# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभ दीपावली

सप्रेम नमस्कार,

सोबत 'शब्द रुची' दिवाळी अंक पाठवला आहे.

आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!

आपले स्नेहांकित,

अरुण जोशी, संपादक

सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त

आणि

योगिता मोरे

धनश्री धारप

ग्रंथाली परिवार

grantháli01@gmail.com
granthali02@gmail.com




शब्द
रुची
दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१४
१०० रुपये
४०


Edge of your seat thrillers unlimited
This is Maharashtra, and these are our royal entities. So take a trip down to this land and discover these beasts that are born to roam free. With reasons unlimited, it is only fair to say one trip is just not enough.
Chandrapur
BOR
TIPESHWAR
DAJIPUR
KARNALA
महा at
MAHARASHTRA
unlimited
MAHARASHTRA TOURISM
www.maharashtratourism.gov.in | Toll Free No: 1800 - 229930



येणाऱ्या आनंदी दिवसांसाठी
सणासुदीच्या हंगामासाठी
विशेष ऑफर
खालील योजनांवर
प्रक्रिया शुल्कामध्ये माफी/सवलत :
सेंट होम
सेंट मॉर्गेज
सेंट ट्रेड स्कीम
रेन्टल्स
पर्सनल लोन
पर्सनल लोन
खालील योजनांवर
व्याज दरात घट :
रेन्टल्स
पर्सनल लोन
पर्सनल लोन
विशेष
उत्सव ऑफर
दिनांक 31 मार्च, 2015
पर्यंत उपलब्ध
अधिक माहितीसाठी कृपया आमच्या जवळच्या
शाखेशी संपर्क साधा.
सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी ''सेंट्रल''
www.centralbankofindia.co.in "CENTRAL" TO YOU SINCE 1911

Follow Us On

Missed Call Alert | 022-61038621

SPARK DEVELOPERS
creating world for you

This Deepawali

**Explore Extravagance In Each Element**
**As You Light Up Your Divine Paradise**



Our Projects At

Worli | Andheri | Ghatkopar | Kalbadevi | Wadala | Vile-Parle | Mulund | Sion

**Corporate Office :**
102, Saroj Apartment, 1st Floor, N.P. Marg, Opp. to Matunga Gujarati Club, King's Circle, Matunga, Mumbai - 400 019
W : www.sparkdevelopers.com | E : sales@sparkdevelopers.com | T: +91 22 65647577 / 78 / 79 / 80



**Desai Oceanic, Worli**

sms SPARK WORLI to 567678



**Jyoti Palatine, Ghatkopar**

sms SPARK GHATKOPAR to 567678



**Mogra Vikas, Andheri**

sms SPARK ANDHERI to 567678



**Desai Classic, Wadala**

sms SPARK WADALA to 567678

Disclaimer: This advertisement is merely conceptual and is not a legal document. It cannot be treated as a part of final purchase agreement.
All dimensions are approximate and subject to construction variances. The developer reserves sole rights to amend architectural specifications during development stages.

शब्द रुची

दिवाळी विशेषांक : ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१४
वर्ष दुसरे, अंक सहावा–सातवा, मूल्य १०० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ चित्र : **किरण हणमशेट**
मुखपृष्ठासह आतील मांडणी : **सतीश खानविलकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

वार्षिक वर्गणी १५० रुपये
दोन वर्षांची वर्गणी २५० रुपये
तीन वर्षांची वर्गणी ३०० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com



**सोशल नेटवर्किंग**

इनोसंट गेम / २३
**अरुण मार्तंड**
सोमी भाषा : एक संशोधन / ३०
**प्रतिक पुरी**
इंटरनेटचं सामर्थ्य / ३५
**धनंजय गांगल**
सोशल मीडिया, सत्ता आणि राजकारण / ५३
**प्रज्ञा शिदोरे**
वेबमंथन आणि आपलं 'सर्च' लाईफ / ६७
**माधव शिरवळकर**
रेडिओचे दिवस आलेत, पण आकाशवाणी कुठे गेली? / ७३
**मेधा कुळकर्णी**
ॲनिमेशनचं भयावह जग / १२२
**अपर्णा पाटील**
सायबर गोबेल्सचे आव्हान! / १२८
**गणेश देवकर**
इंटरनेटवरील उचलेगिरी / १३५
**तनुश्री संदेश राणे**
'कॅश'लेसच्या दिशेने... / १३७
**मोहन टांकसाळे**

**ललित/वैचारिक**

वेडगावचे शहाणे / ११
**डॉ. उज्ज्वला दळवी**
मात निसर्गावर / ४१
**स्मिता भागवत**
समीरचे समांतर जीवन / ८१
**उमेश कदम**
लोकशाहीर ज्ञानोबा उत्पात / ९९
**अरुण पुराणिक**
अमेरिकेतील स्मरणीय व्यक्ती आणि स्मारके / १०५
**डॉ. दाऊद दळवी**
'ना.घं'चं मेहेकर आणि मोझार्टचं साल्झबर्ग... / १०९
**प्रवीण बर्दापूरकर**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

काश्मिर – एक काळवंडलेला कौस्तुभ / ११४
डॉ. अनंत पां. लाभसेटवार
मदनबाण अशोक / १४१
प्रा. नीला अशोक कोर्डे
वंशाचा दिवा आणि वंशवेल / १५५
सुधीर थत्ते
भारताचे 'वॉल्ट डिस्ने' – व्यंगचित्रकार प्राण / १६०
प्रभाकर वाईरकर
विनोबांची त्रयी... / १६७
बाबूराव चंदावार
उंबरठा (स्पर्धा कथा) / १७१
सु.गो. तपस्वी
टिकाराम बापू / १९१
श्रीकांत देशमुख
कुलवृत्ताच्या निमित्ताने / २००
प्रभाकर भिडे
अरे बाबा जाहिरात! / २०५
रविप्रकाश कुलकर्णी
सांस्कृतिक प्रमुख / २०९
प्रा. प्रतिभा सराफ

कवितेची पाने / २१८
अनुवाद किशोर मेढे (मूळ – गुलजार),
चंद्रशेखर सानेकर, उषा मेहता, अशोक कोतवाल,
सुमन फडके, सदानंद डबीर, स्मिता मेढी,
ऐश्वर्य पाटेकर, प्रदीप गुजर, शकुंतला मुळ्ये,
श्रीपाद जोशी, अंजली दासखेडकर, प्रशांत असनारे,
स्नेहल मिरगणे, बबन लोंढे, सरोज जोशी,
आनंद सांडू, सुरेश पाचकवडे, भगवान निळे

ग्रंथपान / २२७
चांगदेव काळे



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय

'तुज नमो, तुज नमो' करत भारतवासीयांनी भाजपाला एकहाती सत्ता दिली. त्यात काँग्रेसच्या नाकर्तेपणाइतका सोशल नेटवर्किंगचा वाटा सिंहाचा आहे. ज्या काँग्रेस राजवटीत संगणक आला, माहिती–तंत्रज्ञान पसरलं, संपर्क–साधनं वाढली त्या काँग्रेसलाच त्यांचा वापर करता आला नाही, हे वास्तव आहे. संगणक म्हणजे माणसानं निर्माण केलेला कृत्रिम आणि सार्वजनिक मेंदूच! आपल्या मेंदूला शीण न आणता, आपल्याला हवं ते हवं तेव्हा देण्यासाठी साठवणारा. अशा अनेक मानवी मेंदूंनी आपल्याला वाटेल ते त्यात साठवावं आणि कुणीही ते पाहावं असा सार्वजनिक मेंदू. त्याची निगा राखणं एवढंच आपल्या मेंदूचं काम! मात्र आता हा सार्वजनिक मेंदू आपल्याला विचारच करायला देत नाही, इतका तो प्रबळ झालाय. आपणच निर्माण केलेल्या मायावी राक्षसानं आपल्यावरच उलटावं तसा. सेल फोनद्वारा अल्लाउद्दिनच्या चिरागासारखा आता तो तळहातावर आलाय. संगणक आणि माहिती–तंत्रज्ञानाची स्वतंत्र दुनियाच गेल्या तीसेक वर्षांत निर्माण झाली. न मागताच त्यात सिटिझनशिप मिळते; नव्हे, घ्यावी लागते. यातून संस्कृतींची, विचारांची, मूल्यांची अशी काही सरमिसळ केली गेली आहे की प्रत्येकात एकाच वेळी आत्मसिद्धता आणि न्यूनगंड, दोन्ही वस्तीला आहेत!

काय घडलं या माध्यमक्रांतीनं? संस्कृती घडवणं–बिघडवणं, मूल्यं कुरवाळणं–बदलणं, विचार मांडणं–खोडणं, सत्ता आणणं–उलथवणं, जगणं सुसह्य–असह्य करणं... हे पूर्वीही होतच होतं. पारावरच्या गप्पांना पारावर नव्हता. आता त्या 'सोशल मीडिया'नामक पारावर आल्या आहेत. खेडेगावातला पार आता ग्लोबल खेड्याचा झाला आहे. म्हटला तर तो 'विश्वचि माझे घर' असा उदात्त आहे, शुद्ध आहे; म्हटलं तर त्यात युद्ध आहे, स्पर्धा आहे. कारण हा कृत्रिम मेंदू म्हणजे समस्त मानवांच्या मेंदूंचं चक्रावून टाकणारं जाळं आहे. त्याचा प्रभाव आपलं जगणं ताब्यात घेत आहे. आज मूकपटांसारखं झालं आहे. संवाद होतो, विचार प्रसवतात–पसरतात, पण मूक राहून. त्यांचा वापर–गैरवापर आपल्यावर ठरतो. कारण त्यात चांगलं–वाईट दोन्हीही आहे.

या अंकात त्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. त्यातून निर्माण झालेली भाषा, त्यातल्या साइट्स (चांगल्या व वाईटसाईट) ॲनिमेटेड पात्रनिर्मिती, सत्तांतरात त्याचा हात, वेगवेगळे ॲप्स, इ–बँकिंग, मजकुरातील सत्यता व वस्तुनिष्ठतेचा शोध, सायबर क्राइम... आदी. धनंजय गांगल, प्रतीक पुरी, प्रज्ञा शिदोरे, माधव शिरवळकर, गणेश देवकर, मोहन टांकसाळे, तनुश्री राणे, अपर्णा पाटील यांचे लेख हे पैलू उलगडतात.

अरुण मार्तंड यांची 'इनोसंट गेम' ही कथा याच तंत्रज्ञानाचं 'खेल खेल में' घडणारं थरारक चित्रण करते.

एफएमचा काळ आणि बदलत्या काळानुसार आवश्यक धोरणांचा अभाव याबाबत मेधा कुलकर्णी यांचा लेख 'सोशल नेटवर्किंग'मधील 'आकाशवाणी'चं आजचं स्वरूप विशद करतो.

यशवंतराव चव्हाण पुलंना 'विदूषक' म्हणाले होते. पुलंनी त्यावरच चित्रपटकथा लिहिली. 'विदूषक' म्हणजे केवळ गमत्या कसा नसतो, हे सांगताना डॉ. उज्ज्वला दळवी यांनी विश्वव्यापी विदूषकांचं सर्वांगसुंदर रेखाटन केलं आहे.

एका प्रख्यात लेखकाला स्त्रीभावना आपल्या हातून पुरेशा उतरत नाहीत अशी खंत होती. त्यासाठी त्यानं पुरुषदेह त्यागून स्त्री होण्याचं ठरवलं. तो 'ती' झाला. त्या 'ती'नंही साहित्य प्रसवलं. तेही लोकप्रिय ठरलं. हा जेंडर चेंज विस्मयकारक आहे. अशा लिंगबदलाबद्दल स्मिता भागवत यांचा लेख उत्तम वठला आहे.

'ज्ञानोबा माऊली' म्हणत पंढरपुरात भक्तिसागर फुलतो. याच भूमीत लावणीसम्राट ज्ञानोबा उत्पात जन्मले. या दुसऱ्या ज्ञानोबानं लावणीला समृद्ध केलं. त्यांचं व्यक्तिचित्र अरुण पुराणिक या त्यांच्या सख्ख्या भाच्यानं रेखाटलंय.

'वंशाचा दिवा हवा' अशी अपेक्षा हे आजही दुर्दैवी वास्तव आहे. मुलगाच जन्माला यावा ही इच्छा किती प्रमाणात आहे व त्याचे भविष्यातील परिणाम काय होतील, यावर सुधीर थत्ते यांचा लेख सामाजिक मानसिकतेवर प्रकाश पाडणारा आहे.

'कॉमिक्स' हा लहान-थोरांचा आवडता विषय. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळात परदेशी कॉमिक्सचा पगडा होता. याच काळात जन्म झालेल्या प्राण कुमार शर्मा यांनी कॉमिक्समध्ये भारतीय संस्कृती व व्यक्तिरेखा असाव्यात असा विचार केला. १९६० साली त्यांचं पहिलं कॉमिक्स 'ढब्बू' प्रसिद्ध झालं. पुढे, 'चाचा चौधरी'नं जनमनाला वेड लावलं. नुकतंच 'प्राण' यांचं निधन झालं. त्यांच्या कर्तृत्वाचा जीवनालेख प्रभाकर वाईरकर यांनी मांडला आहे.

नीला अशोक कोर्डे यांचं अभिजात साहित्य, संस्कृतीमधील वृक्ष-फुलांवरील अभ्यासपूर्ण विवेचन गेल्या दोन दिवाळी अंकांत आपण अनुभवलं. या अंकात 'अशोका'बद्दल त्यांचा लेख तसाच उद्‌बोधक आहे. स्मारकं आणि वारसा याबाबत आपली उदासीनता कशी आहे हे डॉ. दाऊद दळवी यांच्या 'अमेरिकेतील स्मरणीय व्यक्ती आणि स्मारके' आणि प्रवीण बर्दापूरकर यांच्या 'ना.घ.'चं मेहेकर आणि मोझार्टचं साल्झबर्ग...' या लेखांतून स्पष्ट होतं. तर चित्रपट जाहिरातींमागची कथा रविप्रकाश कुलकर्णी सांगतात.

कुलवृत्त म्हणजे एका आडनावाची डिरेक्टरी असं म्हटलं जातं. त्यात भवताल, त्यावेळची सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती अभावानं आढळते. प्रभाकर भिडे यांनी 'कुलवृत्ताच्या निमित्तानं' मिळालेल्या ज्ञानाचे, माहितीचे रोचक अनुभव लिहिले आहेत. बाबूराव चंदावार यांनी 'विनोबांची त्रयी' सांगितली आहे. 'काळवंडलेला कौस्तुभ' हा अनंत लाभसेटवार यांचा काश्मिरवरील लेख सुस्वरूप-विरूप याचा लेखाजोखा आहे.

ज्येष्ठ कथाकार उमेश कदम यांच्या कथेसह सु.गो तपस्वी यांची स्पर्धा-कथा (यातील पर्यायांवर वाचकांना आवाहन आहे), प्रतिभा सराफ यांची कथा आणि श्रीकांत देशमुख यांचं उत्तम व्यक्तिचित्रण अंकात वाचायला मिळतं, तसाच कवितांमधून विविध छटांचा आविष्कार घडतो.

दिवाळी अंकाला 'सोशल नेटवर्किंग' हा मुख्य विषय योजला. अंकाचं काम सुरू असताना गणपतीचे दिवस सरले होते. 'गणपती दूध पितो' हे क्षणात जगभर करण्याची किमया या तंत्रज्ञानानं केली! आजही 'प्लँचेट' केलं जातं, निवडणूक अर्ज भरायला पितृपक्ष संपण्याची वाट पाहिली जाते. त्याचवेळी सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी भल्या सकाळी भारताचं 'मंगळ मिशन' यशस्वी होतं. त्याबद्दल व्हायलाच हवा असा आनंदाचा जल्लोशही होतो. प्रखर बुद्धिमत्तेतून या तंत्रज्ञानाचा उदय झाला, तरी प्रगल्भतेचा प्रसार मात्र झालेला दिसला नाही, दिसत नाही. बुद्धी आणि मनाचा हा अजब खेळ आपण सतत अनुभवत असतो.


जग बदलेल, जीवनरीत बदलेल, व्यक्त होण्याची साधनं बदलतील, पण माणसाचा ध्यास आणि प्रवास काही थांबणार नाही. माणूस यंत्रवत होण्याची प्रक्रिया वाढत असली तरी बऱ्याचअंशी त्यातला 'माणूस' जिवंत आहे. तो पुढे पुढे जात आहे. नवी क्षितिजं त्याला खुणावत राहतील. आजचा अभिमानाचा क्षण आहे ती भारताची यशस्वी 'मंगळ'स्वारी. त्या साध्यानं माणसातलं अमंगळ दूर होण्याचा असाच ध्यास ठेवला तर पुढचा प्रवास मंगल होईल.

अंक सिद्ध करताना, मुखपृष्ठासाठी किरण हणमशेट यांचं लाभलेलं उत्कृष्ट पेंटिंग, मुखपृष्ठसह एकूणच मांडणी करणारे सतीश खानविलकर, संजय कुलकर्णींनी टाइपसेटिंग करताना केलेली धावपळ, चाललेल्या कामावर आस्थेनं लक्ष ठेवून गरज असेल तिथे मदत करणाऱ्या योगिता मोरे, जाहिरातींसाठी धनश्री धारप यांचे परिश्रम, उत्तम मुद्रण करणारे इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे आनंद लिमये आणि जाहिरातदार-हितचिंतक यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

पुढील अंक डिसेंबरचा 'पर्यटन विशेषांक' आहे. आल्हाद गोडबोले त्याचं संपादन करत आहेत.

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.

**– अरुण जोशी**


टीजेएस्‌बी बँक
टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड
विश्वास जिंदगी भर का
मांगल्याची सुरुवात दिवाळी. नात्यांची दृढ वीण दिवाळी.
आनंदाची, रंगांची दिवाळी. तेजोमयतेचा नवा आरंभ दिवाळी.
टी जे एस्‌ बी सहकारी बँक परिवारातर्फे सर्वांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
- वैयक्तिक कर्जे -
तुमची सर्व स्वप्नं दिवाळीच्या शुभमुहुर्तावर साकार करा
प्रवास
शिक्षण
समारंभ
घराचे नूतनीकरण
गृहोपयोगी वस्तू
प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय - टी जे एस्‌ बी हाऊस, प्लॉट नं. बी ५, रोड क्र. २,
वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४ टोल फ्री - १८०० २२३ ४६६ www.tjsb.co.in

*Congratulations to Granthali for*
*40 years journey and*
*Best wishes for the future*

ASHAR

DREAMS • DESIGN • DELIVERY

Corp. Off. : "Ashar IT Park", Ground Floor, Road No. 16Z,
Wagle Estate, Near Agriculture office, Thane (W)-400604
Tel. Fax : 67751111 (30 lines) ● www.ashar.in
email : ashar44@rediffmail.com

# वेडगावचे शहाणे

**डॉ. उज्ज्वला दळवी**



**विदूषक** म्हणे विघ्नेशाला,
भक्त मी, तुझा सच्चा चेला!
माझं नाक, तुझी सोंड;
माझा कोट, तुझं पोट;
सदा गिरवतो तुझाच कित्ता;
तू दुःखहर्ता, मी सुखकर्ता!

विदूषक! सर्कशीतला, माकडचेष्टा करणारा, भडकरंगी, बटबटीत मुखवट्याचा वेडसर माणूस! शाळकरी पुनीतला विदूषक अजिबात आवडला नाही! आधी तर त्याला त्या माणसाची भीतीच वाटली. मग तारेवरची कसरत, झुल्यावरची झेप, सुराफेक वगैरे खेळ चालू झाले. पुनीतला त्यांची भीती अधिक वाटली. काळजी, दडपणही वाटलं. मग त्या सगळ्या करामती विदूषकानंही केल्या. त्यांच्यात मुद्दाम चुका करून तो सराईतपणे सावरलाही! त्याच्या सफाईदार मूर्खपणामुळे पुनीत इतर काळजी तात्पुरती विसरला. आठ वर्षांच्या पुनीतला ते त्यावेळी जाणवलं नाही, पण पुढचा आठवडाभर त्याला पुन्हापुन्हा त्या विदूषकाची आठवण येत राहिली. त्याच्या चुकांमागे दडलेला, पुनीतच्या काळजीची काळजी घेणारा, खरा विदूषक हळूहळू समजत गेला. मग मात्र पुनीतच्या मनात 'सर्कस म्हणजे विदूषक' हे समीकरण पक्कं झालं!

विदूषक! शारीरिक आणि पोशाखी बेडौलपणाच्या आड चातुर्य, चापल्य आणि कौशल्य लपवणारा! पुनीतसारखा सखोल

> विदूषक ही वल्ली स्थळकाळातीत आहे. वेगवेगळ्या देशांतले, भिन्न संस्कृतींतले, पुरातन काळापासून आजपर्यंतचे सगळे विदूषक काही नियम कटाक्षानं पाळतात. कुठलाही विदूषक समाजात वावरतो, रीतिरिवाजांत भाग घेतो आणि तरीही त्याचा पाय कशातही गुंतलेला नसतो.

विचार सगळीच मुलं, अगदी मोठी माणसंसुद्धा करतातच असं नाही. पण त्यांच्या अंतर्मनाला ते कळतं. म्हणूनच विदूषक सगळ्यांचा लाडका असतो. सर्कशीतला विदूषक तारेवरच्या कसरतीत जी विनोदी धडपड करतो तिला इतर कलाकारांहून अधिक कसब अंगी असायची गरज असते. अमेरिकेतल्या चित्तथरारक रोडिओ-स्पर्धेमधले विदूषकही मस्तवाल बैलासमोर वेडेवाकडे नाचरे चाळे करतात. त्या चाळ्यांनी ते त्या बैलाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतात आणि त्याला हुलकावण्या दाखवत दूर नेतात. त्याच्यावरून पडलेल्या काउबॉयला इजा होऊ देत नाहीत. ते स्वतःचा आणि काउबॉयचाही जीव वाचवतात आणि त्यातही वेंधळेपणाचं प्रदर्शन करून लोकांना हसवतात. एरवी समाजात वावरणारे इतर विदूषकही स्वतःचं हसं करून घेत असतानाच, विनोदाच्या शालजोडीतले आहेर देत समाजाच्या दांभिकतेचं पितळ उघडं पाडतात. त्या सगळ्या हास्यास्पद आणि सोप्या वाटणाऱ्या गोष्टी साधायला मोठं धाडस, प्रसंगावधान आणि चलाखी लागते. आपल्या माकडचेष्टांनी हसवता हसवता प्रेक्षकांना अंतर्मुख करायचं अलौकिक कसब विदूषकाच्या अंगी असतं. विदूषकाच्या खऱ्या विनोदाची प्रत मानवी विनोदबुद्धीला पटणारी आणि आवडणारी अशीच असते.

हसणं आणि विनोद कळणं यात फरक आहे. प्रयोगशाळेतले उंदीरही गुदगुल्या केल्यावर तारसप्तकाच्या पार सूर लावून हसतात. पण दोन गोष्टींतल्या विसंगतीची संगत लावून त्यातला विनोद जाणणं ही मानवाची खासियत आहे. जोवर भाषेचा उगम झाला नव्हता तोवर त्यासाठी ढोबळ विसंगती पुरत होती. सर्वसामान्यांहून वेगळं दिसणारं काहीही हास्यास्पद ठरत होतं. गंभीर प्रसंगांतला ताण विनोदानं कमी करणाऱ्या माणसाची समाजाला गरज असते. पुरातन काळात त्यासाठी केवळ वेडाविद्रा माणूस चालत होता. आदिमानवांच्या भटक्या टोळ्यांमध्ये एखाद्याचं व्यंगही इतरांच्या करमणुकीचा विषय बनलं असावं अशी शास्त्रज्ञांची अटकळ आहे.

मध्ययुगीन युरोपातही शारीरिक व्यंग असलेले, खरेखुरे वेडे लोक 'पाळले' जात. त्या बापड्यांच्या वेड्या चाळ्यांना, कुरूपतेला हसून त्यांचे श्रीमंत पोशिंदे आपली करमणूक करून घेत. इसवी सनापूर्वीच्या दुसऱ्या सहस्रकात चीनच्या राजानं आपल्या संग्रही अनेक 'खरे' वेडे जमवले होते. ग्रीक आणि रोमन सरदारांपाशी अष्टवक्र कुरूप गुलाम बाळगलेले असत. मॉन्टेझूमा या ॲझ्टेक सम्राटाच्या पदरीही तसे ओबडधोबड गुलाम होते. त्यांच्या व्यंगाची सतत कुचेष्टा होई. 'अती झालं आणि हसू आलं' अशी अवस्था झाल्यामुळे त्यांची भयभीती लोपली. ते विनोदाच्या रूपात सडेतोड खरं बोलायला लागले. जगभरातल्या विदूषकी वृत्तीची सुरुवात तशी झाली असावी.

भाषेचा विकास होत गेला; विचार व्यक्त करायला शब्दांचे संकेत वापरात आले आणि विसंगतीला अनेक नव्या छटा लाभल्या. तसे संकेत वापरायला किमान तीस हजार वर्षांपूर्वी सुरुवात झाली असावी असं सांगणारे पुरावे शास्त्रज्ञांना मिळाले आहेत. त्यानंतर सातत्यानं समाजाची विनोदबुद्धी अधिकाधिक सुसंस्कृत होत गेली आणि निःशब्द विनोदांचीही पातळी उंचावली.


तशीच प्रगती लहान मुलांतही दिसते. दोन वर्षांचं मूल गुदगुल्यांनी, कुकूचकू केल्यानं खिदळतं. पाच-सहा वर्षांचं मूल कार्टूनमधल्या धडपड्या जोकरला पोट धरधरून हसतं. आठ-दहा वर्षांचं मूल त्या जोकरला हसतं, पण त्याला त्यात मजा वाटत नाही. विदूषकाच्या शाब्दिक विनोदांनी त्याची खरी करमणूक होते. शिवाय त्याच वयात त्याला स्वतःमधल्या उणिवा कळतात आणि त्यांच्याबद्दल विनोद करून वडीलधाऱ्यांकडून दिलासा मिळवायचा प्रयत्नही करता येतो. म्हणजेच त्याच्या मनातला सुसंस्कृत विदूषक जागा होतो.

नजरेत भरणारी विसंगती, सामान्य दर्जाचा धांगडधिंगा यांनी मेंदूच्या पाठीमागचा भाग उद्दीपित होतो. शाब्दिक विनोदातल्या वाक्याचा अर्थ डावा मेंदू लावतो. पण ते दृश्य किंवा वाक्य पूर्वीच्या सामान्य अनुभवांच्या नोंदीशी ताडून, त्या संदर्भानुसार नव्यातली विसंगती जाणून नव्याजुन्यातल्या विरोधाभासाला दाद द्यायचं काम

कोशारी



उजवा मेंदू करतो. मेंदूच्या एका बाजूनं विनोदाची टाळी वाजत नाही. त्याला मेंदूचे दोन्ही भाग सजग असावे लागतात. म्हणूनच विनोदानं बुद्धी तल्लख होते.



जसजशी मानवजात अधिकाधिक सुसंस्कृत होत गेली तसतशी 'खऱ्या' वेड्यांची हिणकस करमणूक मागे पडली. मनोरंजनासाठी 'खोट्या' जपानी कल्चर्ड मोत्यांसारखे सुसंस्कृत विदूषक सरसावले. आदिवासी जमातींमध्ये ते धार्मिक सोपस्कारांचा भाग झाले, मांत्रिक आणि वैद्य झाले. होपी ह्या अमेरिकेतल्या आदिवासी जमातीत माकडचेष्टा करणारा 'कोशारी' हा विदूषक पापी मनाचा प्रतिनिधी असे. नृत्यनाट्यात त्याला उपरती झालेली बघताना प्रेक्षकांच्या मनातली नीतिनियमांची बंधनं पक्की होत. आफ्रिकेच्या काँगो खोऱ्यातले 'बम्बूटी' विदूषक थट्टेनं सगळा दोष स्वतःकडे घेत जमातीतले तंटेबखेडे सोडवत. हेयोका जोडपी एकमेकांची मस्करी करत संकटग्रस्त गावकऱ्यांना नवी उमेद देत.

आफ्रिकेतल्या काही जमातींच्या नीतिकथांत विदूषकांना पंचतंत्रातल्यासारखी किंवा इसापकथांसारखी प्राण्यांची रूपं दिली गेली. तशा कथांतल्या लांडग्यांनी विदूषकी कावा वापरून देवांकडून आपल्या जमातीसाठी विस्तव मिळवला. पाऊस पाडण्याच्या मंत्रतंत्रातही विदूषकांचं सहकार्य असे.

विदूषक' याचा शब्दशः अर्थ 'अपभ्रष्ट', 'विद्रूप करणारा' असा आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांहून वेगळं, विसंगत दिसणं, स्वतःच एक जिताजागता विनोद बनणं हा व्यावसायिक विदूषकाच्या जॉब डिस्क्रिप्शनचा भाग आहे. इजिप्तच्या पुरातन चित्रलेखांत फरोहाच्या दरबारातल्या, दैवी नृत्य करणाऱ्या', डांगा नावाच्या बुटक्याचं वर्णन आहे. मोहेन-जो-दारोच्या उत्खननामध्ये नाचणाऱ्या बुटक्यांच्या मूर्ती सापडल्या आहेत. त्या इसवी सनपूर्व २५००च्या काळातल्या आहेत. शेक्सपीयरच्या नाटकांत विदूषकाचं काम करणारे, रॉबर्ट आर्निमसारखे नामांकित नटही बुटकेच होते. हॉलिवूडमध्ये तर त्या कामासाठी 'बुटके-संग्रह'च आहे. त्याउलट काही विदूषक उंच, किडकिडीत असतात आणि पोक काढून, हात लटकावत चालतात. त्यात भर म्हणून ते पायांना लांब काठ्या बांधून लांबटांगी सोंग बनतात. सोबत इतरही शारीरिक व्यंग असलं तर ठीक, नाहीतर नाकीडोळी नीटस असूनही स्वतःला 'वक्रतुंड' म्हणवून घेत; मग त्या नावाला सार्थ ठरवायला वाकडं केलेलं तोंड; रंगवून विद्रूप केलेला, भडक आयसिंगवाल्या केकसारखा चेहरा; नाकावर लालभडक गोळा; टकलाच्या चंद्राभोवती पिंजारलेल्या केसांची प्रभावळ अशी उसनी व्यंगंही ते मिरवतात. कळसूत्री हालचालींच्या, चमत्कारिक अंगविक्षेपांच्या आणि वेंधळेपणाच्या आभूषणांनी त्यांची विरूपता अधिकच खुलते.

विदूषकी पोशाखही रीतिरिवाजाला धरून नसतो. चौपट अंगाचे भोंगळ, अस्ताव्यस्त कपडे; टोपीला गाढवाचे कान, तुमानीला शेपटी अशासारखं ध्यान बनूनच विदूषक अवतरतो. दादा कोंडक्यांचा वाढत्या अंगाचा सदरा, अर्धी चड्डी आणि लोंबती नाडी ह्याच व्यावसायिक गणवेशाचे प्रतिनिधी होते. चार्ली चॅप्लिन काळा सूट घालत असले तरी मोठ्ठी हॅट, लांब, बेढब विजार आणि आखूड कोट असा त्यांचा विक्षिप्त थाट असे. तशा विचित्र पोशाखांमुळे त्यांचा विदूषकपणा तर नजरेत भरेच, पण त्याचवेळी त्यांचं व्यक्तिमत्त्वही उणं, नगण्य बने. सतराव्या शतकापासून पाश्चात्य विदूषकांच्या अंगावर 'मोटली' नावाचा, अंगावर ताणून बसणारा, अतरंग-

इजिप्तचे बुटके नर्तक



ठिगळी, इंद्रधनुष्यी पेहराव चढला. डोक्यावरच्या लांब, टोकदार टोपीला गोंडा आला. हातातल्या काठीला विदूषकी डोकं उगवलं. पत्त्यांतला जोकर तसल्याच वेषात असतो.

जुन्या काळतल्या भारतीय विदूषकांचं ध्यानही हास्यास्पदच असे. विदूषकानं आपल्या दिसण्यानं, बोलण्यानं, पोशाखानं आणि रंगरंगोटीनं हंशा पिकवावा असं भरताच्या नाट्यशास्त्रातही म्हटलेलं आहे. संस्कृत नाटकांतला विदूषक खुजा, कुबडा, दंताळा, टकल्या असे. त्याच्या डोळ्यात फूल पडलेलं असे. अंगाला विभूति फासून, चिंध्या आणि कातडी नेसून, हातातली कुटिलका म्हणजे वेडीवाकडी काठी मिरवत तो नाटकात वावरत असे. मथुरेच्या वस्तुसंग्रहालयातल्या एका पदकावर सभेत भाषण करणाऱ्या तशा काठीवाल्या विदूषकाचं कोरीव उठावाचं चित्र आहे. वेरूळच्या लेण्यांतही राजाच्या किंवा देवाच्या पायांशी, आसनाखाली बसलेल्या बुटक्या विदूषकांची चित्रं आहेत.

विदूषकांच्या त्या 'वरलिया सोंगा'ची बतावणी स्वतःकडे कमीपणा घेण्यासाठीच असे. विनोद साधताना तो स्वतःतल्या उणिवा ठळकपणे मांडे. त्यावरून गंमत करत स्वतःकडे कमीपणा ओढवून घेई. त्या उणिवांच्या बुरख्याखाली तो आपली बुद्धिमत्ता, चातुर्य आणि चलाखी धूर्तपणे दडवू शके. तरीही त्याचं मूर्खपणाचं सोंग इतकं चांगलं वठे की तो पोशिंद्याचा किंवा नायकाचा प्रतिस्पर्धी कधीही होत नसे. उलट तो नायकाचा विश्वासू सल्लागारच बने. त्याच्या हास्यविनोदांनी राजाला चार घास जास्त जात. आणि विदूषकाच्याही रोजच्या दोन घासांची






निश्चिंती होई. त्याचा विनोद कधीही आक्रमक किंवा स्वतःचा मोठेपणा मिरवणारा नसे. तो फार तर गमतीच्या गोष्टी सांगून सर्वांना आपलंसं करून घेणारा असे. तशा विनोदानं राजाचा किंवा दरबारी मंडळींचा अपमान तर होत नसेच; शिवाय त्याचा तो विनोदी कमीपणा गौण सेवकांना, दास-चाकरांनाही सुखावून जाई. विदूषक सर्वांचा लाडका होई. त्या लोकसंग्रहातून त्याला सार्वजनिक हिताच्या अनेक गोष्टी साधता येत.

इसवी सनापूर्वीच्या तिसऱ्या शतकात चीनमध्ये अत्यंत जुलमी राजवट होती. त्या राजानंच चीनची भिंत बांधली. त्यानंतर त्यानं त्या भिंतीच्या बाहेरच्या भागाला रंग द्यायचं फर्मान काढलं. रंग लावणाऱ्या गरिबांना बाहेरच्या शत्रूंपासून कसलंही संरक्षण दिलं जाणार नव्हतं. हजारो गरीब कामगार नाहक प्राणाला मुकले असते. राजाच्या चतुर विदूषकानं आपलं कौशल्य पणाला लावून ती रंगरंगोटी रद्द करवली. हरून-अल-रशीदच्या लवाजम्यातल्या बहालूल नावाच्या गमत्यानं वेडाचं सोंग घेऊन स्वतःचा आणि इतरही अनेकांचा जीव वाचवला. त्याच्या कथा मध्यपूर्वेत लोकप्रिय आहेत. आठव्या हेन्रीच्या लहरी कारभारात गोरगरिबांचं हित जपायची मोलाची कामगिरी राजाच्या विदूषकानं, विल सॉमर्सनं बजावली. लोकहिताची जबाबदारी राजकारण्यांपेक्षा विदूषकांनीच कित्येकदा अधिक समर्थपणे पेलली आहे.

रिचर्ड टार्लटन हा सोळाव्या शतकातला सुप्रसिद्ध विदूषक. एलिझाबेथ राणीला तिच्यातले दोष सुनावायचं अवघड काम फक्त तोच

करू जाणे. तिचा चढलेला पारा उतरवायला त्याच्या विनोदांचं शिंपण लागे. तो अत्यंत लोकप्रिय विनोदी नट होता. व्यापारी मनोवृत्तीच्या शहरी लोकांना टार्लटनच्या गावरान विनोदांनी व्यापक सामाजिक दृष्टी दिली. त्यानं नाटकं लिहिली; गाणीही लिहिली. काळाच्या ओघात ते सगळं साहित्य हरपलं. पण रंगमंचावर असतानाही नाटक आणि सामान्य जीवन यांच्यातली सीमारेषा सहज ओलांडून प्रेक्षकांशी संवाद साधणाऱ्या, त्यांना नाटकातले बारकावे समजावून देणाऱ्या विदूषकाची त्यानं सुरू केलेली परंपरा शेक्सपीयरच्या नाटकांनी उचलली आणि अजरामर केली. विदूषक हा नाटक आणि प्रेक्षक यांच्यातला दुवा झाला. १७६८पासून विदूषकानं सर्कशीचं रिंगणही काबीज केलं.

विजयनगरच्या कृष्णदेवरायाच्या पदरी असलेला ‘विकटकवी’ तेनाली रामनही सोळाव्याच शतकातला आणि बिरबलही त्याच वेळचा. ते दोघंही विनोदी असले तरी विदूषक नव्हते. ते चतुर आणि ज्ञानी म्हणून सन्मानानं जगले. त्यांनी थट्टेतही कधी स्वतःचं हसं करून घेतलं नाही.



रंगमंच आणि प्रेक्षक यांच्यातला दुवा सांधणारा पारंपरिक विदूषक भारतातल्या वेगवेगळ्या गावांत आणि तऱ्हेतऱ्हेच्या संस्कृतींत, भाषांत आढळतो. आपल्या मराठी तमाशातला सोंगाड्या, केरळातल्या ‘चाक्यार कूथु’मधला पौराणिक कथांचं गमतीदार विडंबन सादर करणारा ‘चाक्यार’ आणि उत्तरप्रदेशच्या नौटंकीमधला ‘मुन्शी’ हेही विदूषकच. मणिपुरी रासलीलेतला पेंद्यासारखा ‘मनसुखा’, काश्मिरी ‘भांड पाथेर’मध्ये सूत्रधाराच्या निवेदनाला विनोदी साथ देणारे ‘मसखरे व नक्काल’ आणि कानडी यक्षगानातला ‘हास्यगम्’ हे त्याच हसत्या-हसवित्यांचे भाऊबंद. पंजाबी ‘नक्कल-स्वांग’ ही स्त्रीरूपं आणि गुजराती भवाईतलं ‘रंगला-रंगली’ हे जोडपं हेदेखील त्याच बहुरूप्याचे अवतार! गंमत म्हणजे रंगला-रंगलीचे हास्यविनोद आणि अमेरिकेतल्या पारंपरिक हेयोका जोडप्याची थट्टामस्करी ह्यांच्यात चांगलंच साम्य दिसतं!




ऋग्वेदाच्या सूक्तात हास्याच्या निर्मितीसाठी मजा-मस्करी करणाऱ्या सुखदायक सहकाऱ्यांना ‘हसनम् उपमन्त्रिनः’ असं संबोधलं आहे. ज्याअर्थी त्यांना मन्त्री म्हटलं आहे त्याअर्थी ते राज्यसभेतले अधिकारी असावेत. त्याच काळात सर्वसामान्यांना हसवण्यासाठी गंमत करणारे ‘करी’ हे व्यावसायिकही होते. प्राचीन काळात बहुधा नटांचं काम लोकांना हसवणं हेच असावं. बौद्ध साहित्यातल्या थेरा गाथा या प्राचीन ग्रंथात तलपूत या नाट्यदिग्दर्शकाचं तथागताबरोबरचं संभाषण आहे. त्यात उल्लेख आहे, ‘जो नट रंगमंचावर सत्याची नक्कल करून लोकांना हसवतो, रमवतो त्याच्या प्रेक्षकवृंदाला हास्याच्या देवगणांमध्ये पुनर्जन्म लाभेल. ते मृत्यूनंतर हास्याच्या देवगणांत पुन्हा जन्माला येतील.’ प्रमथ हे शंकराचे

# नवीन मौज प्रकाशने

रंगवाटेचा वारकरी **अरुण काकडे** यांचे आत्मचरित्र म्हणजे प्रायोगिक रंगभूमीचा जणू आरसाच. अकृत्रिम भाषेने नटलेल्या या आत्मचरित्रात अनेक दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश आहे.

**अमका** : अरुण काकडे

२६८ पृष्ठे + ८ पृष्ठे मोठा आकार पुठ्ठा बांधणी किंमत ४०० रुपये

निजामशाहीच्या अस्ताचे साक्षीदार, तसेच या मुस्लीम राजवटीलाही मानवी चेहरा देणाऱ्या काही व्यक्तींची तसेच अन्य कर्त्याधर्त्यांची सहृदयतेने रेखाटलेली व्यक्तिचित्रे

**संस्थानी माणसं** : नरेंद्र चपळगावकर

१६० पृष्ठे किंमत २०० रुपये

कालातीत आशयाच्या समृद्ध नाटकाचं सहजसोप्या भाषेत केलेले भाषांतर. नाट्यप्रेमी, नाट्यधर्मी आणि कलाकारांसोबतच सामान्य नाट्यप्रेमींनाही नाटकाकडं पाहण्याचा एक समग्र अर्थपूर्ण दृष्टिकोन देणारं पुस्तक

**मृच्छकटिकम् अर्थात मातीच्या गाड्याचं प्रकरण** : राजीव नाईक

संस्कृत नाट्यपाठ : शुद्रक भाषांतर व भाष्य : राजीव नाईक १२२ पृष्ठे किंमत १२५ रुपये

लंपनच्या भावविश्वात वाचकांना गुंतवून टाकणाऱ्या लेखकाच्या ललित लेखांचे भावस्पर्शी लेणे

**चांदण्याचा रस्ता** : प्रकाश नारायण संत

९६ पृष्ठे + ८ रंगीत पृष्ठे किंमत १२५ रुपये

अपू नावाचा लहान मुलगा, थोरली बहीण दुर्गा, सर्वजया, छोटी मोठी कामे करून जगणारा, जगविणारा पिता हरिहर यांची हृदयस्पर्शी कथा. रे यांच्या जगप्रसिद्ध पथेर पांचाली या चित्रपटाची मूळ कादंबरी

**पथेर पांचाली** : विभूतिभूषण वंद्योपाध्याय अनुवाद: नीलिमा भावे

२५६ पृष्ठे किंमत २५० रुपये

तांबोळींची कविता मानवाच्या अंगभूत दुर्बलतेचा, असहायतेचा, अनिकेतत्वाचा आणि परात्मभावाचा वेध घेते. त्यांची कविता वाचताना आपण आपल्याच जगण्याची कहाणी वाचत असल्याचा प्रत्यय येतो.–सुधीर रसाळ

**जन्मझुला** : लक्ष्मीकांत तांबोळी

९८ पृष्ठे किंमत १२५ रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी: २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com




उगवता चंद्रही मोडलेल्या लाडवासारखा दिसे! 'राजाला उर्वशीची इतकी ओढ लागते त्याअर्थी मी जितका कुरूप आहे तितकीच ती सुंदर असावी,' असा तर्कही त्यानं केला.

'मालविकाग्निमित्रा'तला विदूषक, गौतम हा अतिशय बुद्धिमान होता. मालविकेचं फक्त चित्र पाहून तिच्या प्रेमात पडलेल्या राजाला ती 'दाखवायचा' समारंभ त्यानं मोठ्या चातुर्यानं घडवून आणला. नृत्यस्पर्धेच्या निमित्तानं त्यानं कमीत कमी वस्त्रं ल्यालेल्या मालविकेकडून प्रियाराधनाचा अभिनय रंगमंचावर, राजासमोर करवून घेतला. नंतर तिला राणीच्या कैदेतून सोडवायला नामी युक्तीही योजली. त्या संपूर्ण नाटकाचा तो सूत्रधारच झाला.

'शाकुंतल'मधला माधव्य एकांतात राजाला मित्र म्हणून संबोधत असे. त्याच्या सहवासात राजाला त्याचा डामडौल, राज्यकारभाराची जबाबदारी, सगळ्या चिंता विसरता येत. शिकारीच्या वेडामुळे वनात गेलेल्या राजाचं तिथल्या ऋषिकन्येवर प्रेम बसणं म्हणजे 'आधीच एका वेडाचं गळू होतं, त्याच्यावर आता प्रेमाची ही नवीच पुटकुळी आली!' असं माधव्याला वाटलं. 'राजवाड्यातल्या राण्या पाकवलेल्या

अनुयायी गण हास्यरसाच्या किंवा विनोदभावनेच्या क्षेत्रातले अधिकारी देव होते असं भरताच्या नाट्यशास्त्रात नमूद केलेलं आहे. भूमराच्या पाचव्या शतकातल्या लेण्यांत हसवण्यासाठी चित्रविचित्र अंगविक्षेप करणाऱ्या प्रमथगणांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. ते संस्कृत वाङ्मयातल्या विदूषकांचे पूर्वज असावेत.

भासाच्या काळापासून विदूषक संस्कृत नाट्यकथानकांचा भाग झाला. तो जातीनं ब्राह्मण असूनही अशिक्षितांची भाषा, प्राकृत बोलणारा, असंबद्ध आणि पुष्कळ वेळा अश्लील बरळणारा, दासींशी भांडणं उकरून काढणारा, नायिकेची टिंगल करणारा असा असे. तरीही तो नायकाचा सल्लागार आणि जिवलग मित्र, नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा पूरक भाग होई. त्याचं खरं स्थान दरबारात, अंतःपुरातल्या हेव्यादाव्यांनी आणि कटकारस्थानांनी भरलेल्या वातावरणातच होतं. त्याला राजाच्या खाजगी दालनांतही मुक्तद्वार असे. त्याच्या त्या जगात, राजाच्या अनेक प्रेमप्रकरणांनी उद्भवणारी गुंतागुंत त्यानं आपल्या बुद्धिचातुर्यानं आणि कौशल्यानं हाताळली. राजाच्या नव्या प्रकरणाची सफळ परिपूर्ती करून देणं, त्यामुळे इतर राण्यांमध्ये उफाळलेला प्रक्षोभ शांत करणं आणि नव्या सवतीशी त्यांचे सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणं अशी सारी करामत त्याला जमली.


भासाच्या 'स्वप्नवासवदत्तम्' नाटकातल्या भोजनभाऊ विदूषकानं, वसंतकानं वासवदत्तेच्या विरहानं व्याकुळ झालेल्या उदयनराजाला धीर दिला. 'सत्कृत्य करायला आमंत्रणाची वाट बघू नकोस' असा पोक्त सल्लाही दिला. कालिदासाच्या विक्रमोर्वशीयातल्या विदूषकाला, मानवकाला



खजुरासारख्या गोडगोड आहेत म्हणून रुचिपालटाला ही आंबटचिंच ऋषिकन्या हवी का तुला?' असा टोमणाही त्यानं मारला. 'ती चिंच' असाच शकुंतलेचा उल्लेख वरचेवर करून त्यानं राजाच्या प्रणयमाधुरीची मिठी नाटकाला बसू दिली नाही.

कालिदासानंतर अकरा शतकांनी आणि त्याच्यापासून पाच हजार मैलांवर शेक्सपीयर जन्मला. पण त्याच्या आणि कालिदासाच्या विदूषकांनी एकाच प्रहसनशाळेत शिक्षण घेतलं असावं अशी शंका येते! त्यांचं वर्णन वेगळं असलं तरी वर्तन फारच एकमेकांसारखं आहे.

शेक्सपीयरच्या 'ट्वेल्फ्थ नाइट'मधला फेस्ट मूर्खाचं सोंग वठवण्याइतका चलाख होता. त्याला परिस्थितीचा आणि भोवतालच्या माणसांचा बरोबर अंदाज घेता येई. घटनांवर, माणसांवर गरजेनुरूप मल्लिनाथी करून तो लोकांचं मनोरंजनही करत असे. धूमकेतूसारखं अचानक नाटकात अवतरणं आणि एकाएकी अंतर्धानही पावणं ही त्याची खासियत होती. तो नाटकातल्या धमालीचा अविभाज्य हिस्सा होताच; पण तरीही तो नाट्यकथानकातून लीलया बाहेर पडून प्रेक्षकांशी थेट संवाद साधू शके आणि त्यांची नाटकाशी जवळीक साधून देई.




किंग लियरच्या विदूषकाला स्वतःचं नावच नव्हतं. त्याचा मूर्ख (फूल) असाच उल्लेख होई. तो कमी दर्जाचा नोकर असल्यामुळे त्याला चाबकाच्या फटक्यांचा धाक दाखवला जाई. तरीही तो राजाचा जिवलग मित्र होता. राजाचं त्याच्यावाचून पान हलत नसे. राजाच्या तिन्ही मुलींचं खरं रूप त्याला पहिल्यापासूनच कळलेलं होतं. राजाची घोडचूक त्याला भोवणार हे भाकीतही त्यानं वर्तवलं होतं. नीतिनियमांच्या बुरख्याआड दडलेला मोह, क्रूरपणा, पाशवी उद्दामपणा 'मूर्खा'ला स्पष्ट दिसत होता, तो राजाला ते सांगत होता. त्याचं वेळीच न ऐकल्यामुळे राजा देशोधडीला लागला. पण तरीही 'मूर्खा'नं सैरभैर झालेल्या राजाला अंतर दिलं नाही. पापाची शिक्षा आणि पुण्याचं फळ देणाऱ्या दैवी शक्तीवर त्या शहाण्या मूर्खाचा विश्वास नव्हता. जगाचा कारभार तर्कसंगत असतो असं मानणं हाच एकमेव खरा वेडेपणा आहे याची त्याला खात्री पटलेली होती.

शेक्सपीयरचे बहुतेक विदूषक प्रेक्षकांशी संवाद साधायला तात्कालिक आणि स्थानिक परिस्थितीवरचे विनोद करत. एकविसाव्या शतकात त्यांचा संदर्भ लागत नाही. किंग लियरच्या मूर्खानं मात्र राजाच्या वर्तनावर जे ताशेरे झोडले त्यांच्यातली गंमत आताही समजू शकते.

किंग लियरचा मूर्ख आणि आठव्या हेन्रीचा विल सॉमर्स हे शहाणे, स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्याही उणिवा आणि उद्दिष्टं जाणणारे होते. त्यांनी आपल्या चातुर्यानं इतरांचं हित साधलं. कालिदासाचे विदूषकही तसेच शहाणे. 'अपने पे हँसकर जग को हँसाया; बनके तमाशा मेले में आया' म्हणणारा, राज कपूरचा जोकर बापडा होता. त्याला स्वतःच्या उणिवा आणि उद्दिष्टं माहीत होती पण आपली फसवणूक कळत नव्हती. दादा कोंडकेंचा सोंगाड्या त्यातलाच. टीव्हीवरच्या बिचाऱ्या 'मिस्टर बीन'ला तर स्वतःच्या चुकाही कळत नाहीत! स्टीव्हन किंगच्या 'इट'मधला विदूषक, पेनीवाइझ कुटिल होता. त्याला स्वतःच्या दोषांची पर्वा नव्हती, पण मुलांची स्वप्नं हेरून त्यांना आपल्या जाळ्यात पकडणं बरोबर जमलं. बॅटमॅनचा 'जोकर'ही गोथॅम गावाशी तसेच डावपेच खेळला. तरीही सगळ्याच विदूषकांची तशी वर्गवारी करता येत नाही.

विदूषक ही वल्ली स्थळकाळातीत आहे. वेगवेगळ्या देशांतले, भिन्न संस्कृतींतले, पुरातन काळापासून आजपर्यंतचे सगळे विदूषक काही नियम कटाक्षानं पाळतात. कुठलाही विदूषक समाजात वावरतो, रीतिरिवाजांत भाग घेतो आणि तरीही त्याचा पाय कशातही गुंतलेला नसतो. साऱ्यापासून

अलिप्त राहून तो वेगळ्या दृष्टिकोनातून घडामोडींकडे बघतो. त्याच्या खोड्यांतून, विनोदांतून तो रूढ चालीरीतींबद्दल प्रश्न उभे करतो, त्यांच्यातल्या चुका दाखवून देतो. तो हास्यास्पद वागतो. पण त्याच वेळी औपरोधिक बोलण्यातून तो चुकीच्या समाजरचनेला, दांभिक नीतिनियमांना हास्यास्पद ठरवतो. विनोदाच्या टाचणीनं भ्रमाचे भोपळे फोडतो. जेव्हा जेव्हा आणि जिथे जिथे सामाजिक तर्कशुद्धतेला ओहोटी लागते तेव्हा तेव्हा आणि तिथे तिथे रूढ सत्तेला गोडीगुलाबीनं शह देणाऱ्या, समाजाला विचाराच्या नव्या दिशा दाखवणाऱ्या विदूषकाची गरज असते.

त्यांचा एक साचा कधीही बनत नाही. विदूषक खरोखरच बहुरूपी असतो. तो धोपटमार्गी चाकोरीत चालणाऱ्या माणसांहून जसा वेगळा वाटतो तसाच तो दुसऱ्या विदूषकांहूनही भिन्न आणि बहुरूपी असतो. त्यामुळे पत्त्यांतल्या जोकरसारखाच तो कधीही कुणाचीही जागा घेऊ शकतो. म्हणूनच त्या छुप्या रुस्तुमाच्या भोवती एक रहस्यमय वलय निर्माण होतं. बऱ्याचशा विदूषकांचं वय, नातीगोती सारंच संदिग्ध असतं. त्यामुळे ते अधिकच गूढ वाटतात. युरोपात तर तशा मस्कऱ्यांचं कसब हेरून त्यांना त्यांच्या गावातून अक्षरशः उचलून आणलं जाई. त्यांच्या खोड्यांनी त्रासलेले नातेवाईक सुटकेचा निःश्वास सोडत. विदूषकांच्या पोटापाण्याची चिंता मिटे पण त्याचं गाव कायमचं सुटे. पोशिंद्यानं गमतीनं वेडंविद्रं नाव ठेवलं तर तोही दुवा तुटे. प्राचीन काळात, ग्रीक आणि रोमन धनिकांच्या महालांत तसे आगापिछा नसलेले शहाणे लोक पोटासाठी वेडे बनून राहत. त्यांनी केलेल्या करमणुकीसाठी वेडावणारे ते धनिक त्यांना वर्षानुवर्षं पोसत. रोमनांनंतर दोन हजार वर्षांनीही युरोपात ती प्रथा चालूच राहिली. गावात, चिखलातल्या डुकरांमागे धावणाऱ्या वेड्या टार्लटनला तडक राणीच्या दरबारासाठी तसाच उचलून आणला होता. अठराव्या शतकातला रशियाचा झार, बलाढ्य पीटर आपल्या पदरी तसे कित्येक बिननावागावाचे अतरंगी कलाकार बाळगत असे. धन्याला लहर आली की त्याच्या करमणुकीला विदूषकानं हजर असावं लागे. त्यामुळे बऱ्याचदा त्याला स्वतःचं कुटुंबही नसे. स्वतःचा एकटेपणा, दुःखं दाखवायला विदूषकी पेशात परवानगी नसते. म्हणून त्या भावना मुखवट्याच्या, रंगरंगोटीच्या आड दडवून विदूषक इतरांच्या दुःखांवर विनोदाची मलमपट्टी करत असे.

द.मा. मिरासदारांच्या 'कोणे एके काळी'मधला वक्रतुंड विदूषकाची ती दुखरी बाजू दाखवतो. साहित्यिक दृष्ट्या



तो 'सर्वगुणसंपन्न' विदूषक आहे. गोष्टीचा शेवट काळजाला चटका लावतो. पण त्याही वेळी, अतिशयोक्तीनं विनोद साधत सर्वांना हसवून आणि त्या हास्याच्या कारंजांत आपल्या डोळ्यांतलं पाणी दडवून वक्रतुंड आपल्या विदूषकीच्या कसोटीत बाजी मारून जातो.

हल्ली तो एकाकीपणा नसतो. पण कित्येक विदूषकांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुळातच नैराश्याकडे कल असतो. अधूनमधून त्यांची मनोवृत्ती दुसरं टोक गाठते आणि त्यांना हर्षवायू होतो. ही दोलायमान मनस्थिती दडवायला त्यांना मुखवटा सोयीचा पडतो. त्यासाठी रंगरंगोटीचीच गरज असते असं नाही. व्यावसायिक शिक्का न मिरवणारे कित्येक विदूषक केवळ बेमालूम अभिनयाचा मुखवटा लेऊन समाजात वावरत असतात. त्यांच्या चेष्टांना हसणाऱ्या बघ्यांना त्या सोंगाड्याच्या मनोव्यथा समजून घेण्यात काहीही स्वारस्य नसतं. नैराश्याच्या गर्तेत असलेल्या विदूषकाकडूनही त्यांना उत्तम प्रतीच्या विनोदाचीच अपेक्षा असते. ती पूर्ण झाली नाही तर प्रेक्षक पाठ फिरवतील, समाजाशी नाती तुटतील हे विदूषकाचं भयस्वप्न असतं. आजवर रॉबिन विल्यम्ससारख्या अनेक विदूषकांनी आत्महत्या केल्या आहेत त्या त्याचमुळे.

विदूषकाच्या हसऱ्या मुखवट्यामागे त्याची हताशा, दुःख दडतं या वस्तुस्थितीचा एकोणिसाव्या शतकात विपर्यास झाला. त्या 'मुखवट्यामागे काय काय दडलं असेल कोण




जाणे!' अशी भीती समाजमनात निर्माण झाली. त्याला तात्कालिक कारणंही होतीच. १८३६ मध्ये एका सुप्रसिद्ध फ्रेंच विदूषकानं क्षुल्लक कारणावरून एका मुलाचा खून केला. त्याच सुमाराला जोसेफ ग्रिमाल्डी नावाचा एक सुप्रसिद्ध, अष्टपैलू विदूषक होता. विदूषकाचा पांढरा मुखवटा त्यानंच मंचावर रूढ केला. त्या जोसेफ ग्रिमाल्डीचा दारूच्या व्यसनामुळे एकाकी, कफल्लक अवस्थेत अंत झाला. त्याच्या दारुड्या मुलाचंही आयुष्य बरबाद झालं. अर्थात त्यांच्या शोकांतिकेलाही अतोनात प्रसिद्धी मिळाली. त्यांच्यावरूनच चार्ल्स डिकन्सनं आपल्या 'पिकविक पेपर्स'मध्ये एका दारुड्या विदूषकाचं विदारक पात्र रंगवलं. ते पुस्तक फारच लोकप्रिय झालं आणि राहिलं. मुखवट्यामागची विकृती चव्हाट्यावर आली. १८९२मध्ये गाजलेल्या 'पालीयाच्ची' या इटालियन ऑपेरातून आपल्या व्यभिचारी बायकोचा खून करणाऱ्या विदूषकाची कहाणी रंगवली गेली. शिकागोमधल्या जनतेच्या आवडत्या, पोगो नावाच्या विदूषकानं १९७२ ते १९७८च्या दरम्यान ३५ तरुणांवर अत्याचार करून त्यांचे खून केले आणि 'वर विदूषकांना खून पचवता येतात,' असंही उद्दामपणे पोलिसांना सांगितलं! स्टीव्हन किंगच्या 'इट' कादंबरीनं विदूषकांना काळोखाचे अघोरी रंग फासले. १९८२ पासून 'किलर क्लाउन्स', 'शेक्स द क्लाउन', 'बॅटमॅनची डार्क नाइट' मालिका यांच्यासारख्या भयावह चित्रपटांनी रुपेरी पडदा भरून टाकला. मुखवट्याआडच्या सैतानाच्या भयानं समाजाला ग्रासलं. विदूषकांच्या पुतळ्यांची तोडफोड झाली. फेसबुकवरच्या 'आय हेट क्लाउन्स' नावाच्या पानाला पाच लाख लाइक्स मिळाल्या! शेफिल्ड युनिव्हर्सिटीच्या संशोधनात 'मुलांना विदूषक आवडत नाहीत' असं सिद्ध झालं! विदूषक-भयाला मानसशास्त्रात 'काउलरोफोबिया' असं नवं नावच ठेवलं गेलं! विदूषक व्हायला कुणी धजेना. परिणामी व्यावसायिक विदूषकांची संख्या घटत चालली!

ते बरोबर नाही असं अनेकांना वाटत होतं. तशा दृष्टीनं संशोधनही सुरू झालं होतं. सुदैवानं त्याच काळात टीव्हीवरचा विदूषक 'बोझो' मॅकडोनल्डच्या साथीनं मुलांचा मित्र झाला होता. मिस्टर बीनही लोकप्रिय होता. अशा वेळी डॉ. हंटर ॲडम्सनं मानवतेसाठी विदूषकीचा नवा खेळ आपल्या 'गेझुण्डहाईट इन्स्टिट्यूट'(आरोग्यसंस्था) या रुग्णालयाच्या कामातून मांडला. त्याच्या कामावर आधारलेल्या 'पॅच ॲडॅम्स' या मुन्नाभाई छापाच्या सिनेमानं विदूषकी पेशाची एक वेगळीच बाजू समाजासमोर आणली.





'डॉक्टर आणि विदूषक ह्या दोघांचं काम एकच असतं, पीडा दूर करणं आणि परिस्थितीत सुधारणा करणं. म्हणून डॉक्टरांनी विदूषकासारखा चेहरा रंगवून किंवा न रंगवताही विनोद करावे आणि त्रासलेल्या, हताश पेशंटांना थोडं हसवावं. त्यामुळे त्या आजारी माणसांचं जिणं सुसह्य होईल', हे तत्त्व रॉबिन विल्यम्सनं त्या सिनेमातून जगाला सांगितलं. त्या सिनेमानं बॉक्स ऑफिस गाजवलं आणि विदूषकांना उःशाप लाभला. त्यांच्या कर्तव्यांत एक आगळी भर पडली.

लहान मुलं हॉस्पिटलमध्ये जायला घाबरतात. त्यातून तिथे जाऊन ऑपरेशनची वाट बघताना तर ती भीतीनं भेदरून जातात. त्यावेळी विदूषकी जाणणाऱ्या डॉक्टरांनी त्यांच्याशी गप्पा मारल्या की त्यांची भीती आणि काळजी दूर व्हायला मदत होते असं इटलीच्या विद्यापीठात झालेल्या अभ्यासात दिसून आलं आहे. श्वसनसंस्थेच्या आजारांत तशा विदूषकी उपचारानं शरीराची प्रतिकारशक्ती वाढते असंही एका संशोधनातून समजलं आहे. गंभीर मनोविकारांनी पीडित असलेल्यांचा वेडेपणाही 'कल्चर्ड वेड्यां'च्या संसर्गानं कह्यात येतो असा इस्राएलमधल्या शास्त्रज्ञांचा निष्कर्ष आहे.

अनेक प्रकारे समाजाच्या उपयोगी पडणारं विदूषक हे पात्र कधी साहित्यातलं मिथक बनतं तर कधी जित्याजागत्या माणसानं पांघरलेलं रूपक बनतं. त्या सोंगाच्या, मुखवट्याच्या आड खराखुरा माणूसच असतो. विदूषकी खेळ त्या खऱ्या माणसांचाही असतो. त्या माणसांना स्वतःच्या भावभावना असतात. त्यांच्या मनाची, आरोग्याची काळजी समाजानंही वाहायला हवी. म्हणजे रॉबिन विल्यम्ससारख्या शोकांतिका टळतील. हलक्याफुलक्या करमणुकीनं जीवनातले ताणतणाव विसरायला लावणारा, विनोदाच्या मधासोबत कटू सत्याची मात्रा चाटवणारा विदूषक ही मानवी समाजाची निकड आहे आणि विनोदानं दुसऱ्याला हसवताना स्वतःच्या समस्या विसरून जाणं ही विदूषकी व्यक्तिमत्त्वाची गरज आहे. मानव्याच्या उगमापासूनच ही परस्परपूरक जोडी सुखानं एकत्र नांदली आहे. आता तर मुखवट्यामागचं गुपितही उघड झालं आहे. त्यामुळे मानवजातीला चिरंतन साथ लाभणार आहे त्या अनंतरंगी, बहुढंगी विदूषकाची,

एक डोळा मारुनी जो दुःख दुसऱ्यामाजि दडवी,
कोळुनी काळोख काळा काजळी हृदयात लपवी,
जो विनोदाच्या प्रकाशी भटकत्यांना मार्ग दावी,
ऊनपाऊस संगमी जो इंद्रधनुचे चित्र दावी.

**– डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

## लोकवाङ्मय गृह

**नवी पुस्तके**

### निवडक ऋतुरंग

संपादक : अरुण शेवते



गुलजार, भीमसेन जोशी, सलील चौधरी, सुंदरलाल बहुगुणा, मेहमूद, भालजी पेंढारकर, बिमल रॉय, व्ही. शांताराम, मोहन गोखले, बी. विठ्ठल, ए.पी.जे.अब्दुल कलाम, कैफी आझमी, सोनिया गांधी, के. के. हेब्बर, आचार्य अत्रे, पं. जवाहरलाल नेहरू, एडविना, अमृता शेर-गील, इंदिरा गांधी, माई आंबेडकर, यशवंतराव चव्हाण अशा मोठ्या व्यक्तिमत्त्वांना माणूस म्हणून समजून घ्यायचे असेल तर हा ग्रंथ संग्रही हवा. पानोपानी माणसाच्या अंतरंगाचे दर्शन घडवणारा ग्रंथ.

पाने : ६४८
पुठ्ठाबांधणी
किंमत : ₹७५०

### इर्जिक

अरुण जाखडे



'इर्जिक' या लेखसंग्रहात शेती-मातीचे, कृषिजीवनाचे, सण-सोहळ्याचे आणि ग्रामव्यवस्थेचे सूक्ष्म, तपशीलवार आणि रसिले चित्रण केलेले आहे. एका अर्थाने हा ग्रामजीवनाचा सांस्कृतिक व सामाजिक दस्तऐवज आहे. आपल्या अनुभवाला अरुण जाखडे यांनी त्यांच्याजवळ असणाऱ्या सखोल आणि चौफेर ग्रंथव्यासंगाची जोड दिली आहे. जाखडे यांच्याजवळ असणारे समृद्ध भूमिप्रेम, निसर्गप्रेम या लेखसंग्रहातून स्पष्ट झाले आहे.

पाने : १८४
किंमत : ₹ २००

### एरवी हा जाळ

अभय दाणी



माणसांच्या जन्मजात एकोप्यावर काळाची अभद्र सावली पडलेली असताना आपल्या मुळांचा आणि मूल्यांचा शोध घेण्यासाठी नात्यांच्या जंगलात व्याकूळतेने भिरभिरणारी ही कविता एकमेकांना आधार देणारी ऊर्जा होऊन जीवन जगण्याची ऊर्मी वाढवते.

प्रेम आणि नात्यांच्या भावबंधांनी असं बळ दिलेलं आहे की या दाहक भूमीत कवी पाय रोवून उभं राहतो. जगण्याच्या कोलाहलात सर्जनाच्या भूमीचा सांभाळ करण्याचा ध्यास या कवितासंग्रहात सतत जाणवतो.

पाने : ९६
किंमत : ₹१३०

### धूसर झालं नसतं गाव

रवी कोरडे



बी रुजलं तर आईनं सगळ्या भुकेजल्या लेकरांसाठी भाकरीची सोय केली म्हणून कपाळाला माती लावायची आणि नाही रुजलं तर म्हणायचं की यंदा आपण काळ्या आईची ओटी भरली. अशा समंजस संस्कारातून, रुजण्या-उगवण्याच्या दरम्यानचे असंख्य भावकल्लोळ कवेत घेणारी ही कविता आहे. रवी कोरडे यांच्या कवितेत माणसांसाठीचा अपार जिव्हाळा जाणवतो. 'धूसर झालं नसतं गावं' या शीर्षकातच ग्रामजीवनावर झालेल्या चौफेर आघातांचं सूचन आहे.

पाने : ९६
किंमत : ₹१३०

**शिवाय आमची पुस्तकं BookGanga.com वर उपलब्ध.**

पिपल्स बुक हाऊस : १५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ✆ : ०२२-२२८७ ३७६८.
लोकवाङ्मय गृह : भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. ✆ : ०२२-२४३६ २४७४.
फॅक्स : २४३१ ३२२०. E-mail : lokvangmayagriha@gmail.com
लोकवाङ्मय गृह प्रा. लि. : ५६२, सदाशिव पेठ, पुणे -४११ ०३० ✆ : ०२०-२४४७ ८२६३

Website : www.lokvangmaygriha.com



# इनोसंट गेम

**अरुण मार्तंड**

‘‘जे... ज्यो...मे...मो...अँड यो...राइट, एव्हरीबडी? रेडी? फिंगरटिप्स ऑन द कीबोर्ड...’’

‘‘राइट, आजोबा....’’

‘‘फुस्सऽ स्ऽ... हीः हीः हीः...होः होः होः’’

‘‘ओ...नो...मो, ही गंमत करण्याची वेळ नाहीय... बी सीरियस... सॉरी सॅम.’’

‘‘नो यो, त्यांना दटावू नकोस. वातावरणात जरा हलकेपणा येतो. आफ्टर ऑल, वुई आर प्लेईंग अ गेम... रादर- डेव्हलपिंग द प्रिसिजन गेम...बरोबर आहे ना टीम...?’’

‘‘बरोब्बर, सॅम, सॉरी सॅम... हुः हुः हुः...’’ एकसाथ कोरस.

‘‘दॅट्स द स्पिरीट. पण सॉरी नको. आपसात तो शब्द वापरत नसतात... ठीक. सुरू. राइट. फिंगरटिप्स...’’

‘‘याह...’’

‘‘यो, को-मॉनिटॉर रेडी?’’

‘‘युप्.’’



सॅमनं वीसपासून उलटमोजणी सुरू केली.

''......पाच..चार..तीन..दोन..एक..झिरो-'' टण्ण. घंटी.

''यो?''

''येस सॅम. ऑल रेकॉर्डेड. हियर... मे- वन पॉइंट नाइन सिक्स सेकंड, मो- वन पॉइंट झिरो सेव्हन, जे- टू पॉइंट झिरो टू अँड ज्यो- झिरो पॉइंट एट टू...''

''वेल डन फ्रेंड्स... बट, वेल, वेल, वेल... अजूनही...अजूनही लक्ष्य टिपलं जात नाही... युनो अवर मार्क, झिरो पॉइंट झिरो फाइव... कॉनसेन्ट्रेट.. स्पीड अँड प्रिसिजन ...मार्केटमध्ये उतरलो की यंग लोक मॅड होतील...आता पंधरा मिन्टं ब्रेक. देन वुई बिगिन अगेन. आज कोणत्या ब्रॅन्डचं आईसक्रीम आहे, यो...? अरेरे, मी पन्नास वर्षांनी तरुण असतो तर....!''

असा हसत खेळत गेम विकसित करणं सुरू होतं.

''पण मो, तू सॅमला आजोबा नको बोलायला होतं.''

''व्हाय... यु नो, ज्योचे वडील चाळीस वर्षांचे आहेत. त्यांना मी अंकल बोलायचं, असं सांगितलं. आणि त्याच्या आईला आँटी...!''

आता मात्र थोडंसं स्पष्टीकरण द्यायलाच हवं. ज्यो म्हणजे जोगेंद्र सामंत. बाप इंडियन आणि आई आयरिश. जे ही जेराल्डिन स्टीव्हनसन. मो, मोजिटु जॉनसन (आई नायजेरियन, बाप हर्झगोवानियाचा), मे म्हणजे मर्लीन रॉथ. चौघांचं सरासरी वय असेल चौदापेक्षा कमी. आणि चौघंही जन्मतः अमेरिकन सिटिझन्स. सगळ्यांना सीनियर ती योशिका मिनपिंग. तिचे पणजोबा दीडशे वर्षांपूर्वी रेल्वे बांधण्यासाठी चीनमधून पॅसिफिक ओलांडून आलेल्या लाखो कामगारांपैकी. यो अठरा वर्षांची प्रगल्भ मुलगी. ती या ग्रूपची लीडर. आणि सॅम? वेल, वेल, वेल... वुई डोन्ट नो. मुलांनाही माहीत नाही. इन अमेरिका, नो वन बॉदर्स. सॅम इज इनफ.

असेच कॅलिफोर्नियाच्या सॅन-दियागोजवळील एका मोठ्या पब्लिक पार्कच्या आसपास राहणारी ही चौघं बागेतील एका गोल टेबलाभोवती आपापल्या स्मार्ट फोनवर एकच कॉमन गेम खेळताना सॅमनं पाहिलं. मल्टिप्लेयरवर. तो चकितच झाला. कारण गेम मोठा गुंतागुंतीचा होता. कॅलिफोर्निया-सॅन-दियागो म्हटल्यावर इथे लक्षात आलंच असेल की चौघांचेही आई-बाप आयटी-सॉफ्टवेअरमधले असणार, ही मुलंच कधीमधी त्यांना धडे देत असणार. सॅमच्या लक्षात आलं की हा गेम वेगळाच आहे आणि तो या मुलांनीच डेव्हलप केलेला आहे.

कॉमन लक्ष्य भेदून गेम संपल्यावर सॅमनं उत्स्फूर्त टाळ्या वाजवल्या.

''दॅट वॉज अ गुड गेम... बट यू डोन्ट सीम टु बी हॅपी... देयर इज अ स्मॉल फ्लॉ...''

मुलं चमकली. हा कोण बँडिकूट मध्येच नाक खुपसतोय. ती नुसतीच त्याच्याकडे बघू लागली. सिली दिसणारा ओल्ड मॅन. ढिसाळ कपडे, आउट-ऑफ-फॅशन तिरकी हॅट, दोन दिवसांचे दाढीचे करडे खुंट. पण ओठांत एक स्माईल अन् डोळ्यांत तिरीप होती, जी फक्त डिजिटल-सॅव्ही लोकच ओळखू शकतात. नाहीतर मुलांनी त्याला केव्हाच हुसकावलं असतं.

''हाय... कॉल मी सॅम. विल टेल यू व्हॉट. सी... तुमचं को-ऑर्डिनेशन परफेक्ट आहे. बट फॉर प्रिसिजन, डेव्हलप केलेला सिक्वेन्स प्रथम उलटीकडून सेट करायला पाहिजे. होल्ड इट, अँड देन, तोच सुलटीकडून सेट करून गिरवायचा...अंडरस्टूड? ट्राय इट, प्रक्टिस इट. अँड यू विल सी यू आर अप्रोचिंग नॅनो-सेकंड्स प्रिसिजन. तुमचा को-ऑर्डिनेशनमधला पॅरॅलॅक्स टॉलरेबल असेल...''

''व्होआव...मॅन, ही इज अ जीनियस...''

''नो, जीनियस वगैरे काही नाही...जस्ट रिटायर्ड प्रोफेशनल...''

असा त्यांचा ग्रूप जमला. काही मिनिटांतच यो मुलांना जॉइन झाली. तीही घरून प्रोग्रामिंग करून देणारी प्रोफेशनल. गट्टी वाढली. पण सॅम सॅन-दियागोला फार दिवस राहणार नव्हताच. तो तिकडे कोलोराडोमध्ये उंचावरच्या पहाडात झोपडी बांधून एकटाच राहत होता. इथे पाच-सात दिवसांसाठी कन्सल्टेशनसाठी आलेला.

चार दिवसांत याच वेळी सहा जण जमायचे. गप्पा अर्थातच संगणकावरच्या ट्रिक्स, नवे गेम्स डेव्हलप करण्याच्या आपापल्या पद्धती, आणि पोटेन्शियलबाबत होत. मुलांना आपली स्टार्ट-अप कंपनी सुरू करायची होती. ''इफ ओन्ली सॅम कुड स्टे अँड बी अ पार्टनर...? इव्हन ऑनलाईन...?''

सॅम हसला. मग गंभीर होऊन म्हणाला, ''लुक, फ्रेन्ड्स्, आयम शुअर टेम्पटेड. तुम्ही इव्हेन्चुअली बिलियन्समध्ये कमावणार हे दिसतंय मला. पण दोन गोष्टी. माय ओल्ड गर्ल इज अप देअर इन कोलोराडो मॉऊन्टेन्स...''

''अणि दुसरी गोष्ट?''

''तुमच्यात यायचंच झालं तर मला ऑनलाईन यावं लागेल. तुम्ही तर ऑनलाईन खेळताच आहात. आणि

तेही चक्क पब्लिक पार्कमधे. दॅट्स व्हेरी व्हेरी डेंजरस. देअर आर स्मार्ट हॅकर्स... स्ट्रॅटोस्फेअरमध्ये घिरट्या घालत असतात... कोणीही हॅक करून तुमच्या अगोदर मार्केटमध्ये उडी मारेल... अँड यू आर डन फॉर...''

यो हसून बोलली, ''सॅम, वुई आर अमेच्युअर्स, बट नॉट फूल्स... आमचीही पाचांची छोटीशी सिक्युरिटी सिस्टिम...''

तिला तोडूनच सॅम खळखळून हसला. ''माहीत आहे, बाळांनो. आयम अॅन ओल्ड मॅन... पण चॅलेंज द्या. कुठच्याही कडेकोट खोलीत तुमचे टाईट कोड वापरून ऑनलाईन गेम सुरू करा. पंधरा मिनिटांत मी सगळे पाचही लॅपटॉप हॅक करून गेम चोरतो की नाही पाहा... चॅलेंज!''

सगळे गंभीर. सॅम बोलला, ''आस्क मी व्हाय आयम टेम्प्टेड. मलाही एक सुपर गेम तयार करायचा होता. पण टीम नीट जमली नाही. यू आर यंग, यू आर स्मार्ट, शार्प अॅन्ड इंटेलिजन्ट; तुम्हाला डिजिटल जादूचं रहस्य कळलेलं आहे. यू मेक माय आद्रेलिन फ्लो अगेन...''

''ब्रेव्हो... अँड थँक्यू सर...पण तुझा निर्णय काय? आमचे श्वास अडकलेत ऐकायला...'' ज्यो. आणि असाच इतरांचाही गलका.

''उत्तर आहे, येस.''

''हुर्राऽऽ ''

''पण ऐकून घ्या. माझी शिस्त फार कडक आहे. विशेषतः सिक्युरिटीसाठी. ऑलरेडी, व्हॉट यू आर डुईंग इज एक्स्ट्रॉऑर्डिनरी. आपल्याला एक स्टेप पुढे जायचंय...''

सॅमनं थोडक्यात प्लॅन एक्स्प्लेन केला, ''तुम्ही मल्टिप्लेयरसारखेच खेळता, पण स्मार्ट मोबाईलवर. क़ॉन्फरन्स कॉलप्रमाणे एकमेकांना हूक न होता, पण यट कनेक्टेड, अनलाइक कॉन्फरन्स, इच वन मूव्हज इंडिपेंडंटली अँड यट यू प्ले इन टीम- फॉर अ कॉमन गोल. दॅट्स ग्रेट. लाइक अ फूटबॉल टीम... ऑर एनी अदर... पण तुम्ही कॉम्पिट करता परस्परांशी. एक गोल ठरवून. रियल गेम इज व्हेन देयर इज अनादर टीम टु प्ले विथ. टू टीम्स अँड टू गोलपोस्ट्स...''

''हाः....'' जे-ज्यो-मे-मो यांच्या तोंडून चित्काराचा कोरस. ''बट हाऊ...''

''ऐका. प्रथम रिक्वायरमेन्ट्स अन् मग हाऊ. तुम्ही एकमेकांशी खेळता. तुमचे सेल नंबर्स, गेमपुरते विशिष्ट पासवर्ड्स, कोडवर्ड्स परस्परांना ओपन असतात. ऑफ कोर्स दॅट इज डेंजरस. एखादा स्मार्ट हॅकर सहज सगळं हॅक करेल. ओके, सो लाँग यू आर जस्ट प्लेईंग. पण जेव्हा दोन टीम्स इनव्हॉल्व होतील तेव्हा...द होल वर्ल्ड वुड बी पीपिंग इन...''

''पण आहे तसंच- एका टीमचं, आपण खेळतो तसंच मार्केट केलं तर...कशाला मोठा घास...''

''ऑफ कोर्स यू विल मेक मिलियन्स... पण परस्परांशी खेळणाऱ्या दोन टीमचा प्रोग्राम बाजारात उतरवला तर ... बिलियन्स्, माय डियर फ्रेंड्स, बिलियन्स... अंडरस्टँड... ट्रस्ट मी. आय नो समथिंग...''

मुलं लहान होती. पण त्यांना मी आणि बी यांमधला फरक कळत होता. टेक्निकल व सिक्युरिटी चॅलेंजेसचा अंदाज होता. पुढचा संवाद कुजबूज स्वरूपात.

''टू टीम्स... थिंक हार्ड. बावीस खेळाडू. टीम ए मधील प्रत्येक खेळाडू टीम बीच्या प्रत्येक किंवा दोन-तीन-चार-पाच खेळाडूंशी एकाच वेळी झटू शकतो, असे अकरा प्लेयर्स..! आणि टीम बी... हाऊ मेनी परम्युटेशन्स अँड काँबिनेशन्स? अॅज मेनी अॅज यू लाईक... अँड व्हेअर डझ द बॉल गो... मिलियन प्लेसेस अँड मोअर... बट वुई रिस्ट्रिक्ट अवरसेल्व्स, अँड मेक इट फार सिंपलर. अँड येट, मच कॉम्प्लिकेटेड... अंडरस्टूड...?''

''माईंड-बॉगलिंग...'' कोणीतरी उद्‌गारलं. मुलं अवाक्.

''येस, अँड दॅट्स व्हाय वुई टेक द चॅलेंज...'' सॅम.

ते अजून बागेतच होते. सॅमनं थोडं विस्तारानं सांगितलं. प्रोग्राम गुंतागुतीचा व खूपच क्लिष्ट असणार. त्यासाठी प्रथम कामाचं को-ऑर्डिनेशन. सॅम त्याच्या डोंगरातील बंगलीत. आधीच तिथं स्टेट ऑफ द आर्ट सिस्टिम सज्ज आहे. मीटिंग्ज किंवा प्रश्नोत्तरं कधीच ठरावीक वेळी नाही. रॅन्डम, ऑल्वेज. आणि 'नेव्हर ऑन युवर स्मार्ट न, पॅड ऑर युवर युजवल लॅपटॉप.' आणि तुम्हाला कोणा एकाला डेप्युट करावं लागेल, माझ्या संपर्कासाठी...'' चौघांनी योकडे बोट केलं... ''ओके, यो, वी चेंज पासवर्ड्स एव्हरीटाइम...''

सॅमच्या उत्साहाचं कारंजं भरात होतं. सगळ्यांना त्याची लागण झालेली. सेक्युअर पासवर्ड व कोड्स दरवेळी कसे व कोणी तयार करायचे ती चर्चा. अन् मग प्रत्यक्ष प्रोग्रामिंगविषयी. सॅमचा मुक्काम एक दिवस लांबला. तेव्हा सारखे कोलोराडोच्या डोंगरातून ओल्ड गर्लचे कॉल्स येत होते आणि सॅम न कंटाळता ते घेऊन मुलांकडे डोळे मिचकावून बघत एक दिवसाच्या उशिराचं प्रेमानं स्पष्टीकरण देत होता.

तीन महिने प्रोग्रामिंगमध्ये गेले. एक महिना रिहर्सलमध्ये. सॅम हार्ड टास्कमास्टर. त्याचा बँक बॅलन्सही जबर असावा. जी जी इक्विपमेन्ट घ्यावी लागली, जागा घ्यावी लागली, त्यासाठी भरपूर पैसे मुलांच्या अकाउंटमध्ये सहज जमा झाले. यो ला बाहेरची कामं सोडावी लागली. सॅमनं जवळच्या गावातील मुलांची टीम रिहर्सलमध्ये खेळण्यासाठी जमवली होती. प्रोग्राम मार्केटमध्ये लाँच करण्याआधीची फायनल रिहर्सल.

''लुक, फ्रेन्ड्स, धिस इज एक्स्ट्रिमली इंपॉर्टन्ट,'' सॅमनं सेफ कोडनं सिक्युअर केलेल्या कॉन्फरन्स कॉलमध्ये सांगितलं, ''या रिहर्सलचाच व्हिडियो आपण प्रेझेन्टेशनमध्ये दाखवणार आहोत. बी केअरफुल. धिस इज गोइंग टु बी अ बिट कॉम्प्लिकेटेड अँड क्वाइट डिमांडिंग. सो, बी स्मार्ट अँड फोकस्ड ॲज यू आर ऑल्वेज, ओके, चीअर्स... ''

आपापले लॅपटॉप घेऊन मुलं रिहर्सल रूममध्ये गोल टेबलाभोवती बसली तेव्हा त्यांना काहीच टेन्शन नव्हतं. गेम सुरू झाला तो प्रत्येकाच्या लॅप-स्क्रीनवर आलेल्या डोंगर-दऱ्यांच्या भीषण सुंदर अशा वेगवेगळ्या दृश्यांनी. सिंपली ब्रेदटेकिंग. प्रत्येक लाइव्ह सीनमधील विहित लक्ष्य चकाकत्या लाल टिंबासारख्या हलत्या वर्तुळांनी दर्शवलं होतं. लक्ष्यं दऱ्यांच्या निरुंद सपाट भागातून विविध पण नेमक्या हेतूनं पुढे सरकत होती, मध्येच डोंगरावर चढल्यासारखी दिशा बदलायची, कपारींमध्ये वा कुठे लुप्त व्हायची, अचानक कुठे दृगोचर व्हायची. पण दिशा ठाम. पळणारी लक्ष्यं ही गेम खेळणारी दुसरी टीम. प्रोग्राममधून जुळवलेली. परस्परांना अज्ञात.

इकडे कॅलिफोर्नियातील मुलांची आपापली लक्ष्यं टिपण्यासाठी वाहनं होती गोड अशा बारीकशा फुलपाखरांच्या रूपात. पंख न फडफडवता सरळ बाणासारखी जाणारी. पण दिसताक्षणी लक्ष्य टिपायची नव्हती. दोनेक मि.मि. व्यासाचं निळ्या रंगाचं वर्तुळ प्रत्येक सीनमधे दिसेल. लाल टिंब त्या निळ्या वर्तुळात प्रवेश करून मध्यभागी स्थिरावेल तेव्हाच फुलपाखरानं बाणासारखी झेप घेऊन ते टिपायचं.

नाही म्हटलं तरी मुलं एक्साइट झाली होती. ''रिमेन काम, किड्स, कीप युवर फिंगरटिप्स रेडी बट स्टेडी, कंट्रोल्ड...'' सॅम हलक्या आवाजात शांतपणे बोलतोय. स्पीकर्समधून त्याचा आवाज आकाशातून आल्यासारखा सुपरह्युमन वाटतोय. सॅम, जो कंटिन्युअस लाईनवर काँटॅक्टमध्ये आहे, कूल राहण्याच्या प्रयत्नात आहे. पण त्याचंही कुजबुजीसारखं बोलणं किंचित उत्तेजित वाटतंय. शिवाय त्याच्या उत्तेजनाला सूक्ष्मशी वेगळीच धार आहेसं मुलांना जाणवतंय. आपसातील नजरानजरीतूनही हेच ते सांगत असावेत. सॅम द कूल प्रोफेशनल...आफ्टरॉल इट वॉज गोईंग टु बी अ बिलियन डॉलर मॅटर! या वयात केवढा सगळा एक्स्पिरियन्स पणाला लावून तो आपल्याला मदत करतोय! कशासाठी? पैसे त्याला काय करायचेयत? बट नो, धिस इज नॉट फॉर मनी. एक नवा अफलातून प्रोग्राम. दॅट विल स्टन द वर्ल्ड. मे बी, इट कॅन बी अप्लाइड इनटू रिॲलिटी. मग सॅम म्हणतो त्याप्रमाणे नॉट सिम्पली बिलियन, बट बिलियन्स...


''माग काढत राहा. सावजाला दृष्टिआड होऊ देऊ नका. दे आर व्हेरी ट्रिकी. वेट टिल इट एन्टर्स द ब्लू सर्कल. बी शुअर अँड देन... ओह, मे.. युवर टारगेट... जवळ आलंय, बी रेडी... यो, आर यू ट्रॅकिंग...लुक ज्यो...''

निळी वर्तुळं एकेक करून दृष्टिपथात येताहेत. लुकलुकणारे लाल बिंदू वाटेतील अडथळे पार करत चुंबकानं लोहकणांना ओढावेत तसे निळ्या गोलांकडे सरकताहेत. इथं एकसमयावच्छेदेकरून बटणं दाबण्याची गरज नाही. मे, ज्यो, मो, जे... फुलपाखरं झेपावताहेत. वर्तुळं तत्क्षणी पिवळट पांढऱ्या रंगानं दुथडी भरून वाहताहेत.

''गेम सक्सेफुल, फ्रेन्ड्स... यू डीड इट...'' सॅमचा आवाज सुस्कारा टाकल्यासारखा खोल. आश्चर्य म्हणजे मुलांनाही थकवा येऊन घाम फुटलेला. एरवी नव्यानं डेव्हलप केलेला एवढा कॉम्प्लिकेटेड गेम यशस्वी झालेला... मुलं उन्मादानं चित्कारत नाचली, ओरडली असती, पण आज अनयुजवल शांतता. यो लुक्ड डिव्हास्टेटेड. ''माय गॉड, रियल लाइफ सिम्युलेशन...'' यो म्हणाली. ''चम्स... सेलिब्रेट... वी आर गोईंग टु बी सुपर-रीच...''

ठरल्याप्रमाणे दहा मिनिटांनी सेफ मोडवरचा कॉन्फरन्स कॉल आला.

''वेल डन किड्स...अँड आय मस्ट थँक यू...'' सॅमचा आवाज खूपच थकलेला. आवाजातील कंप अधिक स्पष्ट. ''....बोलायला मला कमी वेळ आहे, म्हणून थोडक्यात बोलतो. यू वील गेट द व्हिडियो क्लिप, एडिटेड अँड ऑल, रेडी फॉर प्रेझेन्टेशन, टुमॉरो. नाऊ गो अहेड अँड हँडल द मार्केट. न्यू यॉर्कच्या हेन्री अँडरसनला काँटॅक्ट करा. ही विल गो ऑल आउट टु हेल्प यू. त्याला मी स्वतः तपशीलवार इंस्ट्रक्शन्स दिल्या आहेत. तासाभराच्या आत तुमच्या प्रत्येकाच्या अकाउंटमध्ये आयुष्यभर पुरेल इतकी रक्कम जमा झाली असेल. दॅट, माय लव्ह टु यू. मला



कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही. ट्राय टु फरगेट मी... ओह, ऑकेजनली, यू मे ट्राय टु व्हिजिट सेनाईल ओल्ड पीपल्स होम ऑफ सान फ्रान्सिस्को. माझी ओल्ड गर्ल तिथे आहे. नॅन्सी अदलायदे. शी रिस्पॉन्ड्स विथ अ स्वीट मार्व्हलस स्माईल अँड नथिंग एल्स... दॅट्स् ऑल. चीअर्स....''

मुलं धक्का बसल्यासारखी अवाक. गेल्या तीन महिन्यांच्या श्रमांनी थकवा साचून राहिलेला. दोन-अडीच तासांत कसेबसे उपचार उरकून व मनस्थिती नसल्यानं पुढचं ठरवण्यासाठी वेळा निश्चित करून झोपा काढाव्यात म्हणून घरी पोचली. तो दुसरा मोठा धक्का त्यांचीच वाट पाहत बसला होता. टीव्हीवरील बातम्या सगळ्यांच्या घरी सुरू होत्या. सर्व वाहिन्यांवर एक बातमी विस्तारानं दाखवत होते-

*...काही अज्ञात ड्रोन्सनी पूर्व युरोपातील बल्गेरिया-मोल्दाविया यांच्या सीमेवरील दुर्गम पहाडीतील तथाकथित दहशतवाद्यांच्या चार चोरट्या तळांवर जबरदस्त हवाई हल्ले करून ते संपूर्ण उद्ध्वस्त केल्याचं वृत्त नुकतंच हाती आलं. या डेडली मिसाईल्स्च्या हल्ल्यांमध्ये प्रचंड प्राणहानी झाल्याचं सांगण्यात येतं. हे तळ पर्वतीय खोऱ्यांमधील गावांजवळ वसलेले असल्यानं तेथील निष्पाप स्त्रिया-मुलांचा समावेश बळींमध्ये असण्याची शक्यता या सूत्रांनी वर्तवली. थोड्याच वेळात अधिक माहिती हाती येईल. तोवर पाहत राहा.....*

*...इंन्फर्मेशन टेक्नॉलॉजीतील पहिल्या पिढीचे प्रसिद्ध पायोनियर व्यावसायिक व संशोधक सिम्पसन वोरोस्तीन यांची कोलोराडोतील डोंगरी निवासस्थानी गोळी घालून*

MAjESTIC ON THE NET
majesticonthenet.com

मॅजेस्टिक आले घरोघरी !

आता मिळवा घरपोच पुस्तके !

मॅजेस्टिक ऑन द नेट.कॉम

आता मिळवा सर्व प्रकाशकांची
मराठी व इंग्रजी पुस्तके घरपोच !

ऑनलाईन खरेदीकरिता भेट द्या -
majesticonthenet.com

फोनवरून ऑर्डर देण्यासाठी संपर्क करा - (022) 65666755

कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध (C.O.D)

Click करा → majesticonthenet.com

*हत्या. खून की आत्महत्या याविषयी दुमत. पोलीस तपास सुरू....*

बातम्या सुरूच. पहाट झालेली. थोड्याच वेळात वृत्तपत्रं आली. बातम्यांचे सारांश फ्रंट पेजवर आले होते-

*...बल्गेरिया-मोल्दाविया सीमेवरील पहाडीतील दहशतवाद्यांचे चार कॅम्पस् अज्ञात ड्रोन्सनी उद्ध्वस्त केल्याच्या वृत्ताला विविध देशांच्या गुप्तहेर संस्थांकडून दुजोरा मिळत आहे. मात्र या हल्ल्यांचं क्रेडिट क्लेम करण्यास अजून कोणत्याही देशाच्या संस्था अथवा अतिरेकी गट पुढे आलेल्या नसल्यानं या विलक्षण हल्ल्यांचं रहस्य वाढत चाललं आहे. हे कोणत्याही ज्ञात दहशतवादी गटाचे अतिरेकी नव्हते. तसंच ते चार की पाच रहस्यमय ड्रोन्स कोठून आले अथवा कोणाचे होते याचाही पत्ता लागत नसल्यानं मिस्टरी अधिकच डीप होत आहे...*

*...दरम्यान, हे कथित तळ अत्यंत रिमोट एरियात असून ते ५० किमी व्यासाच्या वर्तुळात आहेत. एकमेकांपासून किमान -अँज क्रो फ्लाईज- २० ते २५ किमी दूर असल्याचं सूत्रांनी सांगितलं. तळांवर दहशतवाद्यांच्या मोठ्या फौजा व ट्रेनिंग कॅम्प्स असून शस्त्रास्त्रांचे व हाय-पॉवर स्फोटकांचे प्रचंड साठे होते. त्या मिस्टेरियस ड्रोन्सनी स्फोटक साठ्यांवर प्रेसिजन बॉंबिंग केलं असावं. त्यामुळे संपूर्ण तळ - कदाचित शेजारच्या खेड्यांसह- बेचिराख झाल्याचं सूत्रांनी सांगितलं. मृतांची संख्या अडीच ते तीन हजारांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.आश्चर्याची गोष्ट म्हणजे नो मेजर पॉवर, नॉर एनी अदर मेजर गव्हर्नमेन्ट सीम टु हॅव नॉलेज ऑफ धिस.....*

दुसरी मेजर स्टोरी कम ऑबिट. सिम्पसन यांचे निधन-

*मागील पिढीतील जगातील ५० प्रसिद्ध बिलियनॉयरांच्या यादीतील अठरावे. इन्नोव्हेटिव आय.टी. व्यावसायिक. वीस मल्टी-नॅशनल कॉर्पोरेशन्स लाँच केल्या. २००५ मध्ये त्यांची एकुलती मुलगी, जावई व नातू पूर्व युरोपात पर्यटनास गेले असता अज्ञात दहशतवाद्यांकडून अपहरण. बिलियन डॉलर खंडणीची मागणी. सिम्पसन यांनी अमेरिकन सिक्रेट सर्व्हिसेसची मदत मागितल्याचं कळताच अपहरणकर्त्यांनी ओलिस दांपत्य व त्यांच्या अल्पवयीन मुलाचा अमानुष व दीर्घ छळ व भयंकर क्रूर शारीरिक अत्याचार करून हत्या केली. असं सांगण्यात येतं की दहशतवाद्यांनी या अत्याचाराचा व्हिडियो सिम्पसनला पाठवला. तेव्हापासून त्यांची पत्नी मानसिक अपंग झाली. अपहरणकर्त्या दहशतवादी गटाचा कधीच पत्ता लागला नाही. सिम्पसन यांना विरक्ती येऊन त्यांनी कंपन्या विकून टाकल्या. पुष्कळशी संपत्ती शेकडो संस्थाना दान करून टाकली. काही जाणकारांची माहिती अशी की त्या क्रूर दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचं सिम्पसन यांना ऑब्सेशन झालं होतं. प्रायव्हेट एजन्सीजवर मिलियन्स खर्च केले. स्वतः वेषांतरं करून पूर्व युरोपात फिरून आले. काही हाती न लागल्यान निराश होऊन डिप्रेशनमध्ये गेले....*

सायंकाळी गजबजलेल्या पार्कातील टेबलाभोवती मुलं खाली मान घालून शांत बसलेली. दोन्ही हात जुळवून टेबलावर ठेवलेले आणि डोळे मिटलेले. पाठीवरच्या सॅक्स टेबलावर गोल करून ठेवलेल्या. पाच मिनिटांनी साऱ्यांनी डोळे उघडले. खरं म्हणजे आपापल्या घरी त्या बातम्या ऐकल्या-वाचल्यापासून त्यांनी एकमेकांना फोन केले नव्हते. काहीच ठरवलं नव्हतं. नेहमीच्या वेळी गुपचूप येऊन बसले.

''डझ एनिवन नो...?'' ज्यो.

''नन इन द वर्ल्ड, एक्सेप्ट अस...'' पार्कातील परिसर बारकाईनं न्याहाळीत यो म्हणाला, ''आय गेस सो... ही वॉज सो मेटिक्युलस अबाउट सेक्युरिटी.''

''डू दे?...'' नेहमीप्रमाणे पार्काबाहेरच्या फूड-स्टॉलजवळ कोल्ड ड्रिंक्स पीत असलेल्या गणवेषातील पोलिसांकडे मानेनं निर्देश कर मो.

''मे बी, इन्व्हेन्चुअली, अबाउट हिम...'' जो, ''नेव्हर अबाउट अस...''

''वुई डिड इट...'' मे.

''येस...'' सगळ्यांचे खोल सुस्कारे.

''व्हॉट डु वुई डू नाऊ...''

''ही वाँटेड अस टु बिकम बिलियॉनर्स...''

''एथिक्स?''

''कुठलाही इनोसंट गेम डेडली बनू शकतो.''

''सो, वुई गो टु द मार्केट?''

''आपण गेलो नाही तर नक्कीच दुसरे कोणी डेव्हलप करतील अन् उतरतील मार्केटात...''

''सो वु गो अहेड...!''


**- अरुण मार्तंड**

४२, पत्रकार,

कलानगर, वांद्रे (पू.),

मुंबई ४०० ०५१

भ्रमणध्वनी : ९८६९४२९८९३

sadhu.arun@gmail.com



# सोमी भाषा : एक संशोधन

**प्रतिक पुरी**

भाषा हा प्रकार आजच्या पंचविसाव्या शतकातून पार हद्दपार झाला आहे. सध्या केवळ मनाच्या द्वारे एकमेकांशी संपर्क होत असताना एकविसाव्या शतकातील लोक लिहिण्या-बोलण्यात वेळ का वाया घालवायचे हा आजच्या भाषा संशोधकांसाठी कुतूहलाचा विषय राहिलेला आहे. विशेषतः सोशल मीडियानामक एका आभासी वातावरणातील संपर्कयंत्रणा हा तेव्हाही आणि आताही गोंधळात टाकणारा विषय होता आणि आहे. एकविसाव्या शतकात या माध्यमातून भाषेचा जो वापर होत असे त्याविषयी सध्या जे संशोधन सुरू आहे त्याची ही त्रोटक माहिती...

**...आणि** २१ व्या शतकात तेव्हा सोमी असायचा. आता तुम्ही म्हणाल, की ही काय भानगड आहे? तर हे एक सामाजिक माध्यम होतं जिथं चार रिकामटेकडी माणसं एकत्र येऊन स्वतःचा रिकामपणा घालवण्यासाठी कायबाय पोस्टा टाकीत पडीक राहायचे. आता पोस्टा म्हणजे काय? तर याचा पोस्टमास्तरशी आणि पत्रांशी काही संबंध नव्हता. या माणसांच्या डोक्यात जे काही मळमळून यायचं ते ही माणसं त्या सोशल मीडियात तळमळीनं ओकून टाकायची. अशी ओकाओकी तिथं रात्रंदिवस चालायची. फेसबुक, ट्विटर, व्हॉट्स अॅप, हाइक सगळीकडे अशी ओकाओकी चालायची. आता तुम्ही म्हणाल, की फेसबुक, ट्विटर, व्हॉट्स अॅप, हाइक म्हणजे काय? तर शाळा कॉलेजं मध्येच सोडून गेलेल्या काही अती हुशार पोरांनी हे सर्व खेळ सुरू केले. आणि त्यात मग इतरांनाही ओढून घेतलं. लवकरच या खेळांनी सर्वांचा खेळखंडोबा केला.

त्याकाळी भाषा नावाचा एक प्रकार असायचा. त्याच्या माध्यमातून हे खेळ चालायचे. आता ही भाषा म्हणजे काय? तर तोंडावाटे लोक वाफ दवडायचे आणि त्यातून काही चित्रविचित्र आवाज निघायचे. त्या प्रत्येक आवाजाला त्या लोकांनी एकेक अर्थ चिकटवून दिला होता. लोक हव्या असलेल्या आवाजात एकमेकांशी बोलायचे. पण एकंदरीतच हे जरा आवाजदार प्रकरण होतं. त्यामुळे भाषा म्हणजे एखादी स्फोटक आणि ज्वालाग्राही वस्तू असल्याचा संशोधकांचा अंदाज आहे. कारण या भाषेवरून लोकांच्या अस्मिता भयंकर तापायच्या म्हणे! आता ही अस्मिता म्हणजे कोण? तर त्यावर अद्याप संशोधन सुरू आहे. कारण त्याचा त्या काळच्या लोकांनाही काही उमग पडलेला नव्हता.

या सोमीच्या वापरावरून तेव्हा लोकांमध्ये भयंकर मतभेद झाले होते. आता हे सोमी म्हणजे काय? तर

सोशल मीडिया. कोणत्याही शब्दाचं छोटं रूप करून बोलण्याची, लिहिण्याची नवी पद्धतच त्या काळच्या जुन्या लोकांमधील नव्या जवान लोकांनी सुरू केली होती. अती प्राचीन काळी जसा गुप्त लिपी नावाचा प्रकार असायचा त्याच्याशी साधर्म्य साधणारी ही सोमी भाषा होती. एकमेकांशी बोलण्यात वेळ जातो म्हणून वेळ वाचवण्यासाठी अशी झटपट भाषा अस्तित्वात आली असावी असा ज्येष्ठ मृतभाषा संशोधक गणपतराव भाडबुडकर यांचा दावा होता. पण हा दावा तरुण संशोधक भालचंद्र मराठवाडे यांनी सप्रमाण खोडून काढला. त्यांच्या म्हणण्यानुसार, लांबलचक शब्द बोलण्यात आणि मुख्य म्हणजे लिहिण्यात अधिक वेळ जातो, तो वेळ वाचावा आणि अधिक बोलता यावं म्हणून ही सोमी भाषा शोधून काढण्यात आली होती. तिच्यात साऱ्यांनीच आपापलं योगदान दिलं आणि लवकरच ती लोकप्रिय झाली.

ही भाषा कोणालाही करणेबल असल्यामुळे जो-तो ऊठसूट नवनवे शब्द शोधून काढायचा आणि वापरायचा. उदाहरणार्थ, हा 'करणेबल' शब्दच घ्या ना. त्याकाळी अस्तित्वात असलेल्या मराठी आणि इंग्रजी भाषेच्या सरमिसळीतून हा शब्द तयार झाला. कोणत्याही गोष्टीची मिसळ करून लोकांपुढे ठेवली की ती भयंकर लोकप्रिय व्हायची. कारण हा मिसळनामक पदार्थ त्याकाळी सर्वांना अतिशयच आवडायचा. भालचंद्र मराठवाडे यांनी अशा भाषेची अनेक उदाहरणं शोधून काढली आहेत. म्हणजे झेपेबल, परवडेबल वगैरे. इंग्रजी भाषेमुळे तर ही सोमी भाषा अधिकच फोफावली. आधीच इंग्रजी म्हणजे अर्धवस्त्रांकित ललना. त्यातही तिची ही पदरओढ झाल्यामुळे तिला आपलं अंग कुठे झाकू आणि कुठे लपवू असं झालं. पण या सोमीग्रस्तांना त्याची चिंता नव्हती. त्यांनी अक्षरांसोबतच आकडे, चिन्हं यांनाही भरीस घेतलं आणि त्यातून ही अजब भाषा जन्माला आली. पण त्याचा अर्थ शोधता शोधता अनेकांची पुरेवाट लागायची. आणि या तरुण पोरांना हेच तर हवं होतं. त्याला ते बंडखोरी असं म्हणायचे. आता बंडखोरी म्हणजे काय? तर इतरांपेक्षा आपणच शहाणे आहोत असं वाटण्याचा हा एक मानसिक आजार होता. असो.

भालचंद्र मराठवाडे यांनी महत्प्रयासानं या भाषेचे काही नमुने शोधून काढले. त्यांचा अर्थ शोधून काढताना मात्र त्यांची फारच दमछाक झाली. उदा. १४३, BTW, GF, GD या अक्षरांपासून कोणते शब्द तयार होतात आणि त्यांचा नेमका कोणता अर्थ घ्यावा यावर समकालीनच नव्हे तर तत्कालीन संशोधकांमध्येही प्रचंड मतभेद होते. उदाहरणार्थ, १४३ म्हणजे आय लव्ह यू असा अर्थ व्हायचा पण मग आय हेट यू साठी कोणते आकडे वापरायचे यावर मात्र त्या काळी फारसं संशोधन झाल्याचं आढळत नाही. BTW चा अर्थ बाय द वे असा घ्यायचा की ब्युटिफुल टॅलेंटेड वुमन की बोअरिंग टेरिबल वुमन असा घ्यायचा? GF म्हणजे गर्लफ्रेन्ड की गॅरंटीड फुल घ्यायचा? आणि GD या शब्दाबद्दल तर आजही वाद सुरू आहेत. याचा अर्थ गॉड होतो असा एका गटाचा दावा आहे. यात सर्व सनातनी लोकांचा भरणा आहे. तर दुसऱ्या गटाचं म्हणणं असं आहे की याचा अर्थ नितंबदोस्त असा आहे. यासाठी आणखी एक विशिष्ट शब्द आहे पण तो वापरण्यास सध्याच्या संस्कृती विभागानं मनाई केली असल्यानं आम्हास त्याचा इथे उच्चार करता येत नाही. या बाबतीत तेव्हाच्या आणि आजच्या संस्कृतिरक्षक लोकांमध्ये कोणताही फरक नव्हता हे सिद्ध होतं. अडचणीच्या आणि श्रमाच्या गोष्टी टाळण्याकडे या लोकांचा कल होता असं अनुमान यावरून काढावयास हरकत नाही असं मराठवाडे यांचं मत आहे. सबब त्या काळचे तरुणही त्या काळच्या म्हाताऱ्यांप्रमाणेच अडचणीच्या मुद्द्यावर पळ काढत असत असं आता सिद्ध झालं आहे.

या लोकांनी परक्या विलायती भाषेबरोबरच स्वतःची मातृभाषाही बिघडवून टाकली. आगाबाभा, आमास, हनाडुबे, अशा सांकेतिक शब्दांची रांगोळी अधनंमधनं इथं उधळताना दिसे. त्यांचे अर्थ काय असावेत याचा अंदाज अद्याप कोणालाच आलेला नाही. ती जीवनास मार्गदर्शक अशी काही अमोलिक गूढ सूत्रं असावीत असा काही भाषातज्ज्ञांचा अंदाज आहे.

त्या काळातील लोकांची आपल्या भाषेबद्दलची अप्रीती पुढे इतकी वाढली की अक्षरांऐवजी त्यांनी स्मायलीजचा वापर सुरू केला. आता तुम्ही म्हणाल, की स्मायलीज म्हणजे काय? तर ही अशी एक वस्तू होती की ज्यात काही गोल चिन्हांचा वापर केला जाई. त्यांचा आकार साधारण मानवी चेहऱ्यासारखा असायचा. प्रत्येक चिन्हाला काहीएक अर्थ दिलेला होता. त्यावरून एखादा माणूस न बोलताच इतरांना तो आनंदी आहे की दुःखी आहे, चिडलेला आहे की गोंधळलेला आहे हे सांगू शकत असे.

पण तुम्ही म्हणाल की अमुक चिन्हाचा अर्थ तमुकच हे ते कसं समजत असत? तर ते लोक हुशार होते. ते

आपल्या फावल्या वेळात असली वेगवेगळाली चिन्हं बनवत आणि त्याचे अमुक-तमुक अर्थ ठरवत. आणि मग ते सोमीच्या अंगणात सगळीकडे धाडून देत. बाकीच्या लोकांना ती चिन्हं वापरण्यास भाग पाडत. एखाद्यानं तशी चिन्हं वापरली नाही तर त्याला आऊटडेटेड, ओल्ड फॅशन्ड म्हणून हिणवत. त्यामुळे बहुतेक लोक ती चिन्हं वापरून स्वतःला अपटुडेट म्हणवत. आपल्या भावना इतरांना कळवण्याचा हा सोपा मार्ग त्यांना वाटत होता.

आता तुम्ही म्हणाल, की ही भावना कोण? तर भावना ही अशी वस्तू होती जी सर्वच लोकांमध्ये नको तितक्या प्रमाणात आढळायची. आणि ती अतिशय नाजूकही होती. कोणी काहीही बोललं की कोणाच्या भावना दुखावल्या जातील ते सांगता यायचं नाही. कदाचित यामुळेच कमी बोलण्याकडे या लोकांचा कल झुकला असावा असा एक मतप्रवाह हल्लीच्या भाषा संशोधकांमध्ये प्रसिद्ध आहे.

हे लोक कायम एकमेकांना फ्रेन्ड रिक्वेस्टा पाठवायचे आणि आपली फ्रेन्ड लिस्ट फुगवायचे. तथापी त्यांची एकमेकांशी ओळखही नसे, होत नसे. हे लोक पोस्टा टाकायचे, मेसेजेस पाठवायचे, एकमेकांना लाईक करायचे, कमेंट छापायचे आणि मुख्य म्हणजे स्टेटस अपडेट करीत राहायचे. आता तुम्ही म्हणाल की यासाठी ते एकच भाषा वापरायचे की अनेक भाषा वापरायचे? तर यावर अद्याप संशोधन सुरू आहे. कारण प्रत्येकजण शब्दांचा असा काही वापर करायचा की ती एक वेगळीच भाषा वाटायची. तत्कालीन काही शिष्ट लोकांनी या भाषेला अश्लील भाषा म्हणून नाकं मुरडली होती. आता तुम्ही म्हणाल, की अश्लील म्हणजे काय? तर ज्यात आयाबहिणींच्या नावाचा हरघडी उच्चार होत असे अशा भाषेला ते अश्लील म्हणायचे.

शिवाय हे लोक कविताही करीत. त्यात अशा अनेक शब्दांचा वापर असायचा ज्यात फुल्या टाकल्या जायच्या. या फुल्यांचा नेमका अर्थ काय याविषयी कोणासही काहीही माहिती नाही. पूर्वी जसं काही धर्मविषयक ग्रंथातील ज्ञान ठरावीक लोकांनाच उपलब्ध असे आणि त्याविषयी कमालीची गुप्तता पाळली जात असे त्याच पद्धतीचं काहीएक महत्त्वाचं ज्ञान या फुल्यांच्या भाषेद्वारे दिलं जात असावं असा एक अंदाज आहे. आता धर्म म्हणजे काय? तर त्याविषयीची माहिती तुम्ही संग्रहालयात वाचू शकता.

हे लोक शब्दांच्या बाबतीत इतके संवेदनशील होते की त्यामुळे दंगली घडायच्या, त्या लोकांचे जे महापुरुष होते त्यांची बदनामी अन्य कोणा महापुरुषाला मानणारी मंडळी करायची. आणि मग दोन्ही महापुरुषांचे थोर अनुयायी एकमेकांची टाळकी फोडत सुटायचे. आता तुम्ही म्हणाल की अनुयायी म्हणजे काय? तर ही अशी एक उपद्रवी वस्तू होती जिची अवस्था, धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय अशी असायची. करू नये अशा अनेक गोष्टी ही जमात करायची आणि त्याचे परिणाम मात्र इतर निष्पाप लोकांना भोगावे लागायचे. सबब अशा अनेक अकरणीय गोष्टी ते लोक करायचे.

शब्दांचा खेळ करणारी ही माणसं पुस्तकप्रेमी असावीत आणि त्या काळी वाचनसंस्कृतीचा सुवर्णकाळ सुरू असेल असा कोणाचाही समज होण्याची शक्यता आहे. पण तसं काही नव्हतं. या लोकांना 'फेसबुक'नामक एका पुस्तकाचीच फार आवड होती असं आढळून आलं आहे. एकाचवेळी कोट्यवधी लोक हे पुस्तक वापरायचे. एखादं पुस्तक वाचण्याऐवजी ते वापरणं हा काय प्रकार आहे हे अद्याप कोणाला समजलेलं नाही. पण त्याविषयी काही सैद्धांतिक प्रबंध मात्र प्रसिद्ध झाले आहेत. ज्यातून या फेसबुकविषयी आणि त्यावरील भाषा वापराविषयी काही अंदाज येऊ शकतो. उदाहरणार्थ, काही फेसबुकं पक्षी, माणसं, एखादं वाक्य आपल्या वॉलवर पोस्टून टाकायचे. आता तुम्ही म्हणाल की वॉल म्हणजे काय? तर वॉल म्हणजे भिंत. या फेसबुकवर ती विदेही स्वरूपात अस्तित्वात असे. त्यावर लोक जोरदार कळ आली की वाट्टेल ते लिहून मोकळं होत. गंमत म्हणजे कोणालाही कोणाच्याही वॉलवर हवं तेव्हा हवं तसं मोकळं होण्याची सोय होती. तर असा कोणी मोकळा झाला की त्यावर बाकीची फेसबुकं मोकळं व्हायला सुरुवात व्हायची.

कधी कधी कोणी एखादा शब्द लिहायचा आणि त्याचा अर्थ विचारायचा. त्यावर बाकीचे लोक असलेले आणि नसलेले अर्थही सांगत सुटायचे. ज्यांना काहीच यायचं नाही ते वावा, फारच छान, सुरेख, सुंदर, अप्रतिम असली ठाशीव वाक्यं हाणायचे. गेला बाजार एखादी स्मायली तरी पोस्टायचे. सबब प्रत्येकजण काहीना काही तरी पोस्टायचाच.

भाषेच्या बाबतीत काही लोक मनसोक्त प्रयोगही करायचे. ज्यावर भयानक शाब्दिक मारामारी चालायची. एरवी सुसंस्कृत आणि सभ्य वाटत असलेली हीच का ती माणसं असा यावेळी प्रश्न पडायचा. आता तुम्ही म्हणाल

की हे सुसंस्कृत आणि सभ्य म्हणजे काय? तर ज्यांच्याकडे थोडाफार पैसा असे, समाजात वरची एखादी नोकरी-धंदा असे, स्थानिक राजकारण्यांशी उघड आणि गुंडांशी छुपे संबंध असत आणि जोडीला एखादी शैक्षणिक पदवी असे, अशी माणसं स्वतःला सुसंस्कृत आणि सभ्य म्हणवून घ्यायला इतरांना भाग पाडायची. सध्याच्या काळात असली माणसं नाहीत यासाठी ईश्वराचेच आभार मानायलाच हवे.

त्या काळचे हे लोक सोमी भाषेच्या बाबतीतही लैंगिक पक्षपात बाळगायचे. म्हणजे उदाहरणार्थ, एखादी मुलगी किंवा बाई फेसबुकवर पोस्टली की सारे मुलगे आणि बाप्ये भराभरा त्याच्यावर कमेंटायला आणि लायकायला सुरू व्हायचे. हा स्पीड त्या मुलीच्या आणि बाईच्या देखणेपणाशी सम प्रमाणात असायचा आणि वयाशी व्यस्त प्रमाणात असायचा. काळाच्या ओघात एवढी एकच गोष्ट आजही टिकून आहे. असो.

सोमीवर वावरताना बाप दाखव नाही तर श्राद्ध घाल असा किंवा हा सूर्य हा जयद्रथ असा प्रकार असल्यानं अनेकांना तिथं वावरताना भयानक न्यूनगंड यायचा. आपण काहीतरी चांगलं आहे म्हणून लिहावं आणि त्यावर लोकांनी भयानक कमेंटा टाकून आपला पार बेडूक करून टाकावा अशी भीती अनेकांच्या मनात असायची. सबब हे लोक इतरांचे चांगले स्टेटस ढापायचे आणि आपल्या नावावर खपवायचे. त्याकाळी अशी वाङ्मयचोरी सर्वत्र सुकाळलेली होती. सोमीचा अतिरेक होऊन अनेकांना त्याचं व्यसनच जडलं जाई. आपल्या कमेंटवर कोणी कमेंट केली नाही किंवा लाईक केलं नाही की या लोकांचा दिवस वाईट जायचा. रात्री काय व्हायचं ते आम्हाला माहीत नाही. सबब अनेक लोक अशा व्यसनानं बेजार झाले होते.

शिवाय हे लोक कारण नसताना कोणालाही कशातही टॅग करायचे. आता तुम्ही म्हणाल की टॅग म्हणजे काय? तर टॅग हा या लोकांचा इतर लोकांवर सूड उगवायचा एक धोकादायक प्रकार होता. मानसिक हिंसेचा हा एक अतिशयच जबरदस्त उपाय होता.

हे पाचपन्नास लोक एकत्र येऊन आपले ग्रूपही तयार करीत आणि मग त्यात एकमेकांशीच मारामाऱ्या करीत. त्यात ते इतरांना सहभागी करून घेत नसत. तो पूर्णतः त्यांच्या खाजगी मनोरंजनाचा भाग असायचा. त्यामुळे त्यांना इतर लोक परंपरावादी, संकुचित मनाचे ढुढ्ढाचार्य म्हणवीत. त्यांच्या या आरडाओरडीचा त्या ग्रूपकऱ्यांवर काडीचाही परिणाम होत नसे. मग ती ओरडा करणारी माणसं स्वतःचाच एक नवीन ग्रूप काढून आपला विद्रोहीपणा शाबूत करीत. सबब त्याकाळी असले मनोरंजक खेळ दोन्ही बाजूनं कायम चालू राहत.

हे लोक पेज तयार करीत आणि इतरांना त्याला लाईक करण्यासाठी इन्व्हिटेशनं धाडत. आता पेज म्हणजे काय? तर अशा काही वस्तू उत्खननातही सापडलेल्या नाहीत. सबब त्याबद्दल आम्हासही काहीएक माहिती नाही.

हे लोक बोलताना इतका नालायकपणा करीत की ते कोणाही विद्वान माणसाचा तो केवळ त्यांच्या धर्माचा, पक्षाचा किंवा मताचा नसल्यानं कडाडून द्वेष करीत आणि त्याच्यावर अश्लाघ्य शेरेबाजी, पत्रकबाजी करून त्याचा जीव नकोसा करून टाकीत. आणि तरीही वर स्वतःलाच विद्वान समजीत.

शिवाय असं करताना आपली कोणाला ओळख पटू नये म्हणून ते आपला फोटो लपवून ठेवीत. मेसेज बॉक्सात जाऊन मेसेज टाकीत. बायकांशी, पोरींशी नाव लपवून, वय लपवून चॅटिंग करीत. सबब कोणाला कळू नयेत अशा अनेक गोष्टी हे लोक करीत.

एकंदरीतच त्या काळातील लोकांना ना आपल्या लोकांविषयी फारसं प्रेम होतं, ना त्यांच्या भाषेविषयी ना संस्कृतीविषयी. तरीदेखील स्वतःस शहाणे समजणारे असे ते सारे लोक होते. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर सारे वायझेड होते. आता तुम्ही म्हणाल की वायझेड म्हणजे काय? तर त्याचा अर्थ न कळलेलाच बरा. मराठवाडे यांचंच मत उधृत करायचं म्हटलं तर, हे सारे लोक तत्कालीन संपर्कसाधनांच्या साहाय्यानं एकमेकांच्या नको इतके संपर्कात आले होते. स्वतःच्या खाजगीपणाचा बाजार मांडून झाल्यावर इतरांच्या खाजगीपणाचाही बाजार मांडायला हे लोक कायम उत्सुकलेले असायचे. स्वभाषेची लक्तरं फाडून स्वतःला आधुनिक समजणारी ही एक आत्ममग्न, स्वान्तसुखाय परपीडक पिढी होती.

**– प्रतिक पुरी**

५४०, बांदल निवास, कुमठेकर रस्ता,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
भ्रमणध्वनी : ९९६०२९८४०३
pratikpuri22gmail.com

**साहित्य अकादेमी** प्रादेशिक कार्यालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई 400014
फोन: 022-24135744, 24147650 E-mail: sahityakademimumbai@gmail.com

**मराठी प्रकाशने**

**अग्निकुंडात उमललेले गुलाब** रु. 500/-
नारायण देसाई
अनु. मु.ब.शहा, विश्वास पाटील
**प्रातिनिधिक लघुनिबंध संग्रह** रु. 100/-
संपादक: के.ज. पुरोहित
**भाषावार प्रांतरचना आणि मराठी (काही परिप्रेक्ष्यं)** रु.150/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे
**दुर्गा भागवत** रु. 50/-
शोभा नाईक
**विवेकानंदांचे चरित्र** रु. 75/-
रोमा रोलां
अनु. विमलाबाई देशपांडे
**शांतला** रु. 150/-
के.व्ही. अय्यर
अनु. द.रा. बेन्द्रे
**...म्हणे तेव्हा राजाधिराज झोपेत होते** रु. 125/-
उमा शंकर चौधरी
अनु. प्रकाश भातम्ब्रेकर
**निवडक मराठी एकांकिका** रु. 160/-
संपादक : सुधा जोशी, रत्नाकर मतकरी
**निवडक हरि नारायण आपटे** रु. 150/-
संपादक : विद्याधर पुंडलीक
**नामदेव गाथा** रु. 90/-
संपादक : हरी श्रीधर शेणोलीकर
**बाणभट्टाची आत्मकथा** रु. 130/-
हजारीप्रसाद द्विवेदी
अनु. र.श. केळकर
**बाबरची स्मृतिचित्रें** रु. 100/-
अनु. ह.रा. दिवेकर
**चक्षुशल्य** रु. 150/-
रवींद्रनाथ ठाकुर
अनु. शंकर बाळाजी शास्त्री
**भिंतीत एक खिडकी असायची** रु. 100/-
विनोदकुमार शुक्ल
अनु. निशिकांत ठकार
**अंधाऱ्या गल्लीत पांढरे ठिपके** रु. 110/-
हिमांशी शेलत
अनु. सुषमा लेले

**बालकवी** रु. 50/-
दमयंती पांढरीपांडे
**गुरु नानक** रु. 50/-
गुरुबचन सिंह तालिब
अनु. निशिकांत ठकार
**चिपळूणकर लेख संग्रह** रु. 180/-
संपादक: मा.ग.बुद्धिसागर
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य** रु. 200/-
संकलन व प्रस्तावना: लक्ष्मण गायकवाड
**संशयात्मा** रु. 175/-
ज्ञानेंद्रपति
अनु. प्रफुल्ल शिलेदार
**मानवी दशावताराचा खेळ** रु. 180/-
पन्नालाल पटेल
अनु. सुषमा करोगल
**वि.द.घाटे** रु. 50/-
अनंत देशमुख
**बाळ गांधी बापु गांधी झाले, त्याची गोष्ट** रु. 150/-
बोळूवार महमद कुंत्रि
अनु. अ.रा. यार्दी
**भारतीय दलित साहित्य** रु. 230/-
संपादक: शरणकुमार लिंबाळे
**स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन** रु. 350/-
संपादक: विद्युत भागवत
**मोरनामा आणि इतर कथा** रु. 130/-
इंतजार हुसैन
अनु. भास्कर लक्ष्मण भोळे
**श्री तुकारामाच्या अभंगांची चर्चा - खंड 1 व 2** रु. 300/-
वासुदेव बळवंत पटवर्धन
गणेश हरी केळकर
**मराठी लोकगीते : संस्कृती अभ्यासाची साधने** रु. 110/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे
**क्रौंच पक्षी** रु. 100/-
वैदेही
अनु. उमा वि. कुलकर्णी

**तुकारामगाथा** रु.110/-
संपादक : भालचंद्र नेमाडे
**हेल्गलँडचे चांचे** रु. 100/-
हेनरिक इब्सेन
अनु. के.ज. पुरोहित
**नगरमंथनम्** रु. 90/-
ओ.पी.शर्मा 'सारथी'
अनु. मैत्रेयी जोशी
**कबीर** रु. 50/-
प्रभाकर माचवे
अनु. जयप्रकाश सावंत
**बसवेश्वर** रु. 25/-
एच्. तिप्पेरुद्रस्वामी
अनु. रोहिणी तुकदेव
**गोरक्षनाथ** रु. 50/-
नागेंद्रनाथ उपाध्याय
अनु. मु.ब. शहा
**नामदेव** रु. 50/-
माधव गोपाळ देशमुख
**नामदेवगाथा** रु. 90/-
संपादक : हरी श्रीधर शेणोलीकर
**एकनाथ वाङ्मयदर्शन** रु.110/-
संपादक : भगवंत देशमुख
**समर्थ रामदास : विवेकदर्शन** रु.150/-
संपादक : वि.रा. करन्दीकर

**आगामी प्रकाशने**

**मराठी ग़ज़ल : अर्धशतकाचा प्रवास** रु. 175/-
संपादक : राम पंडित

**हिंदी प्रकाशने**

**गुरुनानक** रु. 50/-
गुरबचन सिंह तालिब
अनु. नरेन्द्र मोहन

**English Publications**

**Tukaram** Rs. 40/-
Bhalchandra Nemade
**Gopal Ganesh Agarkar** Rs. 50/-
Maya Pandit

***समकालीन भारतीय साहित्य*** **Single Copy : Rs.25, 1 Year: Rs.125, 3 Years: Rs.350**
***Indian Literature*** **Single Copy : Rs. 50, 1 Year: Rs. 250, 3 Years: Rs. 650**



# इंटरनेटचं सामर्थ्य




**धनंजय गांगल**

**इंटरनेटनं जग जवळ आलं असलं तरी देश, धर्म, भाषा, जात, पंथ यातील सीमा आहेत तशाच आहेत. किंबहुना, त्या अधिक गडद करण्यासाठी इंटरनेटचा वापर होत आहे. तंत्रज्ञानामुळे माणसाच्या मूलभूत प्रवृत्ती बदलतील अशी आशा अनेक विचारवंतांना वाटते, किंबहुना तसं व्हावं अशी प्रामाणिक इच्छा असते, पण प्रत्यक्षात तसा इतिहास नाही.**

**डिसेंबर** १७, २०१०. देश ट्युनिशिया. 'हप्ता' द्यायला नकार दिला म्हणून 'मोहम्मद बोझीझी' ह्या भाजीविक्रेत्याला पोलिसांनी मारहाण केली. परिस्थितीपुढे हताश होऊन मोहम्मदनं सरळ स्वत:ला पेटवून दिलं आणि त्यातच त्याचा अंत झाला. ही एक लहानशी घटना पण इंटरनेटवरून अशा वेगानं आणि ताकदीनं पसरली की जनतेत आधीच खदखदत असलेल्या असंतोषाचा भडका उडण्यास कारणीभूत ठरली. याचा शेवट हुकूमशहा बेन अलीच्या परगंदा होण्यात झाला.




यातून इजिप्तच्या निदर्शकांना स्फूर्ती मिळाली, ज्याचं गत्यंतर अध्यक्ष मुबारक यांच्या गच्छंतीत झालं. नंतर हे लोण उर्वरित अरब देशांच्यात पसरलं ज्यालाच 'अरब स्प्रिंग' म्हणतात. इंटरनेटचं हे आजचं सामर्थ्य! १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीनंतर लेनिन गमतीनं म्हणाला होता की पोस्ट, टेलिग्राफ यांशिवाय 'साम्यवाद' आणि 'क्रांती' हे फक्त शब्दकोशातील शब्दच राहिले असते! आज शंभर वर्षांनी पोस्टाची जागा टप्याटप्यानं इंटरनेटनं घेतली आहे. अण्णांचं आंदोलन आणि 'आप'च्या सुरुवातीच्या अनपेक्षित यशातही इंटरनेटचा मोठा वाटा आहे. या इंटरनेटच्या सामर्थ्याचं खूप कौतुक होत असलं तरी शेवटी इंटरनेट हे एक माध्यम आहे – दुधारी तलवारीसारखं – त्याला स्वतःची मतं नाहीत की आई-बाप नाही. वर उल्लेखलेली ट्युनिशिया किंवा इजिप्तमधील आंदोलनं फसली असती तर याच इंटरनेटचा उपयोग करून बेन अली आणि मुबारक यांनी एकेका आंदोलनकर्त्याला हुडकून तुरुंगाचा रस्ता दाखवला असता. २००९ च्या फसलेल्या निदर्शनानंतर इराण सरकारनं हेच केलं!

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून टेलिग्राफ म्हणजे तार पाठवण्याच्या तंत्रज्ञानावर संशोधन चालू असलं तरी खरं यश आलं ते सॅम्युएल मोर्से याच्या प्रयत्नांना. साधारण एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास. तोपर्यंत कुठलाही निरोप किंवा बातमी ही माणूस घोडा किंवा जहाज वापरून ज्या वेगानं जाऊ शकेल त्या वेगानं पोचायची. मनुष्य पोचायच्या आधी बातमी पोचणं शक्य झालं ते टेलिग्राफ तंत्रज्ञान आल्यापासून. पुढे रेडिओ तंत्रज्ञान आल्यापासून एकाचवेळी विस्तृत भूभागात पसरलेल्या अनेकांशी संपर्क करण्याच्या शक्यता वाढल्या. १९७३ मध्ये अमेरिकेनं अवकाशात सोडलेली स्कायलॅब त्यावरचं नियंत्रण सुटल्यानं १९७९ साली पृथ्वीच्या वातावरणात परत शिरून जगाच्या पाठीवर कुठेही पडेल असं नासानं प्रसृत केलं. तेव्हा हे सगळं नवीन होतं त्यामुळे पुढे काही महिने या आश्चर्य-कुतूहल आणि भीतीमिश्रित बातमीनं समाजाचं मनोविश्व व्यापून राहिलं होतं- जणू काही आपल्याच डोक्यावर ती आपटणार आहे. शेवटी जुलै ११ रोजी ती स्कायलॅब ऑस्ट्रेलियाच्या वाळवंटात कोसळली आणि सगळ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. त्या ताणातून सुटकेच्या जल्लोषात – 'काय म्हणताय, काय विशेष? तर म्हणे – ऑस्ट्रेलियात अवशेष!' अशी नायगावकरी काव्यंही अनेकांना स्फुरू लागली. पण संपूर्ण समाजमनाचा काही काळ ठाव घेणारी ही बातमी जगाच्या कानाकोपऱ्यात पसरायला प्रत्यक्षात काही आठवडे जावे लागले. त्या मानानं ९० च्या दशकात गणपती दूध पिण्याची अफवा काही तासांत पसरली – कारण एसटीडी, आयएसडीचा मोठ्या प्रमाणात वापर! आज इंटरनेटनं ते अंतर काही मिनिटांवर आणलं आहे.

टेलिग्राफ वापरलं जाऊ लागलं तेव्हा जगभरच्या विचारवंतांनी जग बदलेल, ते जास्त जवळ येईल, माणसामाणसातील अंतर नष्ट होईल, बंधुभाव वाढेल अशी बरीच स्वप्नं बघितली. प्रत्यक्षात तसं काही झालं नाही. उलट विसाव्या शतकात दोन महायुद्धं जगानं बघितली. पुढे विसाव्या शतकाच्या शेवटी, नव्वदच्या दशकात, जगभर इंटरनेट जेव्हा बाळसं धरत होतं, तेव्हाही इंटरनेटमुळे जगात आमूलाग्र बदल होणार आहेत अशी खात्री अनेक विचारवंतांना होती. त्यावेळेला गुगल बाल्यावस्थेत होतं आणि फेसबुक, ट्विटर, व्हॉट्स ॲपचा जन्म व्हायला दशक-दीड दशक अवकाश होता. तेव्हा अशी भाकितं केली जात होती की इंटरनेटमुळे देशा-देशांतील, राज्या-राज्यांतील सीमारेषा पुसल्या जातील. धर्म-जात-भाषा हे अर्थहीन होऊन जातील. जग हे एकच एक ग्लोबल व्हिलेज असेल



– त्याची भाषा एक, धर्म एक. आयटीमधील दादा कंपनी ओरॅकल. तिचा मुखिया लॅरी एलिसन. त्याला वाटत होतं की जगातले सर्व व्यवहार इंटरनेटवरच होतील. या व्यवहारांसाठी त्यानं बिन्झ नावाचं इंटरनेट चलनही अस्तित्वात आणलं (बिट–कॉईन हे त्याचं आजचं रूप, ज्याला व्यापक अधिकृत मान्यता नाही). व्यक्तिगत संगणक (पीसी) आणि विंडोज या संगणक प्रणालीची काही गरजच उरणार नाही. सर्व काही इंटरनेटवर! तो तर असंही म्हणाला की– 'माणूस इंटरनेटवर असेल, तीच त्याची ओळख. इंटरनेटवर नसलेला व्यावहारिक दृष्टीनं अस्तित्वातच नसेल!' (आपल्या 'आधार' कार्डामागची भूमिकाही 'Acknowledged Existance' म्हणजे 'अस्तित्वाची दखल' हीच होती!) हे सगळं ऐकायला अद्भुत होतं. पण इंटरनेटचा दबदबाच एवढा होता की त्याच्याशी काहीही संबध नसलेल्या कंपन्याही नावामागे–पुढे इ आणि डॉट–कॉम लावण्याच्या धडपडीत होत्या. हा फुगा शेअर बाजारात मार्च २००० मध्ये फुटला. ही घटना डॉट कॉम बर्स्ट नावानं ओळखली जाते. आज २०१४. इंटरनेट आपल्याला व्यापून असलं तरी त्या बड्या विचारवंतांच्या स्वप्नातलं इंटरनेट त्या अर्थानं अवतरलं नाही. इंटरनेटनं जग जवळ आलं असलं तरी देश, धर्म, भाषा, जात, पंथ यातील सीमा आहेत तशाच आहेत. किंबहुना, त्या अधिक गडद करण्यासाठी इंटरनेटचा वापर होत आहे. तंत्रज्ञानामुळे माणसाच्या मूलभूत प्रवृत्ती बदलतील अशी आशा अनेक विचारवंतांना वाटते, किंबहुना तसं व्हावं अशी प्रामाणिक इच्छा असते, पण प्रत्यक्षात तसा इतिहास नाही. उलट या प्रवृत्तीच तंत्रज्ञानावर स्वार होऊन आपलं ईप्सित साध्य करतात. असो. दुनिया भग्न झाली तरी आशा उडत राहते हेच खरं!

विचारवंत आल्विन टोफलेर यानं ७०/८० च्या दशकात 'थर्ड वेव' आणि 'फ्युचर शॉक' अशा दोन पुस्तकांतून

मानवी इतिहासाची तीन युगांत विभागणी केली. १७व्या शतकापर्यंत 'कृषी' युग, १८ ते २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत 'औद्योगिक' युग आणि त्यानंतर 'माहिती' युग. जवळपास याच सुमारास मोठ्या एकत्र कुटुंब पद्धतीतून लहान कुटुंबात आणि त्यानंतर एकटं राहणं सोयीस्कर आणि आर्थिक दृष्ट्या शक्य होऊ लागलं. १८व्या शतकापर्यंत मानवी व्यवहारात मौखिकाला महत्त्व होतं. त्यानंतर दोन-अडीच शतकं लिखित शब्दांना आणि आता इंटरनेटच्या जगात दृक-श्राव्याला महत्त्व प्राप्त झालंय. इंटरनेटच्या व्यवहारात एकूणच शब्द-संकोच होत चाललाय. भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांपेक्षा चित्र, स्मायली वापरणं जास्त सोयीस्कर वाटत आहे. वृतपत्रातही मजकूर जवळजवळ तेवढीच जागा व्यापलेल्या चित्राभोवती मांडलेला असतो. शिवाय सारांश (झिस्ट) चार-ओळीत असतोच - जेणेकरून मजकूर वाचण्याची गरजच पडू नये.

सिनेमापेक्षा नाटकाचा वेगळेपणा असा की त्यात प्रेक्षक समोर असतो आणि तो उत्स्फूर्त प्रतिक्रिया देतो. वृत्तपत्र, रेडीओ, टीव्ही ही माध्यमं एक-दिशा आहेत. तिथे प्रतिक्रिया पोचायला वेळ लागतो. इंटरनेटवर मात्र प्रतिक्रिया काही क्षणांत पोचतात - सर्व दृक्‌श्राव्य माध्यमांचा वापर करून. शिवाय प्रतिक्रिया देणाऱ्याला आपली खरी ओळख लपवायची सोय असते. एका अर्थानं लोकशाहीतील गुप्त मतदान कल्पनेच्या जवळ जाणारी ही सोय आहे. आणि म्हणूनच पाच वर्षांतून एकदा मतदान ही कल्पना मागे सारून 'participatory democracy' म्हणजे सतत वेगवेगळ्या मुद्यांवर मतदारांचं मत आजमवायचं आणि निर्णय घ्यायचे ही कल्पना पुढे येत आहे. आपली खरी ओळख लपवायची आणि आपण आहोत त्यापेक्षा वेगळे कोणीतरी, आपल्याच स्वप्नातले आपण! ही इच्छा इंटरनेटवर शक्य होते. अर्पिता विशीतली तरुणी आहे. टेक-सॅव्ही आहे. आई-बाबा, काका-मामा, आजी-आजोबा यांचे मोबाईल फोन एकत्र करून जेवढी किंमत होईल त्या किमतीचा मोबाईल फोन तिच्याकडे आहे. तोच तिचा गाईड, फिलॉसॉफर, सखा, बंधू, भ्राता आहे. तिची मैत्रीण घसरून पडली तर तिला हसायला आलं. पण हेच जर तिच्या मोबाईलबाबत असतं तर ती पॅनिक झाली असती. ती सतत मोबाईल हातात धरून कानाला गुंड्या लावून असते. ती एकाच वेळी आईनं दिलेले पोहे तोंडात टाकते, त्या गुंड्यामधून गाणी ऐकते, व्हॉट्स-अॅपवर काहीतरी टाईप करते, टीव्हीही सर्फ करते आणि मध्येच माउस हलवून तिच्या पीसीवरही असते. घरात आई-बाबांशी ती विशेष बोलत नाही, शेजाऱ्यांशीही जेवढ्यास तेवढं. तिला प्रत्यक्ष मित्र-मैत्रिणीही कमीच. पण व्हॉट्स-अॅप, फेसबुकवरची तिची प्रतिमा मात्र पूर्णपणे वेगळी - बबली अशी आहे. ती तिनं प्रयत्नपूर्वक जोपासली आहे. नेटवर तिला खूप मित्र आहेत. त्यांच्यापैकी बहुतेकांना ती भेटलीही नाहीये आणि कदाचित पुढेही कधी भेट होणार नाही. पण त्यांच्याकडे ती आयुष्यातल्या लहानसहान गोष्टीही शेअर करते. तिनं एखादा फोटो टाकला तर ती किती सुंदर दिसतेय अशा कॉमेंट्स आवर्जून येतात. तिच्या वाढदिवसाला शुभेच्छांचा जेवढा पाऊस पडतो तेवढाच पाऊस तिनं व्हॉट्स-अॅपवर 'मला खरचटलं' असं म्हटलं तरी तिच्या काळजीनं पडतो. तिच्या आईला वाटतं तिनं मोबाईलवर बोट फिरवण्यापेक्षा पोळपाटावर लाटणं फिरवलं तर पुढे संसाराला उपयोग होईल. त्यासाठी तिचा त्रागाही चालू असतो. तिचे बाबा मात्र ठामपणे तिच्या पाठीशी उभे आहेत. लग्नानंतर माहिती नाही पण तोपर्यंत तरी तिला तिच्या मनासारखं जगू दे अशी त्यांची धारणा आहे. ती थोडीतरी माणसांत यावी म्हणून परवा तिच्या आईनं तिच्या काही मैत्रिणींना सहज पार्टी म्हणून घरी बोलावलं पण अर्पिता त्यात रमली नाही. त्या सगळ्यांनी बराच वेळ आपापल्या व्हॉट्स-अॅपवरून कोणाकोणाशी संवाद साधला आणि त्या घरी गेल्या. दुसरीकडे राहुल हा चाळिशीतील तरुण. एका नामांकीत बहुराष्ट्रीय कंपनीत अधिकारी आहे. कामानिमित्त सर्व आधुनिक तंत्रज्ञान त्याला वापरावं लागतं. पण व्यक्तिशः तो तंत्रज्ञानाच्या विरुद्ध आहे. ६० च्या दशकानंतरच्या सिनेसंगीताला तो मानत नाही. आणि एकूणच पूर्वी सगळं किती छान होतं आणि आता सगळंच भ्रष्ट होत चाललंय असं त्याचं ठाम मत आहे. ६०-७० च्या दशकानंतर आलेले सर्व प्रकल्प हे निसर्ग आणि समाजविघातक आहेत आणि त्यांना प्राणपणानं विरोध करणं हे आपलं कर्तव्य आहे असं तो मनोमन मानतो. ते मत व्यक्त करण्यासाठी आणि त्याचा प्रसार करण्यासाठी तो जाणीवपूर्वक इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्स-अॅप, ब्लॉग्स यांचा वापर करतो. असे विक्षिप्त वाटणारे विचार असल्यामुळे कदाचित त्याला फारसे कोणी मित्र नाहीत. त्यामुळे तो सतत नेटवरच असतो. अशा वय, समज आणि वैचारिक दृष्ट्या दोन टोकांवर असलेल्या ह्या दोन व्यक्ती इंटरनेटवर अखंड पोहत असतात - ते प्रत्यक्षात आहेत त्यापेक्षा पूर्ण वेगळी प्रतिमा जपत!

'डेथ ऑफ अ सेल्समन' हे आर्थर मिलर यांचं गाजलेलं नाटक. काळ एकोणिसशे पन्नासच्या दशकातला. विली



लोमान हा एक सामान्य सेल्समन. झपाट्यानं बदलत्या जगाशी जुळवून घेण्यात कमी पडतोय. एकीकडे सुबोध स्वप्नांचं मनोराज्य, दुसरीकडे न पेलणारं अपेक्षांचं ओझं, अन् तिसरीकडे सरणारं वय. यातला ताण असह्य होऊन अपघाती आत्महत्येत त्याचा शेवट होतो. या नाटकातला संघर्ष कालातीत आहे. तो जगभरच्या नाट्यकर्मींना गेली सहा दशकं खुणावतो आहे. आजही अनेक भाषांत या नाटकाचे प्रयोग होतात. पण कालानुरूप एक बदल मात्र अवश्य होतो. मूळ नाटकातील बदलत्या जगाचे संकेत संदिग्ध आहेत; आज मात्र लॅपटॉप आणि इ-कॉमर्स हमखास दाखवतात. या आधुनिक तंत्रज्ञानानं सेल्समन विली लोमानच्या अस्तित्वालाच आव्हान मिळतं. त्याची हतबलता अजूनच गडद होते. तर असं हे खरेदी-विक्रीच्या व्यवहारातलं गेम चेंजर - इंटरनेट!

१९९४-९५ मध्ये जेफ्फ बेझोसनं 'ॲमेझॉन डॉट कॉम' ही ऑनलाइन पुस्तकं विकणारी कंपनी स्थापन करून एकप्रकारे इतिहास घडवला. त्याच्या यशानं पुढे अनेकांना स्फूर्ती मिळाली आणि मग इ-कॉमर्सनं मागे वळून पाहिलंच नाही. 'वर्ल्ड इज फ्लॅट' या गाजलेल्या आणि काहीशा वादग्रस्त पुस्तकात लेखक थॉमस फ्रीडमन, या नव्या माध्यामाचं वेगळेपण विषद करताना म्हणतो - ''या नेट शॉपिंगच्या मैदानात पदरी विशेष साधनसंपत्ती नसलेला खेळाडूही रथीमहारथींना टक्कर देऊ शकतो. आणि सामान्य ग्राहकही जवळपासच्या बाजारावर अवलंबून न राहता, जगभरच्या कुठल्याही बाजारातून वस्तू विकत घेऊ शकतो. 'औकात है क्या?' अशा नजरांना तोंड न देता जगातल्या उंची वस्तूंचं निदान नजरेनं विंडो-शॉपिंग तरी करू शकतो. इथे 'नाही रे'लाही संधी मिळण्याच्या शक्यता बऱ्याच सोप्या होत आहेत आणि त्या अर्थानं श्रीमंत ते गरीब अशी उतरंड असलेलं आता जग हे सपाट होत आहे.''

भारताच्या सव्वाशे कोटी लोकसंख्येपैकी साधारण तेरा ते चौदा कोटी इंटरनेट वापरतात आणि त्यापैकी तीन ते

चार कोटी नेटवर खरेदी-विक्रीचे व्यवहार करतात. यातले ६० ते ७०% व्यवहार प्रवासी तिकिटं, हॉटेल बुकिंग इत्यादी संबंधित म्हणजे प्रवासासंबंधित होतात. उरलेले इलेक्ट्रॉनिक्स, खाद्य, कपडे इत्यादी... पाश्चात्य देशांपेक्षा आपलं वेगळेपण असं की 'कॅश-ऑन-डिलिवरी' म्हणजे शक्य असेल तिथे विकत घेतलेली वस्तू घरपोच मिळून खात्री झाली की रोखीनं पैसे देण्याकडे ग्राहकांचा कल मोठ्या प्रमाणावर दिसतो. Trust म्हणजे विश्वास, हा जरी नेटवरील व्यवहारांचा कणा असला, तरी भारतीय नेट-ग्राहक अजून फुंकून पिण्यावर विश्वास ठेवतो. की काळ्या अर्थव्यवस्थेचं हे द्योतक समजायचं? शिवाय थॉमस फ्रीडमनला हे जग सपाट होत आहे, असं वाटत असलं तरी आपल्याकडे मात्र बनियांचीच पुढची पिढी आणि त्यातही विशेषतः अग्रवाल्स या माध्यमातही अग्रेसर आहेत. घराणेशाही अशीही आहे.

भारत सरकारनं मल्टि-ब्रांड रिटेलमध्ये ५१% थेट परदेशी गुंतवणुकीची मुभा दिली असली, तरी ती इ-कॉमर्सला लागू नाही. कारण मल्टि-ब्रांड रिटेलमधे ५१% थेट परदेशी गुंतवणुकीची मुभा १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठीच आहे. पण इंटरनेटच्या या माध्यमामुळे लहान गावातील ग्राहकही या संकेतस्थळावरून खरेदी करू शकेल आणि तिथल्या स्थानिक विक्रेत्यावर तो एकप्रकारे अन्याय होईल. शिवाय इ-कॉमर्स निसर्गतःच विशेष रोजगार निर्माण करत नाही. अमेरिकन सरकार आणि ॲमेझॉन, इबे, वॉलमार्ट मात्र सरकारवर त्याबाबतीत दबाव टाकून आहेत.

असो. वेगवेगळ्या सर्व्हेंची निरीक्षणं हेच सांगताहेत की नेट शॉपिंग प्रचंड प्रमाणात वाढतंय. पण आठवा 'सस्ती चीज और अच्छी चीज में फरक होता है', म्हणणाऱ्या ललिताजी. ज्यांना तांदूळ, गहू, डाळींच्या पोत्यात हात घातल्याशिवाय किराणा खरेदी केला, असं वाटायचं नाही; अशा या ललिताजींना नेटवर कसं आणायचं आणि त्यांच्या या गरजा नेटवरून कशा पूर्ण करायच्या हे एक आव्हानच आहे.

अर्थात नेटवरच्या या ऑनलाइन खरेदी-विक्रीत सगळंच सोपं आणि आलबेल नाही. 'संगम डायरेक्ट', 'स्पिनॅच', 'शॉपवेज' ही आपल्याकडची काही अपयशाची उदाहरणं आहेत. अमेरिकेतील 'Webvan'च्या अपयशाचं उदाहरण तर केस-स्टडी म्हणून बघितलं जातं.

नेटवरील खरेदी-विक्री व्यवहारच्या साधारण ३ रचना आहेत- १) B2C म्हणजे बिजनेस-टू-कन्झ्युमर. म्हणजे नेटवरील मॉल्स. इथे ग्राहक थेट वस्तू विकत घेतो आणि ती घरपोच देण्याची जबाबदारी या नेट-मॉल्सची असते. Amazon, Flipkart, Myntra, Jabong, eBay, yebhi, HomeShop18 ही संकेतस्थळं या प्रकारात मोडतात. २) C2C म्हणजे कन्झ्युमर-टू-कन्झ्युमर. ही संकेतस्थळं स्वतः प्रत्यक्षात काही विकत नाहीत. पण ती ग्राहक आणि विक्रेता यांची गाठ घालून देतात. 'Cellphone Zhr sellphone' म्हणत ज्याच्या जाहिरातींनी सध्या धुमाकूळ घातला आहे, ते संकेतस्थळ olx.in हे या प्रकारचं. विक्रेत्यानं (तोही एक ग्राहकच) त्याच्या विकायच्या वस्तूचे फोटो काढून या संकेतस्थळावर टाकायचे. ग्राहकाला फोटो आणि मजकूर बघून जर वस्तू घ्यावीशी वाटली, तर दोघांनी एकमेकांशी संपर्क साधून व्यवहार पूर्ण करायचा. हे संकेतस्थळ म्हणजे फक्त एक माध्यम!) 3) B2B म्हणजे बिझनेस-टू-बिझनेस. यात ग्राहक म्हणजेही एक कंपनी असते, जी दुसऱ्या कंपनीशी नेटवरून व्यवहार करते. आपल्याकडे याला महत्त्व वेगळ्या कारणासाठी आहे. सरकारनं फक्त B2B मधेच १००% थेट परदेशी गुंतवणूक करण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे कर वाचवण्यासाठी आणि इतर गुंतागुंतीच्या नियमातून वाट काढण्यासाठी B2C/ C2C कंपन्या एकतरी B2B कंपनी स्थापन करतात आणि आपले वेगवेगळे व्यवहार सोयीप्रमाणे इकडे किंवा तिकडे दाखवतात.

मध्यंतरी 'MTS Mobile'च्या एका अतिशयोक्त वाटणाऱ्या जाहिरातीनं लक्ष वेधून घेतलं आहे. आईच्या पोटातून नुकतंच जन्मलेलं बाळ स्वतःच स्वतःची नाळ कापतं. नर्सच्या खिशातील मोबाइल काढून वापरतं, डॉक्टरांच्या लॅपटॉपवर गुगल चालू करतं. आपल्या घरातल्या ललिताजी जर दिवसाचे सर्वच व्यवहार असे नेटवर करू लागल्या तर पोटातल्या अभिमन्यूला जन्मतःच नेट वापरता येऊ लागेल आणि ती अतिशयोक्त वाटणारी जाहिरातही व्यवहारात प्रत्यक्षात येईल, कदाचित!

**- धनंजय गांगल**
बी-३, ट्रँक्विल स्ट्रीट सोसायटी,
यारी रोड, वेसावे, शालीमार बेकरी लेन,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०६१
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

# मात निसर्गावर...

स्मिता भागवत

**ली क्युंग-योप या मुलास यशस्वी अभिनेत्री होण्याची महत्त्वाकांक्षा होती - नव्हे त्याचा तो ध्यास होता. म्हणून त्याने डॉ. किम यांच्याकडून आपल्या पुरुषदेहाचे स्त्रीदेहात रूपांतर करवून घेतले. नावात बदल करून ली क्युंग-युन हे नवे नाव धारण केले. आज ती उत्तम अभिनेत्री, पॉप सिंगर आणि ३५-२४-३५ अशी प्रमुख मापे असलेली सर्वाधिक लोकप्रिय मॉडेल आहे. एंटरटेनरच्या - मनोरंजनाच्या विश्वात ती हारिसू या नावाने विख्यात बनली आहे.**

**फार** पूर्वी वाचलेली एक कथा हल्ली मला वारंवार आठवते. तो माझा बालपणीचा सुखाचा काळ होता. तेव्हा वाचलेल्या कथा केवळ मनोरंजनासाठी नसत. सुजाण जन्मदात्यांनी अपत्यावर संस्कारसिंचन करताना वाचनाची घेतलेली ती मदत असे. त्या काळी वाचलेल्या कथांच्या शेवटी कथानकाचे तात्पर्य दिलेले असे. हल्ली सातत्याने मला त्यातील ही बोधकथा आठवते.

**एक** होता राजा. तेव्हा वाचलेल्या बहुतेक कथांमध्ये या वाक्यानंतर राजाला दोन राण्या असत, एक आवडती आणि दुसरी नावडती, असा मजकूर असे. पण हा राजा वेगळा होता. त्याच्या राणीला तीन मुली झाल्या. पहिल्या पत्नीस मुलीच झाल्या तर राज्यास वारस देण्यासाठी तेव्हाचे राजे दुसरे लग्न करीत. प्रत्येक राणीस ते ठाऊक नि मंजूर असे. या राजास पुत्र हवाच होता. पण पुत्रासाठी दुसरी राणी आणणे पटत नव्हते. वाढत्या वयात राजा विरक्त होऊ लागला. त्यास अध्यात्माची भूक लागली. राज्याचे खूप काम असे. तरी तो आध्यात्मिक वाचनासाठी वेळ काढू लागला. त्यामुळे त्यास दृढ श्रद्धा आणि निश्चयाची थोरवी कळली. 'निश्चयाचे ऐसे बळ तुका म्हणे तेची फळ', या उक्तीतील विचारांशी मिळतीजुळती! राजा विचारी. वाचायचे नि विसरायचे, असा त्याचा पिंड नव्हता. अतूट श्रद्धेच्या पायावर दृढ निश्चयाने नि स्वच्छ मनाने रास्त इच्छेची इमारत रचली तर ती इच्छा पूर्ण करण्यास समस्त निसर्ग पाठबळ पुरवतो, असे त्याच्या वाचनात आले.

राजाच्या मनात वैचारिक वादळ उठले. अचानक हे वादळ अनपेक्षित दिशेस वळले. त्यात त्याने आपले चौथे अपत्य मुलगाच असेल, अशी अनोखी श्रद्धा बाळगण्याचा निश्चय केला. निश्चयास अढळ श्रद्धेचे पाठबळ मिळाल्यास निसर्ग तसेच घडवत असेल तर, आपला निश्चय नेहमी 'करीन ती पूर्व' असा असतो म्हणून, त्याने निश्चयास श्रद्धेची जोड दिली. चौथे अपत्य मुलगा असो की मुलगी, आपण ते मुलगा म्हणून स्वीकारायचे, असा त्याने दृढ निश्चय केला. अपत्याचा पुत्र म्हणून स्वीकार करून, त्याचे मुलाचे करतात तसे संगोपन केले, अपत्य मुलगा असण्यावर अक्षत

श्रद्धा ठेवली तर वाचलेल्या माहितीनुसार निसर्ग अपत्याचे लिंग परिवर्तनही घडवू शकतो, अशी त्याच्या मनात खात्री निर्माण झाली. राजाने हे सारे राणीस सविस्तर सांगितले. राणी हबकली. तिला ही निसर्गावर कुरघोडी वाटली. त्यामुळे अर्थातच तिला ते पटले नाही. असे करणे ईश्वरेच्छेचा अपमान करणे वा विकृत कामना बाळगणे आहे, असे ती म्हणाली. राजास समजावण्यात तिने प्रयत्नांची शर्थ केली. राजाने मैत्रीण वाटेल अशी सुसंस्कृत सवत आणणे आपणास हवे आहे, असा हट्ट तिने धरला. पण पुन्हा लग्न करण्याची इच्छा होऊ नये इतके राजाचे राणीवर प्रेम होते. तरी तो तिच्या ओंजळीने कधी पाणी प्यायला नव्हता. भविष्यातही राणीस राजी करण्यासाठी स्वेच्छेस मुरड घालण्याचा त्याचा विचार नव्हता. आध्यात्मिक वाचनावर त्याचा पूर्ण विश्वास होता. म्हणून आपण म्हणू तेच होईल, असे त्याने राणीला ठणकावून सांगितले.

राजाने निश्चय तडीस नेण्याचा चंग बांधला. असीम श्रद्धेस ज्ञानाचीही जोड असावी, असा विचार करून त्याने अभ्यासाची कास धरली. यथावकाश राणीने गर्भ धारण केला. त्या आधी राणीने गर्भ धारण करताच राजा कुशल दासींची फौज तिच्या सेवेस देई. त्यात जाणकार आया नि कुशल सुईणींचा समावेश असे. पण या वेळी राजाने तसे केले नाही. राणी गर्भवती होण्यापूर्वी अभ्यास सुरू केलेल्या राजाने अभ्यासास अधिक वेळ देणे सुरू केले. गर्भार राणीची काळजी घेणे, बाळाचा जन्म करणे, बाळास मालीश करणे, आंघोळ घालणे... सारे त्याच्या अभ्यासात समाविष्ट होते. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला. स्वभावात जन्मदत्त राजहट्ट होताच, अभ्यासात प्राप्त केलेल्या ज्ञानाने, तो हट्टाग्रह बनला. राणीस कधी राजास विरोध करणे जमले नव्हते. तेव्हाही जमले नाही.

इतके करून याही खेपेस कन्या जन्मली. पण राजाचा निश्चयाच्या बळावर विश्वास होता त्यास नख लागले नाही. निसर्ग बालकाचे लिंगपरिवर्तन करून आपल्या श्रद्धेस दाद देईल, अशी त्यास खात्री वाटली. त्याने वारस प्राप्त झाला, अशी दवंडी पिटण्याचा आदेश दिला. नगरात हत्तीवरून साखर वाटण्यात आली. युवराज जन्मावा यासाठी राजाने फार कठीण नवस केला होता, अशी प्रजेस माहिती देण्यात आली. त्यानुसार राजपुत्राच्या जन्माआधी आणि नंतर, नवजात अपत्याचे संगोपन केवळ जन्मदातेच करतील, हे जाहीर करण्यात आले. राणी वावरती झाली नव्हती तोवर राजाने जातीने बाळाचे सारे सोपस्कार केले. त्यामुळे राज्याचा वारस ठरवलेले हे अपत्य कन्या आहे, हे कुणाला कळले नाही. राणीस हे अनुचित वाटले. पण रांगडा शूर वीर पती बाळाच्या कोमल देहास हलक्या हाताने तेल चोळणे, स्नान घालणे अशी स्त्रियांची नाजूक कामे नेटाने करतो याचे - पर्यायाने राजाच्या अतूट श्रद्धेचे - तिला कौतुक वाटले. म्हणून तिचाही राजाच्या श्रद्धेवर विश्वास बसला.

अपत्य चालू-बोलू लागताच राजा शिक्षणाची उत्तम व्यवस्था करत असे. या अपत्याच्या प्रशिक्षणाचीही त्याने चोख व्यवस्था केली. तोवर हे शिक्षण नवजात बालिकेतून सलज्ज सुसंस्कृत क्षत्रिय राजकुमारी घडवण्यासाठी असे. नव्या अपत्यातून मात्र शूर आणि चाणाक्ष राज्यकर्त्याची निर्मिती करायची होती. म्हणून राजाने तशा प्रशिक्षणाची व्यवस्था केली. चौदा वर्षे ते नेमस्तपणे चालू शकले. राजा-राणीव्यतिरिक्त राज्याचा युवराज म्हणून स्थापित झालेली व्यक्ती स्त्री आहे, हे कुणाला ठाऊक नव्हते. युवराज म्हणून स्थापित झालेली राजकुमारीही त्यास अपवाद नव्हती. मुलांपेक्षा मुलगी वेगळी असते, याची जाणीव देणारे ज्ञान तिच्या प्रशिक्षणात नव्हते. त्यामुळे बहिणी आपल्यापेक्षा 'वेगळ्या' आहेत असे ती समजत असे. पण मग....

निसर्गाने राजास नग्न सत्याचे दर्शन घडवले. शूर राज्यकर्ता घडवण्याचे प्रशिक्षण घेत असलेल्या राजकुमारीस ऋतुदर्शन झाले आणि राजाच्या भ्रमाचा भोपळा फुटला. आपल्या श्रद्धेत उणीव राहिली, याची जाणीव होऊन तो हिरमुसला. नैराश्य आलेल्या अगतिक राजाने युवराजाची(?) राणीकडे सोपवणी केली. राणीने कन्येचा ताबा घेतला; पण इतक्या वर्षांच्या संगोपनाने राजकुमारीच्या तनात नाही तरी मनात पुरुषी अभिनिवेशाचे बीज अंकुरले होते. शिवाय प्रशिक्षणातील तालीम आणि व्यायामामुळे तिची शरीरयष्टी दणकट झाली होती. ती अत्यंत हूड बनली होती. लज्जेशी दुरूनही परिचय नसलेल्या लेकीला वळण लावणे हे अत्यंत अवघड आव्हान होते. ते अशक्य काम वाटले तरी करण्यास पर्याय नव्हता. हूड कन्येवर वेगाने अपार बंधने लादणे राणीसाठी आणि लादून घेणे राजकुमारीसाठी अत्यंत अवघड बनले. अचानक कोसळलेली ही अनपेक्षित परिस्थिती पुढे राजकुमारीला इतकी असह्य वाटली की एका अगतिक क्षणी तिने जीवन संपवले.

तात्पर्य : निसर्गाच्या निर्मितीत ढवळाढवळ करणे म्हणजे सर्वनाश ओढवून घेणे असते.

त्या काळी तसे होतेही! पण पुढे परिस्थिती बदलली. निसर्गाने निर्माण केलेल्या मानव नावाच्या निर्मितीच्या मनात वारंवार निसर्गाच्या कामात ढवळाढवळ करण्याची मनीषा डोकावू लागली. ती पूर्ण केल्याविना त्यास चैन पडेना. मनीषा पूर्ण करणे म्हणजे निसर्गावर मात करण्याचा प्रयास करणे होते. ते नाशास कारण ठरण्याची शक्यता होती. पण ते केल्याने मानवाच्या अस्वस्थ मनास स्वस्थता लाभणार होती. अस्वस्थ जीवनापेक्षा नाशास निमंत्रित करणे बरे, असे त्यास वाटले. म्हणून त्याने मानस पूर्ण करण्याचा प्रयास केला. त्यात त्याचा नाश झालाच नाही; उलट मनीषा पूर्ण झाल्याने त्याचा आत्मविश्वास वाढला. मग त्यास वारंवार निसर्गावर मात करण्याची इच्छा होऊ लागली. प्रयत्न यशस्वी होत गेल्याने प्रयत्नाचे छंदात रूपांतर झाले; नव्हे, निसर्गावर मात करण्याचे त्याला व्यसन लागले. कधी नदीच्या प्रवाहाची दिशा बदलून वा तिचा प्रवाह अडवून, कधी पर्वत फोडून वाट सोपी करून, तर कधी मानवी पायाहून अधिक गती असलेली प्रवासाची साधने निर्माण करून, कधी मरणासन्न माणसाच्या देहात सशक्त माणसाचे रक्त ओतून, तर कधी मेलेल्या व्यक्तीच्या अवयवाचे जिवंत माणसात रोपण करून, कधी बहुप्रसवा स्त्रीचा मूल होण्याचा मार्ग बंद करून तर कधी वंध्या स्त्रीच्या ओटीत मूल घालून.... प्रत्येक प्रयत्न त्याच्या बुद्धीस अनोखे समाधान पुरवत असे. यशस्वी प्रयत्नांमुळे जीवनाची गुणवत्ता सुधारते आहे, याची जाणीव झाल्याने त्याच्या डोक्यात नित्यनव्या कल्पना आकार घेऊ लागल्या. त्या साकार करण्यासाठी तो प्रयत्नांची शर्थ करू लागला. प्रगतीचा प्रत्येक टप्पा त्याला सर्वोच्च शिखर वाटे. पण तो गाठला की अधिक उंच शिखर दिसे. गगनास गवसणी घालण्याची इच्छा जोर पकडू लागे. अविरत प्रयत्न करत तो अधिक उंच शिखरे गाठत होता. शर्थीचा प्रयत्न करून त्याने वरील बोधकथेचे स्मरण करवणारे शिखर गाठले. मानवाने निसर्गावर केलेली कदाचित ही सर्वोच्च मात असावी. वरील बोधकथेतील राजकुमारीस ज्या कारणाने आत्महत्या करावी लागली, ते कारण नाहीसे होण्याची आता शक्यता निर्माण झाली आहे. हे यश चाळीस-बेचाळीस वर्षांपूर्वी प्राप्त झाले असले तरी ते हल्लीच थोडेफार पचनी पडू लागले आहे.

'द वर्ल्ड ट्रॅव्हल्स १९५०-२००० या अभिजात ग्रंथाची निर्मिती जेन/जेम्स मॉरिस या लेखक/लेखिकेने जेनच्या रूपात असताना केली. इंग्लंडच्या हंफेरी मॉरिस यांच्या १९२६ साली जन्मलेल्या मुलाचे नाव जेम्स! त्याने सत्यघटनांवर आधारित कथा-कादंबऱ्या, इतिहाससंशोधन आणि प्रवासातील अनुभवांच्या संदर्भात विपुल लेखन केले. जेम्स मॉरिस हे नाव स्थापित लेखकांच्या यादीत समाविष्ट झाले. समीक्षक त्यास मनाचा तळ गाठण्यात यशस्वी होणारा लेखक म्हणत. तरी त्याला स्त्रियांच्या भावनांचे सादरीकरण करण्यात आपण कमी पडतो, अशी खंत होती. स्त्रियांच्या मनातील आंदोलने समग्रतेने जाणून घेणे केवळ स्त्रियांनाच जमते, असे समजून तो हळहळत असे. अशा वेळी त्याने लिंगपरिवर्तनाच्या (Trans gender) वैज्ञानिक प्रक्रियेविषयी ऐकले. त्याच्या मनात अपार कुतूहल निर्माण झाले. अचानक एक भन्नाट विचार मनात शिरला. स्त्रीदेह धारण करून स्त्रीची मानसिकता सादर करण्याचा! वास्तविक १९४९ साली त्याने एलिझाबेथ टकनीस या इंग्लिश स्त्रीशी लग्न केले होते. त्यांना चार मुले होती. तरी त्याने ट्रान्स जेंडरच्या संदर्भात अनेक वैज्ञानिक लेख मिळवून माहिती गोळा केली. सांगोपांग विचार करून त्याने स्त्रीदेह धारण करण्याचा निश्चय केला. पण त्याच्या कुटुंबाने त्याचा निर्णय भन्नाट मूर्खपणा ठरवला. मित्रांनीही तीव्र विरोध केला. तरी त्याने हॉर्मोन थेरपी सुरू केली. त्यामुळे त्याच्या देहावरील राठ आणि दाट केस, गालावरील दाढी नि ओठांवरील मिसरूड अदृश्य होऊ लागली. त्याच्या पत्नीस हे पसंत पडले नाही. तिने कोर्टाकडे धाव घेतली.

ब्रिटिश कोर्टाने जेम्सला लिंगपरिवर्तन करण्यास नकार देऊन एलिझाबेथला न्याय दिला. तरी जेम्सच्या हट्टास नख लागले नाही. जेम्सने घटस्फोटाची कारवाई केली तरच तो शस्त्रक्रियेचा मूर्ख निर्णय अमलात आणू शकेल, असे कोर्टाने स्पष्ट सांगितले. एलिझाबेथला काडीमोड घेणे मंजूर नव्हते. जेम्सचा औषधे घेण्याचा काळ संपला होता. स्त्रीचे मानस उलगडण्यात यशस्वी होण्याचा ध्यास जेम्सने घेतला होता. ईप्सित साध्य करण्यासाठी काहीही करायची त्याची तयारी होती. म्हणून इंग्लंडहून तो थेट मोरोक्कोस गेला. तिथे ही शस्त्रक्रिया करवून घेऊन १९७२ साली स्त्री बनून त्याने जेन हे नाव धारण केले. तशी कायदेशीर कार्यवाही पूर्ण करूनच तो इंग्लंडला परतला. गंमत म्हणजे इंग्लंडला परतल्यावर 'जेन' घरीच गेली. तिच्याबरोबर राहण्यास एलिझाबेथने हरकत घेतली नाही. जेम्सप्रमाणे जेनबरोबरही तिचे छान सूर जुळले. एकाच जन्मात जेम्स नि जेन या दोन्ही अवतारांत जगण्याची जेम्सची करामत तिला आश्चर्यचकित करणारी ठरली. जेम्सप्रमाणे जेनच्या अवताराने सकस आणि विपुल लेखन केले.

'द वर्ल्ड ट्रॅव्हल्स १९५०-२०००' हा अभिजात ग्रंथ, जेनने २००३ साली प्रकाशित केला. त्यात अनुभवांचा धांडोळा इतक्या डोळस तटस्थ नजरेने आणि समग्रतेने सादर झाला आहे की या पन्नास वर्षांतील स्थित्यंतराचा वेगळा इतिहास लिहिण्याची गरज उरू नये. म्हणून चाहते या ग्रंथास कौतुकाने जेन मॉरिसचे टाइम मशीन असे म्हणतात. जेम्स आणि जेन मॉरिस या दोन्ही नावांचा यशस्वी आणि लोकप्रिय साहित्यिकांत समावेश होतो. तरी या दोन व्यक्ती नाहीत नि त्यातील एकही टोपणनाव नाही, याचे वाचकांना सुखद कौतुक वाटते.

द वर्ल्ड ट्रॅव्हल्स... हा ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वी सौराष्ट्राच्या गाववजा शहरातील डॉ. कमलने लिंगपरिवर्तन करवून डॉ. कमलाकर बनल्याची घटना कळली होती. जेम्सने स्त्रीचे मानस जाणून उत्तम साहित्यकृती निर्माण करण्याच्या हेतूने, तर डॉ. केतकीचे प्रेम प्राप्त करण्यासाठी कमलने परिवर्तनाच्या वेदना सहन केल्या. अशी प्रेमकथा भारतासारख्या रुढीपरंपरांना टोकाचे महत्त्व असलेल्या देशात घडली, हे नवलच! जेम्सच्या कृतीशी आणि वर वर्णन केलेल्या बोधकथेशीही साम्य सांगणारी कमल, जन्मदात्यांची चौथी कन्या! बोधकथेतील राजकुमारीस ती मुलगी असल्याचे ठाऊक नव्हते. कमल मात्र ती मुलगी असल्याचे जाणून होती. मुलाची तीव्र हौस असलेल्या पित्याने तिचे संगोपन मुलाप्रमाणे केले होते. तिने कधी फ्रॉक, स्कर्ट, चणिया-चोळी, साडी.... असे प्रकार वापरले नव्हते. तिला डॉक्टर व्हायचे होते. तिच्या गावात मेडिकल कॉलेज नव्हते. म्हणून ती शहरात मुलींच्या वसतिगृहात राहू लागली. तिला मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळाल्यावर केतकीचा तिच्या जीवनात रूम पार्टनर म्हणून प्रवेश झाला. पुढे केतकीही मेडिकल कॉलेजात जाऊ लागली. दोघींत अतूट प्रेम निर्माण झाले. ते नव्हते समलिंगी आकर्षण (लेस्बियन) की दोन मैत्रिणींतील सख्य! सुरुवातीस त्या दोघींना त्या गूढ भावनेचे आकलन होत नसे. पण एका अगोचर क्षणी त्यांच्या मनात रूम पार्टनर नव्हे तर लाइफ पार्टनर असायला हवे, असा विचार आला. तो ठाण मांडून बसला. दोघींचा विज्ञानावर गाढ विश्वास! त्या डॉक्टर असल्यामुळे त्यांना लिंगपरिवर्तन प्रक्रियेची माहिती होती. सारासार विचार करून या जोडीने आपल्या विचारास निर्णयाचे रूप दिले. दोघींच्या कुटुंबात अर्थातच भयानक अस्वस्थता निर्माण झाली. उभय कुटुंबांनी आपापल्या मुलीस संबंध तोडण्याची धमकी दिली. पण डॉक्टर मुली आपल्या पायावर उभ्या राहू शकत होत्या. त्यांनी धमकीस भिऊन निर्णय बदलला नाही. केतकीशी लग्न करण्याच्या इच्छेस वश होऊन १९८१ साली जून महिन्यात कमल पुरुष झाली. तिने कमलाकर नाव धारण केले. या प्रक्रियेसाठी तिने औषधोपचार सुरू केले तेव्हापासून ते या अनोख्या दांपत्यास बाळ झाले तोवर दोन्ही घरांत अभद्र तणाव वस्तीस आला होता.

तो माझ्या जीवनातील अतिव्यस्ततेचा काळ होता. त्यामुळे या संदर्भात पुरेसा तपास करण्यास मी लगेच धाव घेऊ शकले नाही. तरी १९८८ साली मी या दांपत्यास भेटणे जमवले. त्यांच्याकडून सविस्तर हकिकत जाणून घेतली. पण हे कार्य सिद्ध करणाऱ्या शल्यविशारद डॉक्टरांची भेट घेणे मला जमवता आले नाही. त्यामुळे यास मी विश्वासपूर्णतेची बैठक देऊ शकले नाही. तरी ही हकिगत मला स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून मी कथेची चौकट पसंत केली आणि २००५च्या दिवाळी अंकात ती सादर केली. तरी....

कमलमधून कमलाकर निर्माण होणे वा जेम्समधून जेनची निर्मिती होणे या घटना वास्तविक आता जुन्या झाल्या आहेत. तरी आधुनिक विचारांचा अनुरोध करणाऱ्या पाश्चात्यांना हा विचार अजून नीट पचलेला नाही. थोडाफार पचला असला तरी शंभर टक्के नाहीच पचलेला, हे २०१२ साली झालेल्या मीस युनिव्हर्सच्या स्पर्धेत सिद्ध झाले. कॅनडा देशात व्हँकूअर येथे वास्तव्य असलेल्या जेन्ना टेलाकोव्हाने त्या सौंदर्यस्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धकांना आपला पूर्ण परिचय द्यावा लागतो. या माहितीची कसून छाननी होत असते. जेन्नाच्या अशा छाननीत तिने दिलेल्या स्थानी त्या तारखेस तिच्या जन्मदात्यांना मुलगा झाल्याची नोंद सापडली. ती मुलाचा जन्म घेतलेली आणि लिंगपरिवर्तनाने स्त्री बनलेली युवती आहे, हे कळले आणि तिला स्पर्धेतून दूर (डिसक्वॉलिफाय) करण्यात आले. तेव्हापासून ती या भेदभावाचा विरोध करण्यासाठी कॅनडात 'अशा' समाजाची एकजूट करण्यासाठी परिभ्रमण करत आहे. मागील वर्षी ती टोरोंटोस आली. आपल्या भाषणात तिने 'अशा' अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अन्यायाचा कडाडून विरोध केला.

काल-परवापर्यंत लिंगपरिवर्तनाच्या घटना सर्रास होत नव्हत्या. आजच्या बहुसंख्य पाश्चात्य कामाक्षी सुंदरी मुळात पुरुष असल्याचे जगजाहीर आहे. त्यांचे व्यवसाय नेमस्तपणे चालू असतात. तरी समाजात त्यांच्याविषयी आकस आहे. भारतीय मानस तर वेगळा विचार कधीच सहज स्वीकारत



बुसानच्या डाँग–ए विश्वविद्यालयाच्या इस्पितळात गरजू व्यक्तीशी बातचीत करताना डॉ. किम सिओकक्कुन.

नाही. भारतीय समाजात जुन्या विचारांचे समर्थन होत असते. रूढीप्रिय समाजात समाजास पटत नसलेले प्रकार गुपचूप होतच असतात. हा प्रकार त्यास अपवाद नाही. तामिळनाडूच्या अन्नामलाई या तरुणाने, माता पुत्राचे सर्व अपराध पोटात घालते, अशी खात्री बाळगून आईचा विरोध डावलून, पुरुषदेहाचा त्याग केला. स्त्रीदेह धारण करून घरी आलेल्या या अपत्याचा पापभीरू आईने स्वीकार केला नाही. मातेचा नकार अन्नामलाईस इतका झोंबला की त्याने (वा तिने) २०१३ च्या २० मे रोजी आत्महत्या केली.

उपचार आणि शस्त्रक्रियेच्या मदतीने असे परिवर्तन करून घेणे उचित की अनुचित हा प्रश्न अजून यक्षप्रश्नच ठरतो आहे. कारण त्याचे समर्पक उत्तर आज उपलब्ध नाही. जी उत्तरे मिळतात ती योग्य असल्याचा निर्वाळा मिळत नाही. म्हणून भारतीय समाजाची उलघाल होते. महाभारतात शिखंडिनी या द्रुपदकन्येचे शिखंडीत झालेले रूपांतर भाकडकथा ठरवली जाते. भारतात खूप मुलींना आपण मुलगा असायला हवे होते, असे वाटते. समाजात मुलींवर अन्याय होतो यासाठीच त्यांना 'असे' वाटते असे नव्हे. त्यांचे वर्तनही तसे असते. म्हणून समाज त्यांची 'टॉम बॉय' म्हणून हेटाळणी करतो. काही मुलांच्या बाबतीतही तसे होते. कोमल मनाच्या कित्येक मुलांना समाज रडुबाई वा बायल्या हे विशेषण प्रदान करून त्यांची टर उडवतो. ते असह्य झाल्याने त्यांना सतत आपण मुलगी असतो तर बरे झाले असते, असे वाटते. वास्तवात ही जेंडर आयडेंटिटी डिसऑर्डर नावाची मानसिक समस्या आहे. त्यांचे मानसशास्त्र समाजास कळत नसल्याने, समाजाने केलेल्या अवहेलनेमुळे अशी मुले उद्ध्वस्त होतात. म्हणून इच्छेनुसार लिंग प्राप्त करावे, असे त्यातील अनेकांना वाटले तरी प्रश्नांचा गुंता इच्छुकांना हे धाडस करू देत नाही. लिंगपरिवर्तनाची प्रकिया सुरू झाली आणि विशिष्ट अडचणीमुळे अचानक थांबली तर? आपली गणना तृतीय पंथात झाली तर? समाजात आपण हास्यास्पद ठरलो तर? आगीतून फुफाट्यात पडणे झाले तर..... अनेक प्रश्न इच्छुकांना भेडसावत असतात. करायला गेलो एक नि झाले भलतेच, असे होण्यापेक्षा आहे ते बरे आहे, हा विचार त्यांना कृतीपासून दूर ठेवतो. नाइलाजाने ते ठेविले अनंते तैसेची राहावे, म्हणत जगण्याचा

## आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !

नवी प्रकाशने




### फुले वेचिता...

**-लता मंगेशकर**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या लेखणीतून शद्बरूप ल्यायलेली ही त्यांच्या आठवर्णींची सुंदर फुले...लतादीदींच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त नव्या सुधारित रूपात रसिकांच्या भेटीला.

(पृष्ठे- १५२) (₹ १६०)

### व्यासांच्या लेकी

**-मधुवंती सप्रे**

व्यासांच्या प्रतिभेतून साकारलेल्या माधवी, दमयंती, शर्मिष्ठा, द्रौपदी, कुंती यांसारख्या महाभारतातील अनेक तेजस्विनींच्या जीवनसंघर्षाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि तेजाचा परिचय करून देणारा लेखसंग्रह.




(पृष्ठे- १२८) (₹ १४०)




### अर्थानुभव

**-चन्द्रशेखर टिळक**

अर्थशास्त्रीय भाषणांच्या माध्यमातून गुंतवणुकीचे मानसशास्त्र-समाजशास्त्र, बदलते अर्थकारण-समाजकारण व आर्थिक नातेसंबंध आणि महिला उद्योजकता यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा धांडोळा घेणारे हे पुस्तक.

(पृष्ठे- १५६) (₹ १७५)


### मांसाहारी मेन्यू डायरी

**-प्रख्यात शेफ विष्णू मनोहर**

शाकाहारी मेन्यू डायरीनंतर लोकाग्रहास्तव मांसाहारींच्या जिभेचे चोचले पुरविणारी ही मांसाहारी मेन्यू डायरी!




(पृष्ठे- ३४४) (₹ ३००)




### साद अन्नपूर्णेची

**-डॉ. संदीप गजानन श्रोत्री**

आव्हानात्मक समजली जाणारी अन्नपूर्णा परिक्रमा आणि अन्नपूर्णा बेस कॅम्प ट्रेक यांचा हा रसाळ वृत्तांत व सोबतच तेथील सांस्कृतिक, सामाजिक स्थित्यंतरे आणि वन-जीवसृष्टीचा घेतलेला मनोवेधक आढावा.

(पृष्ठे- २६४) (₹ ३२५)

### रजे हो

**ऊर्फ मुद्दाम भरकटलेली कथा**

**-राजन खान**

लोकशाहीच्या चौकटीतील राज्यकर्ते व प्रजा यांच्यातील गुंतागुंतीच्या नात्यावर भाष्य करणारी आणि शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी ही दीर्घकथा.



(पृष्ठे- १५२) (₹ १६०)

आगामी

### ऋजुला

**लेखक-माधव जोशी • अनुवाद-सुहास अंजनकर**

'ती'च्या इवल्याशा पावलांची चाहूल लागली आणि त्याच्यातला 'पुरूष' बदलत गेला. एका पित्याने कथन केलेली ही पित्याच्या जन्माची कथा!




**आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती**

मैत्रेय प्रकाशन

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.

चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८

E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com | Website : www.maitreyaprakashan.com

टोल फ्री क्र.: १८०० २२२ ६१३

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा. पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com

प्रयत्न करतात, पण 'चित्ती असू द्यावे समाधान' या उत्तरार्धापासून ते चार अंगुळे दूरच राहतात.

दक्षिण कोरिया भारताप्रमाणेच किंवा भारताहून अधिक रूढी, परंपरा आणि संस्कृतीस अतिरेकी महत्त्व देणारा देश आहे. तरी हल्ली तिथे ट्रान्स जेंडर प्रकारच्या प्रजेची संख्या वाढते आहे. लिंगपरिवर्तन करवून घेणारे वेगाने वाढत आहेत. त्याचे श्रेय डॉ. किम सिऑक क्वुन यांना दिले जाते. त्यांनी मागील वर्षी मुलीचा जन्म मिळालेल्या परदेशी वास्तव्य असलेल्या एका ननचे बौद्ध भिक्षूत रूपांतर केले. त्यांचे उपचार सुरू केल्यापासून ती बौद्ध भिक्षूची वस्त्रे धारण करून दक्षिण कोरियातील बुसान शहरात वावरत असे. समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी त्या भिक्षूने पत्रकारांचा संपर्क टाळला. तरी डॉ. किम एका बौद्ध भिक्षूसाठी! कृत्रिम शिस्न (पेनिस) तयार करत आहेत, याची समाजात चर्चा होती. त्या संदर्भात अधिक माहिती मिळवण्याच्या हेतूने, काही महिन्यांपूर्वी पाश्चात्य देशात ठिकठिकाणी त्यांची भाषणे आणि शिबिरे झाली. डॉ. किम यांना ऐकण्याची संधी मिळाल्याने, कमलचा कमलाकर होण्याच्या बाबतीत विश्वसनीय माहिती मिळवण्याची संधी हुकली होती ती प्राप्त झाली. डॉ. किम यांच्या कार्याचा आलेख, कार्यप्रणाली, विचित्र ठरणारे काम करण्याचे कारण, त्यांची भूमिका वगैरे जाणून घेणे जमले.

डॉ. किम यांनी वैद्यक क्षेत्रात प्लॅस्टिक सर्जन म्हणून पदार्पण केले. लवकरच त्यांचा जम बसला. काही मुलांच्या देहात जन्मापासून खोड असते. कधी अपघातात एखादा अवयव नष्ट वा खच्ची होतो. अशा समस्या डॉ. किम लीलया सोडवत. मोकळ्या स्वभावामुळे खूप रूग्ण डॉक्टरांचे दोस्त बनत. अपघातात सापडलेला आणि त्यांच्या हस्ते बरा झालेला एक रूग्ण त्यांचा मित्र बनला होता. तो वैद्यकीय उपचारास देह दुरुस्त करणे म्हणत असे. त्याला त्याचे पुरुष असणे मुळीच पसंत नव्हते. बरेच वेळा तो शिश्न तोडून टाकण्याची वा कापून काढण्याची इच्छा व्यक्त करत असे. या अनावर इच्छेस आवरणे फार अवघड होते, असेही तो सांगे. सतत कुरकुर हा त्याचा स्वभाव बनला होता. वारंवार त्यास पुरुषदेहाचा त्याग – आत्मघात करण्याची इच्छा होत असे. प्रसंगी मैत्रीचे भांडवल करून तो डॉ. किम यांना माझा देह दुरुस्त करून मला स्त्री कर ना असा आग्रह करत असे. प्लॅस्टिक सर्जरी करून कापलेले नाक बसवता येते, लहान छातीच्या स्त्रीदेहात कृत्रिम वक्ष तयार करून रोपता येतात. मग कृत्रिम गर्भाशय, अंडाशय आणि योनी तयार करून देहात रोपणे का जमू नये, असे विचारून त्यांना भंडावून सोडत असे. त्यांच्यासारखा निष्णात शल्यविशारद हे काम नक्की जमवू शकेल, अशी खात्री व्यक्त करत असे. स्त्रीत रूपांतरित होण्याचा त्याने ध्यासच घेतला होता. तो आपल्या कामात निष्णात होता. त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. पण आपल्या पुरुषदेहाचा त्यास तिटकारा वाटे. म्हणून वयाची पन्नास वर्षे उलटली तरी त्याने लग्न केले नव्हते. बाकी त्याच्यात बोट ठेवायला कुठेही जागा नव्हती. तो सज्जन आणि विश्वासपात्र होता. म्हणून डॉ. किम यांना तो मनोरुग्ण वाटला. त्यांच्या मित्रवर्तुळात एक मनोरोगचिकित्सक होता. त्याची मदत घेण्याचा विचार करून डॉ. किम यांनी त्यास आपल्या नव्या मित्राचा प्रश्न सांगितला. त्याच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी आपल्या मनोरुग्ण मित्रास जेवणाचे आमंत्रण दिले. तेव्हा या तज्ज्ञ मित्रासही बोलावले. अनौपचारिक गप्पांच्या माध्यमातून समस्येचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला. तज्ज्ञ मित्राने डॉ. किम यांच्या रूग्णसदृश मित्रास जेंडर आयडेंटिटी डिसऑर्डर ही समस्या असल्याचे निदान केले. असे रूग्ण आपल्या लैंगिक जातीचा टोकाचा तिरस्कार करतात. काही वेळा हा तिरस्कार त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतो, असेही तो म्हणाला. या विधानाने डॉ. किम फार अस्वस्थ झाले. पण घाईने काम करून निवांतपणे पश्चात्ताप करण्याची सवय त्यांना नव्हती. मनोरुग्ण मित्रास देह दुरुस्त करून देण्याचे वचन दिले. पाश्चिमात्य देशांत झालेल्या अशा प्रयोगांचा सांगोपांग अभ्यास करण्याचा मानस त्यास सांगितला. आपला मानस सिद्ध होईल, तोवर धीर धरण्याचे या मित्राकडून वचन घेतले.

मित्रास दिलेले वचन पाळण्यासाठी खरोखर डॉ. किम यांनी कंबर कसली. अभ्यासास वेळ देत असल्यामुळे नित्याचा व्यवसाय करण्यास ते कमी वेळ काढू शकत. त्यांच्याकडून उपचार करून घेण्याची इच्छा असणारे रूग्ण आणि त्यांचे सहकारी त्यांना कमी वेळ व्यवसाय – प्रॅक्टिस करण्याचे कारण विचारू लागले. डॉक्टर सर्वांना खरे सांगत. काही लोकांना ते हास्यास्पद वाटे. त्यांचे हितचिंतक म्हणवणाऱ्या सहकारी मित्रांनी त्यांना आवर घालण्याचा प्रयत्न केला. असे करणे (ब्लास्फेमी) सर्वशक्तिमान निर्मात्याच्या – परमेश्वराच्या चुका काढून निंदा करणे आहे, परमेश्वराच्या कामात ढवळाढवळ करणारा नरकात जातो.... वगैरे सांगून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण डॉक्टर निर्भय होते. त्यांनी पाश्चात्य देशांत अशा प्रकारच्या

शल्यचिकित्सा कशा होतात, त्याचा सांगोपांग अभ्यास केला. प्रकाशित ग्रंथांचे वाचन व शस्त्रक्रियेच्या चित्रफिती अभ्यासून त्यांनी मानस सिद्ध करण्याच्या दिशेने ठाम पावले उचलली.

थोड्याच काळात डॉ. किम यांच्या निर्णयाची बातमी सर्वत्र पसरली. पूर्ण देशात त्यांच्या विरोधात वादळ उठले. कॅथलिक चर्चचे प्रमुख फादर – धर्मगुरू, मेडिकल कॉलेजचे प्राध्यापक, इतर प्लॅस्टिक सर्जन सारे त्यांना रोखण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. भरपूर नाव आणि पैसा देणारा व्यवसाय करायचे सोडून त्यांना भिकेचे डोहाळे का लागले आहेत, असेही ते विचारत. समाज नि धर्ममार्तंडांचा विरोध कमी होता तर साऊथ कोरियाच्या कोर्टाने त्यांच्या कामावर बंदी लादली. त्यामुळे ते नामोहरम होणे दूर, उलट वाढत्या विरोधाने त्यांना आपल्या भूमिकेशी अधिक ठाम केले. न्याय मागण्यास त्यांनी सुप्रीम कोर्टाकडे धाव घेतली.

सारा समाज त्यांचा विरोध करत होता तेव्हा मोजके स्त्रीवेषधारी पुरुष आणि पुरुषवेषधारी स्त्रिया परमेश्वराची करावी तशी केविलवाण्या स्वरात त्यांची प्रार्थना करत होते, की विधात्याच्या नजरचुकीमुळे आम्ही भलत्या देहात अडकलो आहोत, आमची सुटका करा. आमच्यावर कृपा करा. डॉ. किम यांच्या मनात या अल्पसंख्याक प्रजेविषयी अनुकंपा जन्मली. प्लॅस्टिक सर्जरीत निष्णात असलेले कुशल डॉक्टर, या अल्पसंख्याक प्रजेसाठी कणखर वकील बनले. ''नवजात बालकास कान नसला तर कृत्रिम कान घडवणे ब्लास्फेमी ठरत नाही. ओठाविना जन्मलेल्या बाळासाठी प्लास्टिक सर्जन कृत्रिम ओठ बनवू शकतो. जन्मापासून असलेला पण न आवडणारा तीळ वा मस काढणे गैर नाही. खळ्या नसलेल्या गालावर खळ्या पाडून परमेश्वराने दिलेल्या देहात बदल करणे धर्मगुरू ब्लास्फेमी ठरवत नाहीत नि कोर्ट तसे करणे कायदेशीर ठरवते. इच्छुकाच्या इच्छेस मान देऊन परमेश्वराने प्रदान केलेल्या देहातील काही दूर करणे वा सपाट छातीच्या स्त्रीसाठी आकर्षक वक्ष बनवणे कायदेशीर ठरते, धर्म त्यास पाप ठरवत नाही. परमेश्वराने निर्माण केलेल्या कायेत सौंदर्याचे रोपण करणे परमेश्वराच्या कामात ढवळाढवळ ठरत नाही. मग अल्पसंख्याक इच्छुकांना इच्छित लिंग प्रदान करणे चुकीचे कसे? भविष्याच्या गर्भात सुप्तावस्थेत असलेल्या घटनांची आधीच चुणूक मिळते त्यांना समाज द्रष्टा म्हणतो. मग समाजाच्या हिताचा विचार करून, संकल्पनांना वास्तवात रूपांतरित करण्याची क्षमता सिद्ध करतात त्या शास्त्रज्ञांना समाजाने द्रष्टा का म्हणू नये? अल्पसंख्याकांच्या समस्या दूर करण्याचा माझा प्रयोग कायदेशीर का ठरत नाही? मला माझ्या प्रश्नांची तार्किक आणि समर्पक उत्तरे हवी आहेत.''

डॉ. किम यांनी खणखणीत स्वरात सुप्रीम कोर्टास स्पष्ट सांगितले. निरुत्तर करणारे त्यांचे कळीचे प्रश्न कोर्टास स्तब्ध करणारे होते. तार्किक कसोटीवर पूर्णपणे योग्य ठरणारी समर्पक उत्तरे कोर्टाकडे नव्हती. म्हणून मधला मार्ग पसंत करून सुप्रीम कोर्टाने निकाल जाहीर केला...

''अल्पसंख्याकांची इच्छा, समस्या आणि डॉ. किम यांच्या ज्ञान तसेच कौशल्याविषयी कोर्ट आदर व्यक्त करते. त्या आदराची खूण म्हणून काही अटी घालून त्यांचे प्रयोग चालू ठेवण्याची सुप्रीम कोर्ट परवानगी देत आहे. ज्यांच्यावर मुलांची जबाबदारी नाही, ज्यांची जननक्षमता संपली आहे वा संपण्याच्या तयारीत आहे, अशा पन्नास वर्षांहून अधिक वयाच्या लोकांना तसेच ज्यांनी विवाह केलेला नाही अशा प्रौढांचे लिंगपरिवर्तन करण्यास कोर्ट परवानगी देत आहे. म्हणजे लिंग बदलू इच्छिणाऱ्या इच्छुकांवर कुटुंबाची जबाबदारी नसावी. मुले वा पन्नास वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या तरुणांनी लिंगपरिवर्तन करून घेऊ नये. तसे केल्यास, शस्त्रक्रिया करणारा आणि करवून घेणारा गुन्हेगार ठरेल. शिवाय कोर्ट किमान दोन मनोरोगचिकित्सकांकडून रुग्णाच्या मानसिकतेत जेंडर आयडेंटिटी डिसऑर्डर ही समस्या असल्याचे निदान केल्याचे प्रमाणपत्र आणणे अत्यंत गरजेचे ठरवत आहे.''

इतकी सूट मिळाली याचा डॉ. किम यांना आनंद झाला. कारण त्यामुळे त्यांच्या कामाचा मार्ग मोकळा झाला. त्यांनी निवांत मनाने प्रयोग सुरू केले. ते कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करत. तरी सुरुवातीस समाजाच्या सर्व स्तरांतून त्यांच्यावर खूप टीका होत असे. समाजाच्या सर्व थरांतून परमेश्वराच्या कामात ढवळाढवळ करून नि निसर्गावर कुरघोडी करण्याचे पाप करून डॉ. किम नरकात जाणार, अशी खात्री व्यक्त होत असे. पण डॉ. किम यांना कपोलकल्पित नरकाचे भय वाटले नाही. त्यांनी नेटाने आगळेवेगळे काम चालू ठेवले. म्हणून या समस्येचे शिकार बनलेले रोगी त्यांना देव मानू लागले. हल्ली केलेल्या बौद्ध भिक्षूच्या शस्त्रक्रियेविषयी त्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

दूरच्या गावातून जेंडर आयडेंटिटी डिसऑर्डर असल्याची प्रमाणपत्रे घेऊन आलेल्या या ननला एक वर्षाहून अधिक काळ हॉर्मोन्स देणे आणि इतर प्रकारचे उपचार करण्यात आले. त्यामुळे तिच्या देहावरील लव राठ होत होती.

तोंडावर दाढी तसेच मिसरूड फुटू लागले. दरम्यानच्या काळात तिच्यासाठी देहात रोपण केल्यावर यशस्वीपणे कार्यरत होऊ शकेल, असे शिश्न तयार करण्यात आले. मग स्त्रीदेहाचे वेगळेपण सिद्ध करणारे अंडाशय, गर्भाशय आणि योनी (ओव्हरीज, युटेरस आणि व्हजाईना) दूर करून गरजेच्या अवयवांचे रोपण करण्यात आले. ही संपूर्ण शस्त्रक्रिया सुमारे अकरा तासात पूर्ण झाली.

असे उपचार करून घेणारे खूप लोक असणे अशक्यच. प्रत्येक इच्छुकाचे लिंग बदलणे शक्य असतेच, असेही नाही. रूपांतराची शस्त्रक्रिया करण्यापूर्वी काही उपचार करणे आवश्यक असते. स्त्रीतून पुरुष वा पुरुषातून स्त्रीत रूपांतरित होण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीस डॉ. किम किमान एक वर्ष मनाने इच्छित लिंगाच्या व्यक्तीसारखे वावरण्याचा सल्ला देतात. तसे केल्याने कोर्ट अत्यावश्यक ठरवत असलेले प्रमाणपत्र मिळणे सोपे होते. कुणाला मानसिकता बदलण्यास एक वर्षाहून अधिक अवधी लागू शकतो. रूग्ण दीर्घ काळ धीराने घेऊ शकला नाही तर त्यास जेंडर आयडेंटिटी डिसऑर्डर असल्याचे प्रमाणपत्र मिळू शकत नाही. अशा गरजू व्यक्तीचे लिंगपरिवर्तन कायदेशीर न ठरल्यामुळे होऊ शकत नाही. दोन मनोरोगचिकित्सकांकडून गरजेचे प्रमाणपत्र मिळाले की रूग्ण हॉर्मोन थेरपी आणि इतर उपचारांना सामोरा जातो. अंतिम टप्पा असतो शस्त्रक्रियेचा! या प्रक्रियेत मरण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून इतर शस्त्रक्रियांप्रमाणेच ही शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शस्त्रक्रियेस परवानगी आहे, असे लिहून रूग्ण सही करतो, तेव्हाच ही कार्यवाही होते.

आता या रूपांतराच्या बाबतीत समाज थोडा मोकळा झाला आहे. पूर्वी कुटुंबातील लोक यास प्रखर विरोध करत. समाज कुत्सित नजरेने तमाशा बघत असे. पण मुळात अशा इच्छुक लोकांत वेगळेपणा जाणवून समाज त्यांची अवहेलना करतच असे. त्यामुळे इच्छुकांना समाजाच्या भेदक नजरांची सवय असे. म्हणून इच्छुक ठाम असत. आता सुप्रीम कोर्टाने काही बंधने शिथिल केली आहेत. वयाचे बंधन काढून स्वजनांच्या परवानगीस महत्त्व दिले आहे. पूर्वी वयाची अट असल्यामुळे बराच काळ समाजाची अवहेलना सहन करून वीट आलेले, आयुष्य उतरणीस लागलेले अगतिक गरजूच डॉक्टरांकडे येत. आता वीस–बावीस वर्षीय तरुणांची संख्या वाढली आहे. खूप काळ नको त्या देहात जखडून राहणे टाळून बरेच गरजू वेळीच इच्छित लिंग प्राप्त करू लागले आहेत.

ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यास खूप वेळ लागतो. सुरुवात करताना मुळापासून मानसिकता बदलणे आवश्यक असते. मग हॉर्मोन्सचे उपचार होतात. शेवटचा टप्पा शस्त्रक्रियेचा असतो. अशा रीतीने पुरुष बनलेली व्यक्ती जननक्षम वयात असेल तर मूल होण्याची शक्यता असते. याउलट पुरुषातून स्त्रीत रूपांतरित झालेल्या तरुण वयातील व्यक्तीस मात्र मूल झालेले ऐकले नाही. कदाचित कृत्रिम शिश्न घडवण्यात वा ते इच्छुकाच्या देहात कार्यरत करण्यात जितके यश आले आहे तितके यश कृत्रिम अंडाशय, गर्भाशय आणि योनी घडवण्यात वा देहात कार्यरत करण्यात प्राप्त झाले नसावे. कदाचित 'अशा' बहुतेक स्त्रिया एंटरटेनरचे (मनोरंजन क्षेत्र) काम करत असल्याने – म्हणजे डान्सर वा मॉडेलिंगच्या क्षेत्रात असल्याने– त्यांना मूल नको असावे. कदाचित म्हणून त्या मूल होऊ देत नसतील, ही शक्यता नाकारता येत नाही.

डॉ. किम यांनी १९९० सुरू करून १९९५ साली शस्त्रक्रियेने पूर्ण केलेले एक रूपांतर खूप गाजले. १७ फेब्रुवारी १९७५ रोजी कोरियात जन्मलेल्या ली क्युंग–योप नावाच्या मुलाचे हे स्त्रीदेहात झालेले रूपांतर होते. कारण या मुलास यशस्वी अभिनेत्री होण्याची महत्त्वाकांक्षा होती – नव्हे त्याचा तो ध्यास होता. म्हणून त्याने डॉ. किम यांच्याकडून आपल्या पुरुषदेहाचे स्त्रीदेहात रूपांतर करवून घेतले. नवी ओळख कायदेशीर करण्यासाठी नावात बदल करून ली क्युंग–युन हे नवे नाव धारण केले. आज ती उत्तम अभिनेत्री, पॉप सिंगर आणि ३५–२४–३५ अशी प्रमुख मापे असलेली सर्वाधिक लोकप्रिय मॉडेल आहे. एंटरटेनरच्या – मनोरंजनाच्या विश्वात ती हारिसू या नावाने विख्यात बनली आहे. तिने २००१ मध्ये चित्रपटक्षेत्रात पदार्पण केले. तत्पूर्वी तिने १९९१ मध्येही अभिनय केला होता, पण तेव्हा ती हारिसू नव्हे तर ती 'तो' होती. आज तिच्या नावावर अनेक कोरियन अल्बम्स, चीन देशाच्या (मँडेरिन) भाषेतील चित्रपट तसेच ताईवानी नाटके आणि इतर खूप काही जमा आहे. तिला हारिसू नाव फार शोभते, असे तिच्या चाहत्यांना वाटते. कारण हारिसू शब्दाचा अर्थ आहे हॉट इश्यू. तिची मिकी जंग या विख्यात पुरुष पॉप सिंगरशी मैत्री झाली. दोन वर्षांची डोळस मैत्री संपवून त्यांनी लग्न केले. ते आजवर टिकून आहे. हारिसू प्रांजळपणे आपला अनुभव कथन करते. ''पुरुषातून स्त्रीत रूपांतरित होण्याच्या काळात जननांगावर घणाचे घाव पडत असावेत अशा वेदनेस मी सामोरी गेले. पण मी तक्रार केली नाही. काही काळात ही वेदना शमली. शस्त्रक्रियेमुळे मी सर्वांगसंपूर्ण स्त्रीदेहात

रूपांतरित झाले. मला ही शस्त्रक्रिया करण्यापूर्वी यात मरणाची शक्यता आहे, हे सांगण्यात आले होते. पण पुरुषदेहाचा मला अत्यंत तिटकारा होता. ही शस्त्रक्रिया शक्य नाही, असे सांगण्यात आले असते तर मी आत्महत्या करायचे ठरवले होते.'' अत्यंत शांत मनाने आपण परवानगी पत्रावर सही केल्याचे ती (सही केली तेव्हा ती 'तो' होती.) जाहीर करते.

काही असो, या प्रकारच्या शस्त्रक्रिया खूप प्रमाणात होणे शक्य नसते. कारण 'अशा' इच्छेस सामान्य वा सहज प्रकृती म्हणता येत नाही. ते अपवादच! नियमाच्या तुलनेत अपवाद नेहमीच संख्येने नगण्य असतात. गेल्या २८ वर्षांत डॉ. किम यांनी तीनशे वीस गरजू व्यक्तींवर शस्त्रक्रिया केल्या. त्यात २१० गरजू पुरुषांना स्त्रीदेहात रूपांतरित केले तर उरलेल्या गरजू स्त्रियांनी पुरुषाचा देह धारण केला आहे. या शस्त्रक्रिया खूप न होण्याचे एक आर्थिक कारणही असू शकते. जन्माने लाभलेल्या लैंगिक जातीचा त्याग करून भिन्न लैंगिक जात धारण करणे हे फार खर्चिक काम आहे. त्यातही स्त्रीने पुरुष होणे अधिक खर्चाचे आहे. वर्तमान परिस्थितीत या कामांसाठी अनुक्रमे ११ ते १३ आणि २९ ते ३० हजार अमेरिकन डॉलर खर्चाची शक्यता व्यक्त होते. सामाजिक विरोधामुळे पूर्वी या शस्त्रक्रिया फार होत नसत. पण आता परमेश्वर, विधाता वा ज्यास जे नाव योग्य वाटेल त्याच्या चुकीमुळे वेगळ्या बनलेल्या 'अशा' लोकांना दैहिक आणि मानसिक त्रास होतो, हे समाजास पटू लागले आहे. म्हणून आता सामाजिक विरोध कमी होत आहे. 'अशा' अपत्यांचे काही जन्मदातेही समाजात 'अशा' अपत्याचे पालकत्व निभावताना समाजाची बोचरी नजर सहन करणे कठीण वाटल्याचे कबूल करतात. अशी झळ सोसणे आपल्या पाल्यासाठी किती दुष्कर ठरत असेल, याची कल्पना ते करू शकतात. सुबत्ता असलेले पालक अपत्याच्या हिताचा विचार करून खर्चाची जबाबदारी पेलतात. म्हणून आता लहान वयात या शस्त्रक्रिया होऊ शकतात.

आज डॉ. किम साऊथ कोरियातील बुसान शहरात डाँग-ए विश्वविद्यालयाचे संचालन असलेल्या इस्पितळात जोमाने काम करत आहेत. पाश्चात्य जगातही त्यांच्या ज्ञानाची आणि शल्यकौशल्याची वाखाणणी होते. त्यांना आपल्या आगळ्यावेगळ्या कामाला समाजाने स्वीकृती दिली, याचे समाधान आहे. तरी त्यामुळे सर्व समस्या संपून शेवट गोड झाला, असे म्हणता येत नाही. कारण गरजू व्यक्ती इच्छित जातीत रूपांतरित झाल्यामुळे जुन्या समस्या नष्ट झाल्या, हे खरे; त्यांची आणि त्यांच्या जन्मदात्यांची अवहेलना कमी झाली हेही खरे; तरी समाजाचा दृष्टिकोन अजूनही रोगट आहे. तो पूर्णपणे बदललेला नाही. मीस युनिव्हर्सच्या स्पर्धेतून जेन्ना या 'अशा' व्यक्तीस वगळणे, हे त्याचेच प्रतीक आहे. शिवाय लिंग बदलल्यामुळे जुन्या समस्या सरल्या तरी काही नव्या निर्माणही झाल्या. आधीचे प्रश्न सोडवणे अवघड होते की नव्याने निर्माण झालेले प्रश्न अधिक जटिल आहेत, या प्रश्नाशी समाज घुटमळतो आहे. गरजू व्यक्तींची इच्छा पूर्ण झाली तरी त्यास निखळ यश म्हणावे, अशी परिस्थिती निर्माण झालेली नाही. लिंगपरिवर्तन प्रक्रियेने नव्याने निर्माण केलेल्या प्रश्नांची सुखद उत्तरे आज समाजाजवळ नाहीत. ती भविष्याच्या गर्भात सुप्तावस्थेत आहेत. नव्याने निर्माण झालेल्या प्रश्न-समस्यांचे समाधान मिळेल आणि दूरगामी परिणाम सुखद ठरतील का, या प्रश्नाचे उत्तर भविष्यकाळच देणार आहे. असे हे जटिल प्रश्न आहेत तरी काय, याचा चौकसपणे विचार करणे आणि त्यांचे समाधान शोधणे हे वर्तमान काळाचे काम आहे.

लिंगपरिवर्तन प्रक्रियेने निर्माण केलेला सर्वाधिक जटिल प्रश्न आहे, व्यक्तिमत्त्व संदिग्धतेच्या गोंधळाचा! Identity crisis! छोटा दिसणारा हा शब्दांचा समूह, जटिल समस्या निर्माण करणारे अनेक प्रश्न दडवून आहे. जेन्नाच्या माहितीची छाननी झाल्यापासून अशा लोकांनी आपली माहिती देताना जन्माची तारीख आणि जन्माचे गाव या सदरात काय लिहावे? जन्मस्थळ म्हणून प्रसूतिगृहाचे नाव लिहावे की शस्त्रक्रिया केली त्या इस्पितळाचे? या व्यक्तींनी वयाचा दाखला कुणाकडून घ्यावा? पारपत्र - पासपोर्ट कसा काढावा वा रिन्यू करावा? नवा पासपोर्ट काढायचा तर जुन्या पासपोर्टचा गैरवापर होऊन नकली पासपोर्ट निर्माण होऊ नये, यासाठी तो निकालात काढताना कोणती खबरदारी घ्यायला हवी? जुन्या पासपोर्टची नीट विल्हेवाट लागली नाही तर त्यामुळे दहशतवादी तसे पासपोर्ट उपयोगात आणून कारवाया वाढवण्याच्या शक्यतेचे निवारण कसे करावे? शिक्षणाचे अपार महत्त्व असलेल्या आणि भ्रष्टाचार शिष्टाचार बनलेल्या भारतासारख्या देशात वेगळ्या 'जातीचे' असताना घेतलेले शिक्षण दुसऱ्या कुणाच्या नावे खपण्याची अनिष्ट घटना घडणे कसे टाळता येईल? जीवनाच्या पूर्वार्धात निर्माण झालेल्या मैत्रीसंबंधातील मित्र वा मैत्रीण फार काळानंतर भेटल्यास आपल्या अशा' मित्रांना ओळखू शकणे अशक्यच. अशा वेळी वेगळा अवतार धारण केलेल्या व्यक्तीने ओळख



पॉप सिंगर झालेली हारिसू



हारिसूने मिकी जंग या पुरुष पॉपसिंगरशी लग्न केले.

देऊन भेट यशस्वी करण्याचा प्रयत्न करणे हा उपाय आहे, पण संबोधन वापरताना 'ती' आणि 'तो' यात सामान्य मित्र वा मैत्रिणीने गोंधळ केला तर ते समंजसपणे समजून घेतले जाईल की तो पाणउतारा ठरेल?.... एक ना अनेक प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत. शिवाय...

जेन मॉरिस वा हारिसू यांच्यासारख्या मोजक्या दिग्गज व्यक्ती अवहेलनेपासून मुक्त राहू शकतात. पण इतरांचे काय? त्यांची एक प्रकारची अवहेलना संपते नि वेगळ्या प्रकारच्या अवहेलनेची समाजात कुजबुज सुरू होते. म्हणजे निवड करायची ती अवहेलनेच्या प्रकाराची! असेच असले तर जन्मापासून सवयीची झालेली अवहेलना सहन करणे

सोपे नाही का? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे निखळ समाधान न देता अधिक गोंधळात टाकतात. म्हणून वरील बोधकथेतील राजाच्या समस्येस ज्ञानाने समर्पक उत्तर दिले, असे आज तरी म्हणता येत नाही. मग पूर्वीच्या आजीबाईंचे मत सार्थ वाटते. बदलणारी फॅशन, होणारी प्रगती ही भ्रामक गृहितके आहेत. वास्तवात हे आहे वर्तुळ! चक्र! सतत फिरणारे! तरी वारंवार परतून त्याच जागी येणारे! नावे बदलली तरी समस्या या समस्याच असतात.

हजारो वर्षांपूर्वी मानव 'अनंते' म्हटले नाही तरी निसर्ग ठेवेल तसा राहत होता. पुढे तृप्त मानवाच्या मनात अस्वस्थतेचा खडा पडला आणि जलात उठतात तसे तरंग उठले. अंत नसलेले! मनात 'मीपणाचे' प्राबल्य वाढवणारे! मन:पुत वागण्यास भरीस घालणारे! म्हणून भूक भागावी यासाठी नव्हे तर रसनेचे लाड करण्यासाठी पाकशास्त्राचा शोध लागला. थंडी, ऊन नि पावसापासून रक्षण मिळवण्यास ऋतूस अनुकूल कपडे शोधण्यात आले. मानवदेहास अनुकूल ठरेल असे गरम वा थंड वातावरण निर्माण करण्याचे तंत्र सापडले.... आणि बरेच काही! म्हणायला सारा आटापीटा समाधानाच्या प्राप्तीसाठी! पण समाधानाची संकल्पना स्वप्नील मिथ असावी. कारण अफाट उरस्फोड केल्यावरही समाधान चार अंगुळे दूरच असते. सारे प्रयत्न मानवी जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी नि समस्येची उकल मिळवण्यासाठी, असे म्हणावे तर सुधारलेली गुणवत्ता वा समस्येची निखळ उकल सापडलेली दिसत नाही. लिंगपरिवर्तन केल्यामुळे जीवनाची गुणवत्ता सुधारली, समस्या नष्ट झाल्या आणि पुढे धावणारे समाधान पकडण्यात यश मिळाले, असे सिद्ध होत नाही तोवर हे परिवर्तन योग्य की अयोग्य हे ठामपणे सांगता येणार नाही. तुम्हाला काय वाटते?



**– स्मिता भागवत**
53 Townley Crescent. Brampton
ON. Canada L6Z4S9
Phone 1 289 752 8885
smitacap@gmail.com



**शब्द रुची** आजच्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांचा मागोवा घेणारे माहितीपर, विचारप्रवर्तक व मनोवेधक मासिक. चाळीस वर्षांची अखंड परंपरा

ग्रंथालीने एप्रिल २०१४ मध्ये चाळीशीत पदार्पण केले. त्यानिमित्त पुढील वर्षभरात काही विशेषांक योजले आहेत. विविध विषयांवर संग्राह्य ठरतील असे हे अंक...

**प्रसिद्ध झाले...**



एप्रिल २०१४
स्त्री विशेषांक
संपादन नीरजा



सप्टेंबर २०१४
पर्यावरण विशेषांक
संपादन शुभदा पटवर्धन

**प्रसिद्ध होत आहेत...**

**डिसेंबर २०१४– पर्यटन विशेषांक**
अतिथी संपादक – **आल्हाद गोडबोले**

**जानेवारी २०१५– साहित्य आणि भाषा विशेषांक**
अतिथी संपादक – **वीणा सानेकर**

**फेब्रुवारी २०१५ – आरोग्य विशेषांक**
अतिथी संपादक – **डॉ. पी.एस. रामाणी**

**मार्च २०१५ – अर्थकारण विशेषांक**
अतिथी संपादक – **विनायक कुळकर्णी**

**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**दोन वर्षांची वर्गणी २५० रुपये ● तीन वर्षांची वर्गणी ३०० रुपये**



# सोशल मीडिया, सत्ता आणि राजकारण

प्रज्ञा शिदोरे




भारताच्या राजकारणामध्ये सोशल मीडीयानं आता आपला जम बसवला आहे. २०१४ च्या अहवालानुसार भारताच्या ५४३ लोकसभा मतदारसंघांपैकी १६० मतदारसंघांमध्ये सोशल मीडियावरील प्रचाराचा निर्णायक प्रभाव दिसतो. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये या माध्यमांचा प्रभाव फार दिसला नाही, पण त्यानंतर पाचच वर्षांनी झालेल्या निवडणुकांमध्ये या माध्यमांचा अगदी थेट परिणाम दिसून आला.

**दोन** व्यक्ती जेव्हा काही ठरवण्यासाठी एकत्र येतात तेव्हा राजकारणाचा जन्म होतो. पण सध्याच्या माहिती-तंत्रज्ञानामुळे आपण एकाच वेळेला एक नाही तर काही हजार लोकांना उद्देशून बोलतो. या गोष्टीचा राजकारणावर, समाजकारणावर प्रभाव पडणार हे निश्चित. पण हा प्रभाव नक्की कसा आहे याबद्दल....

फिलिपिन्समधली २००१ मधली आंदोलनं, बराक ओबामा यांची २००८ ची अध्यक्षीय निवडणूक, २०११ सालात जगभरात झालेली प्रस्थापितांच्या विरोधातली आंदोलनं, अण्णा, केजरीवाल, नरेंद्र मोदी आणि भाजपची लोकसभा २०१४ साठी तयारी, इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया यांमध्ये समान धागे काय?

या सगळ्या गटांनी आणि व्यक्तींनी आपले विचार, आपली कृती जगासमोर मांडण्यासाठी आणि जगाची त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी बनवण्यासाठी सोशल मीडियाची मदत घेतली.

मानवजातीच्या गेल्या दहा हजार वर्षांच्या इतिहासात मानवानं जेवढे बदल पाहिले नसतील तेवढे बदल आपण गेल्या पंचवीस वर्षांत पाहिले. त्यातला सर्वात मूलभूत बदल म्हणजे इंटरनेटचा; आणि त्यामुळे अवतरणाऱ्या या 'सामाजिक रचने'चा किंवा 'सोशल नेटवर्किंग'चा. या सर्वव्यापी 'सामाजिक विणी'नं सारंच बदललं. आपली भाषा, ज्ञानग्रहणाची साधनं, आपल्या मैत्रीच्या-नातेसंबंधांच्या कल्पना-सवयी, अर्थकारण-राजकारण-समाजकारण, आपल्या व्यक्तिगत आणि सार्वजनिकतेच्या कल्पना... सारं सारं बदललं. यानं आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्यातल्या इतक्या जास्त गोष्टींवर परिणाम केला आहे, कल्पनांना आव्हान दिलं आहे की या बदलाला खऱ्या अर्थानं क्रांतिकारी म्हणता येईल. अशा या बदलांचा थेट प्रभाव आपल्या विचारांवर व्हायला लागतो. आणि हे बदल 'राजकीय' व्हायला लागतात.

मला माझ्या आजोबांनी विचारलेला प्रश्न कायम आठवतो. आजोबांना मी फेसबुक म्हणजे काय, कसं आपण तुमच्या अमेरिकेत असलेल्या भावांना तडक निरोप पोचवू शकतो इत्यादी सांगत होते. आजोबा म्हणाले, ''संदेश इतका जलद गतीनं जाणार असेल, तिकडच्या व्यक्तीला लगेच पोचणार असेल, तर याची किंमत पण फार असेल नाही?'' मी ताडकन म्हणाले... ''अहो, नाही! हे एकदम फ्री आहे! एकही पैसा मोजावा लागणार नाही तुम्हाला.'' काही केल्या आजोबांना हे पटेना. त्यांच्या मते, कोणतीही गोष्ट जेव्हा तुम्हाला फुकट मिळते तेव्हा त्याची किंमत कोणीतरी वेगळंच किंवा आपणच आपल्या नकळत मोजत असतो. मला त्यावेळी ते लक्षात आलं नाही, पण त्यांचं म्हणणं बरोबर होतं. सोशल मीडियाच्या जगात, त्या माध्यमाचे वापरकर्ते म्हणजे आपणच एक प्रॉडक्ट असतो. कोणत्याही व्यावसायिकाला किंवा राज्यकर्त्याला आपण तयार ग्राहक म्हणून मिळत असतो. जसे वस्तूंचे ग्राहक तसेच विचारांचे ग्राहक!

पण, या मीडियामध्ये एक गोष्ट खूप महत्त्वाची आहे. ती म्हणजे, जसे आपल्यावर वेगवेगळे विचार येऊन पद्धतशीरपणे आदळत असतात, तसेच आपणही आपले स्वत:चे विचार सर्वांपुढे मांडू शकत असतो.

***सोशल मीडिया म्हणजे नक्की काय? त्यात काय काय येतं?***

खरं तर सोशल मिडिया म्हणजे काय, हे वेगळं सांगायची गरज नाही. आपण सगळेच ते वापरत असतो, अनुभवत असतो. त्याचा परिणाम आपल्यावरही होत असतो. पण ढोबळमानानं सध्या सर्वात प्रचलित असं मध्यम ज्याच्याबद्दल या लेखात आपण अधिक खोलवर विचार करू ते म्हणजे फेसबुक, ट्विटर आणि व्हॉट्स ॲप. या तीनही माध्यमांचा राजकारणावर, सत्ताकारणारणावर थेट प्रभाव पडतो आहे.

भारतात या सोशल मीडियाचं जाळं भलतंच घट्ट आहे. भारतात एकूण इंटरनेट वापरकर्ते २० कोटी एवढे आहेत. हा आकडा भारताला, इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये अमेरिका आणि चीननंतर तिसऱ्या क्रमांकावर नेऊन ठेवतो. सरासरी प्रमाण घेतलं तर हे वापरकर्ते दररोज २५ ते २६ मिनिटं 'ऑनलाईन' असतात. यातले अर्ध्याहून अधिक लोक हे आपल्या मोबाईलवरून या सोशल मीडिया साईटवर आपली मतं मांडत असतात किंवा लोकांची मतं ऐकत असतात. अधिकतर १५ ते २४ वयोगटातली जनता या माध्यमातून एकमेकांशी जोडली जाते आहे.

का बरं जोडली गेली इतकी माणसं या माध्यमांना? का या सर्वांना आपले विचार सर्वांसमोर मांडावेसे वाटत आहेत? या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मानवउत्क्रांती शास्त्रामध्ये मिळतात. हे शास्त्रज्ञ म्हणतात की माहितीची देवाण-घेवाण करणं ही माणसाची सहजप्रेरणा आहे. एकमेकांबद्दलच्या माहितीतून मानव-प्राणी आपल्या सभोवतालाचं आकलन करून घेतो. या आकलनातून त्याच्या वागण्या-बोलण्याला आकार येतो. या देवाण-घेवाणीतूनच माणूस आपल्या क्रिया-प्रतिक्रिया ठरवत असतो. म्हणूनच या देवाण-घेवाणीचा माणसाच्या विचारांवर मोठा प्रभाव पडतो. हे सर्व ठरवण्याची प्रक्रिया ही माणसाच्या स्व-संरक्षणाच्या मूलभूत प्रेरणेशी मिळतीजुळती आहे. आज विचारांची देवाणघेवाण हे प्रत्यक्ष स्व-संरक्षणाचं माध्यम नाही, परंतु माणूस आपला स्पर्धक किंवा समर्थक शोधायला आणि त्या अनुषंगानं आपले स्वत:विषयीचे निर्णय घ्यायला या माध्यमाचा वापर करतो. आजच्या मानवी मेंदूलाही आपले विचार एका धाग्यात गुंफण्यासाठी जास्तीत जास्त लोकांशी कोणत्या ना कोणत्या माध्यमातून संपर्कात राहावं असं वाटतं.

आपले विचार बांधण्यासाठी इतर माणसांशी देवाण-घेवाण करणं ही जर माणसाची सहजप्रेरणा असेल, तर माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रसाराआधी माणूस काय काय करत होता? तो आपले विचार लोकांपर्यंत कसे आणत होता?

माणूस कायमच आपल्या समविचारी साथीदारांच्या शोधात असतो. आपले अनुभव, त्याचा आपण लावलेला अर्थ त्याला लोकांसमोर मांडायचा असतो, पडताळून पाहायचा असतो. प्रत्येक युगात या देवाणघेवाणीची संकल्पना वेगळी होती. माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात त्याचं रूप हे फेसबुकसारख्या साइट आहेत. मग माणसाचं पहिलं सोशल नेटवर्क हे म्हणजे आपल्या टोळीच्या गुहेसमोरच्या शेकोटीभोवती बसून दिवसभरातली घटनांचा मागोवा घेणं असेल. आताच्या वातावरणात खायला योग्य अशा कोणत्या वनस्पती जंगलाच्या कोणत्या भागात आहेत याची माहिती एखादी आजी देत असेल. शिकारीसाठी नवनवीन युक्त्यांवर चर्चा होत असेल. मग एखादा कलाकार आपल्या या घटनांचा अर्थ गुहेच्या भिंतीवर चितारत असेल. पुढच्या पिढ्या या चित्रांवरून काही धडे घेत असतील.

### *ओबामा निवडणूक २००८*

व्हिएतनाम आणि अमेरिका यांमध्ये १९६५ पासून सुरू झालेलं युद्ध हे पहिलं 'टेलिव्हिजन युद्ध' असं म्हणतात. कारण तोपर्यंत टेलिव्हिजन अमेरिकेतल्या घराघरात पोचला होता. लोक आपापली कामं आटोपून व्हिएतनामची दृश्यं बघायला जमत असत. याप्रमाणेच २००८ साली अमेरिकेत झालेली राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक ही पहिली 'सोशल मीडिया निवडणूक' म्हणायला हरकत नाही. अमेरिकेचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी त्यांच्या २००८ मधल्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये सोशल मीडियाचा पुरेपूर वापर केला. स्वत:चा अजेंडा लोकांसमोर आणणं, आपली छबी लोकांच्या मनात पक्की करणं. यामुळे अमेरिकन जनतेला ते आपले, एकदम आपल्या घरातलेच वाटू लागले.

बराक ओबामा यांच्या निवडणूक यंत्रणेमध्ये अनेक लोक सहभागी झाले होते. त्यामध्ये जाहिरात जगतातील लोकांचा आणि अंकगणितातील तंत्रज्ञांचा भर सर्वाधिक होता. ओबामांच्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी त्यांच्याकडे जवळपास १ कोटी ५० लाख इ-मेल पत्ते गोळा केलेले होते. वेगवेगळ्या सोशल मीडिया माध्यमांवर ५० लाखांच्या वर लोक त्यांचे 'मित्र' होते. प्रत्येक माणसाच्या सहभागाचे ३ टप्पे निश्चित करण्यात आले होते. पहिला टप्पा म्हणजे तो फक्त ओबामांचा 'मित्र' बनेल, इ-मेल वाचेल इत्यादी. दुसऱ्या टप्प्यामध्ये तो ओबामांविषयीचा मजकूर अनेक लोकांना पाठवेल आणि लोकांना त्यांची मतं पटवून देईल. तिसरा स्तर असा, की या सोशल मीडियाव्यतिरिक्त बाहेरच्या जगात तो ओबामांचा आणि त्यांच्या मतांचा पुरस्कार करेल. या सोशल माध्यमांच्या बरोबरीनं ओबामांनी आपले ॲपदेखील लोकांसमोर आणले होते. थोडक्यात काय, तर विविध प्रकारे सतत आपल्या मतदात्यांच्या आणि 'कदाचित मत देऊ शकतील' अशांच्या संपर्कात राहायचे! या सगळ्या प्रचारमोहिमेच्या मुळाशी होते ते my.barackobama.com नावाचे संकेतस्थळ.

निवडणूक प्रचारयंत्रणेमधल्या अनेक पंडितांनी बराक ओबामा आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या या सोशल मीडिया



# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : (०२२) २२६३ १३ २५ / फॅक्स : २२६५ ३९ ६६

**प्रशासनिक मराठी भाषेचा विकास-पु. मु.**- गीता भागवत- रु.२७५ .
**कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य -पु.मु.**- सरोजिनी वैद्य - रु.२७५ .
**मराठी लेखन मार्गदर्शिका-पु. मु.** - यास्मिन शेख - रु.८०.
**मराठी लघुलेखन शब्दकोश -पु.मु**- व. वा. इनामदार - रु.१४०.
**विज्ञान संकल्पना कोश -पु. मु.**- रा. वि. सोवनी - रु.२५०.
**शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम-पु.मु.**-वा.व. पटवर्धन- रमेश पानसे - रु.३९६.
**मराठी भाषा : वाढ आणि बिघाड- पु.मु.**- श्री. के. क्षीरसागर- रु.२२५ .
**वृद्धिः भाषेचे व भाषाभ्यासाचे विकसन -पु.मु.**- दिनेश द. माहुलकर - रु.३७६.
**भाषा-आपली सर्वांचीच** - अविनाश बिनीवाले - रु.१५०.
**महाराष्ट्र साहित्य परिषद** - म. श्री. दीक्षित - रु.१२०.
**व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य -पु. मु.** - कृष्णा श्री. अर्जुनवाडकर - रु.१००.
**काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य** -मृणालिनी जोगळेकर - रु.१५०.
**गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य**- हेमंत वि. इनामदार - रु.६०.
**बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य** - मोहिनी वर्दे - रु.६०.
**मातृसेवा संघ** - विनया खडपेकर - रु.६०.
**'सकाळ' वृत्तपत्र आणि वृत्तसमूह -पु. मु.**- स्वाती सुहास कर्वे -रु.१२५ .
**शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य**- भा. र. सावडे- रु.१६०.
**डॉ. अ. का. प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य** - वि. बा. प्रभुदेसाई - रु.१५०.
**त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची** - सुषमा पौडवाल - रु.१५०.
**त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते -पु. मु.**- वसंत जोशी - रु.५०.
**मद्रासची मराठी हस्तलिखिते** - वसंत जोशी - रु.१५०.
**हैदराबादची मराठी हस्तलिखिते** - श्री. रं. कुलकर्णी, व इतर - रु.१००.
**कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते** - भीमाशंकर देशपांडे - रु.१५०.
**तंजावर सूची (खंड सहावा)** - भीमराव केसकर - रु.२००.
**दक्षिण भा. मराठी वाङ्मयाचा इतिहास-तंजावर खंड**-वसंतजोशी - रु.५००.
**दक्षिण भारतातील वाङ्मयाचा इतिहास - आंध्र-कर्नाटक खंड** - वसंत जोशी व द. दि. पुंडे - रु.५००.
**दाक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध**-माणिकधनपलवार-रु.३००.
**साहित्यसेतू** - श्री. रं. कुलकर्णी - रु.४५ .
**दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार**- श्री. रं. कुलकर्णी- रु.४५ .
**करुणाष्टक** - व्यंकटेश माडगूळकर - विनायक नारायण सप्रे - रु.७५ .
**राजमाची का बुधा** - गो. नी. दांडेकर - मीरा नांदगावकर- रु.७५ .
**विंदिया जितनी झील** - निर्मला देशपांडे - सुनीता परांजपे - रु.१००.
**कल्याणी** - ज्योत्स्ना देवधर - ७५ रु.
**मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे** -माधव कोंडविलकर-अविनाश बिनीवाले-रु.१५०.
**दिन ब दिन** - शं. ना. नवरे - सुभाष रणदिवे - रु.१००.
**साँस भर का फासला** -अंबिका सरकार- शरयू पेडणेकर - रु.१००.
**श्रीमती रमाबाई रानडे** - मा. श्री. विद्वांस - वासंतिका पुणतांबेकर - रु.११०.
**मैं कृतार्थ हुई** - मेहरून्निसा दलवाई - विजया - रु.११०.
**रोहिणी** - केशव केळकर - विलास गिते - रु.१००.
**बौद्धिक संपत्ती अधिकार** - विशाल कटारिया- अनु.-अनिता जोशी - रु.२५ .
**यंत्रालयाचा ज्ञानकोश** - शंकर गोपाळ भिडे - रु.१६००.
**मराठी ग्रंथसूची भाग १ व २** -संपा.- शंकर गणेश दाते - रु.२६००.
**मराठी ग्रंथसूची भा. ३ (१९५१-६२)** - शरद साठे - रु.१०००.
**मराठी ग्रंथसूची भा. ४ (१९६३-७०)** - शरद साठे - रु.११००.
**मराठी ग्रंथसूची भा. ५ (१९७१-७८)** - शरद साठे - रु.१६००.
**मराठी विज्ञान ग्रंथसूची** - रा.वि.सोवनी, संजीवनी शिंत्रे - रु.१५०.
**मराठी वैद्यक ग्रंथसूची** - सुरेश नाडकर्णी, कविता महाजन - रु.१२५ .
**मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची** - वसंत कुलकर्णी - रु.२००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड १ - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान** - रु.४००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड २ - सूतनिर्माण** - रु.४००.
**वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड ३ - कापडनिर्माण** - रु.५००.
**शिक्षणाचे अंतरंग—पु. मु.** - लीला पाटील - रु.३५५ .
**फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश** - यू. म. पठाण - रु.६००.
**पालघर तालुका-बोली समाज व संस्कृती** - प्रतिभा कणेकर - रु.६५०.
**दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश-प्र.खंड** -डॉ. गंगाधर पानतावणे - रु.३५०.
**दलित-ग्रामीण साहित्य : रूढी, प्रथा, परंपरा, विधिकोश- डॉ. गंगाधर** पानतावणे, डॉ. अशोक सोलनकर - रु.५६२.
**महाराष्ट्राचा भाषिक नकाशा** - रमेश धोंगडे, अशोक सोलनकर - रु.५३०.
**का ? आणि कसे ?** - अनु. संध्या पाटील-ठाकूर - रु. १५५ .
**कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण आत्मचरित्रात्मक पुस्तकाची** audio C.D. रु.१००.
**श्रीदासबोध - श्री. समर्थ रामदास स्वामी**-audio C.D. ५ सीडीसंच- रु.२५०.
**दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश -द्वि.खंड- डॉ.**गंगाधर पानतावणे- रु.३५२.
**वस्त्रनिर्मिती माहितीकोश-खं ४-रासायनिक प्रक्रिया**-कै.वा.अचवल- रु.१४२०.
**स्वातंत्र्यापासूनचे भारताचे राजकारण**-अनु.अ. दातार/वि. घोटाळे- रु.३५६.
**प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय धातुशास्त्राचा संक्षिप्त इतिहास** - प्रवीण प्र. देशपांडे - रु.१६०.
**तारकांशी मैत्री** - अनु. प्रदीप नायक - रु. ३२९.
**भारतीय इतिहासातील काही अभ्यास-विषय** - जा. वांबूरकर-उटगीकर- रु.४१८.
**मराठी ग्रंथसूची भाग ६ (१९७९-८५ )** - शरद साठे - रु.१३९६.

*** आगामी प्रकाशने ***

१) भारतातील सामाजिक परिवर्तन आणि विकास २) शालेय मराठी शब्दकोश ३) वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड ५ - फॅशन व वस्त्रप्रावरणे ४) कुशाग्र बुद्धीचा डी.एन.ए ५) मराठी ग्रंथसूची खंड ७ वा. ६) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश (प ते ह - खंड ३)

*** सर्व पुस्तकांवर २०% सवलत ***

संस्थेचे संकेतस्थळ : http://rmvs.maharashtra.gov.in ईमेल : rmvs_mumbai@yahoo.com

प्रचाराचं तोंडभरून कौतुक केलं आहे. त्यांच्या मते हा प्रचार राजकारणाचा आणि राजकीय प्रचाराचा तंतोतंत वापर केल्यामुळे यशस्वी झाला होता. लेझरफिल्ड आणि अशाच काही शास्त्रज्ञांच्या मते निवडणुकीमध्ये कोणाला मत द्यायचं हा निर्णय एका झटक्यात कधीच घेतला जात नाही. त्यामुळे उमेदवारानं कायम आपली मतं ३ फेऱ्यांमध्ये आपल्या मतदत्यांसमोर ठेवावीत. तीन फेऱ्या आणि तीन वर्तुळं.

बराक ओबामांच्या या सर्व प्रचारामध्ये केवळ त्यांनी मांडलेली मतं नव्हती. त्यामध्ये सामान्य, राजकीयदृष्ट्या अलिप्त अशा लोकांनाही सामावून घेण्यासाठी संधी होती. ही मंडळी या सोशल मीडिया पंडितांच्या भाषेत कुंपणावरची. या कुंपणावरच असणाऱ्या लोकांना थेट निवडणुकीबाबत नाही पण त्या अनुषंगानं प्रचारसाहित्य पोचायचं. म्हणजे एखाद्या चित्रकारानं ओबामा यांची चित्रं काढली आहेत, त्या चित्रांपैकी तुम्हाला कोणतं चित्र आवडतं? मत द्या! यामुळे माणसं साध्या साध्या गोष्टींनी या सगळ्या प्रचाराशी जोडली गेली.

### *जगभरातले बदलाचे वारे आणि सोशल मीडिया*

२०११ साली इजिप्तमध्ये सत्ताबदल झाला. 'अरब स्प्रिंग'मधील तो सगळ्यात परिणामकारक आणि दृश्य बदल होता. हा बदल भरपूर लोकसंख्येच्या एका अरब देशामध्ये झाला होता. या सगळ्या बदलाच्या प्रक्रियेमध्ये सोशल मीडियानं मोठीच कामगिरी बजावली होती. अनेक लोकांनी या सगळ्या क्रांतीला 'ट्विटर क्रांती' या नावानं संबोधलं. फेसबुक किंवा ट्विटरसारखी माध्यमं आंदोलकांना आपले विचार मांडण्यासाठी एक सोपं, सुटसुटीत व्यासपीठ देतात. पण, ही माध्यमं स्वत:च स्थितिप्रिय असल्यानं आंदोलनाच्या विचारांचा, मागण्यांचा प्रभाव पाडण्यासाठी ती कुचकामी ठरतात. ही माध्यमं आंदोलनाला लागणारी व्यवस्था निर्माण करू शकत नाहीत, त्यामुळे नुसताच गोंधळ निर्माण होतो आणि आंदोलन चिरस्थायी चालण्यासाठी लागणारा युक्तिवाद सर्व सर्मथकांना सतत करता येत नाही.

यापूर्वीच्या सामाजिक-राजकीय आंदोलकांना त्यांच्या मागण्यांवरून, त्यांच्या विचारधारेवरून, त्यामागील तत्त्वज्ञानाच्या आधारानं ओळखलं जायचं. आताच्या आंदोलकांना त्यांनी एकत्र येण्यासाठी, निरोप पोचवण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर केला यावरून ओळखलं जातं. या आंदोलनांवर, त्यांनी वापरलेल्या साधनांवरून टीकाही होताना दिसते. आशयापेक्षा, मूळ मागण्यांपेक्षा त्यात कृतीच्या नेपथ्याकडे जास्त लक्ष दिल्याचं जाणवतं. या अरब स्प्रिंग आणि जगात घडलेल्या अनेक छोट्या छोट्या आंदोलनांना म्हणावं तसं यश आलेलं नाही.

'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट' हे त्याचंच एक उदाहरण. सोविएट युनियनच्या पाडावानंतर गेली दोन दशकं अमेरिका एक निरंकुश सत्ता बनली होती. या सत्तेचं केंद्र बनलं वॉल स्ट्रीट. जिथे अमेरिकेतल्या अर्थसत्तेतील सौदे केले जातात. त्या सत्तेला आव्हान देण्याचे मनसुबे अमेरिकेतले तरुण-तरुणी रचत होते. तंत्रज्ञानाची साथ मिळालेल्या, कोणी एक नेता नसलेल्या या अराजकीय आंदोलनानं अनेक




सामाजिक-राजकीय विचारवंतांमध्ये नव्यानं चैतन्य जागवलं. यावर्षी १७ सप्टेंबरला 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट'च्या आंदोलनानं तीन वर्षं पुरी केली. अमेरिकेतील 'आहे रे' आणि 'नाही रे' या दोन वर्गांमधली दरी अधोरेखित करणाऱ्यांत या आंदोलनानं अनेक समाजशास्त्रज्ञांच्या, सामान्य नागरिकांच्या बदलाच्या अपेक्षा वाढवल्या होत्या. सर्व आंदोलन कोण्या एका नेत्याशिवाय, एका व्यवस्थेशिवाय केवळ सोशल मीडियामार्फत एकत्र आलेल्या आंदोलकांच्या मदतीनं उभं राहिलं होतं.

आज मात्र या 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट' चळवळीचं चित्र काहीसं वेगळं आहे. ९९% लोकांचं प्रतिनिधित्व करणारे हे तरुण आंदोलक आता पर्यावरणवादी, स्त्रीवादी चळवळींबरोबर काम करत आहेत. थोडक्यात काय, तर या

आंदोलकांना आता कोणतीही एक निश्चित मागणी उरली नाही. पण हे आंदोलक अधिक न्याय्य जगासाठी त्यांचा लढा कायमच सुरू ठेवणार आहेत, असंही म्हणत आहेत.

### *परिणाम केवळ सकारात्मक नाही*

सोशल मीडियामुळे होणाऱ्या माहितीच्या मुक्त आणि मुफ्त व्यवहाराचे परिणाम सगळेच सकारात्मक आहेत असं नक्कीच म्हणता येणार नाही. काही महिन्यांपूर्वीच पुण्यात झालेल्या दंगली याची साक्ष देतात. कोण्या एका इसमानं हिंदू देवीदेवतांच्या तसबिरींना अभद्र रूप दिलं. महाराष्ट्रातल्या काही राजकीय नेत्यांच्या छायाचित्रांचीही विटंबना केली होती. ही चित्रं विविध संपर्क माध्यमांमधून सर्वांपर्यंत काही तासांच्या आत पोचली. याचा परिणाम म्हणून पुण्यात अनेक भागांमध्ये दंगलसदृश परिस्थिती तयार झाली. पोलीस मोठ्या प्रमाणात दंगल रोखण्यात यशस्वी झाले. पण तरीही यामुळे पुण्यात एका माणसाला दंगलखोरांमुळे आपले प्राण गमवावे लागले.

सध्या कुप्रसिद्ध अशा ISIS (इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया) यांनी देखील या माध्यमांचा उपयोग करून आपले विचार जगासमोर मांडायला सुरुवात केली आहे. विचार मांडण्याबरोबरच ते याच माध्यमांचा उपयोग करून नवे आंदोलक, समर्थक, आणि त्यांच्यासाठी सक्रिय काम करण्यासाठी तयार असलेल्या युवकांना पद्धतशीरपणे सदस्यत्व देत आहेत. त्यांच्या अनेक फेसबुक संकेतांमार्फत ते जगभरातील युवकांना जिहादसाठी एकत्र येण्याचं आवाहन करत असतात. हे आवाहन करण्यासाठी त्यांनी अनेक छोटे छोटे व्हिडिओ फेसबुकवर प्रदर्शित केले आहेत.

### *भारताचं राजकारण आणि सोशल मीडिया*

भारताच्या राजकारणामध्ये सोशल मीडीयानं आता आपला जम बसवला आहे. IRIS Knowledge foundation च्या २०१४ च्या अहवालानुसार भारताच्या ५४३ लोकसभा मतदारसंघांपैकी १६० मतदारसंघांमध्ये सोशल मीडियावरील प्रचाराचा निर्णायक प्रभाव दिसतो. २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये या माध्यमांचा प्रभाव फार दिसला नाही, पण त्यानंतर पाचच वर्षांनी झालेल्या निवडणुकांमध्ये या माध्यमांचा अगदी थेट परिणाम दिसून आला. या सगळ्याची सुरुवात झाली २०११ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये. तीन वर्षांपूर्वी अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनानं जोर धरला होता. राजकारणाला नावं ठेवणारा, स्वत:ला अराजकीय म्हणून मिरवणारा एक मोठा समूह फेसबुक आणि ट्विटरच्या माध्यमातून एकत्र येत होता. राजकीय व्यवस्थांवरचा, राजकीय पक्षांवरचा, राज्यकर्त्यांवरचा विश्वास पूर्णपणे उडालेल्या या समूहासमोर अण्णांच्या रूपानं एक नवा अ-राजकीय पर्याय निर्माण झाला होता. राजकीयदृष्ट्या दूषित वातावरणात हा पर्याय निवडणं अतिशय सोपं, सोयीस्कर आणि जीवाला फारशी तोशीस न देणारं होतं. एखादी फेसबुक पोस्ट 'लाईक' केली, रविवारी एखाद्या मोर्चात जाऊन आलो की आपण मोकळे! कुठे फार मोठी जबाबदारी उचलायला नको किंवा फार काही तात्त्विक चर्चा वगैरे करायला नको. एकदा ...की जय म्हटलं की काम झालं! सर्वच माध्यमांमधून अण्णा म्हणजे दुसरे गांधी, आणि हे आंदोलन म्हणजे




दुसरा का तिसरा स्वातंत्र्यलढा असं बिंबवलं जात होतं. टीव्ही चॅनेल्सनी तर हे आंदोलन डोक्यावरच घेतलं होतं. या तात्कालिक उठावाला लगेच दुसरा स्वातंत्र्यलढा, क्रांती वगैरे म्हणणं हे जरा उतावळेपणा दाखवणारं आणि त्यामुळेच हास्यास्पद वाटत होतं. चक्क्याला श्रीखंड म्हणायचं, परीक्षकाला महागुरू म्हणायचं, चर्चेच्या गुऱ्हाळाला महाचर्चा म्हणायचं असं उदात्तीकरण हे सर्वच सोशल मीडियाचा केंद्रभाग. त्यामुळे नुसतं रस्त्यावर जमणं म्हणजेच क्रांती असं म्हटलं जातं होतं. आमच्या पिढीला दुर्दैवानं क्रांती म्हणजे काय माहीत नाही. या आंदोलनाला क्रांती म्हटल्यामुळे आपण खऱ्या मूलगामी बदलांच्या किती लांब जात आहोत माहीत नाही.

यातून एक गोष्ट चांगली घडली. अनेक अ-राजकीय लोकांचा आवाज बनणारा 'आम आदमी पक्ष' अस्तित्वात

आला. सोशल मीडियाच्या मदतीनं निर्माण झालेल्या आंदोलनाचा एक दृश्य परिणाम बघायला मिळाला. आम आदमी पक्ष आणि सोशल मीडिया यांचे मुळातले विचार खूप सारखे आहेत. माहितीला मुक्त करणं, कोणत्याही माहितीवर कोण्या एकाची मक्तेदारी नाही, ज्याच्याकडे काही सांगण्यासारखं आहे; मांडण्याजोगं आहे, त्या वेळेपुरता तो नेता. बाकी नेता (आम आदमी पक्षाच्या संदर्भात केजरीवाल जरी एकमेव आणि अविरत चेहरा असले तरी ती पक्षाची अधिकृत भूमिका नाही. आणि सध्या तो लेखाचा विषयही नाही!) नाही. त्यामुळे आम आदमी पक्षानं आपले विचार सर्वदूर पसरवण्यासाठी या माध्यमाचा वापर करणं ओघानंच आलं. २०१३ मधल्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीमध्ये आणि त्यानंतर २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये या पक्षानं सोशल माध्यमांचा खुबीनं वापर केलेला दिसतो.




आम आदमी पक्षाची सोशल मीडियामधील प्रचारयंत्रणा फारच नियोजनपूर्ण होती. जेवढ्या मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे होते त्या सर्व मतदारसंघांमध्ये एक मुख्य नेमला गेला होता. त्याची आणि त्याच्या सहकाऱ्यांची नियमित बैठक होत असे. केंद्रीय यंत्रणेमधून त्यांना कशाप्रकारचा मजकूर टाकायचा आहे याबद्दल स्पष्ट संदेश दिले गेलेले असायचे. रोज किती इमेल करायचे याबद्दलचं टार्गेट ठरवून दिलेलं असायचं. ही झाली त्या त्या मतदारसंघामध्ये असलेली रचना. एक केंद्रीय रचना होती, जिथे अनेक कार्यकर्ते हा मजकूर प्रत्यक्षात तयार करायचे. आपल्याला Whatsapp वर येणारे pappu vrs feku चे संदेश हे त्यांचंच काम. भ्रष्टाचारविरोधी आंदोलन आणि आम आदमी पक्ष यांचा या सर्व माध्यमांवर नक्कीच मोठा प्रभाव होता. पण, या जाळ्यात अडकल्यामुळे त्यांना कदाचित खरी परिस्थिती दिसू शकली नाही. आणि ज्या माध्यमांनी त्यांना वाढवलं त्यांच्याचमुळे बदलत्या परिस्थितीनुसार अनेकांनी मतं बदलायला सुरुवात केली आणि हा भोपळा फुटला. प्रत्यक्ष निवडणुकीच्या निकालांमध्ये आम आदमी पक्षाला फारशा जागा मिळाल्या नाहीत. सध्या तर या सोशल माध्यमांवर आम आदमी पक्षाबद्दल काहीच वाचायला मिळत नाहीये!

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी यांचा सोशल मीडिया वापर बघण्याजोगा होता. पद्धतशीरपणे ते स्वत:ला घराघरात आणि माहितीतंत्रज्ञान वापरणाऱ्या लोकांपर्यंत पोचवत होते. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामांप्रमाणे त्यांनीही स्वत:ची एक छबी निर्माण केली. स्वत:च्या ट्विटर आणि फेसबुक अकाउंटमधून त्यांच्या प्रचाराची माहिती सर्वांना मिळत होती. याबरोबरच मोदी थेट आपल्या मतदारांशी गुगलप्लसच्या माध्यमातून संवाद साधत होते. हा प्रयोग केजरीवाल यांनीही केला होता. दोघांनीही गुगल Hangout वर मतदारांच्या प्रश्नांना थेट उत्तरं दिली होती. आपल्या नेत्यानं असं प्रत्यक्ष लोकांमध्ये येऊन प्रश्नांना उत्तरं देणं हे भारतात पहिल्यांदाच घडत होतं. नेता थेट येऊन जनतेमध्ये बसला तर त्याची विश्वासार्हता वाढते हे सत्य नव्या, डिजिटल युगात Hangout च्या स्वरूपात बघायला मिळालं. काँग्रेस पक्षाचा मुख्य चेहरा सोशल मीडियामध्ये कधीच आला नाही. या निवडणुकीमधली काँग्रेसची कामगिरी आपण पाहतच आहोत. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांनी ही निवडणूक सोशल मीडियावर जिंकली होती. जणू काही ते पंतप्रधान झालेच होते अशा आवेशात प्रतिक्रिया उमटत होत्या. प्रत्यक्ष निवडणुका या केवळ उपचारमात्र होत्या!

महाराष्ट्रातही या वर्षी विधानसभा निवडणूक होत आहे. उमेदवारांनी प्रचारासाठी आता विविध Apps च्या माध्यमातून आपल्या मतदारसंघात संपर्क ठेवायची सुरुवात केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं काही काळापूर्वी आपलं अधिकृत App लोकांसाठी उपलब्ध करून दिलं

होतं. मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक प्रचारातून धडे घेऊन, पक्षाचे महाराष्ट्रातील नेते, जसे विनोद तावडे, देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे हे ट्विटर आणि फेसबुकवर सक्रिय झाले आहेत. महाराष्ट्रातल्या निवडणुकीवर या माध्यमांचा कसा प्रभाव पडतो हे आता बघायचं.

नुकतंच निवडून आलेलं भारतीय जनता पक्षाचं सरकार यामध्ये काही बदल, काही प्रयोग करू पाहत आहे. केंद्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागानं नुकतंच mygov.nic.in नावाचं संकेतस्थळ सुरू केलं आहे. या संकेतस्थळामार्फत सामान्य नागरिक शासनाच्या संपर्कात राहू शकतात. इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये असलेल्या संकेतस्थळावर 'चर्चा करें' आणि 'मैं करूँगा' असे ठळक रकाने आहेत. 'चर्चा करें'मधून नागरिक विविध विषयांवरचे आपले विचार थेट शासनापर्यंत पोचवू शकतात. त्याबरोबरच 'मैं करूँगा'मध्ये एका नागरिकाला करता येतील अशी खूप लहानलहान कामं दिली गेली आहेत. 'भारताचं भविष्य घडवायचं असेल तर शासनाच्या कामामध्ये थेट सहभागी व्हा' असं आवाहनही केलं गेलं आहे. या माध्यमांचा उपयोग होऊन नक्की काय आणि कशी कृती घडेल हे बघायला हवं.



### *माहिती कोणाची?*

सत्तेचा एक भाग म्हणजे नियंत्रण. ज्याचं माहितीवर नियंत्रण त्याची सत्ता वरचढ. लोकशाहीमध्ये म्हणूनच माध्यमांना चौथा स्तंभ मानतात. माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात ज्याचा या माध्यमांवर प्रभाव त्याच्या हातात सत्तेच्या चाव्या असं समीकरण झालं आहे.

१९९०च्या पूर्वार्धात इंटरनेट सार्वजनिक वापरासाठी खुलं केलं गेलं. जगातील सर्वांना आपल्याकडे असलेली माहिती इतर सर्वांना उपलब्ध करून देता यावी व जगात माहिती व ज्ञानाचा मुक्त व्यवहार असावा ही त्यामागची भावना होती. त्याच सुमारास भारत मुक्त आर्थिक व्यवस्था स्वीकारून या बदलांमध्ये सक्रिय सहभाग घेऊ लागला. या बदलांमुळे माहितीच्या सार्वत्रीकरणाची सुरुवात झाली.

याच तत्त्वांशी निष्ठा बाळगत जिमी वेल्स यानं 'विकिपीडिया' या मुक्त (आणि मुफ्त) ज्ञानकोशाची सुरुवात केली. संपूर्णपणे लोकसहभागावर आधारित असलेल्या या ज्ञानकोशानं नुकतीच १३ वर्षं पूर्ण केली. 'माणसाला असलेली सर्व माहिती तुमच्या हाताच्या बोटांवर' हे या ज्ञानकोशाचं ब्रीदवाक्य आहे. आज या कोशात २८१ भाषांतील २.३ कोटी लेख आहेत. केवळ इंग्रजी भाषेतल्या लेखांची संख्याच ३.५ कोटी आहे. हे सर्व लेख लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांच्या मदतीनं लिहिलेले आहेत. म्हणजे खऱ्या अर्थानं विकिपीडियावरील माहिती लोकशाहीवादी आहे. एखाद्या विषयावर जर लेखामध्ये बदल करायचा असेल तर योग्य तोडगा निघेपर्यंत चर्चा केली जाते. अर्थात तुम्ही लिहीत असलेल्या प्रत्येक माहितीला संदर्भ असणं अनिवार्य आहे. विकिपीडियानं नुकताच गिकी (गवर्नमेंट-विकी) नावाचा उपक्रम सुरू केला आहे. याच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, अंदाजपत्रकं मुक्त चर्चेसाठी खुली करण्यात येत आहेत. शासनव्यवस्थेला पारदर्शी व उत्तरदायी बनवणं हा यामागचा उद्देश आहे.

विकिपीडियाबरोबरच सध्या चर्चेत असलेला असाच माहितीचा साठा म्हणजे 'विकीलिक्स'. 'विकी' हे नाव सोडल्यास या दोन्हींचा एकमेकांशी काही संबंध नाही. हो, माहिती ही अभिजनांची मक्तेदारी नाही हे त्या दोन्हींमधले एकमेव साम्य. जर तुम्हाला एखादी माहिती काही अंतस्थ हेतूंनी जनतेपासून लपवली जाते आहे असं लक्षात आलं आणि जर ती माहिती तुम्हाला उपलब्ध असली तर ती तुम्ही इथे आणून देऊ शकता. ती माहिती विकीलिक्सकडे कशी आली याचा थांगपत्ता कोणालाही लागू दिला जात नाही - खुद्द विकीलिक्सलाही नाही - याची खबरदारी घेतली गेली आहे. २००६ साली जुलियन असान्ज यानं याच पद्धतीनं अनेक बलाढ्य राष्ट्रांची गुपितं विकीलिक्सच्या माध्यमातून लोकांसमोर आणायला सुरुवात केली. अमेरिकन

सैन्यानं अफगाणिस्तानमध्ये केलेल्या अमानुष हल्ल्याच्या चित्रफितीनं अमेरिकेलाही मान खाली घालायला लावली. बलाढ्य राष्ट्रं 'विकीलिक्स'नं माहितीचा गैरवापर केला व राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणली असं ठणकावत आहेत, तर असान्ज हा नव्या युगाचा रॉबिन हूडच बनलेला आहे. अनेक वृत्तपत्रांतून त्याचा 'नव्या युगाचा सत्याग्रही' असाही उल्लेख होतो आहे.

विकीलिक्स असो वा विकिपीडिया किंवा बहुचर्चित फेसबुक, या सर्वांना बांधणारा एक प्रबळ विचार आहे तो म्हणजे 'माहितीला मुक्त असू द्या - ज्ञानाला बंधनं घालू नका.' माहिती शक्तिशाली आहे. आणि जेव्हा ती जनतेच्या हातात असते तेव्हा तिची शक्ती कैकपटींनी वाढते. लोकशाहीचा चौथा स्तंभ या नव्या माध्यमांच्या रेट्यानं झपाट्यानं बदलतो आहे. आज इंटरनेटच्या माध्यमातून कधीही नव्हता इतका माहितीचा साठा आपल्याला खुला आहे. जनतेला जागरूक करणाचं काम ही माध्यमं करत आहेत. राष्ट्रीय सुरक्षेस धोकादायक म्हणून माहिती दाबून ठेवायचा प्रयत्न केला तरी ती बाहेर येणारच. या माहितीच्या महासागराला जनतेपासून लपवून ठेवणं आता शक्य नाही. किंबहुना जर राष्ट्रांनी याचा योग्य वापर केला तर त्याचा परिणाम लोकशाही बळकट करण्यासाठीच होऊ शकतो.

इंटरनेटची, सोशल नेटवर्किंगची निर्मितीच मुळात माहितीची मुक्त देवाणघेवाण होण्यासाठी झाली, माहितीला एका जागी जखडून ठेवण्यासाठी नाही. म्हणूनच हे जाळं आपण विश्वासानं, मैत्रीनं, सहकार्यानं विणलं. हे जाळं आता नवीन आहे. लांबच्या प्रवासातली ही फक्त काही पावलं आहेत. पुढचा प्रवास कसा होतो हे आपली ही वीण किती बळकट आहे त्यावर अवलंबून आहे.

वैयक्तिकतेच्या बदलत्या कल्पना आणि माहितीच्या अती प्रसारामुळे काही देशांच्या सरकारनं आपल्या फायद्यासाठी या वृत्तीचा उपयोग करून घेतला आहे. अमेरिकेनं तर असं कबूल केलं आहे की फेसबुककडे आमच्या नागरिकांबद्दलची आमच्यापेक्षाही जास्त माहिती आहे. आणि देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीनं ही माहिती अतिमौल्यवान असल्यानं अमेरिकन सरकारला वाटल्यास ही सर्व माहिती फेसबुक उपलब्ध करून देऊ शकतं. याच प्रकारे फेसबुककडून कायद्यानं सर्व माहिती न घेता, पण, एखाद्या गुन्हेगाराच्या मागावर असलेली गुप्तचर यंत्रणा आधी त्याच्या फेसबुक, ट्विटर इत्यादी अकाउंटवरून त्याचा माग काढू शकते. कोणत्याही सरकारकडे त्याच्याबद्दल असलेल्या माहितीपेक्षा नागरिकच सरकारबद्दल अधिक माहिती अधिकार आणि इतर माध्यमांतून निर्माण करत आहेत. हे सर्वच देशांपुढे मोठं विचित्र आव्हान निर्माण झालं आहे. कारण जरी लोकशाहीसाठी हे फार चांगलं असलं तरी सरकार चालवण्यासाठीच्या यंत्रांना एवढ्या माहितीच्या सार्वत्रिकीकरणाची सवय नाही. ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी तर या सोशल मीडियाला 'फेरल बीस्ट' एक जंगली प्राणी- असं संबोधलं आहे. ते म्हणतात की सोशल मीडिया हा वेडावाकडा वाढला आहे. लोकशाही टिकवण्यासाठी त्याला आकार द्यायला हवा. पण तो आकार कसा द्यायचा हे आमच्या नाही, कोणत्याही देशाच्या सरकारच्या अजून लक्षात आलेलं नाहीये.

### *यापुढे काय?*

ही सर्व सोशल मीडियावरची गर्दी, त्याचा परिणाम हा आपण एक पाऊल मागे होऊन बघायला हवा. एक तर, सोशल मीडिया हे माध्यम आहे. त्याच्याकडे स्वत:चा काही कंटेंट नाही. हा कंटेंट, हा विचार माणूसच त्याला देत असतो. त्यामुळे हे केवळ माध्यम आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे. उत्तम तलवार असली म्हणून लढाई जिंकता येत नाही, त्यासाठी अथक परिश्रमानं ती तलवार चालवण्याची कला अवगत असावी लागते. सोशल मीडियाचं तसंच आहे.

२००४ साली जेम्स सुरोवायकी नावाच्या समाजशास्त्रज्ञानं 'विजडम ऑफ क्राउड्स' नावाची संकल्पना मांडली. त्यात तो म्हणतो की एकट्याच्या निर्णयापेक्षा समूहानं उचललेलं पाऊल हे अधिक शहापणाचं असतं. एकाच भावनेनं, ध्येयानं एकत्र आलेल्या या समूहामध्ये राजकीय शक्ती उलथवून टाकण्याचंही सामर्थ्य असतं. सोशल मीडियाच्या जगात समूहाचा शहाणपणा टिकतो का? अनेक मतंमतांतारांच्या, बिंबवलेल्या आणि कधी कधी फसव्या वास्तवाच्या गर्दीत हा शहाणपणा कसा तग धरून ठेवेल हे येणारा काळच सांगेल.

**- प्रज्ञा शिदोरे**
कल्याण बंगला, ३२,
नटराज सोसायटी, कर्वेनगर,
पुणे-४११०५२
भ्रमणध्वनी : ९८६०००९७१९
pradnya.shidore@gmail.com


मराठी साहित्य रसिकांसाठी खुषखबर...
तुमचं आवडतं पुस्तक
सर्च करा
त्याची
ऑनलाईन
माहिती मिळवा
ऑनलाईन
खरेदी करा....
आणि पुस्तकं घरपोच मिळवा
मराठी साहित्याचा आनंद आता ऑनलाईन लुटा...!
Tej Advertising
www.erasik.com
सुवर्णमहोत्सवी वर्ष
५०
१९६४ २०१३
रसिक साहित्य प्रा. लि.
रसिक साहित्य प्रा.लि.
ग्रंथ मैत्री...सर्वोत्तम मैत्री
अप्पा बळवंत चौक, पुणे – ४११०३०.
फोन : +91 20 24451129
customercare@erasik.com


एसबीआय
HER घर
महिलांसाठी होम लोन
होम लोन त्यांच्यासाठी
जे देतात घराला घरपण.
सादर आहे महिलांसाठी एसबीआय होम लोन @ कमी व्याज दरात.
सर्वात कमी व्याज दर
10.10% वार्षिक
सर्वात कमी ईएमआय
₹ 885/लाख*
• रोज कमी होत जाणाऱ्या शिल्लकीवर व्याज
• मॅक्सगेन : ओवरड्राफ्ट सुविधा
कर्जाची रक्कम | ईएमआय/लाख*
₹ 75 लाखांपर्यंत | ₹ 885
₹ 75 लाखांपेक्षा अधिक | ₹ 897
सहकार्यासाठी आमची 24x7 हेल्पलाइन नं. 080-26599990 वर किंवा टोल फ्री नंबर 1800 11 2211 / 1800 425 3800 वर कॉल करा
किंवा www.sbi.co.in ह्या आमच्या वेबसाइट वर लॉग ऑन करा.

## डॉ. नीना सावंत यांची प्रबोधनात्मक तीन पुस्तके

### संवाद


आजच्या धकाधकीच्या आयुष्यात संवादाचे नाते विस्कटत चालले आहे. संवाद साधण्याची प्रत्येकाची स्वतंत्र शैली असते. आपण कोणाशी कसे बोलावे व कसे बोलू नये याचे भान ठेवले पाहिजे. तरच संवादाचे सुसंवादात रूपांतर होऊ शकेल. या पुस्तकाच्या निमित्ताने, संवाद हे अभिव्यक्त होण्याचे उत्तम माध्यम असून त्याचा वापर करताना तो अधिक प्रभावी कसा होऊ शकेल हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.




### एका तळ्यात होती...

लहानपणापासून मुलांवरील अपेक्षांच्या ओझ्यामुळे त्यांच्या बालसुलभ क्रिया-प्रतिक्रिया दबल्या जात आहेत. दुसरीकडे, टीव्हीसारख्या आधुनिक माहिती माध्यमातून मुलं अधिक चौकस होत आहेत. त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरं पालकांकडे नाहीत. तसंच, मुलांचं बालपण फुलवण्याइतका वेळ पालक त्यांना देऊ शकत नाहीत.


आज सर्वत्र दिसणाऱ्या बालक-पालक विवंचनांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून घेतलेला हा आढावा.




### चाहूल तारुण्याची

पौगंडावस्थेतील मुलाला वाढवताना पालकांना संपर्कशास्त्र, माहिती, समजूतदारपणा आणि मुलांशी कसे वागावे ह्याचे चांगले ज्ञान असेल तर त्यांना जबाबदारी पेलवणे अवघड वाटणार नाही.

या पुस्तकाचा हाच हेतू आहे की पालकांना पौगंडावस्थेतील मुलांच्या समस्या कळाव्यात आणि समजूनउमजून त्यांना मार्गदर्शन करावे. ज्याचा पालक व मुलांना उपयोग होऊ शकेल.




**तीन पुस्तकांचा संच**
**मूळ किंमत ३७० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**



नेतृत्व आणि त्याहून पुढे
शुभ
दिपावली
सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
बिझनेस क्रेडिट शील्ड
हाऊसहोल्डर पॉलिसी
मेडिक्लेम पॉलिसी
कार्यालय संरक्षण शील्ड पॉलिसी
पशु विमा पॉलिसी
मोटार पॉलिसी
सागरी मालवाहतूक पॉलिसी
दुकानदार पॉलिसी
व्यक्तिगत अपघात पॉलिसी
प्रकल्प विमा पॉलिसी
प्रवास विमा पॉलिसी
विद्यार्थी सुरक्षा विमा
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
(Wholly owned by the Government of India)
India's Premier General Insurance Company
IRDA REGN. No. 190
96th YEAR
राष्ट्राच्या सेवेत समर्पित
वैयक्तिक | वाणिज्यिक | औद्योगिक | दायित्वे | सामाजिक | ग्रामीण | कर्ज विमा
24x7 - टोल फ्री नंबर 1800-209-1415 | online.newindia.co.in | www.newindia.co.in

# Our Prestigious Printing Job

## Granthali's

# My Marathi

### Text Book for Communicative Marathi




With Best Compliment from

**SAP Print Solutions Pvt. Ltd.**

28A, Lakshmi Industrial Estate, S.N. Path, Lower Parel (W),
Mumbai-400 013



# वेबमंथन आणि आपलं 'सर्च' लाईफ

**माधव शिरवळकर**

> **उत्तमाचा शोध आणि नेमक्या संदर्भाचा शोध ह्या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. सर्चचे तंत्र हे स्पेशलायझेशनकडे झुकते आहे. आपण सगळेच सर्च करीत असतो. त्यात आपल्या आयुष्याचा कितीतरी काळ खर्ची पडतो. पूर्वी संदर्भ फक्त पुस्तकात शोधले जात. त्यासाठी ग्रंथपालांची हमखास मदत होत असे. आता डिजिटल युगात पॉवर सर्चचे तंत्र हाच पर्याय आहे. जगाच्या मागे राहायचे नसेल तर आपले सर्च लाईफ अपग्रेड करण्याशिवाय आता पर्याय नाही.**

**देव** आणि दानवांनी मिळून केलेल्या समुद्रमंथनाची कथा तशी सर्वश्रुत आहे. अमृताच्या प्राप्तीसाठी देव आणि राक्षस दोघांनी मिळून समुद्र घुसळला. त्यासाठी मंदार पर्वताची रवी आणि वासुकी नागाचा दोर त्यांनी वापरला. समुद्रमंथनातून पहिल्यांदा हलाहल विष निष्पन्न झाले. ते शिवशंकराने प्राशन केले आणि हलाहलाची समस्या दूर केली. हलाहल विषप्राशन केल्याने शंकराचा कंठ निळा झाला. त्यामुळे शंकरास नीलकंठ असे नाव आहे. पुढे समुद्रमंथनातून चौदा रत्ने निर्माण झाली. त्यातलेच एक रत्न म्हणजे अमृत. अमृताबरोबर जी इतर रत्ने होती त्याबरोबर आणखी दोन पेये होती. ती म्हणजे सुरा आणि हलाहल. अर्थात दारू आणि जालीम विष. त्याखेरीज लक्ष्मी, कामधेनू गाय, रंभा-अप्सरा, पांचजन्य शंख, चंद्र, ऐरावत हत्ती वगैरेही रत्ने त्या चौदांमध्ये होती. ही कथा रामायण, महाभारत आणि पुराणे अशी तिन्ही ठिकाणी असल्याचा संदर्भ विश्वकोशात आहे.

आधुनिक काळात इंटरनेटनामक समुद्राचे मंथन आपण सर्वच जण करीत असतो. आपण स्वतःला देव मानले तर जगातले अन्य राक्षसही इंटरनेट मंथनात आपल्याबरोबर सहभागी असतात. समुद्रमंथनासाठी मंदार पर्वताची रवी आणि वासुकी नागाचा दोर वापरला गेला होता. इंटरनेट मंथनासाठी रवी आणि दोर न वापरता आपण दररोज गुगल सर्च इंजिन नावाचा फूड प्रोसेसर वापरत असतो. देव आणि दानवांचे समुद्रमंथन एका टप्प्यावर संपले. मात्र आधुनिक मानवाचे इंटरनेट गुगल मंथन कधीही न संपणारे आहे. समुद्रातून जशी चौदा रत्ने सापडली होती तशी बरीच रत्ने इंटरनेट मंथनातून मिळत असतात. आपल्यासारख्या अनेकांना त्यातले अमृत हवे असते. पण असेही अनेक आहेत की ज्यांना हलाहल किंवा नुसत्याच रंभा-अप्सरा हव्या असतात. पांचजन्य शंख म्हणजे आपला मल्टिमीडिया. लक्ष्मी म्हणजे साक्षात इ-कॉमर्स. वगैरे वगैरे. यातला विनोदाचा भाग वगळला तरी खाली उरणारा बोध बराच बोलका आहे.

साधारणतः १९९४-९५ पासून इंटरनेटची सुरुवात झाल्याचे मानले जाते. पुढे त्याचा बोलबाला वाढत गेला. आज २०१४-१५ या काळात इंटरनेटच्या वयाची विशी

सुरू झाली आहे. समुद्र आणि इंटरनेट यांच्यातला मोठा फरक हा की समुद्र भरती–ओहोटीच्या रूपात पण निश्चित प्रमाणात अस्तित्व राखून असतो. मात्र इंटरनेटमध्ये फक्त भरतीच येत असते. ओहोटी नसतेच. इंटरनेटवर येणारा डेटा (अर्थात असंख्य वेबसाईट, पोस्ट, मेसेज, चित्रे, फिल्म वगैरे वगैरे) हा नेहमी वाढतच असतो. त्यात नवनवी अमृत, विष, रंभा–अप्सरा वगैरे रत्ने दररोज शेकड्याने येऊन पडत असतात. त्या वाढत्या समुद्रात उतरून आपण आपल्या मगदुराप्रमाणे गुगलची रवी घुसळून हवे ते काही मिळतेय का हे पाहत असतो.

१९९५ ते २०१४ ह्या एकूण वीस वर्षांचे प्रत्येकी पाच वर्षांचे समान चार भाग आपण केले आणि त्यावर स्वतंत्र कटाक्ष टाकला तर इंटरनेटची संस्कृती आपल्या नकळत कसकशी बदलत गेली याचा ढोबळ अंदाज नक्कीच घेता येतो. १९९५ ते २००० हा काळ भाबड्या इंटरनेटचा होता. एक तर त्यावेळचे नेट फक्त संगणकावरच होते आणि संगणक आजच्या एवढा घरोघरी पोहचलेला नव्हता. स्वाभाविकच ती पाच वर्षे इंटरनेट हा किमान गरजेचा भाग झालेला नव्हता. उलट एकूण उपयोगाच्या तुलनेत इंटरनेट महागडे असल्याने तिकडे न वळलेले बरे असे आम जनतेचे धोरण असे. २००१ ते २००५ ह्या काळात इंटरनेटचा उपयोग वाढला आणि खर्चाच्या दृष्टीने ते बरेच किफायतशीर झाले. त्याचा वापरही तांत्रिक दृष्ट्या पूर्वीपेक्षा सोपा होऊन गेला. मात्र ह्या काळातही इंटरनेट मोबाईल फोनवर स्थिरावलेले नव्हते. टूजी, थ्रीजी आणि फोरजी कोणी ऐकलेलेही नव्हते. आज जवळजवळ प्रत्येकाला माहीत असलेली पीडीएफ फाईल सुद्धा तेव्हा निवडक जाणकारांनाच ज्ञात होती. २००६ ते २०१० हा काळ इंटरनेटने टॉप गियर टाकण्याचा काळ मानावा लागेल. कारण ह्या काळात इंटरनेट मोबाईलवर पाहिले, वाचले, आणि ऐकले जाऊ लागले. २०११ ते २०१४ ह्या काळात अन्न, वस्त्र आणि निवारा याबरोबर चौथी गरज म्हणून लोक इंटरनेटचे नाव घेऊ लागले. आजच्या तरुण पिढीला पर्याय विचारला, की एक दिवस इंटरनेट मिळेल किंवा खायला मिळेल, तर बहुसंख्य तरुण उपाशी राहून नेटवर बसण्याची तयारी दर्शवतील.

### *'सर्च'चे बदलते स्वरूप*

इंटरनेट हे डेटाचे हिमालयाएवढे डंपिंग यार्ड आहे आणि त्यात फार मोठ्या प्रमाणावर कचरा भरलेला आहे याची जाणीव आज सर्वांनाच आहे. जेव्हा आपण गुगलवर काही शोधतो किंवा सर्च करतो तेव्हा आपल्याला काही विशिष्ट माहिती हवी असते. पण गुगल आपल्याला शोधून देतो काही कोटी रिझल्ट्स. त्या सगळ्या काही कोटी रिझल्ट्सवर नुसती नजर टाकणंही अशक्यप्राय असतं. आपण सामान्यतः पहिल्या चाळीस पन्नास (किंवा फार तर म्हणजे शे–दीडशे) सर्च रिझल्ट्सवर नजर टाकतो आणि माघार घेतो. आपला सर्च आपण मग पुन्हा नव्याने करायला घेतो आणि पूर्वीच्या प्रयत्नात न मिळालेली माहिती नव्याने मिळतेय का हे तपासू लागतो. इंटरनेटवरचा हा चाचपडण्याचा भाग आणि त्यासाठी दिलेला वेळ हा बहुधा फार प्रदीर्घ असा असतो. खूपदा खूप प्रयत्न करूनही माहिती सापडलीच नाही असेही घडते. अशा वेळी नेटवरचा वेळ वाया गेलेला असतो. पण ही सारी क्रिया–प्रतिक्रिया सर्वत्र दिसणारी आणि स्वाभाविक म्हणावी अशीच आहे. ती कोणालाही चुकलेली नाही. १९९५ मध्ये इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात गुगल अस्तित्वातच नव्हते. तेव्हा सर्च इंजिनची भूमिका बजावण्यासाठी ज्या विविध वेबसाईट होत्या त्यात yahoo.com अग्रेसर होते. पुढे कालांतराने गुगल आले आणि लोकांना यथावकाश याहूची गरज वाटेनाशी झाली. याहू मागे पडले. गुगलने सर्च तंत्रज्ञानाची पालखी बरीच पुढे नेली. सर्च तंत्रज्ञानात गुगलने सातत्याने आणि झपाट्याने भर घातली. ती प्रक्रिया आजही चालू आहे. त्या भरीचे प्रमाण इतके झाले आहे की 'सर्च कसा करावा' ह्या विषयावर आता पुस्तके निघाली आहेत आणि शैक्षणिक अभ्यासक्रमही तयार झाले आहेत. एकीकडे 'सर्च' इतका स्पेशलाईज्ड होत चाललेला असताना आपल्यापैकी बरेच जण याहूच्या काळात जसा सर्च केला जाई तशाच पद्धतीने आजही गुगल सर्च करताना दिसतात. आपण जर सर्चच्या नव्या खुब्या किंवा युक्त्या आत्मसात केल्या तर आपल्या आयुष्यातला सर्चमागे खर्ची पडणारा फार मोठा वेळ वाचू शकेल. ह्या खुब्या अगदी साध्यासोप्या असून लवकरच त्या सवयीचा भाग बनतात आणि आपल्या नेट उत्पादकतेत मोलाची भर घालतात. हा मुद्दा खूप महत्त्वाचा असला तरी ह्या बाबीकडे आपले नकळत दुर्लक्ष तरी होत असते, किंवा आपल्याला त्याची माहिती असूनही आपण त्या खुब्या वापरण्याचा आळस करीत असतो. अशा काही निवडक खुब्यांवर आपण नजर टाकू. यातल्या बहुसंख्य खुब्या तुम्हाला माहीत असतील तर तुम्ही करीत असलेला सर्च हा कार्यक्षम आहे असे म्हणता येईल. मात्र यातल्या बहुसंख्य खुब्या अजून तुम्ही ऐकल्या वा वापरल्या नसतील तर तुमचे सर्च

व्यवस्थापन सुधारायला खूप वाव आहे हे निश्चित. खुद्द गुगल आणि गुगलशी संबंधित वेबसाईट्सवर अशा अनेक खुब्या इंटरनेटवर आपल्याला दिसतात. इंग्रजीत अशा खुब्यांवर किमान आठ-दहा तरी स्वतंत्र पुस्तके आलेली आहेत.

***वेबमंथन आणि उत्तमाचा शोध***

जवळजवळ प्रत्येक नेटकऱ्याचा एकच प्रयत्न असतो आणि तो म्हणजे उत्तम आणि सर्वोत्कृष्ट वेबसाईट शोधण्याचा. उत्तम आणि सर्वोत्कृष्ट आपण म्हणतो तेव्हा त्या पूर्ण विश्वासार्ह असायला हव्यात हे आपण गृहीतच धरलेले असते. एकदा अशी एक उत्तमाची यादी आपल्या हातात पडली म्हणजे कायमचे काम झाले असे अर्थातच नसते. कारण नेटवर दररोज हजारो नव्या वेबसाईट्स येऊन पडत असतात आणि त्यातल्या काही उत्तम असण्याची दाट शक्यता असते. ह्या कारणामुळे वेबवरचा उत्तमाचा शोध हा न संपणारा असतो. आपल्याकडे मराठी वृत्तपत्रांमध्ये नव्या उत्तमोत्तम वेबसाईट्ससंबंधीची सदरे अभावाने दिसतात. मात्र टाइम मॅगझिन, फोर्ब्स मॅगझिन, गार्डियन, युएसए टुडे, न्यू यॉर्क टाइम्स वगैरे अनेक ख्यातनाम आंतरराष्ट्रीय नियतकालिके आपल्या वाचकांसाठी उत्तम वेबसाईट्स देणारी सदरे गेली अनेक वर्षे नियमाने चालवीत आहेत. ब्रिटनमधून निघणारे 'वेब युजर' नावाचे नियतकालिक तर प्रत्येक अंकात यासाठी भरपूर पाने भरून माहिती देत असते, तर काही वेळा उत्कृष्ट वेबसाईट्सवर एक पूर्ण अंकच काढला जातो. अशी सदरे आणि नियतकालिके जगभर लोकप्रिय होताना दिसत आहेत.

उत्तमाचा शोध हा दोन प्रकारचा दिसून येतो. एक म्हणजे सर्वसाधारणपणे एखाद्या विषयावरील उत्तम वेबसाईट. उदाहरणार्थ, संगणक आणि एकूणच आयुष्यासंबंधी सुखदायी टिप्स आणि ट्रिक्स देणारी lifehacker.com ही वेबसाईट. जिना त्रिपानी ह्या अमेरिकन तरुणीने तयार केलेल्या स्वतःच्या ब्लॉगमधून ह्या वेबसाईटचा वटवृक्ष तयार झाला आणि नंतर यथावकाश ती जगातील सर्वोत्तम दहा वेबसाईट्सपैकी एक असल्याचा उल्लेख इंटरनेटवर होऊ लागला. विशिष्ट



विषयांवरच्या उत्तम वेबसाईट्सची यादी पुरवणाऱ्या अनेक वेबसाईट्स दिसतात. त्यात जगातील अनेक मोठी ग्रंथालयेही सहभागी आहेत. त्यातील एक म्हणजे कॅनडातील टोरोंटो पब्लिक लायब्ररी. ह्या ग्रंथालयाच्या वेबसाईटवरील http://www.torontopubliclibrary.ca/vrl/recommend-websites.jsp ह्या लिंकवर अवश्य जाऊन पाहा. तिथे उत्तम आणि विश्वासार्ह अशा सुमारे १४,००० वेबसाईट्सची विषयवार यादी तुम्हाला मिळेल. तिथे कला, साहित्य, अर्थजगत, संगणक व इंटरनेट, शिक्षण क्षेत्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, पर्यावरण, भूगोल, भाषा, वृत्त आणि माध्यमे, धर्म, गणित, क्रीडा असे मुख्य विषय आहेत. त्या मुख्य विषयाच्या आत इतर उपविषय आहेत. उदाहरणार्थ, आरोग्य विभागात गेलात तर तिथे ए ते झेड असे अद्याक्षरांचे २६ विभाग आहेत. समजा, तुम्ही एच अद्याक्षराच्या उपविषयांमध्ये गेलात तर तिथे H1N1, Homoeopathy, Hepatitis, Headache वगैरे उपविभाग दिसतील. त्यातल्या समजा History वर क्लिक केलेत तर तिथे एशियन, आफ्रिकन, अमेरिकन, युरोपीयन, मिडल इस्टर्न वगैरे असे वेगवेगळे इतिहासाचे उपविभाग आहेत. त्यातील समजा प्राचीन इतिहास (Ancient history) उपविभागावर क्लिक केलेत तर तिथे fordham.edu सारखी वेबसाईट दिसते. १८४१ मध्ये स्थापन झालेल्या फोर्धम विद्यापीठाचे हे संकेतस्थळ. त्यावरील Amoncient History Sourcebook हा प्रकल्प एखाद्या ज्ञानकोशासारखा आहे.

एकूण १०,००० उत्तम वेबसाईटसपैकी ही एक. एखादे विद्यापीठ आपले संकेतस्थळ किती समृद्ध करून जगापुढे ठेवू शकते त्याचे उदाहरण म्हणजे Fordham University.

मुद्दा हा की एखाद्या विषयावरच्या उत्तम आणि विश्वासार्ह वेबसाईट्स शोधण्याचा प्रयत्न जगभरच्या विद्यापीठांत असलेल्या ग्रंथालयांतील ग्रंथपालही करीत असतात. त्यांनी केलेले कष्ट आपल्या आयतेच उपयोगाला येऊ शकतात. विस्तारभयास्तव इथे केवळ एकच उदाहरण दिले आहे. टोरोन्टो पब्लिक लायब्ररी काय किंवा फोर्धम विद्यापीठ काय, अशा वेबसाईट्स ह्या उत्तम वेबसाईट्स शोधण्याच्या अलिबाबाच्या गुहाच आहेत.

***पॉवर सर्चिंग***

सरसकट एखाद्या विषयावरच्या उत्तम वेबसाईटचा शोध




घेऊन देणाऱ्या वेबसाईट्स आपली उत्तमाच्या शोधाची सर्वसामान्य गरज भागवत असल्या तरी अडचण येते ती एखाद्या विशिष्ट संदर्भाच्या शोधाची. एक उदाहरण घेऊ. समजा, आपल्याला महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेली प्रदूषण ह्या विषयावरील एक पीडीएफ फाईल शोधायची आहे. आपल्या नेहमीच्या पद्धतीने गुगलवर ती फाईल शोधण्याचा प्रयत्न केला तर किती तास जातील सांगता येणार नाही. हवा तर प्रयत्न करून पाहा. पण गुगलमध्ये site:.maharashtra.gov.in file:.pdf pollution असे टाइप करून पाहा. गुगल तुम्हाला महाराष्ट्र सरकारच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या pollution ह्या विषयावरच्या हजारो pdf फाईल्सची यादी क्षणार्धात तुमच्यासमोर ठेवेल. सर्चमधील ही कार्यक्षमता गुगलच्या Search operator तंत्रामुळे साध्य झाली. असे अनेक सर्च ऑपरेटर आहेत की जे वाचक, विद्यार्थी आणि संशोधनाचे काम करणाऱ्यांना माहीत असणे आवश्यक आहे. सर्च ऑपरेटरचा उपयोग करून गुगलवर माहिती शोधणे म्हणजे नाव पत्ता हातात घेऊन एखाद्या माणसाला एखाद्या गावात शोधणे. मात्र, सर्च ऑपरेटरचा उपयोग न करता गुगलवर माहिती शोधणे म्हणजे नावही माहीत नाही, पत्ताही माहीत नाही अशा माणसाला गावात शोधणे. म्हणजे महाकर्मकठीण काम. सर्चच्या बाबतीत आता जगभर जागरूकता वाढते आहे. 'मेकिंग अवर सर्च लाईफ इझियर' ह्या मुद्याकडे लोक लक्ष देऊ लागले आहेत. ह्या सर्च ऑपरेटर्सची माहिती आणि एकूणच कार्यक्षम सर्च कसा करावा याचे प्राथमिक शिक्षण देणारी खुद्द गुगलने दिलेली चांगली वेबसाईट म्हणजे powersearchingwithgoogle.com. ही वेबसाईट गुगलची अधिकृत वेबसाईट आहे. मात्र सामान्यतः त्याबद्दल फारशी माहिती लोकांना नाही.

ही वेबसाईट अत्यंत बहुमोल आणि मोफत आहे. गुगलने त्याला Search Education Online असे म्हटले आहे. यात Power Searching आणि Advanced Power Searching असे दोन कोर्सेस आहेत जे आपण ऑनलाईन करू शकतो. गुगलमधील सिनीयर रिसर्च सायंटिस्ट डॉ. डॅनियल रसेल यांनी स्वतः हे कोर्सेस शिकवले आहेत. त्यातील लेसन्सच्या व्हिडिओ फाईल्स वेबसाईटवर आहेत. काही धडे विद्यार्थ्यांकडून गिरवून म्हणजे प्रॅक्टिकल्सद्वारे करवून घेतलेले आहेत. हे दोन कोर्सेस करणाऱ्यांच्या आयुष्यात सर्च करताना वाया जाणारे अक्षरशः शेकडो तास वाचतात आणि सर्च कितीतरी पटींनी अधिक कार्यक्षम होतो हा माझा अनुभव आहे. विद्यार्थी, संशोधनाचे काम करणारे, प्राध्यापक, पीएच.डी.चे उमेदवार अशा सर्वांनी Power searching techniques शिकायला हवीत. उत्तमाचा शोध आणि नेमक्या संदर्भाचा शोध ह्या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. सर्चचे तंत्र हे स्पेशलायझेशनकडे झुकते आहे. आपण सगळेच सर्च करीत असतो. त्यात आपल्या आयुष्याचा कितीतरी काळ खर्ची पडतो. पूर्वी संदर्भ फक्त पुस्तकात शोधले जात. त्यासाठी ग्रंथपालांची हमखास मदत होत असे. आता डिजिटल युगात पॉवर सर्चचे तंत्र हाच पर्याय आहे. जगाच्या मागे राहायचे नसेल तर आपले सर्च लाईफ अपग्रेड करण्याशिवाय आता पर्याय नाही.

**– माधव शिरवळकर**
बी–१३, बिल्वकुंज हौ.सोसायटी,
इ.एस.आय. हॉस्पिटलजवळ, एल.बी.एस. मार्ग,
मुलुंड (प), मुंबई ४०० ०८२
भ्रमणध्वनी : ९९८७६४२७९१
ms@pujasoft.net

**ग्रंथाली**




प्रपितामह
**काशिनाथ देवजी धुरू**
आणि
सूर्यवंशी
क्षत्रिय
ज्ञाती
समाज

**वसुमती धुरू**

काशिनाथ देवजी धुरू हे सूर्यवंशी क्षत्रिय समाजातील ज्ञातिपुरुष. त्यांनी मुंबईच्या दादर–माहीम भागात आपल्या ज्ञातिसमाजासाठी युगकार्य केले. अनेक मानदंड घालून ठेवले. एकूणच सार्वजनिक जीवन संपन्न केले. हा वारसा त्यांच्या कुटुंबाने चालवला. त्यांच्या कर्तृत्वाची ही कुटुंबकथा.

**मूळ किंमत २५० रुपये ● सवलतीत १५० रुपये**

**समाजपरिवर्तनाच्या एका आगळ्या प्रयोगाला तसाच अनोखा प्रतिसाद !**

**एक अनोखे अभियान !**

# मेळघाटावरील मोहर

डॉ. रवींद्र कोल्हे • डॉ. स्मिता कोल्हे

लेखिका - मृणालिनी चितळे

पृष्ठे ३०० • रंगीत छायाचित्रे • किंमत रु. ३००/- • ट.ख. रु. ३०/-

**अभियानात सहभागी होण्यासाठी तुम्ही फक्त इतकंच करा**

- या पुस्तकाची एक प्रत तुम्ही विकत घ्या. सुहृदांना भेट देण्यासाठी आणखी प्रती घ्या.
- तुम्ही विकत घेतलेल्या प्रत्येक प्रतीमागे रुपये ५० कोल्हे दांपत्याच्या सामाजिक कार्यासाठी वेगळे काढले जातील. लेखक-प्रकाशक त्यात वेगळी भर घालतील.
- जेवढ्या जास्त प्रती विकत घ्याल, तेवढा अधिक आनंद मेळघाटात पसरत जाईल.

कोल्हे दांपत्याचं काम आजही अव्याहतपणे सुरूच आहे.
त्यांना गरज आहे मदतीच्या हातांची..
साहजिकच तुमचा सहभागही तितकाच मोलाचा आहे.
म्हणूनच आम्ही सुरुवात केलीय या

**मेळघाट 'राजहंसी' अभियानाची !**

**अभियान मुदत : १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१४**

**राजहंस प्रकाशन**

पुणे २४४६५०६३, २४४७३४५९ मुंबई २४२२३९०१ नवी मुंबई ८६७३२७२४२
औरंगाबाद ९४२२७१३१७६ कोल्हापूर २६४६४२४ नागपूर ९३७२२२५२०१
सातारा ९८२२३९०८१० नाशिक ९४२२२५२२०८



# रेडिओचे दिवस आलेत, पण आकाशवाणी कुठे गेली?

**मेधा कुळकर्णी**

**आज जागतिक होताना माणसांच्या स्थानिक अस्मिता आक्रमकपणे व्यक्त होताहेत. जागतिक माहितीचं भांडार श्रोत्यांसाठी खुलं करताना त्यांच्या अस्मितांनाही पुरेसा अवकाश देण्याचं, ब्रॉड कास्टिंग आणि नॅरो कास्टिंग यांचा तोल साधण्याचं काम देशभरातली शेकडो आकाशवाणी केंद्रं करू शकतील. परंपरा आणि नवता यांचा उत्तम मेळ कसा घालायचा हे जगाला सांगू शकतील. करण्यासारखं हे सारं आहे. आणि हे करणं म्हणजेच 'बहुजनहिताय' माध्यम होणं आहे.**

**मुंबई**–दिल्ली–मुंबई राजधानी एक्स्प्रेस सुरू झाली तेव्हा तिच्या वेगळेपणाचं खूप कौतुक वाटायचं. तिचा सुसाट वेग हे पहिलं आकर्षण. तिचा रंग, आसनरचना, विमानातल्यासारखं मिळणारं जेवण वगैरे कौतुकाच्या गोष्टी तर होत्याच. या सगळ्यात अनोखी अशी आणखी एक गोष्ट होती; जी विमानातही नसायची. ही होती – बातम्या ऐकायला मिळणं! मुंबईत संध्याकाळी ४–५ ला बसल्यावर दिल्लीला उतरेपर्यंत दुसऱ्या दिवशी सकाळचे १० वाजत असत. या सतरा–अठरा तासांत राजधानी एक्स्प्रेसच्या प्रवासात दोन वेळा बातम्या प्रसृत केल्या जात असत. गाडी सुटल्याच्या रात्री आणि पोचण्याच्या दिवशी सकाळी ९च्या सुमारास. आजच्याइतकी त्या काळी मिनिटामिनिटाला काय घडतंय हे जाणून घ्यायची जिज्ञासा नसायची. पण देशात, जगात काही महत्त्वाचं घडलं तर प्रवासकाळात ते कळलंच नाही असं नाही व्हायचं. उलट ते नेमकेपणानं प्रवाशांपर्यंत पोचायचं. बातम्यांची ही




सेवा भारतीय रेल्वेला आकाशवाणीकडून पुरवली जात असे. खरं म्हणजे रेल्वेच ती सेवा आकाशवाणीकडून घेत असे. आकाशवाणीची हिंदीतून दिली जाणारी 'समाचार संध्या' आणि 'समाचार प्रभात' ही दोन बातमीपत्रं ध्वनिमुद्रित करून कालांतरानं लावली जात असत. त्यात राजकीय, सामाजिक घडामोडींसोबत खेळ आणि हवामानवृत्तही असायचं. बसल्या जागी हे सगळं अधिकृत आणि विश्वसनीय यंत्रणेकडून चांगल्या बिनभेसळीच्या भाषेत ऐकायला मिळायचं. अजूनही ही सेवा राजधानी एक्स्प्रेसमध्ये सुरू असल्याचं समजतं. पण आता तर काय; चोवीस तास बातम्या पुरवणारा मोबाईल असतो प्रवाशांजवळ. पण जेव्हा तो नव्हता तेव्हा बातम्या समजण्याची व्यवस्था करण्यात निराळेपणा होता. भारत हा केवढा उभ्या-आडव्या अंतराचा देश. ही अंतरं कापणाऱ्या कितीतरी रेल्वेगाड्या. राजधानी एक्स्प्रेसप्रमाणे सगळ्याच लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये आकाशवाणी प्रवाशांच्या माहिती आणि मनोरंजनाची दर्जेदार व्यवस्था करू शकली नसती का? पण तसं घडलं नाही. आता आपण जेव्हा सोशल मीडिया, एफएम रेडिओ वगैरेंची चर्चा करतो तेव्हा वाटतं या मीडियाच्या वावटळीत आकाशवाणी हे माध्यम पाचोळ्यासारखं उडून तर नाही ना जाणार!

कारण आज आपण आकाशवाणीचे कार्यक्रम ऐकतो तेव्हा त्यात फार काही नवेपण जाणवत नाही. भोवतालच्या बदललेल्या जगाचं प्रतिबिंबही तिथे फारसं उमटलेलं दिसत नाही. किंबहुना आकाशवाणीच्या श्रोतृवर्गाचं सरासरी वयच आता सत्तरीच्या पलीकडचं आहे. आकाशवाणीनं सुरू केलेल्या परंपरा एकाहून एक सकस होत्या. एकेका परंपरेबद्दल लिहायचं तरी बरेच शब्द खर्ची घालावे लागतील. मुळात नवस्वतंत्र भारताच्या आशा-आकांक्षा फुलवण्याचं, नागरिकांना विकासोन्मुख करण्याचं काम आकाशवाणीनं केलं. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांची पंचवार्षिक योजना आकाशवाणीनं सर्वदूर पोचवली. भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करणारी हरितक्रांती आकाशवाणीशिवाय पुरी होऊच शकली नसती. संगीत, नाटक, साहित्य अशा सगळ्याच कलांविषयी त्या काळातल्या मध्यमवर्गाची अभिरुची जोपासली आकाशवाणीनंच! भाषेचे चांगले संस्कारही केले. परंपरेचा सांभाळ करतानाच आधुनिक जाणिवा विकसित करण्याचं कामही आकाशवाणीनंच केलं. सरकारनं लोकांसाठी आखलेल्या योजना लोकांपर्यंत यशस्वीपणे पोचवण्याचं कामही हेच माध्यम अथकपणे करत आलं. प्रसारण त्या त्या राज्याच्या स्थानिक भाषेतून असल्यानं आकाशवाणी केंद्रांच्या माळेत सारा देश बांधला गेला होता.

आकाशवाणीची तुलना जगभरातल्या अन्य देशांतल्या रेडिओंशी करून पाहू. सरकारी निधीवर 'व्हॉइस ऑफ अमेरिका' चालतो. सुमारे ५० भाषांतून इथे कार्यक्रम प्रसारित होतात. अमेरिकन सरकारच्या धोरणांचा प्रसार असं सरळसरळ उद्दिष्ट घेऊन व्हॉइस ऑफ अमेरिका प्रसारण करतो. मुळात या रेडिओची सुरुवातच १९४२ च्या महायुद्धादरम्यान अमेरिकेच्या बाजूनं लोकमत वळवण्यासाठी झाली. व्हॉइस ऑफ अमेरिकाची पहिली उद्घोषणा होती - 'श्रोतेहो, आजपासून दररोज याच वेळी आम्ही तुमच्याशी अमेरिकेविषयी आणि युद्धाविषयी बोलणार आहोत.' व्हॉइस ऑफ अमेरिका कित्येक वर्षं अमेरिकेच्या युद्धविषयक माहिती देणाऱ्या विभागाच्या अखत्यारीत होता.

सोव्हिएट रशिया, चीन याही देशांच्या रेडिओंची सुरुवात युद्धाच्या बातम्या आणि आपल्या युद्धविषयक धोरणाला लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी झाली. दोन्ही ठिकाणी रेडिओ सुरुवातीला कम्युनिस्ट पक्षाच्या ताब्यात होता. १९९१ मध्ये सोव्हिएट रशियाची फाटाफूट झाल्यावर आता

वेगवेगळ्या देशांचे स्वतःचे रेडिओ आहेत. चीननं गेल्या दहा वर्षांत आपलं प्रसारण धोरण जगभरातल्या श्रोत्यांना आकर्षित करण्याच्या दिशेनं ठेवलं आहे. अमेरिकेलाही मागे टाकत चायना रेडिओ इंटरनॅशनलनं जगभरातल्या विविध भाषांत प्रसारण करायला सुरुवात केली आहे.

अमेरिका, रशिया, चीन इथल्या रेडिओपेक्षा आधुनिक आणि व्यापक धोरण १९२२ साली सुरू झालेल्या बीबीसी रेडिओचं राहिलं. माहिती, शिक्षण आणि मनोरंजन हे ते धोरण! आकाशवाणीनं तर त्याही पुढे जाऊन सर्वसामान्य लोकांचं भलं करण्याचा उद्देश ठेवला. आकाशवाणीचं घोषवाक्य आहे - 'बहुजनहिताय बहुजनसुखाय.' हा खास भारतीय विचार आहे.

विविध भारती या आकाशवाणीच्या वाहिनीनं श्रोत्यांचं उच्च दर्जाचं मनोरंजन केलं. विविध भारती या वाहिनीनं भारताला हिंदी ऐकायला-बोलायला शिकवलं. आजही विविध भारतीची लोकप्रियता टिकून आहे. सन २०००नंतर एफएम रेडिओ फारच लोकप्रिय झाला आहे. खरं तर खाजगी एफएम वाहिन्या लोकप्रिय झाल्या आणि पुन्हा एकदा रेडिओचे दिवस आले असं म्हटलं जाऊ लागलं. एफएम हे तंत्रज्ञानाचं नाव. फ्रिक्वेन्सी मोड्युलेशन. हे तंत्रज्ञान मर्यादित क्षेत्रफळात, एखाद्या शहरापुरतं, जिल्ह्यात, स्वच्छ आणि स्पष्ट प्रसारणक्षमता असलेलं. मुख्यतः वेगवान संगीताला अनुकूल. पण कित्येकांना माहीत नाही की हे एफएम तंत्रज्ञान पहिल्यांदा आकाशवाणीनंच आणलं. खाजगी रेडिओ येण्याच्या कितीतरी आधी (१९७७ मध्ये) आकाशवाणीनंच एफएम प्रसारण सुरू केलं आणि देशातल्या जिल्ह्याजिल्ह्यात एफएम केंद्रं सुरू केली. एका परीनं हा जिल्ह्याचा कम्युनिटी रेडिओच होता. 'ब्रॉडकास्टिंग'सोबत 'नॅरोकास्टिंग' असा हा प्रयोग होता.

पण हा सगळा आता जुना वा अलिकडचा भूतकाळ झाला. दूरदर्शन अवतरलं; तेव्हा आकाशवाणीत काम करणाऱ्यांना आपलं माध्यम आता कोण ऐकणार याची धास्ती वाटली होती. खेडोपाडी वीजच उपलब्ध नसल्यानं लोक टीव्ही बघूच शकणार नाहीत आणि बॅटरीवर चालणारा रेडिओच ऐकतील असं फसवं समर्थन तेव्हा आकाशवाणीत केलं जायचं. पुढे खुद्द दूरदर्शनलाच अनेक स्पर्धक आले. आणि नंतर आकाशवाणीलाही! लोकांना नवनवी माध्यमं हवीच असतात. शिवाय प्रत्येक नव्या पिढीसोबत माध्यमानंही बदलण्याची गरज असते. फक्त रूपडं नाही, आशय-विषय-भाषा-परिप्रेक्ष्य यासह सगळाच बदल अपेक्षित असतो. पण आकाशवाणी माध्यमात तो घडला नाही, घडवून आणला गेला नाही.

१९९० नंतर आपल्याकडे खाजगीकरणाच्या धोरणाचा अंमल सार्वजनिक क्षेत्रात सुरू झाला आणि वातावरण बदलायला सुरुवात झाली. दूरसंचार, विमान वाहतूक, पेट्रोलियम, वीज वगैरे क्षेत्रांबरोबरच प्रसारणक्षेत्रातही खाजगीकरणाचं वारं शिरलं. त्याआधी खाजगी टीव्ही चॅनल्स अवतरले होतेच. त्याही आधी १९९७ साली प्रसारभारती विधेयक आणून आकाशवाणी आणि दूरदर्शनला स्वायत्तता देण्याची आणि या माध्यमांना सरकारी जोखडातून मुक्त करण्याची चर्चा झाली होती. प्रत्यक्षात तसं काही घडलंच नाही. घडणारही नव्हतं. कोणतं सरकार आपल्या हातातल्या माध्यमांवरची ताबेदारी सोडेल? आणि कोणत्याही सरकारनं ती का म्हणून सोडावी?

आपल्याकडे खाजगीकरण अस्तित्वात नव्हतं आणि आकाशवाणी हे सरकारचं माध्यम अशी ओळख असली, तरी सरकारी म्हणून या माध्यमाची बदनामी झाली ती आणीबाणीच्या काळात. वृत्तपत्रांसोबत याही माध्यमावर आलेल्या सेन्सॉरशिपमुळे आणि वीस कलमी कार्यक्रमाच्या अतिप्रचारामुळे. एरवी आकाशवाणीची प्रसारणसंहिता ही कोणत्याही सभ्य, सुसंस्कृत व्यक्तीच्या लिहिण्या-बोलण्या-वागण्याहून निराळी नाही. त्यामुळे जाचक ठरणारीही नाहीच. कोणा व्यक्तीची, संघटनेची बदनामी नको. व्यक्तीचं, संघटनेचं नाव घेऊन बोलण्याऐवजी त्यांच्या विचारांवर मतप्रदर्शन करावं. एखाद्या व्यापारी उत्पादनाची जाहिरात होणार नाही याची काळजी घ्यावी, वगैरे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याची चर्चा आणीबाणीत जोरात होती. आकाशवाणी आणि दूरदर्शन सरकारी नियंत्रणातून मुक्त करावं असा विचारप्रवाह त्याच चर्चेतून आणीबाणीनंतर पुढे आला. आणीबाणीचा हा फायदा म्हणावं की तोटा? बीबीसीच्या धर्तीवर हे मॉडेल असावं अशी चर्चा सुरू झाली आणि कालांतरानं प्रसारभारतीचा जन्म झाला.

सरकारचा स्वतःचा रेडिओ, माउथपीस असावा की नसावा हा नेहमी चर्चेत राहिलेला मुद्दा आहे. भारतासारख्या देशात जिथे निरक्षरांची, गरिबांची, वंचितांची संख्या मोठी आहे तिथे त्यांच्यापर्यंत त्यांच्या हिताच्या गोष्टी पोचवण्यासाठी, सरकारी योजनांची माहिती पोचवण्यासाठी एखाद्या जबाबदार माध्यमाची आवश्यकता आहे यात शंकाच नाही. सरकारच्या कामाची माहिती नीटपणे लोकांपर्यंत जावी यात सरकारचे हितसंबंध गुंतलेले असल्यानं सरकारनं

या माध्यमावर नियंत्रण ठेवणं स्वाभाविक ठरतं. निव्वळ नफा कमावणं आणि त्यासाठी लोकांची करमणूक करणं या उद्देशानं चालवले जाणारे खाजगी रेडिओ ही जबाबदारी कशाला मानतील?

महाराष्ट्रात आज मुंबईतल्या दोन वाहिन्या आणि अन्य तेरा जिल्ह्यांत एफएम केंद्रं आहेत. पण आकाशवाणी आजच्या काळाच्या गरजेनुसार स्वतःचा ब्रँड तयार करू शकली नाही. ब्रँड बनवण्याच्या क्षमतेचे कल्पक आणि काळाची पावलं ओळखणारे अधिकारी, कर्मचारी इथे जरूर आहेत, पण योग्य नेतृत्वाअभावी हे होऊ शकलेलं नाही.

खाजगी एफएम वाहिन्यांनी तरुण पिढी आकर्षित होईल अशी नावं आपल्या वाहिन्यांना दिली. सादरीकरणाची आक्रमक शैली आणली. श्रोत्यांचा सहभाग, त्यांच्याशी संवाद, त्यांची मतं, त्यांचे अनुभव याला जास्त महत्त्व दिलं... किमान तसा आविर्भाव तरी आणला. टेलिकम्युनिकेशनच्या प्रगतीमुळे प्रवासातही मोबाइल फोन, एसएमएसद्वारे रेडिओशी संवाद करणं लोकांना शक्य होऊ लागलं. अगोदरच स्वस्त आणि परवडण्याजोगा, काम करता करता कण्याजोगा असलेला रेडिओ अधिक मोबाईल झाला, पर्समध्ये, खिशात, वाहनातही आला. श्रोत्यांच्या अधिक निकट, अगदी कानातच जाऊन पोचला. सुरुवातीला महानगरात दाखल झालेले खाजगी रेडिओ आता जिल्ह्याजिल्ह्यात पोचले. जागतिकीकरणाच्या लाटेवर स्वार व्हायला निघालेली स्मार्ट तरुण पिढी तिथेही त्यांनी आकृष्ट करून घेतली. थोडी स्थानिक भाषेची झूल चढवली. मनोरंजनाचा सिलसिला सुरूच राहिला.

या सगळ्यात बहुजनहिताय बहुजनसुखाय हे ब्रीद असलेल्या आकाशवाणीचं काय झालं आहे? आकाशवाणीत हळुहळू कार्यक्रमांचं महत्त्व कमी होत गेलं आणि जाहिराती मिळवण्यावर भर देणं सुरू झालं. जाहिरातींशी संबंधित विभागांचंही महत्त्व वाढत गेलं. पूर्वी सर्वोच्च अधिकारी महासंचालक (डायरेक्टर जनरल) असायचे आणि ते स्टाफपैकीच कुणीतरी, खालपासून करिअर सुरू करून वरच्या पदापर्यंत पोचलेले असायचे. त्यांना कामातल्या सगळ्या खाचाखोचा माहीत असायच्या. दिल्लीत बसलेले असले तरी त्यांना तळापर्यंतची माहिती असायची.

आता या महासंचालकांच्याही वर आणखी एक पद आलं - मुख्य कार्यकारी अधिकारी (सीइओ). तेही आयएएस केडरमधलं. तेव्हापासूनच आकाशवाणी - दूरदर्शनचे अग्रक्रमच बदलले. आयएएस अधिकाऱ्यांसाठी नवी पदं उपलब्ध करण्याच्या क्रमात प्रसारभारतीसारखी बरीच महामंडळं तयार केली गेली असं कळलं. महसूल मिळवणं हाच प्रमुख अजेंडा होऊन गेला. एकीकडे खाजगी रेडिओंना परवाने द्यायचे, त्यांना सर्व सुविधा द्यायच्या आणि दुसरीकडे आकाशवाणीकडे दुर्लक्ष करायचं असं धोरण सुरू झालं. काळाबरोबर बदल हवेतच, प्रसारण वेळ विकून महसूलही मिळवायला हवा, पण ते आकाशवाणी-दूरदर्शनमध्ये आयुष्य घालवलेल्यांना, तिथल्या खाचाखोचा, बारकावे माहीत असणाऱ्यांना विश्वासात घेऊन, त्यांचे अनुभव, त्यांची मतं विचारात घेऊन केलं गेलं नाही. त्यामुळे आकाशवाणीत काम करणारे सगळेच 'बिचारे' होऊन गेले आहेत. अनेक शहरांमधल्या आकाशवाणी केंद्रांच्या आवारातच खाजगी रेडिओंना त्यांची कार्यालयं थाटायला जागा दिली गेली. एकाच आवारात एक सरकारी छापाच्या इमारतीतला रेडिओ आणि तिथेच चकाचक कॉर्पोरेट खाजगी रेडिओ! आकाशवाणी कर्मचाऱ्यांचं मनोधैर्य खच्ची करणारं. कामातलं आव्हान, नाविन्य, कल्पकता संपली की स्टाफची भांडणं, मतभेद आणि व्यवस्थापनाच्या समस्या डोकं वर काढतात हे लक्षात घेतलं पाहिजे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना नव्या आव्हानात्मक कामात गुंतवून ठेवणं ही नेतृत्वाची जबाबदारीच असते. आकाशवाणीतलं या संदर्भातलं वातावरण मुळीच आशादायी नाही. अनेक गुणी अधिकारी आणि कर्मचारी त्यामुळे वैफल्यग्रस्त झालेले दिसतात. नेहमीची कामं पुरी करण्यासाठीही तिथे पुरेसं मनुष्यबळ नाही, आवश्यक ती साधनं नाहीत. वेळ विकून पैसे मिळवण्याचं उद्दिष्ट मात्र वरचढ झालं आहे. योग्य नेतृत्वाच्या अभावी ना धड कमाई आणि ना पूर्वीची आशयसंपन्नता, अशी स्थिती. यात आकाशवाणीपणवर शेवाळं साचत गेलं आहे.

आकाशवाणीपण म्हणजे तरी काय? आजच्या भाषेत युनिक सेलिंग पॉइंट? एक तर ही अत्यंत जबाबदार संस्था आहे. आपल्या माध्यमातून जे बोललं जाईल त्याचा ऐकणाऱ्यावर काय परिणाम होईल याचा खूप गंभीरपणे विचार इथे केला जातो. खाजगी वाहिन्यांशी आकाशवाणीची तुलना करताना नेहमी दिलं एक जाणारं उदाहरण - मुंबईतल्या खाजगी एफएम वाहिन्यांचा प्राइम टाइम सकाळ आणि संध्याकाळ; जेव्हा लोक प्रवास करत असतात. ट्रॅफिक जॅमबद्दल या वाहिन्या कसं आणि काय बोलतात आणि आकाशवाणीच्या एफएम वाहिन्या त्याहून वेगळं काय करतात ते समजून घेतलं की जबाबदार प्रसारण म्हणजे काय ते कळावं. खाजगी वाहिनीला एखाद्या श्रोत्यानं फोन करून मी

अमूक ठिकाणी ट्रॅफिक जॅममध्ये अडकलो आहे असं कळवलं तरी ते त्या ठिकाणच्या ट्रॅफिक जॅमबद्दल आवेगानं बोलायला (खरं तर 'बडबड' करायला) सुरुवात करतात. आकाशवाणी संबंधित यंत्रणेशी संपर्क करून खातरजमा करून घेतल्याशिवाय असं काहीही जाहीर करत नाही. जाहीर करताना त्या यंत्रणेचा हवाला दिल्याशिवाय राहत नाही. अशा जबाबदारीतूनच विश्वासार्हता निर्माण होते.

जबाबदारी, विश्वसनीयता यासह लोकांशी जोडलेली




नाळ, समाजातल्या सगळ्या घटकांचा विचार, प्रादेशिक भाषेची, संस्कृतीची जपणूक, सुधारणावादाचा आग्रह, माहितीचा प्रसार ही आकाशवाणीची वैशिष्ट्यं. या आकाशवाणीची आजच्या काळातही गरज आणि मागणी आहेच, आणि एकही खाजगी रेडिओ आकाशवाणीची जागा घेऊ शकत नाही. पण त्यासाठी आमच्या या माध्यमाला नवं व्हावं लागेल. आज जगभर रेडिओ कार्यक्रमांचं स्वरूप बदललं आहे. प्रत्येक देश आपापल्या स्थानिक भाषांखेरीज अन्य भाषांमधून प्रसारण सुरू करताहेत. बाहेरून आपल्या देशात स्थलांतरित होणारे लोक हा लक्ष्यगट ठेवून कार्यक्रमांची आखणी करताहेत. असं करण्यासाठी आकाशवाणीची जुनी धोरणं तपासून बघावी लागतील, बदलावी लागतील. मुंबईचंच उदाहरण घ्यायचं तर कोणे एके काळी मुंबईतल्या मराठी भाषक लोकसंख्येवर आधारलेलं कार्यक्रमांचं भाषाविषयक धोरण बदलण्याचा विचार याआधीच व्हायला हवा होता. अजूनही जुन्याच धोरणाप्रमाणे मराठीखेरीज कोकणी, हिंदी, गुजराती, कन्नड, सिंधी या भाषांमधून कार्यक्रम सुरू आहेत. मुंबईत स्थलांतरित झालेल्या, होणाऱ्या नागरिकांसाठी त्यांच्या भाषेत कार्यक्रम करून त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडून घेण्याचं, मुंबईशी त्यांची सांस्कृतिक नाळ जोडण्याचं काम आकाशवाणी का नाही करू शकणार?


काळाप्रमाणे माध्यमानं किंवा माध्यम वापरणाऱ्यांनी बदलावं म्हणजे नेमकं काय? माध्यमांची काही उदाहरणं घेऊन विचार करू. काही वर्षांपूर्वी आम्ही मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या प्रमुख वर्तमानपत्राच्या पुरवणीत 'मिशन पॉसिबल' हे सदर चालवलं होतं. नवं तंत्रज्ञान, नवी माध्यमं यांची मदत घेऊन नव्या दृष्टीनंही सामाजिक कामं करणाऱ्या संस्था-व्यक्तींविषयींचं सदर. आखणी सुरू असताना नव्या काळाचं, बदलांचं चांगलं भान असणाऱ्या त्या वृत्तपत्राच्या संपादकांनी सुचवलं की सदर प्रसिद्ध व्हायला सुरुवात झाली की त्याचा ब्लॉगही करावा आणि बघावं कसा प्रतिसाद मिळतो ते! आम्ही तसं केलंदेखील आणि काय बदल घडून येतो त्याचा प्रत्ययही घेतला! वृत्तपत्रासारख्या पारंपरिक माध्यमातून प्रकाशित होणारा मजकूर जेव्हा ब्लॉगसारख्या नव्या माध्यमातूनही आला तेव्हा सगळ्यात आधी तरुण वाचक ब्लॉगला लाभले. प्रतिसादाचा वेग वाढला. प्रतिसाद दुतर्फी झाला. चर्चाही होऊ लागल्या. जगभरातून वाचकप्रतिसाद मिळाला. एवढंच नाही; तर या प्रयत्नांतून सदरात ज्या कामांविषयी लिहिलं होतं त्यापैकी एका कामाला अमेरिकेतून निधीही मिळाला!

वर्तमानपत्रांमध्ये कुणीतरी संपादन करणारी, काय छापायचं-काय नाही ते ठरवणारी व्यक्ती असते. मात्र ब्लॉग, फेसबुक या माध्यमांचं तसं नाही. आपली पारंपरिक पद्धत एकानं बोलण्याची-अनेकांनी ऐकण्याची, वृत्तपत्रवाचनातून 'एकतर्फी' मतं समजून घेण्याची, त्यावरून आपली बनवण्याची! आता 'एकानं-अनेकांना'ऐवजी 'अनेकांनी-अनेकांना' 'लोकांनी-एकमेकांना' आणि 'अनेक नागरिकांनी मिळून' आपलं म्हणणं मांडणं शक्य झाल्यानं नवं काही 'बॉटम-अप' सुरू झालं आहे. सोप्या तंत्रज्ञानामुळे सर्वसामान्य लोकांना स्वतःचा मीडिया, अभिव्यक्ती-साधन मिळालं आहे. ते स्वतःच आपली पत्रकारिता करू लागलेत.

## रोहन प्रकाशन — नवा संच नव्या रहस्यकथा...

# लोकप्रिय गुप्तहेर फेलूदा आला आहे पुन्हा...
# नवी उत्कंठावर्धक रहस्य घेऊन!

**नवा ब्लॅक सेट**




## रोमहर्षक १२ कथा ४ पुस्तकं




४ पुस्तकांचा संच रु.४०० ■ **सवलतीत रु. ३००**

**सुटी पुस्तकं प्रत्येकी रु. १००**



**सेटसोबत आतमध्ये 'वाचन-डायरी' व 'फेलूदा स्टिकर्स' विनामूल्य!**

विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे लिखित चित्तथरारक व उत्कंठावर्धक 'फॅन्टॅस्टिक फेलूदा' या कथांमध्ये रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, या कथा विविध शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा मिलाफ साधला आहे. अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या रहस्यकथा केवळ किशोरांनाच नव्हे तर मोठ्यांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित!

* यापूर्वी प्रकाशित झालेल्या 'फॅन्टॅस्टिक फेलूदा' रहस्यकथा मालिकेतील १२ कथांची पुस्तकंही वेगवेगळी व संच रूपात (रेड, ग्रीन, ब्लू) उपलब्ध

**सर्वत्र उपलब्ध**

**रोहन प्रकाशन**

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहिती व ONLINE SHOPPING यासाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**

एरवी मोठी वृतपत्रं, मोठी टीव्ही-रेडिओ चॅनल्स यांच्यापर्यंत ही माणसं कधी आणि कशी पोचणार होती? लोकअवधान वाढलं आहे. स्वतःची मतं मांडण्याचे नवे मार्ग, व्याकरण-स्पेलिंगच्या कचाट्यातून सुटून सैल झालेली भाषा, अनेकांपर्यंत क्षणात पोचण्याचा झपाटा यामुळे सोशल मीडियाचा वापर वाढला आहे. त्यामुळे मुख्य प्रवाहातल्या माध्यमांनी या नवमीडियाची दखल घेणं भागच आहे. आकाशवाणीनं अशी सोशल मीडियाची दखल घेतल्याचं जाणवत नाही. फेसबुकचंच उदाहरण घेऊ. फेसबुकवर काही लिहिलं जरी नाही आणि ते नुसतं वाचलं तरी नवनवे मतप्रवाह समजून घेता येतात; ज्यांचा कार्यक्रमात समावेश करता येतो. कार्यक्रमात भाग घेणारी, कार्यक्रमांसाठी लेखन करणारी नवी माणसं सापडू शकतात. कार्यक्रमाच्या नव्या कल्पना सुचू शकतात.

बदलासंबंधीचं आणखी एक उदाहरण रेडिओ कॅनडाचं. सन दोन हजारच्या दशकात जगभरात माणसांचं देशोदेशी प्रवास करणं मोठ्या प्रमाणात वाढलं. भाषा, संस्कृती यांची सरमिसळ होऊ लागली. आतले आणि बाहेरचे असे संघर्षही सुरू झाले. स्थलांतरामुळे लोकांच्या जगण्यात होणारे बदल हा कळीचा विषय होऊन गेला. रेडिओ कॅनडानं त्यांच्या आंतरराष्ट्रीय प्रसारणात या विषयाला खास स्थान दिलं आहे. कॅनडाची ओळख तर स्थलांतरितांचाच देश अशी. विविध देशांतले स्थलांतरित जे सांस्कृतिक बदलांचे दूत आहेत त्यांच्याविषयीच्या कार्यक्रमांची मालिकाच रेडिओ कॅनडा इंटरनॅशनलनं सुरू केली आहे. 'डायव्हर्सिटी मेकर्स' असं या मालिकेचं शीर्षक. ज्यांनी या मालिकेची संकल्पना आणि निर्मिती केली आहे त्या लिओनोरा चम्पमन या स्वतः युरोपातली युद्धभूमी बोस्निया इथून कॅनडात स्थलांतरित झालेल्या आहेत.

आता महाराष्ट्रातलं ताजं उदाहरण. प्रवरानगर कम्युनिटी रेडिओचं. बाभळेश्वर, ता. राहाता, जि. अहमदनगर इथला हा रेडिओ. केंद्र सरकारनं स्थापन केलेल्या कृषी केंद्रांपैकी काहींनी कम्युनिटी रेडिओ सुरू केले आहेत. उदाहरणार्थ, बारामती कृषी विज्ञान केंद्राद्वारेही कम्युनिटी रेडिओ चालवला जातो. पण अशा कृषी केंद्रांशी संलग्न रेडिओ केंद्रांचा मुख्य भर शेतीविषयक माहितीवर असतो. बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्राद्वारे चालवला जाणारा प्रवरा कम्युनिटी रेडिओ मात्र शेतीविषयक माहिती देण्याच्या पलीकडे जाऊन स्थानिक लोकांसाठी सांस्कृतिक माध्यम म्हणून काम करताना दिसतो. रेडिओच्या कक्षेत येणाऱ्या सर्व तालुक्यांशी आणि गावांशी रेडिओत काम करणाऱ्या माणसांचा थेट संपर्क-संबंध आहे. रेडिओ कार्यक्रमात सर्व स्थानिक घडामोडींची यथायोग्य दखल घेतली जाते. परंपरा आणि नवता यांची चांगली सांगड प्रवरा कम्युनिटी रेडिओच्या उपक्रमांत घातली जाते. उदाहरणार्थ, स्थानिक प्रदेशात गायली जाणारी पारंपरिक गाणी, लोकगीतं, स्थानिक पारंपरिक भाषा यांचा संग्रह करण्याचं काम रेडिओनं हाती घेतलं आहे. त्याचबरोबर शेती आणि लोकजीवनाशी संबंधित सर्व प्रकारची आधुनिक माहिती विविध कार्यक्रमांतून दिली जाते. एखाद्या समस्येचा सरकारी पातळीवर पाठपुरावाही केला जातो. प्रवरा रेडिओ हा खऱ्या अर्थानं कम्युनिटी रेडिओ म्हणजे लोकांचा रेडिओ आहे कारण तो चालवणाऱ्यांची सगळी फौजदेखील स्थानिक आहे. आसपासच्या गावांतल्या तरुण मुला-मुलींची फौजच हा रेडिओ चालवते. हीच मुलं-मुली कार्यक्रमांची आखणी करतात, सादरीकरण करतात, गावांमध्ये जातात, लोकांशी बोलतात, मुलाखती घेतात, कार्यक्रमांविषयी लोकांचा प्रतिसादही जाणून घेतात. म्हणजे आकाशवाणीचीच परंपरा इथे सुरू आहे असं म्हणायला हरकत नाही. पण या इवल्याशा प्रवरा कम्युनिटी रेडिओच्या तुलनेत तिथली आकाशवाणी केंद्रं मात्र तितका प्रभाव पाडू शकत नाहीत.

छत्तीसगडचे पत्रकार शुभ्रांशु चौधरी यांना यंदाचं 'गुगल डिजिटल ॲक्टिव्हिजम ॲवॉर्ड' मिळालं. चौधरी इंटरनेट, मोबाइल फोन आणि सोशल मीडियाच्या मदतीनं गोंडी भाषेत छत्तीसगडमधल्या आदिवासींपर्यंत माहिती पोचवण्याचे प्रयत्न करतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या छत्तीसगडमधल्या दाहक प्रश्नाला भिडण्यासाठी सीजीनेट (CGnet) हा चौधरींनी सुरू केलेला इ-गट, छतीसगडमधल्या नागरिक-पत्रकारांचं नेटवर्क. त्यातून सुरू झालेली 'सीजी स्वर' ही मोबाइल फोनवरून दिली जाणारी माहितीसेवा. तिथल्या गोंडी आदिवासींना सरकारी योजना-सुविधांची माहिती, विविध बातम्या मिळू लागल्यात. या माहितीचा उपयोग ते स्वतःचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी करत आहेत. 'सीजी स्वर'चे बातमीदार आहेत तिथलेच आदिवासी युवक. आदिवासींनी आदिवासींसाठी चालवलेली ही अनोखी माहितीसेवा! मीडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभही अशा प्रयत्नांमुळे अधिकच बळकट होत आहे. सोशल मीडियाच्या मदतीनं समस्यांचा पाठपुरवठा करणं सहजसाध्य झालं. 'सीजीनेट'नं हे अवलंबलं. म्हणूनच तिथल्या गरीब आदिवासी जनतेला अधिकार बहाल करण्याचे प्रयत्न करता आले.

ज्याला आपण सोशल मीडिया म्हणतो तो कम्प्युटरपूर्व


काळातही वस्तीतल्या बुद्धविहाराच्या, गावातल्या समाजमंदिराच्या, पारावरच्या आणि पाणवठ्यावरच्या गप्पांच्या रूपात अस्तित्वात होताच. आणि अशा ठिकाणी पूर्वी रेडिओ लागलेला असायचा. मला आठवतंय, १९८९-९० मध्ये मुंबई साक्षरता मोहिमेत धारावीत घरांभोवतालच्या मोकळ्या जागेलगतच्या भिंतींचा अनोखा उपयोग कार्यकर्त्यांनी केला होता. त्या जागेत (संसाराला हातभार लावण्यासाठी) बाया पापड लाटायला बसायच्या आणि त्या भिंतीवर लिहिलेली अक्षरं, चित्ररूपी माहिती आपोआपच त्यांच्या दृष्टीस पडायची. रोजरोज वाचून पाठही व्हायची! जुन्या काळातली 'वॉल'च जणू! १९९३ मध्ये मराठवाड्यात भूकंप झाला तेव्हा महाराष्ट्रातल्या आकाशवाणी केंद्रांनी भूकंपग्रस्त आणि त्यांचे मराठवाड्याबाहेरचे नातेवाईक यांना एकमेकांशी संपर्क करण्यात मदत करून यशस्वी 'नेटवर्किंग' केलं होतं.

केनयाची राजधानी नैरोबी. एका गजबजलेल्या झोपडवस्तीतलं रेडिओ स्टेशन. स्टुडिओतून निवेदक कार्यक्रम सादर करत आहे. तो श्रोत्यांना विचारतोय त्यांच्या स्वप्नांविषयी, आकांक्षा, भविष्यातल्या योजनांविषयी. श्रोते फोनवरून बोलताहेत, एसएमएस पाठवताहेत, फेसबुकवर लिहिताहेत. तरुणांना चांगली नोकरी हवी आहे. निवेदक नोकरी कशी-कुठे मिळेल, त्यासाठी वस्तीत कधी-कुठे प्रशिक्षण-मार्गदर्शन आयोजित केलंय ते सांगतोय. नोकरीनंतर छोकरी नको का असंही गमतीत विचारतोय. लगोलग एचआयव्ही एड्सबद्दल सावधगिरीची सूचना देतोय. रक्ततपासणीची सोय कुठे असते, तपासणी का महत्त्वाची आहे, देशात-शहरातलं एड्सग्रस्तांचं प्रमाण-स्थिती वगैरे. पोरं सांगताहेत त्यांना खूप शिकायचं आहे. आया सांगताहेत वस्तीत चांगली शाळा हवी. निवेदक त्या त्या विषयावर श्रोत्यांना माहिती देतोय. मधून सुयोग्य गाणीसुद्धा. सुरू आहे रंगतदार कार्यक्रम. हा नैरोबी शहरातल्या 'पुमवानी' नावाच्या वस्तीतला, युनिसेफच्या मदतीनं सुरू असलेला घेट्टो एफएम कम्युनिटी रेडिओ. हा वस्तीचा सोशल मीडियाच. कारण हा निव्वळ रेडिओ नाही. संपर्क, संवाद, माहितीची देवघेव आणि या सगळ्यातून लोककल्याण साधणारी चळवळच आहे.

माध्यमाचा लोकांशी लाइव्ह, जिवंत संपर्क ही आजच्या काळाची गरज आहे. देशभरात आकाशवाणी आणि दूरदर्शन यांचं नेटवर्क प्रचंड आहे. दोन्ही माध्यमांनी एकमेकांना पूरक ठरेल असं प्रसारण केलं तर एखाद्या विषयावर अख्खा देश ढवळून निघू शकतो. आज जागतिक होताना माणसांच्या स्थानिक अस्मिता आक्रमकपणे व्यक्त होताहेत. जागतिक माहितीचं भांडार श्रोत्यांसाठी खुलं करताना त्यांच्या अस्मितांनाही पुरेसा अवकाश देण्याचं, ब्रॉड कास्टिंग आणि नॅरो कास्टिंग यांचा तोल साधण्याचं काम देशभरातली शेकडो आकाशवाणी केंद्रं करू शकतील. परंपरा आणि नवता यांचा उत्तम मेळ कसा घालायचा हे जगाला सांगू शकतील. करण्यासारखं हे सारं आहे. आणि हे करणं म्हणजेच 'बहुजनहिताय' माध्यम होणं आहे. आकाशवाणी होणं आहे. होईल हे सारं? कोण घडवू शकेल? पण आजच्या खाजगी वाहिन्यांच्या गोंगाटात हा प्रश्न आकाशवाणीच्या नेतृत्वाला ऐकूसुद्धा जाणार नाही.

**मेधा कुळकर्णी**
२/६४, स्नेहसागर, शिवधाम, म्हाडा कॉलनी,
अरुणकुमार वैद्य मार्ग, दिंडोशी
मालाड (पू), मुंबई: ४०००९७
भ्रमणध्वनी : ९८३३५१८७१३
kulmedha@gmail.com

**॥ग्रंथाली॥**




**तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात**

**मनोहर जाधव**

**मूल्य १२० रुपये**
**सवलतीत ७० रुपये**

मनोहर जाधव यांच्या या संग्रहातील कवितांमधून व्यक्तीच्या सामाजिक आणि भावजीवनातील कल्लोळ रसरशीतपणे प्रकट झाला आहे. वेगवेगळ्या अनुभवांच्या बाह्य आणि अंत:स्तरावर व्यक्ती ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असते ते पाहता या संग्रहातील कवितांचा पोत हा अनेकपदरी आहे. मानवी जीवनात एकच एक अनुभव प्रत्ययाला येत नसतो तर तो संमिश्र, विरोधाभासी तर कधी तर्कविरोधीही असतो. या अनुभवांचे आकलन आणि विश्लेषण हे देखील म्हणूनच व्यामिश्र स्वरूपाचे असते. माणसाचे आयुष्य कधीही गणिती पद्धतीने जात नसते तर ते अधिक कोलाहलाचे म्हणून अतर्क्यही असते. नव्वदोत्तर काळात तर हे आयुष्य अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. या सगळ्या संवेदनांचे चित्रण या कवितेतून अनुभवता येते.



# समीरचे समांतर जीवन!

**उमेश कदम, नैरोबी**

**समीर आणि मनोज यांनी १९७९ मध्ये अहमदनगर येथील न्यू कॉलेजच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला तेव्हापासून मनोजचे समीरला एकच सांगणे असायचे, 'सम्या, आता आपल्याला मैत्रिणी हव्यात!' वर्गात तशी मुलींची संख्या बऱ्यापैकी होती व दोघांची बऱ्याच मुलींशी ओळख व मैत्री असली तरी मनोजचा एकच अट्टहास असायचा, 'असली वरवरची मैत्री काय कामाची? एखादी खास मैत्रीण असायला हवी!' समीर त्याच्याशी सहमत व्हायचा, पण त्याच्या हातून तसले धाडस होणे शक्य नव्हते.**

''**समीर,** एवढ्या मोठ्या पदावर पोचला आहेस, आता तरी मी तुला गेली कित्यक वर्षं जे सांगत आलेलो आहे, ते मनावर घे! मी तुला सुनीताबाई देशपांडेंनी लिहिलेलं 'समांतर जीवन' हे पुस्तक आजच कुरियरनं पाठवून देतो. ते वाच म्हणजे तुझ्या डोक्यात जरा प्रकाश पडेल.'' समीरचा

मित्र मनोज त्याच्याशी फोनवर बोलता बोलता म्हणाला.

समीर सावकार आणि मनोज धर्माधिकारी – एकेकाळचे सम्या आणि मन्या – या बालमित्रांची गेल्या जवळजवळ चाळीस वर्षांची घनिष्ठ मैत्री. अहमदनगरचे केंद्रीय विद्यालय आणि नंतर न्यू कॉलेजमध्ये ते दोघे एकत्र शिकले होते. बी.कॉम. झाल्यावर मनोजने पुढे एम.बी.ए. करायचे ठरवले तर समीर बी.एस्सी.नंतर वनस्पतीशास्त्रात एम.एस्सी. करणार होता. दोघांचीही घराणी मूळची नगरचीच. मनोजचे वडील एल.आय.सी.त अधिकारी होते, तर समीरचे एका सहकारी बँकेत अधिकारी. जेव्हा दोघांनीही उच्च शिक्षणासाठी पुण्याला जायचे ठरवले, तेव्हा घरच्यांनी संमती दिली. समीरने पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला तर मनोजने फर्ग्युसनला. दोघेही आपापल्या विषयात चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झालेले. त्यामुळे प्रवेश मिळण्यात अडचणी आल्या नाहीत. त्यांनी चतुश्रृंगीजवळ, सेनापती बापट मार्गावर, विद्यापीठापासून जवळच एका बंगल्याच्या आउटहाऊसमधली एक खोली भाड्याने घेतली. मनोजने त्याची नगरची स्कूटर पुण्याला आणली होती, पण समीर तेथून चालतच विद्यापीठात जायचा. ही गोष्ट जवळजवळ बत्तीस वर्षांपूर्वीची, १९८२ सालची. त्यानंतर दोघांच्या, विशेषतः समीरच्या, आयुष्यात बरीच स्थित्यंतरे घडलेली.

हल्ली समीर नैरोबी येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक पर्यावरण कार्यालयात साहाय्यक संचालक पदावर होता. आता २०१४ मध्ये त्याला नैरोबीला येऊन दहा वर्षे झाली होती. सध्या तेथे तो व पत्नी सुलभा असे दोघेच राहायचे. मुलगा पार्थ २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या केप टाऊन विद्यापीठात आधी बी.ई.साठी गेला व अलिकडेच तो अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठात एम.एस. करू लागला होता. त्याच्या पाठीवरच्या मीराला अभिजात इंग्रजी साहित्याची आवड होती. ती गेल्या वर्षीपासून इंग्लंडच्या विख्यात ऑक्स्फर्ड विद्यापीठात इंग्रजी साहित्यात बी.ए. करू लागली होती. नैरोबीला आल्यापासून समीरची आर्थिक स्थिती कल्पनेपेक्षा वधारली होती.

सध्या मनोज मुंबईमधील एका बहुराष्ट्रीय कंपनीचा कार्यकारी संचालक होता. त्याचे त्याच्या क्षेत्रात उत्तम चालले होते. तो व समीर सतत एकमेकांच्या संपर्कात असत. इंटरनेटमुळे ते सोपे झाले होते. सुरुवातीस फक्त इ-मेल, व आता 'स्मार्ट फोन'मुळे 'स्काइप' किंवा 'वायबर' असे प्रोग्रॅम वापरून केव्हाही फुकट बोलता यायचे. त्या दोघांचा आठवड्यातून एकदा किंवा दोनदा फोन व्हायचाच. अजूनही दोघे एकमेकांना विश्वासात घेऊन बोलत. अलिकडे समीरने मनोजला फोन केला असता तो म्हणाला,

''मनोज, (आता त्यांनी एकमेकांना मन्या आणि सम्या म्हणायचे सोडून दिले होते) सगळं काही व्यवस्थित चालू आहे, पण कुठेतरी मधूनच पोकळी जाणवते, रे!''

''मिड-लाईफ क्रायसिस, दुसरं काय?''

''पण कशामुळे व्हावा? मला आज कसलीच चिंता नाही.''

''एक काम कर. या विषयवार प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ रेबेका क्ले यांनी एक खूप अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे, त्याची लिंक तुला पाठवतो. तू वाच आणि मग आपण चर्चा करू.''

मनोजने सांगितल्याप्रमाणे इ-मेलने समीरला त्या लेखाची लिंक पाठवली. समीरने तो वाचला व दोन दिवसांनी त्याने पुन्हा मनोजला फोन केला.

''मनोज, लेख वाचला. रेबेका क्ले यांच्या म्हणण्यानुसार 'मिड-लाईफ क्रायसिस'ची जी कारणं आहेत ती मला लागू होत नाहीत. आता हे पाहा, पहिलं आहे आर्थिक विवंचना. त्या तर मला मुळीच नाहीत. माझी तर आज हेवा करण्यासारखी परिस्थिती आहे, मनोज. दुसरं, आपल्या कामातील तोच तोपणामुळे आलेला कंटाळा. मला तर माझं काम खूप आवडतं. रोज नवी नवी आव्हानं, त्यावर उपाय शोधून काढणं, चर्चा-विनिमय करणं...छे, छे, ते कारण होऊच शकत नाही. तिसरं, मुलांकडून अपेक्षाभंग. अरे मनोज, पार्थ आणि मीरा, दोघांनाही जबाबदारीची खूप जाणीव आहे व त्यांचा अभ्यास उत्तम चालला आहे. चौथं, एखाद्या निकटवर्तीयाचं निधन. बाबा ७७ झालेत आणि आई ७२. दोघांच्या प्रकृती त्यांच्या त्यांच्या वयोमानाप्रमाणे उत्तम आहेत. शेखर त्यांची उत्तम काळजी घेतोय. (शेखर हा समीरचा धाकटा भाऊ, डॉक्टर होऊन नगरलाच स्थाईक झालेला. समीरचे आई-बाबा त्याच्याबरोबरच राहत). बरं, पाचवं कारण आहे, वार्धक्याची विवंचना आणि मृत्यूचं भय. मनोज, मला दोन्हीही नाहीत. कारण आपण कधीतरी म्हातारे होणार आणि या जगाचा निरोप घेणार हे, अटळ आहे. त्यामुळे त्यांची चिंता करत बसणं मूर्खपणाचं आणि भित्रेपणाचं लक्षण आहे. शेवटचं कारण आहे, असमाधानी वैवाहिक आयुष्य. त्या बाबतीत देखील माझं ठीक चाललं आहे.'

''समीर, ठीक आहे म्हणजे काय? तुझं 'सेक्स लाईफ'

कसं आहे सांग. माझ्यापासून काहीही लपवू नकोस.''

समीरने थोडा विचार केला. सुलभाचा तीन वर्षांपूर्वी मेनोपॉज झाला आणि तेव्हापासून तिची सेक्समधली इच्छा कमी झाली. नैरोबीला आल्यापासून तिचे वजन दिवसेंदिवस वाढतच चालले होते. नैरोबीच्या महाराष्ट्र मंडळात 'मराठी महिलामंडळ' होते. ती त्याची सक्रिय सदस्य होती. तेथील तिच्या मैत्रिणींच्या किटी पार्ट्या, त्यांच्याबरोबर वारंवार बाहेर जेवायला जाणे, 'पॉट लक्', आणि व्यायामाचा अभाव यामुळे तिचे वजन भरभर वाढत गेले. शिवाय तिला गोड पदार्थांची आवड. भारतीय दुकाने असलेल्या 'डायमंड प्लाझा'ला गेली की येताना गुलाबजाम, रसगुल्ले, रसमलाई, चमचम असल्या बंगाली मिठायांचे डबे सोबत असायचे. समीर मात्र आपली प्रकृती सांभाळून असायचा. गिगीरीतील त्याच्या कार्यालयाजवळील 'रुंडा' या उच्चभ्रूंच्या प्रचंड कॉलनीत त्याचे निवासस्थान होते. तो तिच्या समोरील लिमुरू रोडवर रोज सकाळी आठ किलोमीटर धावून यायचा. हळुहळू त्याचे दिवसेंदिवस बेढब दिसणाऱ्या सुलभाचे शारीरिक आकर्षण कमी झाले. गेली काही वर्षे मुकपणे दोघेही 'तो' विषय टाळत होते, जणू काही त्यांच्यात त्याबाबतीत अलिखित करारच झालेला आहे! पण समीरला मात्र अधूनमधून आपण आता स्त्री सहवासापासून वंचित राहणार, याची खंत वाटायची.

''मनोज, हे मात्र कबूल करायला हवं की 'त्या' बाबतीत मी काहीसा असमाधानी आहे.'' समीरने प्रांजळपणे कबूल केले.

हे ऐकल्यावर मनोजने समीरला 'समांतर जीवन' हे पुस्तक वाचायचा सल्ला दिला व पुस्तक वाचून झाल्यावर आपण बोलू असे सांगितले. समीरला तीन दिवसांनी पुस्तक मिळाले व त्याने ते दोन दिवसांत वाचून काढले. फक्त ९५ पानांचे ते पुस्तक म्हणजे फिलीस रोझ यांच्या 'पॅरलल लाईव्हज्' या इंग्रजी पुस्तकाचा सुनीताबाईंनी अतिशय ओघवत्या भाषेत केलेला सारांश होता. त्यात त्यांनी इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकातील काही थोर विचारवंत, लेखक, विचारप्रवर्तक, असे प्रकाशझोतातील विद्वान त्याकाळचे नीतिनियम, शिष्टाचार व कायदे झुगारून विवाहबाह्य जीवन कसे व का जगले याचा, मनोवेधक परामर्श घेतलेला.

''मनोज, पुस्तक वाचले. तुला ते मला वाचायला सांगून काय सुचवायचं आहे?''

''अरे, 'मिड-लाईफ क्रायसिस'वरील रामबाण उपाय म्हणजे एखाद्या छानशा मुलीशी मैत्री करणं!''

''काय वाट्टेल ते काय बोलतोस? माझी सामाजिक प्रतिष्ठा, नोकरी, कौटुंबिक स्वास्थ्य यांचा विचार केला आहेस का तू? आणि वेड्या, आता बावन्नाव्या वयात कोण माझ्या प्रेमात पडेल? आज काय सकाळीसकाळीच बियर किंवा जीन घेतली आहेस की काय?''

''ठीक आहे, माझं ऐकायचं नसेल तर राहू दे. तुझ्या त्या पोकळीनं झाकोळलेल्या आयुष्याबद्दल अश्रू ढाळत बस. नाहीतरी तुझ्यात ती धमकच नाही. एनी वे, आपण नंतर बोलू या विषयावर. मला दुपारच्या फ्लाईटनं चेन्नईला मीटिंगला जायचं आहे. सोबत 'पर्चेस'मधली असिस्टंट लिंडा डिकास्टाला घेऊन चाललोय. गुड बाय!''

समीर आणि मनोज यांनी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला तेव्हापासून मनोजचे समीरला एकच सांगणे असायचे, 'सम्या, आता आपल्याला मैत्रिणी हव्यात!' वर्गात तशी मुलींची संख्या बऱ्यापैकी होती व दोघांच्या बऱ्याच मुलींशी ओळख व मैत्री असली तरी मनोजचा एकच अट्टहास असायचा, 'असली वरवरची मैत्री काय कामाची? एखादी 'खास' मैत्रीण असायला हवी!' समीर त्याच्याशी सहमत व्हायचा, पण त्याच्या हातून तसले धाडस होणे शक्य नव्हते. समीरचे व्यक्तिमत्त्व भारदस्त होते. उंच, नाकेला, गोरा उभ्या चेहऱ्याचा, बोलक्या डोळ्यांचा समीर दिसायला छान होता. त्या मानाने मनोज तसा समीरसारखा देखणा नसला तरी नाकी-डोळी ठीक होता. समीरचा स्वभाव भिडस्त, तर मनोज खूप बोलका. तो ज्या मुलीशी जवळीक साधायची आहे तिच्याशी गोंडा घोळेल, गप्पा मारेल, कॅन्टीनला घेऊन जाईल, तिचा वाढदिवस लक्षात ठेवून एखादी छोटी भेटवस्तू देईल, स्कूटरवरून फिरवून आणेल! समीर मात्र मुलींपासून खूप अलिप्त राहायचा. पण मनोजचे एक वैशिष्ट्य हे की तो अभ्यासात कधीच मागे पडला नाही. एकदा समीरने त्याला विचारले,

''मन्या, लेका, पोरींच्या नादानं तुझं अभ्यासावरचं लक्ष कसं काय उडत नाही?''

''आपल्याला मैत्रीण असली की त्यामुळे आपला अभ्यास जास्त चांगला होतो, असा माझा दावा आहे!''

''काहीतरी काय बोलतोस? ते कसं काय सांगशील?''


''साधी गोष्ट आहे, मैत्रीण म्हटल्यावर तिच्यावर आपली छाप पडायला हवी की नको? सम्या, एक लक्षात

ठेव, मुलींना अभ्यासातील डफ्फर मुलं आवडत नाहीत. ती हुशार असावीत, वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकत असावीत अशी त्यांची अपेक्षा असते. तर या बाबतीत आपण मागे पडायचं नाही असा मी निर्धार केला आहे. शिवाय आपली 'खास' मैत्रीण ही आपली स्फूर्तीदेवता देखील असते! तिला डोळ्यांसमोर ठेवून अभ्यास करायचा. तू लेका कधी सुधारणार नाहीस. वैजू नेने तुझ्याकडे काहींना काही बहाणे करून सारखी बोलायला येते. तिला जरा रिंगणात घे!

''मला नाही नाही ते सल्ले देऊ नकोस. मला नाही त्या फंदात पडायचं.''

''फंदात पडायचं नाही, की जमत नाही? नसेल जमत तर माझ्याकडून शिक ना! अरे, मुलींना पटवायचं म्हणजे खूप खोटं बोलावं लागतं. त्यांच्या कपड्यांची, दिसण्याची, स्वभावाची स्तुती करावी लागते. त्यांचा 'विक पॉइंट' हेरावा लागतो. त्यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवायला वेळ लागत नाही. एकदा तसु तू करू लागलास ना...''

''जाऊ दे, तुला काय करायचं आहे ते कर. मला त्या भरीला पाडू नकोस,'' असे म्हणून समीर जरी तो विषय संपवत असे, तरी त्याला मन्याचा खूप हेवा वाटायचा. त्यालाच काय, वर्गातील इतरांना देखील. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असताना तो रेखा पत्कीबरोबर कॉलेजच्या बाहेर बऱ्याच ठिकाणी दिसत असतो असे बोलले जायचे. अर्थात समीरला मन्याने विश्वासात घेऊन रेखाबद्दल सारे काही सांगितले होतेच. ही झाली नगरची गोष्ट. पुण्याला गेल्यावर दोन महिन्यांत मन्या बी.कॉम.च्या शेवटच्या वर्षातील मेधा आपटेबरोबर फिरू लागला. पण बी.कॉम. झाल्याझाल्या घरच्यांनी तिचे लग्न ठरवले (कदाचित तिचे लक्षण पाहून) व ती लग्न होऊन गेली देखील. पण मन्या डगमगला नाही, दीड महिन्यात बी.ए.च्या दुसऱ्या वर्षाच्या आरती देसाईला त्याने पटवली! पुण्याला शिकायला जायची कल्पना मनोजचीच. अर्थात तेथील उत्तम शिक्षण संस्था हा महत्त्वाचा भाग होताच, पण आपल्याला जरा 'मोकळीक' मिळावी ही त्याची सुप्त इच्छा!



दोन वर्षांनी, म्हणजे १९८४ मध्ये दोघांचेही अभ्यासक्रम संपले. दोघांनीही आपापल्या विषयात प्राविण्य मिळवले. मनोजला चिंचवडच्या एका बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळाली तर समीरला नव्याने उघडण्यात आलेल्या औंध येथील नवमहाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या भाऊसाहेब जेधे सायन्स कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागात डेमॉन्स्ट्रेटरची नोकरी मिळाली. 'वर्षा-दोन वर्षांत तुम्हाला लेक्चरर करू' असे संस्थेने त्याला आश्वासन दिलेले. त्याला शिकवायची देखील खूप आवड होती. त्या दोघांनी औंधच्या सिंध कॉलनीजवळ 'प्रियदर्शिनी अपार्टमेंट्स्'मध्ये एक फ्लॅट भाड्याने घेतला. तेथून समीरचे कॉलेज चालत जायच्या अंतरावर होते, तर मनोज चिंचवडला जायला आपली स्कूटर वापरायचा. पण आता दोघे नोकऱ्या करू लागले तरी मनोजचा मैत्रीण असण्याचा अट्टहास काही केल्या कमी होत नव्हता! एकदा तो समीरला म्हणाला,

''सम्या, एक लक्षात ठेव, आयुष्यात सगळ्या गोष्टी ज्या-त्या वेळी व्हायला हव्यात.''


''हो, नोकरी, लग्न, मुलं वगैरे ना?''

''मी त्याबद्दल बोलत नाहीरे, त्या गोष्टी तर आपोआप होतच असतात. बघशील आता, आपल्या घरचे आपल्यामागे लग्नाचा कसा तगादा लावतील. मला म्हणायचं आहे, की ज्या-त्या वेळी योग्य अशी मैत्रीण हवीच. आता हे तुझंच बघ. तू लवकरच लेक्चरर होशील. आता तू फक्त बावीस वर्षांचा आहेस. तू तुझ्या एखाद्या चुणचुणीत विद्यार्थिनीशी संधान बांधू शकतोस. अरे, तरुण नि तुझ्यासारख्या देखण्या शिक्षकाच्या प्रेमात पडायला मुलींमध्ये चढाओढ लागेल! बरं ते जाऊ दे. आपण असं समजू की पुढील काही वर्षं तू या शिक्षणक्षेत्रातच राहणार आहेस. पुढच्या वर्षी लेक्चरर होशील. तीन-चार वर्षांत तुझं लग्न

होईल. त्यानंतर चार-पाच वर्षं मजेत जातील. पण एक-दोन मुलं झाली की तुझी बायको मुलांच्या व्यापात मग्न होईल. तिला तुझ्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळणार नाही. अशा वेळी तुला एखाद्या मैत्रिणीची गरज भासू लागेल. तुझ्याच कॉलेजमधली एखादी सुंदर सहकारी त्यासाठी अगदी योग्य.''

''काहीतरी काय बोलतोस! विवाहितेच्या प्रेमात कोण पडेल?''

''अरे, तुला माहीत नाही. एखादी प्रौढ कुमारिका, घटस्फोटिता किंवा नवऱ्याशी खटके उडणारी विवाहिता देखील असं प्रेमात पडण्यासाठी उत्तम कॅन्डिडेट! बरं, ते जाऊ दे, आपण तुझ्या आयुष्याचा पुढचा आलेख मांडू. तू आता पीएच.डी.ची तयारी सुरू केली आहेसच. तुझ्या बरोबरीची एखादी संशोधिका देखील अशा उपक्रमास योग्य असते. तू चाळिशीत गेलास की तुला विद्यापीठ पीएच.डी.चा मार्गदर्शक म्हणून मान्यता देईल. आता तुझ्याकडे तू 'गाईड' लाभावास अशी विनंती घेऊन बरेच इच्छुक येतील. त्यात मुली देखील असणार. तुझ्या वनस्पतीशास्त्राकडे मुलांपेक्षा मुलींचाच ओढा जास्त असतो, हे काय मी तुला सांगायला हवं? अशा वेळी पुरुष गाईडनं त्यांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेण्याऐवजी त्यांचं रूप लक्षात घेण्याची प्रथा खूप पूर्वीपासून शिक्षणक्षेत्रात रूढ झालेली आहे, याचं भान ठेव. ही सिच्युएशन फार आयडियल असते. गाईड संशोधिकेला आपल्या खोलीत बोलावून तासन्‌तास चर्चा करू शकतात. त्यांना ती 'कसली चर्चा चालू आहे?' असं कोणी विचारू शकत नाही. बऱ्याच वेळेस ते आपल्या अशा संशोधिकेस बाहेरगावी चर्चासत्र, कार्यशाळा अशा कार्यक्रमांना घेऊन जाऊन गुपचूप 'दुसरेच कार्यक्रम' आटोपतात! तसंच पत्नी-मुलं सुटीवर गेली की घरीसुद्धा त्यांना चर्चेला बोलावलं तर कोणाला त्यात काही वावगं वाटत नाही. बरं, पुढे तू एखाद्या विद्यापीठात विभागप्रमुख झालास की मग काय विचारूच नकोस. तुझ्याकडे काही समित्यांचं अध्यक्षपद वगैरे येणार. निवडी, नेमणुका, शिष्यवृत्त्यांची मंजुरी असे अधिकार तुझ्याकडे आले की...''



त्याला मध्येच थांबवत समीर म्हणाला,

''मन्या, पुरे झालं तुझं पुराण. मी आपला माझं कुटुंब आणि करियर यांच्यावर लक्ष केंद्रित करणार आहे, हे लक्षात घे. आणि नसत्या गोष्टी माझ्या मनात भरवू नकोस. तू गाठ तुझी एखादी सहकारी नाहीतर तुझ्या हाताखाली काम करणारी, साहाय्यिका, नाहीतर जरा सिनियर झाल्यावर मिळणारी सेक्रेटरी!''

''ते तू मला सांगूच नकोस. तू पाहशीलच यथावकाश!''

समीरने सायन्स कॉलेजमध्ये काम करायला सुरुवात करून जेमतेम आठ-नऊ महिने झाले असतील. त्यावेळी, म्हणजे मार्च १९८५ मध्ये त्याच्याबाबतीत एक खूप दुरगामी परिणाम होऊ शकणारी घटना घडली. त्याला ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथील न्यू साऊथवेल्स विद्यापीठाची पीएच.डी.साठी तीन वर्षांची शिष्यवृत्ती मिळाली! खरे म्हणजे समीरने उगाच खडा टाकून पाहावा म्हणून जून १९८४ मध्ये चार-पाच अमेरिकन, दोन ब्रिटिश व तीन ऑस्ट्रेलियन विद्यापीठांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले होते. त्यांची फक्त पोच आली होती. पुढे काही महिने त्यांच्याकडून कसलाच प्रतिसाद न आल्याने त्याने तो विषय डोक्यातून केव्हाच काढून टाकला होता. पण अनपेक्षितपणे न्यू साऊथवेल्स विद्यापीठाने रॉबर्ट ब्राऊन (१७७३-१८५८) या प्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञाच्या स्मरणार्थ देण्यात येणारी शिष्यवृत्ती त्याला देऊ केली. ती ऑगस्ट १९८५ पासून सुरू होणार होती. समीरने ही आनंदाची बातमी घरी कळवली. त्याने शिष्यवृत्ती स्वीकारत असल्याचे न्यू साऊथवेल्स विद्यापीठाला कळवले व नोकरीचा राजीनामा द्यायचे ठरवले. घरच्यांचा अर्थात त्याच्या निर्णयास ठाम पाठिंबा होता.

समीरने आपल्या संशोधनासाठी त्याचे मार्गदर्शक डॉ. टिमोथी व्हिटबोर्न यांच्या संमतीने 'पुरातन प्रदेशनिष्ठ वनस्पतींचे संवर्धन' (कॉन्झर्वेशन ऑफ पॅलिओ-एंडेमिक स्पेशिज) संबंधित एक क्लिष्ट विषय निवडला. मुळातच

त्याची वृत्ती अभ्यासू नि कष्टाळू. त्यात त्याला विषयाची खूप आवड. तीन वर्षे संशोधनात व प्रबंध लिहिण्यात पाहता पाहता सरली. त्याचा प्रबंध 'वनस्पतीशास्त्रातील अलीकडील संशोधनाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे' या शब्दांत त्याचे इंग्लंडहून आलेले परीक्षक डॉ. हर्बर्ट स्कॉट यांनी वर्णन केले व विद्यापीठाला समीरचा प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशित करायची शिफारस केली. समीर भारतात परतल्यावर त्याला पुणे विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागात सिनियर लेक्चररची नोकरी सहज मिळून गेली. त्या पुढील चार-पाच वर्षांत त्याचे बरेच शोधनिबंध आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले. त्याला अधूनमधून वेगवेगळ्या देशांतून चर्चासत्रे, व्याख्यानमाला किंवा कार्यशाळा यांची आमंत्रणे येऊ लागली. दरम्यान, नोव्हेंबर १९८९ मध्ये त्याचा नाशिकच्या सुलभा देशपांडेबरोबर विवाह झाला. लग्न घरच्यांनीच, पण समीर व सुलभा यांच्या संमतीने ठरवले होते. सुलभा होम सायन्सची पदवीधर होती. नाकीडोळी सुंदर व बोलकी सुलभा समीरला पहिल्या भेटीतच आवडली होती. त्यांनी निर्णय घेण्यापूर्वी ते तीन-चार वेळा घरच्यांच्या संमतीने घराबाहेर भेटले होते, एकमेकांच्या आवडी-निवडी, महत्त्वाकांक्षा जाणून घेतल्या होत्या, स्वभावाची ओळख पटली होती. सुलभाला नोकरी करण्याची आवड नव्हती. तिला आपले काही छंद जोपासत घर सांभाळायची इच्छा होती. १९९१ मध्ये पार्थ व १९९५ मध्ये मीरा जन्मले. त्याच वर्षी समीरला बढती मिळून तो 'रीडर' म्हणजे नव्या भाषेत 'असोसिएट प्रोफेसर' झाला होता. दिवसेंदिवस त्याच्या नावाचा त्याच्या क्षेत्रात दबदबा वाढत चालला होता. अशातच १९९९च्या मे महिन्यात त्याला त्याचे एक परिचित, नैरोबी येथे मुख्यालय असलेल्या 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंटल प्रोग्रॅम' म्हणजे 'युनेप' या साऱ्या जगभर पर्यावरण रक्षणाचे काम करणाऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयाचे उपसंचालक, डॉ. हॅरॉल्ड क्लॉफ्टन यांचा इ-मेल संदेश आला. तो वाचून समीर संभ्रमात पडला. त्या रात्री त्याने सुलभाजवळ तो विषय काढला.

''सुलभा, नैरोबी येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक पर्यावरण कार्यालयात माझी तीन वर्षांसाठी नेमणूक करण्यासाठी त्याचे उपसंचालक, डॉ. क्लॉफ्टन यांनी माझी शिफारस केली आहे. पगार दरमहा ६७०० डॉलर, म्हणजे जवळजवळ तीन लाख रुपये, राहायला बंगला, मुलांच्या शिक्षणाचा खर्च...''

सर्व गोष्टींचा विचार करता नैरोबीहून आलेली ऑफर समीरने स्वीकारावी असे सर्वानुमते ठरले. सुलभा देखील नवऱ्याला संयुक्त राष्ट्रसंघात अधिकारीपदावर नोकरी मिळतेय म्हणून सुखावली होती. समीरची नैरोबीतील नेमणूक फक्त तीन वर्षांची होती. त्या कालावधीपुरते विद्यापीठाने त्याला 'लिन' दिले होते. पण ती मुदत संपल्यावर त्याच्या वरिष्ठांनी त्याला विद्यापीठाची नोकरी सोडायचा, पूर्णवेळ संयुक्त राष्ट्रसंघात काम करण्याचा सल्ला व त्याच्या सध्याच्या पदावरच त्याची पुढील पाच वर्षांसाठी नेमणुकीचा प्रस्ताव दिला. समीरने तो स्वीकारला.

दोन वर्षांपूर्वीच, म्हणजे २०१२ मध्ये समीर पी-५ ग्रेडला पोचला होता. तो आता त्या जागतिक कार्यालयाचा साहाय्यक संचालक झाला होता. त्याच्या हाताखाली पी-३ ग्रेडचे दोन अधिकारी काम करत होते. त्यापैकी एक होती अर्जेंटिनाची मिसेस कार्लाव्हो. तिला रिटायर व्हायला दीड वर्ष बाकी होते. दुसरा होता चाळिशीचा युगांडाचा सिल्व्हेस्टर ओंझिवूआ. त्या तिघांची व्हर्जिनिया एन्जेरी ही सेक्रेटरी होती. मार्च २०१४ मध्ये फक्त बी.कॉम. झालेल्या व्हर्जिनियाने उच्च शिक्षण करण्यासाठी राजीनामा दिला. त्याबद्दल कोणाला फारसे दुखः झाले नाही. कारण सतत तिचा चेहरा त्रासिक वाटायचा. कधी जरा कामाचा ताण वाढला तर तिचे तोंड वाकडे व्हायचे. पण काम कमी असले तरी चेहऱ्यावर हास्य तर राहू दे, प्रसन्नता देखील नसायची. तिच्या जागी नव्या सेक्रेटरीची नेमणूक करायला मानवी साधन संपत्ती विभागातर्फे जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागवण्यात आले. त्यांच्या कार्यालयातील फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागेवर आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची निवड व नेमणूक न्यू यॉर्क व जिनिव्हा येथील कार्यालयांतून केली जायची, तर साहाय्यक व कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक स्थानिक नागरिकांमधून केली जायची. मिसेस कार्लाव्हो, सिल्व्हेस्टर, मानवी साधन संपत्ती विभागाची प्रमुख मेरी रुरीगी व मुख्य प्रशासकांचे प्रतिनिधी फ्रान्सिस फोस्टर यांच्या निवड समितीने पस्तिशीची तरुणी जेसिका म्वांगी हिची निवड केली. अर्थात असल्या लहानसहान गोष्टीत समीर लक्ष घालायचा नाही.

''गुड मॉर्निंग, सर.''

एक रिपोर्ट वाचत असलेल्या समीरने चमकून वर पाहिले. हसतमुख नि प्रसन्न चेहऱ्याची एक केनियन तरुणी समोर उभी होती.

''कोण तुम्ही?''

''सर, मी तुमच्या विभागाची नवी सेक्रेटरी, जेसिका म्वांगी!''

''ओह, सिल्व्हेस्टर म्हणत होता कोणाचीतरी निवड केली आहे. कधी जॉईन झालात तुम्ही, मिस् म्वांगी?''

''सर, प्लीज मला 'जेसिका' असे संबोधा. आणि मी आजपासून कामाला सुरुवात करत आहे.''

''छान. विश यू गुड लक्, जेसिका.''

''थँक्स सर, मी माझ्या नव्या कामाचं स्वरूप समजावून घ्यायला सुरू केलं आहे. त्यात काही मदत लागली तर आपल्याला त्रास दिला तर चालेल ना?''

समीरच्या तोंडावर आले होते की काही मदत लागली तर 'सिल्व्हेस्टरला विचार' असे तिला सांगावे. पण कसे कोण जाणे, तो म्हणाला,

''केव्हाही माझ्याकडे ये.''

हास्याचा एक प्रसन्न झंकार त्या खोलीत सोडून ती निघून गेली. त्यानंतर बराच वेळ तिचा मंजुळ आवाज त्याच्या खोलीत घुमत असल्याचा भास समीरला झाला! तिचा चेहरा हसरा नि प्रसन्न तर होताच, शिवाय बोलके डोळे, केनियात क्वचितच पाहायला मिळणारा गव्हाळ वर्ण, सरळ नाक आणि लांब केस असलेली, लयबद्ध शरीरयष्टीची जेसिका मोहक दिसत होती.

जेसिकाची खोली समीरच्या खोलीला लागून होती. तिच्या दुसऱ्या बाजूला सिल्व्हेस्टर आणि मिसेस कार्व्हालोच्या खोल्या होत्या. जेसिका अधूनमधून या ना त्या कारणाने समीरच्या खोलीत यायची. हळुहळू समीरला ती जवळपास असल्याचे आवडू लागले. कधीकधी बाहेर काही कामानिमित्त जावे लागले तर तो तिला बरोबर घेऊन जाऊ लागला. अर्थात त्यात वावगे काहीच नव्हते. 'मिनिट्स ऑफ द मीटिंग' नोंद करून घेण्यासाठी, कागदपत्रे हाताळण्यासाठी किंवा काही प्रकल्पांचा पाठपुरावा करण्यासाठी त्याला तिची मदत घ्यावी लागायचीच. हल्ली ती सोबत असेल तर तो ड्रायव्हर घेण्यापेक्षा स्वतःच गाडी चालवायचा. त्याने तिला तिची पार्श्वभूमी काय आहे, घरी कोण कोण असते, नवरा-मुले आहेत का, असे प्रश्न कधीच विचारले नव्हते. पण त्याची त्याला उत्सुकता लागून राहिली होती. त्याने एकेदिवशी मानवी साधन संपत्ती विभागात जाऊन मेरी रुरीगीकडून जेसिकाने नोकरीसाठी केलेला अर्ज व त्यासोबतचा 'बायो-डेटा' वाचायला मागून घेतला. त्यातून त्याला बऱ्याच गोष्टी समजल्या. महत्त्वाचे म्हणजे ती अविवाहित असून तिची जन्म तारीख ७ डिसेंबर १९७९ असल्याचे त्याला समजले. ती विवाहित नाही हे समजल्यावर त्याला कळत-नकळत बरे वाटले होते. एकदा समीर व जेसिका 'वेस्टलँड' भागातील एका संस्थेतील मीटिंग आटोपून त्यांच्या गिगिरी येथील कार्यालयाकडे निघाले होते. एव्हाना जेसिकाने काम करायला सुरू करून दोन महिने झाले होते. दुपारचा एक वाजत आला होता. समीरने जेसिकाला विचारले,

''जेसिका, जेवायची वेळ होत आलीय. आपण आज 'हंडी'त जेऊन मग ऑफिसला जाऊया. चालेल तुला?''

''अरे वा, फारच छान आयडिया आहे, सर. मी देखील खूप दिवसांत भारतीय जेवण खाल्लं नाही. ते मला खूप आवडतं.''

''असं? चल तर मग, मी गाडी तिकडे घेतो'', असे म्हणून समीरने गाडी राफ्ता रोडवरून चिरोमो रोड ओलांडून रिंग रोडच्या कोपऱ्यावरील 'द मॉल' या इमारतीतील 'हंडी' या भारतीय उपाहारगृहाकडे घेतली. हंडी हे नैरोबीतील सर्वात उत्तम व प्रसिद्ध भारतीय उपाहारगृह. ते दोघे बसल्यावर समीरने जेसिकाला विचारले,

''तुला भारतीय जेवणातलं काय आवडतं?''

''मला ना सर, चिकन टिक्का आणि दाल माखनी खूप आवडते. आणि बटर नान देखील.''

''असं? ठीक आहे,'' असे म्हणून समीरने वेटरला एक चिकन टिक्का, एक दाल माखनी व तीन बटर नानची ऑर्डर दिली. जेसिकाने त्याच्याकडून पायनापल ज्युस तर समीरने डायेट कोक मागवला. वेटर त्यांची पेये ठेवून गेल्यावर जेसिका म्हणाली,

''सर, खूप दिवस झाले, मला तुम्हाला एक गोष्ट विचारायची होती. चालेल?''

त्यावर समीरला जरा आश्चर्य वाटले. काय बरे विचारायचे असेल हिला, असा विचार त्याच्या मनात आला. पण तो आपल्या मनातील घालमेल लपवत हसतहसत म्हणाला,

''हो विचार ना, जेसिका.''

''सर, अधूनमधून मला तुमचा 'बायो-डेटा' कोणाकोणाला पाठवावा लागतो. परवा मी तो बारकाईनं वाचत होते. तुमच्या करियरबद्दल वाचून मी खूप भारावून गेले आहे. तुमचं शिक्षण, संशोधन, अभ्यासपूर्ण लिखाण, जगाच्या वेगवेगळ्या भागांत चर्चासत्रं, कार्यशाळा, व्याख्यानं यासाठी केलेला प्रवास व अल्पावधीत झालेली तुमची प्रगती थक्क करून टाकणारी आहे. तुमच्या हाताखाली मला काम करायला मिळतं हे माझं भाग्यच म्हणायचं.''

हे ऐकताच समीर मनोमनी सुखावला. कोणाला आपली स्तुती आवडत नाही? पण चेहऱ्यावर आपण काही विशेष केलेले नाही असा भाव आणून तो म्हणाला,

''प्रामाणिकपणे कष्ट करून कोणत्याही क्षेत्रात कोणालाही यश मिळवता येतं, जेसिका. मी काही फारसं वेगळं केलेलं नाही. योग्य त्या वेळी शिक्षणावर लक्ष केंद्रित केलं आणि उत्तमोत्तम संधी चालून आल्या.''

''तुमच्या मिसेस देखील तुमच्यासारख्याच हुशार असतील नाही?''

समीरला हा प्रश्न अनपेक्षित होता. तो जरा गंभीर होत म्हणाला,

''ती काही फारसं शिकलेली नाही. पदवीधर आहे, पण नोकरी किंवा करियर यांची तिला आवड नाही. गेली कित्येक वर्षं ती आपल्या मैत्रिणी व इतर उद्योगांत मग्न असते. जेसिका, एखाद्याला सगळं काही मिळत नाही.''

''म्हणजे, मला नाही समजले तुम्हाला काय म्हणायचं आहे, सर?''

''जेसिका, व्यावसायिक क्षेत्रात जसा मी यशस्वी झालो, तसा वैयक्तिक जीवनात होऊ शकलो नाही. बरं, चल तो विषय जाऊ दे. आपण आज इथे उत्तम भारतीय जेवणाचा आस्वाद घायला आलो आहोत,'' असे म्हणून समीरने मुद्दाम तो विषय संपवला. पण तसे करण्यापूर्वी आपण 'वैवाहिक जीवनात सुखी नाही' हे त्याने जेसिकाला अप्रत्यक्षरीत्या सुचवले.

त्यानंतर दीड महिन्याने समीर, मिसेस कार्व्हालो, सिल्व्हेस्टर व जेसिका केनियाच्या पूर्व किनाऱ्यावरील मोंबासा या रमणीय ठिकाणी 'युनेप'ने आयोजित केलेल्या एका सेमिनारसाठी गेले होते. ते एक दिवसाचेच होते. दुसऱ्या दिवशी समीरची मोंबासात एक बैठक होती. सेमिनार संपल्यावर मिसेस कार्व्हालो व सिल्व्हेस्टर संध्याकाळच्या फ्लाइटने नैरोबीला परतले. जेसिकाला ज्या 'सेव्हरीन रिझॉर्ट'मध्ये सेमिनार आयोजित केले होते त्याचे बिल भागवणे, तसेच समीरला त्याच्या मीटिंगच्या वेळी मदत करणे अशी कामे असल्याने ती देखील मागे राहिली होती. समीर व जेसिका 'सेव्हरीन रिझॉर्ट'मध्येच उतरले होते. त्या दोघांनी संध्याकाळी रिझॉर्टच्या समोरील सुरेख पांढऱ्याशुभ्र समुद्रकिनाऱ्यावर एक चक्कर टाकून यायचे ठरवले होते. ठरल्याप्रमाणे ते दोघे बाहेर पडले. समीर दिवसभर सुटात होता, पण संध्याकाळी त्याने शॉवर घेऊन नेव्ही ब्ल्यू टी-शर्ट, क्रीम कलरची कार्गो पँट व रिबॉकचे बूट घातले होते. जेसिकाने फुलाफुलांचा झिरझिरीत फ्रॉक घातला होता. मोम्बासाची हवा दिवसा गरम असली तरी संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर छान वारा सुटला होता. आकाशात नारिंगी छटा उमटली होती. दूरवर मोंबासा बंदराकडे जाणाऱ्या मोठ्या बोटी दिसत होत्या. समुद्रकिनाऱ्यावरील नारळीची झाडे लयबद्ध रीतीने वाऱ्याच्या तालावर डोलत होती. ते दोघे गप्पा मारत चालू लागले. इतक्यात शंख-शिंपल्यांच्या वस्तू विकणारा एक मुलगा त्यांच्याकडे पळतपळत आला व काहीतरी घ्यायची गळ घालू लागला. समीरने त्याला काही नको आहे असे सारखे सारखे सांगितले तरी तो त्यांचा पिच्छा सोडत नव्हता. शेवटी तो पोरगा म्हणाला,

''साहेब, निदान तुमच्या गर्लफ्रेंडसाठी ही माळ तरी घ्या!'' त्यावर ते दोघेही जरा संकोचले. पण समीर ते चेहऱ्यावर न दाखवता त्या मुलाला म्हणाला,

''अरे, माझ्या गर्लफ्रेंडला असल्या शंख-शिंपल्यांच्या माळा आवडत नाहीत. तिला हिरे-मोत्यांच्या माळा आवडतात. होय की नाही, जेसिका?''

जेसिका देखील त्यावर हसत हसत म्हणाली,

''हो ना. नैरोबीला गेल्यावर त्यासाठी 'स्टर्लिंग'मध्ये जायचं आपलं ठरलं आहेच, डार्लिंग!'' हे ऐकल्यावर तो पोरगा निघून गेला व समीर आणि जेसिका मनसोक्त हसले. रिझॉर्टवर परतल्यावर समीर जेसिकाला म्हणाला,

''आज खूप दमलो आहे. जरा बारमध्ये जाऊन एखादं ड्रिंक घ्यावं म्हणतो. तू पण चल कंपनीला.''

''हो, सर. येईन ना मी. नाहीतर तुम्हाला एकट्याला ड्रिंक घेत बसायला किती कंटाळा येईल!''

ते दोघे बारकडे गेले. बारसमोर समुद्रकिनारा दिसत होता.

''तुझ्यासाठी काय सांगू जेसिका? वाईन वगैरे काही घेतेस की नाही कधी कधी?''

''हो घेते ना सर. मला जीन अँड टॉनिक चालेल.''

''अरे वा, छान,'' असे म्हणून समीरने वेटरला एक जीन अँड टॉनिक व स्वतः साठी लार्ज डिम्पल स्कॉच 'ऑन द रॉक्स' मागवली. त्यांची पेये आल्यावर गप्पा पुढे सुरू झाल्या. स्कॉच पोटात गेल्यावर समीरला जरा उत्साह आला व त्याचा संकोच गळून पडला. तो जेसिकाला म्हणाला,

''जेसिका, तुला एक वैयक्तिक प्रश्न विचारला तर राग येणार नाही ना?''

''हे काय सर, विचारा ना, त्यात काय. आता आपण एकमेकाला किती चांगले ओळखतो.''

''जेसिका, तू आजपर्यंत लग्न कसं काय केलं नाहीस? दिसायला छान आहेस, शिकली आहेस, बऱ्यापैकी नोकरी आहे तुला. तरीही अविवाहितच कशी काय राहिलीस?''

''त्याचं काय झालं सर, माझे वडील एका खाजगी कंपनीत क्लार्क होते. ते छप्पन्नाव्या वर्षी अचानक हृदयविकारानं वारले. माझ्या पाठीवर दोन लहान भाऊ. घरची परिस्थिती बेताचीच. मी त्यावेळी बी.कॉम.ला होते. परीक्षा झाल्याझाल्या नोकरी करू लागले. घरची जबाबदारी माझ्यावर आली. मग भावांचं शिक्षण, आईचं आजारपण, यात माझा सारा वेळ आणि पैसा गेला. आता भाऊ नोकऱ्या करू लागले. पण या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडतापाडता माझा उमेदीचा काळ निघून गेला. त्यात दोन मैत्रिणींच्या बाबतीत शोकांतिका झालेल्या. एकीचा लग्नानंतर दोन वर्षांत घटस्फोट तर दुसरीच्या नवऱ्याने लग्न होऊन एक वर्ष व्हायच्या आत एका घटस्फोटितेबरोबर विवाहबाह्य संबंध ठेवले. तेव्हापासून मी लग्नाचा धसका घेतला.''

''पण तुला कधी कधी आपल्याला एखाद्या पुरुषाचा सहवास असावा असं वाटत नाही?''

''वाटतं ना, पण करणार काय? आता मी पस्तिशी गाठली आहे. आता मला कोणी जोडीदार मिळेल असं वाटत नाही.''

''म्हणजे तुला कोणी बॉयफ्रेंड नाही?''

''नाही, सर. तुमच्यापासून काय लपवायचं?''

''मिळेल, मिळेल, जेसिका. प्रत्येक गोष्टीची वेळ यायला लागते. तुझ्या साऱ्या विवंचना मिटतील.''

त्यानंतर समीरने तो विषय पुढे वाढवला नाही. पण जेसिकाला कोणी बॉयफ्रेंड नाही हे समजल्यावर त्याला खूप आनंद झाला होता.

त्यानंतर जेव्हाजेव्हा संधी मिळेल तेव्हातेव्हा समीर बाहेरगावी जाताना जेसिकाला घेऊन जाऊ लागला. एकदा तो तिला दक्षिण आफ्रिकेतील प्रिटोरियाला व इजिप्तमध्ये कैरोला देखील घेऊन गेला. तेथे असताना एके संध्याकाळी ते दोघे गिझा भागातील जगप्रसिद्ध 'पिरॅमिडस् व स्फिंक्स' पाहून आले. जेसिका समीरबरोबर प्रवासाला संधी मिळते आहे यामुळे खूष होती. अलिकडे नैरोबीत असताना समीर अधूनमधून जेसिकाला लंचला बाहेर घेऊन जायचा. एरवी तो दुपारी घरी जेवायला जायचा. कधी सुलभा घरी असायची कधी नसायची. समीर व जेसिका यांना एकत्र पाहून कोणाला कसलीही शंका यायचे कारण नव्हते. शेवटी ती त्याच्या विभागाची सेक्रेटरी होती. हळुहळू ते दोघे एकमेकांच्या जवळ येत चालले होते, पण समीरने अजूनही तिला आपण तिच्या प्रेमात पडू इच्छित आहोत याचा सुगावा लागू दिला नव्हता. एकदा जेसिका समीरला म्हणाली,

''सर, तुम्ही एकटे कामानिमित्त परदेशी जाता ना, तेव्हा मला अजिबात करमत नाही. सारखी तुमची आठवण येते. निदान मला फोन करून तुम्ही कसे आहात हे तरी कळवत जा!''



समीर तिला म्हणाला,

''हो जेसिका, मी नक्कीच तुला फोन करत जाईन.''

सुलभा समीरला असे कधी म्हणाल्याचे त्याच्या लक्षात नव्हते. तो नैरोबीत असो व नसो, सुलभाला त्याचे काही वाटत नव्हते. ती आपल्या विश्वात मग्न होती.

आता जेसिकाला कामाला सुरुवात करून पाच महिने होऊन गेले होते. एकदा ती व समीर लंचला गोंग रोडवरील 'मिसोनो' या प्रसिद्ध जपानी उपाहारगृहात जेवायला गेले होते. ते पहिल्या मजल्यावर एका कोपऱ्यात बसले. त्या दिवशी तेथे अजिबात गर्दी नव्हती. त्यांचे जेवण यायला वेळ होता. समीर डायेट कोक व जेसिका मँगो ज्युस घेत गप्पा मारत बसले होते. त्या दिवशी समीरने थोडे धाडस करायचे ठरवले. तो जेसिकाला म्हणाला,

''जेसिका, आपल्याला एकमेकांचा सहवास खूप आवडतो. मला आता भीती वाटू लागली आहे की मी तुझ्या प्रेमात पडलोय की काय?''

त्यावर जरा लाजत जेसिका म्हणाली,

''सर, माझ्या मनात देखील हीच गोष्ट किती दिवस झाले घोळत होती. पण या विषयवार कसं बोलायचं असा संकोच वाटत होता. सर, तुम्हाला खरं सांगू, तुमच्यासारख्या उत्तम करियर असलेल्या, उच्च पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या मोठ्या व्यक्तीला तुमच्यावर प्रेम करणारी सहचारिणी हवी. त्यामुळे तुमचं करियर अधिक खुलेल. तुमच्या आयुष्यात तुम्ही मागे सांगितल्याप्रमाणे जी पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढायची मला संधी मिळाली तर मी स्वतःला भाग्यवान समजेन!''

हे ऐकल्यावर समीर रोमांचित झाला. त्याने जेसिकाचा हात हातात घेतला व तो तिला म्हणाला,

''मला तुझ्याशी एकांतात खूप खूप काही बोलायचं आहे.''

''तुम्ही सांगाल तेथे मी यायला तयार आहे, सर.''

''ठीक, पण तुला एक सांगतो, येथून पुढे आपण दोघं एकत्र असताना तू मला 'सर' म्हणायचं नाही, फक्त समीर म्हणायचं.''

''ठीक आहे, सर, सॉरी, समीर!''

''छान. हे पाहा जेसिका, आपण दोघं दोन-तीन दिवसांसाठी 'स्वीट वॉटर्स'ला जाऊया?''

दोन वर्षांपूर्वी समीर व सुलभा तिकडे गेले होते. ते ठिकाण नान्युकी या शहराजवळ होते. नैरोबीहून तेथे पोचायला जेमतेम तीन तास लागायचे. तेथील पंचतारांकित सेरेना रिझॉर्टमध्ये आरामशीर व प्रशस्त तंबूत राहण्याची उत्तम सोय होती. स्वतंत्र टॉयलेट, बाथरूम अशा अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असे ते तंबू तेथे जाणाऱ्यांचे प्रमुख आकर्षण समजले जाते. शिवाय तो रिझॉर्ट स्वीट वॉटर्स राष्ट्रीय अभयारण्याच्या आवारात असल्याने कित्येक वन्य पशू-पक्षी तेथे पाहायला मिळत. रिझॉर्टमधील तंबूंची रचना अशी होती की ते एका छोट्या जलाशयाच्या भोवती तयार केले होते. दिवसभर तेथे कित्येक जातींची हरणे, झेब्रे, जिराफ आणि वेगवेगळ्या प्रकारचे वन्य पक्षी पाणी प्यायला येत. तंबूच्या दारातील व्हरांड्यात खुर्च्या टाकून अवघ्या साठ-सत्तर फुटांवरील ते दृश्य पाहायला खूप छान वाटायचे. तेथून माउंट केनिया या सुरेख सतरा हजार फूट उंचीच्या बर्फाच्छादित शिखर असलेल्या पर्वताच्या मागून होणारा सूर्योदय खूपच छान दिसायचा. समीर व सुलभा तेथे तीन दिवसांसाठी गेले होते, पण गेलेल्या दुसऱ्या दिवशी सुलभा समीरला म्हणाली होती, की 'तेच ते प्राणी आणि पक्षी पाहून मला कंटाळा आला आहे. आपण आजच नैरोबीला परत जाऊ.' समीरला वन्यजीवनाची व निसर्गाची खूप आवड. पण उगाच वाद घालण्यात काही अर्थ नाही असा विचार करून त्याने त्या संध्याकाळी नैरोबीला परत जायचे कबूल केले. शहरी जीवनाची, त्यातल्या त्यात स्मार्टफोन, टी.व्ही., इंटरनेट – ते देखील फेसबुक, स्काईप, वायबर आणि व्हॉट्स ॲप वगैरे वापरण्यासाठी – आणि इतर आधुनिक सुखसोयींची चटक लागलेल्या सुलभाला तेथे गेल्यावर पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखे झाले होते.

''अय्या! खरंच म्हणताय सर, नाही, समीर?''

''हो मग, तुला काय चेष्टा वाटली?''

''तसं नाही. मी देखील त्या रिझॉर्टबद्दल खूप ऐकलं आहे. पण तेथे राहणं मला परवडण्यासारखं नाही म्हणून कधी तिकडे गेलेच नाही.'' तेथे एका दिवसाचा जेवण-खाण्यापासून राहण्यापर्यंतचा खर्च प्रत्येकी जवळजवळ १५० डॉलर होता.

''आता तू त्याची काळजी करू नको. पण तुला ठाऊक आहे, तिकडचे तंबू 'हनिमून कपल्स'साठी तयार केले आहेत म्हणे. त्यासाठी तिकडे जाणाऱ्यांचं प्रमाण खूप मोठं आहे,'' समीर हसत हसत म्हणाला. त्यावर जरा लाजून खाली पाहत जेसिका म्हणाली,

''आपणदेखील त्यासाठीच तिकडे जाणार आहोत असं समजूया!'' आता मात्र समीरची दांडी उडाली! जेसिकाकडून त्याला एवढे स्पष्ट उत्तर अपेक्षित नव्हते. तिकडे जाण्याच्या विचाराने व जेसिकाच्या सूचक बोलण्याने तो खूप उत्तेजित झाला.

''कधी जायचं ठरवताय, समीर?''

समीरने आपला स्मार्टफोन काढला. त्यात त्याच्या 'प्लॅनर'मध्ये महत्त्वाच्या कामांच्या व बैठकांच्या नोंदी होत्या. त्या पाहून तो म्हणाला,

''पुढच्या महिन्याच्या ११ व १२ तारखांना शनिवार व रविवार आहे. त्यावेळी जाऊ. शुक्रवारी दुपारी येथून निघू व सोमवारी सकाळी लवकर तेथून परत यायला निघू.''

''पण तुम्ही घरी काय सांगणार?''

''ते तू माझ्यावर सोपव. त्याबद्दल तू निश्चिंत राहा.''

खरे म्हणजे ऑक्टोबरच्या चार तारखेला सुलभा भारतात जाणार होती. आधी इंदूरला तिच्या मावसबहिणीच्या

मुलाच्या लग्नाला हजर राहून ती मुंबईच्या थोरल्या भावाकडे चार दिवस, पुण्याला धाकट्या बहिणीकडे चार दिवस असे करतकरत नाशिकला आईवडिलांना भेटायला जाण्याचा तिचा कार्यक्रम खूप आधी ठरला होता. त्यात तिचा जवळजवळ दीड महिना जाणार होता.

ऑफिसला परतल्यावर समीरने त्याच्या नेहमीच्या सफारी एजंटला फोन करून सेरेना स्वीट वॉटर्स रिझॉर्टचे बुकिंग केले. तिकडे जायला अजून तीन आठवडे बाकी होते. आता तो १० तारीख कधी एकदा उजाडते याची आतुरतेने वाट पाहू लागला. त्याच दिवशी त्याने मनोजला एक इ-मेल पाठवला.

''प्रिय मनोज,

तुझं कसं काय चाललं आहे? आम्ही इकडे उत्तम आहोत.

तुला सांगायचं म्हणजे तुझा सल्ला शिरसावंद्य मानून मी एक गळ टाकला होता. गळाला मोठा मासा लागला आहे. ती माझी सेक्रेटरी आहे. तिचा फोटो सोबत जोडला आहे. तो पाहून तुला माझा हेवा वाटणार यात शंकाच नाही. आम्ही दोघं पुढच्या महिन्यात १० ते १३ या तारखांदरम्यान एका रम्य ठिकाणी हनिमून कपल्ससाठी प्रसिद्ध असलेल्या सेरेना स्वीट वॉटर्स रिझॉर्टमध्ये राहायला जाणार आहोत. तिचं, म्हणजे जेसिकाचं, म्हणणं असं आहे की आपण आपल्या हनिमूनलाच तेथे जाणार आहोत असं समजायचं! यात सर्व काही आलं! मी तिकडे जाण्यासाठी आतुरलो आहे. तिकडे जाण्यापूर्वी आपलं बोलणं होईलच. पण तिकडून परतल्यावर तुला तिकडचा सारा इतिवृत्तांत (काही गोष्टी सेन्सॉरकरून) कळवेन.

तुझा मित्र,<br>समीर.''

सप्टेंबरच्या २५ तारखेस समीरला मानवी साधन संपत्ती विभागाची प्रमुख मेरी रुरीगीचा फोन आला.

''डॉ. सावकार, येत्या ३० तारखेस जेसिका म्वांगीचं प्रोबेशन संपतंय. तिचे सहा महिने पूर्ण होत आहेत. आपल्याला तिच्या कामाचं मूल्यमापन करून तिची नेमणूक पक्की करायची की नाही, याचा विचार केला पाहिजे. उद्या सकाळी १० वाजता मूल्यमापन समितीची मीटिंग होईल. त्यासाठी तुम्ही हजर राहावं म्हणून मी फोन केला.''

''असं? ठीक आहे, मी येईन. मीटिंग बोर्डरूम मध्येच होणार ना?''

''हो, डॉ. सावकार.''

''ओके, मेरी. मी येईन मीटिंगला,'' असे म्हणून समीरने फोन ठेवला. जेसिकाच्या नेमणुकीवर शिक्कामोर्तब करणे हा संघटनेच्या औपचारिकतेचा भाग होता, हे तो विसरूनच गेला होता. उद्या दहा मिनिटांत ते काम उरकून टाकू असा समीरने विचार केला व तो पुढे कामाला लागला. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे मीटिंगला सारे जमले. त्यात समीर आणि मेरी रुरीगी व्यतिरिक्त मिसेस कार्लाव्हो, सिल्व्हेस्टर व मुख्य प्रशासकांचे प्रतिनिधी फ्रान्सिस फोस्टर यांचा समावेश होता. मेरीने मीटिंगची सुरुवात केली. प्रत्येकाने जेसिकाच्या कामाबद्दल व तिच्या योग्यतेबद्दल आपापले मत काय आहे हे सांगायला सुरुवात केली. मिसेस कार्लाव्हो म्हणाली,

''जेसिकाला इलेक्ट्रॉनिक फायलिंग करता येत नाही. माझ्या कित्येक महत्त्वाच्या कागदपत्रांना तिनं इकडचं तिकडे करून टाकलं आहे. त्यामुळे झालं आहे काय, की एखादं डॉक्युमेंट किंवा रिपोर्ट चटकन शोधणं खूप अवघड होऊन बसलं आहे. तिला मी कागदपत्रांची विषयानुसार वर्गवारी कशी करायची असते हे हजार वेळा समजावून सांगितलं, पण तिच्या डोक्यातच शिरत नाही.''

मेरीने सिल्व्हेस्टरला त्याचा अनुभव काय आहे हे विचारल्यावर तो म्हणाला,

''माझा देखील तोच अनुभव आहे. शिवाय तिला ड्राफ्टिंग अजिबात जमत नाही. साधं एक पानाचं पत्र असो वा मीटिंगचा किंवा सेमिनारचा अहवाल असो, धड चार ओळी प्रोटोकॉलनुसार लिहिता येत नाहीत.''

त्यावर मेरीने समीरला विचारले,

''डॉ. सावकार, या बाबतीत तुमचा काय अनुभव आहे?''

''या गोष्टी काही प्रमाणात माझ्या लक्षात आल्या होत्या, पण ती शिकत आहे, हल्ली तिच्या कमी चुका होत आहेत. अजून संधी व कामाचा अनुभव आल्यावर ठीक होईल असं वाटतं.''

''ती व्हर्जिनिया कशीही असली तरी कामात चोख होती. मला तरी जेसिकाबरोबर काम करणं शक्य होणार नाही.'' मिसेस कार्व्हालो म्हणाली. त्यावर मेरीने फ्रान्सिस फोस्टरला विचारले,

''प्रशासन व फायनान्स यांचा काय अनुभव आहे?''

त्यावर फ्रान्सिस म्हणाला,

''माझ्याकडे फायनान्सनं पाठवलेल्या नोटमध्ये म्हटलं


आहे, जेसिकला साधं अकाउंटिंग जमत नाही. काही सेमिनार वगैरेच्या अकाउंटसमध्ये तिनं खूप गोंधळ घातला आहे. आवश्यक ती व्हाउचर्स सांभाळून ठेवली नाहीत किंवा योग्य त्यावेळी घेऊन ठेवली नाहीत. त्यामुळे ऑडीटरनी ताशेरे मारले आहेत. या त्रुटी वेळोवेळी तिच्या निदर्शनास आणून दिल्या, पण संधी देऊन देखील सुधारणा होत नसल्यानं फायनान्स तिच्या नोकरीचा करार पक्का करण्यास संमती देऊ शकत नाही. प्रशासकीय कार्यालयाचा देखील हाच निष्कर्ष आहे.''

त्यावर मेरीने समीरला विचारले,

''आता काय करायचं डॉ. सावकार?''

''मला वाटतं आणखी चार महिन्यांसाठी प्रोबेशन वाढवून तिला सुधारायची संधी द्यावी.'' त्यावर इतर सारे म्हणाले की आमची त्याला संमती नाही. तिला कमी करून नव्या निवडीची प्रक्रिया सुरू करावी असा एकच सूर त्यांच्या बोलण्यातून निघत होता. या साऱ्या प्रकारामुळे समीरचे धाबे दणाणले. इतरांच्या प्रखर विरोधापुढे त्याचे काही चालेना. बरे, आपण तिला पाठीशी घालत आहोत अशी शंका इतरांना आली तर त्यातून वेगवेगळे अर्थ लावण्याची शक्यता होती.

''ठीक आहे, तिला कळवून टाका की तिची नेमणूक पक्की करता येणार नाही'' समीर मेरीकडे पाहत म्हणाला.



''ते आम्ही करूच. पण त्या पत्रासोबत तुमच्या सहीचा तिच्या मूल्यमापनाचा अहवाल जोडावा लागेल. तिच्या चुका तिच्या निदर्शनास आणाव्या लागतील. मला वाटतं मिसेस कार्लाव्हो व मिस्टर सिल्व्हेस्टर त्याचा मसुदा करतील, तुम्ही फक्त त्यावर सही करावी.'' मेरी समीरला म्हणाली. त्याला नाही म्हणायचे काही कारणच नव्हते.

''तिला ३० सप्टेंबरला संध्याकाळी तिचं प्रोबेशन असमाधानकारक असल्याचं पत्र देऊन, यापुढे कामावर येण्याची गरज नाही असं लेखी कळवावं लागेल. तोपर्यंत हा निर्णय आपण सर्वांनी गोपनीय ठेवावा.'' मेरी उठताउठता म्हणली.

तो संपूर्ण दिवस समीरचे कामात लक्ष लागत नव्हते. जेसिकाने एक-दोनदा 'तुम्हाला ठीक वाटतं आहे ना? प्रकृती ठीक नाही का?' असे काहीतरी विचारले होते, पण समीरने त्याला उडवाउडवीची उत्तरे दिली होती. तो दिवस शुक्रवारचा. सोमवारी समीरने बाहेरच्या मीटिंग्स ठेवल्या होत्या. त्यासाठी एकटाच तो तिकडे गेला. त्याने मंगळवारची, म्हणजे जेसिकाच्या शेवटच्या दिवसाची रजा काढली. मेरीचे पत्र जेसिकाला मिळाल्यावर तिची होणारी प्रतिक्रिया पाहणे त्याला टाळायचे होते. आता या साऱ्या प्रकाराचा त्याच्या व जेसिकाच्या संबंधावर काय परिणाम होणार आहे हे त्याला स्पष्ट दिसत होते.

१ ऑक्टोबरला समीर कामावर गेला. अर्थात जेसिकाची खोली रिकामीच होती. ३ तारखेस त्याने जेसिकला फोन केला.

''हॅलो जेसिका, मी समीर बोलतोय.''

''हो कळलं. कशाला फोन केलात?'' ती कोरड्या आवाजात म्हणाली.

''जेसिका, तुझा मोठा गैरसमज होणं स्वाभाविक आहे. मला तुला भेटायचं आहे व सारा खुलासा करायचा आहे.''

''आता काय उपयोग आहे त्या खुलाशाचा?''

''अगं, माझी बाजू तरी ऐकून घे. आपण असं करू, उद्या दुपारी लंचच्या वेळेत, साडेबाराला 'द ग्रेट वॉल' या तुझ्या आवडीच्या चायनीज उपाहारगृहात भेटू.''

''त्यातून काही निष्पन्न होणार नाही याची मला खात्री आहे. तुम्ही मला गोड बोलून फसवलं आहे. चुका कोणाकडून होत नाहीत? मला सुधारायची संधी द्यायची शिफारस तरी करायची होती तुम्ही. माझ्या चुकांची केवढी मोठी यादी जोडली होती त्या मेरीच्या पत्राला.''

''अगं,ती यादी मी केली नव्हती. त्याचाच तर खुलासा करायचा आहे मला.''

''खोटं कशाला बोलता? तुमची सही आहे त्या अहवालावर. विभागप्रमुख म्हणून काही नाही करता आलं? म्हणे माझं तुझ्यावर प्रेम आहे! तरी बरं झालं, गोड गोड बोलून तिकडे 'स्वीट वॉटर्स'ला नेऊन माझा गैरफायदा घ्यायच्या आधीच हे सर्व घडलं. नाहीतर मला पश्चात्ताप झाला असता. पुरुषजात धोकादायक असते असं मला वाटतच होतं, आता तर चक्क खात्रीच झाली आहे माझी. मला तुम्हाला भेटायची मुळीच इच्छा नाही. कृपा करून इथून पुढे मला फोन देखील करू नका,'' असे म्हणून तिने फोन बंद केला.

समीरने ऑफिसला गेल्यावर त्याच्या सफारी एजंटला फोन करून सेरेना स्वीट वॉटर्स रिझॉर्टचे बुकिंग रद्द करायला सांगितले. आता त्याला साधे पाणी देखील कडू लागू लागले होते!

समीरने त्याच दिवशी मनोजला इ-मेल लिहायला घेतला-

''प्रिय मनोज,

मागे तुला मी जेसिका या माझ्या सेक्रेटरीबरोबर तीन-चार दिवस सेरेना स्वीट वॉटर्स रिझॉर्ट या रम्य ठिकाणी राहायला जाणार होतो हे कळवलं होतं, हे तुझ्या लक्षात असेल. पण तिकडे जाण्यापूर्वीच माझे डोळे उघडले व माझी सद्सदविवेकबुद्धी जागी झाली. आपल्या हातून किती घोर पातक होऊ घातलं आहे, याची प्रकर्षानं जाणीव झाली. श्री प्रभूरामचंद्रांच्या एकपत्नीत्वाचा आदर्श असलेल्या भारतीय संस्कृतीत वाढलेला मी, त्या उच्च संस्कृतीशी प्रतारणा करायला निघालो होतो यावर माझा माझ्यावरच विश्वास बसत नव्हता. तू वाहवत गेलेला आहेसच, पण मी देखील तुझ्याप्रमाणे त्या गटारगंगेत वाहवत जायचं? तुझ्या वेळोवेळीच्या सल्ल्यानं माझ्या डोळ्यांवर झापड चढलं होतं. एका निरागस नि अनभिज्ञ तरुणीचा मी केवळ माझं उच्चपद वापरून गैरफायदा घ्यावा यासारख्या हीन नि निंदनीय कृत्याचं पातक माझ्या हातून घडण्यापूर्वीच माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी आजच माझ्या एजंटला फोन करून तिकडचं बुकिंग रद्द केल्याचं कळवलं. माझ्या या निर्णयाची जेसिकास कल्पना दिल्यावर ती खूप अस्वस्थ झाली. पण तिकडे जाऊन माझ्या हातून घोर अपराध झाल्यानंतर मी देखील अस्वस्थ होऊ शकलो असतो. या साऱ्या प्रकरणात केवळ तुझा बदसल्ला ऐकल्यानं आम्हा दोघांचं मनःस्वास्थ्य बिघडलं आहे. पण यथावकाश तिला देखील उच्च विचारसरणीच्या व सर्वमान्य नीतीमत्तेच्या निकषांवर घेतलेल्या माझ्या निर्णयाची महती पटेल व तो क्षणभंगुर मोह किती निरर्थक असतो, याची जाणीव होईल. असो.

तथापि, तुला एवढंच सांगायचं आहे की या विषयावर यापुढे आपण काहीही बोलायला नको. तू मला असल्या बाबतीत कसलाही सल्ला देऊ नये अशी तुला नम्र विनंती आहे. अर्थात आपली मैत्री यापुढे देखील अबाधित राहील, किंबहुना वृद्धिंगत होईल, याची मी तुला ग्वाही देतो.

मला 'समांतर जीवन' जगायचं नाही हा माझा निर्णय अविचल आहे, एवढं मात्र लक्षात ठेव!

तुझा मित्र,

समीर.''

**– उमेश कदम**

'आनंद', २५-ई, ताराबाई पार्क,

कोल्हापूर ४१६००३

दूरध्वनी : (०२३१) २६५३४६०

kadamumesh@hotmail.com

**॥ग्रंथाली॥**



**निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया**

**दिलीप शिंदे**

भारतात लोकशाहीचे संवर्धन करताना निवडणूकविषयक ज्ञान जनतेला व्हावे या भूमिकेतून निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया सुबोध पद्धतीने सांगणारे हे पुस्तक. निवडणूक आयोग आणि गावपातळीपर्यंतची निवडणूक यंत्रणा यातून उमजते.

**मूळ किंमत ८० रुपये ● सवलतीत ५० रुपये**

## 'पद्मगंधा'ची नवीन दर्जेदार प्रकाशने

तीन पिढ्यांच्या कथालेखिकांच्या सर्जनप्रक्रियेची ओळख करून देणारा, त्यांची कथेसंबंधीची भूमिका स्पष्ट करणारा ग्रंथ. अकरा कथा लेखिकांच्या मुलाखती व त्यांच्या कथा



### स्त्री-लिखित मराठी कथा

(१९५० ते २०१०)

संपादन : अरुणा ढेरे

**मूळ किंमत** ₹ ७०० । **सवलतीत** ₹ ५६०

स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांच्या कालखंडात लक्षणीय स्वरूपाचे कादंबरीलेखन करणाऱ्या अकरा लेखिकांच्या वाङ्मयकृतींविषयीचे, अकरा अभ्यासक स्त्रियांनी लिहिलेले लेख

### स्त्री-लिखित मराठी कादंबरी

(१९५० ते २०१०)

संपादन : अरुणा ढेरे



**मूळ किंमत** ₹ ३२० । **सवलतीत** ₹ २५५

एक अतिशय गुंतागुंतीचं, पण गवसलं तर आयुष्याला उजळून टाकणारं असं मैत्रीचं नातं आहे. त्या प्रेममय मैत्रीविषयी लिहिलेले हे ललितबंध आहेत.



### प्रेमातून प्रेमाकडे

अरुणा ढेरे

**मूळ किंमत** ₹ ३०० । **सवलतीत** ₹ २४०

कवितेचा मराठी विश्वकोश अर्वाचीन काळातील काव्यनिर्मितीची विविधलक्ष्यी मीमांसा प्रथमच एकत्रितपणे संगृहीत

### अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा




संपादक

डॉ. राजेंद्र नाईकवाडे

**मूळ किंमत** ₹ ९०० । **सवलतीत** ₹ ७२०

महाराष्ट्रातील नद्यांचे लोकजीवनातील महत्त्व स्पष्ट करतानाच संस्कृत आणि मराठी वाङ्मय, विविध धार्मिक विधी, परंपरा, उत्सव आणि देवता ह्यांचा अभ्यास.



### नदी आणि स्त्रीत्व

ॲन फेल्डहाउस

अनुवाद : विजया देव

**मूळ किंमत** ₹ ४५० । **सवलतीत** ₹ ३६०

विसाव्या शतकाच्या बौद्धिक वातावरणावर जगभर नित्शेइतका प्रभाव अन्य तत्त्ववेत्त्यांचा नाही. या महान तत्त्ववेत्त्याला समजून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

### फ्रेडरिख नित्शे

**जीवन आणि तत्त्वज्ञान**

विश्वास पाटील



**मूळ किंमत** ₹ ३०० । **सवलतीत** ₹ २४०

**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : arunjakhade@padmagandha.com


आपल्या जीवनामध्ये सौख्याचा आणि आनंदाचा अविरत वर्षाव होवो.
शुभ दिपावली
गृह कर्ज
वाहन कर्ज
शिक्षा कर्ज
एम एस एम ई कर्ज
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
1800 22 2244 | 080 2530 0175
080 2530 2510 | www.unionbankofindia.co.in

## ग्रंथाली

# नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचे प्रकाशन समारंभ



दिलीप शिंदे लिखित 'निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया' या पुस्तकाचे प्रकाशन स्वाधीन क्षत्रिय (मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उजवीकडून दुसरे) यांच्या हस्ते झाले. सोबत सुरज मांढरे (उपसचिव, मुख्य सचिव कार्यालय), सुदेश हिंगलासपूरकर (ग्रंथाली विश्वस्त), निलेश गटणे (सह निवडणूक अधिकारी), नितीन गद्रे (मुख्य निवडणूक अधिकारी व प्रधान सचिव) आणि लेखक दिलीप शिंदे (अप्पर आयुक्त, कोकण विभाग)




वसुमती धुरू लिखित 'प्रपितामह काशिनाथ देवजी धुरू आणि सूर्यवंशी ज्ञाति समाज' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी प्रभाकर भिडे, डॉ. विजया राजाध्यक्ष, लेखिका वसुमती धुरू, दिनकर गांगल आणि बाळ वेदक


विशेष ऑफर
31 डिसें. 2014 पर्यंत
• व्याज दर घटले
• कोणतेही प्रोसेसिंग शुल्क नाही
BOI
आनंदाचं नवं घरकुल
बीओआय होम लोन
ईएमआय
₹893/-
प्रती लाख
परतफेड 30 वर्षां पर्यंत
पूर्व - भरणा शुल्क नाही
निःशुल्क व्यक्तिगत अपघाती बीमा*
होम लोन वर ओव्हरड्राफ्ट सुविधेचा पर्याय उपलब्ध आहे
टोल फ्री नं.
1800 103 1906/
1800 220 229
बँक ऑफ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं
www.bankofindia.co.in पहा


Aamrai
ORGANIC
Brimming with Nature's Divine Goodness
Born in a moment so perfect, only nature could create it. From the red soils of Konkan and black rock of Western Ghats; fired by the hot Ratnagiri sun and cooled by the salty breeze from the Arabian sea, delicious, sumptuous organic mangoes are grown in Ratnagiri's Aamrai. Known for their exceptional sweetness, texture and flavor, they are a creation of divine love.
Certified by
www. aamrai.com
info@ aamrai.com | Facebook.com/Aamrai.mangoes

# लोकशाहीर ज्ञानोबा उत्पात

अरुण पुराणिक

**लोकशाहीर** ज्ञानोबा उत्पात म्हणजे उत्तर पेशवाईतील कवी होनाजी, सगन-भाऊ, राम जोशी, गंगू हैबती, भाऊ फक्कड, अनंत फंदी, लहरी हैदर, पठ्ठे बापूराव यांसारख्या अनेक शाहिरांच्या कमीत कमी दोनशे लावण्या, त्यांच्या मूळ चालींसह, त्याच ढंगात अदाकारीसह पेश करणारे लावणीसम्राट! 'तमाशा' या लोककलेच्या क्षेत्रातील बहुतेक मान-सन्मान, पुरस्कार, मिळणारे तसेच महाराष्ट्रातील अनेक प्रथितयश कलावंतिणींचे लाडके गुरुजी!



तमाशातील कलावंतिणीने शाहिराला लावणी लिहून मागावी व ती बोर्डावर सादर करावी हा प्रकार शाहीर पठ्ठे बापूराव यांच्यानंतर लुप्त झाला होता, पण ती परंपरा पुढे ज्ञानोबांनीच जतन केली. ज्ञानोबांची लावणी म्हणजे टाळ्यांचा कडकडाट, शिट्ट्यांचा कलकलाट आणि कलावंतिणीवर हजारों रुपयांची बरसात! कोणत्याही लावणी महोत्सवाला ज्ञानोबांच्या लावणीशिवाय रंगत येत नाही. आज पारंपरिक मराठी लावण्या म्हणून चित्रपटगीतेच सर्वत्र म्हटली जातात. अशा वेळी खास संगीतबारीसाठी तयार केलेल्या लावण्यांना एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते. ज्ञानोबांच्या लावणीत राम जोशीचे भाषासौंदर्य आहे तर होनाजीच्या संगीताचा नाद आहे. सगन-भाऊंच्या उत्तान श्रृंगाराच्या अनेक छटा त्यामध्ये पाहायला मिळतात. रसिकांसाठी ज्ञानोबांच्या इरसाल लावण्यांची ही एक झलक!

*'एका जागेवर बसून राया आंबून गेलय अंग,*
*आंबून गेलय अंग*
*खेळ खेळू दोघं, राया खेळ खेळू दोघं'*

*'रात्र चांदणी, चला अंगणी, बागे मध्ये फिरू*
*बागे मध्ये फिरू राया हात हाता मध्ये धरू   (धृ.)*
*चोर शिपाई खेळू राया लपून बसते मी शोधा*
*पळून जाईल तस्कर तुमचा हात विळख्याने बांधा*
*नको अदालत नको खटला, एकदम शिक्षा सुरू' (१)*
*'लई दिसाची हौस राया चला पुरी करू*

*'चला जेजुरीला जाऊ'*
*('नवरा माझा नवसाचा' चित्रपटात ही लावणी घेतली आहे.)*

पंढरपुरात लावणी उत्सव चालू झाला. उत्पात गल्लीतील एका पत्र्याच्या खोलीत ज्ञानोबाची लावणी रंगात आली होती. अचानक रात्री दहा वाजता पु.ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, श्रीराम पुजारी ही बुजुर्ग मंडळी त्या लहानशा खोलीत लावणी ऐकायला येऊन बसली. केवळ लावणीवरच्या निरागस प्रेमापोटी ही मंडळी तिथे तीन तास बसली. नुसती बसलीच नाहीत तर त्या श्रृंगाररसात न्हाऊन गेली.



*'पहिल्या रात्रीची गंमत सांगते, घ्या गं गडनी तुम्ही बसून*
*कुण्या पुरुषाला सांगू नका गं आपली गंमत तुम्ही चुकून'*
*'तुझ्या काव्याला बाई मी फसायची नाही*
*तुझ्या संग मी शिणुमाला येयाची न्हाई*
*अंधारात खेटून खेटून काय बघतोस चाळं करून*
*ह्यो चावटपणा मला चालायचा न्हाई*
*तुझ्या संग....'*

*'तुझी नि माझी संगत सरली विसर आता तू मला*
*मला सासरी नेण्यासाठी दीर धाकला आला'*

*'सुबक ठेंगणी चतुर कामिनी माडीवर दिसली*
*हातात ऐना घेऊनी मैना कच सुकवित बसली'*

*उभी राहुनी माडीवरती वाट पाहिली काल*
*वाटलं होतं तुम्ही याल, राया वाटलं होतं तुम्ही याल ।।धृ।।*
*तुमच्या आवडीचा शालू नेसले, चोळी किनखाबी लाल*
*तुमच्यासाठी तयार ठेवले नरम गुलाबी गाल ।।१।।*

ज्ञानोबांचा जन्म पंढरपूरच्या श्री रुक्मिणीमातेची वंशपरंपरागत पूजाअर्चा, भजन, प्रवचन, कीर्तन करणाऱ्या उत्पात घराण्यातला! त्यांचे आजोबा बाळकृष्णबुवा हे रोज सकाळी रुक्मिणी मंदिरात भजन करीत व दुपारी कलावंतिणींना लावण्या व अदाकारी शिकवीत, ते जुन्या पारंपरिक लावण्यांचे जाणकार गायक व त्या नृत्याचे हावभाव शिकविणारे गुरू होते. आजोबांची ही कला नातवात म्हणजे ज्ञानोबात उतरली. ज्ञानोबांना गोड आवाजाची नैसर्गिक देणगी होती.

उत्पात समाजातील लोक पंढरपुरात होळी पौर्णिमा ते रंगपंचमी या काळात जुन्या लावण्यांचे सांग्रसंगीत कार्यक्रम करीत. सुरुवातीच्या काळात ते केवळ डफावर लावण्या म्हणत. नंतर त्यात पेटी, तबला, मंजिरी व ढोलकी आदी वाद्यांची साथसंगत आली. साधारण १९७० नंतर ज्ञानोबा हे त्यांचे प्रमुख लावणी गायक झाले. बुद्धिमान, उच्च विद्याविभूषित ज्ञानोबा लावणीच्या अभ्यासासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वणवण फिरले, तमासगीरांना प्रत्यक्ष भेटले. भामाबाई (सत्यभामाबाई) पंढरपूरकर, लीलाबाई पारुबाई अनसूया गदगकर, यमुनाताई वाईकर आदी कलावंतिणींच्या बैठका प्रत्यक्ष पाहिल्या, सातत्याने ऐकल्या. जुन्या लावण्यांची त्यांच्या चालीसह हस्तलिखिते गोळा केली. सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी प्रचलित असलेले अनवट राग ऐकले. ज्ञानोबा हे माझे सख्खे मामा! १९१० ते १९५० या काळातील क्लासिकल संगीताचा फार मोठा संग्रह माझ्याकडे आहे. दादा, त्या संगीताचा अभ्यास करण्यासाठी मुंबईला येऊन राहिले.

पश्चिम महाराष्ट्रात कमळनाथ नावाचा प्रसिद्ध नाच्या

होता. त्याची अदाकारी पाहून कलावंतिणींनाही त्याचा हेवा वाटायचा. पेशव्यांच्या प्रसिद्ध सरदारांच्या वारसापैकी एकाच्या मुलीला वयात येऊनही न्हाण येत नव्हते. सरदारांनी आपल्या घरी कमळनाथची बैठक ठरवली. त्याने 'म्हशी न्हाणपण हे आले' ही श्रृंगारिक लावणी, हावभाव, अदा करत अशी काही सादर केली की लावणी पूर्ण होण्याआधीच त्या पोरीला न्हाण आले. ज्ञानोबा या कमळनाथाकडे अदा शिकले. पंढरपूरचा कल्ल्या घडगी ही अदाकारीत संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात प्रसिद्ध होता. ज्ञानोबा महाराष्ट्रातील लावणी तिच्या मूळ ढंगात सादर करण्यात तरबेज झाले.

ज्ञानोबांचे इतलकरंजीचे मित्र श्यामराव भिडे एक दिवस ज्ञानोबांची लावणी ऐकण्यासाठी प्रख्यात गायकनट वसंतराव देशपांडे यांना पंढरपुरी घेऊन आले. पारुबाई जेजुरीकर यांची बैठक झाली. त्यानंतर ज्ञानोबा गायला बसले. ज्ञानोबांच्या लावण्या ऐकून वसंतराव भारावले. ज्ञानोबांनाही मग स्फूर्ती आली. त्यांनी फक्त डोळ्यांची अदाकारी असलेले 'छंडो छंडो मुरारी' हे पद म्हटले व अर्धा तास फक्त डोळ्यांची अदाकारी व मुद्राभिनय दाखवला. या बैठकीनंतर ज्ञानोबांचे पंढरपुराबाहेर नाव होऊ लागले.

होळी पौर्णिमेपासून पंढरपुरात लावणी उत्सव चालू झाला. देवळाजवळच्या उत्पात गल्लीतील एका बोळात पत्र्याच्या खोलीत ज्ञानोबाची लावणी रंगात आली होती. अचानक रात्री दहा वाजता पु.ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, श्रीराम पुजारी ही बुजुर्ग मंडळी त्या लहानशा खोलीत लावणी ऐकायला येऊन बसली. एअर कंडिशनर नाही, आवाज करतो म्हणून पंखाही नाही. केवळ लावणीवरच्या निरागस प्रेमापोटी ही मंडळी तिथे तीन तास बसली. नुसती बसलीच नाहीत तर त्या श्रृंगाररसात न्हाऊन गेली.

ज्ञानोबांनी अदाकारी करत अस्सल लावणी सुरू केली,


*पती गं दिसण्यात दिस फाकडा*
*अंगावर धोतर रेशमी जोडा*
*पाया मध्ये शिंदेशाही जोडा*
*शिरी गं मंदिल मोत्या तुरा*
*सर्व गुणांनी बरा, परंतु त्याला ते नाही गं*
*त्याला ते नाही गं*

यावर हास्याचा प्रचंड कल्लोळ उडाला. यावर पु.ल. म्हणाले, ''ज्ञानोबा, तुझी ही लावणी ऐकून आम्हाला सुद्धा 'ते' नाही असं वाटायला लागले आहे.'' पुन्हा हास्याची कारंजी उडाली. मग पु.ल. म्हणाले, ''अहो, 'ते' म्हणजे लावणीचे रसिकत्व आम्हाला नाही.''

मग फुलांचा सुगंध वाऱ्याने दशदिशांना न्यावा तसा ज्ञानोबांच्या लावणीचा सुगंध पु.ल. व वसंतराव यांनी साऱ्या महाराष्ट्रात नेला.

शेठ वालचंद यांच्या जन्मशताब्दीनिमित्त इंडियन नॅशनल थिएटरने भक्तिसंगीत महोत्सव आयोजित केला होता. त्यावेळी अशोकजी परांजपे पंढरपुरी आले व म्हणाले, ''पु.लं.नी तुमचा लावणीचा कार्यक्रम भक्तिसंगीत महोत्सवात ठेवा असे मला सांगितले आहे! मी ते ऐकून चकित झालो व म्हणालो, भक्तिसंगीत महोत्सवात लावणी गायली तर आयोजक म्हणून लोक मला धोंडे मारतील! त्यावर पु.ल. म्हणाले, 'ते मला काही माहीत नाही.' केवळ पु.लं.च्या आग्रहावरून आम्ही तुमचा कार्यक्रम ठेवला आहे. यात काय सादर करायचे ते तुमचे तुम्ही ठरवा.''

ज्ञानोबांचे धाकटे भाऊ भागवताचार्य वा.ना. उत्पात तिथेच बसले होते. त्यांनी ज्ञानोबांना सुचवले, भक्तिसंगीत



महोत्सवात आपण लावणीतील भक्ती असा कार्यक्रम करू. अशोकजींनाही ते पटले. मग ज्ञानोबांनी राम जोशी, होनाजी बाळा, सगन-भाऊ, गंगू हैबती इत्यादी शाहिरांच्या भक्तिपर लावण्या सादर केल्या. रसिकांनी तो बहारदार कार्यक्रम अक्षरशः डोक्यावर घेतला. दुर्गाबाई भागवत, कल्याणी हर्डीकर, आठवले वगैरे साहित्यिकांनी ज्ञानोबांची खूप प्रशंसा केली. इंग्रजी वृत्तपत्रांनीही चार स्तंभी लेख लिहून या कार्यक्रमाची दखल घेतली. ज्ञानोबांची लावणी महाराष्ट्राला कळली.

मुंबई दूरदर्शनवर 'प्रतिभा आणि प्रतिमा' कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतसमीक्षक अशोक रानडे यांनी, ज्ञानोबांची एक तास मुलाखत घेतली. या कार्यक्रमामुळे जुन्या लावण्या व ज्ञानोबा दोघेही प्रसिद्धीच्या झोतात आले. उभ्या महाराष्ट्रातून

ज्ञानोबांना लावणीच्या कार्यक्रमाची निमंत्रणे येऊन लागली.

पंडित भीमसेन जोशींनी पुण्यात नवीन बंगला बांधला आणि वास्तुशांतीनिमित्त त्यांनी घरी ज्ञानोबांची लावणीची बैठक ठेवली. त्या कार्यक्रमाला पु.ल. देशपांडे यांच्यासहित संगीत व साहित्य क्षेत्रातील बुजुर्ग मंडळी आवर्जून आली होती. भीमसेन जोशी म्हणाले, ''ज्ञानोबा घर आहे म्हणून संकोच बाळगू नका. आम्हाला लावणीतील श्रृंगाराचाही आनंद घ्यायचा आहे. त्यामुळे उगाच सोवळेपणा बाळगू नका. अगदी मुक्तपणे लावण्या पेश करा.''

ज्ञानोबांनी उत्तर पेशवाईतील विठ्ठल विष्णू, विश्वनाथ गिरी, सगन-भाऊ (सगन मुस्लिम तर भाऊ कुलकर्णी होते) आदींच्या श्रृंगारिक लावण्यांनी बैठकीला सुरुवात केली. सगन-भाऊ म्हणजे उत्तान श्रृंगाराची परिसीमा! पण त्या श्रृंगाराला अश्लिलतेचा दर्प नाही.

ज्ञानोबांनी आपल्या लावण्यांतून स्त्रीस्वभावाचे अनेक पैलू उलगडून दाखवले. तिच्या मोहक भावछटा मोठ्या खुबीने व्यक्त केल्या. प्रियकराची पहाटेपर्यंत प्रतीक्षा करणारी विरहिणी, उपेक्षेच्या दुःखाने उन्मळून पडणारी अर्धांगिनी, प्रियकराच्या स्पर्शाने नखशिखान्त मोहरून जाणारी अभिसारिका, त्याची फिरकी घेणारी अल्लड प्रेमिका, त्याच्या



जवानीला आव्हान देणारी लावण्यवती!

सकाळच्या प्रहरी देवदर्शनाला जाणाऱ्या सुवासिनीचे वर्णन करणाऱ्या 'छक्कड'ने बैठकीला सुरुवात झाली-

*'हळदी कुंकवाचा डाव्या हाती डबा, डबा'*

पूर्वीच्या काळी किशोरावस्थेतच मुलींचे विवाह होत. अंगणात नाचत-बागडत असतानाच अचानक तिला आपल्या स्त्रीत्वाची जाणीव होई. त्यावेळचा तो अनुभव स्त्रीसुलभ लज्जेने, बालिशपणे ती आपल्या सासुबाईंना सांगते,

*'न्हाण आले वाटे मजला*
*ओ सासू बाई शालू निरीवर भिजला'*

पोरगी आता वयात आली आहे. भीड, संकोच कमी झाला आहे. तीही आता रतीक्रिडेसाठी आसुसली आहे.

*'सख्या उठा, बोला चाळा*
*मला मांडीवरी निजवा'*

मासिक पाळी सुरू झाल्यावर ती लाडेलाडे पतीला बजावते,

*'झाले दुरशी, सख्या हो झाले दुरशी*
*दोनचार दिवस जवळी येऊ नका, महाली नेऊ नका'*

स्नान करून शुद्ध झाल्यावर ती म्हणते

*'अवळून कवळून घेते सख्याला*
*मुखामध्ये मुख घाला'*

आपला बाहेरख्याली पती म्हणजे कुलिन स्त्रीला तोंड दाबून बुक्यांचा मार! त्या पतीला आधीन करून ठेवण्यासाठी पत्नी पतीसेवा करते. साजश्रृंगार करते. प्रसंगी करुणाही भाकते, *'रोज मंचकी व्यर्थ राहिली'*

शेवटची 'चंद्र चकोरा परी' ही विरहात भिजलेली लावणी इतकी रंगली की श्रोते बेभान झाले.

पुरुषांनी लावणी गाणे अनैसर्गिक आहे. पण ज्ञानोबा उत्पात या उक्तीला अपवाद होते. मुंबईच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात लावणी महोत्सव सुरू होता. त्यावेळी मंत्री, संगीतदिग्दर्शक, साहित्यिक, परदेशी वकिलातीचे लोक हजर होते. एका षोडस वर्षीय कलावंतिणीच्या दिलखेचक नृत्यानंतर ज्ञानोबांची बैठक होती. सुंदर नर्तिकेच्या नृत्यानंतर पुरुषाची लावणी कोण ऐकणार, म्हणून सर्वांनाच धास्ती होती. पण ज्ञानोबांनी गायिलेल्या 'रंग रूप ज्ञान कळा' या सगन-भाऊच्या गणानेच श्रोत्यांच्या मनाची पकड घेतली. हा कार्यक्रम इतका रंगला की रसिकांना नर्तिकांचा विसर पडला. मंत्रीमहोदय रंगमंचावर येऊन ज्ञानोबांच्या पाया पडले. संगीतकार नौशाद म्हणाले, महाराष्ट्राला लावणीसंगीताचा इतका समृद्ध पाया असताना, वारसा असताना येथील लोक पॉप संगीत का ऐकतात, हे कळत नाही.

मुंबईतील एन.सी.पी.ए.मधील कार्यक्रमाला म.टा.चे संपादक गोविंदराव तळवळकर, विजया मेहता, भास्कर चंदावरकर असे अनेक ज्येष्ठ पत्रकार, कलावंत उपस्थित होते. पुण्यातल्या भरत नाट्यमंदिरात ज्ञानोबांचा कार्यक्रम ऐकायला खास छोटागंधर्व आले होते. ते म्हणाले माझी तब्येत ठीक नाही, मी अर्ध्या तासानंतर जाईन. पण लावणीत ते इतके रंगले की तीन तास कसे उलटले ते त्यांना कळलेच नाही. शेवटी ज्ञानोबांची पाठ थोपटत ते म्हणाले, ही तुमची लावणी नाही, भुलावणी आहे.

पं. कुमारगंधर्व, पं. जसराज, पं. शिवकुमार शर्मा, झाकिर हुसैन खां साहेब, कविवर्य कुसुमाग्रज आदींनी ज्ञानोबांचा गौरव केला. नाटककार विद्याधर गोखले यांनी तर ज्ञानोबांची लावणी ऐकून त्यांना होनाजी बाळा नाटकात बाळाची भूमिका करण्याची गळ घातली.


ज्ञानोबा हे हाडाचे शिक्षक होते. लावणीगायनाचा हा समृद्ध वारसा, हा दुर्मिळ खजिना त्यांनी आपल्यापुरता मर्यादित न ठेवता, अनेक होतकरू कलावंतिणींना वाटला. त्यात छाया-माया खुटेगावकर, राजश्री-आरती नगरकर, रेश्मा-लैला जामखेडकर, उमा-नंदा इस्लामपूरकर, छाया-प्रभा पंढरपूरकर, आशा-रूपा परभणीकर, दीघोळंकर पार्टी या प्रमुख आहेत. अकलूजच्या लावणी महोत्सवात गेली अनेक वर्षे या पार्ट्या पहिला, दुसरा क्रमांक मिळवत आहेत. आज महाराष्ट्रातील सर्व तमाशा थिएटरांत ज्ञानोबांनी रचलेल्या लावण्या गायल्या जातात. अमेरिकेतील ख्रिस्तीन राव या विदुषीने ज्ञानोबांच्या मदतीने कॅलिफोर्निया विद्यापीठात 'मराठी लावणीचा संगीतपैलू' या विषयावर पीएच.डी. केली. त्यामध्ये ज्ञानोबांची लावणी हे स्वतंत्र प्रकरण आहे व त्यांच्या ध्वनिमुद्रित लावण्या कॅलिफोर्निया विद्यापीठाने जतन करून ठेवल्या आहेत.

ज्ञानोबा सुंदर नव्हते. क्लासिकल संगीतही शिकलेले नव्हते. चेहऱ्यावरील हसरा मिस्किलपणा, जन्मजात विनोदबुद्धी, हजरजबाबीपणा आणि स्त्रीलाही लाजवेल असा मोहक मुद्राभिनय ही प्रमुख अस्त्रे ज्ञानोबांकडे होती. ज्ञानोबा सत्तरीच्या घरात पोचले होते तरी एखाद्या अल्लड तरुणीचा नखरा, खट्याळपणा त्यांच्या गाण्यात होता. ही आईसाहेब रुक्मिणीमातेची कृपा नव्हे तर दुसरे काय होते?

ज्ञानोबा नुसतेच लावणी गात नव्हते तर या मराठमोळ्या लावणीला सामाजिक प्रतिष्ठा कशी मिळेल, या विचाराने झपाटलेले होते. एकेकाळी ग्रामीण भागातील श्रीमंत बागाईतदार या तमासगीरांचे पोशिंदे आणि आश्रयदाते होते. चित्रपटातील लावणीही केवळ गावचा पाटील, ढोलकीवाला आणि कलावंतीण यांच्याभोवती रुंजी घालत होती. त्या लावणीतही पुढे पाश्चिमात्य संगीत घुसडले गेले. त्यामुळे सुशिक्षित, उच्चभ्रू समाज लावणीपासून दूर राहिला होता. स्त्रिया तर लावणीकडे फिरकतही नव्हत्या. ज्ञानोबांनी भक्तिभाव, पावित्र्य, आर्तता यांचे यथार्थ दर्शन घडवले. ह.भ.प. धुंडामहाराज देगलूरकर, बाबामहाराज सातारकर यांनीसुद्धा ज्ञानोबाच्या लावण्या ऐकल्या. वर्षानुवर्षे गावाच्या वेशीबाहेर कनातीत चालणारी, बदनाम झालेली मराठी लावणी ज्ञानोबांनी धार्मिक मंडपातच नव्हे तर चक्क देवळात आणली. ज्ञानोबांचे हे योगदान, समाजप्रबोधन क्रांतिकारकच म्हणावे लागेल!

२००७ मध्ये ज्ञानोबा उत्पात गेले तेव्हा पंढरपुरातील अवघ्या धडशी (गाणे, बजावणे करणारी जमात) गल्लीने सुतक पाळले होते. गावोगावच्या तमाशा फडांत दोन दिवस चूल पेटली नव्हती. ज्ञानोबा मराठी लावणीचे अनभिषिक्त सम्राट होते. चौकाची लावणी, बालेघाटी, नगरी, छक्कड, स्फूट लावणी या सर्व प्रकारांत ज्ञानोबांचा शब्द प्रमाण होत. त्यांना सरकार व समाजाने अनेक पुरस्कार दिले. सर्व वृत्तपत्रे व वाहिन्यांनी त्यांना डोक्यावर घेतले. सर्वसामान्य जनतेनेही त्यांना भरभरून प्रेम दिले. पंढरपुरातला हा दुसरा ज्ञानोबा महाराष्ट्राच्या स्मरणात कायम राहील.

**- अरुण पुराणिक**
ई/१०३, महेश्वरी नगर, एम आय डी सी,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३
दूरध्वनी : ९३२२२१८६५३
arun.puranik@gmail.com




**तणावमुक्त जीवन**

**तरुणांपुढील आव्हान**

**डॉ. पी.एस. रामाणी**

आजच्या स्पर्धात्मक युगात आणि बदललेल्या जीवनशैलीत तरुणांनी त्यांच्यापुढे असलेल्या आव्हानांना सामोरे जाताना मनावर असलेला ताण दूर कसा करावा आणि आनंदी, समाधानी जीवन कसे जगावे याचा मंत्र देणारे पुस्तक.

**मूळ किंमत १३० रुपये ● सवलतीत ८० रुपये**

# हार्दिक शुभेच्छा!

## आकर्षक व्याज दरासहित विविध कर्ज योजना

**स्वप्नपूर्ती**
गृह कर्ज

घर खरेदीसाठी रू. ७० लाखापर्यंत
२० वर्षाकरिता कर्ज



**मनोरथ**
वाहन कर्ज

वाहन खरेदीसाठी
१००% कर्ज



**ज्ञानवर्धिनी**
शैक्षणिक कर्ज

देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी कर्ज– रू. १० लाखापर्यंत
परदेशातील उच्च शिक्षणासाठी कर्ज– रू. २० लाखापर्यंत



**व्यापार आणि उद्योग धंद्यासाठी**
सुलभ कर्ज

रू. १० कोटीपर्यंत



### शिवाय

ए.टी.एम. सेवा, मुद्रांक सेवा, परकीय चलन विषयक सेवा, RTGS / NEFT, ई–पेमेंटव्दारे विविध कर भरण्याची सुविधा व कोअर बँकिंग प्रणालीचे सहाय्याने व्यक्तिगत सेवा.

# ठाणे भारत सहकारी बँक लि.

शेड्यूल्ड बँक

सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे - ४००६०२. फोन नं. २५४४ ७८१६ / २५४० ८०७६
मुख्य शाखा : शततारका, बाजी प्रभू देशपांडे मार्ग, ठाणे. फोन नं. २५४२ ९४३२ / ३३

*अटी लागू.

ठाणे मुख्यशाखा / ठाणे पूर्व / पोखरण / चंदनवाडी / चेंदणी कोळीवाडा / श्रीनगर / शिवाईनगर / ऋतूपार्क / घोडबंदर रोड / लोकमान्य नगर / कल्याण / डोंबिवली / ऐरोली विस्तारित कक्ष / मुलुंड / घाटकोपर – पूर्व / घाटकोपर –प. / भांडूप / दादर / कळवा / पनवेल / बदलापूर / पुणे

# अमेरिकेतील स्मरणीय व्यक्ती आणि स्मारके

**डॉ. दाऊद दळवी**

> **थॉमस पेनच्या निधनानंतर त्याच्या विचारांचा जसा प्रसार झाला, तशी त्याची योग्यता व मोठेपणा लोकांना कळू लागला. गुलामगिरीचा विरोधक आणि अमेरिकन तसेच फ्रेंच राज्यक्रांत्यांचा उद्गाता म्हणून त्याला मान्यता मिळाली. न्यू यॉर्क शहराजवळच न्यू राशल येथे थॉमस पेन मेमोरियल म्युझियम उभारण्यात आले आहे.**

**अमेरिकन** जगताची संस्कृती ही जास्त तर पाचशे वर्षांची आहे. कोलंबस भारताच्या शोधात आला आणि त्याला अमेरिका गवसली. सर्व जगाचा इतिहासच बदलला गेला. युरोपमधल्या स्पॅनिश, पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज यांनी अमेरिकेच्या महाखंडाचे लचके तोडण्यास सुरुवात केली. भारतासारख्या प्राचीन संस्कृती असलेल्या इंका, ॲझटेक, माया इत्यादी रक्तवर्णीय अमेरिकनांच्या संस्कृती नष्ट करून अमेरिकेत छोट्या युरोपची निर्मिती झाली. बिचारे रक्तवर्णीय (रेड इंडियन्स) स्वतःच्याच देशात आदिवासी बनून छोट्या खेड्यात किंवा वसाहतीत गतवैभवाची उजळणी करत बसलेले आहेत. मूळ अमेरिकनांवर स्पॅनिश व पोर्तुगीजांनी अनन्वित अत्याचार करून त्यांची संस्कृती व सभ्यता हिसकावून घेतली. सध्याच्या अत्याधुनिक अमेरिकेची निर्मिती ही अवघ्या पाचशे वर्षांची आहे. पण आश्चर्य म्हणजे हा अमेरिकन इंग्लिश, स्पॅनिश, डच किंवा फ्रेंच, जर्मन वंशाचा असो, त्याला त्या पाचशे वर्षांचा केवढा अभिमान वाटतो. ही पाचशे वर्षे त्याला अनेक युगांसारखी वाटतात.

सर्वसाधारण अमेरिकन माणसाला तेथील पुरातन वास्तू, इमारती, कार्यालये याबद्दल कितीतरी आपुलकी असते. इथल्या बहुतेक शहरात त्यांचे स्वतःचे वस्तुसंग्रहालय असते व त्यात युरोपीयन अमेरिकेत आल्यानंतर साठवलेल्या वस्तू स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकत असतात. अमेरिकेतील स्वातंत्र्ययुद्ध व यादवी युद्ध या काळातील शस्त्रास्त्रे, बंदुका, तोफा, तलवारी, गणवेश, भांडी, दुर्मिळ पुस्तके, नाणी यांचा संग्रह कौशल्यपूर्ण रीतीने मांडलेला असतो. शाळा-महाविद्यालयांतून या पुरातन वास्तूंचे जतन-संवर्धन करण्याचे शिक्षण पद्धतशीरपणे दिले जाते. अमेरिकन लोक त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील प्रेरणास्थळे, सैन्याची व्यूहरचना तन्मयतेने दाखवतात. अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील जॉर्ज वॉशिंग्टन, जेफरसन यांपासून कृष्णवर्णियांना मानाचे स्थान देणाऱ्या अब्राहम लिंकन यांच्यापर्यंत प्रत्येकाचे जीवन स्फूर्तिप्रद व प्रेरणा देणारे आहे. पण अमेरिकेतील नागरिकांचा सर्वात मोठा गुण म्हणजे व्यक्तिस्तोमाचा अव्हेर होय. वॉशिंग्टन, लिंकन, रुझवेल्ट, आयसेन हॉवर इत्यादी दिग्गज राष्ट्राध्यक्ष त्यांच्याकडे झाले, पण कुणाचेही अवाजवी व फाजील व्यक्तिमहात्म्य कुठेही दिसणार नाही. त्यांचा योग्य तो सन्मान राखून प्रत्येक अमेरिकन व्यक्तीला त्यांच्याबद्दल रास्त अभिमान व गौरव वाटतो. या सर्व थोर व्यक्तींची स्मारके वॉशिंग्टन व इतर ठिकाणी आहेत. जॉर्ज वॉशिंग्टनचे घर माउंट वॅर्नान या त्याच्या गावात राष्ट्रीय स्मारक म्हणून संवर्धित केलेले आहे. इतर स्मारकांच्या तुलनेत मला इथेच लोकांची मोठी वर्दळ दिसून आली. स्मारक पाहण्यास लांबच लांब रांगा लावल्या होत्या. पण प्रत्येकजण धीरगंभीरपणे शांततेने पुढे सरकत होता. वॉशिंग्टनच्या घरातील व्यवस्था अठराव्या शतकाच्या उमरावाप्रमाणे होती. त्याची बैठकीची खोली, शयनकक्ष,

भोजनालय इत्यादी त्याच्या काळात होते तसेच संवर्धित करण्यात आले आहे. या गोष्टी आपण अगदी सहजपणे पाहू शकतो व अमेरिकेच्या प्राचीन वारशाचा आनंद लुटू शकतो.

वॉशिंग्टनच्या घरासारखे दुसरे स्मारक व वस्तुसंग्रहालय मी शिकागोजवळच्या मिलवॉकी शहरात पाहिले. अमेरिकन वायुदलाचा जनक व मिलवॉकीचा सुपुत्र बिली मिशेल याचे नाव मिलवॉकी आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेले आहे. विमानतळाच्या एका मजल्यावर हे आगळेवेगळे वस्तुसंग्रहालय आहे. मिशेल १८ वर्षांचा असताना सैन्यात दाखल झाला. त्यावेळेस नुकताच विमानांचा शोध लागला होता, तोफखान्याचा भाग म्हणून विमानांचे महत्त्व होते. मिशेलने सैन्यात लेफ्टनंट कर्नलपासून ब्रिगेडियर जनरलपर्यंत सर्व उच्च पदांवर काम केले. १९१७ साली अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. मिशेलला युद्धाच्या कामगिरीवर फ्रान्सला पाठवण्यात आले. विमानदलाचे महत्त्व ओळखून त्याने अमेरिकेच्या विमानदलाचा स्वतंत्र विभाग केला. जर्मन व जपानी युद्धनौका वायुसेनेच्या मदतीने बुडवण्यात अमेरिकेला प्रचंड यश मिळाले. मिशेलचे वर्चस्व व लोकप्रियता वाढली. त्याला अनेक प्रतिस्पर्धी होते. त्यामुळे त्याला मोठ्या पदावरून पायउतार करण्याचे बरेच प्रसंग त्याच्यावर आले. तरीही न डगमगता अमेरिकेच्या वायुसेनेची त्याने भक्कम रचना केली. त्याच्या मृत्युनंतर (१९३६) त्याच्या कामाची महती लोकांना कळली. १९४२ मध्ये दुसरे महायुद्ध चालू असताना अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी मिशेलला मरणोत्तर अमेरिकेतील मेजर जनरल हे सर्वोच्च पद दिले. मिलवॉकीच्या वस्तुसंग्रहालयात मिशेलची पदके, सन्मान व वस्तू भविष्यकाळात प्रेरणाप्रद म्हणून जतन करून ठेवण्यात आल्या आहेत.



**बिली मिशेल**

अमेरिकेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, जो काही त्यांचा काही शतकांचा वारसा आहे त्याचे काटेकोर जतन होय. एकदा न्यू यॉर्कहून जाताना रस्त्यात मी थॉमस पेनच्या नावाचा फलक पाहिला. महाविद्यालयात असताना त्याचे स्वातंत्र्यावरचे लेख मी तन्मयतेने वाचले होते. त्याच्या विचारांनी मी भारावून गेलो होतो.

त्याच्या जीवनाबद्दल संक्षिप्त माहिती वाचकास असावी. थॉमस पेन (१७३६-१८०९) याचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. काही दिवस तिथल्या अबकारी खात्यात त्याने नोकरी केली. स्वभावाने अत्यंत सडेतोड व विक्षिप्त असल्यामुळे तिथल्या लोकांशी त्याचे पटले नाही. खोटी प्रमाणपत्रे करून देण्यास त्याने नकार दिल्यामुळे नोकरीतून त्याला काढण्यात आले. अमेरिकन राज्यक्रांतीतील नेता बेंजामिन फ्रँकलिन व थॉमस पेनची भेट १७७४ मध्ये लंडनला झाली. फ्रँकलिनच्या शिफारसीमुळे तो अमेरिकेला गेला. तेथील राजकीय परिस्थिती विशेषत: आफ्रिकन कृष्णवर्णियांचे भयानक शोषण त्याने पाहिले व गुलामगिरी ही अतिशय अमानुष व अन्यायकारक प्रथा आहे म्हणून त्यावर पहिलेच पुस्तक लिहिले. त्यामुळे गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांमध्ये तो अतिशय अप्रिय झाला. त्यानंतर पेनसिलव्हानिया मासिकाचा तो सहसंपादक झाला. त्याच्या विचारांना मजबूत व्यासपीठ मिळाले. त्याच वेळेस अमेरिकेतील वसाहती व त्यांचे इंग्लिश राज्यकर्ते यांत लेकसिंगटन व कॉनकॉर्ड येथे झालेल्या युद्धात त्याने ब्रिटिशांविरुद्ध राजकीय तोफ डागली. अमेरिकन वसाहतींना वेस्ट मिन्स्टर येथे इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व मिळत नसेल तर त्यांनी ब्रिटिश सरकारला कर देणे बंद करावे असे क्रांतिकारी विचार व्यक्त केले.

अमेरिकन वसाहतवाल्यांना इंग्लंडपासून नेमके काय हवेय ते कळत नव्हते. त्याचे उत्कृष्ट पृथ:करण थॉमस पेनने केले. Common Sense या त्याच्या पहिल्या राजकीय पुस्तिकेत त्याने स्वतंत्र अमेरिकन राज्याची कल्पना मांडली. हा दिवस १० जानेवारी १७७६ होता. आपल्या या पुस्तकात त्याने अनेक राजकीय विचार मांडले. त्यात तो म्हणतो,



थॉमस पेन मेमोरियल



थॉमस पेन

प्रशासन ही आवश्यक आपत्ती आहे. (Government is necessary evil) प्रशासनात लोकांना प्रतिनिधित्व मिळाले तरच ते उपयुक्त ठरते. या त्याच्या विचारांचा अमेरिकन क्रांतीच्या नेत्यांवर प्रचंड प्रभाव पडला व जून ४, १७७६ रोजी अमेरिकेने स्वातंत्र्याचा जाहीरनामा (Declaration of independance) प्रसिद्ध केला. अमेरिका हे जगातील पहिले प्रातिनिधिक लोकसत्ताक राज्य निर्माण झाले.

थॉमस पेनने १७७१ ते ९२ या काळात फ्रेंच राज्यक्रांतीत सक्रिय भाग घेतला व तो फ्रान्सला आला. या काळात युरोपमध्ये राजेशाहीविरुद्ध लोकांचे राज्य हे वैचारिक द्वंद्व माजले होते. इंग्लंडच्या राजघराण्याचा व फ्रान्ससहित युरोपमधील इतर राजघराण्यांचा पुरस्कार इंग्लंडचा प्रसिद्ध विचारवंत एडमंड बर्क याने केला. त्याला अतिशय समर्पक व सडेतोड उत्तर थॉमस पेनने त्याच्या 'Rights of Man' या पुस्तकात दिले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीत त्याने क्रांतिकारांना मदत केली, पण फ्रान्सचा राजा सोळावा लुई याला मृत्युदंड देऊ नये असे म्हटल्याने तो फ्रान्समध्ये अप्रिय झाला. त्यानंतर त्याच्या या विचारामुळे काही काळ फ्रान्समध्ये त्याला अटकेत ठेवण्यात आले होते. या काळात त्याने 'The Age of Reason' हे प्रसिद्ध पुस्तक लिहिले.

ख्रिस्ती धर्म व ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्याचे विचार लोकांना न पटणारे होते. 'जगातील सर्व धर्म, मग ते ज्यू, ख्रिस्ती किंवा तुर्की (मुस्लीम) असोत, त्यांच्या संस्था माणसाच्या कल्पकतेतून निघालेल्या दिसतात. मनुष्यजातीला अज्ञाताचे भय दाखवून, घाबरवण्यासाठी आणि सर्व सत्ता व कायदे स्वधर्माच्या उपभोगासाठी करण्यात आले' असे तो म्हणतो, ('All national institutions of Churches

whether Jewish Church, Christian Church or Turkish apear to me no other than human inventions. Set up to Terrify and enslave mankind and monopolize mankind, power and profit.')


थॉमस पेन हा अत्यंत कुशाग्र बुद्धीचा पण स्वभावाने हेकेखोर व विक्षिप्त होता. त्याने अनेकांना दुखावले. त्यात अमेरिकेचा प्रणेता जॉर्ज वॉशिंग्टन हा सुद्धा होता. हळूहळू त्याचे सर्व मित्र त्याला सोडून गेले. शेवटपर्यंत त्याचे कोणाशीही पटले नाही. ख्रिस्ती धर्माबद्दलच्या विचारामुळे तो सर्वसाधारण समाजाची सहानुभूती गमावून बसला. ८ जून १८०९ रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या प्रेतयात्रेस अवघे सहा लोक उपस्थित होते. मात्र त्याच्या निधनानंतर त्याच्या विचारांचा जसा प्रसार झाला, तशी त्याची योग्यता व मोठेपणा लोकांना कळू लागला. मृत्यूनंतर थोड्याच अवधीत त्याला अमाप प्रसिद्धी मिळाली. गुलामगिरीचा विरोधक व अमेरिकन तसेच फ्रेंच राज्यक्रांत्यांचा उद्‌गाता म्हणून त्याला मान्यता मिळाली. न्यू यॉर्क शहराजवळच न्यू राशल येथे शासनाने ३२० एकर जमीन दिली. या ठिकाणी थॉमस पेन मेमोरियल म्युझियम उभारण्यात आले आहे.

...थॉमस पेनच्या नावाचा फलक पाहिल्यानंतर त्याच्या सुंदर एकमजली घराकडे सहजतेने पाय वळले. दुर्दैवाने तो दिवस रविवारचा असल्यामुळे घर बंद होते. सर्वत्र शुकशुकाट होता. घरासमोरील बागेत काही काळ रेंगाळत होतो. तेवढ्यात आतून कुणीतरी आम्हास पाहिले. दरवाजा उघडला. समोर आलेल्या व्यक्तीने रविवार असल्यामुळे स्मारक बंद असल्याचे सांगितले. पण मी भारतातून हे स्मारक पाहण्यास आलो आहे हे सांगितल्यावर त्याने दरवाजा उघडला. इथलेतिथले संवाद झाले. पण त्या व्यक्तीने थॉमस पेन याबद्दलची माझी माहिती ऐकल्यावर रविवार असूनही किमान दीड-दोन तास थॉमस पेनचे संपूर्ण घर दाखवले. त्याची अभ्यासिका दाखवली, या अभ्यासिकेत टेबलासमोर खुर्चीवर बसलेल्या थॉमस पेनचा हुबेहूब मेणाचा पुतळा आहे. त्याच्या बाजूला उभे राहून आम्ही अनेक छायाचित्रे काढली. आधुनिक जगातील राजकीय स्वातंत्र्याच्या विचारांना प्रेरणा देणारा थॉमस पेन याचे निवासस्थान पाहिल्यावर मन भरून आले. आश्चर्य म्हणजे ही एकमजली इमारत रस्त्याच्या मधोमध होती. रस्ता अडला जाऊ नये म्हणून सभोवतालच्या बागेसहित तशीच्या तशी उचलण्यात आली व आता आहे त्या ठिकाणी तिची पुनर्स्थापना करण्यात आली. हा सर्व खटाटोप, केवळ अशक्य कोटीतला वाटत होता. पण ते सत्य होते. अमेरिकन लोकांची प्राचीन वारसा टिकवण्याची व तिचे संवर्धन करण्याची जिद्द वाखाणण्यासारखी होती.

अमेरिकेच्या तुलनेत भारताला किमान अडीच सहस्रकांचा प्राचीन इतिहास आहे. देशाच्या सर्वच भागांत प्राचीन अवशेष, खंडहर गढ्या, कोटकिल्ले, प्रासाद, देऊळे, राऊळे, मशिदी, दर्गे, मकबरे ही विखुरलेली आहेत. यातील प्रत्येक वास्तू गतवैभवाची आठवण काढत अश्रू ढाळत आहे. इतका प्रचंड व वैभवशाली वारसा सांभाळण्याची ताकद आपल्यात नाही हे दुर्दैव वाटते, पण हा वारसा सांभाळण्याऐवजी गडकिल्ल्यांवर, लेण्यांच्या पृष्ठभागावर आपले नाव रंगवण्याची आपली आवड मात्र विस्मित करणारी आहे. आता या सर्व गोष्टींना जबाबदारीच्या भावनेने पायबंद घालण्याची नितांत आवश्यकता आहे. तरच आपण भारत माझा महान या उक्तीला कुठेतरी न्याय देऊ शकू.

**- डॉ. दाऊद दळवी**
१३/१४ भरत व्हिला, धोबी आळी, टेंभीनाका,
ठाणे ४०० ६०१, दूरध्वनी (०२२) २५३४५७०६
dawooddalvi123@gmail.com

॥ग्रंथाली॥




**रत्नागिरी ते आइनस्टाइन**

**सर्वोत्तम ठाकूर**

या पुस्तकातील लेख सर्वसामान्य माणसांच्या मनातील वेगवेगळ्या विचारांना प्रकट करणारे आहेत. ज्यांना विचार महत्त्वाचे वाटतात, पण ते नीटसे अभिव्यक्त करता येत नाहीत, त्यांची प्रातिनिधिक कैफियत असे हे लेख आहेत. त्यांतील विचार, उदाहरणं ही वाचकाला अंतर्मुख व्हायला लावणारी आहेत, काही वेळा धक्का देणारी आहेत.

**मूळ किंमत २५० रुपये ● सवलतीत १५० रुपये**

# ‘ना.घ.’चं मेहेकर आणि मोझार्टचं साल्झबर्ग...

**प्रवीण बर्दापूरकर**



ना.घ. देशपांडे यांचे मेहेकरमधील घर

> ...मोझार्टच्या गावाला भेट देऊन आल्यापासून मेहेकर ओलांडताना ना.घ. देशपांडे यांची कविता मनात पिंगा घालू लागते, कंचनीच्या महालाची दंतकथा आठवते आणि विलक्षण ओशाळल्यासारखं होतं... कारमधूनही डोळे वर करून या गावाकडे मी बघू शकत नाही.

**मराठी** भावगीत रानावनात पोचवणाऱ्या ‘शीळ’कर्त्या ना.घ. देशपांडे यांच्या मेहेकर गावावरून आजवर असंख्य वेळा गेलो. काही प्रसंगी गावातही गेलो. बालाजी मंदिरामागे असलेल्या ना.घ. देशपांडे यांच्या घरीही भक्तिभावानं जाऊन आलो. सुरुवातीच्या काळात एसटी महामंडळाच्या बसनं आणि नंतर कारनं मेहेकर अनेकदा ओलांडलं. साडेतीन-चार दशकांपूर्वी औरंगाबादहून सकाळी सहा पन्नासला निघालेली नागपूर बस दुपारी अडीचच्या सुमारास मेहेकरबाहेर निघत असे तेव्हा ‘ना.घ. आता काय करत असतील’, असा प्रश्न पडत असे. ना.घ. देशपांडे या कवीनं शीळ घातल्यावर प्रसिद्धीच्या झोतात आलेलं मेहेकर नावाचं हे गाव लहान रस्त्यावर, टुमदार आणि शांत होतं. निवडणुकीच्या वृत्तसंकलनाच्या निमित्तानं फिरत असताना अचानक तातडीची गरज म्हणून

८०च्या दशकात एकदा एका रात्री मेहेकरच्या विश्रामगृहात मुक्काम करावा लागला. तर लक्षात आलं, क्वचित जाणा-येणाऱ्या बसेस आणि ट्रक्सच्या आवाजानं वातावरणावर चरे उमटताहेत आणि या गावाची झोपमोड होतेय, इतकं शांत होतं मेहेकर त्या काळात! आता हे गाव हाय-वेवर आलं आहे. नागरीकरणाच्या वेगाचे वारे या गावावरही वाहू लागले आहेत. त्यामुळे येणाऱ्या सोयींनी म्हणजे अवैध प्रवासी वाहतूक बेशिस्तपणे करणाऱ्या काळ्या-पिवळ्या गाड्या, ट्रक्स आणि वेगवेगळी अजस्त्र वाहनं, कार यांची झालेली गर्दी, मद्याचे बार, 'शीला की जवानी', 'लुंगी' किंचाळणारे आणि अन्य अलयबद्ध गाणे नावाचे आवाज.. असे व्रण या गावावरही जागोजागी आढळू लागले आहेत. अखंड वाढतच असलेल्या आणि २४ तास चालणाऱ्या वाहतुकीनं गावात एकेकाळी नांदणारा शांतपणा पार हरवला आहे. विविध वाहनं, हॉटेल्स, पानटपऱ्या वाढल्या, तिथली गिऱ्हाईकांची गर्दी आणि कलकलाट वाढला आहे. विविध प्रकारची वाहनं, माणसं आणि अन्य अनेक आवाज यांचं मिश्रण होऊन एक अपरिचित बेसूर जसा अन्य गावावर पसरलेला आहे; अगदी तसंच मेहेकर गावाचं झालंय. वाढत्या नागरीकरणानं मेहेकरचा टुमदारपण उद्ध्वस्त केलंय. गावातल्या प्रत्येक वास्तू, हॉटेलातील खाद्यपदार्थ आणि प्रत्येक दुकानातील प्रत्येक वस्तू.. एवढंच नाही तर वर्दळीत वावरणाऱ्या प्रत्येक माणसावर धुळीची पुटं चढली आहेत.



ना.घ. यांच्यासह डावी-उजवीकडे नीळकृष्ण देशपांडे, श्याम देशपांडे

मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकानं ना.घ. यांच्या कवितेसोबतच त्यांच्या कंचनीच्या महालावर प्रेम केलं. ना.घ. देशपांडे यांची कंचनीच्या महालावरची विरुपिका त्या काळात कवीमनाच्या प्रत्येकाला त्याचीही नितांत आणि आर्त गरज वाटली. कंचनी ही एक वारांगना. मेहेकरच्या त्या माळरानावर एक महाल बांधून त्याच्या वरच्या गवाक्षातून लोणारच्या कमळाईदेवीच्या देवळातला दिवा पाहण्याची तिची कामना होती. तो दिवा पाहिला आणि तिची शिळा झाली, अशी ती दंतकथा. मराठी काव्यप्रांतात कंचनीला ना.घ. देशपांडे यांनी 'शीळ'इतकंच अमर केलं. आता तो महाल तर सोडाच पण बुरुजही राहिलेला नाही. आमच्या असांस्कृतिक कोडगेपणा आणि बेफिकीर वृत्तीनं कंचनीच्या दंतकथेची अक्षरशः माती केली. ना.घ. यांचं स्मारक व्हावं आणि कंचनीच्या महालाचं जतन व्हावं ही कविवर्य ना.धों. महानोरांची मनोमन इच्छा होती. सरकारदरबारी इतकी सेवा बजावूनही महानोर यांना मेहेकरात ना.घ. देशपांडे यांचं ना स्मारक उभारता आलं ना कंचनीचा महाल टिकवून ठेवता आला. विदर्भ साहित्य संघानं त्यांना त्यांच्या गावात जाऊन जीवनव्रती हा सन्मान दिला. मराठी साहित्यप्रांती जितक्या अलिप्तपणे आयुष्यभर ना.घ. वावरले तितक्याच अलिप्तपणे तो सन्मान त्यांनी स्वीकारला. मी 'लोकसत्ता'च्या विदर्भ आवृत्तीचा संपदक असताना एकदा अकोल्याचा आमचा वार्ताहर असणाऱ्या श्रीमंत माने (आता तो 'सकाळ'च्या नाशिक आवृत्तीचा संपादक आहे.) कंचनीच्या महालाचा विषय दुखऱ्या हळवेपणानं उकरून काढला आणि त्यावर लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. ना.घ. देशपांडे यांच्या कवितेचं वय आणि प्रौढता लक्षात



भग्नावस्थेत असलेला कंचनीचा महाल

घेतली तर श्रीमंत मानेचं वय खूपच तरुण होतं तेव्हा. पण वय आणि काव्यलुब्धांच्या अशा अनेक पिढ्यांशी नातं जोडणाऱ्या ना.घ. देशपांडे यांच्या कवितेनं श्रीमंत माने यांच्यावरही मोहिनी घातलेली होती. त्यातच नारायण कुळकर्णी-कवठेकर हे या प्रांतातले त्यांचे गुरू. गुरूचं डोहखोल काव्यमग्न झपाटलेपण शिष्यातही आलेलं. श्रीमंत माने यानं ना.घ. देशपांडे स्मारक आणि कंचनीच्या महालाचा इश्यू बराच लावून ठेवला. एकदा तर अतिशय कळवळून एक मालिका 'लोकसत्ता'त लिहिली. त्या शिळेचा फोटोही प्रकाशित केला होता.. हा मजकूर प्रकाशित झाल्यावर 'आपण जतन करू हे सारं', असं आश्वासन तत्कालीन सांस्कृतिक मंत्री अनिल देशमुख यांनी दिलं होतं. ते पण विसरून जाण्यासाठीच! नागपूरपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सावनेर इथलं राम गणेश गडकरी यांचा स्मारक आणि घर, सांस्कृतिक मंत्री या नात्यानं जतन करू न शकलेले अनिल देशमुख नागपूरपासून साडेतीनशे किलोमीटर अंतरावर असलेल्या मेहेकर गावात जाण्याचीही तसदी घेणार नाहीत हे स्पष्ट होतं आणि घडलंही तस्संच.

ज्या कंचनीच्या महालाची मोहिनी मराठी मनाला पडली त्या महालाची नीट देखभाल तर झाली नाहीच पण, मध्यंतरी शेजारी भरणाऱ्या यात्रेच्या वेळी त्या कथित महाल (म्हणजे उरलेले अवशेष) आणि शिळेवर काही पोस्टर्स लावली गेली आणि वातावरण बिघडलं.. वाद झाला. पोलीस आले. वगैरे वगैरे. एकदा बोलताना मेहेकरच्या अमर जाधव या युवकानं सांगितलं, अचानक उदासी दाटून आली. मन खूपच विषण्ण झालं.


मोझार्ट मेमोरियल

माझी ऑस्ट्रियातील साल्झबर्ग सेमिनारच्या आंतरराष्ट्रीय अभ्यासवृत्तीसाठी निवड झाली तेव्हा सर्वात प्रथम आठवला तो द ग्रेट मोझार्ट! व्हिएन्नामार्गे साल्झबर्गला उतरलो तेव्हा 'फ्लेक्स'मय भारतीय सवयीनं वाटल, वाटलं विमानतळावर नक्की कुठेतरी फलक असेल, 'हेच ते मोझार्टचं गाव' किंवा 'मोझार्टच्या गावात तुमचं स्वागत आहे', आणि स्वागतोत्सुकांची नावं. पण तसं काही नव्हतं कुठेच. सलग आठ दिवस अभ्यासवृत्तीचं काम झाल्यावर मिळालेल्या सुटीत आम्ही गावात धाव घेतली. पाकिस्तानमधून आलेले, पाकिस्तान न्यूजचा ओवेस आणि कराचीची अंदलीब यांनाही मोझार्टच्या घराला भेट देण्याची इच्छा होती. बरीच पायपीट करून गावाच्या मध्यवर्ती भागात एका चौकात पोचलो आणि आमच्या स्वागताला समोर आला तो मोझार्टचा वाडा. वाडा म्हणणं हे अगदी आपलं मराठमोळं (खरं तर, मध्यमवर्गीय-पांढरपेशी-सदाशिवपेठी इत्यादी, इत्यादी) झालं. खरं तर तो आहे नजरेच्या एका टप्प्याच्या आवाक्यात न येणारा भव्य प्रासाद. त्या प्रासादाच्या बाह्य भिंतीपासून ते आत ठेवलेल्या प्रत्येक वस्तूपर्यंत मनावर एक दडपण आणणारा नीटनेटकेपणा आहे. सगळं काही इतकं जागच्या जागी आणि टापटीप आहे, की जणू मोझार्ट कुठंतरी बाहेर गेला आहे आणि काही मिनिटांतच परत येऊन वाद्यवृंद जुळवणार आहे!

आम्ही ती वास्तू पाहून आधी मनोमन नतमस्तक झालो आणि तिचं ज्या पद्धतीनं जतन केलं आहे ते बघून अचंबितच झालो. (नंतर ऑस्ट्रिया, जर्मनी आणि मध्य युरोपच्या अन्य भागांत फिरताना हा अनुभव आपल्याला वारंवार येणार आहे याची कल्पना नव्हती आम्हाला. जर्मनीत ज्यूंच्या झालेल्या अनन्वित छळाची वर्णनं वाचली होती, काही चित्रपट पाहिले होते त्या छळांवर आधारित. प्रत्यक्षात त्या छावण्या बघताना अंगावर काटा आला आणि क्रौर्याची परिसीमा म्हणजे काय हे पटलं. जे छळाच्या स्मृतींचं जतन करू शकतात ते मोझार्टसारख्या संगीतकारांच्या स्मृती रत्न-माणकं जपाव्यात तशा सांभाळणारच याची खात्री पटली.)



खासदार, अमित डावे लिखित आणि
पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांची प्रस्तावना लाभलेल्या

## छत्रपती शिवाजी आणि सुराज्य

किंमत रु. ५००/-

पुस्तकाला संपूर्ण महाराष्ट्रातून भरघोस प्रतिसाद

सुराज्य आणि मजबूत प्रशासन यांच्या शोधात आज शासनव्यवस्था भरकटत चालली आहे. हा शोध सफल होण्यासाठी शिवाजी महाराजांच्या शासनाकडे आधारभूत मानचित्र म्हणून पाहण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

महाराज कसे विचार करीत, कसा निर्णय घेत, त्यांची राज्यकारभाराची शैली कशी होती? आजच्या शासनकर्त्यांनी ही समजून घेण्याची गरज आहे...

'आम्हाला माहीत नसलेले शिवाजी महाराज
या पुस्तकाने दाखविले', अशा वाचकांच्या प्रतिक्रिया.
त्यामुळे आपणही वाचावे आणि इतरांनाही भेट द्यावे,
असे हे पुस्तक आहे.

***त्वरा करा... मर्यादित प्रति शिल्लक***

## गो-विज्ञान



मूळ किंमत : ३५०
सवलत मूल्य : २५०
सवलत केवळ
३० नोव्हेंबर २०१४पर्यंतच

- आपण कोणत्या गायीचे दूध पितो? देशी की विदेशी? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला माहीत नसते. पण विदेशी म्हणजेच जर्सी गायींचे दूध आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर विकले जाते. या दुधाच्या सेवनामुळेच मधुमेह, हृदयरोग यासारखे गंभीर आजार वाढत आहेत.
- कोणत्याही गावाचा विकास गाईशिवाय होऊ शकत नाही. गाय-बैल, आणि शेती हे ग्रामविकासाचे तीन मुख्य घटक आहेत.
- केवळ गायीच्या सहवासानेही वाईट वृत्ती बदलू शकते, हे सिद्ध करून दाखविले आहे, भोपाळ सेंट्रल जेलचे अधीक्षक पुरुषोत्तम सोमकुंवर यांनी. या जेलमध्ये खुनाच्या आरोपाखाली असलेल्या कैद्यांचे जीवन गोमातेच्या सेवेने बदलते आहे...


या सर्व गोष्टींवर विश्वास बसणार नाही. पण या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. त्या कशा, हे वाचण्यासाठी

***आजच नोंदणी करा आणि पुस्तक मिळवा.***

आपला धनादेश अथवा धनाकर्ष
**'हिंदुस्थान प्रकाशन संस्था पुस्तक विभाग'**
या नावानेच पाठवावा.

**संपर्क** - स्थानिक प्रतिनिधी आणि
सा. विवेक, प्रशासकीय कार्यालय.
दूरध्वनी:(०२२) २७८१०२३५/३६


**॥ग्रंथाली॥**




# गुरुदत्त

संपादन
**सुधीर नांदगांवकर**

मूल्य २२५ रुपये
सवलतीत १३५ रुपये

चित्रपटातील कलावंतांची लोकप्रियता क्षणभंगुर असते. पण कलावंत म्हणून गुरुदत्त यांच्यासंबंधी गेल्या ५० वर्षांत जेवढे लेखन झाले ते भाग्य अन्य कोणत्या सिनेकलावंताला क्वचितच लाभले आहे. ५० वर्षांनंतरही गुरुदत्त यांच्या चित्रपटांची रसिक मनावरील मोहिनी ओसरलेली नाही. सिनेमा माध्यमाचा अभ्यास करणाऱ्यांना आजही गुरुदत्त यांचा सिनेमा खुणावत असतो. गुरुदत्त यांच्या समकालीनांनाच नव्हे, तर नंतरच्या प्रत्येक पिढीला त्यांच्या कलेविषयी वाटणारे कुतूहल अजून संपलेले नाही.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि बदलत्या सामाजिक स्थित्यंतरांचा मागोवा घेणारी भारत गजेंद्रगडकर यांची दोन पुस्तके**



## धाराशिव ते उस्मानाबाद

मूल्य १८० रुपये
सवलतीत ११० रुपये



## बालाघाटची साद

मूल्य १०० रुपये
सवलतीत ८० रुपये


सांस्कृतिक स्मृती जतन करण्याच्या त्यांच्या म्हणजे युरोपीयनांच्या रसिकतेला, समज आणि उमज यांना दाद देण्याशिवाय पर्यायच नव्हता. उण्यापुऱ्या ३५-३६ वर्षांच्या आयुष्यात (जन्म २७ जानेवारी १७५६ आणि मृत्यू ५ डिसेंबर १७९१) मोझार्टनं युरोपीयन संगीत ज्या उंचीवर नेऊन ठेवलं ते सुरेल कर्तृत्व नंतर कोणाला जमलंच नाही. अल्पशा जगण्यात मोझार्टनं अवघं शास्त्रीय संगीत कवेत घेत ४१ सिम्फनी निर्माण केल्या आणि तो अजरामर झाला. आणखी जगता तर मोझार्ट संगीताच्या क्षेत्रात आणखी किती आणि कशी आश्चर्यं निर्माण करता असा प्रश्न तो प्रासाद सोडताना मनात रुंजी घालत होता.

आम्ही बाहेर आलो आणि फूटपाथवर उभं राहून भारावलेल्या नजरेनं त्या वास्तूकडे गारूड झाल्यासारखं बघत काही वेळ उभे राहिलो. रस्त्यावरून जा-ये करणाऱ्यांना त्या प्रासादाकडे अचंबित होऊन पाहणारे पर्यटक नवीन नव्हते. तसे भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टच दिसत होते. आम्हाला वळसा घालून ते जात होते... गारुडाचा अंमल ओसरल्यावर आम्ही पुढे काय करायचं याची आखणी करत असताना वृत्तपत्र वाचत एक मध्यमवर्गीय महिला तिच्या डॉगीला फिरवत आली. आम्हा लोकांना पाहून बहुधा त्या पिल्लू डॉगीचं कुतूहल जागृत झालं असावं. ते आमच्याभोवती रेंगाळलं. शेपटी हलवत आमचा वास घेऊ लागलं, बागडू लागलं आणि बागडता बागडता अचानक ते गोल फिरू लागलं. असं फिरणं हे डॉगीला शी लागल्याचं लक्षण असतं. ती महिला हे जाणून असावी. पटकन हातातलं वृत्तपत्र पर्समध्ये टाकत तिनं पुढे ओढून नेण्याच्या आतच डॉगीनं कार्यभार उरकला होता! राष्ट्रीय महत्त्वाची वास्तू असो, की सार्वजनिक उपयोगाची की सरकारी वास्तू; प्राणी लांब राहिले माणसांनीही कुठंही तंगडी वर केल्याचं पाहण्याची आपल्याला सवय आहे, त्यामुळे आम्हाला त्याचं काहीच वाटलं नाही पण, ती महिला मात्र विलक्षण ओशाळली. 'ओ.नो' म्हणत तिनं 'कॅन एनीबडी होल्ड धिस?' असं विचारत डॉगीला बांधलेली साखळी समोर केली. मी 'श्युअर' म्हणत ती पकडली. एव्हाना, प्रेशर गेल्यानं डॉगोबा मजेत बागडत होते. त्या महिलेनं पर्समधून ३/४ टिश्यू पेपर काढले. डॉगीनं केलेली शी साफ नीट केली, सू पुसून टाकली. नंतर ते टिश्यू पेपर नीट एका कागदात गुंडाळले आणि कचरा कुंडीत नेऊन टाकले... मी थक्क होऊन पाहतच राहिलो. सुसंस्कृतपणा काय असतो आणि देशाचं वैभव नागरिकच कसं जतन करू शकतात हे त्या महिलेनं आम्हाला न बोलता दाखवून दिलं. इतका अभिजात सुसंस्कृतपणा आणि स्वयंशिस्त बघून ओशाळं होण्याची वेळ आमच्यावर आलेली होती; अर्थात हे मनातल्या मनात असल्यानं तिला काही खळणार नव्हतं. हात स्वच्छ पुसून माझ्या हातून डॉगीची साखळी घेत ती म्हणाली, 'सॉरी, ही इज लिटल नॉटी...' आणि जणू काहीच घडलं नाही अशा सहज आविर्भावात ती निघून गेली.

...मोझार्टच्या गावाला भेट देऊन आल्यापासून मेहेकर ओलांडताना मला ना.घ. देशपांडे यांची कविता मनात पिंगा घालू लागते, कंचनीच्या महालाची दंतकथा आठवते आणि विलक्षण ओशाळल्यासारखं होतं... कारमधूनही डोळे वर करून या गावाकडे मी बघू शकत नाही.

**– प्रवीण बर्दापूरकर**
एफ १२ , चाणक्यपुरी , फेज १,
शहानुरमिया दर्गा रोड,
औरंगाबाद ४३१००५
भ्रमणध्वनी : ९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com

**॥ग्रंथाली॥**



'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेली

**मराठीतील साहित्यलेणी**

**दीपक घारे**

ग्रंथविषयक तपशीलांची भर घालून अद्ययावत केलेली नवी आवृत्ती.

प्रत्येक ग्रंथप्रेमीच्या संग्रही असायलाच हवी असे संदर्भ पुस्तक...

**मूळ किंमत १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये**

# काश्मिर

## एक काळवंडलेला कौस्तुभ

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**हा भूप्रदेश खरोखरीच निसर्गसंपन्न आहे, पण मानवानं केलेल्या आक्रमणामुळे व पर्यावरणाचं योग्य जतन न केल्यामुळे त्याला नंदनवन किंवा देवाचे अश्रू अशा कविकल्पनांनी भूषवणं दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे कठीण होत आहे...**



एक पदरी नॅशनल हायवे १. तो सैन्य, ट्रॅक्स, वाहनं व मेंढ्या एकाच वेळी वापरतात.

**आमच्या** विश्वसंचारी जीवनात आम्ही अनेक देशांत गेलो. बराचसा भारताचा भाग देखील तुडवला. दर वेळी मायदेशाची वारी केली, की मातृभूमीचा कुठलाना कुठला तुकडा बघून अनुभवसंपन्न झाल्याशिवाय आम्ही देश सोडत नाही. भारताचे पाय (कन्याकुमारी, उटी वगैरे) अवलोकन केल्यावर त्याच्या शिरासमोर नतमस्तक होणं आलंच. म्हणून यावेळी जून २०१४ मध्ये एका लग्नासाठी वारी केल्यावर आम्ही काश्मिरला पदधूळ झाडण्याचं ठरवलं. पण या अनुभवातून निरपेक्ष आनंद मिळाला असं म्हणता येणार नाही. जीवनात जसं सुख आणि दु:ख, ऊन आणि सावली किंवा प्रकाश व अंधार हातात हात घालून फुगडी खेळतात तसंच काश्मिरला भेट देताना वाटलं. एकेकाळचं अप्रतिम सौंदर्य मानवानं पायदळी तुडवलं. त्यामुळे मन म्लान झालं.

योगायोग असा, की मुहूर्त काढूनही काश्मिरच्या भेटीला

इतका चांगला दिवस सापडला नसता. जून ९, २०१४ रोजी दिल्लीतल्या तापमानानं उच्चांक गाठला. एवढा की राजधानीत वीजपुरवठा कमी पडून मंत्र्यांनासुद्धा कपाळावरच्या घामाच्या धारा पुसणं भाग पडलं. त्यामुळे मला विकृत आनंद झाला. भारनियमनाची चव प्रथमच राज्यकर्त्यांना अनुभवावी लागली. त्यामुळे उर्वरित देशाला दरवर्षी उन्हाळा आला की कुठल्या यातना सोसाव्या लागतात याची सरकारला प्रत्ययकारी कल्पना आली असावी. या भट्टीतून आपली मुंबईदेखील सुटली नाही. अशा वेळी थंड हवेच्या ठिकाणी प्रयाण करणं म्हणजे तहानलेल्याला वाळ्याचं थंड पाणी देण्यासारखं नव्हत का?

मुंबईहून अडीच तासांच्या उड्डाणानंतर श्रीनगर दृष्टिपथात आलं. आजुबाजूला पर्वतांच्या रांगा बघून आपण निसर्गाशी सामिप्य साधणार म्हणून आनंद झाला. पण निरखून बघितल्यावर तो निसर्ग प्रदूषणजन्य धुक्यात गुंडाळला आहे असं आढळून आलं. तसंच खाली ठिकठिकाणी मानवानं लहान लहान खेडी उभारलेली दिसली. त्यामुळे होणारं प्रदूषण मापता येत नव्हतं.

विमानतळाबाहेर पडताच 'पृथ्वीवरच्या नंदनवनात तुमचं स्वागत असो' अशी इंग्रजीत पाटी दिसली. पण ती धुळीनं माखली होती. पंचम जॉर्ज जयपूरला आला तेव्हा रहिवासी एवढे खूश झाले की त्यांनी सर्व शहर त्याला आवडणाऱ्या गुलाबी रंगानं रंगवलं होतं. आम्ही भारताला भेट देतो तेव्हा सर्व देश धूळ उडवून आमचं स्वागत करतो. प्रत्येकाला आपापल्या प्रतिष्ठेनुसार आदरातिथ्य मिळतं म्हणा! म्हणून त्याविषयी तक्रार करण्यात अर्थ नाही. पण माझ्या मनात नंदनवनाविषयी जी प्रतिमा होती तिच्यात धुळीला स्थान नव्हतं. त्यानंतर अर्धा तास श्रीनगरमधून प्रवास करताना, या शहराला आलेल्या बकालीला तर मुळीच नव्हतं. माणसाच्या सौंदर्यदृष्टीला भोक पाडणाऱ्या दुकानावरच्या पाट्या, लोकांचे लोंढे व जीवघेणी वाहतूक बघण्यास एवढ्या दूर येण्याची जरुरी नव्हती. याबाबतीत मुंबई, दिल्ली व कोलकाता प्रसिद्ध आहे.

मग लगेच टॅक्सीनं वळण घेतलं आणि एकदम सगळं जगच बदललं. एका मोठ्या फाटकात गाडी थांबली व आवश्यक सुरक्षाचाचणी केल्यावर फुलांनी नटलेल्या व वृक्षांनी सजवलेल्या परिसरात शिरली. हे ललित ग्रँड पॅलेस हॉटेल. महाराजा प्रताप सिंगनी १९१० मध्ये बांधलेलं व आता ललित नावाच्या कंपनीनं त्याचं पंचतारांकित हॉटेलमध्ये रूपांतर केलेलं. एकेकाळी इथे लॉर्ड माउंटबॅटन व खुद्द महात्मा गांधी राहिले होते. या राजेशाही इतिहासामुळे इथले दरही राजाला शोभण्यासारखे. कंपनीच्या मुंबईतल्या हॉटेलपेक्षा अडीचपट. नुसत्या लोणच्याची किंमत २४५ रुपये. मग त्यावर मूल्यवर्धक व इतर कर आकारल्यावर किंमत ३० टक्क्यांनी फुगते. म्हणून हॉटेल ओस पडलं असेल अशी गैरसमजूत कुणी करून घेऊ नये. ते भरगच्च भरलं होतं. ते देखील देशी कुटुंबांनी. खरं तर अशा ठिकाणी परदेशी पाहुणे खूप सापडतात, पण इथल्या युद्धग्रस्त परिस्थितीला व मुस्लीम राजवटीला भिऊन ते इकडे फिरकत नाहीत असं कळलं.

नोंदणी करताना आम्हाला काव्हा (Kahwa) नावाचं गरम पेय मातीच्या पेल्यात देण्यात आलं. हे काश्मिरचं विशेष. त्यात बदामाचा व अनेक कंदमुळांचा अर्क असतो. त्यामुळे त्याची चव अगदीच वेगळी. या कंदमुळांमुळे अंगात नसलेले रोग देखील बरे होत असावेत असा भास झाला. नाहीतर अशा शानदार हॉटेलमध्ये भारी शँपेन देऊन पाहुण्यांचं स्वागत करण्याची प्रथा.

हॉटेलचा परिसर खूप मोठा. तो रंगीत फुलं लावून सुशोभित केलेला. तिथून दाल लेकचं दर्शन झालं. सामान लावल्यावर आम्ही तिकडेच आगेकूच केली. हॉटेल त्यासाठी गाडी देण्यास तयार होतं, पण त्याचं शुल्क बघून व्यायामाचं महात्म्य एकदम आठवलं आणि १० मिनिटं चालल्यावर आम्ही जगप्रसिद्ध दाल लेकवर येऊन पोचलो. शिकारावाल्यांनी एकदम गराडा घातला. इथे प्रवासी त्या बोटीत बसून जलविहार करण्यास येतात हे त्यांना चांगलं ठाऊक. भावाविषयी घासाघीस सुरू झाली. आमच्यातली ही कला लयाला गेली असल्यामुळे त्यानं सांगितलेल्या उच्चतम भावात मी घोषित केलेल्या नीचतम किमतीत मोठं भगदाड आढळलं. ते बुजवल्यावर आम्ही एका शिकाऱ्यात बसलो. म्हणजे आमची सौ. बसली. मी मात्र पहुडलो. इथे पहुडणं निराळं होतं. इथल्या विश्रांतीत स्वर्ग होता. विष्णू नागाच्या वेटोळ्यावर शरीर पसरवतो तसं मी केलं. सरोवरावरून वाहणारा गार वारा अमृतस्पर्श करून गेला आणि सर्व अंग पुलकित झालं.

एक बाजू सोडून सर्व बाजूंनी दाल लेकभोवती पर्वतांच्या उत्तुंग रागा. काठावर एका रेषेत अनेक कारंजी बसवली होती. ती समन्वयीत प्रयत्नांनी आकाशात पाणी फेकत होती. त्यात सौंदर्य होतं.

आमची बोट वल्हवणाऱ्याच नाव मसूद. मध्यम वय केव्हाच उलटून गेलेला, अर्धेअधिक दात गमावून बसलेला

व श्रवणीय आवाजात बोलणारा. त्याला कष्ट करून तो शिकारा वल्हवावा लागला. या प्रक्रियेचं स्वयंचलत्व झालं नव्हतं.

दाल लेकला भारतातलं सर्वात सुंदर सरोवर म्हणून किताब मिळाला. ते काश्मिरच्या शिरपेचातलं एक मोठं मोरपीस समजलं जातं. त्यामुळे इथे पर्यटकांची नेहमी गर्दी असते. हिवाळ्यात हे तळं गोठत असल्यामुळे जलविहाराला खीळ बसते. या सरोवराचं मूळचं क्षेत्रफळ काही चौरस मैल, पण मानवी आक्रमणामुळे ते आता बरचसं संकुचित व प्रदूषित झालं आहे. एका काठावर जलबोटींची (houseboats) रांगच्या रांग लावून ठेवलेली. त्यात पर्यटक राहतात. त्यांचं मलमूत्रविसर्जन या सौंदर्यवान सरोवरात होत असल्यामुळे ते गंगेप्रमाणे प्रदूषित झालं आहे. हा अक्षम्य गुन्हा आहे. निसर्गाचा हा ऱ्हास बघून जीव हळहळतो व

ती तीन रंगांची फुलं (पिवळी, गुलाबी व निळी) सूर्यास्त झाल्यावर मिटणारी. त्या दुपारी आकाश ढगाळलेलं असल्यामुळे ती अबोल झाली होती. मसूदनं आम्हाला तरंगती जमीन दाखवली. त्या तुकड्यावर गवत व फळझाडं वाढलेली. पण त्यावर भार देताच तो पाण्यात बुडत होता. जमीन स्थितीगत असते अशी आपली संकल्पना. पण इथे ती तरंगत होती. जलबोटी, तरंगत शॉपिंग सेंटर व चौपाटीला लाजवणारी गर्दी असलेला नेहरू पार्क. हे सर्व मावनाच्या आधुनिकतेचे आविष्कार इथे स्थानबाह्य वाटतात. त्यांच्या ओझ्याखाली इथलं सौंदर्य पायदळी तुडवलं गेलं तर नवल कसलं?

दुसऱ्या दिवशी सकाळी न्याहारीला गेलो. तिची व्यवस्था अगदी वेगळी. एका चिनार वृक्षाच्या भव्य बुंध्याभोवती अन्नवाटपकेंद्र ठेवलेलं. मग गवतावर खाण्याची



दाल लेकवरील तरंगती जमीन

जीव द्यावासा वाटतो. पण ते देखील इथे शक्य नाही. कारण दाल लेकची सरासरी खोली फक्त ५ फूट! ते तुपाच्या वाटीत उडी मारल्यासरखं होईल.

इथल्या पाण्यात जलवेली झपाट्यानं वाढतात. हे निसर्गाचं आक्रमण मानवी प्रदूषणामुळेच. ते रोखण्यासाठी जागतिक बँकेनं काश्मिर सरकारला हजारो कोटी रुपयांची देणगी दिली. भ्रष्टाचाराचा रोग सर्व भारतभर पसरला असल्यामुळे पैसे संपले. पण त्या वेली अजून जशाच्या तशा आहेत. त्या सारख्या तोडून बाहेर काढाव्या लागतात. असं असूनही दाल लेकचं मूलभूत सौंदर्य नाकारता येत नाही. लिलीच्या फुलांच्या वेलींनी एका भागात गर्दी केलेली.

टेबलं लावलेली. एकीकडे मोठे पर्वत, पुढ्यात दूरवर खुणावणारा दाल लेक आणि भोवताली रंगीबेरंगी फुलांचे ताटवे. तिथे एक मोठं पाण्याचं कारंजं नाचत होतं. अशा वातावरणात अन्नाला वेगळीच चव येते. चहात साखर नसली तरी तो गोड वाटतो. आम्हाला हवाबंद वातावरणात जेवण घेण्याची सवय. पण निसर्गाच्या सान्निध्यात अन्नग्रहण करताना जो आनंद होतो तो काही आगळा असतो यात वाद नाही.

हॉटेलच्या आवारात चिनार नावाचे अनेक वृक्ष होते. त्याची पानं आपल्या हातासारखी. त्याला पाच बोटं असतात. शिशिर ऋतू आला म्हणजे ती लालभडक होतात. त्यावेळी

रक्तवर्णीय पर्णभारानं विभूषित झालेल हे डेरेदार वृक्ष बघण्यासारखे असतात. ते मूळचे इराणमधले. पण मोगलांनी इथे आणलेले. हे वृक्ष शेकडो वर्षांचे होते. पण त्या भीष्माचारी वयाचा कुणी आदर करत नव्हतं. अमेरिकेत एखादी गोष्ट ५९ वर्षांची झाली की ती ऐतिहासिक समजून तिला पुराणवस्तूसंग्रहालयात ठेवण्यात येतं. पण या वृक्षांनी शेकडो पावसाळे बघितले असले तरी त्यांचा वेध कुणी घेत नव्हतं. आपल्याला बुद्धीप्रमाणे काळाचीही पारख नाही असंच म्हणावं लागेल.

या चिनार वृक्षाचं एक वैशिष्ट्य मला खूप आवडलं, ते म्हणजे त्याची दाट सावली. भर दुपारी सूर्य तळपत असताना या वृक्षाखाली बसलो तेव्हा निसर्गाची ही वातानुकूलित योजना मानवी यंत्रणेपेक्षा कितीतरी श्रेष्ठ व पर्यावरणवर्धक वाटली. निसर्गाच्या मंदिरातच खरं सुख मिळतं आणि आधुनिकीकरण आपल्याला त्यापासून दूर नेतं याची प्रचिती आली. अशा शांततेत एक तर माणसातली सर्जकता उफाळून येते नाही तर त्याला निद्रादेवी प्रसन्न होते.


दुसऱ्या दिवशी गाडी करून इथून पूर्वेला ६० कि.मी. असलेल्या गुलमर्गला गेलो. 'गुल' म्हणजे फुलांचे ताटवे. पण आम्हाला रस्त्यात फुलं सोडून इतर सर्व गोष्टी दिसल्या. कचरा, धूळ व वाहतूककोंडी अनुभवली. श्रीनगर सोडून दीड तास झाला तरी रस्त्याच्या बाजूला बांधलेली निकृष्ट दुकानं व त्यांच्यामुळे आलेली बकाली संपली नाही. शेवटच्या अर्ध्या तासात पर्वत सुरू झाले व मानवी सभ्यता (civilisation) मागे पडली असं वाटलं. पण तो केवळ भास होता. कारण पर्वताच्या पायथ्याशी पोचताच मुंबईतल्यासारखी माणसांची, गाड्यांची व इथलं विशेष म्हणजे घोड्यांची गर्दी दिसली. ती बघून मला धडकी बसली. क्षणभर परत जाण्याचा विचार मनात आला. पण तोंडात घास गेल्यावर तो गिळण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

आमच्या ड्रायव्हरचं नाव इजरत हुसेन. मध्यम वयाचा. बराचसा सुसंस्कृत. म्हणजे मुंबईत नव्यानंच उत्तरप्रदेश किंवा बिहारमधून आलेल्या व आपल्यालाच रस्त्यांची माहिति विचारणाऱ्यापेक्षा वेगळा. हुसेनचे वडील व भाऊ त्याच धंद्यात होते. विशेष म्हणजे त्याचा मुलगा काश्मिरमध्ये नोकऱ्यांची वानवा असल्यामुळे प्रथम मुंबईला व तिथून अमेरिकेला गेला होता. तो बायकोला बाळंतपणासाठी घरी घेऊन नुकताच आला होता. आम्ही त्याला भेटावं म्हणून त्यानं आग्रह केला. दुसऱ्या दिवशी तो योग आला. महत्त्वाचं म्हणजे हुसेन अमेरिकेला जाऊन आला होता. असा अमेरिका रिटर्न्ड वाहनचालक मिळायला भाग्यच लागतं. तेव्हापासून तो भारताची अमेरिकेशी तुलना करू लागला व आपल्या रस्त्यांची दयनीय स्थिती, राजकारण्यांचा भ्रष्टाचार व भारतीय माणसाचा शैक्षणिक असंस्कृतपण बघून त्याला देशाची घृणा आली होती. आपला देश सुधारेल याची त्याला फार आशा नव्हती.

वाटेत हुसेननं एक वाटाड्या पकडला. त्याची गरज मला सुरुवातीला कळली नाही. पण मग पटली. इशारत बोलका, सारखा हसणारा, पान खाणारा आणि रसाळ आवाजात बोलणारा. ललित ग्रँड पॅलेसच्या पाहुण्यांची सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून तो स्वतःला इतर वाटाड्यांपेक्षा श्रेष्ठ समजे.

तिथे गांडोल्यात बसून वर पर्वतावर जाण्याची व्यवस्था. पण त्यासाठी अनेक हजार पर्यटक लांब ओळीत व उन्हात तासन् तास ताटकळत उभे. तिकीट काढल्यावर गांडोल्यात बसण्यासाठी तशीच लांब दुसरी ओळ. मी काळजीत पडलो असता इशारत मदतीस धावून आला. त्यानं जादू केली आणि क्षणार्धात आम्ही त्या गंगोत्रीच्या मुखाशी उभे. इशारतला इथल्या कुठल्या कळा दाबाव्यात हे चांगलं ठाऊक. तो वाटाड्या म्हणून त्याचा धंदाच होता. त्याचं ट्रेड सिक्रेट विचारल्यावर त्यानं गूढ हास्य केलं. त्याचा अर्थ मला कळला. भारतात खिरापत वाटल्यानं सूर्योदय देखील थोपवता येतो असं त्यानं भासवलं.

या गांडोल्यात बसण्यात देशवासीयांना खूप अप्रूप. पण मी व सौ. लता एकेकाळचे स्कीपटू असल्यामुळे आम्हाला तो अनुभव आपण सकाळी चहा पितो त्यापेक्षा निराळा वाटला नाही. तो निराळा या दृष्टीनं होता की हे गांडोले जगात सर्वात जास्त उंचीवर नेणारे. पहिल्या टप्प्यात ते पर्यटकांना ८,५०० फूट व दुसऱ्या टप्प्यात १०,२०० फूट उंचीवर नेत होते. त्यामुळे हे स्थळ स्किईंगसाठी मक्का समजण्यात येई. त्यासाठी हिवाळ्यात इथली युद्धग्रस्त परिस्थिती डावलून अनेक परदेशी गोरे येतात अस कळलं. पण ही सुविधा बांधण्यात भारतीय माणसाचं फारसं डोकं नव्हतं. एका फ्रेंच कंपनीन आपल्यावर उपकार केले होते. हे परावलंबित्व मुंबईतही आढळतं. अगदी त्याचवेळी त्या वित्तराजधानीत बोटभर लांबीची मेट्रो उघडली आणि मुंबईकरांनी हवेत उड्या मारल्या. बोटभर यासाठी की तेवढ्या लांबीची रेल्वे चीन एका आठवड्यात बांधतो तर आपल्याला त्यासाठी ८ वर्षं व संकल्पाधिक तिप्पट पैसे लागले. महत्त्वाचं म्हणजे त्यातही फ्रेंच कंपनीचं तंत्रज्ञान होतं. साफल्यापोटी




# संस्कृती दिवाळी २०१४

## अंतरंग...

विद्यार्थ्यांचं आकलन आणि मातृभाषा, पालकांच्या दृष्टीनं आजची ज्ञानभाषा असलेली इंग्रजी भाषा, भाषा आणि समाज, भाषा आणि राजकारण, मराठीची सामर्थ्यस्थळं आदींचा वेध घेणारा परिसंवाद -

### इंग्रजी माध्यम आणि आपण

सहभाग - **उमेश घोंगडे** (संचलन)

• डॉ.वसंत काळपांडे • प्रा.अनिल गोरे • प्रा.हरी नरके
• श्रीधर लोणी • किशोर दरक • हेरंब कुलकर्णी

### आतला आवाज -

विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या स्वशोधाचा आणि प्रवासाचा वेध घेणारा विभाग

१) **पं.जसराजजी** यांच्या स्वरसाधनेचा प्रवास २) **पं.नंदकिशोर कपोते** यांची नृत्यसाधना
३) अभिनेता-कवी **किशोर कदम** यांची मुलाखत ४) व्याख्यानांनी मंत्रमुग्ध करणारे **प्रा.नितीन बानगुडे-पाटील**
५) गुन्हेगारीच्या दलदलीतून बाहेर पडून गांधी विचारांचा प्रसार करणारे **लक्ष्मण गोळे** यांची कहाणी
६) शेफ **विष्णू मनोहर** यांची वेगळी 'रुचकर' वाटचाल ७) एडस्‌ग्रस्तांचा मसीहा **संतोष पवार**
८) राजकारणाच्या पायऱ्या चढताना जपलेला आतला आवाज **सुनिल तटकरे**
९) खानदानी मराठा असूनही 'लावणी'च्या पदन्यासाला श्वास करणारी **विजया निकम**
१०) शेती मार्केटिंगचं वेगळं तंत्र अवलंबणाऱ्या **मंदाताई चव्हाण.....यांच्या आतल्या आवाजाचे शब्दोच्चार!**

### विशेष लेख

• **कवितेपलीकडचे गुलजार : अनंत दीक्षित** • **करिअर मार्गदर्शन : तुकाराम जाधव** संचालक, युनिक ॲकॅडमी
• **'कायझेन' : विश्वास फडतरे** कायझेन कन्सल्टंट • **कमल पाध्ये यांची मुलाखत : अनिल किणीकर**
• **बदलते राजकारण : विनायक लिमये** • **जोजफ कॉन्रॅड** (इंग्रजी कादंबरीकार) : **डॉ.चंद्रशेखर चिंगरे**
• **शेतीतील संधी व अडथळे : सुकृत करंदीकर** • **आरक्षणाचे राजकारण : योगेश कुटे**
• **मोदीलाट की मध्यमवर्गाची कूटनीती : अविनाश थोरात**

### 'टाळ्यांच्या' कविता

**फ.मुं.शिंदे, दासू वैद्य, इंद्रजित भालेराव, कल्पना दुधाळ, बबलू वडार, अरुण म्हात्रे, रमजान मुल्ला, प्रदीप पाटील, प्रकाश होळकर, चंद्रकांत वानखेडे, भरत दौंडकर, लता अहिवळे, लक्ष्मीकांत तांबोळी.**
या कवींच्या रसिकांची जिंदादिल दाद मिळवणाऱ्या निवडक कविता अर्थात् - **टाळ्यांच्या कविता**
स्तोत्राइतकच महत्व द्यावं इतकी मोलाची, आपल्या राजाची गुणवैशिष्ट्यं सांगणारी
**निवडक शिवसूक्त... कवी अरुण म्हात्रे**

### कथा

**र.वा.दिघे, व.के.पाटील, लीना मेहेंदळे, डॉ.राजेंद्र माने, रामचंद्र नलावडे, सुनील वेदपाठक** आणि **द.ता.भोसले** यांनी रेखाटलेलं व्यक्तिचित्र...

### वार्षिक राशीभविष्य

## संस्कृती प्रकाशन

प्रकाशक : सुनिताराजे पवार

६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, नू.म.वि. समोर, पुणे ३०.
मोबा. ९८२३० ६८८२९२ • फोन ०२०-२४४९७३४३
sanskrutiprakashan@yahoo.com www.sanskrutiprakashan.com

मुंबईकरांना होणारा आनंदज्वर एकदा क्षम्य असेल, पण त्यातलं परावलंबित्व मुळीच नाही. देशात कौशल्य नाही असं कसं म्हणता येईल? आपण त्याला प्रोत्साहन देत नाही एवढंच. दिल्लीतली मेट्रो तर जपाननं बांधली. याचाच अर्थ असा की प्रजननाव्यतिरिक्त आपण स्वायत्तपणे काहीच करू शकत नाही. यात मला तरी उड्या मारण्यासारखं काही दिसत नाही.

वर गेल्यावर छातीत शेवटी शुद्ध हवा शिरेल असं वाटलं. पण एवढ्या उंचीवर तसं होण्याऐवजी घोड्यांच्या लिदांमुळे गंधित झालेली हवा मिळाली. तिथून ४ कि.मी. घोड्यावर बसून जाण्याची व्यवस्था. त्यामुळे तिथे १००-२०० प्राण्यांचा कळप होता. प्रत्येक घोड्यामागे एक 'महुत'. त्यामुळे ८,५०० फुटांवर देखील शांतता लाभली नाही. नाकपुड्या धरून आम्ही घोडेस्वार झालो आणि पुढचं अंतर कापू लागलो. इथला भूखंड अतिशय कठोर. सर्वत्र मोठमोठे धोंडे पसरलेले. हिवाळ्यात बर्फ पडला म्हणजे ते सर्व बर्फाखाली झाकलं जाऊन स्किइंगसाठी गुळगुळीत भूप्रदेश निर्माण होतो. पण बर्फ वितळ्यावर वसुंधरेचं शरीर उघडं विद्रूप झालं होतं. या अडसरातून मार्ग काढत आमचे घोडे मंद गतीनं वर गेले. तिथे थोडा विसावा घेतला. चहापान केलं. पुन्हा भारतीय माणसाच्या विकृत मनःस्थितीची प्रचीती आली. सर्वत्र चहाचे कागदी पेले व पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्या विखुरलेल्या. या बेदरकार वागणुकीमुळे आपण निसर्गदेवतांचा खून नव्हे तर खिमा करत आहोत याचं कुणालाच भान दिसलं नाही.

चहा पिताना समोर बघितलं. क्षितिजावर बर्फाच्छादित शिखरं ढगांशी कुजबुज करताना दिसली. त्याला मात्र मानवाचा स्पर्श झाला नव्हता. तो कैलासवासाचाच भाग असावा. म्हणजे आपणा सर्वांचं अखेरचं विश्रांतीस्थान. त्या रौद्ररम्य दृश्यात उद्वेगीत मनाला शांत करण्याचं सामर्थ्य होतं. त्यात पावित्र्य होतं आणि महत्त्वाचं म्हणजे ते मानवाला स्पर्शातीत होतं.

आता बर्फावरून तिसरा टप्पा सुरू झाला. घोडे मागे पडून लाकडाच्या पट्टीवर बसावं लागलं. मग एका माणसानं ती पट्टी ओढत वर नेलं. तो चढ सोपा नव्हता. मागून एका अनामंत्रित व मग बक्षिसी मागणाऱ्या माणसानं ढकललं. तरीही शेवटची ५-५० पावलं स्वतःचे पाय वापरून बर्फातून रस्ता कापावा लागला. एवढे कष्ट केल्यावर काय दिसलं? समोर धबधबा आढळला. वितळत्या बर्फाचं पाणी खडकांवरून खाली वेगानं पडत होतं. पण त्या जलधारा बाहेर वाहण्याऐवजी बर्फातल्या पोकळीत अदृश्य झाल्या होत्या. शंकराच्या जटेत गंगा विसावली तशी. बराच वेळ ते दृश्य प्राशन केल्यावर आलो तसंच टप्प्याटप्प्यानं खाली उतरलो. देवानं भारताला दिलेली निसर्गसंपदा अफाट आहे. पण मानवानं तिचा आदर करण्याऐवजी द्रौपदीसारखी विटंबना केली हे दुर्दैव.



८५०० फूट उंचीवरचं प्रदूषण करणारं चहागृह व घोडे

दुसऱ्या दिवशी हुसेननं आम्हाला १०० कि.मी. उत्तरेला असलेल्या सोनमर्ग नावाच्या पर्यटनस्थळी नॅशनल हायवे नंबर एकनं नेलं. या रस्त्याला राजमार्ग म्हणणं म्हणजे शूर्पणखेला जागतिक सौंदर्यस्पर्धेत पहिलं बक्षीस देण्यासारखं. यापेक्षा अमेरिकेतले आडमार्ग विस्तृत व खड्डेमुक्त असतात. हा राजमार्ग दोन पदरी तर सोडाच पण अनेक ठिकाणी एकपदरी आहे आणि तो गाड्या, ट्रक्स, लष्करी वाहनं आणि मेंढ्या असे चार गट वापरतात. याशिवाय पादचारी

वेगळे. याचं वाईट वाटण्याचं कारण असं की हा राजमार्ग व्यूहात्मक दृष्ट्या अतिमहत्त्वाचा आहे. कारण उत्तरेला तो प्रथम कारगील व नंतर लडाख-लेह भागात जातो. लडाख येथून फक्त ४०० कि.मी. त्या भागात अर्थातच आपलं सैन्य आहे. त्यांना रसद व लष्करी सामुग्री पुरवण्यासाठी हा राजमार्ग एकुलता एक मुख्य पर्याय आहे. मग तो बहुपदरी नको का? कारगील व सरहद्दीयुद्धात मार खाल्ला तरी अशी दयनीय स्थिती का? आपला देश जगात सर्वात जास्त शस्त्रास्त्र परदेशातून आयात करतो कारण ती देशांतर्गत बनवण्यासाठी लागणार डोकं आपल्याजवळ आहे, पण राजकीय वातावरण नाही. जे आहे त्याचं राजकीयीकरण झाल्यामुळे देशाला एवढं परदेशी चलन आयातीवर खर्च करावं लागतं.

स्त्रिया कमावलेल्या मातीत पेरत होत्या. कृषीउत्पादनाला लागणारी ही स्त्रीशक्ती अजूनही वापण्यात येते हे बघून नवल वाटलं. हे देशभर खरं आहे. बैल आणि स्त्रिया यांच्या शक्तीतून भारत कृषीप्रधान देश झाला आहे. म्हणून आपण बैलांचे आभार मानण्यासाठी दरवर्षी पोळा साजरा करतो. पण त्या स्त्रियांच्या मनगटाचं काय? त्यांच्यासाठी मदर्स डे आहे, पण तो शहरापुरताच. या शेतात राबणाऱ्या खेडुत स्त्रियांना त्याचं अस्तित्व देखील माहीत नसेल. मग समान हक्क, स्त्रीमुक्ती अशा चळवळींविषयी त्या सुसंस्कृत असणं अशक्यच.

यांत्रिकीकरणासाठी पैसा नसल्यामुळे इथे व देशभर आधुनिकीकरणानं फारसा बदल केलेला दिसत नाही. या स्त्रिया दिवसभर शेतात राबून संध्याकाळी सरपण घेऊन



प्रदूषित दाल लेक

चुली पेटवतात व स्वयंपाक करतात. कुटुंबाचं पोट भरल्यावरच ती उरलेलं अन्न घेऊन पानावर बसते. तिच्या या त्यागबुद्धीचं कुणी कौतुक करत नाही. ते गृहीत धरण्यात येतं. भारतीय स्त्रीत्वाची ही दयनीय व श्रेयहीन स्थिती बघून मनाला पीळ बसला.

पण त्याचा फायदा काय? रसद पाठवण्यासाठी लागणारा परिवहन मार्ग नसेल तर ती आघाडीवर नेणार कशी? दुसऱ्या बाजूला चीननं खऱ्या अर्थानं राजमार्गच नव्हे तर रेल्वे बांधली म्हणे. म्हणजे पुन्हा युद्ध झालं तर त्या देशाचं लष्कर दिल्लीपर्यंत येऊन पोचेल आणि आपलं या नंबर एकच्या राजमार्गावर मेंढ्यांत अडकून हरी हरी करत बसेल. म्हणून या रस्त्याचं प्राधान्यानं रुंदीकरण व डांबरीकरण करायला नको का? पण तो 'युद्धपातळी'वरचा प्रकल्प दिल्लीच्या लालफितीत अडकला असेल. आपल्या देशात राष्ट्राच्या संरक्षणापेक्षा नोकरशाही केव्हाही महत्त्वाची.

एका तासाच्या रटाळ प्रवासानंतर समोर अंथरलेला निसर्ग बघून वैतागलेलं मन शांत झालं. मधूनमधून भाताची पिवळीजर्द शेतं मनाला सुखद स्पर्श करून गेली. काहीत भात वाढला होता तर काहीत त्यांची रोपटी ओणावणाऱ्या

जम्मू-काश्मिरवर १५२८ ते १७५१ पर्यंत मोगलांनी राज्य केलं. त्यातल्या जहांगीरनं (ज्यानं आपल्या बीबीच्या स्मरणार्थ ताजमहाल बांधला) या भूखंडाला प्रथमच 'नंदनवन' म्हणून संबोधलं. मग इथे अफगाण आले. शीखांनी त्यांच्याशी युद्ध करून ब्रिटिशांच्या नजरेखाली १९४७ पर्यंत राज्य केलं. त्यावेळी या प्रदेशाची भारत, पाकिस्तान व चीनमध्ये विभागणी झाली. आज इथली ९७% प्रजा मुस्लिम असून त्यांची मातृभाषा उर्दू आहे. लोकसंख्या फक्त सव्वा कोटी. याउलट महाराष्ट्राची ११ कोटी आहे. जे हिंदुधर्मीय होते ते

मुख्यतः जम्मूमध्ये केंद्रित झालेले. त्यातले पंडित नावाचे ब्राह्मण प्रसिद्ध. जवाहरलाल नेहरू त्याचं प्रसिद्ध उदाहरण. त्यांचं आजोळ श्रीनगरपासून दूर नाही असं आमचा ड्रायव्हर हुसेन म्हणाला.

हा प्रांत भारताप्रमाणे कृषीप्रधान. मुख्य पीक तांदूळ व निरनिराळ्या प्रकारची फळं. इथल्या फुलांपासून निर्माण होणारं केशर व मेंढ्यांपासूनची काश्मिरी शाल जगप्रसिद्ध आहेत. अलिकडे पर्यटनक्षेत्रानं मुसंडी मारली असून गुलमर्ग येथे होणारी बर्फावरची घसरगुंडी (Skiing) जागतिक पातळीची समजण्यात येते.

काश्मिरचं राजकारण वेगळं आहे. दिल्लीतल्या संसदेनं पारित केलेले कायदे इथे लागू पडत नाही. इथली विधानसभा ते धुडकावून लावू शकते. स्वतःची राज्यघटना असलेला हा एकुलता एक प्रांत. देशातल्या इतर प्रांतियांना इथे स्थावर इस्टेट विकत घेण्यास बंदी आहे. पण त्यात अनेक पळवाटा उपलब्ध असणार. भारनियमनाचा रोग या प्रांतालाही लागला आहे. इथे पैदा होणारी जलविद्युत उन्हाळ्यात हरियाना प्रांताला विकण्यात येते. हिवाळ्यात पाणी गोठल्यामुळे तिचं उत्पादन घटतं. त्यावेळी वीज हरियाणातून आयात केली जाते. पण ती कमी पडत असल्यामुळे भारनियमन करावं लागतं. आमच्या हॉटेलमधली वीज अनेकदा गेली. पण स्वतःच्या विजनिर्मिती यंत्रापासून ती लवकरच आली.

इथे मान्सून असा नसतोच. पाऊस येतो व लगेच निघून जातो. हिवाळ्यात बर्फ मात्र खूप पडतो. त्यामुळे पर्वतातले रस्ते बंद होतात. राजमार्ग १ तर बर्फाखाली अदृश्य होतो. या बर्फवृष्टीमुळे श्रीनगरमधली राजधानी हिवाळ्यात जम्मूमध्ये दक्षिणेला स्थलांतरित करण्यात येते. त्यावेळी शाळा तीन महिने बंद असतात. त्यांना उन्हाळ्याची सुट्टी अशी मिळतच नाही. पण हे महाविद्यालयांना लागू पडत नाही. ती हिवाळ्यातही उघडी असतात. या प्रांतात कारखाने व त्यामुळे होणारं प्रदूषण असं नाहीच. त्यामुळे नोकऱ्यांची वानवा असून तरुण पिढीला मुंबई, दिल्लीसारख्या शहरी जाऊन नशीब उघडावं लागतं.

तास दीड तास खडतर प्रवास केल्यानंतर एकदा एकाच दिशेनं जाता येईल असा एक लोखंडी पूल ओलांडला. त्याखालून वाहणाऱ्या नदीचं नाव सिंध. तिचं वैशिष्ट्य म्हणजे गंगायमुनेसारखी किंवा मुंबईतल्या मिठी नदीप्रमाणे ती मृतप्राय स्थितीत नसून सजीव, सचेतन व उर्ज्वस्वल वाटली. महत्त्वाचं म्हणजे ती स्वच्छ होती. तिचं निळसर आकाशी रंगाचं पाणी नुकत्याच वितळलेल्या बर्फापासून तयार झालेलं. तिचा उगम उत्तरेला अमरनाथच्या गुहेत झालेला. गोठलेल्या शिवलिंगातून थेंबाथेंबानं जन्मलेल्या सरितेला इथे बाळसं आलं होतं. आजुबाजूच्या उंच पर्वतावरून खाली येणारे पाण्याचे अनेक ओढे सिंध नदीत संमीलित होऊन आपलं स्वत्व विसर्जित करत होते. पाणी उथळ व तळ खडकाळ असल्यामुळे नदी खळबळण्याचा आवाज करत अधीरतेनं दक्षिणेला धावत होती. श्रीनगरजवळ ती झेलम नदीला मिळते. तिचं पाणी मानवी आक्रमणामुळे प्रदूषित झालेलं असल्यामुळे सिंध नदीला या मीलनाचा अभिमान वाटत नसावा. कधी खडकांशी कुजबुज करत तर कधी त्यावर रागानं आपटून ती अव्याहतपणे पुढे जात होती. शेवटपर्यंत तिनं आमचं बोट धरून आम्हाला सोबत दिली.

शेवटी सोनमर्ग ठिकाण आलं. गुलमर्गमध्ये जशी फुलं दिसली नाहीत तसं इथे सोनं आढळलं नाही. सिंध नदी मात्र कोपित झालेली दिसली. तिचा प्रवाह रौद्र रूप धारण करून अनेक खडकांवर आदळत होता. सगळीकडे उंच पर्वत, काहींच्या खांद्यावर बर्फ. तो वितळून पाण्याच्या श्वेतवर्णीय रेषा हसत-बागडत खाली येत होत्या. तिथे अनेक ठिकाणी हिमनद्या दिसल्या व अलास्काची आठवण झाली. पर्वतांच्या कड्यावरून त्या गोठलेल्या नद्या सिंध नदीच्या काठापर्यंत येऊन थांबल्या होत्या. बर्फाच्या चादरीच्या राक्षसी जिभा नदीत डोकावत होत्या. ते दृश्य मी पूर्वी अलास्कामधे बघितलं होतं. तरीही अविस्मरणीय वाटलं.

सोनमर्गच्या पुढे जाण्यास ५०० रुपये पथकर व लडाखला पोचण्यास १ दिवस लागणार असं हुसेन म्हणाला. हिवाळ्यात इथे ५० फूट बर्फ पडून सगळी दरी व नदी त्याखाली अदृश्य होते. त्यावेळी वाहतूक बंद होते.

हा भूप्रदेश खरोखरीच निसर्गसंपन्न आहे, पण मानवानं केलेल्या आक्रमणामुळे व पर्यावरणाचं योग्य जतन न केल्यामुळे त्याला नंदनवन किंवा देवाचे अश्रू अशा कविकल्पनांनी भूषवणं दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे कठीण होत आहे, एवढंच.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
२, सेकंड स्ट्रीट, #२००१,
जर्सी सिटी, न्यू जर्सी ०७३०२
latalabh@aol.com

# ॲनिमेशनचं भयावह जग

**अपर्णा पाटील**



आर्चीचा खून एका अनोळखी व्यक्तीकडून होणार आहे... कॅप्टन अमेरिका आता कृष्णवर्णीय असणार आहे... आजवर थॉर हा योद्धा केवळ पुरुष असायचा यापुढे तो एका महिलायोद्ध्याच्या रूपात दिसणार आहे... या बातम्या जिवंत माणसांच्या नाहीत. पण या बातम्यांना आपल्या आयुष्यात स्थान आहे. जिवंत नसलेली, ही आणि यासारखी असंख्य कार्टून कॅरेक्टर्स आणि त्यांच्या आयुष्यातल्या घडामोडी आपल्या जीवनाचा भाग झाल्यात. माणसाच्या मनोरंजनासाठी तयार केलेल्या कार्टूनचं एक समांतर जगच अस्तित्वात आलं आहे. मात्र त्यात रमणारी मुलं आणि माणसं यांना त्यापासून धोका असल्याचा इशारा मानसशास्त्रज्ञ देऊ लागले आहेत.





**Yesterday** is history,

Tomorrow is a mystery, but today is gift.

हे वाक्य शेक्सपीअरनं लिहिलेल्या एखाद्या नाटकातलं नाही तर 'कुंग फू पांडा' नावाच्या ॲनिमेशन फिल्ममधल्या मास्टर शिफूनं आपला शिष्य पांडा पो याला जीवनाचं तत्त्वज्ञान समजावण्यासाठी उच्चारलेलं आहे.

When Zebra is in the Zone, leave him alone,

असं 'मादागास्कर'मधला ॲलेक्स नावाचा सिंह, आपला झेब्रा मित्र मार्टी याला उद्देशून जेव्हा म्हणतो, त्या वाक्यावर हसायचं की, त्याला संतवचन म्हणायचं, असा प्रश्न पडतो. तर No man walk out of his own story... हे रँगो या सरड्याच्या तोंडी असलेलं वाक्य न पटण्यासारखं नसतंच मुळी.

पांडा पो आणि मास्टर शिफू, ॲलेक्स आणि मार्टी, रँगो आणि बिन्स ही सगळी मुलांच्या मनोरंजनासाठी काढलेल्या ॲनिमेशनपटातली पात्रं आहेत. पण त्यांच्या तोंडी असलेल्या वाक्यांना सुविचार नावाच्या सदरात बसवता येतं.

टीव्हीवर कितीतरी चॅनेल्स आहेत. त्यात माणसाच्या प्रत्येक आवडीचा, गरजांचा विचार केलेला असतो. बातम्यांपासून अध्यात्मापर्यंत आणि प्राण्यांपासून कारपर्यंत प्रत्येकाचं वेगळं चॅनेल आहे. अशा चॅनेल्सच्या गर्दीत मुलांसाठी कार्टून नेटवर्कही आहे. रडलेल्या मुलाला शांत करण्यासाठी टीव्ही ठेवला जातो, तेव्हा वयाच्या अगदी सहाव्या महिन्यांपासून कार्टून त्याच्या आयुष्यात प्रवेश करतात. अशी पिढी कार्टूनवर पोसली जाणार नाही तर काय? पूर्वी आजी-आजोबा आणि घरातल्या ढीगभर

बहीण-भावांच्या गराड्यात वाढणारी मुलं आता फक्त टीव्हीच्या खोक्यासमोर वाढू लागली आहेत. त्यांना आपल्या चुलत-मावस भावंडांची ओळख होण्याआधीच टॉम अँड जेरी माहीत झालेले असतात. डोरेमॅन त्यांचा दोस्त असतो. तर शिन चॅन म्हणजे जणू आपणच असल्याच्या थाटात ही मुलं वाढतात.

ॲनिमेशन ही माणसाच्या कल्पनेतून जन्माला आलेली सृष्टी आहे. माणसाच्या सुबक मेंदूतून जन्माला आलेली ही कला पाच हजार वर्षांपासून अस्तित्वात असल्याचं इतिहास सांगतो. त्याचं आधुनिक आवडतं रूप म्हणजे कार्टून फिल्म्स. एकोणिसाव्या शतकात ज्या कलेला आपण केवळ वर्तमानपत्रं किंवा मासिकांमध्ये तुकड्यांच्या रूपात पाहू शकत होतो, त्यांना आपण विसाव्या शतकात आधी कॉमिक्सच्या आणि नंतर फिल्मच्या रूपात पाहायला लागलो. तेही घरबसल्या. कार्टून हा शब्द मुख्यतः टीव्हीवरच्या आणि शॉर्ट फिल्मसाठी वापरला जाऊ लागला. ज्यात प्राणी, सुपरहिरो आणि धाडसी किंवा जगावेगळी मुलं आहेत, त्यांना कार्टून सर्रास म्हटलं जाऊ लागलं. कार्टून जन्माला आलं तेच मुळी मुलांना हसवण्यासाठी. या मुलांच्या वाढण्याबरोबरच त्यांचं हे कार्टूनप्रेम वाढलंय. त्यामुळे या ॲनिमेशनच्या जगात नव्यानव्या कॅरेक्टरचा जन्म होत राहिला. त्यामुळे त्याचा पसाराही वाढत गेला. रोज टीव्हीवर कार्टूनचा रतीब चालू असतो. महिन्या-दोन महिन्यांतून पूर्ण लांबीचा सिनेमा रिलीज होत असतो. त्यामुळे ॲनिमेशनचा पसारा वाढत गेला आहे.

ॲनिमेशनच्या जगाला आणखी बळ मिळण्यासाठी कारण ठरली ती सामाजिक स्थिती. अमेरिकेतल्या विभक्त आणि विस्कटलेल्या घरातील मुलांच्या मनाचे हळवे कोपरे या कॉमिक्सच्या जगानं भरून आणि भारून टाकले. कॉमिक्सची जागा हलत्याबोलत्या कार्टून फिल्मनं घेतली. लवकरच टीव्ही, सिनेमा यात फार मोठी जागा या ॲनिमेशन कॅरेक्टरनं व्यापली. ही जागा इतकी मोठी झाली की, जिवंत माणसांइतकी दखल घ्यायला त्यानं भाग पाडलं. ॲनिमेशनच्या तंत्रानं माणसानं उभं केलेलं जग असलं, तरी ते निव्वळ कार्टून किंवा कॉमिक्स म्हणून सोडून देता येत नाही. कारण कार्टून कॅरेक्टरला जिवंत माणसांची स्वभाववैशिष्ट्यं चिकटवली आहेत. मग जशा गुंतागुंती, परिणाम माणसांच्या जगात पाहायला मिळतात, तशीच काहीशी परिस्थिती या ॲनिमेशनच्या जगात उद्भवली आहे.

ॲनिमेशनच्या जगात अनेक प्रकारचे, मानवी स्वभावानं वावरणारे प्राणी आहेत. काही बोलत नाहीत, तर काही बोलतात. मिकी माऊस, डोनाल्ड डक, प्लुटो, गारफिल्ड, पीनट, चिपमंक्स, पेंग्विन्स, टॉप कॅट, स्नुपी, बग्ज बनी, डॅफी डक, पोर्की पिग, रोड-रनर, या सगळ्यांच्या काही विशिष्ट सवयी आहेत. ते ज्या पद्धतीनं बोलतात किंवा वागतात, ते जगातल्या कोणत्याही माणसाला, अरे... हे तर आपल्यासारखे आहेत, असं वाटायला लावतात. अशा प्राण्यांची प्रमुख भूमिका असलेले चित्रपटही लोकांना आवडू लागले आहेत. एखाद्या हिंदी मसाला सिनेमाप्रमाणे त्यात नाचगाण्यापासून प्रबोधनापर्यंत सगळ्या गोष्टी ठासून भरलेल्या असतात. 'आइस एज', 'मादागास्कर', 'कुंग फू पांडा', 'फाइंडिंग निमो', 'टॉय स्टोरी', 'कार्स' यासारखे चित्रपट पाहिले की ते सहज लक्षात येतं. हे चित्रपट म्हणजे मानवी मनाच्या अनेक हरवलेल्या भावभावना या प्राण्यांना चिकटवल्या आहेत. 'कुंग फू पांडा' चित्रपटातले संवाद तर इतके लोकप्रिय आहेत, की त्यांचा अनेकदा कोट्स म्हणजे सुविचार म्हणून विचार केला जातो. 'मादागास्कर'मध्येही ॲलेक्स तर 'फाइंडिंग निमो'मधला गोल्डफिश किंवा रँगो सरडा नुसतंच मनोरंजन करतात असं नाही तर आपण त्यांच्यात आपलं, आपल्या जगण्याचं प्रतिबिंब पाहतो. त्यांचं जग जरी आपणच आपल्या कल्पनेनतून उभं केलेलं असलं तरी, त्यांच्यात आपण आपल्या आयुष्याचा नव्यानं शोध घेत राहतो. ज्या भावभावनांना आता आपल्या आयुष्यात फार स्थान राहिलेलं नाही, त्यांना वाट करून देण्यासाठी ही कार्टूनमधली अनेक पात्रं आहेत.

गारफिल्ड, केल्विन-होब्ज, पीनट्स, स्कूबीडू अशा कॉमिक्समधल्या कितीतरी व्यक्तिरेखा आपल्या आवडत्या असतात. त्याचं स्वभाववैशिष्ट्यं आपण समजून घेत असतो. गारफिल्डसारखी आळशी मांजर, तिचा समजूतदार आणि वेंधळा मालक, केल्विन नावाचा अत्यंत हुशार पण निरागस मुलगा आणि त्याचा लाडका वाघ होब्ज यांच्यातल्या गप्पा म्हणजे न संपणाऱ्या गोष्टी. स्कूबीडू हा घाबरट कुत्रा, त्याच्या गमतीजमती वाचताना-पाहताना आपण स्वतःला विसरून जातो. पण त्याही पुढचा टप्पा गाठला तो सुपरहिरोंच्या प्रवेशानं.

ॲनिमेशनच्या जगात प्रवेश केलेल्या सुपरहिरोंनी जग व्यापलंय. बॅटमॅन, स्पायडरमॅन, सुपरमॅन, फँटम, हल्क, आयर्नमॅन, ही यादी आणखीही खूप मोठी होणारी आहे. सर्वसामान्य माणूस म्हणून जगणारी ही पात्रं एका शक्तीच्या जोरावर जगातल्या दुष्ट शक्ती, संकटांचा नाश करतात. रोजच्या जगण्यातून माणसाला आलेल्या नैराश्यावरचा हा

उतारा असतो. एखाद्या जादुई शक्तीच्या ताकदीनं हवं ते करायला कोणाला आवडणार नाही, मग त्यातून अशी असंख्य पात्रं कार्टूनच्या जगात प्रवेश करती झाली. सर्वसामान्य म्हणून जगणारी माणसं आपल्याला मिळालेल्या जादुई ताकदीच्या जोरावर असामान्य काम करू पाहतात. रोजच्या आयुष्यात प्रत्येक गोष्टीसाठी संघर्ष कराव्या लागणाऱ्या माणसाला अशा जगात वावरायला फार आवडतं. त्यामुळे आपण सुपरहिरोच्या जगात का रमतो, हे मानसशास्त्र समजून घ्यावं लागतं.

या कार्टूनच्या जगात फक्त प्राणी, सुपरहिरो नाहीत, तर पॉपाय, जॉनी ब्राव्हो यासारखी माणसंही आहेत. जॉनी ब्राव्होला जिमला जाऊन बेटकुळ्या काढायचं वेड आहे. शरीरानं मोठा बॉडीबिल्डर म्हणाव्या अशा जॉनीला त्याची आई मात्र फार फडफड करू देत नाही. पॉपाय द सेलर मॅन अशी ओळख असलेला पॉपाय, त्याची प्रेयसी ऑलिव्ह, तिच्यापायी पॉपयशी सतत पंगा घेणारा ब्लुटो अशा मुख्य व्यक्तीरेखांभोवती पॉपायचं जग फिरत राहतं. प्रेमाचा त्रिकोण, पालक खाऊन शक्तिवान होणं, हे मुलांइतकं मोठ्यांनाही आवडणारं असतं. तर अश्मयुग म्हणजे स्टोनएजमध्ये वावरणारं फ्लिन्टस्टोन कुटुंब ही जबरदस्त फँटसी आहे. फ्रेड आणि विल्मा ही त्यातली प्रमुख जोडी आहे. फ्रेड एकदम धडपड्या पण रागीट स्वभावाचा तर विल्मा एकदम हुशार, समजूतदार पण तो खरेदी करून पैसे उधळते. या त्यांच्या कुटुंबाचं राहणीमान हे सर्वसामान्य माणसाच्या कल्पनांची अतिशोयक्ती असते. रिचर्ड रिची रिच ज्युनियर याला आपण रिची रिच नावानं ओळखतो. श्रीमंत असलेला गरीब बिच्चारा मुलगा असं या मुलांचं वर्णन केलं जातं. तर आर्चीच्या प्रेमात अमेरिकन माणसं स्वतःला हरवून गेली आहेत. त्याच्या मैत्रिणी वेरोनिका आणि बेटी इतक्या लोकप्रिय आहेत, की एखादी आधुनिक कपड्यांची मुलगी दिसली इतकी तिला वेरोनिका किंवा जुन्या विचारांची मुलगी त्यांच्या लेखी बेटी ठरते. काही दिवसांपूर्वी आर्चीची हत्या होणार आहे, अशी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. मात्र या कल्पित बातमीनं जिवंत माणसं हादरली. प्रचंड गदारोळ माजला. कार्टूनचं जग किती विस्तारलंय आणि त्याहीपेक्षा आपण त्यात किती गुरफटलो आहोत, याची साक्ष देणारा हा प्रसंग होता.



खरं तर मुलांसाठी सुरू केलेलं हे कॉमिक्सचं जग मोठ्या माणसांच्या वृत्तीनं चालतं, कारण ते माणसानंच निर्माण केलं आहे. त्यामुळे मुलं जरी त्यात रमत असली तर मोठ्यांनाही त्यात अडकायला होतं. असं नसतं तर हॉलिवूडचे प्रख्यात दिग्दर्शक स्टीव्हन स्पिलबर्ग यांना टिनटीन या कार्टून कॅरेक्टरवरचा सिनेमा करावासा वाटला नसता. ख्रिस्तोफर नोलनला बॅटमननं भुरळ घातली नसती. स्पायडरमॅन, सुपरमॅनला पडद्यावर साकारण्यासाठी नामवंत दिग्दर्शकांमध्ये चढाओढ लागली नसती.

ॲनिमेशच्या जगात नुसतीच वैशिष्ट्यं नाहीत, तर सामाजिक परिस्थितीचं प्रतिबिंब त्यात दिसतं. त्याचं एक उदाहरण म्हणजे, कॅप्टन अमेरिका या व्यक्तिरेखेला आता कृष्णवर्णीय नायक मिळणार आहे. कॅप्टन अमेरिका हा दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कॉमिक्समध्ये जन्माला आलेल्या अनेक सुपरहिरोंपैकी एक. तो पक्का अमेरिकन मानसिकतेचा आहे. तो शत्रूंचा धुव्वा उडवतो. अमेरिकन जनतेच्या रक्षणासाठी धावून येतो. त्याचा पेहरावही अमेरिकन ध्वजासारखा आहे. अशा या कॅप्टन अमेरिका या सुपरहिरोच्या रूपात प्रत्येक अमेरिकन माणसाची अस्मिता दडलेली आहे.

त्यामुळेच आजवर त्या सुपरहिरोच्या रूपात कधी कृष्णवर्णीय 'कॅप्टन अमेरिका' असू शकतो, असा कधी विचारच केला गेला नाही. पण देशातील सर्वोच्च पदावर बराक ओबामांसारखा कृष्णवर्णीय नेता आल्यानंतर अमेरिकेच्या अस्मितेचं प्रतीक असलेल्या या सुपरहिरोलाही बदलणं भाग पडलं. तसंच काहीसं म्हणता येईल ते थॉरच्या बाबतीत. थॉर हा पुराणकथांमधला देव. दुष्टांचा नाश करणं हे त्याचं पहिलं काम, कॉमिकच्या जगात हे नाव एक योद्धा म्हणून लोकप्रिय आहे. आजवर थॉर फक्त पुरुषच होता. मात्र सामाजिक बदलांची दखल घेत, स्त्री-पुरुष समानतेच्या हक्काची लढाई पाहून योद्धा म्हणून स्त्रीला स्वीकारलं आहे. याविषयीच्या चर्चा सध्या रंगत आहेत. या सगळ्या चर्चांमध्ये एक गोष्ट समजून घ्यावी लागते, ती म्हणजे ही फक्त कॉमिक्सच्या जगातली पात्रं आहेत. जगात जिवंत नसलेली शेकडो कार्टून पात्रं आहेत, ज्यांना रोज टीव्हीवर पाहता येतं. पण त्यांच्या असण्याचा संबंध थेट हाडामांसाच्या माणसांच्या जगण्याशी आहे.



गेल्या काही वर्षांत मात्र मानसशास्त्रज्ञांनी या कार्टून कॅरेक्टरनी मुलांच्या मनावर कसे भयावह परिणाम केले आहेत, याकडे लक्ष वेधलंय. या कार्टून कॅरेक्टरकडे आपण जरी मुलांच्या मनोरंजनाचं साधन म्हणून पाहत असलो तरी त्याचे मानसशास्त्रीय परिणाम व्यसनामुळे होणाऱ्या कॅन्सरपेक्षाही भयंकर आहेत. पाश्चिमात्य मानसशास्त्रज्ञांनी त्याचा अभ्यास करून काढलेले निष्कर्ष हादरवून टाकणारे आहेत. विशेष म्हणजे अनेक मुलांमध्ये अशा कार्टूनमुळे मनोविकार होऊ शकण्याचा धोका असल्याचा इशारा दिला आहे. त्यासाठी प्रत्येक कार्टून कॅरेक्टरचा स्वतंत्र मानसशास्त्रीय अभ्यास केला आहे. अनेकदा एखाद्या वैशिष्ट्यामुळे आपल्याला विशिष्ट कॅरेक्टर आवडतं. पण नेमक्या त्या आवडीतच मानसशास्त्रीय दोष असू शकतो. म्हणजे समजा, जर तुम्हाला टॉम आणि जेरी या जोडीतला एक तर टॉम आवडू शकतो नाहीतर जेरी. पण तुम्हाला टॉम आवडतो की जेरी, यावरूनच तुमची मानसिकता समजते. त्यातूनच एखाद्याला कोणालाही कारणाशिवाय सतत मारण्याची हिंसक वृत्ती नकळत का होईना मेंदूवर घातक परिणाम करते.

अमेरिकेतल्या घराघरात चार्ली ब्राऊन हे पात्र लाडकं आहे. पण त्याचा मानसशास्त्रीय अभ्यास केला तर त्याला पर्सनॅलिटी डिसऑर्डर असल्याची भीती व्यक्त होतेय. त्यामुळे अनेक पालकांना मुलांना ते पाहू देऊ नका, असा चक्क इशारा देण्यात आला आहे. विनी द पू हेही अनेक मुलांना आवडणारं अस्वल. अनेकांना त्याच्या मस्तीखोर, प्रेमळ स्वभावामुळे त्याला घट्ट मिठी मारावीशी वाटते. पण मानसशास्त्रज्ञांच्या मते, तो खाण्यासाठी जसा वागतो, ती मानसिक आजाराची लक्षणं आहेत. अशा अनेक कॅरेक्टरची स्वभाववैशिष्ट्यं लक्षात घेतली तर जसं टीव्ही आणि सिनेमात वारंवार सिगारेटी फुंकू नका, दारू पिऊ नका, तंबाखू खाऊ नका, इतकंच कशाला बारा वर्षांखालील व्यक्तींनी आपल्या पालकांच्या परवानगीनं हा कार्यक्रम पाहावा, अशा सूचना दिलेल्या दिसतात तशा या कार्टून फिल्मसाठी द्यावी लागतील का, या दिशेनं मानसशास्त्रज्ञांचा अभ्यास सुरू झाला आहे. भारतातही या भयंकर परिणामांची लक्षणं दिसण्यास सुरुवात झालीच आहे. शिन चॅनच्या प्रसारणावर बंदी घालण्यात यावी, यासाठी झालेला वाद हा याच भयावह स्थितीची पहिली घंटा वाजणारा होता.

शिन चॅन हा अत्यंत उद्धट आणि वात्रट मुलगा. आपल्या पालकांना, शिक्षकांना जुमानत नाही. सतत त्याचा पारा चढलेला असतो. आपल्याला हवं ते मिळवण्यासाठी तो वाट्टेल ते करत असतो. अशा मुलाला पाहून घराघरातील पोरं वाह्यात होणार नाही तर काय! त्यांना शिन चॅन हे जगात अस्तित्वात नसलेलं पात्र आहे, असं सांगून काही उपयोग होणार आहे का? कारण त्याच्या सगळ्या सवयी थेट आपल्यासारख्या आहेत, असं प्रत्येक मुलाला वाटतं.

आपली आवडती गोष्ट न मिळाल्यानं रस्त्यावर भोकाड पसरलेली मुलं पाहून शिन चॅन अशा मुलांवरून बेतलाय, की शिन चॅन पाहून मुलं असं करायला शिकलीत, हे समजणं आता कठीण झालंय. पण त्याचं प्रसारण बंद करण्यात यावं, यावरून बरीच चर्चा झाली.

कार्टून हे मुलांच्या मनोरंजानाचं एकमेव साधन असतं. आपल्याला आवडणाऱ्या फिल्म्स घरबसल्या केव्हाही पाहणं त्यांना सहज शक्य असतं. अनेक पालकही मुलांना अशा फिल्म पाहू देण्यासाठी जबाबदार असतात. आता तर मुलांना घराबाहेर पडणं नकोसं वाटू लागलं आहे. बाहेर जाऊन खेळण्यापेक्षा कार्टून पाहणं त्यांना आवडतं. काही मुलं तर आपल्या आवडत्या कार्टून शोला पाहण्यासाठी वाट्टेल तर करण्याच्या तयारीत असतात. तासन् तास ही मुलं टीव्हीला खिळून बसलेली असतात. अनेकदा मुलांचं हे टीव्ही पाहणं मुलांच्या मानसिकतेवर काय गंभीर परिणाम करतं, हे त्यांच्या पालकांच्या गावीही नसतं. बेन-टेन, पोकेमान, बार्बी अशा शोमधून मुलांच्या वाढत्या वयात परिणाम होतो. ते जे काही पाहतात, त्यातून त्यांच्यात काही बाबतीत काही चुकीच्या धारणा होण्याची भीती असते.

बग्ज बनी वारंवार हातोड्यानं मारतो, असं आठ-दहा वर्षांची मुलं सतत पाहत असतील, तर अशा मुलांमध्ये हिंसक होण्याची बीजं नक्कीच रुजतात. एका घटनेत आठ वर्षांच्या एका मुलाला आपल्या शाळेतल्या मित्राला मारताना शिक्षकांनी रोखलं. त्यांनी त्याला तू त्याला का मारतोस, असं विचारल्यावर त्याचं उत्तर होतं, मी काल रात्री कार्टूनमध्ये काय दाखवलं, तेच फक्त करून दाखवत होतो. अनेकदा शाळेतल्या मुलांच्या मारामाऱ्यांचं कारण हे अशा घराघरात पाहिल्या जाणाऱ्या कार्टून शोमध्ये सापडतं, असा एक निष्कर्ष अमेरिकन संस्थेनं काढला आहे. इतकंच नाही तर त्यांच्या स्वभावातही बदल होतात. विन्क्स क्लब पाहणाऱ्या मुली शॉपिंगला गेल्या की इतक्या नखरे करतात, की विचारायची सोय नाही.

टॉम अँड जेरी हे त्याचं सगळ्यात भयंकर उदाहरण आहे. टॉम अँड जेरी हे सगळ्यात लोकप्रिय कार्टून आहे. ज्यात मांजर आणि उंदीर सतत एकमेकांचा पाठलाग करत असतात. त्यातला जेरी हा हुशार तर टॉम थोडा मूर्ख आहे. ते एकमेकाशी भांडताना वेगवेगळ्या शस्त्रांचा वापर करतात. जे हसू आणणारं असतं. मात्र प्रत्यक्षात मुलांच्या मनावर अशा गोष्टींचा होणारा परिणाम हा वाईटच असतो. मुलांचं निरागस भावविश्व उद्ध्वस्त करणारा असतो. सत्तरच्या दशकात अनेक क्लासिक कार्टून सेन्सॉर करून दाखवले जायचे. त्यावेळी काही देशांनी टॉम अँड जेरी दाखवण्यास मनाई केली होती. त्यावेळी टॉम अँड जेरी जरी तलवार, चाकू, बॉम्बचा वापर एकमेकांना मारण्यासाठी करत असले तरी त्यात ते मरत नाहीत, किंवा जखमी होत नाहीत, असा दावा करण्यात आला होता. पण मुलांना हा फरक कळणार कसा, यावर काही चर्चाच झाली नाही.

अमेरिकेत आता ॲनिमेशन हा काळजी करण्याचा विषय झाला आहे. भारतात अजून पालक त्यात हिंसाचार किंवा अश्लील गोष्टी नाहीत ना, एवढ्याच समाधानात आहेत. कॉमिक्स वाचणं ही खास अमेरिकन फॅशन भारतीय मुलांनाही लागली. मुलांसाठी स्ट्रीप्समध्ये कथानक रंगवणारी कॉमिक्स म्हणजे लाखामोलाचा ठेवा असायचा. मिकी माऊस, डोनाल्ड डक सगळ्यांच्या आवडीचे आहेतच त्याशिवाय डोरेमॉन, पॉवर पफ गर्ल, ही-मॅन, हे सगळ्यांच्याच बालपणीचा हिस्सा झाले आहेत. आता त्यात भारतीय कॅरेक्टरची भर पडली आहे. मोटू-पतलू, छोटा भीम, तेनाली राम, कृष्ण, गणेशा अशी अनेक अनेक पात्रं आपल्याकडच्या ॲनिमेशन इंडस्ट्रीचा भाग बनली आहेत. जशी इंग्रजीत ग्रीक पुराणातून थॉरसारखी पात्रं उभी केली, तसा आपल्याकडे छोटा भीम आहे. अनेकदा छोटी मुलं या छोट्या भीमच्या आवेशात वावरतात, बाल गणेशाशी गप्पा मारतात. आपल्याला त्या मुलांचं कौतुकही वाटतं. पण कल्पनांमधून रंगवलेली ही पात्रं या मुलांच्या मनावर वेगळा परिमाण तर करत नाही, याचा विचार करायला वेळ देत नाहीये.

जगात कार्टून पाहायला आवडत नाहीत, अशी मुलं नाहीत. किंवा मी कार्टून पाहणार नाही, असं म्हणणारी मुलंच बहुधा या जगात नाहीत. त्यामुळे छतावरून पडल्यावरही आपणही कोणत्यातरी प्राण्याप्रमाणे अलगद जमिनीवर उतरू असं त्याला वाटतं, त्या मुलाला कोण समजवणार! जोपर्यंत ही मुलं त्रास कोणाला देत नाहीत, तोपर्यंत आपणही त्यांनी असे शो पाहायला हरकत घेत नाही. कोवळ्या वयापासूनच ॲनिमेशनच्या रूपात हिंसाच पाहणाऱ्या भावी पिढीचं भवितव्य मात्र काळजी करायला लावणारं आहे.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१), गिरिजा अपार्टमेंट,
खेर सेक्शन, अंबरनाथ (पू) ४२१ ५०१
aparna.patil@gmail.com



# सायबर गोबेल्सचे आव्हान!

**गणेश देवकर**

**फेसबुक वापरा पण जपून**

- एफबीवर तुमचे लोकेशन अपडेट करू नका.
- वैयक्तिक फोटो, माहिती टाकू नका.
- नकारार्थी, चुकीचे, उग्र विचार मांडू नका.
- अनोळखी व्यक्तींची फ्रेंड रिक्वेस्ट टाळा.
- फ्रेंड लिस्ट वाढवण्याचा हव्यास टाळावा.
- आपल्या भावना पोस्ट करण्यापूर्वी दहा वेळा विचार करा.
- कुठलीही पोस्ट, फोटो लाइक तसेच शेअर करण्यापूर्वी दहा वेळा विचार करा.
- एफबीवरून मोबाईल नंबर देऊ नका.

**फेसबुकवर** दररोज नवीन सेल्फी अपलोड करणे, हॉटेलमध्ये जेवतानाचे-पिकनिकचे फोटो टाकणे, मित्रमैत्रिणी-सहकारी-नातेवाईकांचे फोटो लाईक करणे, त्यांनी टाकलेल्या फोटोंवर कमेंट टाकणे, कुणी अपडेट केलेले स्टेटस लाईक करणे हा सध्या आपण सर्वांचाच आवडता उद्योग. आवडत्या अभिनेत्यांचे काढलेले फोटो, प्रिय नेत्यांच्या टाळ्या खेचणाऱ्या घोषणा आणि नावडत्या नेत्यांची हुर्यो उडवणारी व्यंगचित्रे असाही मजकूर आपल्या पाहण्यात येत असतो. टीम इंडियाच्या खेळाडूंचे कौतुक, परदेशी खेळाडूंची टिंगल, देशाबाबत अभिमान वाढवणाऱ्या घटना, शत्रूदेशांची यथेच्छ हेटाळणी करणाऱ्या कमेंट्स आदींचा फेसबुकवर अक्षरश: मारा सुरू असतो.

फेसबुक अकाउंटशी जोडल्या गेलेल्या आपल्या फ्रेंड्सच्या 'ग्लोबल सोशल नेटवर्क'चे आपल्याला कोण कौतुक असते. यामुळे आपण क्षणार्धात सर्वांशी जोडले जात असतो; अवघे जग आपल्या मुठीत असते. लाईक केलेला फोटो किंवा केलेल्या कमेंटमधून कुणाची नाहक बदनामी, होणारा मन:स्ताप याची आपल्याला जराही फिकीर नसते. ही गमतीशीर व्यंगचित्रे, टिंगलटवाळी करणारे-खिल्ली उडवणारे मेसेजेस, मार्मिक भाष्य करणारे संदेश, मजेशीर कार्टून्स नेमकी कुणी टाकली असावीत, याचा विचार करण्याची आपल्याला गरजही वाटत नाही. स्मार्ट फोनधारक तर आपल्याला मिळालेल्या फोटोत काही तथ्य आहे का, समोर आलेली माहिती खरी आहे की खोटी, याची शहानिशा न करता 'फॉरवर्ड' आणि 'शेअर' करीत सुटतात. यातून लोकांची चांगलीच करमणूक होते. परंतु गोबेल्सच्या प्रचारनीतीप्रमाणे यातून हवा असलेला संदेश कमीत कमी कालावधीत लाखो लोकांच्या गळी उतरवला जात आहे, हे आपल्या लक्षात येत नाही. वास्तविक यातून कुणाचेतरी वारेमाप कौतुक किंवा प्रतिमा मलीन करण्याचे काम हेतुपुरस्सर केले जात असते. बदनामी करणारा कायद्याने दोषी असतोच, परंतु त्याने केलेल्या 'उद्योगां'ना लाईक किंवा त्यावर कमेंट करून आपणही त्याला एकप्रकारे खतपाणीच घालत असतो. यातूनच पुढे वाद निर्माण होतात. मागच्या वर्षी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर पालघरच्या दोन तरुणींनी फेसबुकवर पोस्ट



केलेल्या कमेंटमुळे शिवसैनिक असेच चवताळले होते. पुढे त्यांनी तरुणीच्या नातेवाईकाच्या हॉस्पिटलची तोडफोडही केली होती. अलिकडेच उत्तरप्रदेशातील मुझफ्फरनगरमध्ये उद्‌भवलेल्या दंगलीही फेसबुकवर टाकलेल्या छायाचित्रांमुळेच आणखी भडकल्या होत्या, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

***सायबर कायदा आणखी कठोर करण्याची गरज***

सध्या दर मिनिटाला २०.४१ कोटी इमेल्स पाठवले जात आहेत, दर मिनिटाला फेसबुकवर ६.८ लाख नवीन अकाउंट उघडले जात आहेत. दर मिनिटाला १ लाखापेक्षा अधिक ट्विट केले जात आहे, तर मिनिटाला ४८ तासांचे नवीन व्हीडिओज अपलोड होत आहेत. दर सेकंदाला २८ हजार २५८ इंटरनेट युजर्स पोर्नोग्राफी बघत असतात. एका दिवसात फेसबुकवर किमान अब्जावधी लोक लॉग-इन करीत असतात. एकट्या भारतातील फेसबुक युजर्सची संख्या ७.८ कोटींच्या पुढे गेली आहे तर जगभरात हीच आकडेवारी तब्बल ८० कोटींच्या घरात आहे. सोशल नेटवर्किंगवर सर्वांचा मुक्त संचार सुरू असतो. प्रत्येकाला आपण इंटरनेटचा वापर किती स्मार्टपणे करीत आहोत, याबाबत कमालीचे अप्रूप वाटत असते. परंतु या सायबर विश्वालाही कुठलीतरी नियमांची चौकट असेल, याचे त्यांना भान नसते. सायबर कायद्याबाबत ते पुरते अनभिज्ञ असतात. हे समजून घेतले नाही तर कळत-नकळत ते सायबर कायद्याच्या कचाट्यात सापडू शकतात.

सोशल मीडियात यापूर्वीही गुन्हे घडत होते. परंतु आता या घटना वेगाने समोर येऊ लागल्या आहेत. मुलींच्या अश्लील चित्रफिती सोशल नेटवर्कवर टाकणे, मुलींचे फेक अकाउंट बनवून त्यांना ब्लॅकमेल करणे, लग्नाच्या आमिषाने फसवणूक करणे, इंटरनेटवर क्रेडिट किंवा डेबिट कार्ड वापरून खातेधारकाला लुबाडणे, इमेल-वेबसाइट हॅक करणे आदी प्रकार आता मोठ्या संख्येने होताना दिसत आहेत. अगदी सुरुवातीच्या काळात कॉलेजमधील विद्यार्थ्यांकडून वेबसाइटवर अश्लील, आक्षेपार्ह छायाचित्रे टाकण्याच्या घटना समोर आल्या होत्या. मुलीने प्रेमासाठी नकार देणे, दोघांचे प्रेम तिसऱ्याला खटकणे आदी

**सायबर क्राइमचे बळी**

- दरवर्षी बळी पडणारे - ३७.८० कोटी
- दर दिवसाला बळी पडणारे - १० लाखांपेक्षा अधिक
- दर सेकंदाला बळी पडणारे - १२
- अनोळखी अकाउंटमधून आलेल्या आक्षेपार्ह फोटोंना बळी पडणाऱ्यांचे प्रमाण - ५०%
- मालवेअर, व्हायरस हॅकिंग, स्कॅम्स, ऑनलाइन फसवणुकीला बळी पडलेल्यांचे प्रमाण - ४१%
- व्यावसायिक आणि वैयक्तिक डेटा एकाच फाईलमध्ये साठवणाऱ्यांचे प्रमाण - २४

## कायद्याची माहिती

...तर तीन वर्षांचा तुरुंगवास!

भारतात माहिती-तंत्रज्ञान कायदा १७ ऑक्टोबर २००० पासून अमलात आला. मूळ कायद्याच्या मसुद्यात संसदेने काही महत्त्वाच्या सुधारणा २००८ साली केल्या होत्या. २००८ मध्ये संसदेने या दुरुस्त्यांना मान्यता दिल्यानंतर ५ फेब्रुवारी २००९ रोजी राष्ट्रपतींनी याला मान्यता दिली. त्यानंतर २७ ऑक्टोबर २००९ पासून सुधारित माहिती आणि तंत्रज्ञान कायदा अमलात आला. या कायद्यानुसार दोषी व्यक्तीला ३ वर्षांची शिक्षा आणि पाच लाखांचा दंड होऊ शकतो.

● इंटरनेटवर या गोष्टी गुन्हा ठरतात -

संगणक किंवा मोबाईलच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण करून केल्या जाणाऱ्या गुन्ह्यांना सायबर गुन्हे म्हणतात. अनेकदा माहितीची ही देवाणघेवाण अजाणतेपणी केलेली असते, तर कधीकधी काही गोष्टी जाणीवपूर्वक अपलोड केल्या जातात. त्यातून पुढे समाजात तणाव निर्माण होतो. इतरांच्या क्रेडिट-डेबिट कार्डमधून पैसे चोरणे, पैशांची अफरातफर करणे, डेटा थेप्ट, हॅकिंग, आक्षेपार्ह एसएमएस किंवा एमएमएस पाठवणे आदी गोष्टीही सायबर गुन्हा या सदरात मोडतात. अलिकडे इमेल किंवा एसएमएस करून एखाद्याला लॉटरी किंवा परदेशात नोकरीचे आमिष दाखवून लुबाडले जाते किंवा एखाद्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून फसवले जाते. याचाही समावेश सायबर गुन्ह्यांमध्ये होतो.

● तक्रार करण्याची प्रक्रिया -

इंटरनेटवर झालेल्या फसवणुकीबाबत सायबर पोलिस स्टेशन किंवा सायबर सेलमध्येच तक्रार नोंदवावी, असा दंडक नाही. तुमच्या हद्दीतील कोणत्याही पोलिस स्टेशनमध्येही सायबर गुन्ह्यांसंदर्भात तक्रार नोंदवता येते. त्यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये व्यवस्था केलेली असते. तक्रार नोंदवताना पुराव्यासाठी आलेला मेसेज, फोटो किंवा एमएमएस सोबत असावा लागतो. फेक अकाउंटची तक्रार करताना पोलिसांना तक्रारीसोबत त्याचे प्रिंटआऊट आणि यूआरएल सादर करावी लागते.

● फौजदारी, दिवाणी खटल्यांबाबत असलेले नियम आणि शिक्षा -

- विडंबनात्मक, अश्लील, बदनामीकारक, जातीवाचक, राष्ट्रद्रोही मजकूर किंवा फोटो पोस्ट करणे, असा फोटो किंवा मजकूर लाइक करणे, त्यावर कमेंट करणे आयटी अ‍ॅक्ट २००० नुसार गुन्हा आहे.

- सायबर गुन्ह्यांसंदर्भात भारतीय दंडविधान संहिता कलम ४२० अंतर्गत फसवणुकीचे गुन्हे दाखल केले जातात. दोषी व्यक्तींवर कलम ६६ (अ), कलम ६६ (क), कलम ६६ (ड), कलम ६६ (ई), कलम ६७ अ नुसार कारवाई केली जाते.

- बदनामीकारक इमेल किंवा एमएमएस पाठवणाऱ्यावर कलम ६६ (अ) अंतर्गत कारवाई केली जाते. यासाठी तीन वर्षे कैद किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा सुनावली जाऊ शकते.

- एखाद्या व्यक्तीने दुसऱ्याची वैयक्तिक माहिती वापरली असेल तर त्याला कलम ६६ (क) अनुसार ३ वर्षांची कैद आणि एक लाखापर्यंत दंड होऊ शकतो.

- एखाद्याने दुसऱ्याची माहिती वापरून फसवणूक केली असल्यास कलम ६६ (ड) अनुसार त्याला ३ वर्षांची

कारणांमुळे हे गुन्हे घडलेले होते. सायबर कायद्यानुसार नोंदवलेल्या केसेस पाहिल्यास ९९ टक्के प्रकरणांत मुलींचे फेक अकाउंट बनवून त्याचा गैरवापर केल्याचे समोर आले आहे. देशाच्या कोणत्याही भागातून फेक अकाउंट बनवून त्यावर आक्षेपार्ह पोस्ट, छायाचित्रे अपलोड करता येऊ शकतात. इंटरनेटचे जाळे देशभरच नव्हे तर जगभर पसरलेले आहे. कुठेही बसून स्मार्टफोन, कम्प्युटर, लॅपटॉपच्या साहाय्याने अपलोड केलेला फोटो किंवा पोस्ट काही क्षणांत जगभर पोचत असतो.

पूर्वी पोलीस प्रशासन याकडे विशेष गांभीर्याने पाहत नव्हते, परंतु आता प्रकरणे अगदी मोर्चे, हाणामारी आणि खुनापर्यंत पोचली आहेत. तणावातून दंगली, दगडफेक होत आहे. यामुळे कायदा आणि सुव्यवस्था कोलमडून पडत आहे. राजकीय पक्षही यावर आपली पोळी भाजून घेऊ लागले आहेत. ही प्रकरणे मीडिया लावून धरीत असल्याने सरकारला याची दखल घेऊन सध्याचा सायबर कायदा आणखी कठोर करावा लागणार आहे.

### *वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्यास ट्रेस करण्याचे दिव्य*

सोशल नेटवर्किंग वेबसाईटवर वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्याला शोधणे अतिशय जिकिरीचे असते. सर्वप्रथम पीसी किंवा लॅपटॉपच्या आयपी अ‍ॅड्रेसवरून त्या व्यक्तीपर्यंत

कैद किंवा १ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

– एखाद्या व्यक्तीच्या खासगी अंगाचे विनापरवानगी चित्रीकरण व प्रदर्शन करणाऱ्याला कलम ६६ (ई) अनुसार ३ वर्षांची शिक्षा किंवा दोन लाखांचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

– अश्लील चित्रांचे प्रसारण करणारा कलम ६७ अंतर्गत दोषी ठरल्यास त्याला ३ वर्षांची शिक्षा व पाच लाखांचा दंड होऊ शकतो.

● सायबर सेलचे विभाग –

– सायबर सेलचे काम तीन विभागांत चालते. सायबर पोलिस स्टेशन, सायबर लॅब आणि इनहाऊस फॉरेन्सिक लॅब असे हे विभाग आहेत.

– इनहाऊस फॉरेन्सिक लॅबमध्ये न्यायवैद्यक तज्ज्ञांच्या साहाय्याने सायबर गुन्ह्यांचा छडा लावला जातो. सायबर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदवले जातात.

– सायबर लॅबमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना तपासासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. डेटा सिक्युरिटी काउन्सिल ऑफ इंडियाचे दोन अधिकारी आणि तज्ज्ञ पोलिस अधिकारी प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवतात. हे प्रशिक्षण आठवडाभराचे असते.

● सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती –

शाळा, कॉलेजेस अशा विविध ठिकाणी सायबर सेफ्टी वीकसारखे कार्यक्रम राबवले जातात. याशिवाय सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्यासाठी लोकांनी कशाप्रकारे खबरदारी घ्यावी, आदी बाबी समजावून सांगितल्या जातात. जनजागृतीसाठी आवश्यक सर्व माहिती मुंबई पोलिस दल आणि सायबर क्राईम सेलच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे.

● फेसबुक आणि व्हॉट्स ॲपवर अपलोड होणाऱ्या मजकुरावर देखरेख–

सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकुराला वेसण घालण्याचे काम सायबर सेलच्या सोशल मीडिया लॅबतर्फे केले जाते. येथील तज्ज्ञ पोलिस अधिकारी सतत नेट पेट्रोलिंग करून आक्षेपार्ह मजकुरावर नजर ठेवतात. एखाद्या व्यक्तीने आक्षेपार्ह मजकूर टाकल्याचे या टीमच्या लक्षात येताच संबंधितावर सायबर गुन्ह्यांतर्गत कारवाई केली जाते. त्याच्यावर माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाई केली जाते. सोशल नेटवर्किंगवर आक्षेपार्ह मजकुरासंदर्भात काही तक्रार असल्यास मुंबई पोलिसांतर्फे नुकतीच ९८२०८१०००७ ही हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. फोन किंवा एसएमएसच्या माध्यमातून इथे तक्रार करता येते.

● बऱ्याचशा सोशल नेटवर्किंगचे सर्व्हर परदेशात असतात. तेथे अपलोड केलेला आक्षेपार्ह मजकूर काढून टाकण्याची प्रक्रिया –


व्हॉट्स ॲप, फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंगचे सर्व्हर परदेशात असल्यामुळे या साईट्सवर अपलोड केलेला आक्षेपार्ह मजकूर काढण्यासाठी परदेशात संबंधित कंपनीशी संपर्क साधावा लागतो. आक्षेपार्ह मजकुराबाबत पोलिस इमेलद्वारे संबंधित कंपनीकडे विचारणा करतात. त्या कंपन्या पोलिसांना कसा प्रतिसाद देतात यावर पुढील तपासाची गती अवलंबून असते. गंभीर प्रकरण असेल तर अधिकाऱ्यांना त्या कंपनीच्या कार्यालयाला भेटही द्यावी लागेत. त्या देशासोबत असलेल्या परराष्ट्र संबंधांनुसार कारवाईसाठी मिळणारा प्रतिसाद अवलंबून असतो.

पोचावे लागते. संबंधित अकाउंट ब्लॉक करून फेसबुक अकाउंटच्या साहाय्याने आयपी ॲड्रेस शोधून काढावा लागतो. त्यायोगे हे अकाउंट बनवणाऱ्यांचे धागेदोरे हाती लागतात. पुढील कारवाईसाठी वापरलेले कनेक्शन एमटीएनएल, एअरटेल, वोडाफोन वा इतर कोणत्या कंपनीचे आहे, याची माहिती मिळवावी लागते. पोस्ट अपलोड केलेली तारीख आणि वेळ कंपनीच्या मदतीने शोधून काढावी लागते. त्या व्यक्तीचे नाव आणि पत्ता मिळवण्यासाठी त्या-त्या कंपनीची मदत घेतली जाते. याबाबत आवश्यक पत्रव्यवहार करून भेटीगाठी घ्याव्या लागतात. हे काम वाटते तितके सोपे नसते.

माहिती-तंत्रज्ञानाचे विश्व वेगाने बदलत असते. तंत्रज्ञान अपग्रेड होत असते. यात फसवणूक करणारेही चतुर बनले आहेत. दुसऱ्याच्या सर्व्हरचा वापर करून ते हवा तो मजकूर वेबसाईटवर अपलोड करीत असतात. काहीजण यासाठी प्रॉक्सी सर्व्हरचा वापर करतात. कधी कधी यासाठी ते भारताऐवजी रशिया किंवा नायजेरियामधील सर्व्हर वापरतात. अशा प्रकरणात गुन्हेगाराला पकडणे खूपच कठीण असते. प्रॉक्सी सर्व्हर ओळखायचा असेल तर तपास अधिकारी तसेच इन्व्हेस्टिगेटरला आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक असते. यासाठी त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण द्यावे लागते.

***वेगाने बदलणाऱ्या आयटी तंत्रज्ञानाचे आव्हान***

पोलिसांना अनेकदा नवीन टेक्नॉलॉजीची माहिती नसते. सध्या आपण एन्ड्रॉईडचे फोन वापरत आहोत, आता आयफोनचा वापर सुरू झाला आहे. काही काळाने आणखी वेगळी टेक्नॉलॉजी बाजारात येईल. सध्या व्हॉट्स ॲप, व्हायबर, स्काइप युज आणि टेलेग्राम यासारखे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. काही दिवसांनी (wickr) विकर हे अजब सॉफ्टवेअर बाजारात येणार आहे. यात मेसेज पाठवल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत पाठवणारा आणि वाचणारा या दोघांच्या मोबाईलमधून तो आपोआप डिलिट होणार आहे. अशा सॉफ्टवेअरमुळे मेसेज पाठवणाऱ्यांचा शोध घेणे आणखी कठीण बनणार आहे. या अडचणींना सामोरे जाताना सायबर सेलला इन्व्हेस्टिगेटरची मदत घ्यावी लागते. पोलिसांना बाजारातील नवीन टेक्नॉलॉजीबाबत अपडेट करावे लागते. फेसबुकवर केलेल्या गुन्ह्यांचा तपास तुलनेत सोपा असतो, परंतु व्हॉट्स ॲपवर आक्षेपार्ह पोस्ट, छायाचित्रे अपलोड करणाऱ्यांचा छडा लावणे खूपच अशक्य असते.



**फक्त एका मिनिटात...! :**

- २०.४१ कोटी इमेल्स पाठवले जातात.
- २० लाखांपेक्षा जास्त शंका गुगलला विचारल्या जातात.
- ६.८ लाख नवीन अकाउंट फेसबुकवर उघडले जातात.
- १.५ कोटींचे ऑनलाइन शॉपिंग केले जाते.
- १ लाखापेक्षा जास्त ट्विट केले जातात.
- ४७ हजार ॲपलचे ॲप्स डाऊनलोड केले जातात.
- ३४,७२२ लाईक्स ब्रँड आणि कंपन्यांना फेसबुकवर मिळतात.
- ४८ तासांचे नवीन व्हीडिओज अपलोड होतात.
- ५३१ नवीन वेबसाईट लाँच होतात.
- ३४७ नवीन ब्लॉग वर्ल्ड प्रेसवर पोस्ट होतात.

सायबर गुन्हेगारांना पकडल्यानंतर त्यांच्यावर कायद्याच्या विविध कलमांनुसार खटले चालवले जातात. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सध्या मुंबईत चार सायबर सेल आहेत. पश्चिम विभागासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील पोलिस स्टेशन, मध्य विभागासाठी ठाणे पोलिस स्टेशन, हार्बर विभागासाठी बेलापूर पोलिस स्टेशन आणि या सर्वांसाठी प्रमुख कार्यालय म्हणजे चर्चगेटचे पोलिस स्टेशन अशी या चार सेलची रचना आहे. नुकताच सायबर क्राइम डिपार्टमेंटने सोशल मीडिया लॅब हा नवीन विभाग चर्चगेटच्या सीबीआय ऑफिस इमारतीत सुरू केला आहे. २०१३ साली सुरू केलेल्या या लॅबमध्ये २४ तास दोन शिफ्टमध्ये काम चालते. आठ ते दहा पोलिसांची टीम सायबर क्राइम मॉनिटरिंगचे काम करीत असते. सोशल मीडियावर कुठे काही आक्षेपार्ह पोस्ट, छायाचित्रे आढळल्यास त्याची माहिती त्वरित सायबर

सेलला दिली जाते. याचा माग काढण्याचे काम सोशल मीडिया लॅबकडून केले जाते.

***प्रशिक्षण आणि अनुभवातून कायद्यात आवश्यक बदल***

आज सायबर गुन्हे हा प्रांत आपल्या सर्वांसाठी नवा आहे. भारतात इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी कायदा २००० साली अस्तित्वात आला. २००८ मध्ये त्यात गरजेनुसार बदल करण्यात आले. २०११ मध्ये त्यात नव्या नियमांची भर टाकण्यात आली. यात पोर्नोग्राफीसंबंधी ४ ते ५ सेक्शन आहेत तर सोशल मीडियातील पोस्टसाठी स्वतंत्र सेक्शन्स आहेत. डेटा चोरी, मोठमोठ्या कंपन्यांची सॉफ्टवेअर बनवून सोर्सकोड चोरणे यासाठी वेगळे सेक्शन्स आहे. कोर्टातील न्यायाधीश आणि वकिलांनाही सायबर गुन्ह्यांबाबत प्रशिक्षण द्यावे लागते. सायबर कायद्यानुसार कारवाई करणारे पोलिसही अनुभवातून शिकत आहेत. अनुभवाच्या आधारे येत्या काळात या कायद्यात आवश्यक बदल करावे लागणार आहेत, तसेच नियम अधिक कठोर करावे लागणार आहेत. कायद्याची माहिती होण्यासाठी भविष्यात रेल्वे, कॉर्पोरेट सेक्टर, नेटबँकिंग, सीएंच्या संघटना यातील कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा घ्याव्या लागणार आहेत. शाळा, कॉलेज, खासगी कंपन्या आणि आस्थापनांसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे लागेल. गरजेनुसार मुलांना एथिकल हॅकिंग आणि सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेशनचे प्रशिक्षणही द्यावे लागेल.

सायबर गुन्हेगारांपासून वाचण्यासाठी लोकांनाही पुरेशी खबरदारी बाळगावी लागेल. सर्वप्रथम आपले व्हायफाय सुरक्षित करणे आवश्यक आहे. आपल्या इमेल, फेसबुक अकाउंटच्या सुरक्षेचीही पुरेशी काळजी घेतली पाहिजे. अनेक वेबसाईट्सवर ही माहिती पिक्चरच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने दिली जाते. सायबर कायद्यानुसार तक्रार कशी नोंदवायची, याची प्रक्रियाही या वेबसाईटस्वर दिली जाते. फेक अकाउंटची तक्रार करताना पोलिसांना तक्रारीसोबत त्याचे प्रिंटआऊट आणि यूआरएल सादर करावी लागते. लोकांच्या मदतीसाठी पोलिसांनीही 'सायबर हेल्पलाइन इंडिया' ही हेल्पलाइन सुरू केली आहे.

सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण पाहता येत्या काळात प्रत्येक पोलिस ठाण्यात सायबर सेल सुरू करावा लागणार आहे. सायबर गुन्हे सोडवण्याची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आहे. त्यामुळेच याला तोंड देताना सरकार, पोलिस आणि जनतेला हातात हात घालून काम करावे लागणार आहे. सायबर गुन्ह्यांपासून बचाव करायचा असेल तर याबाबत अधिकाधिक माहिती मिळवणे हाच एक उपाय आहे. भारतात याबाबत जागृतीची खूप गरज आहे. या कायद्याबाबत लोकांचे ज्ञान, माहिती जितकी वाढेल तितका त्याचा वापर वाढणार आहे. त्यामुळे आपला सायबर कायदा अधिक ताकदवान आणि प्रभावी होण्यास मदत होईल.



**फेसबुकला कायमचा बाय-बाय!**

शाळा, कॉलेजमध्ये तर चॅटिंगच्या माध्यमातून तरुणींना जाळ्यात ओढण्यासाठी फेसबुक हे माध्यम बनले आहे. त्यामुळे न पाहिलेल्या लोकांशी चॅटिंग करताना, त्यांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना आपण सजग राहायला हवे. ज्या प्रगत देशांतून आपल्याकडे हे पीक फोफावले तेथील सुजाण नागरिकांनी वेळीच यापासून होणारा धोका ओळखला आहे. यामुळेच बहुतांश देशांतील नागरिक आपले खासगी आयुष्य आता 'खासगी' राहणार नाही, या भीतीने कायमचे फेसबुकवरून 'लॉग आऊट' होत आहेत. २०१० मध्ये अमेरिकेतल्या ३० जे ३५ हजार युजर्सनी एकाच दिवशी कायमचे 'लॉग आऊट' होणे पसंत केले होते. भारतात मात्र सध्या याच्या उलट चित्र आहे. शेजारी कोण राहते हे माहीत नसणारी आजची पिढी हजारो किलोमीटर दूर असणाऱ्या ऑनलाइन फ्रेंण्डला सकाळी सकाळी गुड मॉर्निंग करायला मात्र विसरत नाही.

**- गणेश देवकर**
अष्टगंधा, डी-३२, रुम नं.३,
सेक्टर-४८, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६
भ्रमणध्वनी : ९९३०३६०५२२
devkar.ganesh156@gmail.com

# यशवंतराव गडाख यांची अभिजात पुस्तके




## अर्धविराम

आत्मचरित्र यशवंतराव गडाख
या एका व्यक्तीचे नसून,
अंगी दुर्दम्य उत्साह व सर्जनशील
जोष असलेल्या, परिवर्तनाच्या
प्रक्रियेची प्रगल्भ जाण असलेल्या
आणि मातीतून आलेल्या
शहाणपणाची जोड असलेल्या
त्या काळातील टिपिकल अशा तरुण
काँग्रेस कार्यकर्त्याच्या/पुढाऱ्याच्या
प्रवासाचा हा सहृदय आलेख आहे.

**– अरुण साधू**


किंमत : २८० रु.
पृष्ठे : २०८




## सहवास

'सहवास' या पुस्तकात त्यांनी आपलं
गाव, निसर्ग आयुष्यात भेटलेली
माणसं, यांच्या नातेसंबंधाचा नितळ
मनानं शोध घेतला आहे.
यातून त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचा
प्रत्यय येतो. आपणही
त्या काळात हरवून जातो.

किंमत : १६० रु.
पृष्ठे : १७६




## अंतर्वेध


आमचे मित्र यशवंतराव गडाख
पाटील हे सात्विक माणुसकीची
शांतपणे आराधना करणारे, शुचितेचे
वारकरी आहेत. हा वारकरी पंथ
त्यांनी साहित्यलेखनातून धरलेला
दिसतो! 'अंतर्वेध' हे त्यांचे नवे
पुस्तक, त्यांच्यातील साहित्यिकाचा
पुनःप्रत्यय आणून देणारे आहेच,
शिवाय भवतालाकडे, तेथील
भल्याबुऱ्या, साध्यासुध्या माणसांकडे,
आपल्या रक्ताच्या गणगोताकडे ते
कोणत्या विशाल नजरेने पाहतात, ते
पुन्हा एकवार जाणवून देणारे आहे.

**– मधु मंगेश कर्णिक**

किंमत : १८० रु.
पृष्ठे : १८८

ऋतुरंग
प्रकाशन

**अरुण शेवते**
बी-१०२, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४



# इंटरनेटवरील उचलेगिरी

**तनुश्री संदेश राणे**

**जगभरात** सर्वत्र जे लेखन प्रकाशित केले जाते, छापले जाते त्याचे लेखाधिकार म्हणजेच कॉपीराईट (Copyright) कोणाजवळ आहेत, याची नोंद त्या पुस्तकाच्या आतील पानावर केलेली असते. जेणेकरून ते लेखन प्रकाशित करण्याचा, पुनर्मुद्रित करण्याचा, रचनात्मक मालकी हक्क त्या व्यक्ती वा संस्थेजवळ असतो. ते लेखन अनुवादित करणे, दुसऱ्या कोणत्याही उद्दिष्टांसाठी वापरणे, त्यावर नाटक, चित्रपट अशा रचनात्मक कलाकृती तयार करून सादर करणे या सर्व गोष्टींसाठी कॉपीराईटचे मालक असणाऱ्यांची परवानगी आवश्यक असते.

इंटरनेट म्हणजे माहितीच्या महाजालावर अनेक विषयांवर अनेक प्रकाराने केलेले लेखन सहज वाचायला मिळते, ऐकायला मिळते. त्या विषयावरील फिल्म्स सहज उपलब्ध होतात. जगभरातील असंख्य विषयांवरील माहिती, पुस्तके डाऊनलोड करून आपल्याजवळ ठेवता येतात. संदर्भासाठी वापरता येतात. या कारणांमुळेच सायबरविश्वात कॉपीराईटबद्दलचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

अगदी उदाहरण द्यायचे झाल्यास, मला एखाद्या व्याख्यानासाठी तयारी करायची असेल तर मी ज्या विषयावर बोलणार आहे त्या विषयासंबंधित शब्द किंवा व्यक्तीचे नाव जर मी एखाद्या सर्च इंजिनवर टाकले तर माझ्या संगणकाच्या स्क्रीनवर लिंक्स, साईट्सची यादीच मिळते. माझ्या विषयासंबंधित जगभरात इंटरनेटवर उपलब्ध लिखाण, विचार, पुस्तके माझ्या संगणकावर उतरवून घेता येतात. त्यातील मला आवडलेले मुद्दे, विचार मी माझ्या भाषणात वापरू शकते. मी ते भाषण श्रोत्यांसमोर सादर केल्यावर त्यांना हे माझेच विचार आहेत असेही वाटू शकते.

दोन वर्षांपूर्वी 'द सिडनी मॉर्निंग हेराल्ड' या वृत्तपत्रातून स्तंभलेखन करणाऱ्या एका मनोविकारतज्ज्ञाला, त्याने लिहिलेले सात लेख, 'द न्यू यॉर्क टाइम्स' व 'द ऑस्ट्रेलियन' या वृत्तपत्रांतून उचलले आहेत, या मुद्यावरून वाचकांची, संपादकांची व प्रकाशकांची माफी मागावी लागली होती.

वरील प्रकार प्लॅगियारिझम (Plagiarism) अर्थात वाङ्मयचौर्याचा, साध्या भाषेत उचलेगिरीचा, प्रकार म्हणावा लागेल. इंटरनेटवरून उचलेगिरी करणे कोणालाही सहज सोपे झालेय म्हणून हा लेखनप्रपंच.

खरे तर, माझे भाषण तयार करताना मी काही मुद्दे, कल्पना, मोठ्या व्यक्तींची वक्तव्ये संदर्भासाहित वापरू शकते. जसे इतिहासातील घटना किंवा व्यक्ती यांवर लेखन करत असताना संग्रहित मजकुराचा वापर करणे आवश्यकच असते. पूर्वी आपण अशा अभ्यासासाठी ग्रंथालयातील पुस्तकांची मदत घेत असू. तेच आता मोठ्या प्रमाणावर इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे. परंतु म्हणून माझे संपूर्ण भाषण तयार करताना जर मी चार वेगवेगळ्या पुस्तकांतून अथाव साईट्सवरून मजकूर जसाच्या तसा उचलून वापरत असेन, आणि त्यात जर माझी प्रतिभा, माझे चिंतन-मनन आणि आकलनाने तयार झालेली माझी मते कुठेच दिसत नसतील तर ती उचलेगिरीच होईल.

ज्या काळात लिखाण छापील स्वरूपातच असायचे म्हणजे संगणक, इंटरनेट जगात अवतरण्यापूर्वी, तेव्हाही दुसऱ्याचे विचार, कल्पना, लेखन, संशोधन इत्यादी स्वतःचेच म्हणून वापरण्याचे, पसरवण्याचे प्रकार घडत असतीलच; परंतु स्वतःचे म्हणून छापून आणण्याचे प्रकार कमी असावेत किंवा आपण असे म्हणू, तसे केले तर करणाऱ्याला शोधता येण्याची शक्यता होती. इंटरनेटच्या या Copy आणि Paste युगात अशा व्यक्तीला शोधणे कठीण झालेय. तसेच कोणत्याही प्रकारच्या लेखनाबद्दल अस्सलतेचा मुद्दा विचारात घ्यावा लागतो.

Plagiarism अर्थात उचलेगिरी हा गंभीर गुन्हा म्हणून मोजला जात नसला तरी शैक्षणिक, साहित्यिक विश्वात तो गंभीर नैतिक अपराध समजला जातो. कॉपीराईट ॲक्ट १९५७, ट्रेडमार्क ॲक्ट १९९९ इत्यादी कायदे अशा तऱ्हेच्या गुन्ह्यांसाठी वापरले जातात. कॉपीराईट ॲक्ट १९५७ साली कलम ५१, ६३, ६३(अ) अनुसार फौजदारी तक्रार जवळच्या पोलिस ठाण्यात दाखल करता येते. खरेच तसे केल्याचे सिद्ध झाल्यास त्या व्यक्तीला कमीत कमी ६ महिने ते ३ वर्षे तुरुंगवास आणि ५० हजार रुपये ते २ लाख रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते.

आज इंटरनेटवर जी प्रचंड माहिती उपलब्ध आहे ती देवनागरी लिपीच्या तुलनेत इंग्रजी लिपीतून जास्त आहे. मराठी, देवनागरी लिपीतील फॉन्ट (Font) हा मुख्य मुद्दा असल्याने कोणी इंटरनेटवरून मराठी लेखन Copy व Paste करून तयार केल्याचा प्रकार ऐकिवात नाही, परंतु इंटरनेटवरील मजकूर, मग तो कोणत्याही भाषेतील असेल, त्या विषयावरील विचार, कल्पना मराठीत भाषांतरीत करून मांडता येणे शक्य आहे.

इंग्रजी भाषेतून लेखन करणाऱ्यांसाठी, इंटरनेटवर उपलब्ध असलेली प्रचंड माहिती आणि Copy व Paste सारखी साधी सोपी कृती वापरून, स्वतःचा लेख अधिक चांगला, नाविन्यपूर्ण बनवता येतो. पण मग अस्सल लेखनाची शक्यता कमी होते. या सर्वांवर उपाय म्हणून इंटरनेटवरची 'Plagiarism Detection Software' वापरायला मिळतात. उदाहरणार्थ, www.smallseotools.com या साईटवर गेल्यास तुमचा लेख, स्तंभलेखन किती अस्सल आहे, हे स्वतःच तपासता येते.

www.smallseotools.com या साईटवर 'Copy your text here' लिहिलेल्या जागेत स्वतःच्या लेखातील परिच्छेद Copy-Paste करायचे आणि 'Check' करण्याची आज्ञा दिल्यावर थोड्याच वेळात ते सॉफ्टवेअर तुम्हाला संपूर्ण इंटरनेटविश्वात हिंडून लेखाच्या अस्सलतेचे प्रमाण किती टक्के आहे ते दाखवते. एवढेच नव्हे, तर काही भाग इंटरनेटवरून उचलला असेल तर तो कुठून, कोणत्या साईटवरून उचलला, त्या संदर्भातील सर्व तपशील दाखवते. अगदी पाहिजे असल्यास त्याचा अहवाल (Report) सादर करते. आता आपण छापण्यास देत असलेला लेख किती प्रमाणात 'अस्सल' असावा हा त्या लेखकाचा आणि प्रकाशकाचा मुद्दा आहे. सर्वसाधारणपणे ऐंशी टक्के 'अस्सल' असलेला लेख उत्तम समजावा.

आशा तऱ्हेने Plagiarism check अर्थात इंटरनेटवरील उचलेगिरीला आळा घालण्यासाठी अनेक साईट्स उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, sourceforge.com, plagscan.com, plagchecker.com इत्यादी. गुगलवर शोधल्यास अजून नावे सापडतील. काही साईट्सवर पैसे भरून किंवा इमेल-आयडी वगैरे देऊन कायम सभासद होता येते, तर काही ठिकाणी ही सेवा विनामूल्य आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचा निबंध स्पर्धेसाठी पाठवण्यापूर्वी, वृत्तपत्रांतील लेखकांनी, प्रकाशकांनी कोणतेही पुस्तक छापण्यापूर्वी अशा साईटचा निश्चितपणे उपयोग करावा, त्यामुळे उचलेगिरीला आळा बसू शकेल. अस्सल कामाला जास्त न्याय आणि प्रसिद्धी मिळू शकेल.

स्वतःचे शोधनिबंध सादर करणाऱ्या M.Phil. किंवा Ph.D. सारख्या उच्च शिक्षणातील पदवीसाठी धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विद्यापीठांसाठी या सॉफ्टवेअरचा चांगला उपयोग होऊ शकतो. युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनने (UGC) तर सर्व कॉलेजेस आणि विद्यापीठांना शोधनिबंधाच्या अस्सलतेची तपासणी करून मगच तो शोधनिबंध, संशोधन ग्राह्य समजण्यासंबंधी सूचना जारी केल्या आहेत.


मराठी किंवा देवनागरी लिपीतही Plagiarism check करणे आता शक्य झाले आहे. Plagiarisma.net या साईटवर इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजरातीच नव्हे अगदी संस्कृत भाषा धरून जवळजवळ १९० भाषांतील तपास शक्य आहे. मराठी भाषेतील PDF, DOC, DOCX, RTF, ODT, TXT, HTML या कोणत्याही प्रकारातील फाईल अपलोड करून अस्सलतेचे प्रमाण शोधून काढणे शक्य आहे.

आपले लिखाण PDF writer वापरून फक्त वाचता येईल या पद्धतीने सादर करावे म्हणजे कोणीही आपला लेख उचलेगिरीने वापरू शकणार नाही.

संदर्भासाठी :

१. सर्वसामान्यांसाठी सायबर गुन्हे व सायबर कायदा - ॲड. प्रशांत माळी
२. www.khandbahale.com
३. www.imediaethics.org

**- तनुश्री संदेश राणे**
बी-२०३, गोराई मंगलमूर्ती अपार्टमेंट,
प्लॉट नं.५, गोराई ३, लोकमान्य टिळक रोड,
बोरिवली (प), मुंबई ४०००९२.
tanushreerane@hotmail.com



# ‘कॅश’लेसच्या दिशेने...

**मोहन टांकसाळे**

मुख्य कार्यकारी अधिकारी, भारतीय बँक संघ

**आजची तरुणाई ही इ-बँकिंगवर भर देणारी असली तरी समाजातील बराच मोठा वर्ग अजूनही रोखीने व्यवहार करण्यालाच प्राधान्य देतोय. जोपर्यंत ग्राहक गरज असेल तेव्हा इ-बँकिंगचा उपयोग करून आपल्या खात्यातील पैशांचा वापर करणार नाही तोपर्यंत ग्राहकांची मानसिकता बदललीय असे म्हणता येणार नाही.**

‘बँकिंग’ हे एक असे क्षेत्र आहे ज्याच्याशी जवळपास प्रत्येकाचा काहीना काही कारणाने संबंध हा येतोच. अनेक आर्थिक व्यवहार मग ते वैयक्तिक असोत वा उद्योगधंद्याशी संबंधित, ते बँकेच्या माध्यमातूनच केले जातात. विविध सरकारी योजनांचा लाभ घ्यायचा तरी बँकेत खाते उघडावेच लागते. भारतात प्राचीन काळापासून बँकिंग अस्तित्वात आहे. ब्रिटिशांची राजवट येण्याआधी आपल्याकडे सावकारी पद्धत होती. ब्रिटिश राजवटीत ईस्ट इंडिया कंपनीने बँकरच्या रूपात आपले कामकाज चालवले आणि १७१७ साली हिंदुस्थान बँकेची स्थापना झाली. त्यानंतर १८व्या शतकाच्या शेवटी आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी अनेक भारतीय बँका अस्तित्वात आल्या. मात्र बँकिंगला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती १९६९च्या सुमारास. स्थानिक सावकाराच्या विळख्यातून सर्वसामान्यांना बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने १९६९ साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यास सुरुवात केली. राष्ट्रीयीकरणामुळे बँकांना त्यांच्या सेवांचा तसेच शाखांचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याची संधी मिळाली. ग्राहकांना सेवा देताना सुरुवातीच्या काळात बँकेमार्फत वापरले जाणारे तंत्रज्ञान हे तसे कामचलाऊ होते. म्हणजे काही ऑटोमॅटिक लेजर पोस्टिंग मशिन्स आणि कॅलक्युलेटर्स, जे मॅन्युअली ऑपरेट केले जायचे. यात खरी क्रांती आली ती १९८८ साली, रंगराजन समितीने बँकिंग सेवेत संगणकीकरणाची शिफारस केली तेव्हा. सुरुवातीला काही व्यवहार संगणकावर आणत मग सर्वच कामे बँका संगणकाच्या मदतीने करू लागल्या. संपूर्ण संगणकीकरणानंतर बदललेल्या बँकिंगशी सरावतानाच म्हणजे साधारण २००० नंतर ‘कोर बँकिंग’ हे नवीन वरदान ग्राहकांना प्राप्त झाले. कोर बँकिंग म्हणजे एकाच बँकेच्या विविध शाखा, अनेक क्षेत्रीय, आंचलिक व मुख्य कार्यालये, सॉफ्टवेअर एकमेकांना जोडणे. यासाठी प्रथम शाखांचे संपूर्ण संगणकीकरण केले

गेले. यामुळे बँकेच्या कामकाजात गतिमानता आली. व्यवहारांत अचूकता तसेच पारदर्शकता वाढली. या कोर बँकिंगचा पुढचा टप्पा म्हणजेच इ-बँकिंग.

*इ-बँकिंग म्हणजे काय?*

अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बँक आपल्या ग्राहकांना जी सेवा पुरवते त्याला 'इ-बँकिंग' असे म्हणतात. आज अनेक राष्ट्रीय तसेच सहकारी बँकांनी कात टाकत आर्थिक व्यवहारांत आधुनिकता आणली आहे. इसीएस, सीएमएस, एनइएफटी किंवा आरटीजीएस अशा पर्यायांमुळे ग्राहकांना पूर्वीपेक्षा अधिक 'अॅडव्हान्स' आणि 'अपडेट' राहणं शक्य झालं आहेच, शिवाय बँकेचे सर्वसाधारण व्यवहार हे बँक वेळेत केव्हाही आणि कुठूनही करणे शक्य झाले आहे. अशा या इ-बँकिंगचे काम कसे चालते हे समजून घेणे तितकेच गरजेचे आहे. इ-बँकिंग ही सेवा प्रामुख्याने ५ टप्प्यांत चालवली जाते.

**१) टेलि (टी) बँकिंग** - या सुविधेसाठी बँकेकडून खातेदाराला एक ग्राहक क्रमांक (कस्टमर आयडी) आणि टेलिफोन आयडेन्टिफिकेशन नंबर (टिन) दिला जातो. ज्या फोनवर ही सेवा उपलब्ध असते तो नंबर फिरवून मग खातेदाराला हवी ती माहिती मिळवता येते. सुरक्षेच्या कारणास्तव हा टिन नंबर गुप्त ठेवावा लागतो, तसेच तो वारंवार बदलावा लागतो.

या सुविधेच्या माध्यमातून खातेदार बरीचशी कामे घरबसल्या करू शकतो. जसे की, खात्यातील सध्याची शिल्लक, एखाद्या ठरावीक दिवसाचा बॅलन्स, नुकतेच झालेले ३ ते ५ व्यवहार, भरलेल्या तसेच दिलेल्या चेकची सद्यस्थिती, चेक वटवण्याविषयी सूचना देणे इत्यादी गोष्टी बँकेत न येता करता येऊ शकतात. मुदतठेवींच्या नूतनीकरणाची सूचनासुद्धा फोनद्वारे देता येते.

**२) मोबाईल (एसएमएस) बँकिंग** - मोबाईल ही आज ऐशेआरामाची किंवा मिरवण्याची गोष्ट राहिलेली नसून आजच्या काळात स्वत:बरोबर ठेवण्याची गरजेची वस्तू बनली आहे. बँकेकडून मिळणाऱ्या मोबाईल बँकिंग या सुविधेत थेट कॉल न करता एसएमएसच्या माध्यमातून व्यवहार करता येतात. त्यासाठी अर्ज केल्यावर बँक ग्राहकाला एक ग्राहक क्रमांक व गुप्त सांकेतिक क्रमांक (पासवर्ड) देते. खात्याच्या स्वरूपानुसार एसएमएस करून मग खातेदार हवी ती माहिती मिळवू शकतो. बँका या सेवेसाठी कोणतेही शुल्क आकारत नाहीत. एसएमएसचा खर्च मात्र ग्राहकांच्या मोबाईलमधून कापला जातो. टेलिबँकिंगमध्ये नमूद केलेली सर्व कामे मोबाईल बँकिंगद्वारे करता येतातच. तसेच मोबाईल बँकिंगची सेवा घेणाऱ्या ग्राहकाला बँकेकडून नियमित बँकेच्या विविध योजनांची एसएमएसद्वारे माहिती कळवली जाते. समजा, मोबाईल नंबर बदलला तर बँकेला एसएमएसद्वारे तसे कळवून ही सेवा अखंड चालू ठेवता येते. नॅशनल रोमिंग असेल तर देशभरातून या सुविधेचा लाभ घेता येतो.

**३) इंटरनेट (आय) बँकिंग** - इंटरनेटच्या साहाय्याने बँक जी सेवा पुरवते त्याला 'इंटरनेट बँकिंग' म्हणतात. आय बँकिंगच्या मदतीने जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून आपल्या खात्यातले व्यवहार तपासता येतात. त्यासाठी कुठलेही मासिक शुल्क भरावे लागत नाही. यात बिलांचा ऑनलाईन भरणा करता येतो. चेकबुक तसेच खात्यात जमा झालेल्या तसेच वजा होणाऱ्या रकमेबाबत जाणून घेता येते. कर्जासाठीही अगदी सहज ऑनलाईन अर्ज करता येतो. डिमांड ड्राफ्टसुद्धा घरबसल्या मिळवता येतो. अगदी आयकर भरण्यासाठीही आय बँकिंगची मदत घेता येते.

आय बँकिंगची सुविधा मिळवण्यासाठी प्रथम बँकेत जाऊन वैयक्तिक इंटरनेट कनेक्शन मिळवण्यासाठी रीतसर अर्ज भरावा लागतो. त्यानंतर बँकेकडून खातेदाराला आय बँकिंगसाठी ठरावीक आयडी आणि पासवर्ड दिला जातो. त्याची खातेदाराकडून शहानिशा केल्यानंतरच बँकेकडून त्याला ही सुविधा दिली जाते. यात चुकीचा पासवर्ड टाकला असता खात्यातील व्यवहार 'लॉक' होतात. त्यामुळे खातेदाराला तो गोपनीय ठेवत असतानाच पासवर्ड विसरला असता बँकेशी संपर्क साधावा लागतो.

**४) इ-पेमेंट** - याचा अर्थ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पेमेंट करणे. बँकेचा विहित नमुन्यातील अर्ज भरून दिल्यानंतर खातेदाराला या सेवेचा लाभ घेता येतो. यामध्ये टेलिफोन-मोबाईलचे बिल, लाईट बिल, पॉलिसी रकमेचा भरणा ही सर्व कामे बँकेमार्फत केली जातात. त्याची रीतसर पावती बँक तुम्हाला देते. यामुळे लांबच लांब रांगेत उभे राहून वेळ वाया घालवण्याची गरज तुम्हाला पडत नाही. इ-पे द्वारे पेमेंट करताना तुमच्या खात्यात पुरेशी रक्कम मात्र असायला हवी. पुरेशा रकमेअभावी तुमच्या बिलांचा भरणा होऊ शकला नाही तर त्यामुळे होणारी गैरसोय आणि दंड यासाठी बँकेला जबाबदार धरता येत नाही.

**५) एटीएम** - म्हणजे एनीटाइम मनी. दिवस असो वा रात्र, तुम्ही केव्हाही या मशीनमधून कार्डच्या मदतीने व्यवहार करू शकता. पैसे काढणे वा व्यतिरिक्त पैसे भरणे, चेक

भरणे, खात्यातील शिल्लक दाखवणे, खात्याचे मिनी स्टेटमेंट देणे, पिन बदलणे, एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पैशांतरण करणे, मोबाईलचे आगाऊ बिल भरणे अशा विविध सेवा एटीएमवर उपलब्ध असतात.

यामध्ये क्रेडिट कार्डाचा वापर केला जातो. क्रेडिट कार्ड दोन प्रकारची असतात. व्यक्तिगत आणि कंपनीसाठी. कंपनी एक्झिक्युटिव्ह, ऑफिशियल्स अशा उच्चपदस्थांना कंपनीतर्फे कॉर्पोरेट कार्ड दिले जाते. ते कार्ड वापरल्यानंतर सर्व रक्कम कंपनीच्या खात्यात डेबिट (नावे) टाकली जाते. प्रत्येक एक्झिक्युटिव्हला खर्चाची मर्यादा ठरवून दिलेली असते. हे कार्ड वापरल्यानंतर ती रक्कम ताबडतोब खात्यातून वजा होते.

### *खबरदारी ही घ्यायलाच हवी !*

आज जवळपास ४० टक्के व्यवहार हे इ-बँकिंगच्या माध्यमातून होतात. भविष्यात हे प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी बँकांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. यात ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण करत असतानाच बँकेमार्फत ग्राहकांच्या सोयीच्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने नवनवे प्रयोग राबवले जात आहेत. गैरव्यवहार किंवा आर्थिक फसवणुकीच्या शक्यता लक्षात घेऊन बँका आपापल्या पातळीवर योग्य ती खबरदारी घेत सुरक्षेची भिंत उभी करतातच. परंतु त्यातही छेद करण्याचे प्रकार हे घडत असतात. हॅकर्सची हुशारी किंवा कार्ड क्लोनिंग यामुळे गैरव्यवहाराचे काही प्रकार घडतात. या पार्श्वभूमीवर ग्राहकांनीही योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे बनले आहे. अनेकदा मोबाईल एसएमएस किंवा इ-मेलच्या माध्यमातून लॉटरी लागल्याचे संदेश येऊन धडकतात. मात्र त्याची शहानिशा न करताच अनेकजण या खोट्या एसएमएस व इ-मेलला प्रतिसाद देत आपली संपूर्ण माहिती उघड करतात. आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवले आणि जागरूकपणे त्याकडे पाहिले तर यातून होणारे आर्थिक गैरव्यवहार नक्कीच टाळता येऊ शकतात.

### *कनेक्ट द कस्टमर...*

टेलिकॉम कनेक्टिव्हिटी हा इ-बँकिंगचा मुख्य कणा आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये भारताने यात बरीच प्रगती केली असली तरी आजही अनेक गावे अशी आहेत जिथे ही सेवा प्रभावीपणे पोहचू शकलेली नाही. ग्रामीण विकासासाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ संबंधित घटकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी स्वत: बँकेने आपल्याकडे घेतली आहे. म्हणूनच ज्या ठिकाणी कनेक्टिव्हिटी अद्याप पोचू शकलेली नाही तिथे व्ही-सॅट तसेच 'बँक मित्र'च्या माध्यमातून बँका सर्वसामान्यांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

### *प्रधानमंत्री जनधन योजना*

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला ४० वर्षे उलटूनही देशातील ५८.७ टक्के जनतेपर्यंतच आज बँकिंग व्यवस्था पोचू शकलीय. उर्वरित जनतेपर्यंत बँकिंग पोचावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच 'जनधन योजना' जाहीर केली आहे. वित्तीय समावेशन कार्यक्रमांतर्गत राबवल्या जाणाऱ्या या योजनेच्या माध्यमातून देशातील सर्व शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबात किमान एक खाते उघडण्याचा मानस आहे. २०१४ च्या ऑगस्टमध्ये ही योजना जाहीर झाल्यापासून आतापर्यंत जवळपास साडेतीन कोटींहून अधिक खाती उघडली गेली आहेत. पुढच्या काही महिन्यांत ५ ते ६ कोटी खाती उघडण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. या जनधन योजनेअंतर्गत उघडण्यात येणाऱ्या खातेदारांना रुपे कार्डही वितरित केले जाणार आहे. बँकिंग क्षेत्रात क्रेडिट कार्डची सुरुवात ही १९८० च्या दशकात झाली. मात्र तेव्हा भारताची स्वत:ची कुठलीही व्यवस्था नव्हती. म्हणून मास्टर कार्ड किंवा व्हिसा कार्ड या ग्लोबल प्लेअर्सची मदत घेण्यात आली. परंतु भारताची स्वत:ची पेमेंट सिस्टिम असावी या हेतूनेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँक असोसिएशनच्या प्रयत्नांतून व 'नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'च्या माध्यमातून भारताची पेमेंट सिस्टिम निर्माण करण्यात आली आणि रुपे कार्डचा जन्म झाला. यामुळे स्वत:चे कार्ड असलेल्या देशांच्या यादीत भारताने पहिल्या पाच क्रमांकांत स्थान पटकावले आहे. जास्तीत जास्त भारतीयांकडे हे कार्ड पोचावे यासाठी साधे तसेच छोटे खाते असलेल्या खातेदारालाही ते उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे या प्रत्येक कार्डावर एक लाखापर्यंत अपघाती विमाही देण्यात आला आहे. हे क्रेडिट कार्ड नसून डेबिट कार्ड आहे. त्यामुळे खात्यात पैसे असतील तरच त्याचा वापर करता येणार आहे.

### *मानसिकता बदलण्याची गरज*

जगातील अनेक देशांमध्ये भारताच्या तुलनेत रोखीने व्यवहार करण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. आज अमेरिकेत एकूण व्यवहाराच्या ३ टक्के, इंग्लडमध्ये २ टक्के, ऑस्ट्रेलियात ३ टक्के आणि जपानमध्ये ६ टक्के व्यवहार हे रोखीने होतात.

भारतात हेच प्रमाण २० टक्के इतके आहे. हे प्रमाण कमी करायचे तर 'कॅशशिवाय व्यवहार' ही मानसिकता विकसित होणे गरजेचे आहे. परदेशात एखाद्या वस्तूची खरेदी केल्यानंतर ग्राहकाने दुकानदाराला तेवढ्या रकमेची नोट काढून दिली तर त्याच्याकडे वेगळ्या नजरेतून पाहिले जाते. आपल्याकडे आजचा तरुणवर्ग हा इ-बँकिंगवर भर देत असला तरी समाजातील बराच मोठ वर्ग अजूनही रोखीने व्यवहार करण्यालाच प्राधान्य देतोय. यात बदल व्हावा तसेच कार्डने व्यवहार करणे सोयीचे व्हावे यासाठी बँकेतर्फे दुकानदारांना 'पॉईंट ऑफ सेल्स' (पीओएम टर्मिनल) ही नवीन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. डेबिट, क्रेडिट तसेच प्रीपेड कार्ड असलेला कोणताही ग्राहक या सुविधेचा लाभ घेऊ शकतो आणि ज्या दुकानदाराकडे ही सोय नसेल त्याविरोधात तक्रारही नोंदवू शकतो. त्यामुळे भविष्यात रोख व्यवहारांचे प्रचलन बऱ्याच अंशी कमी होईल. मात्र जोपर्यंत ग्राहक गरज असेल तेव्हा इ-बँकिंगचा उपयोग करून आपल्या खात्यातील पैशांचा वापर करणार नाही तोपर्यंत ग्राहकांची मानसिकता बदललीय असे म्हणता येणार नाही. ही मानसिकता बदलायची तर शहरी तसेच ग्रामीण दोन्ही भागांतील समाज आर्थिकदृष्ट्या साक्षर झाला पाहिजे. शासन आणि बँका आपल्या पातळीवर त्यासाठी प्रयत्न करतच आहेत. परंतु प्रत्येक व्यक्तीने स्वत: 'मी रोखीने व्यवहार करणार नाही' असा निश्चय केला तरच इ-बँकिंगला अधिक चालना मिळू शकेल.


इ-बँकिंग जसे वाढतेय तसतसे त्यात बरेच नवीन प्रयोग होत आहेत. भारतीय बँक संघाच्या(आयबीए) पुढाकाराने आणि फिकीच्या सहकार्याने अलिकडेच डिजिटल यंत्रणेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण सेवा कशी वाढवायची या विषयावर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. त्याला मिळालेला बँकांचा प्रतिसाद अतिशय उत्साहपूर्ण असाच होता. भविष्यातील बँकिंग हे बहुतांश डिजिटल स्वरूपातील असेल आणि ते 'कॅशलेस सोसायटी' अशी एक नवी ओळख आपल्याला मिळवून देईल !

शब्दांकन

**- सविता अमर**

भ्रमणध्वनी : ९९६९३८७६१४
savita.amar@gmail.com


**॥ग्रंथाली॥** **अरुण शेवते संपादित पुस्तके**




## माझं जन्मघर

गुलज़ार, सुशीलकुमार शिंदे, यशवंतराव गडाख, आरती अंकलीकर-टिकेकर, राजन खान, हेमंत टकले, किशोर कदम आदींनी आपल्या जन्मघराच्या जागवलेल्या आठवणी..

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**




## हिंडताफिरता

गुलज़ार, कुमार केतकर, सतीश काळसेकर, नवनीता सेन, डॉ. उज्ज्वला दळवी आदींनी भ्रमंती करून मिळालेला आनंद आपल्यापर्यंत पोचवला आहे...

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



## मन पाहि मागे मागे...

गुलज़ार, बाबासाहेब पुरंदरे, गिरीश कुबेर, यशवंतराव गडाख, राजीव खांडेकर, द.ता. भोसले आदी मान्यवरांनी आपल्या मनातील रेखाटलेली भावस्पर्शी स्मृतिचित्रे...

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# मदनबाण अशोक

**प्रा. नीला अशोक कोर्डे**

**आजही रसिकांना आकर्षित करणाऱ्या कालिदासाच्या 'मेघदूतम्' या गीतिकाव्यात वर्षावर्णन असूनही कालिदास आपल्या प्रिय अशोकाला विसरलेला नाही. मेघदूतातील गृहविरहार्त (होमसिक) यक्ष मेघाजवळ आपल्या सुंदर घराचे जे वर्णन करतो, त्यामध्ये अशोक आणि केसर (बकुल) या वृक्षांचा उल्लेख आला आहे. केवळ उल्लेखच नव्हे तर या वृक्षांशी संबंधित असलेला एक काव्यमय कविसंकेतही येथे आला आहे.**

अशोक... ज्याच्या नावातच दु:ख नष्ट करण्याचे सामर्थ्य आहे असा हा वृक्ष... कामदेव मदनाचा प्रियसखा असणाऱ्या ऋतुराज वसंताच्या आगमनाने फुलणारा... कुसुमाकर वसंताने मदनाला प्रेमिकांवर शरसंधान करता यावे म्हणून जे पाच पुष्पबाण निर्माण केले त्यांमध्ये अशोकपुष्पाचा विशेषत: रक्ताशोकाचा समावेश आहे-

*अरविन्दं अशोकं च चूतं च नवमल्लिका।*
*नीलोत्पलं तथा ह्येते पञ्चबाणस्य सायका:।।*

अर्थ- लाल कमळ, अशोकपुष्प, आम्रमंजरी, ताजी जुई आणि निळं कमळ हे मदनाचे पाच बाण आहेत.

या पुष्पबाणांमध्ये अशोकाचा क्रम दुसरा असला तरी स्वत: मदनाने मात्र याला अग्रक्रम दिला आहे. म्हणूनच तप करणाऱ्या योगी शिवाला पार्वतीकडे आकृष्ट करण्यासाठी मदन प्रवेश करतो तो वसंतागमनाने फुललेल्या अशोकवनात!

प्रेमदेव मदन, त्याला प्रेमकार्यात साहाय्य करणारा वसंत आणि वसंतात फुलणारा प्रेमोत्तेजक अशोक! या तिघांमध्ये जणू एक वेगळाच 'प्रेमाचा त्रिकोण' निर्माण झाला आहे.

तसा तर हा अशोक आपल्याला अगदी बालपणीच रामायण कथेत भेटतो. रावणाने सीतेचे अपहरण करून तिला अशोकवनात ठेवल्यामुळे सीता आणि अशोकवन हे समीकरण बालपणीच मनात ठसते!

रामायणातील हा अशोक संस्कृत साहित्यात विविध आणि विलोभनीय संदर्भ घेऊन फुलला आहे.

या वृक्षाचा आपल्याला प्रथम परिचय होतो तो मात्र अभिजात संस्कृत साहित्यातील आदिकाव्य मानल्या गेलेल्या रामायणातच! श्रुतींमध्ये म्हणजे वेदांमध्ये याचा उल्लेख नाही. इसवी सनाच्या आठव्या शतकाचा मध्य ते इसवी सनाच्या दहाव्या शतकाचा मध्य या कालावधीत लिहिल्या गेलेल्या 'अङ्गिरस' स्मृतीमध्ये अशोकाचा उल्लेख 'नट' या काहीशा वेगळ्याच नावाने आला आहे. अशोक सर्वपरिचित झाला तो मात्र रामायणामुळेच!

इथे एक गोष्ट मात्र स्पष्ट करावीशी वाटते. ती म्हणजे आज ज्याला आपण अशोक म्हणून ओळखतो तो खरा अशोक नव्हेच! आज सर्वत्र दिसणाऱ्या- विशेषत: बंगल्यांना, इमारतींना भिंतीसारखा आडोसा म्हणून लावल्या जाणाऱ्या- 'मास्ट ट्री'ला अशोक म्हणणे म्हणजे खऱ्या अशोकाचा अपमानच! हा 'हिरवा अशोक' 'पानांचा अशोक' किंवा 'आसुपालव'- खोटा अशोक आहे. माणकासारखी लाल फुले येणाऱ्या मूळ अशोकाऐवजी याला अशोक म्हणणे म्हणजे काचेच्या मण्याला माणिक म्हणण्यासारखे आहे.

संस्कृत साहित्यातील अशोक हा खरा अशोक आहे. याची उंची मध्यम असून पाने आंब्याच्या पानांसारखी दिसतात. याची मृदु मुलायम पालवी फारच आकर्षक दिसते. या

पालवीचे बदलते रंगही फार सुंदर दिसतात. सुरुवातीला पांढरट करडा, नंतर जांभळट लाल, किरमिजी असे रंग बदलत जाऊन पोपटी आणि नंतर हिरवा रंग होतो. अशोकाच्या मंद सुगंधी फुलांचे गुच्छ एक्झोराच्या गुच्छांप्रमाणे असतात. त्यांच्या लाल रंगामुळेच संस्कृतमध्ये अशोकाला 'रक्ताशोक' हे सार्थ नाव मिळाले आहे. लाल रंग हा प्रेमाचे प्रतीक असल्यामुळेच मदनाच्या पुष्पबाणांमध्ये अशोकाला स्थान मिळाले.

संस्कृत साहित्यातील अशोकासाठी कालक्रमाने जेव्हा आपण रामायणापासून सुरुवात करतो तेव्हा तिथे तो आपल्याला प्रथम रावणाच्या लंकेत न भेटता, अयोध्येतच भेटतो. रामायणाच्या उत्तरकाण्डात अयोध्येतील अशोक वाटिकेत राम सीतेसह विहार करत असल्याचा उल्लेख आला आहे. रामायणाच्या अरण्यकाण्डात आणि किष्किन्धाकाण्डातही वनवर्णनांमध्ये अशोक आहे. रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर तिचा शोध घेणाऱ्या राम-लक्ष्मणांना, मार्ग दाखविणाऱ्या दिव्य देहधारी कबन्धाने पंपा सरोवराकाठी असलेल्या ज्या वृक्षांचा निर्देश केला आहे, त्यांमध्ये अशोकही आहे. विशेष म्हणजे तेथे 'नील' अशोकाचा उल्लेख आहे. (त्यानंतर नील अशोकाचा उल्लेख बाणाच्या 'कादंबरी'त आणि वराहमिहिराच्या 'बृहत्संहिते'त आला आहे.) अशोकाच्या या प्रजातीविषयी माहिती मात्र मिळत नाही. नावावरून हा अशोक निळ्या रंगाची फुले येणारा असावा असे वाटते.

पंपा सरोवराच्या तीरावर वसंत ऋतूत फुललेला अशोक विरहव्याकुळ रामाला मोहक न भासता दाहकच भासतो. राम लक्ष्मणाला म्हणतो-

स्वनन्ति पादपाश्चेमे ममानङ्गप्रदीपकाः।
अशोकस्तबकाङ्गारः षट्पदस्वननिः स्वनः।।

किष्किन्धाकाण्ड सर्ग १ श्लोक क्र. २९

अर्थ - हे वृक्ष (पक्ष्यांच्या किलबिलाटाने) आवाज करत आहेत. भ्रमरांच्या गुंजारवाने भरून गेलेल्या अशोकाचा (रक्ताशोकाचा) गुच्छरूपी अंगार माझा अनंग (प्रणयभावना) उद्दीपित करत आहे.

दुसऱ्या एका श्लोकात राम म्हणतो-

*कामिनामयमत्यन्तमशोकः शोकवर्धनः।*
*स्तबकैः पवनोत्क्षिप्तैस्तर्जयन्निव मां स्थितः।।*

किष्किन्धाकाण्ड सर्ग १ श्लोक क्र. ५९

अर्थ - हा अशोक (विरही) प्रेमिकांचा शोक अत्यंत वाढविणारा आहे. तो जणू वाऱ्याने वर उचलल्या गेलेल्या गुच्छांनी माझी निर्भर्त्सनाच करत आहे.

लंकेत रावणाने सीतेला ज्या अशोकवनिकेत ठेवले होते, त्या अशोकवनिकेचे वर्णन रामायणातील सुंदरकाण्डात आले आहे ही अशोकवनिका देवांचा वास्तुविशारद विश्वकर्मा याने निर्माण केलेली असून ती देवांचे नंदनवन आणि चित्ररथ गंधर्वाचे चैत्ररथ उद्यान यांच्यापेक्षाही अधिक सुंदर होती. या अशोकवनिकेतील अशोक वृक्ष दिव्य, अद्भुत असल्यामुळे त्यांचे वर्णन अन्यत्र आढळणाऱ्या अशोक वृक्षांशी मिळतेजुळते नाही. महर्षि वाल्मीकि म्हणतात-

*शातकुम्भनिभाः केचित् केचिदग्निशिखप्रभाः।*
*नीलाञ्जननिभाः केचित् तत्राशोकाः सहस्रशः।।*

सुंदरकाण्ड सर्ग १५ श्लोक क्र. ११

अर्थ - तेथील काही अशोक वृक्ष सुवर्णाप्रमाणे तेजस्वी, काही अग्निशिखेची प्रभा असलेले तर काही नीलांजनाप्रमाणे म्हणजे काळ्या अंजनाप्रमाणे होते.

रामायणाप्रमाणेच महाभारतातील वनवर्णनांमध्येही अशोक आला आहे. महाभारतातील आदिपर्व, वनपर्व आणि द्रोणपर्व यांमध्ये आम्र चम्पक कर्णिकार यांसारख्या वृक्षांबरोबरच अशोकाचाही निर्देश आहे. मात्र रामायणातील अशोकाप्रमाणे त्याला खास असा भावनिक संदर्भ नाही.

रामायण आणि महाभारत या आर्ष म्हणजे वाल्मीकि आणि व्यास ऋषींनी रचलेल्या महाकाव्यांच्या नंतर येणाऱ्या अभिजात संस्कृत साहित्यातील अशोक, त्याच्या रंग बदलणाऱ्या पालवींप्रमाणेच 'विविधरंगी' झाला आहे. अनेक सुंदर संदर्भांनी बहरला आहे. या संदर्भांमुळेच निसर्गतः सौंदर्यसंपन्न असणारा अशोक संस्कृत साहित्यात अधिकच सुंदर झाला आहे.

कालक्रमाने 'भास' हा कविकुलगुरू कालिदासाच्या आधी होऊन गेलेला नाटककार! रामायणावर आधारित त्याच्या 'प्रतिमा' या नाटकाच्या पहिल्या अंकात अशोक आला आहे. या अंकाची सुरुवात रामाच्या राज्याभिषेकाच्या तयारीने झाली आहे. अभिषेकासारख्या आनंदमय प्रसंगी मनोरंजनासाठी नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. याच वेळी आपल्या परिवारासह राजमहालात बसलेल्या सीतेला तिची दासी अवदातिका हळूच काहीतरी नेताना दिसते. सीतेने त्याविषयी विचारताच ती खुलासा करते की, नेपथ्यपालिनी आर्या रेवा हिने नाट्यमंडपाच्या सजावटीचे प्रयोजन संपले असूनसुद्धा अशोक वृक्षाचे किसलय म्हणजे पल्लव देण्याचे नाकारल्यामुळे तिला धडा शिकविण्यासाठी तिने (आर्या रेवेने) नेपथ्यगृहातून वल्कले चोरून आणलेली



आहेत. सीता कुतूहलाने ती वल्कले स्वत:च परिधान करते. ही जणू अशुभाची - सीतेच्या वनवासाची-चाहूल असते. कारण नंतर रामाचा अभिषेक न होता सीता रामासह वनात जाते. इथे अप्रत्यक्षरीत्या अशोकच सीतेच्या शोकाला कारणीभूत झाला आहे. पुढेही रावणाने तिला अशोकवनिकेत ठेवले असता अशोकच शोकदायक ठरतो. हाही एक योगायोगच म्हटला पाहिजे.

महाकवी अश्वघोष हा इसवी सनाच्या पहिल्या शतकात म्हणजे कालिदासाच्या आधी होऊन गेलेला कवी! बुद्धचरितावर आधारित त्याच्या 'सौन्दरनन्दम्' या महाकाव्याच्या सातव्या सर्गात, भगवान बुद्धाजवळ प्रव्रज्या (संन्यास) घेतल्यानंतर आपल्या प्रिय पत्नीच्या सुंदरीच्या विरहाने व्याकूळ झालेल्या नंदाचे वर्णन आहे. वसंत ऋतूत प्रेमिकांना आनंददायक असणारा अशोक, भगवान बुद्धांचा सापत्न अनुज नंद याला मात्र शोककारक होतो. याविषयी कवी म्हणतो-

*शोकस्य हर्ता शरणागतानां शोकस्य कर्ता प्रतिगर्वितानां।*
*अशोकमालम्ब्य स जातशोक: प्रियां प्रियाशोकवनां शुशोच ।।*

सौन्दरनन्दम् सर्ग ७ श्लोक क्र. ५

अर्थ - शरणागतांचा शोक हरण करणारा, गर्वोद्धतांना शोक देणारा तो नंद अशोक वृक्षाचा आश्रय घेऊन, जिला अशोकवन प्रिय आहे अशा आपल्या प्रियेसाठी शोक करू लागला.

या श्लोकातील शोक आणि अशोक या शब्दांच्या पुनरावृत्तीमुळे झालेला अनुप्रास अलंकारही लक्षणीय आहे.

कविकुलगुरू कालिदासाचा तर अशोक हा अत्यंत प्रिय वृक्ष आहे. एक 'अभिज्ञानशाकुन्तलम्' सोडल्यास त्याच्या अन्य सर्व साहित्यकृतींमध्ये अशोक विविध संदर्भ घेऊन फुलला आहे.

कालिदासाच्या 'ऋतुसंहारम्' या गीतिकाव्यातील वसंतवर्णनात, स्त्रिया वसंतात फुलणारी फुले अलंकार म्हणून धारण करत असल्याचा उल्लेख आहे. त्यांच्या काळ्या आणि चंचल केशकलापात अशोकाचे फूल खुलून दिसते.
*चलेषु नीलेष्वलकेष्वशोकम्।*

ऋतुसंहारम् सर्ग ६ श्लोक क्र. ५

आणखी एका श्लोकात मदनबाण असणारा कामोत्तेजक रक्ताशोक अ-शोक असूनही नवयुवतींची हृदये सशोक करत असल्याचे म्हटले आहे-

*आ मूलतो विद्रुम रागताम्रं*
*सपल्लवा: पुष्पचयं दधाना:।*
*कुर्वन्त्यशोका हृदयं सशोकं*
*निरीक्ष्यमाणा नवयौवनानाम् ।।१६ ।।*

ऋतुसंहारम् सर्ग ६ श्लोक क्र. १६

अर्थ - ज्यांना पालवी फुटली आहे आणि ज्यांना बुंध्यापासून पोवळ्याप्रमाणे लाल रंगाची फुले आली आहेत अशा अशोक वृक्षांचे निरीक्षण करताना (विरही) नवयुवतींचे

हृदय मात्र 'सशोक' (दुःखी) झाले.

आजही रसिकांना आकर्षित करणाऱ्या कालिदासाच्या 'मेघदूतम्' या गीतिकाव्यात वर्षावर्णन असूनही कालिदास आपल्या प्रिय अशोकाला विसरलेला नाही. मेघदूतातील गृहविरहार्त (होमसिक) यक्ष मेघाजवळ आपल्या सुंदर घराचे जे वर्णन करतो, त्यामध्ये अशोक आणि केसर (बकुल) या वृक्षांचा उल्लेख आला आहे. केवळ उल्लेखच नव्हे तर या वृक्षांशी संबंधित असलेला एक काव्यमय कविसंकेतही येथे आला आहे. गर्भवती स्त्रियांना जसे दोहद म्हणजे डोहाळे लागतात तसेच डोहाळे सुवासिक सुंदर फुले येणाऱ्या काही वृक्षांनाही लागतात. विशेष म्हणजे या 'रसिक' वृक्षांचे दोहद नवयौवना सुंदर स्त्रियांकडूनच पुरविले जातात. या कविसंकेतात स्त्रियांची कुसुमकोमलता आणि त्यांचे फुलांशी असणारे साम्य अभिप्रेत आहे. अशोक, चंपक, बकुल यांसारखे नाजूक आणि सुवासिक फुले येणारे वृक्ष स्त्रियांच्या सहभागाशिवाय फुलत नाहीत ही कल्पनाच किती रमणीय आहे! आणखी एक विशेष म्हणजे या कविसंकेताप्रमाणे जे दहा दोहद वृक्ष सांगितले आहेत त्यांच्या दोहद पुरविण्याच्या स्पर्श, आलिङ्गन वीक्षण (कटाक्ष), नर्मवाक्य, मृदु हास्य, मुखमदिरा सिंचन यांसारख्या विविध पद्धती पाहिल्या तर त्यांतून 'कामक्रीडां'चे सहज सूचन होते. तरुणींनी केलेल्या कामक्रीडांनीच जणू हे वृक्ष फुलतात. वसंत ऋतूत फुलणारा अशोक स्वत: कामोत्तेजक असूनही जणू तरुणींकडून कामक्रीडेची अभिलाषा धरतो. तरुणींकडून 'लत्ताप्रहार' झाल्यानंतरच तो फुलतो. (पादाघातात् अशोक:) एरवी अपमानास्पद असणारा लत्ताप्रहार तरुणीकडून कामक्रीडेत झाला असता मात्र क्षम्य ठरतो.

अशोकाच्या या दोहदाचा उल्लेख पुढील श्लोकात आला आहे–

*सनूपुररवेण स्त्रीचरणेनाभिताडनम्।*
*दोहदं यदशोकस्य तत: पुष्पोद्‌गमो भवेत्।।*

अर्थ – स्त्रीच्या, रुणझुणता नूपुर धारण केलेल्या चरणाच्या ताडनाने दोहद पुरविले गेल्यानंतर अशोकाला फुले येतात.

मेघदूतात अशोक आणि बकुल या दोन वृक्षांचे दोहद पुरविले गेल्याचा उल्लेख आहे–

*रक्ताशोकश्चलकिसलय: केसरश्चात्र कान्त:*
*प्रत्यासन्नो कुरबकवृतेर्माधवीमण्डपस्य।*
*एक: सख्यास्तव सह मया वामपादाभिलाषी*
*काङ्क्षत्यन्यो वदनमदिरां दोहदच्छद्मनाऽस्या: ।।१८।।*

मेघदूतम् – उत्तरमेघ श्लोक क्र. १८

अर्थ– कुरबक (कोरांटी) वृक्षांनी वेढलेल्या माधवी मंडपाच्या जवळच चंचल पानांचा रक्ताशोक आहे आणि बकुल वृक्षही आहे. एक (रक्ताशोक) माझ्याप्रमाणेच तुझ्या (मेघाच्या) सखीच्या (म्हणजेच यक्षपत्नीच्या) डाव्या पायाच्या आघाताची इच्छा करतो तर दुसरा (बकुल) तिच्या मुखातील मदिरेच्या सिंचनाचा अभिलाषी आहे.

इथे यक्षपत्नीच्या 'वाम' म्हणजे डाव्या पायाच्या आघाताचा उल्लेख केला आहे. याचे खास कारण आहे. स्त्रियांचे 'वामांग' हे शुभ मानले आहे. संस्कृतमध्ये स्त्रीला 'वामा' म्हणतात.

तसेच अन्य दोहदापेक्षी वृक्षांचे दोहद रसिकतेने पुरविले जात असता अशोकाच्या वाट्याला मात्र लत्ताप्रहार येण्याचेही खास कारण आहे. अशोकाच्या झाडाला बुंध्यापासूनच फुले येण्यास सुरुवात होते. म्हणजे एका अर्थी तो नखशिखान्त फुलतो. यामुळे पादापासून म्हणजे मुळापासून मस्तकापर्यंत फुलणाऱ्या या वृक्षाचे दोहद स्त्रीच्या पादाघाताने पुरविले जाण्यातच औचित्य आहे.

कालिदासाच्या 'कुमारसम्भवम्' या महाकाव्यात ध्यानधारणा करणाऱ्या शिवाच्या तपोभूमीत अकाली आलेल्या वसंत ऋतूमुळे अशोकाला त्याचे दोहद पुरविले गेले नसूनही बुंध्यापासून फुले आल्याचे वर्णन आहे–

*असूत सद्य: कुसुमान्यशोक: स्कन्धात्प्रभृत्येव सपल्लवानि।*
*पादेन नापेक्षत सुन्दरीणां संपर्कमासिञ्जितनूपुरेण।।*

कुमारसम्भवम् सर्ग ३ श्लोक क्र. २६

कुमारसंभवात वसंत ऋतूच्या आगमनाने फुललेल्या अशोकाचे आणखी एक विलोभनीय रूप पाहावयास मिळते. शिवाच्या सेवेला जाणाऱ्या पार्वतीने वसंत ऋतूतील फुलांचे अलंकार धारण केले होते– (वसन्तपुष्पाभरणं वहन्ती) त्यांमध्ये पद्मरागाला म्हणजे माणिकालाही लाजविणाऱ्या लाल अशोकपुष्पांचा समावेश होता– (अशोकनिर्भर्त्सितपद्मरागम् – कुमारसम्भवम् सर्ग ३ श्लोक क्र. ५३.)

वसंत ऋतूतल्या उगवत्या सूर्यबिंबाचा लाल रंग प्राशन करून फुललेल्या आणि त्या रवितेजाने माणकापेक्षाही तेजस्वी झालेल्या रक्ताशोकाचे किती सुंदर वर्णन कालिदासाने केले आहे.

कालिदासाच्या 'रघुवंशम्' या महाकाव्यात अयोध्येचा राजपुत्र अज आणि विदर्भ देशाची राजकन्या इंदुमती यांच्या विवाहाचे वर्णन आहे. इंदुमतीचे 'पाणिग्रहण' करणाऱ्या

अजाला कालिदासाने 'चूत' म्हणजे आम्रवृक्षाची उपमा दिली आहे तर इंदुमतीला त्याने 'अशोकलता' म्हटले आहे-

*हस्तेन हस्तं परिगृह्य वध्वा: स राजसूनु: सुतरां चकासे*
*अनन्तराशोकलताप्रवालं प्राप्येव चूत: प्रतिपल्लवेन ।।*

रघुवंशम् सर्ग ५ श्लोक क्र. २१

अर्थ - ज्याप्रमाणे आम्रवृक्ष त्याच्या पालवीमध्ये अशोकलतेची पालवी गुंफली गेली असता शोभून दिसतो त्याप्रमाणे राजपुत्र अज याने वधूचा हात हातात घेतला असता तो अधिकच शोभून दिसू लागला.

या श्लोकात कालिदासाने इंदुमतीसाठी 'अशोकलता' असा खास शब्द योजिला आहे. येथे 'लता' या शब्दाचा अर्थ शाखा, फांदी असा होतो. कालिदासाचा दांपत्याच्या अनुरूपतेवर नेहमीच कटाक्ष आहे. त्यामुळेच त्याने अज-इंदुमतीला वसंतात फुलणाऱ्या आम्रवृक्षाची आणि अशोकलतेची उपमा दिली आहे.

पुढे इंदुमतीच्या मृत्यूनंतर अजाने केलेल्या विलापात मात्र अशोक शोककारक झाला आहे. अज म्हणतो-

*कुसुमं कृतदोहदस्त्वया यदशोकोऽयमुदीरयिष्यति ।*
*अलकाभरणं कथं नु तत्त्वव नेष्यामि निवापमाल्यताम् ।।*

रघुवंशम् सर्ग ८ श्लोक क्र. ६२

अर्थ - हे प्रिये, तू दोहद पुरविलेल्या ज्या अशोकाच्या फुलांनी, तू जिवंत असताना तुझा केशपाश अलंकृत केला गेला होता, त्याच अशोकाची फुले मी तुझ्यासाठी जलदानांजलीमध्ये कशी घेऊ?

यानंतरच्या श्लोकात अज म्हणतो-

*स्मरतेव सशब्दनूपुरं चरणानुग्रहमन्यदुर्लभम् ।*
*अमुना कुसुमाश्रुवर्षिणा त्वमशोकेन सुगात्रि शोच्यसे ।।*

रघुवंशम् सर्ग ८ श्लोक क्र. ६३

अर्थ - हे सुंदरी अन्य वृक्षांना दुर्लभ अशा तुझ्या रुणझुणत्या नूपुराने अलंकृत केलेल्या चरणाच्या अनुग्रहाचे स्मरण होऊन कुसुमरूपी अश्रू ढाळणारा अशोक तुझ्यासाठी शोक करत आहे.

रघुवंशाच्या नवव्या सर्गातील वसंत ऋतूच्या वर्णनात मात्र अशोकाचे प्रसन्न रूप पाहावयास मिळते. इथे स्त्रिया अशोकाची कोवळी पालवी कर्णालंकार म्हणून धारण करत असल्याचा उल्लेख आहे-

*कुसुममेव न केवलमार्तवं नवमशोकतरो: स्मरदीपनम् ।*
*किसलयप्रसवोऽपि विलासिनां मदयिता दयिताश्रवणार्पित: ।।*

रघुवंशम सर्ग ९ श्लोक क्र. ३१

अर्थ - वसंत ऋतूत अशोक वृक्षावर फुललेली फक्त फुलेच कामोत्तेजक होती असे नव्हे, तर प्रियतमेने कर्णालंकार म्हणून धारण केलेली अशोकाची कोवळी पालवीसुद्धा विलासी जनांसाठी कामोत्तेजक होती.

रघुवंशाच्या तेराव्या सर्गातील अशोकाला एक वेगळाच संदर्भ आहे. रावणवधानंतर लंकेहून सीतेसह परत येताना राम सीतेला म्हणतो-

*इमां तटाशोकलतां च तन्वीं स्तनाभिरामस्तबकाभिनम्राम् ।*
*त्वत्प्राप्तिबुद्ध्या परिरब्धुकाम: सौमित्रिणा साश्रमहं निषिद्ध: ।।*

रघुवंशम् सर्ग १३ श्लोक क्र. ३२

अर्थ - नदीतटावरील अशोकाच्या, स्तनांप्रमाणे दिसणाऱ्या मनोहर गुच्छांनी झुकलेल्या शाखेला 'तू मला सापडलीस' या विचाराने आलिंगन देऊ इच्छिणाऱ्या मला, लक्ष्मणाने साश्रुनयनांनी रोखले.

या श्लोकात कालिदासाने सीताविरहाने व्याकूळ झालेल्या रामाचा शोक अशोकाच्या द्वारे व्यक्त केला आहे.

रघुवंशात कालिदासाने वर्णिलेला अशोक प्रसन्न आणि खिन्न असा संमिश्र आहे.

कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीयम्' या नाटकाच्या दुसऱ्या अंकातील वसंत वर्णनात बाल्य आणि यौवन यांच्या सीमारेषेवरील मधुश्रीचे म्हणजे वसंतलक्ष्मीचे वर्णन आले आहे. त्यामध्ये उमलू पाहणारे रक्ताशोकाचे फूल कालिदासाने अत्यंत हळुवारपणे रेखाटले आहे. कालिदास म्हणतो-

*रक्ताशोकमुपोढरागसुभगं भदोन्मुखं तिष्ठति ।*

विक्रमोर्वशीयम् अंक २ श्लोक क्र. ७

अर्थ - आपल्या लालिम्याने सुंदर दिसणारे अशोकाचे फूल आता उमलणारच असे वाटते.

'विक्रमोर्वशीयम्'च्या चौथ्या अंकात लतेत रूपांतर झाल्यामुळे अदृश्य झालेल्या उर्वशीसाठी विलाप करणारा पुरुवा वनातील रक्ताशोकाला विचारतो-

*रक्ताशोक कृशोदरी क्व नु गता त्यक्त्वानुरक्तं जनं*
*नो दृष्टेति मुधैव चालयसि किं वाताभिभूतं शिर: ।*
*उत्कण्ठाघटमानषट्पदघटासङ्घट्टदष्टच्छद:*
*तत्पादाहतिमन्तरेण भवत: पुष्पोद्गमोऽयं कृत: ।।*

विक्रमोर्वशीयम् अंक ४ श्लोक क्र. ६२

अर्थ - हे लाल अशोका! या प्रेमिकाला सोडून ती सुंदरी (कृशोदरी) कुठे गेली? वाऱ्याने हलणाऱ्या आपल्या मस्तकाने हा आपण तिला पाहिली नसल्याचे सांगत आहे का? जर तू पाहिली नसशील तर मधाच्या लालसेने भ्रमरांच्या




''गेली ९८ वर्षे सतत ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत बारा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल''

।। असमर्थास समर्थ करणे ।।

**दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. मुंबई**

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४. दू. क्र. २३८५४९४५, २३८६८१३४, २३८५४९९४
फॅक्स क्र. – २३८९ ६८५३

मध्यवर्ती कार्यालय : १३-१४, गणानाथ को-ऑपरेटिव्ह हौ. सोसा. लि., दादर (पश्चिम) स्टेशनसमोर, मुंबई-४०० ०२८.
दू. क्र. २४२२५७१८, २४२२३११६. फॅक्स क्र. – २४३१ ५० ५०

**शाखा**

**१) गिरगांव, २) दादर, ३) भायखळा, ४) घाटकोपर (प.), ५) गोरेगांव, ६) बोरीवली, ७) दहिसर, ८) घाटकोपर (पू.), ९) वाशी, १०) ठाणे, ११) खारघर, १२) हडपसर, १३) सासवड**

वरील सर्व शाखांमधून आरटीजीएस/एनईएफटी द्वारे फंड्स ट्रान्सफरची सुविधा उपलब्ध कोअर बँकिंगद्वारे कुठल्याही शाखेतून व्यवहार करण्याची तसेच मोबाईल, एस.एम.एस. बँकिंगची सेवा उपलब्ध. दादर, भायखळा, ठाणे या शाखांमधून फ्रंकींग सेवा उपलब्ध. भायखळा, ठाणे व दादर या शाखांमधून फ्रंकींग सेवा उपलब्ध. डेक्कन ''रूपे कार्ड'' द्वारे भारतातील इतर बँकांच्या १,६६,००० पेक्षा जास्त एटीएममधून आपल्या खात्यातील रक्कम काढण्याची सुविधा.

**वसुल भाग भांडवल १४.५४ कोटी** | **ठेवी ५०७.९४ कोटी** | **कर्ज ३२०.४२ कोटी**

**श्री. चंद्रकांत शिवराम शेवाळे**
उपाध्यक्ष

**श्री. काशिनाथ दिनकर मोरे**
अध्यक्ष

**श्री. शशिकांत ल. अभंग**
सरव्यवस्थापक

ho@deccanbank.com website-www.deccanbank.com co@deccanbank.com

झुंडीकडून कुरतडल्या जाणाऱ्या फुलांचा हा बहर तिच्या पादस्पर्शाशिवाय आलाच कसा असता?

याच नाटकात पुरुरव्याला सापडलेल्या लाल रंगाच्या संगमनीय मण्याला लाल अशोकाच्या फुलाची उपमा दिली आहे–

*अये रक्ताशोकप्रसवरागो माणिरयम्।*

अर्थ – हा तर लाल अशोकाच्या फुलासारखा लाल लाल मणी आहे!

कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकातील अशोकाला जितके महत्त्व आहे तितके महत्त्व त्याच्या अन्य साहित्यकृतींतील अशोकाला नाही. किंबहुना, हा अशोक वृक्ष न राहता जणू एक व्यक्तीच झाला आहे. अग्निमित्र आणि मालविका या नायक-नायिकेचे मीलन घडवून आणण्यास हाच अशोक कारणीभूत झाला आहे. विशेष म्हणजे हा अशोक रक्ताशोक नसून 'तपनीय' म्हणजे सुवर्णाशोक आहे.

'मालविकाग्निमित्रम्'चा तिसरा अंक हा या नाटकाचा केंद्रबिंदू आहे. या अंकात कालिदासाने वसंत ऋतूत तपनीय अशोकाचे दोहद पुरविले जाण्याचा महत्त्वाचा प्रसंग रंगविला आहे. या अंकात एका बाजूला राजा अग्निमित्र आणि विदूषक गौतम, दुसरीकडे मालविका आणि तिची सखी बकुलवलिका तर तिसरीकडे राणी इरावती आणि तिची दासी निपुणिका असे 'त्रिकेंद्री' दृश्य आहे.

विदूषक गौतम याच्या खोडकरपणामुळे अग्निमित्राची ज्येष्ठ राणी धारिणी हिचा पाय दुखावल्यामुळे प्रमदवनातील तपनीय अशोकाचे दोहद पुरविण्यासाठी ती आपली दासी मालविका हिची नियुक्ती करते. या निमित्ताने मालविका आणि अग्निमित्र यांच्यातील जो सूचक प्रणय प्रसंग कालिदासाने रंगविला आहे त्याला संस्कृत साहित्यात तोड नाही. या अंकाच्या सुरुवातीला रक्ताशोकाचेही सुंदर वर्णन आले आहे. मालविकेच्या मीलनास आतुर झालेल्या अग्निमित्राला वासंतिक पुष्पांचे अलंकार धारण केलेली 'वसंतलक्ष्मी' (वसंत ऋतूची शोभा) साजशृंगार केलेल्या युवतीच्या रूपात दिसते. तिने आपले ओठ वसंतात फुललेल्या रक्ताशोकाने रंगविले आहेत. तिच्या या ओष्ठप्रसाधनाने युवतींच्या बिंबाधरावरील (पिकलेल्या तोंडल्याप्रमाणे लाल ओठांवरील) अलक्तकाला म्हणजे अळित्याला लाजविले आहे.

*रक्ताशोकरुचा विशेषितगुणो बिम्बाधरालक्तक:।*

मालविकाग्निमित्रम् अंक ३ श्लोक क्र. ५

अग्निमित्राशी भेट न झाल्यामुळे हुरहुर लागलेल्या मालविकेला दोहद न पुरविला गेलेला तपनीय अशोक जणू तिचेच अनुकरण करत आहे असे वाटते. अग्निमित्रही स्वत:ला अशोकाच्या ठिकाणी पाहतो. अशा प्रकारे दोघांचेही भावबंध अशोकाशी जुळले आहेत. अग्निमित्राला अलक्तकाने पावले रंगविलेली आणि नूपुर धारण केलेली मालविका दोहदापेक्षेने न फुललेल्या अशोकावर किंवा नाजूक अपराध केल्यावर लज्जेने मस्तक लवविलेल्या प्रियकरावर (म्हणजे स्वत: अग्निमित्रावर) आघात करताना शोभेल असे वाटते.

मालविकेची सखी बकुलवलिका तिला अशोकाचा कोवळा लाल पल्लवगुच्छ कर्णालंकार म्हणून धारण करावयास सांगताना चातुर्याने द्व्यर्थी शब्दयोजना करून म्हणते–

*एष उपारूढराग उपभोगक्षम: पुरतस्ते दृश्यते।*

अर्थ – हा लाली चढलेला (किंवा प्रेम जडलेला आणि) उपयोग करण्यास (उपभोगास) योग्य तुझ्यापुढेच दिसतो आहे.

प्रणयातुर मालविकेला बकुलावलिका अग्निमित्राचाच निर्देश करत आहे असे वाटते.

मालविकेने अशोकावर लत्ताप्रहार केल्यानंतर अग्निमित्र तिला आपलेही धृतिपुष्परूप म्हणजे मन:शांतिरूप फुले येण्याचे दोहद पुरविण्यास सांगतो. याच वेळी हे दृश्य पाहणारी इरावती राणी क्रोधाने पुढे सरसावते आणि मालविकेला म्हणते– '*'पूरय पूरय। अशोक: कुसुमं दर्शयति न वा। अयं पुन: पुष्प्यति फलति च।*

अर्थ – पुरव! पुरव! अशोक फुले दाखविल नाहीतर नाही दाखविणार! हा मात्र फुलेच काय फळेसुद्धा देईल!

यातील काहीशा अश्लीलतेकडे झुकणाऱ्या व्यंग्यार्थाविषयी सुज्ञांस अधिक सांगणे नलगे! अशोकाला फक्त फुलेच येतात, फळे येत नाहीत या वनस्पतीशास्त्रीय सत्याचा कालिदासाने येथे किती उपरोधिक उपयोग केला आहे.

तपनीय अशोकाच्या माध्यमातून मालविका आणि अग्निमित्र यांचा प्रणय रंगविणारा हा तिसरा अंक या पाच अंकी नाटकात जणू 'मध्यममणिन्याया'ने म्हणजे माळेत मध्यवर्ती मणी शोभून दिसावा त्याप्रमाणे खुलून दिसतो.

कालक्रमाने कालिदासानंतर म्हणजे इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेला सम्राट हर्षवर्धन हा नाटककारही होता. त्याच्या 'रत्नावली' या नाटिकेतील वसंतोत्सवाच्या वर्णनात युवतींकडून अशोकतरु दोहद पुरविले

गेल्याचा उल्लेख आहे. या नाटिकेतील अशोकाचा आणखी एक विशेष म्हणजे येथे श्रीहर्षाने त्याच्यासाठी 'किङ्किरात' हा अगदी अपरिचित शब्द योजिला आहे. वसंतोत्सवाच्या वेळी 'एकपीता' म्हणजे एका पिवळ्याच रंगाने भरून गेलेल्या कौशांबी नगरीतील लोकांनी 'किङ्किरात' म्हणजे अशोक पुष्पमाला मस्तकावर धारण केल्या आहेत. कौशांबी पूर्ण पिवळी दिसत असल्याच्या उल्लेखावरून येथेही पिवळ्या रंगाची फुले येणारा सुवर्णाशोक सूचित झाला आहे.

सम्राट हर्षवर्धनाच्या राजसभेतील कवी बाणभट्ट याची 'हर्षचरितम्' आणि 'कादम्बरी' ही दोन गद्यकाव्ये प्रसिद्ध आहेत, यांमध्ये आलेला अशोक केवळ 'दोहदा'पुरता नसून फुलताना दिसणाऱ्या त्याच्या विविध रंगछटांप्रमाणेच त्याला आकर्षक असे विविध संदर्भ आहेत.

बाणभट्टाच्या काळात म्हणजेच गुप्तकाळात मंगलप्रसंगी आंब्याच्या पानांप्रमाणेच अशोकाच्या पानांचा उपयोग करण्यात येत होता. सम्राट हर्षवर्धनाची भगिनी राज्यश्री हिच्या विवाहाच्या वेळी विवाहमंडपाचे स्तंभ आम्रपल्लव आणि अशोकपल्लव यांनी सजविले होते.

विवाहप्रसंगी ज्या अग्नीभोवती राज्यश्री आणि तिचा पती गृहवर्मा यांनी प्रदक्षिणा केली, त्या लवलवत्या ज्वालांनी युक्त अग्नीला बाणाने लवलवत्या पालवीने युक्त अशोक वृक्षाची उपमा दिली आहे. त्याचबरोबर राज्यश्री आणि गृहवर्मा यांना रक्ताशोकासमीप असणाऱ्या रति-मदनाची उपमा दिली आहे. शिवाचा तपोभंग करण्यासाठी रतीसह तपोवनात गेलेला मदन रक्ताशोकाखालीच उभा राहिला होता हा पौराणिक संदर्भही बाणाने येथे सूचित केला आहे.

यानंतरही राज्यश्रीच्या 'सुहागरात'साठी सजविलेल्या वासगृहाचे म्हणजे शय्यागृहाचे वर्णन करताना बाणाने रक्ताशोकाचा उल्लेख केला आहे-

*एकदेशलिखित-स्तबकित-रक्ताशोक-तरुतल-भाजाधिराज्यचापेन तिर्यक्कूणित-नेत्रत्रिभागेन शरमृजू कुर्वता कामदेवेनाधिष्ठितम्....*

अर्थ - शय्यागृहाच्या एका बाजूला फुलांनी बहरलेल्या, रक्ताशोकाखाली उभ्या असलेल्या, धनुष्याला बाण जोडलेल्या आणि डोळा तिरपा करून नेम साधणाऱ्या कामदेवाचे चित्र होते.

येथे रक्ताशोकाला एक खास संदर्भ आहे. राज्यश्रीच्या शयनगृहात, प्रेमिकांवर शरसंधान करणाऱ्या मदनाचेच अधिराज्य होते. बाणाने राज्यश्री आणि गृहवर्मा या नवदांपत्याची परस्परानुरक्तता रक्ताशोकाद्वारे किती हळुवारपणे सूचित केली आहे!

हर्षचरितात 'रती'शी संलग्न असलेल्या रक्ताशोकाला बाणाच्या कादंबरीत मात्र 'विरती'तही स्थान मिळाले आहे. याच वेगळेपणामुळे 'कादम्बरी'तील रक्ताशोक उठून दिसतो. एरवी कामोत्तेजक असणाऱ्या रक्ताशोकाची त्याच्या शीतल आणि घनदाट छायेमुळे जाबाली मुनींनी आपल्या आश्रमात आश्रयस्थान म्हणून निवड केली आहे. कादंबरीतील शुकशावकाच्या (पोपटाच्या पिल्लाच्या) निवेदनात या रक्ताशोकाचे आलेले वर्णन मुळातूनच वाचण्यासारखे आहे. ज्ञानतपस्विनी दुर्गा भागवतांनी केलेला या संस्कृत वर्णनाचा अनुवादही तितकाच उठावदार आहे. उज्जयिनीच्या शूद्रक राजाला आपली कहाणी मनुष्यवाणीने सांगताना पोपटाचे पिल्लू म्हणते-

'अशा त्या आश्रमाच्या मध्यभागी मी पशुपति शिवासारखं भस्म लावलेल्या भगवान जाबालींना एका लाल अशोक वृक्षाच्या सावलीत खाली बसलेलं पाहिलं. त्या वृक्षाची पालवी अळत्यासारखी लाल होती. ऋषिमंडळींनी त्याच्या डहाळ्यांवर आपली काळी मृगचर्मं आणि पाण्याचे कमंडलू टांगून ठेवले होते. मुनिकन्यांनी त्याच्या बुंध्यावर हळद-तांदळाची पिठी कालवून तिने पिवळी पंचांगुलिकं काढली होती. हरणाची पाडसं त्या अळ्यातलं पाणी पीत होती. मुनिकुमारांनी त्याच्या चारी बाजूंनी कुशगवताची त्यांची चिरगुटं मेखलेसारखी लपेटली होती. त्याच्या तळची जमीन हिरव्या शेणाने सारवून शुद्ध केली होती. नुकतीच त्या भूमीवर फुलं रचून ठेवल्यामुळे ती फार सुंदर दिसत होती. ती जागा फार मोठी नव्हती. पण तिचा आकार वाटोळा असल्यामुळे तिने मोठा अवकाश व्यापला होता.

बाणाची कादंबरी - दुर्गा भागवत. पृष्ठ ६८

एका अशोकाच्या वर्णनात किती विविध रंग बाणाने भरले आहेत! या वृक्षावर अगदी मनापासून प्रेम असल्यावाचून बाण त्याचे इतके सुंदर चित्र रेखाटू शकला नसता.

एरवी शृंगारिक संदर्भ असणाऱ्या रक्ताशोकाचे हे सात्त्विक रूप खरोखरच विलोभनीय आहे! कालिदासाच्या 'तपनीय' अशोकाप्रमाणे महत्त्वाची भूमिका न बजावतासुद्धा, हा रक्ताशोक रंगरुचिरतेने आणि बाणाच्या चित्रदर्शी शैलीने आपले मन वेधून घेतो.

संस्कृत काव्याचे पंचप्राण मानल्या गेलेल्या पंचमहाकाव्यांपैकी कालिदासाच्या 'रघुवंशम्' आणि 'कुमारसम्भवम्'मधील अशोक जितका मनोहारी आहे,

तितका अन्य महाकाव्यांमधील म्हणजे भारवीचे किरातार्जुनीयम्, माघाचे शिशुपालवधम् आणि पंडित हर्षाचे नैषधीयचरितम् यांमधील अशोक त्याच्या वर्णनातील सांकेतिकतेमुळे आकर्षक झालेला नाही. माघाच्या शिशुपालवधम्'मध्ये तर रक्ताशोकाच्या फुलाला विरही जनांच्या, कामाग्नीने दग्ध झालेल्या हृदयाच्या मांसखंडाची बीभत्स उपमा दिली आहे.

संस्कृत काव्याच्या अपकर्षकालातही काही उल्लेखनीय काव्ये निर्माण झाली. इसवी सनाच्या बाराव्या शतकात बंगाल येथे होऊन गेलेल्या जयदेव कवीचे 'गीतगोविन्दम्' हे त्यांपैकीच एक काव्य आहे. बाह्यत: शृंगारिक परंतु अंतरंग भक्तिरसाने ओथंबलेल्या या काव्यात अशोक आला आहे. कृष्णविरहाने व्याकुळ झालेली राधा आपल्या सखीला म्हणते-

*दूरालोक: स्तोकस्तबकनविका अशोकलतिका विकास:।*

अर्थ - वाऱ्यावर हेलावणाऱ्या या अशोकाच्या डहाळीवर कोवळ्या फुलांचा गुच्छ झुलत आहे, ज्याकडे मला पाहवत नाही!

कृष्णचरिताशी निगडित असलेल्या भागवत पुराणातही गोपिका यमुनेच्या तटावर अशोकवनात कृष्णाला शोधत अनेक वृक्षलतांना त्याच्याविषयी विचारत असल्याचा उल्लेख आहे.

केवळ संस्कृत साहित्यातच नव्हे, तर धर्मशास्त्र, ज्योति:शास्त्र, वैद्यकशास्त्र यांसारख्या शास्त्रांमध्येही अशोकाला महत्त्वाचे स्थान आहे.

धर्मग्रंथांमध्ये अशोक प्रतिपदा, अशोकषष्ठी, अशोकद्वादशी, अशोक त्रिरात्रव्रत यांसारखी व्रते सांगितली आहेत. अशोकाचे पूजन केले असता शोक नष्ट होतो ही या व्रतांच्या आचरणामागील भावना आहे. आजही पंचांगात 'अशोककलिकाप्राशन' या विधीचा उल्लेख आढळतो. चैत्र शुद्ध अष्टमीस पुनर्वसु नक्षत्र आले असता अशोकाच्या आठ कळ्यांचे प्राशन (भक्षण) करतात. त्यावेळी पुढील मंत्र म्हणतात-

*त्वामशोकवराभीष्टं मधुमाससमुद्भवम्।*
*पिबामि शोकसन्तप्तं मामशोकं सदा कुरू।।*

- निर्णयसिन्धु

अर्थ - हे अशोकश्रेष्ठा, इच्छापूर्ती करणाऱ्या व चैत्र मासात उत्पन्न झालेल्या तुझे (तुझ्या कळ्यांचे) मी प्राशन करत आहे. शोकसंतप्त अशा मला तू विशोक कर. हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मातही अशोकाला पवित्र मानतात. कारण भगवान गौतम बुद्धांचा जन्म अशोक वृक्षाखाली झाला, अशी आख्यायिका आहे.

धर्मशास्त्राप्रमाणे ज्योति:शास्त्रामध्येही अशोकाला स्थान आहे. इसवी सनाच्या पाचव्या शतकात होऊन गेलेल्या वराहमिहिर या ज्योति:शास्त्रज्ञाने आपल्या 'बृहत्संहिता' या ग्रंथात कोणत्या वृक्षांना फळे-फुले आली असता कोणत्या द्रव्यांची तसेच धान्यांची समृद्धी होते याविषयी ठोकताळे मांडले आहेत. त्यांमध्ये 'रक्ताशोकेन रक्तशालि:' म्हणजे रक्ताशोकाने तांबड्या साळीची (लाल तांदुळाची) तर 'नीलाशोकेन सूकरक:' म्हणजे नील अशोकाने सूकरक जातीच्या पांढऱ्या तांदुळाची समृद्धी होते असे म्हटले आहे - बृहत्संहिता कुसुमलताध्याय: २९.२

आयुर्वेदामध्येही अशोकाचे औषधी गुणधर्म सांगितले आहेत.

संस्कृत कवींना प्रिय असणाऱ्या आणि शास्त्रीय ग्रंथांमध्ये स्थान प्राप्त झालेल्या या अशोकाच्या वाट्याला कधीकधी मात्र संस्कृत साहित्यातच निंदा आली आहे. 'सुभाषितरत्नभाण्डागार' या ग्रंथातील एका श्लोकात अशोकाच्या फळ न येण्याच्या वर्मावर बोट ठेवले आहे-

*किं ते नम्रतया किमुन्नेततया किं वा घनच्छायया।*
*किं वा पल्लवलीलया किमनया चाशोकपुष्पश्रिया।*
*यत्त्वन्मूलनिषण्णखिन्नपथिकस्तोम: स्तुवन्नन्वहं*
*न स्वादूनि मृदूनि खादति फलान्याकण्ठमुत्कठित:।।*

अर्थ - हे अशोका, तुझ्या नम्रतेचा, उन्नततेचा, घनदाट छायेचा, पालवीचा आणि पुष्पवैभवाचा काय उपयोग? कारण तुझ्या मुळाशी बसलेल्या (उन्हाने) त्रस्त झालेल्या पथिकांना मधुर आणि मृदु फळे खावयास मिळत नाहीत.

हा श्लोक रचणाऱ्या कवीचा अशोकाकडे पाहण्याचा दृष्टिकोण 'जीवनासाठी कला'वादीचा आहे.

संस्कृत साहित्यातील या अशोकाची मराठी साहित्यात मात्र दखल घेतली गेली नाही. अपवाद फक्त 'ज्ञानेश्वरी'चा आहे. भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायातील विश्वरूपदर्शनावर भाष्य करताना संत ज्ञानेश्वरांनी अशोकाचा दृष्टान्त दिला आहे.

ज्ञानेश्वर म्हणतात-

*अशोकाचे अंगवसे चघळिले कऱ्हेनि जैसे।*
*लोक वक्त्रामाजी तैसे वाया गेले।।*

ज्ञानेश्वरी अध्याय ११ ओवी क्र. ४१४

अर्थ - उंटाने जसे अशोक वृक्षाचे शेंडे (पालवी) चघळून टाकावेत त्याप्रमाणे या विश्वरूपाच्या तोंडात हे लोक वाया गेले. (गिळून टाकले गेले.)

आज केवळ मराठी साहित्यातच नव्हे, तर वृक्ष संवर्धनातही अशोकाच्या वाट्याला उपेक्षाच आली आहे. आज उद्यानांमधून, वनांमधून तसेच रस्त्याच्या दुतर्फा लावल्या गेलेल्या वृक्षांमध्ये गुलमोहरासारख्या विदेशी वृक्षांचीच चलती आहे. श्री. दि.द. बहुलीकर यांनी आपल्या 'कल्लोलिनी' नामक अभिनव संस्कृत मुक्तक संग्रहात गुलमोहराला पाहून अशोक सशोक झाल्याचे म्हटले आहे–

*स्वीयालक्तकरागरक्तचरणन्यासाय वृक्षान्तराण्युज्झित्वा*
*गुल्मोहर द्रुमशिरो दृष्ट्वा श्रियं वृण्वतीम्।*
*एषो अशोकतरुश्च शोकसहितो वैवर्ण्यमापद्यते।।*

अर्थ – श्रीने म्हणजे वसंतलक्ष्मीने आपला अलक्तकाने (अळत्याने) रंगविलेला पाय ठेवण्यासाठी (पदन्यासासाठी) रक्ताशोकाला बाजूला सारून लाल फुलांच्या गुलमोहराची निवड केलेली पाहून अशोक सशोक होतो.

खरोखरच विदेशी गुलमोहर कानामागून (की पानामागून?) येऊन तिखट (की तिखटाप्रमाणे?) लाल झाला आहे!

लाल फुलांनी फुललेल्या अशोकातून त्याच्या हृदयाला झालेली ही जखम तर भळभळत नाही ना? आणि जेव्हा 'आसुपालवाला' अशोक समजले जाते तेव्हा तर या जखमेवर जणू मीठच चोळले जाते.

आज जेव्हा प्राचीन काळातील, संस्कृत साहित्यातील सुंदर युवतींच्या लत्ताप्रहाराने फुलणारा, सुगंधी माणकांची बरसात करणारा अशोक पुन्हा वनोपवनी लावला जाईल तेव्हाच तो खऱ्या अर्थाने 'अ–शोक' होईल!

**प्रा. नीला अशोक कोर्डे**
वरदान १०५, ए ४४ एदलजी रोड,
टेंभीनाका, ठाणे–४००६०१
दूरध्वनी : (०२२) २५३९७९१२
भ्रमणध्वनी : ९३२४८९१८८०

॥ग्रंथाली॥




**दृष्टिपटल**
**डॉ. माधवी मेंहेंदळे**

एका संवेदनशील मनाने प्रांजळपणे कथन केलेला देहाच्या अभ्यासापासून ते देहाच्या जाणिवेपलीकडच्या अनुभवविश्वातला 'दृष्टिपटल' हा प्रवास आहे.

**मूल्य १५० रुपये ● सवलतीत ९० रुपये**




**सावन घन बरसे**
**स्मिता भागवत**

संगीतसम्राट तानसेन याला होणारा दाह मेघमल्हार गाऊन शमवणाऱ्या ताना–रिरी या गायक भगिनींचं कर्तृत्व सांगणारी उद्‌बोधक ऐतिहासिक कादंबरी.

**मूल्य ५०० रुपये ● सवलतीत ३०० रुपये**

# रुचीच्या वाचकांसाठी

**खास सवलतीच्या दरात**

INKING INNOVATIONS

## इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे प्रकाशित केलेली पुस्तके

**आमच्या www.iipublishers.com या संकेतस्थळावर जाऊन ऑर्डर फॉर्म भरून info@iipublishers.com वर इमेल करावा. अथवा खालील पत्त्यावर पाठवावा.**





**PS Ramani—A Legend**
A photo-biography of the world-renowned neurospinal surgeon



**Yanni Itihas Ghadavila:**
*Author: Dhananjay Keer*
Biographical sketches of some great national leaders



**California te Kailash:**
*Author: Vishwas Barve*
The author's experiences of his stay abroad and here





**Junction:**
*Author: Mrs. Savani Kelkar*
Account of the interesting experiences of an engine driver, transporting you into the world of Indian Railways




**Tuzhyashich boltye mee...**
*Author: Shambhavi Hardikar*
Conversations of the author with her late actor husband Jayram Hardikar





**How to be Effective in Life:**
*Author: Dr PS Ramani*
A handy guide that will help the young generation onto the path of stress-free success




**Trailing the Tiger:**
*Author: Atul Dhamankar*
From tiger traits to close encounters, and plenty of colour photographs, an exciting and interesting book for wildlife lovers




Deer Tales:
*Author: Atul Dhamankar*
All about deer, their appearance, eating and mating habits, a very informative book with lots of colour photographs and personal experiences





**High-Tech Lifeline:**
*Author: Dr Anil Gandhi*
An easy-to-understand book on the latest developments in medicine




**Collaborators or Conformists?:**
*Author: Dr Aroon Tikekar*
Lectures based on Dr Tikekar's comprehensive study of the editors of the past with rare information and photographs




**Aushadhi Vishwakosh:**
*Author: Dr Mandar Joshi*
An encyclopaedic volume elaborating the attributes of 150 naturally occurring substances, and their use in allopathy, ayurveda, homeopathy and so on.




**Kishore Kumar**
A Versatile Genius
*Author: Shashikant Kinikar*
An interesting biography of A Versatile Genius

**India Printing House. Gr. floor,**
**42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031**
**Tel: +91 22 2418 6233, Email : info@iipublishers.com, Website : www.iipublishers.com**




# मानवटकर
## मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
### आय.एस.ओ.9001:2008 प्रमाणित हॉस्पिटल

**जयंत टॉकीजच्या मागे, मेडिसीन कॉम्प्लेक्स जवळ, एकोरी वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२**

Ph. : 07172-272298, 274498, Fax-07172-274529,
Mob. : 9049114444, 9823004481, 8550993824
E-mail : prakash.manwatkar@gmail.com
Website : www.manwatkarhospital.com

**डॉ. सौ. माधुरी मानवटकर**
एम.बी.बी.एस., एम.एस. (जन. सर्जरी)
एम.एस. (ई.एन.टी.) एफ.आय.ए.जी.ई.एस, एफ.एम.ए.एस.
**जनरल व लॅप्रोस्कोपिक सर्जन**

**डॉ. प्रकाश मानवटकर**
एम.बी.बी.एस., एम.डी.डी.ए.
(अॅनेस्थेशियालॉजी)
**अॅनेस्थेशियालॉजिस्ट व क्रिटीकल केअर**

**डॉ. आनंद बेंदले**
एम.बी.बी.एस., एम.डी. (जनरल मेडिसीन)
**ह्रदयरोग, मधुमेह, किडनी विकार व क्रिटीकल केअर तज्ज्ञ**

**डॉ. उल्हास बोरकर**
एम.बी.बी.एस., एम.एस. (आर्थो) डी. आर्थो
**अस्थिरोग तज्ज्ञ**



**सुनील चौधरी**

नगराध्यक्ष, नगर परिषद, अंबरनाथ

**यांच्यातर्फे**

# ग्रंथालीच्या चाळीस वर्षांच्या वाटचालीनिमित्त हार्दिक शुभेच्छा

# WISH YOU
# HAPPY DIWALI
# AND
# A
# PROSPEROUS
# NEW YEAR

## FROM A WELL WISHER

विज्ञानविलोल

# वंशाचा दिवा आणि वंशवेल

**सुधीर थत्ते**

> **'प्रत्येकाने स्त्रीभ्रूणहत्या करून केवळ मुलगाच होऊ दिला तर भविष्यात मुलग्यांची संख्या बेसुमार वाढल्यामुळे आपल्या मुलाला जोडीदारीण न मिळाल्याने आपला वंशच नष्ट होईल,' हे लोकांना पटले तरच ते विवेकाने वागू शकतील. त्यानंतर समाजाच्या सर्व थरांमध्ये पसरणारे 'वंशाचा दिवाच हवा,' हे वेड संपुष्टात येऊन भविष्यात आपली वंशवेल सुरक्षितपणे बहरेल. हे काम लगेच सुरू करायला हवे, कारण या विवेकवेलीची फळे दिसायला एका पिढीएवढा काळ उलटावा लागेल!**

**गर्भाला** कोणत्याही प्रकारे अपाय न होता केवळ आईच्या रक्तपरीक्षेने गर्भधारणेनंतर अवघ्या सात आठवड्यांत मातेच्या पोटातल्या गर्भाच्या अनुवांशिक दोषांचे निदान नव्व्याण्णव टक्क्यांपेक्षा अधिक अचूकतेने करता येईल, असे अलिकडेच वॉशिंग्टनच्या जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठाच्या स्टेफॅनी डेव्हॅने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवून दिले. आपल्यातले कोणतेही गंभीर स्वरूपाचे अनुवांशिक आजार सदोष जनुकांमार्फत आपल्या भावी अपत्याकडे गेलेले नाहीत ना, याची तपासणी कोणत्याही जोखमीशिवाय करणे यामुळे शक्य होईल. अनुवांशिक आजारांचा वारसा त्या गर्भाच्या वाट्याला आलाच असेल तर वेळीच गर्भपात करून त्याची आयुष्यभराच्या त्रासांमधून सुटकाही करता येईल.

आईच्या गर्भाशयातल्या बाळाचा डीएनए वारेतून म्हणजे गर्भाभोवतीच्या वेष्टनातून पेशीरहित अवस्थेत आईच्या रक्तात शिरतो. त्यामुळे केवळ आईच्या रक्ताचा नमुना वापरून बाळाच्या डीएनएची तपासणी करून त्यात सदोष जनुक आहेत का, हे कळते. सहजपणे करता येणाऱ्या या तपासणीने सदोष जनुकांमुळे होणाऱ्या भयानक रोगांनी पुढच्या पिढीचे आयुष्य बरबाद होणे टाळता येईल, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

या रक्ततपासणीतून गर्भातले बालक मुलगा आहे की मुलगी हेही कळते. सध्याच्या गर्भलिंग चाचण्यांपेक्षा ही रक्तचाचणी अधिक अचूक, लवकर करता येणारी आणि सोपी आहे. शिवाय, या रक्तचाचणीपाठोपाठ आता मूत्रचाचणीनेही गर्भलिंगपरीक्षा करण्यावर प्रयोग चालू आहेत. या चाचण्या उपलब्ध झाल्या तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे केवळ अशक्य ठरेल आणि भारतातल्या मुलगा-मुलगी भेदाने पछाडलेल्या आई-वडिलांच्या हाती एक नवे कोलीतच मिळेल!

खेदाची गोष्ट म्हणजे, सुशिक्षित, श्रीमंत आणि अमेरिकेसारख्या प्रगत देशात गेलेल्या भारतीयांनाही 'मुलगाच हवा,' या वेडाने पछाडलेले आहे हे अलिकडेच कनेक्टिकट विद्यापीठाच्या जेम्स एगन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अभ्यासातून उघडकीस आले. १९७५ ते २००२

या काळात अमेरिकेत जन्माला आलेल्या मुलामुलींच्या आकडेवारीचा अभ्यास त्यांनी केला. तिथल्या भारतीयांना झालेल्या अपत्यांमध्ये मुलग्यांचे प्रमाण हे एवढे जास्त होते की त्यावरून या भारतीयांनी गर्भलिंग परीक्षा करून मुलगी असल्यास गर्भपात करून घेतला असणार, असा निष्कर्ष त्यांनी काढला.

२०११च्या जनगणनेप्रमाणे भारतात सरासरीने हजार मुलग्यांमागे ९०९ मुली जन्माला येतात. सर्वात वाईट स्थिती जम्मू आणि काश्मिरची आहे, तिथे हे प्रमाण ७७८ एवढे आहे तर हरयाणात ८३५. हरयाणातल्या अनेक खेड्यांमध्ये तर गेल्या कित्येक वर्षांमध्ये एकही मुलगी जन्माला आलेली नाही! महाराष्ट्रात हे प्रमाण ८७६ आणि मुंबईतल्या सर्वात समृद्ध भागात ८५६ एवढे आहे. टरॉण्टो विद्यापीठाच्या झा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी असे दाखवून दिले आहे की भारतातल्या शिकल्या-सवरलेल्या आणि चांगल्या परिस्थितीतल्या लोकांनी आतापर्यंत सुमारे एक कोटी स्त्रीगर्भांची हत्या केली. हा आकडा हिटलरने मारलेल्या ज्यूंच्या संख्येपेक्षाही जास्त आहे!

सर्वसामान्यपणे (म्हणजे स्त्रीगर्भांची योजनापूर्वक हत्या न होता) दर हजार मुलांमागे ९३५ ते ९७० मुली जन्माला येतात. मुलगे जास्त संख्येने जन्माला आले तरी त्यांची प्रतिरक्षासंस्था नाजूक असते. त्यामुळे विविध रोगांना बळी पडणाऱ्या मुलग्यांची संख्या मुलींपेक्षा जास्त असते. तसेच, वयात येणाऱ्या मुलांमधल्या टेस्टोस्टिरोन संप्रेरकामुळे मुलगे कलहांना किंवा अपघातांना अधिक बळी पडतात. त्यामुळे वयात येईपर्यंत हे प्रमाण हजार मुलग्यांमागे हजार मुली एवढे होते. आता सुरक्षेविषयीची जाणीव, लसीकरण आणि वैद्यकीय सुविधा वाढल्याने अकाली मृत्यू न येता वयात येणाऱ्या मुलग्यांची संख्या वाढते आहे, तर स्त्रीभ्रूणहत्यांमुळे मुलींची संख्या मात्र घटते आहे. त्यामुळे भविष्यात सुमारे पंधरा ते वीस टक्के मुलग्यांना जोडीदारीण मिळणे अशक्य होईल.

अर्थात, जोडीदारीण (किंवा जोडीदार) न मिळण्याची समस्या ही सलिंग प्रजोत्पादनाएवढीच जुनी आहे. कारण मानवातच नव्हे तर अन्य प्राण्यांमध्येही नर आणि मादी यांच्या संख्येत वेळोवेळी तफावत निर्माण होते. सभोवतालच्या परिस्थितीनुसार प्राण्यांमध्येही नरांची किंवा माद्यांची संख्या जास्त वाढते. प्रेटोरिया विद्यापीठाच्या एलिसा कॅमेरॉन यांनी असे दाखवून दिले आहे की सस्तन प्राण्यांच्या माद्यांना पुल्लिंगी अपत्य होणार की स्त्रीलिंगी, हे त्यांच्या गर्भधारणेच्या काळातल्या परिस्थितीनुसार बदलते. या काळात जर सुकाळाची स्थिती म्हणजे खाण्यापिण्याच्या पदार्थांची रेलचेल असेल तर पुल्लिंगी अपत्ये जास्त संख्येने जन्माला येतात, तर दुष्काळाची किंवा टंचाईची स्थिती असेल तर स्त्रीलिंगी अपत्ये जास्त संख्येने जन्माला येतात.

स्टोवर्स वैद्यक संशोधन संस्थेच्या मेलिसा लार्सन यांनी याचे जैवरासायनिक कारण शोधून काढले. सुकाळात भरपूर खायला मिळाल्यामुळे माद्यांच्या शरीरात ग्लुकोजचे प्रमाण वाढते. त्यामुळे 'आयएफएन-टॉ' या नावाचे संकेत-रेणू (सिग्नल-मॉलेक्युल) सक्रिय होतात. या रेणूंमुळे स्त्रीलिंगी गर्भांच्या वाढीला प्रतिकूल परिस्थिती निर्माण होऊन ते नष्ट होतात. पण पुल्लिंगी गर्भांची वाढ मात्र होत राहते. दुष्काळात हीच प्रक्रिया उलट दिशेने होते. अशा रीतीने सस्तन प्राण्यांमध्ये पुढच्या पिढीतल्या नर आणि माद्यांची संख्या सुकाळ-दुष्काळानुसार कमी-जास्त होत राहते.

नर-माद्यांची संख्या अशी कमी-जास्त का होते हे उत्क्रांतीशास्त्रातल्या 'पुनरुत्पादन मूल्य' या संकल्पनेतून उलगडते. या संकल्पनेनुसार सजीवांचे आणि त्यांच्या क्रियांचे मूल्य हे त्यांचा पुनरुत्पादनाच्या दृष्टीने किती उपयोग आहे यावर ठरते. याचमुळे पुनरुत्पादनासाठी नर-मादीपैकी जे कोणी जास्त गुंतवणूक करेल त्याचे पुनरुत्पादन मूल्य जास्त असते. परिणामी त्याचा त्या जीवजातीत वरचष्मा राहतो.

बऱ्याचदा नराचा पुनरुत्पादनातला सहभाग केवळ पुंबीज (स्पर्म) देण्यापुरता असतो. मादी मात्र फलित झालेली अंडी उबवणे किंवा पोटात वाढवणे, पिल्लांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे अशी अनेक कामे करते. त्यामुळे मादीचा बहुतेक जीवजातींमध्ये वरचष्मा असतो. कोणत्या नराला आपल्याशी समागम करू द्यायचा हे मादीच ठरवते. त्यामुळे मादीला आकर्षित करण्यासाठी नरांमध्ये प्रचंड स्पर्धा होऊन त्यांच्यात मनोहारी पिसारा, रंगीत कंठ किंवा गोड गळा यांसारखी वैशिष्ट्ये निर्माण होतात. हरिणांमध्ये मादीला आकर्षित करण्याच्या स्पर्धेतून नरांमध्ये आकर्षक शिंगसंभार निर्माण झाला. ही शिंगे फांद्यांमध्ये अडकल्याने अनेकदा नराला वाघासारख्या भक्षकांच्या तोंडीही पडावे लागते. तरीही माद्या शिंगसंभार असणाऱ्या नरांनाच प्राधान्य देत असल्यामुळे नरांचे शिंगसंभार मोठेच राहिले आहेत!

पुनरुत्पादनमूल्य वाढण्यासाठी विशिष्ट लिंगाच्या गर्भांनाच कसा प्राध्यान्याने जन्म दिला जातो, हे हरिणांवरच्या प्रयोगांमध्ये स्पष्ट झाले. हरिणांच्या माद्या सुकाळात प्राधान्याने पुल्लिंगी पिल्लांनाच जन्म देतात. कारण पुल्लिंगी पिल्ले मोठी

झाल्यावर नर म्हणून प्रचंड प्रमाणात पुंबीजे निर्माण करतात. सुकाळात हरिणांची संख्या भरपूर वाढून नराला एकाच हंगामात कितीतरी जास्त माद्यांशी समागम करण्याची संधी मिळून त्याच्या पिल्लांची संख्या भरपूर वाढू शकते. पण मादीच्या स्त्रीबीजांची संख्या मर्यादित असल्यामुळे ती थोड्याच पिल्लांना जन्म देऊ शकते. त्यामुळे सुकाळात पुल्लिंगी पिल्लांचे पुनरुत्पादनमूल्य जास्त असते. दुष्काळात हीच स्थिती उलट होऊन स्त्रीलिंगी पिल्लांचे पुनरुत्पादनमूल्य जास्त होते.

सुरुवातीला हरिणांप्रमाणेच मानव प्राण्यातही नराची निवड मादी करत असे. या स्पर्धेतूनच मानव नराच्या चेहऱ्याला दाढीमिशांची आभूषणे प्राप्त झाली. पण मानव सुस्थिर होत गेल्यावर परिस्थिती बदलली. शस्त्र, अग्नी, शेती अशा विविध शोधांमुळे मानव अधिक प्रगत, सक्षम आणि सुस्थिर झाला. मानवी नर-मादीतल्या युगुलबंधामुळे तो जोडीने राहू लागला. त्यातून अपत्यसंगोपनात नरालाही स्थान निर्माण झाल्याने नरालाही मादीच्या निवडीचा अधिकार मिळाला. यातूनच मानवी माद्यांची त्वचा नितळ होऊन मानवी नरांच्या दृष्टीने त्या 'अधिक सुंदर' बनल्या.

एकेकाळी पुरुष शिकार करायचे, तर स्त्रिया बालसंगोपन करायच्या. शिकारीच्या गरजांमधून धट्ट्याकट्ट्या पुरुषांचे महत्त्व वाढले. नंतर शेतीसाठीही मनुष्यबळाची गरज भागवण्यासाठी मुलगे होणे गरजेचे झाले. यातूनच पितृप्रधान संस्कृती वाढीला लागली. पितृसत्ताक पद्धतीत पिता किंवा कुटुंबातला सर्वात ज्येष्ठ पुरुष हा कुटुंबप्रमुख असतो. त्याच्याकडे बहुतांश अधिकार एकवटलेले असतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे अधिकार जाताना मुलग्याकडेच जातात, मुलगी ज्येष्ठ असली तरी तिच्याकडे जात नाहीत. (मानववंशशास्त्रज्ञांच्या मते काही ठिकाणी मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात असली तरी पितृसत्ताक पद्धतीएवढी सत्ता त्यांत स्त्रियांकडे एकवटलेली नसे.)

पितृसत्ताक पद्धतीबरोबरच मानवाच्या पिल्लांचे पुनरुत्पादनमूल्य हे केवळ नैसर्गिक घटकांवरच अवलंबून न राहता त्यावर सामाजिक घटकांचा परिणाम होऊ लागला. पितृसत्ताक पद्धतीमुळे पित्याच्या शेती, संपत्ती आणि व्यवसायापासून आडनावापर्यंतच्या सर्व गोष्टींचा वारसा मुलग्याकडे जाऊ लागला. त्याच्याकडे 'म्हातारपणची काठी' म्हणून पाहिले जाऊ लागले. मेल्यावर मुलानेच अग्नी देण्यासारख्या धार्मिक रुढींनी मुलग्याचे महत्त्व आणखीच वाढून तो 'वंशाचा दिवा' बनला!

याउलट, मुलगी लग्न होऊन दुसऱ्याच्या घरी जात असल्यामुळे मुलीतली गुंतवणूक आपल्या उपयोगाची नाही, हा समज दृढ झाला. 'मुलीची निगराणी। शेजाऱ्याच्या झाडाला पाणी।।' अशा अर्थाच्या म्हणी उत्तर आणि पश्चिम भारतातल्या बोलीभाषांमध्ये आहेत. यामुळेच कितीही मुली झाल्या तरी मुलगा झालाच पाहिजे हा अट्टहास सुरू झाला. या अट्टहासातूनच अनेकदा कुटुंबातल्या मुलींच्या वाट्याला क्रौर्याची वागणूक येऊन केवळ अकाली मृत्यूच त्यांची त्यातून सुटका करी.



भारताच्या उत्तर आणि पश्चिम भागात पितृसत्ताक पद्धतीचा प्रचंड प्रभाव होता. गर्भलिंगपरीक्षणाअभावी मुलींना गर्भातच मारणे शक्य नसल्याने जन्मानंतर त्यांना लहानपणीच संपवण्याचे प्रयत्न केले जात. ब्रिटिशांच्या अमलाखालील भारतात, तसेच राजस्थान, गुजरात, सुरत आणि कच्छमध्ये मुलींची बालवयातच मोठ्या प्रमाणावर हत्या केली जात असल्याच्या १७८९ सालच्या नोंदी आहेत. म्हणूनच उत्तर आणि पश्चिम भारतातल्या राज्यांमध्ये १७९५ साली बालहत्याविरोधी कायदा करण्यात आला.

हा कायदा होऊन दोन शतके

उलटल्यावरही समाजाच्या मनोवृत्तीत बदल झालेला नाही. उत्तर आणि पश्चिम भारतातल्या अनेक राज्यांमध्ये १९७१ मध्ये स्त्रियांचे प्रमाण ९००च्या खाली होते. दक्षिणेतल्या काही राज्यांमधले हे प्रमाण हजाराच्या आसपास असल्यामुळे संपूर्ण भारताचे सरासरी प्रमाण ९३० होते. (उत्तरेतल्या राज्यांमधल्या पितृसत्ताक संस्कृतीपेक्षा दक्षिणेकडच्या राज्यांची संस्कृती वेगळी असल्याने दक्षिणेत स्त्रियांची स्थिती तुलनेने चांगली होती.)

त्यातच, १९७०नंतर गर्भलिंग चाचण्या उपलब्ध झाल्या, १९७१मध्ये गर्भपाताला कायदेशीर मान्यता मिळाली आणि यानंतर स्त्रीगर्भपातांचा ओघच सुरू झाला. मुलगी असल्यास चाचणीनंतर १०० टक्के स्त्रिया गर्भपात करून घेतात, पण मुलगा असल्यास अनुवांशिक दोष असला तरी गर्भपात केला जात नाही, असे निरीक्षण रमणम्मा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नोंदवले आहे. १९८०नंतर सोनोग्राफीने गर्भलिंगपरीक्षा शक्य झाल्यावर 'आज पाचशे रुपये घाला आणि नंतर पाच लाख रुपये वाचवा,' अशा जाहिराती उघडपणे झळकू लागल्या! जिथे वीज नाही अशा छोट्या गावीही जनरेटरच्या मदतीने सोनोग्राफी करून लिंगपरीक्षेनंतर स्त्रीभ्रूणहत्या करण्यात येऊ लागल्या.

गर्भलिंगपरीक्षांवर बंदी घालणारा कायदा १९९६मध्ये अमलात आला. २००३नंतर कायद्याला व्यापक स्वरूप दिले गेले. यामुळे वर दिलेल्या रक्तपरीक्षेसह कोणतीही गर्भलिंगचाचणी करण्यावर बंदी आहे. अर्थात, कायदा झाला तरी त्याची अंमलबजावणी किती होऊ शकते हा प्रश्न शिल्लक राहतोच. स्त्रियांची संख्या २००१च्या जनगणनेप्रमाणे ९३३ होती ती २०११मध्ये ९४०वर गेली. हा फरक स्त्रिया जास्त जगून वयस्कर स्त्रियांची संख्या वाढू लागल्यामुळे पडला, पण एक ते सहा वर्षे वयोगटातल्या बालिकांची संख्या मात्र ९१४ एवढी कमी आहे. या दशकात लोकांचे शिक्षण आणि समृद्धी यांत वाढ झाली तरी त्याने ही समस्या सुटण्याऐवजी वाढलीच आहे.

उत्तर भारतात विशेषतः हरयाणा आणि पंजाबमध्ये ज्या खेड्यांमध्ये एकही मुलगी अलिकडे जन्माला आलेली नाही अशा खेड्यांत आपली मुलगी द्यायला पालक तयार होत नाहीत. त्यामुळे तिथे लग्नासाठी मुली पळवल्या आणि पैसे देऊन खरीदल्या जात आहेत. तसेच, यातल्या अनेकींना घरातल्या सर्व तरुणांना आपला नवरा म्हणून सक्तीने स्वीकारावे लागत आहे, असा स्वयंसेवी संस्थांचा अहवाल आहे. जोडीदारीण न मिळणाऱ्या मुलग्यांच्या वाढत्या संख्येमुळे मुलींची सामाजिक असुरक्षितता वाढते आहे. त्यामुळे मुलगी होण्याऐवजी मुलगाच झालेला बरा, असे भावी पालकांना वाढत्या प्रमाणात वाटण्याचा धोका आहे. असे झाले तर मुलींच्या संख्येत अधिकच वेगाने घट होईल.

एखाद्या जीवजातीत उत्परिवर्तनाने केवळ पुल्लिंगी प्राणी निर्माण होऊ लागले तर ती जीवजात नष्ट होते. जीवजात नष्ट होण्याचा निसर्गाच्या दृष्टीने एकच अर्थ असतो, तो म्हणजे ती जीवजात जगण्याला लायक राहिलेली नाही. पण पालकांच्या अविवेकाकरता त्यांच्या मुलांवर 'जगण्यास नालायक' हा शिक्का मारून सुजाण मानवाला हा प्रश्न सोडवता येणार नाही. मानवाला हा प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः विचार करून मार्ग काढावा लागेल.

शासनाने स्त्रीभ्रूणहत्यांच्या संदर्भात अनेक कायदे केले आहेत. पण त्या कायद्यांच्या मर्यादा आहेत. गर्भलिंगचाचणी बेकायदा असली तरी गर्भपात कायदेशीर आहे. त्यामुळे रक्त किंवा मूत्रपरीक्षेतून सहजपणे स्त्रीलिंगी गर्भ असल्याचे कळले तर गर्भपात करण्यापासून कोणीच थांबवू शकत नाही. समाजात विकृत मनोवृत्ती कायम असताना कायद्याने गर्भपातावर बंदी घातली तर स्त्रीभ्रूणहत्येचे रूपांतर स्त्रीबालहत्येत होण्याचा धोका आहे. चीनमध्ये एकच मूल जन्माला घालण्याचे बंधन असल्याने मुलग्यासाठी आसुसलेले पालक एकुलत्या एका मुलीची हत्या करून, तो अपघात आहे असे दाखवून पुन्हा मुलगा होण्यासाठी संधी मिळवायचे, असा स्वयंसेवी संस्थांचा दावा आहे.


मुलगी मोठी झाल्यावर शासनाकडून किंवा स्वयंसेवी संस्थांकडून तिच्यासाठी रक्कम मिळाली तर हुंडा म्हणून ती वापरली जाऊन हुंड्याच्या प्रथेला बळच मिळण्याचा धोका संभवतो. अपत्ये किती असावीत, ती सर्व पुल्लिंगी अपत्येच असावीत काय, गर्भपात करण्याचा अधिकार कोणाला असावा या गोष्टींसाठी नियम करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे आपल्या लोकशाही देशात खूप अवघड आहे. कारण धार्मिक किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यांपासून मतांचे राजकारण आणि भ्रष्टाचारापर्यंत अनेक गोष्टींचे अडथळे त्यात आहेत.

सध्याच्या शिक्षणामुळे हा प्रश्न सुटायला फारसा उपयोग होत नाही, हे विकसित देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या वतर्नाच्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. स्वतःची प्रगती साधून अमेरिकेत म्हणजे प्रगतीच्या तथाकथित शिखरावर पोचल्यावरही 'मुलगाच हवा,' हा अनेकांचा अट्टहास कायम राहतो. अन्य धार्मिक प्रथांना

किंवा रुढींना झुगारणाऱ्या आणि स्वतःला पुरुषांच्या बरोबरीच्या मानणाऱ्या शिकल्या-सवरलेल्या स्त्रिया आपल्या मुलीला मात्र मुलग्याच्या बरोबरीची मानत नाहीत. अपत्य संगोपनात महत्त्वाचा वाटा असणारी स्त्री 'मुलगा व्हायला हवाच,' या पुरुषांच्या दबावाला बळी पडून स्त्री-भ्रूणहत्येला तयार होते. या साऱ्यातून तथाकथित आधुनिक शिक्षणाचे फोलपण स्पष्ट होते. स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार ना शिक्षणात होतो, ना घरात!

स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याने स्त्रिया अधिक निर्भयपणे विचार करू शकतील. स्त्रियांचे वैयक्तिक जीवनमान सुधारले तर त्या स्वतंत्रपणे विचार करायला आणि आपल्या मतांचा आग्रह धरायला शिकतील. त्या दृष्टीने समानतेच्या संस्कारांसह आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणारे स्त्रीशिक्षण हा प्रश्न सोडवायला उपयुक्त ठरेल.


॥ग्रंथाली॥




डॉ. मनमोहनसिंग

एक वादळी पर्व

सुजय शास्त्री

अर्थनीतीचे शिल्पकार म्हणून नावाजलेल्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या एका दशकातील कर्तबगारीचा मागोवा घेत त्यांच्या विरोधात उठलेल्या काहुरांमागची कारणमीमांसा करत मांडलेला पट....

मूल्य ३०० रुपये ● सवलतीत १८० रुपये


अर्थात, या प्रश्नावरचा सर्वात महत्त्वाचा उपाय आहे तो म्हणजे सर्वांना विवेकाने वागायला शिकवणे. पॅरिसमधल्या मेंदू आणि मज्जारज्जू संशोधन संस्थेचे मथीयऽ पेसिग्लिओं आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'लोक विवेकाने का आणि केव्हा वागतात,' यावर संशोधन केले. त्यात त्यांना असे आढळले की वरवर विचार करता जी गोष्ट तात्कालिक फायद्याची वाटेल तीच करण्यावर सामान्यतः लोकांचा भर असतो. मात्र, जेव्हा लोक एखाद्या गोष्टीच्या भविष्यातल्या दीर्घकालीन व्यापक परिणामांचा विचार करू शकतात, तेव्हा ते विवेकाने वागतात. आपण करतो तेच इतरांनी केले तर समाजात अनर्थ होईल, याची लोकांना खात्री पटते, तेव्हा ते विवेकाचा वापर करायला प्रवृत्त होतात. उदाहरणार्थ, दोन्ही बाजूंकडे अण्वस्त्रे असल्यामुळे अण्वस्त्रांचा वापर म्हणजे एकमेकांना निश्चितपणे नष्ट करणे,' हे जेव्हा दोन्ही बाजूंना पटते तेव्हाच 'अण्वस्त्रांवर नियंत्रण हवे,' हे उभयपक्षांना मान्य होते. 'प्रत्येकाने स्त्रीभ्रूणहत्या करून केवळ मुलगाच होऊ दिला तर भविष्यात मुलग्यांची संख्या बेसुमार वाढल्यामुळे आपल्या मुलाला जोडीदारीण न मिळाल्याने आपला वंशच नष्ट होईल,' हे लोकांना पटले तरच ते विवेकाने वागू शकतील. त्यानंतर समाजाच्या सर्व थरांमध्ये पसरणारे 'वंशाचा दिवाच हवा,' हे वेड संपुष्टात येऊन भविष्यात आपली वंशवेल सुरक्षितपणे बहरेल. हे काम लगेच सुरू करायला हवे, कारण या विवेकवेलीची फळे दिसायला एका पिढीएवढा काळ उलटावा लागेल!

किंबहुना, या सर्वातून मानव म्हणूनही आपण बरेच काही शिकण्याजोगे आहे. जगभरात चाललेल्या विज्ञान-संशोधनातून सातत्याने नवनवे शोध लागतच राहतील. या शोधांमुळे नवनवीन शक्यता निर्माण होत राहतील. या शक्यतांचा उपयोग सर्वांच्या दीर्घकालीन कल्याणासाठीच व्हायला हवा असेल तर आपल्याला केवळ शरीरानेच नव्हे तर मनानेदेखील आधुनिक बनावे लागेल. समाजमनाला योग्य दिशेने वळवून विज्ञानाची विवेकाशी सांगड घातली तरच आपण विनाशाऐवजी विकासाकडे वाटचाल करू शकू!


**– सुधीर थत्ते**


फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६,

गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह, पिरोजशानगर,

विक्रोळी (पूर्व), मुंबई ४००० ०७९

भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३

sudhirthattey@yahoo.com



# भारताचे 'वॉल्ट डिस्ने' व्यंगचित्रकार प्राण

**प्रभाकर वाईरकर, व्यंगचित्रकार**

क्रूरता व अन्याय यांची परिसीमा गाठणारी माणसाची वृत्ती शेवटी मनस्तापापोटी शांततेच्या मार्गाने चालू लागते. जसे सम्राट अशोकाने कलिंग देशावर स्वारी करून माणसांच्या मुडद्यांनी 'दया' नदीचे पात्र रक्ताने लालेलाल केले आणि अचानक सम्राट अशोक बुद्धाच्या शांततेच्या मार्गाने चालू लागला, लुटारू वाल्या कोळी नारदमुनीच्या उपदेशाने ऋषी वाल्मीकी झाला आणि त्यांच्या हातातून दिव्य रामायणाची निर्मिती झाली, तसाच काहीसा परिणाम अती हिंसा, रक्तपात पाहून एका तरुण मुलावर झाला. अखंड भारतामधून भारत आणि पाकिस्तान विभक्त झाल्यावर हिंदू-मुस्लीम यांच्यामध्ये न भूतो न भविष्यती असा रक्तपात, हिंसेचा कळस, मानवी मूल्यांचा चेंदामेंदा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावर नऊ वर्षाच्या तरुणावर सम्राट अशोकाप्रमाणे परिणाम झाला. त्याने ठरवले, की मोठेपणी आपण असे काही करावे की ज्यामधून माणसाच्या मनावर-चेहऱ्यावर आनंदाच्या फुलांचा सतत वर्षाव होत राहू दे. याच ध्येयामुळे एका जगप्रसिद्ध व्यंगचित्रकाराचा भारतीय व्यंगचित्रकलेच्या जगतामध्ये उदय झाला. त्या प्रसिद्ध व्यंगचित्रकाराचे नाव 'प्राण'! प्राण कुमार शर्मा.




एकेकाळी अखंड भारतामध्ये असलेल्या लाहोर शहराजवळील कसूर या खेड्यामध्ये प्राण यांचा १५ ऑगस्ट १९३८ रोजी जन्म झाला. हसते-खेळते सुखी कुटुंब. वडील पोलीस ठाणेदाराच्या हुद्यावर. सात भाऊ-बहिणी. परंतु प्राण हे सहा महिन्यांचे असताना त्यांच्या वडिलांनी हे जग सोडले. अचानक गरिबीच्या भोवऱ्यात कुटुंब सापडले. यातून मार्ग काढण्यासाठी प्राण यांच्या भावाने सर्व कुटुंबासहित ग्वालियरला घरकुल वसवले. त्यांचा मोठा भाऊ कँवरभाई यांच्यामध्ये चित्रकलेचे गुण लपलेले होते. त्यांनी ग्वालियरला साईनबोर्ड रंगवण्याचे दुकान थाटले व त्यातून मिळणाऱ्या मिळकतीमधून संपूर्ण कुटुंब दिवस ढकलत राहिले. गरिबीचा कळस! तरीही प्राण यांनी 'सराफा मेडल ईस्ट' या प्राथमिक शाळेमध्ये प्रवेश घेतला. परंतु पाकिस्तानमध्ये वास्तव्य असल्याने उर्दू भाषेचा वापर व ग्वालियरला हिंदी भाषा पगडा. सुरुवातीला हिंदी समजणे फारच कठीण गेले. भावाला




साईनबोर्डसाठी मदत करणे हा प्राण यांचा छंद झाला. त्या कामाचे २-३ आणे प्राण यांना मिळू लागले. पुस्तके स्वतःची नव्हती. परंतु कुटुंबाकडून त्यांना खूप प्रोत्साहन मिळाले. बाजूलाच असलेल्या सेंट्रल लायब्ररीमध्ये त्यांचे सतत जाणेयेणे चालू झाले. त्या ठिकाणी अनेक वर्तमानपत्रे वाचावयास मिळत. वाचनाची त्याना भरपूर आवड. त्या वर्तमानपत्रांमधील कॉमिक्स स्ट्रिप्स् - जी परदेशी असत- त्यांचे लक्ष वेधून घेऊ लागली व आपणही असे काहीतरी करावे या उर्मीचा अंकुर त्यांच्या मनामध्ये फुटू लागला. परंतु त्या कॉमिक्समधील व्यक्तिरेखा भारतीय असाव्यात ज्या भारतीय संस्कृती अंगावर ल्यालेल्या असाव्यात असे त्यांनी ठरवले.

याच लायब्ररीमध्ये त्यांना टॉलस्टॉय, मुन्शी प्रेमचंद त्यांना सापडले. मुन्शी प्रेमचंद यांची सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढली. असा हा दिनक्रम असूनही अभ्यासामध्येही प्रगती होत होती आणि एके दिवशी 'बीए'ची पदवी हातात विसावली.

ग्वालियरला मनासारखा धंदा होत नव्हता म्हणून प्राण यांच्या भावाने कुटुंबासहित दिल्लीला प्रस्थान ठेवले. त्यांच्या मोठ्या भावाने साईन बोर्डप्रमाणेच, देवळांसाठी देव-देवतांची चित्रे तसेच गुरुद्वारासाठी गुरू नानक अशा सद्गुरूंची चित्रे चितारणे चालू ठेवले. प्राण हे त्यांची कला न्याहाळीत व त्यांच्या पॅलेटमध्ये जे उरलेले रंग असतील त्यांचा वापर करून चित्रे चितारू लागले.

व्यंगचित्रांकडे ओढा असल्याने व्यंगचित्रे ते चितारू लागले. जेणेकरून वाचकांच्या चेहऱ्यावर सतत हास्य निर्माण होत राहील व हेच त्यांचे ध्येय ते नऊ वर्षांचे असल्यापासूनचे होते.

पूर्ण दिवस भावाबरोबर चित्रे चितारण्याचा रियाज करतानाच त्यांनी संध्याकाळी कॅम्प कॉलेजमध्ये (पार्ट टाईम) जाऊन पोलिटिकल सायन्समध्ये एम.ए. केले. त्याचबरोबर ते ड्रॉईंग शिक्षकाच्या नोकरीच्या शोधात होते. समकालीन प्रतिस्पर्धी ड्रॉईंग चित्रकारांपेक्षा त्यांचे रेखाटन उत्तम असूनही त्यांना शिक्षकाची नोकरी मिळत नव्हती कारण त्यांच्याकडे ड्रॉईंगची कोणतीही पदवी नव्हती. त्यामुळे त्यांनी मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये पेंटिंगच्या कोर्ससाठी प्रवेश घेतला. एक विमुक्त विद्यार्थी म्हणून त्याकाळी घरी अभ्यास करून कॉलेजमध्ये परीक्षा देता येत होती. परंतु चार वर्षे ड्रॉईंगची परीक्षा देऊनही त्यांचे जे.जे.च्या अभ्यासक्रमामध्ये मन रमेना. त्यांनी पाचव्या वर्षी जे.जे.चा अभ्यासाक्रम सोडून दिला आणि व्यंगचित्रकलेकडे वळले. कॉमिक्स तयार करू लागले. त्यांची पहिली कॉमिक्स स्ट्रिप 'ढब्बू' दैनिक 'मिलाप'मध्ये प्रसिद्ध झाली, १९६० साली.

त्याकाळी परदेशी कॉमिक्सचा बोलबाला खूप होता. परंतु प्राण यांना नेहमी वाटे आपल्या भारतीय मातीतील व्यक्तिरेखा, विषय आले पाहिजेत. म्हणून भारतीयतेचा प्रभाव असलेली व्यक्तिरेखा व विषय घेऊन ते कॉमिक्स तयार करू लागले. श्रीमतीजी, बिल्लू, रमण, चाचा चौधरी व साबू, पिंकी अशी प्रसिद्ध व्यक्तिचित्रे त्यांनी तयार केली. याच वेळी संपूर्ण भारतीय व्यक्तिमत्त्व, पेहराव असलेला, पांढरी मिशी, वय ५०च्या वर, लाल मोठा पागोटा, हातामध्ये लाकडी काठी, बुटका, जॅकेट, परंतु त्यांचा मेंदू कम्प्युटरपेक्षाही अधिक गतीने काम करायचा असा 'चाचा चौधरी' तयार झाला. चाणाक्यच्या आधाराने 'चाचा चौधरी' तयार केला गेला. कारण त्याकाळच्या पाश्चिमात्त्य लोकप्रिय व्यक्तिरेखा स्पायडरमॅन, सुपरमॅन, बॅटमॅन इत्यादींचा प्रभाव


नसलेली संपूर्ण भारतीय असलेली व्यक्तिरेखा त्यांना तयार करायची होती. 'चाचा चौधरी'कडे सर्व प्रकारच्या समस्या सोडवायचे उपाय होते. मोठ-मोठ्या अपराध्यांना ते धूळ चारायचे. चाचा चौधरी स्वतः शक्तिशाली नसले तरीही ज्यूपिटर ग्रहावरून आलेला शक्तिशाली 'साबू' त्याच्याबरोबर सावलीप्रमाणे राहत असे आणि खतरनाक लोकांचा नाश करण्यात चाचा चौधरींना तो मदत करत असे. त्यांची लाल पगडी भारतीयतेचे प्रतीक असून ती पगडी कधी कधी बदमाशांना पकडण्याचेही काम करत असे. त्यांच्याबरोबर त्यांचा सडपातळ व चतुर असा रॉकेट कुत्राही होता.

स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया या कम्युनिस्ट संस्थेशी त्यांचा संबंध आला. त्यामुळे त्यांनी अनेक मोठाले राजकीय बॅनर तयार केले. भारत विभाजनाच्या वेळच्या हिंदू-मुस्लीम दंगली पाहून आपण निधर्मी बनलो असे ते म्हणायचे.

प्राण यांची चित्रशैली अगदी साधी आहे. चित्रांची आऊटलाईन काळ्या रंगाने ब्रशचा वापर करून त्यानंतर त्यामध्ये रंग भरले जातात. काही वेळा काळ्या आऊटलाइनचा वापर न करता हाफटोन पद्धतीने रंग भरले जातात. कॉमिक्सच्या फ्रेममध्ये जी रचना केली जाते त्यामध्ये वेगवेगळ्या अँगल्सनी चित्रांकन केलेले अगदी क्वचितच आढळते. फ्लॅट पद्धतीने रंग भरले जातात. रेखाटनामध्ये ॲनाटोमीचा बऱ्यापैकी वापर केलेला आढळतो. व्यक्तिचित्रे रेखाटताना ती भारतीयच वाटतील याची खबरदारी घेतली गेली. काही वेळा कम्प्युटरचा वापर चित्रांमध्ये रंग भरताना केला गेला. आवश्यकतेनुसार बॅकग्राऊंडचा वापर केलेला आढळतो. रंगसंगती भडक पद्धतीने केलेली दिसते.

प्राण यानी विनोदनिर्मिती केली त्यामध्ये उत्तर भारतीय समाजजीवनाचा प्रभाव आढळतो. सर्वसाधारणपणे जे प्रसंग त्यांनी उभे केले ते उत्तर भारतीय संस्कृतीचा जणू आरसाच.

उदा. १) 'चाचा चौधरी' कॉमिक्ससाठी त्यांनी चित्रमालिका तयार केली आहे. त्यामध्ये उत्तर भारतीय डोक्यावरून घुंघट घेतलेली सर्वसाधारण स्त्री वाळवंट सदृश परिसरातून पाणी घेऊन येत आहे व टवाळखोर मुले 'ढोलू' तिची मडकी फोडतात. ती पळून जाते. ढोलू व मित्र खूष, परंतु काही वेळातच तोच प्रयोग ते चाचा चौधरीवर करतात






आणि त्यांची फजिती रंगाचे पाणी अंगावर पडल्याने होते ती दाखवण्यासाठी जी चित्ररचना व संभाषण याचा वापर ते करतात त्याने वाचणाऱ्याच्या मनावर आपोआपच हास्य फुलते. प्रसंग अगदी छोटासा असला तरीही.

या चित्रामध्ये त्यांनी ब्रशने काळ्या रंगाने रेखाटन करून त्यामध्ये कम्प्युटर-फोटोशॉपमध्ये रंगकाम केले आहे. पात्रांमधील हावभाव चित्राला साजेसे आहेत. चित्रकारी अगदी साधी.

२) भर पावसात काळी छत्री घेऊन स्त्री प्रवास करते. हे चित्र एवढे बोलके आहे की जी छत्री तिने वापरली ती तकलादू कंपनीची व ती स्त्री कंजूष असणार हे ध्वनीत होते. प्राण यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांमध्ये 'बिल्लू' हा मानसपुत्र तर 'पिंकी' ही मानसकन्या असे संबोधण्यात येते. या दोघांच्या अफलातून कारवाया त्यांनी अनेक कॉमिक्समधून लोकांसमोर ठेवल्या. विशेषतः बच्चेकंपनीने त्यांचा मनमुराद आनंद लुटला.

३) पिंकी अभ्यासू आहे. ती अभ्यासामध्ये एवढी गर्क झाली की तिच्या केसांमध्ये पक्ष्याने अंडी घातली. तिला वेळेचे भानच राहिले नाही, हे यातून ध्वनीत होते. या ठिकाणी त्यांनी काळ्या आऊटलाइनचा वापर केला नाही, तर संपूर्ण चित्र हाफटोन पद्धतीमध्ये रंगवले आहे. तिची फजिती झालेली आहे हे दर्शवण्यासाठी टवाळखोर ससा दाखवला आहे.

डोळ्यांवरून फिरणारे लांब केस हे 'बिल्लू'चे वैशिष्ट्य, तर 'साबू' अवाढव्य शरीरयष्टीचा. परंतु हे व्यक्तिचित्र प्राण यांनी स्वतःची शैली निर्माण करताना जे परिमाणे योजली, विशेषतः माणसांच्या शरीररचनेत त्याला सयुक्तिक वाटत नाही असे वाटते. विशेषतः बाहू त्या चित्राला समयोजक वाटत नाहीत. तरीही या 'साबू'ने लोकांच्या मनावर गारूड केले. अशा प्रकारे प्राण यांनी ५०० पुस्तकांचे भांडार कॉमिक्स्वेड्या वाचकांसमोर उघडे केले. जवळजवळ ५०/५५ वर्षे प्राण यांनी आपल्या कॉमिक्सने अनेक पिढ्या घडवल्या. नव्हे, जेव्हा एकत्र कुटुंब पद्धती कालबाह्य वाटू लागली तेव्हा आजी-आजोबांच्या पौराणिक, अद्‌भुत, ऐतिहासिक, रम्य, काल्पनिक गोष्टी नातवंडाना सांगण्याचा जमाना कसा राहणार? मुलगा, सून व मुले एका घरात तर आजी-आजोबा दुसऱ्याच गावात/शहरात चाचपडत पडलेले... अशा स्वतःमध्येच गुंतलेल्या आईवडिलांमुळे

छोट्यांना 'त्या' अद्‌भुत गोष्टी कोण सांगणार?... ते काम प्राण यांच्या कॉमिक्स पुस्तकांनी केले. हीच पुस्तके मुलांची आजी-आजोबा बनली, अनेक पिढ्या व पुढेही...

'चाचा चौधरी' ही चित्रमालिका प्रथमतः 'लोटपॉट' या मॅगझिनमध्ये १९६९ साली प्रसिद्ध झाली आणि त्या मालिकेने वाचकांची मने जिंकण्याचा विक्रम केला. 'शंकर्स विकली'सारख्या अनेक मॅगझिन्स व वर्तपत्रांतून त्यांची व्यंगचित्रे कार्टून स्ट्रिपच्या आकारातून प्रसिद्ध होत होती. परंतु मनासारखे पैसे मिळत नव्हते. १९८१ साली त्यांच्या जीवनात 'अचानक धनलाभ' व्हावा यासारखी घटना घडली. दिल्लीमधील डायमंड कॉमिक्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर नरेंद्र एक प्रस्ताव घेऊन प्राणना भेटले. तो प्रस्ताव असा होता, की आतापर्यंत त्यांनी जेवढ्या कॉमिक्स स्ट्रिप्स केल्या आहेत त्यांचे एक संकलित पुस्तक करावे. जेणेकरून प्राण यांच्या सर्व चित्रांचा हजारो वाचक त्यांचा आस्वाद घेतील. प्राण यांनी त्यांना होकार दिला कारण एकाच वेळी खूप पैसे मिळणार होते.

प्रथमच 'चाचा चौधरी' पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आणि भारतीय व्यंगचित्रकलेच्या विश्वाचा तो मैलाचा दगड ठरला. मराठी, गुजराती, हिंदी, ओरिया, इंग्रजी या भाषांतून 'चाचा चौधरी' घरोघरी पोचला. लोकांकडून सतत मागणी होऊ लागली. 'चाचा चौधरी'चे हक्क प्राण यांनी स्वतःकडे ठेवले. त्यावेळी त्यांना प्रकाशकाकडून एका पुस्तकासाठी रु.१५,०००/- मिळत होते व नंतर ते वाढत जाऊन रु.८०,०००/- ते रु.१,००,०००/- पर्यंत गेले. प्राण त्यांच्या स्वतःच्या अटी घालून पुस्तक पब्लिश करायला परवानगी देत. म्हणजेच एकेकाळी प्रकाशक स्वतःच्या अटीप्रमाणे चित्रकाराकडून कॉमिक्स तयार करून घेत असत, परंतु आज बाजी उलटली. व्यंगचित्रकार स्वतःच्या अटी घालून काम करू लागला. संपादकांनी सुरुवातीला प्राण यांचीही व्यंगचित्रे नाकारली होती.

पुढे, बिल्लू, श्रीमतीजी, रमण, पिंकी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. प्राण यांच्या पुस्तकातील खुसखुशीत विनोद, उपहास, मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनातील हलके-फुलके प्रसंग जणू काही आपल्याच जीवनात घडताहेत वा आजूबाजूला घडताहेत असे वाचकांना वाटू लागे. यांची त्या पुस्तकांमध्ये मेजवानी मिळाल्याने लोक ट्रेनमध्ये प्रवास करताना, बसची वाट पाहताना, तरुण मुले झोपताना 'चाचा चौधरीं'चे पारायण करू लागले आणि त्यांच्या चेहऱ्यावर सतत हास्य खेळू लागले.



प्राण यांच्या कोणत्याही व्यक्तिरेखेचा मृत्यू होत नाही. प्राण एकदा म्हणाले होते, 'माझ्या कॉमिक्सना एवढा प्रतिसाद कसा मिळाला याचे उत्तर - मध्यमवर्गीय लोकांचे जीवनावर आधारित विषय- त्यांचा परिवार, घरातील प्रसंग, मुले, घरातील विरोधाभास, घरेलू प्राणी या सर्वांवर घडणारे प्रसंग यावर अगदी खुसखुशीत भाषेत विनोदी पद्धतीने केलेले चित्रांकन हेच यशाचे गमक आहे.' ते म्हणत, अमेरिकेऐवजी जपानमध्ये जास्त कॉमिक्सची निर्मिती होते.

प्रत्येकाकडे विनोद बुद्धी असणे आवश्यक असते. त्यासाठी पैसे लागत नाहीत. विनोदात हार्ट ॲटकही येत नाही की डिप्रेशनही येत नाही. संपूर्ण आयुष्य आनंदाने भरून राहाते.

कॉमिक्समुळे त्यांना जग फिरण्याचा योग आला. तिथले लोक, निसर्ग, कला वगैरेंचा आस्वाद घेता आला. नॅशनल कार्टूनिस्ट सोसायटी ऑफ अमेरिका, शिकागो या संस्थेने त्यांना व्यंगचित्रकलेवर व्याख्यान द्यायला बोलावले. त्या ठिकाणी जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार विटल बेली, पॅट ऑलिफंट, कॅथी इत्यादींबरोबर संवाद साधता आला. व्यंगचित्रपरिषदेसाठी कोरियामध्ये जाता आले. परंतु लॅटिन अमेरिकेमध्ये ते जाऊ शकले नाहीत, कारण त्या ठिकाणी





रस्त्यामध्ये लुटारू लुटतात व मारतात अशी माहिती त्यांना मिळाली होती.

सतत कॉमिक्ससाठी विचार व कल्पना कशा व केव्हा सुचतात हे विचारल्यावर ते म्हणाले होते, की ''सकाळच्या वेळी निर्मळ व प्रसन्न वातावरणात फिरताना मन आनंदित व प्रफुल्लित असते. अशा रम्य वेळी मनामध्ये विचारचक्र चालू असते. सतत घडणाऱ्या घडामोडींवर विचार होतो व त्यातूनच कल्पनेचा 'स्पार्क' उडतो आणि घरी गेल्यावर कॉमिक्सचे पान तयार होते.''

कोणता वाईट अनुभव या क्षेत्रात आला असे विचरता ते म्हणाले होते, ''श्रीमतीजी' ही कॉमिक्स सिरीज 'सरिता' मॅगझीनमधून नेहमी प्रसिद्ध होत होती व त्यावर कॉपीराईट म्हणून माझे नाव असायचे. अचानक 'सरिता'च्या संपादकांनी ट्रेडमार्क ॲक्टअन्वये 'श्रीमतीजी'चे रजिस्ट्रेशन करावयास तत्कालीन सरकारी संस्थेकडे अर्ज केला. हे जेव्हा मला समजले त्यावेळी तात्काळ मी संपादक विश्वनाथ यांच्याकडे विचारणा केली. परंतु संपादकांनी मला अतिशय अपमानास्पद वागणूक देऊन 'काय करावयाचे ते कर, मी कोणाला घाबरत नाही.' असा दम दिला. परंतु मी वकिलाच्या मदतीने ती केस लढली व जिंकलोही.''

'चाचा चौधरी' कॉमिक्सवर टीव्ही सिरियल पण बनवली गेली. ती वयस्क आणि तरुणांनी खूप पसंत केली.




सतत वेगळे पण क्रिएटिव्ह करण्याच्या सवयीमुळे त्यांनी अनेक व्यक्तिरेखा तयार करून त्यांच्या नावामध्येही आपल्या क्रिएटीव्हिटीचा प्रत्यय आणून दिला. उदा. बिल्लू, पिंकी, तोषी, बजरंगी पहलवान, छक्कन, जोजी, ताऊजी, साबू, गोबर गणेश, चम्पू, भीखू, शान्तू, चिकू, रमन इत्यादी.

'चिकू' नावाच्या अतिशय बुद्धिमान सशाच्या खोडकर कथा प्राण यांनी कॉमिक्समधून मांडल्या. त्या 'चंपक' नावाच्या मॅगझिनमधून प्रसिद्ध होत होत्या. ७० ते ८० चे दशक कॉमिक्सच्या वाटचालींसाठी जणू सुवर्णकाळच! याच काळामध्ये एका अनुमानाप्रमाणे १० करोड कॉमिक्स पुस्तके विकली गेली.

कॉमिक्स ही कल्पना युनान या देशातून प्रथम जगासमोर मांडली गेली. स्विस चित्रकार रुडोल्फ टकर याने अनेक व्यक्तिचित्रे तयार करून त्यांचा उपयोग कॉमिक्स स्ट्रिपमध्ये १९व्या शतकामध्ये केला. जगामध्ये सर्व प्रथम कॉमिक्स स्ट्रिप अमेरिकन वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाली.

प्राण यांनी भारतीय कॉमिक्स पुस्तकांसाठी जे योगदान दिले आणि त्याची व्याप्ती भारतासहित जगामध्ये वाढवली. या कार्यामुळे भारताचे 'वॉल्ट डिस्ने' ही पदवी 'वर्ल्ड एन्सायक्लोपेडिया ऑफ कॉमिक्स' यांनी बहाल केली.

त्यांना अनेक मानसन्मान मिळाले –

- १९८३ साली 'रमन–हम एक है' या पुस्तकाचे

प्रकाशन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले.

● १९९५ साली 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'मध्ये 'चाचा चौधरी'ला मानाचे स्थान मिळाले.

● १९९८ साली 'राजधानी रत्न' पुरस्कार.

● २००१ साली लाइफ टाइम अचिव्हमेंट ॲवॉर्ड – इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टूनिस्ट, बंगलोर यांच्यातर्फे.

● पुट्टी या व्यक्तिरेखेमुळे प्राण हे लाखो कन्नड लोकांमध्ये प्रसिद्ध पावले.

प्राण यांना मुलगा व मुलगी अशी दोन अपत्ये. मुलगा निखिल प्राण यांची 'प्राणस् मीडिया इन्स्टिट्यूट' सांभाळतो आहे.

प्राण यांची 'सही'सुद्धा अर्थपूर्ण वाटते. 'प्राण'मधल्या 'ण'च्या ऐवजी ते एक शून्य काढतात. त्यापुढे 'ण'चा भास होण्यासाठी उभी रेषा काढतात. मला वाटते, त्या 'शून्या'मागे त्यांचा भारतीय कॉमिक्सचे स्वतंत्र जग निर्माण करायचा हेतू असावा.

प्राण यांनी कॉमिक्सच्या क्षेत्रात स्वतंत्र भारतीय शैली निर्माण केली. त्यासाठी त्यांची मेहनत, झोकून देण्याची वृत्ती, विनोदबुद्धी, चित्रकलेचा ध्यास, सृजनशीलता आणि त्यांच्यामध्ये लपलेला विनोदी लेखक या गुणांमुळे त्यांना 'जागतिक सुप्रसिद्ध व्यंगचित्रकारा'चा पल्ला गाठता आला.

आजच्या आधुनिक तांत्रिक युगात, टीव्ही, इंटरनेट, मोबाईल यांनी सर्व समाज व्यापलेला असताना कॉमिक्स पुस्तकांचे भवितव्य अधांतरी लटकत आहे. तरी सुद्धा कॉमिक्स ही आज इंटरनेटच्या माध्यमातून कम्प्युटर, मोबाईल इत्यादींवर सहज उपलब्ध आहेत. ज्यावेळी 'चाचा चौधरी' ही टीव्ही मालिका लोकांनी उचलून धरली, त्याचा परिणाम असा झाला की 'चाचा चौधरी'ची कॉमिक्स पुस्तके दुपटीने विकली गेली. कारण पडद्यावरचा 'चाचा चौधरी', पुस्तकाच्या माध्यमातून प्रत्यक्ष हाताळायचा होता. त्यामुळे तांत्रिक आधुनिक युगातही कॉमिक्सचे महत्त्व कमी होणार नाही. फक्त पेपरऐवजी कम्प्युटर वा मोबाईल फोनचा स्क्रीन वापरला जाईल.

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी–४०५, वाकोला ब्रीज, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई–४०० ०५५. भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

ग्रंथाली


जगभर कुणीही शिकावी अशी...

माय मराठी – My Marathi

मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन

मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला,
ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम

एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर
मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी.
'माय मराठी'च्या एका संचात
पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि
विनामूल्य दृक्‌श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.




मूल्य
रु.१२५०
1000 रुपये
फक्त


प्रकल्प समन्वयक
विभा सुराणा
दीपक पवार

लेखक
सुहास लिमये
जयवंत चुनेकर

टपालखर्च १०० रु.

# विनोबांची त्रयी : स्वाध्याय, धर्म आणि वैचारिक साधना

बाबूराव चंदावार



**विनोबा स्वत:विषयी सांगताना संक्षेपाने म्हणाले होते, की ''मी एक ओबडधोबड पाषाण होतो. या पाषाणाला शंकराचार्यांनी मजबूत आणि पक्के केले. या पाषाणावर गांधीजींनी कारागिरी केली व त्याला आकार दिला. पण, त्या पाषाणाला तोडून त्यातून पाणी काढण्याचा (भक्तितत्त्व परिपुष्ट करण्याचा) पराक्रम ज्ञानदेवांनीच केला.''**

**भारतात** आणि जगातही अनेकांना विनोबांचा सहवास लाभला. यातले बरेच सध्या हयात नाहीत व काही थोडे हयात आहेत. हयात असलेल्यांपैकीच मीही एक आहे. पण हयात असलेल्यांची संख्या मात्र स्वाभाविकपणेच घटत चाललेली आहे. अशांनी विनोबांचे आकलन त्यांच्या परीने केलेलेच आहे. यातले काही अद्याप विनोबांचे आकलन करून घेण्याची मानसिकता बाळगून आहेत. विनोबांच्या बाबतीतले कोणाचेही आकलन परिपूर्ण आहे वा असेल असे मानता येत नाही व मानूही नये! कारण, विनोबांकडे पाहण्याचा व त्यांना जाणून घेण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन स्वतंत्र असू शकतो व आहे. मी माझ्या दृष्टिकोनातून विनोबांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला; व ज्या एका प्रमाणात त्यांना जाणून घेतलेही आहे, ते संपूर्णतः सत्याधारित निखळ आहे, याचा दावा मी कधीच करीत नाही. आकलनात परिस्थितीजन्य अपूर्णता व दोष असूच शकतात व असतीलही, असेच मी मानतो. पण, मी ज्या दृष्टिकोनातून विनोबांकडे पाहिले व ज्यांतून त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तो माझा दृष्टिकोन विनोबांना अन्यायकारक ठरू

नये, याची खबरदारी मात्र मी नेहमीच घेत असतो. अर्थात, अनेक अडचणींच्या प्रसंगातही; विशेषतः आणीबाणीच्या काळातही मी याची खबरदारी घेतलीच आहे.

ईशावास्योपनिषदाचा विनोबांनी मराठीत अनुवाद केला आहे. सकाळच्या प्रार्थनेत म्हणता यावे म्हणून ते गेय पद्धतीचे म्हणजे गाता यावे अशा पद्धतीचे ते केले आहे. यात–

'कविर्मनीसी परिभूः स्वयंभूर यथातथ्यतः

अर्थान व्यद्धाच्छाश्वतीभ्य समाथ्यः'

या संस्कृत वचनाचा मराठी अनुवाद विनोबांनी केला आहे. त्यात 'तो कवि म्हणजे कांतदर्शी, वशी, व्यापक आणि स्वतंत्र झाला. त्याने शाश्वतकालपर्यंत टिकणारे सर्व अर्थ यथावत् साधले' असे म्हटले आहे. यातल्या दृष्टिकोनातून मी विनोबांना पाहतोही आहे. पण, विनोबांनी स्वतःविषयी जे म्हटले आहे, ते मी अर्थातच महत्त्वाचे मानतो. कारण, यात त्यांचा दृष्टिकोन स्वच्छ व स्पष्ट झालेला दिसतो. तोच त्यांच्या जीवनघडणीला कारणीभूत झाला असल्याचे मला जाणवत राहिले आहे!

''तत्त्वविचारात शंकराचार्य, भक्तिमार्गात ज्ञानदेव व कर्मयोगात बापू (म. गांधी) ही माझी त्रयी आहे. भगवान शंकराचार्यांसाठी माझ्या मनात जेवढा आदर आहे, त्यापेक्षा अधिक आदराची कल्पना मी करूच शकत नाही. तत्त्वज्ञानाच्या शंका ज्या तार्किक मनात निर्माण झाल्या, त्यांच्या निरसनासाठी शंकराचार्यांची अधिकाधिक मदत झाली. त्यांचे विचार-ऋण सर्वथा माझ्या डोक्यावर आहे. देहभावनेतून मुक्त होणे हे ऋण फेडण्याचा उपाय आहे. आत्मा अमर आहे. मी आत्मा आहे. शरीरापासून भिन्न आहे. माझी ही प्रक्रिया सतत चालू आहे आणि ईश्वरकृपेने ती पूर्ण होईल याचा विश्वास आहे.

''ज्ञानदेवाचा जो माझ्यावर उपकार आहे, तो व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ शब्दच नाहीत. त्यांचा परिणाम चिंतनावर आहे, हृदयावर आहे आणि माझ्या कार्यपद्धतीवर आहे. म्हणजे माझ्या संपूर्ण जीवनावरच आहे. त्यांनी मला भाव दिले. मला माझी भाषा त्यांनीच दिली. स्वभावाने मी कठोर माणूस आहे. परंतु माझ्या जीवनाला आणि हृदयाला ज्यांनी मधुरता प्राप्त करून दिली आहे ती ज्ञानदेवांनी.

''गांधीजींच्या विचारांचा आणि ग्रंथांचा अभ्यास माझा झालाच आहे. परंतु त्यांच्या संगतीचा लाभही मला लाभला. त्यांनी जी सेवाकार्ये उभी केली, त्यांतले काही करताना माझे तारुण्य त्यात कामी आले. त्यांचे माझ्यावर फार उपकार आहेत. संगती, विचारांचा लाभ आणि तद्नुसार काम करण्याची संधी या तिघांचे मिळून 'महापुरुषसंश्रय' होत असते. ते मला प्राप्त झाले.''

हेच त्यांनी वेगळ्या प्रसंगात स्वतःविषयी सांगताना संक्षेपाने म्हटले होते, की ''मी एक ओबडधोबड पाषाण होतो. या पाषाणाला शंकराचार्यांनी मजबूत आणि पक्के केले. या पाषाणावर गांधीजींनी कारागिरी केली व त्याला आकार दिला. पण, त्या पाषाणाला तोडून त्यातून पाणी काढण्याचा (भक्तितत्त्व परिपुष्ट करण्याचा) पराक्रम ज्ञानदेवांनीच केला.'' ('विनोबाका ब्रह्मनिर्वाण' हिन्दी ग्रंथ पृष्ठ ३५,३६. लेखक बाल विजय. खादी मिशन सेवाट्रस्टसाठी रामदास शर्मा, मॅनेजिंग ट्रस्टी, गोपुरी – ४४२ ११४ वर्धा, महाराष्ट्र. २५ मार्च २०१४, मराठी अनुवाद माझा)

महात्मा गांधींची ३० जानेवारी १९४८ रोजी हत्या झाल्यानंतर जवाहरलाल नेहरूंनी 'आमच्यातून प्रकाश निघून गेला' असे निराशेचे उद्‌गार काढले होते. या मनःस्थितीतच ११ ते १५ मार्च १९४८, असे पाच दिवस गांधीजनांची सभा सेवाग्रामला झाली होती. यात त्यावेळचे राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी, जयप्रकाश नारायण, काकासाहेब कालेलकर, शंकरराव देव, किशोरलाल मश्रुवाला, प्यारेलालजी, झाकिर हुसेन, कृष्णदास जाजू, आचार्य दादा धर्माधिकारी, अप्पासाहेब पटवर्धन, रंगराव दिवाकर, देवदास गांधी, आर्यनायकम्, प्रफुल्लचंद्र घोष, श्रीमन्नारायण अग्रवाल आदि विनोबांच्या सान्निध्यात एकत्र जमले व त्यांनी जे विचारमंथन केले होते, त्यातून 'हरवलेला प्रकाश' विनोबांच्या सांत्वन देण्याच्या स्वरूपात त्यांनी पुन्हा पाहिला व अनुभवला होता. म्हणूनच महात्मा गांधींचे मानस जाणणारे 'मानसपुत्र' मानूनच विनोबांचे सांत्वनपर मार्गदर्शन सर्वांनीच घेतलेही होते. याचवेळी 'सर्वोदय समाज रचने'चा संकल्प सोडला गेला होता.

१९५१ साली भूमीप्रश्नावर आंध्रच्या तेलंगणमध्ये बोल्शेविक क्रांतीच्या समर्थकांनी भूमीहीन शेतमजूरांचे बंड संघटित केले होते. त्यातून हिंसाचार घडून आला होता. याने व्यथित होऊनच विनोबांनी तेलंगणची पदयात्रा केली, व त्यांना १८ एप्रिल (१९५१) रोजी प्रथम भूदान प्राप्त झाले होते. यानंतर सातत्यपूर्वक तेरा वर्षे विनोबांनी भारतात तसेच पाकिस्तानातही पदयात्रा केली होती. यातून जी सर्वोदयाची चळवळ फोफावली त्याचा एक इतिहास घडलेला आहे. त्यातले यशापयश दोन्ही भारताच्या भवितव्याशी निगडित झालेले आहे पण विनोबांनी भारताचा आत्मा

शोधण्याचा प्रयत्न केला व यातून त्यांना कळून चुकले की भारताची प्रमुख प्राप्ती (मिळकत) 'समन्वय' आहे. काकासाहेब कालेलकर विनोबांना भेटले असता विनोबांनी त्यांच्याजवळ जे प्रतिपादन केले होते, ते मुळातूनच जाणून घ्यायला हवे. ''आम्ही आध्यात्मिक' ही आमची एक अहंकाराची गोष्ट झालेली आहे. पश्चिमेकडेही आध्यात्मिक शोध व प्रयोग झाले आहेत. त्याची सोबत घेण्यात नम्रता आहे. आधुनिक काळात त्यांनी विज्ञान वाढविले, त्यांचे हे एक वैशिष्ट्य आहे. भारताची मुख्य प्राप्ती (मिळकत) 'समन्वय'च दिसते आहे. पश्चिमेच्या लोकांना ते अद्याप साधलेले नाही आहे. आम्हालासुद्धा पूर्णत्वाने ते साधले आहे, अशी गोष्ट नाही. पण आम्हाला ते मान्य झाले आहे.

''...जसे विज्ञान अनंत आहे, तसेच अध्यात्मही अनंत आहे. 'अनंत वै वेदाः' असे वाक्य आहे. पण, ते आम्ही विसरलो आहोत.

''बुद्धाचा सादर स्वीकार हिंदुस्थानच्या संतांनी केला होता. कबीर, नानकच नव्हे, पंढरपूर आणि जगन्नाथपुरीच्या वैष्णव संप्रदायानेही हे मान्य केले आहे. एकनाथ-रामदासाने म्हटले आहे, की विठ्ठल बुद्धमूर्ति आहे. आज आम्ही बुद्धावतारातच आहोत. त्याच्या विचारानेच आशिया आणि युरोप एक होऊन राहू शकतील.

''...इस्लाम आणि ख्रिस्ती भारतात आल्यानंतर रूपांतरित झाले. ते आणखी रूपांतरित होतील. हिंदू तर जाणता-अजाणता सतत रूपांतरित होत आहेत. म्हणून बुद्ध, महावीर, शंकर एवढ्यावरच आम्ही मर्यादित होऊ नये. चित्रेसुद्धा मला गौण वाटतात. उत्सव करावेत. मुहम्मद पैगंबराचे चित्र नसते. मला सांगितले गेले की मुहम्मद पैगंबराचे चित्र काढणे 'कुफ्र' होईल. मला तो विचार महत्त्वपूर्ण वाटतो. विवेकानंदांनी अलमोडा आश्रमात रामकृष्ण परमहंसांची मूर्ती वा चित्र ठेवले नाही. म्हटले की एक स्थान तरी कमीत कमी मुक्त ठेवायला हवे.'' ('अनायास शब्दांकन' हिन्दी ग्रंथ. संपादक बाल विजय, खादी मिशन सेवाट्रस्ट, २०१४चे प्रकाशन, पृष्ठ १४९ वरून मराठी अनुवाद माझा)

विनोबा राजकारणात नव्हते. म्हणून ते राजकारण करणारेही नव्हते. महात्मा गांधींनी जेवढे राजकारण केले होते, तेवढेही राजकारण विनोबांनी केले नव्हते. राजकारणाचे आध्यात्मिकरण व्हावे, हा विचार गोपाळ कृष्ण गोखल्यांचा होता. तो महामा गांधींनी मान्यच केला होता. पण स्वातंत्र्यासाठी त्यांना राजकारणात सहभागी व्हावे लागले होते. तरीही राजकारणाचे आध्यात्मिकरण करण्याचा प्रयत्न केलाच होता. पण ते त्यांना साधले असेल, असे दिसलेच नाही. विनोबा मात्र संपूर्णपणे राजकारणापासून अलिप्त राहिले होते. कारण माणसाला माणसापासून वेगळे करून तोडणारे राजकारण असते व असू शकते, असेच त्यांनी मानले होते. धर्मांचे संप्रदाय झाले, व संप्रदायांनी विद्वेष पसरवला. म्हणून धर्म कालबाह्य जाणीव झाली, असे प्रतिपादन विनोबांनी केले. धर्मांचे संप्रदाय होतातच. म्हणून ते धर्माचे पालन करण्याच्या पात्रतेचे नसतात. यातूनच धर्मांची कालबाह्य अवस्था निर्माण होतही असते. याचमुळे विनोबांनी राजकारण व धर्म या दोहोंना कालबाह्य (आउटडेटेड) म्हटले होते. पण अध्यात्म आणि विज्ञान कालसंगत म्हटलेही होते. सांप्रदायिकतेमुळे धर्मातून अध्यात्म नाहीसे झाले. तसेच राजकारणामुळे माणसे माणसापासून तुटली म्हणून वेगळी झाली. यास्तव धर्म आणि राजकारण कालबाह्य झाल्याचे प्रतिपादन विनोबांनी केले होते. या विषयी त्यांचे आश्रमवासी सहकारी काकासाहेब वाळुंजकर यांच्याशी बोलताना त्यांनी म्हटले होते, की ''एकीकडे हिंसेचा जाहीरपणे निषेध केला जाणे आणि दुसरीकडे हिंसेचा राजकीय फायद्यासाठी लाभ उठवणे, अशा प्रकारचे मानसशास्त्र आपल्या देशाच्या नेत्यांचे झाले आहे. दुसऱ्या देशातले नेते हिंसेमुळे होणारा लाभ मान्य करतात आणि हिंसेचे उघडपणे समर्थनही करतात. आपल्या देशातले नेते, ते कोणत्याही पक्षाचे असोत, सार्वजनिक हिंसेचे समर्थन करताना दिसत नाही. पण हिंसेमुळे होणारा लाभ ते सोडतही नाहीत. क्राउड सायकॉलॉजीसारखी नेत्यांची सायकॉलॉजी अभ्यासनीय नसली तरी चिंतनीय विषय आहे. हिंदुस्थानात सत्याग्रही मानले गेलेले सुद्धा सत्याग्रहाला 'प्रेशर टॅक्टिक्स' मानतात. सत्याग्रहात प्रवेश केलेले हे हिंसातत्त्व आहे.'' ('अनायास शब्दांकन' हिन्दी ग्रंथातून मराठी अनुवाद माझा)

प्रथम सत्याग्रही मानूनच महात्मा गांधींनी विनोबांची १९४० साली निवड केली होती. म्हणून विनोबा सत्याग्रही तत्त्वज्ञानाचे आचार्य मानले गेले. महात्मा गांधी जरी सत्याग्रही तत्त्वज्ञानाचे जनक मानले जातात, तरी सत्याग्रहाची विकासप्रक्रिया या देशात फक्त विनोबांनीच चालवली होती. म्हणून ते या विषयातला अधिकार बाळगून असणारे एकमेव सत्याग्रही मानले जातात. महात्मा गांधींनी १९१७ साली रशियात झालेल्या बोल्शेविक क्रांतीकडे दुर्लक्ष केले होते. पण भांडवलशाहीचे ते विरोधीही होते. बोल्शेविक क्रांती व

भांडवलशाही या दोहोंचा स्वीकार न करताच स्वातंत्र्यासाठी त्यांनी सत्याग्रहाचा स्वीकार केला होता. यातून सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान उदयास आले. तो कम्युनिझमला व भांडवलशाहीला पर्याय शोधण्याचा प्रयत्न होता. अर्थात कम्युनिझम व भांडवलशाहीच्या प्रतिक्रियेतून सत्याग्रही तत्त्वज्ञान उदयास आले नाही. मूलगामी परिवर्तनाचा उपाय या सदरातच सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा उदय झाला. या संदर्भात हिंसेच्या विरोधात नकारात्मक (निगेटिव) भूमिका महात्मा गांधींनी घेतलेलीच नव्हती, पण सकारात्मकतेचा (पॉजिटिव) भक्कम पाया मात्र विनोबांनीच रचला. या संदर्भात विनोबा कम्युनिझमचे विरोधक गणले गेले नाहीत. कारण विनोबांनी कम्युनिझमला करुणेचा आधार आहे, असे म्हटले होते. 'नेक्स्ट बेस्ट कम्युनिझम' हे त्यांचे वाक्य प्रसिद्धच आहे. म्हणून कम्युनिझम करुणामूलक आहे, असा अर्थ लावता येऊ शकतो. पण म्हणूनच सत्य आणि अहिंसेविना करुणेची क्रांती होऊ शकत नाही असे विनोबांनी म्हटलेही होते. करुणेतून विवेक गळून पडतो तेव्हाच त्यातून हिंसेचा उद्‌भव होतो हे लक्षात घेऊनच 'हिंसक क्रांती म्हणजे एका गुलामगिरीतून दुसऱ्या गुलामगिरीत प्रवेश करणे आहे. हिंसक क्रांतीतून गुलामी नाहीशी होत नाही हेच यातून त्यांनी बजावले होते!' ('अनायास शब्दांकन' पृष्ठ ४८च्या आधारे)


जसे ज्ञानदेवाने 'विश्वात्मके देवे' या पसायदानातून विश्वात्मक देवाला आळवले होते, तसेच विनोबांनी वैश्विकतेची जाणीव करून देण्यासाठी जे आळवले होते तेही जगाच्या या नव्या संदर्भात लक्षात घ्यायला हवे–

''आम्ही कोणत्याही देश-विशेषाचे अभिमानी नाही. कोणत्याही धर्म-विशेषाचे आग्रही नाही. कोणत्याही संप्रदाय व जाति-वैशिष्ट्यात बद्ध नाही. विश्वात उपलब्ध सद्‌विचाराच्या उद्यानात विहार करणे हा आमचा धर्म. विविध वैशिष्ट्यांत सामंजस्य प्रस्थापित करणे, विश्ववृत्तीचा विकास करणे, ही आमची वैचारिक साधना.'' (मूळ हिन्दी वरून मराठी अनुवाद माझा)

स्वाध्याय, धर्म आणि वैचारिक साधना या त्रयींची जागतिक संदर्भात आळवणी करणारे विनोबा युगद्रष्टे मानूनच निश्चितपणे जगातल्या जनमानसात प्रतिष्ठित होऊन राहतील. हेच त्यांच्या बाबतीत जाणून घ्यायला हवे. कारण, ते जाणून घेण्यासारखे आहे!

**– बाबूराव चंदावार**
सई नगर २, डी-१, फ्लॅट नं.१३, सिंहगड रोड,
पुणे ४११ ०३०, महाराष्ट्र
दूरध्वनी: ०२०-२४२५०६९३


ग्रंथाली




**कथा माझ्या घडण्याची**
**प्रभाकर राणे**

हे लेखन शिक्षणविषयक
आस्था बाळगणाऱ्या साऱ्यांनी
आवर्जून वाचावं असं आहे.

**मूल्य १६० रुपये ● सवलतीत १०० रुपये**




**वचनपूर्ती**
**मृणालिनी प्रभू**

माणसातील चांगुलपणावरील अढळ विश्वास, प्रेमावरील अभंग निष्ठा, निरंतर श्रमाची उपासना आणि दुर्दम्य इच्छाशक्ती या चार मूल्यांना घेऊन जीवनाची वाटचाल करणाऱ्या उमीचा भावभावनांनी भरलेला हृदयंगम प्रवास म्हणजे एक उत्कंठावर्धक कादंबरी.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# उंबरठा

**सु.गो. तपस्वी**

सदर कथेवर 'ग्रंथाली'ने स्पर्धा आयोजित केली आहे.
(स्पर्धेच्या अटी कथेच्या शेवटी दिल्या आहेत.)
विजयी स्पर्धकांना पारितोषिके व प्रशस्तिपत्रके देण्यात येतील.
पारितोषिके
प्रथमः रु.३०००/- द्वितीयः रु.२०००/- तृतीयः रु.१०००/-

**''गाडी** काढू का?'' सोमूनं सर्वांना उद्देशून विचारलं. सोमनाथदादा मुंबईहून खास धाकटच्या बहिणीच्या पार्टीकरता आला होता. सोमू आणि त्याची धाकटी बहीण माधुरी ह्यांच्या वयात बरंच अंतर होतं.

काटदरे कुटुंब एकेक करून बंगल्याबाहेर आलं व रस्त्यावर उभ्या केलेल्या बाबांच्या गाडीजवळ जमा झालं. सोमूनं मुंबईहून आणलेली स्वत:ची आल्टो कुंपणाच्या आत ठेवली, फाटक लावलं व तो बाबांच्या इनोव्हामध्ये ड्रायव्हरच्या जागेवर बसला. त्याच्या शेजारी जया, त्याची बायको व त्यांचा तीन वर्षांचा मुलगा, अमेय बसले. मागच्या सीटवर सोमूच्या आईवडिलांनंतर, सोमूच्या मागे माधुरी बसली.

''कुठे जायचं? मेनलँड चायनाच ना?'' सोमूनं विचारलं.

''तिथंच जाऊ या.'' पुढे बाबा म्हणाले, ''माधुरी छान मार्कांनी पास झाली आहे. कंप्युटर इंजिनीअर म्हणून नोकरीला लागल्यावर ती पार्टी देईल. आज मात्र तिच्या ग्रॅज्युएशनच्या पार्टीसाठी मीच पैसे खर्च करणार हं. लेट अस सेलिब्रेट.'' बाबांनी पुस्ती जोडली.

''तुम्ही सेलिब्रेट करणार म्हणजे 'ब्लडी मेरी' लागणारच; तिही मेनलँड चायनामध्ये मिळेल.'' सोमनाथच्या पाठीवर थोपटल्यासारखं करून, त्याची आई मालतीबाई पुढे म्हणाल्या, ''घे बाबा, सेनापती बापट रोडवरच्या मेनलँड चायनामध्येच गाडी घे.''


मेनलँड चायना निवडण्यामागे मालतीबाईंचा दुसरा उद्देश असाही होता, की त्या रेस्टॉरंटमध्ये पार्किंगचा प्रश्न उद्‌भवणार नव्हता. गाडी तेथील अंडरग्राऊंड पार्किंग लॉटमध्ये व्यवस्थित ठेवता येणार होती.

माधुरीचं इतरांच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. जॉब ऑफर्सपैकी कोणता निवडायचा, ह्याबद्दलच ती विचार करत होती.

माधुरीचं लक्ष वेधण्याकरता तिच्या सोमूदादानं विचारलं, ''काय माधुरी, तुला चालेल ना चाइनीज मेन्यू?''

★ ★ ★

दोन वर्षांपूर्वीची ती आठवण माधुरीला अक्षयबरोबर सूप पिताना मेनलँड चायनामध्ये आली होती. अक्षय



सूर्यवंशी म्हणजे माधुरीला दोन वर्षांपूर्वी स्टॅम्फोर्ड युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत भेटलेली, पहिली मराठी व्यक्ती.

माधुरीपेक्षा चार-पाच वर्षं अगोदरच अक्षय पुण्यातून कम्प्युटर इंजिनीअर झाला होता व माधुरीच्या बराच आधी तो अमेरिकेत येऊन पोचला होता. सीसीएस ह्या भारतीय कंपनीत अक्षय नोकरीला होता व त्या कंपनीकडून डेप्युटेशनवर येऊन दुगल ह्या अमेरिकन कंपनीत तो गेली काही वर्षं कॅलिफोर्नियाच्या बे एरियात काम करत होता.

माधुरीच्या आईवडिलांचा तिच्या अक्षयबरोबरच्या आंतरजातीय प्रेमप्रकरणाला तसा विरोधच होता. मात्र, सोमूदादानं माधुरीला आश्वासन दिलं होतं, की काही महिन्यांत तो आईवडिलांना त्या दोघांच्या लग्नाकरता अनुकूल करून घेईल.

माधुरीसुद्धा क्षिप्रा ह्या भारतीय कंपनीतून डेप्युटेशनवर बे एरियात काम करत होती. पालो आल्टो ह्या सॅनफ्रान्सिस्कोच्या उपनगरातील माधुरीच्या अमेरिकन एम्प्लॉयरचं नाव होतं एलपी, लँगली पॅकार्ड.

अक्षय दुगलमध्ये डेप्युटेशनवर आला असताना सुरुवातीला त्याला दोन-चार अमेरिकन कंपन्यांकडून नोकरीकरता विचारणा झाली, परंतु त्यासाठी त्याला अमेरिकन सिटिझन होण्याचा निर्णय घ्यावा लागणार होता. लग्नानंतर दोन्ही कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळींनी त्या जोडप्याच्या परदेशी स्थायिक होण्याच्या निर्णयात सहभागी असावं, असा अक्षयचा विचार होता व त्यासाठीच तो तीन-चार वर्षांनंतरही डेप्युटेशनवरच काम करत होता.

★ ★ ★

माधुरीच्या वडिलांचा, रघुनाथ काटदरेंचा ऑटोमोबाईल्सचा एक महत्त्वाचा घटक बनवण्याचा पुण्यात कारखाना होता. बघायला गेलं तर रघुनाथराव हे पुण्यातील एक मोठं सामाजिक प्रस्थ होतं व माधुरीच्या लग्नाला होणाऱ्या विरोधाला रघुनाथरावांकडे ठाम कारण नव्हतं. जातीचा प्रश्न अमेरिकेत वास्तव्य करताना अक्षय व माधुरीच्या विवाहाबाबत येणार नाही हे सोमनाथला ठाऊक होतं आणि स्वत:च्या आईवडिलांना ते पटवणं हे त्याला तसं कठीण काम नव्हतं.

अमेरिकेत माधुरीनं लग्न करण्यासाठी एखादा मराठी माणूस निवडला होता, हेच आईवडिलांच्या दृष्टिकोनातून खरं तर महत्त्वाचं होतं आणि लग्नानंतर दोघंही अमेरिकेचं नागरिकत्व घेतील, ह्या गोष्टीबाबत कोणाचंच दुमत नव्हतं. शिवाय, अक्षय व माधुरी दोघंही मांसाहारी होते - अक्षय मुळातलाच व माधुरी सवयीनं - हे सुद्धा आईबाबांना पटवण्यासाठी एक महत्त्वाचं कारण असू शकत होतं.

अशा व इतर स्पष्टीकरणानंतर सोमूनं अक्षय व माधुरीच्या लग्नासाठी आईवडिलांची समजूत घातली व त्यांच्याकडून लग्नाला परवानगी मिळवली.

★ ★ ★

दोन-चार महिन्यांतच अक्षय-माधुरीचा विवाह भारतात समारंभानं साजरा झाला. बरीच सूर्यवंशी मंडळी अकोल्याहून आली होती. वरपक्षाकडून अकोल्याला एक रिसेप्शन ठेवण्यात आलं. पुण्यातील लग्नसोहळ्यात अक्षय व माधुरीच्या नातेवाईकांना व दोन्हीकडच्या कौटुंबिक

परिचितांना बोलावलं गेलं होतं.

पुण्यातील एका रिसेप्शनला मात्र अक्षय व माधुरीच्या कंपन्यांतील व्यक्तींनाही आमंत्रण गेलं होतं आणि रघुनाथरावांच्या कारखान्यातील सर्व माणसांकरता एक वेगळा स्वागत-समारंभ आयोजित केला गेला होता.

आठवडाभर चाललेल्या लग्नाच्या धामधुमीनंतर अक्षय व माधुरी नवरा-बायको म्हणून अमेरिकेला परतले आणि परतण्याच्या वाटेवर स्पेनमध्ये दोघांनी हनीमून साजरा केला.

★ ★ ★

स्पेनमधील बार्सिलोनाहून मालोरकाला जातानाचा दोनशे किलोमीटरचा प्रवास बोटीनं दिवसा करू व येताना विमानानं परतू, असं अक्षय व माधुरीचं आधीच ठरलं होतं.

जाताना डेकवर लाटांच्या फेसावरील शिंतोड्यात भिजायला दोघांनाही खूप मजा आली.

जगप्रसिद्ध चित्रकार पिकासोची कारकीर्द फ्रान्समध्ये गेली होती तरी मूळचा तो बार्सिलोनाचाच. शिवाय, बार्सिलोनामधील आन्टोनिओ गाऊडि ह्या आर्किटेक्टच्या वास्तूंबद्दल माधुरीनं कुठेतरी वाचलं होतं. बार्सिलोना ही माधुरीची निवड होती तर हनीमूनकरता मालोरकाचा रिसॉर्ट अक्षयनं निवडला.

मालोरका ह्या बेटाची राजधानी आहे पाल्मा; पाल्मा डि मालोरका हे त्या राजधानीचं संपूर्ण नाव. राफेल नदाल हा टेनिसपटू मूळचा मालोरकाचाच आणि त्या गोष्टीचा रास्त अभिमान स्पेनमधील त्या राज्यातील लोकांना आहे.

माजोर्का, म्हणजेच स्पेनमध्ये मालोरका. मालोरकाला बेट म्हणायचं, पण पस्तीसशे स्क्वेअर किलोमीटर एवढं मोठं क्षेत्रफळ असलेलं ते बेट स्पेनमधील एक राज्य आहे. गंमत म्हणजे, स्पेन ह्या देशातील ते राज्य सिंगापूर ह्या देशाच्या पाच-सहा पट आहे!

पाल्मापासून दहा किलोमीटरवर आणि एअरपोर्टपासून फक्त दोन किलोमीटर अंतरावर असलेला इब्रिस्टार रॉयल क्युपिडो हा रिसॉर्ट राहण्यासाठी अक्षयनं निवडला. जिभेला जडत्व आणणाऱ्या रिसॉर्टच्या त्या संपूर्ण नावापेक्षा मालोरकामधील टॅक्सीड्रायव्हर आयआरसी ह्या सोप्या नावानं त्या रिसॉर्टचा उल्लेख करायची. आयआरसीसारख्या नामांकित हॉटेलमध्ये स्वत:च्या खर्चानं राहण्याची त्या प्रेमी युगुलाची ऐपत नव्हती, परंतु आयुष्यात हनीमून परत परत येणार नसल्यामुळे त्या नवदांपत्याला होणाऱ्या खर्चाची पर्वा नव्हती.

प्लामा डि पाल्मा ह्या दोन्ही बाजूला झाडं असलेल्या, बुलाव्हाच्या मध्यावर असलेल्या आयआरसी रिसॉर्टवर राहणं अक्षयनं पक्कं केलं व पुढील तीन-चार दिवस हां हां म्हणता निघून गेले.

सकाळी ब्रेकफास्ट तसा उशिराच झाल्यामुळे दुपारच्या जेवणाला बहुधा 'चाट' मिळायची; रस्त्यावरच कुठेतरी 'चाउम्याउ' व्हायचं! संध्याकाळी मात्र रिसॉर्टजवळच्या एखाद्या बार-रेस्टॉरंटमध्ये डिनर व्हायचं. दोघांनाही सीफूड आवडत असल्यामुळे त्या प्रेमी युगुलाची मालोरकामध्ये चंगळ होती.

कधी एखादा बीच पालथा घातला जायचा, कधी सेरा डि तामुन्ताना ह्या पर्वतराजीमधील डोंगरदऱ्या तुडवल्या जायच्या तर कधी भाड्याच्या सायकली घेऊन दूरवर रपेट व्हायची.

अक्षयबरोबर स्टॅम्फोर्ड युनिव्हर्सिटीत झालेल्या परिचयानंतर माधुरी एकदा अक्षयला म्हणाली होती, 'आय हेट गॉल्फ.' अक्षयच्या ते लक्षात होतं, त्यामुळे मालोरकाला उत्तम गॉल्फकोर्स असूनही अक्षयनं तो मोह टाळला. एक मात्र झालं, वाइनयार्डच्या टूरमध्ये दोघांनीही भरपूर वाईन टेस्ट केली.

रात्री उशिरापर्यंत चाललेल्या जिवाभावाच्या गप्पांमध्ये एकमेकांच्या आयुष्यातील गोष्टींची उजळणी झाली आणि दोन-तीन वर्षांच्या ओळखीतून जे उलगडलं नव्हतं ते रहस्य त्या प्रेमी युगुलाला दोन-चार दिवसांच्या हनीमूनमध्ये मालोरकाला सापडलं.

★ ★ ★

स्टॅम्फोर्ड युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत एका रांगेत अक्षयच्या मागे नुकतीच अमेरिकेत आलेली माधुरी उभी होती. अक्षयनं त्याचं नाव लायब्ररीच्या क्लार्कला सांगितलं. समोरचा माणूस भारतीय दिसत होता तरी तो महाराष्ट्रीय निघावा हे माधुरीला खूप सांकेतिक वाटलं. अधुनमधून मराठीतून बोलण्याची उणीव माधुरीलाही जाणवत होतीच.

''अक्षय सूर्यवंशी, म्हणजे आपल्याला मराठी येतं का?'' माधुरीनं विचारलं.

''हो'' असं उत्तर देऊन माधुरीचं काम होईपर्यंत अक्षय थांबला.

कॉफीवर अक्षय व माधुरीनं एकमेकांची ओळख करून घेतली आणि ओळख करून घेता घेता दोघंही 'आपण'वरून 'तुम्ही'वर आले आणि काही दिवसांतच ती

दोघं 'तुम्ही'वरून 'तू'वर आले होते.

दोघांची ऑफिसे सकाळी आठला सुरू व्हायची. लॉरेन्सहून माधुरी सात बाराची कॅलट्रेन पकडायची तर अक्षय सात अडतीसची.

सल्ला देण्यासाठी अक्षयनं माधुरीला एकदा सुचवलं, ''पंधरा मिनिटांचं मार्जिन ठेवण्याची अमेरिकेत गरज नाही. तू आठच्या ऑफिसकरता उशिराची, सात-अठ्ठावीसची कॅलट्रेनसुद्धा पकडू शकतेस.''

हसत हसत माधुरीनं उत्तर दिलं होतं, ''अरे बाबा, सात अठ्ठावीसची कॅलट्रेन पालो आल्टोला थांबत नाही; म्हणून तर मी सात बाराची लोकल पकडते.''

माधुरीची संगत लाभावी म्हणून काही आठवड्यांतच अक्षय सात-बाराची कॅलट्रेन पकडायला लागला. त्यामुळे माऊंटन व्ह्यूच्या दुगलच्या ऑफिसात अक्षय लवकर पोचायचा आणि कॉफी व डोनटसाठीही त्याला वेळ मिळू लागला. तेच कारण तो इतरांना सांगायचा.

ऑफिसमधून येताना मात्र ते वेगवेगळ्या ट्रेन्सनी लॉरेन्सला परतत असत.

सुरुवातीला, स्टेशनवरून घरी जाताना माधुरी तयार जेवण रेस्टॉरंटमधून पॅक करून घेऊन जायची. हळूहळू अक्षयनंच तिला लॉरेन्समधील दुकानं दाखवली व कुठे काय चांगलं व स्वस्तात मिळतं आणि घरी गेल्यावर ते कसं खाण्यायोग्य करायचं ते सांगितलं. अशा वेळी त्या दोघांचं कॉफीपान होत असे.

कधी कधी सुटी बघून जेवणाचाही कार्यक्रम पुढे होऊ लागला. पाच-सहा महिन्यांतच एकमेकांच्या मित्रमैत्रिणींबरोबर पार्ट्या-पिक्चरनाही सुरुवात झाली आणि वर्षभरात माधुरी-अक्षयचं डेटिंग सुरू झालं.

अक्षय व माधुरीची मैत्री 'स्टेडी' झाली आणि वर्षाच्या शेवटाला ती दोघं लग्नगाठ बांधतील अशी खात्री दोघांच्याही मित्र-मैत्रिणींना वाटू लागली.

★ ★ ★

इ-मेलच्या माध्यमातून अक्षयची बऱ्याच जुन्या-नव्या लोकांची ओळख होऊन मेलामेली सुरू झाली होती; जितेंद्र क्षीरसागर हा त्यांच्यामधीलच एक.

जितेंद्र हा माधुरीचा अल्मा मेट आहे हे अक्षयला कळल्यावर जितेंद्रकडून अक्षयला आलेल्या काही मेल्स माधुरीला फॉरवर्ड करणं अक्षयकडून सुरू झालं आणि नंतर दोघांच्याही मेल्सची सीसी माधुरीला यायची.

जितेंद्र पूर्णतया नास्तिक होता तर अक्षय महाभारत व गीता ह्या ग्रंथातील श्लोकांना उद्धृत करून हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानावर भाष्य करण्यात पटाईत होता. होणाऱ्या त्या वादांमध्ये माधुरीची स्वत:चीही मतं असायची. हळूहळू त्या वादविवादांच्या ग्रूपमध्ये माधुरी सामील झाली.

प्रारब्ध ह्या गोष्टीवर जितेंद्र व माधुरीचा मुळीच विश्वास नव्हता तर अक्षय मात्र बऱ्याच गोष्टींना 'डेस्टिनी' कारणीभूत असते, असं मानायचा. अक्षयचं हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानावर प्रभुत्व होतं, ह्या गोष्टीचं मात्र जितेंद्र व माधुरीलाही कौतुक होतं.

इ-मेल वर झालेल्या गप्पांवरून व यु ट्युबच्या माध्यमाचा उपयोग करून एकमेकांना पाठवलेल्या व्हिडिओ क्लिप्समुळे जितेंद्र, अक्षय व माधुरी आणि इतर ग्रूपमेंबरांना प्रत्यक्ष भेट न होतासुद्धा एकमेकांचा व्यवस्थित परिचय झाला होता.

★ ★ ★



अमेरिकेत आल्याआल्याच जितेंद्रचा जित झाला होता; सर्व परिचित त्याला जित म्हणूनच संबोधायचे. एकुलता एक असलेला जित दहावीत असताना एका अपघातात त्याचे आईवडील दगावले व जित पोरका झाला होता. जितच्या पुढील शिक्षणाची आर्थिक जबाबदारी त्याच्या सदाकाकांनी उचलली, मात्र त्याची रवानगी हॉस्टेलमध्ये झाली होती. पुढील शिक्षणात स्कॉलरशिप व फ्रीशिप ह्यांचं महत्त्व जितला उलगडल्यामुळे 'अभ्यासएके

अभ्यास' हेच जितचं धोरण ठरलं होतं आणि त्या धोरणाचा जितच्या पदव्युत्तर शिक्षणात खूप हातभार लागला होता.

जितनं भारतातील मुंबई आयआयटीमध्ये एमटेक केलं व ते झाल्यानंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीमधून फायनान्समध्ये एमबीएचं शिक्षण घेतलं. अशा उत्कृष्ट शिक्षणामुळेच जितला वाईल्डमन सॅक्समध्ये नोकरी मिळाली व त्यानंतर जितचे अमेरिकन नागरिकत्वासाठी प्रयत्न सुरू झाले होते.

वाईल्डमन सॅक्स पगार, सुविधा व कमिशन भरपूर द्यायची, पण नोकरदारांकडून त्यांची वर्षातील ३६५ दिवस २४ तासांच्या कामाच्या बांधिलकीची अपेक्षा असायची. जित सडाफटिंग असल्यामुळे त्याला वाईल्डमन सॅक्समधील नोकरी व पैसा कमावणं सहज शक्य झालं आणि आयुष्यात जितचं तेच लक्ष्य बनलं होतं.

सध्या जित जर्सी सिटीमधील न्यू पोर्ट इथे राहत होता. जर्सी सिटीची खासियत म्हणजे दक्षिण आशियातील बरेच यशस्वी व महत्त्वाकांक्षी तरुण त्या उपनगरात राहायचे आणि न्यू यॉर्कमध्ये काम करायचे. बहुतेक तरुणांचा मॅनहॅटनमधील रात्रींवर पैसा उधळणं व फिफ्थ अव्हेन्यूवरील महागड्या दुकानात खरेदी करणं हा शौक होता. जितही त्याला अपवाद नव्हता. मॅनहॅटनच्या बारमध्ये त्याच्याचसारख्या महत्त्वाचं काम करणाऱ्या अनेक व्यक्तींच्या धंद्याच्या गप्पा चालायच्या व भरपूर टिप्स मिळायच्या. अशा टिप्समुळे घेतलेले निर्णय नेहमीच फायद्याचे ठरायचे, हेही त्या शौकामागचं एक महत्त्वाचं कारण होतं.

★ ★ ★

अक्षय व माधुरीची लग्नानंतर राहण्यासाठी सोयीच्या घरासाठी शोधाशोध सुरू झाली. अक्षय व माधुरीच्या कामांच्या ठिकाणांसाठी लॉरेन्स खूप सोयीचं होतं. सॅनफ्रान्सिस्कोला जाणाऱ्या कॅलट्रेनचं माऊंटन व्ह्यू हे दुसरं स्टेशन होतं तर पालो आल्टो पाचवं. अक्षयला दहा मिनिटांचा तर माधुरीला वीस मिनिटांचा रेल्वेप्रवास ऑफिसला जाण्यासाठी करावा लागायचा. अक्षय व माधुरी काही वर्षं लॉरेन्सला राहिल्यामुळे तो परिसर त्या दोघांच्या परिचयाचा होता, त्यांना दुकानं व रेस्टॉरंटची माहिती होती आणि दोघांचाही मित्रपरिवार लॉरेन्सला राहणारा असल्यामुळे लग्नानंतर लॉरेन्सलाच राहायचं, ह्या बाबतीत दोघांचंही एकमत होतं.

सर्व दृष्टिकोनांतून सोयीचं असं तीन बेडरूमचं घर फर्निचरसकट भाड्यानं मिळत होतं व तेच अक्षय व माधुरीनं पक्कं केलं. लग्नासाठी भारतात जाण्यापूर्वी दोघांनीही त्यांची जुनी घरं सोडण्यासाठी बंदोबस्त केला व हनीमूननंतर परतल्यावर नव्या घरात 'गृहप्रवेश' करायचा, असं त्या दोघांनी ठरवलं होतं.

हनीमूनहून परतल्यावर अक्षय व माधुरी ह्यांनी आपापल्या ऑफिसच्या व परिचितांतील लोकांसाठी एक रिसेप्शन ठेवलं तर दोघांच्याही जवळच्या मित्रमैत्रिणींकरता नव्या घरातच एका पार्टीचं आयोजन केलं; लग्नाबरोबर 'हाऊस वॉर्मिंग'सुद्धा जोरात साजरं झालं होतं!

बऱ्याच कंपन्यांत नवरा-बायको नोकरीत असू नयेत अशी एक अट असते. कंपनीच्या कामांमुळेच 'जोडपी' तयार होत असली तरी लग्नानंतर एकाला कंपनीच्या त्या अटीमुळे नोकरी सोडावी लागते; अक्षय-माधुरीच्या बाबतीत तो प्रश्नच उद्भवला नाही.

खेळीमेळीत दिवस चालले होते. बघता बघता एक वर्ष संपलं आणि लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाकरता आलेले माधुरीचे आईवडीलही परत गेले.

★ ★ ★

बाबांची सत्तरी साजरी करण्याचा सोमनाथचा विचार होता; त्यानं माधुरीला फोनवरून तसं सांगितलं. अक्षय-माधुरीनं ऑफिसमध्ये रजेची सोय करून भारताला धावती भेट देण्याचा विचार केला व सोमूदादाला तसं कळवलं. विमानाची तिकिटं पक्की करण्यापूर्वी अक्षयनं ऑफिसमध्ये चौकशी केल्यावर बॉसनं एक निराळीच कल्पना काढली. तो अक्षयला म्हणाला, ''न्यू यॉर्कच्या ऑफिसमध्ये एक काम आहे. तू ते करावंस. दोन दिवसांत ते करून पुढे तू मुंबईला जाऊ शकतोस.''

अक्षय म्हणाला होता, ''माधुरी पण बरोबर आहे.'' मात्र, हो-नाही करताकरता दोघांचा तसाच कार्यक्रम ठरला.

अक्षयनं त्याचा कार्यक्रम जितला कळवला होता. जितचं मेलवर उत्तर आलं, की तो कामानिमित्त न्यू यॉर्कमध्ये नसणार. अक्षय व माधुरी दुसऱ्या दिवशी मुंबईचं विमान पकडणार होते. तोच हॉटेलवर जितचा फोन आला.

जित लवकर परतला होता आणि रात्री त्या दोघांना भेटायला हॉटेलवर येणार असं त्यांचं फोनवर ठरलं. जित खाली आल्याचं कळल्यावर अक्षय व माधुरी लॉबीमध्ये

आले व जितला प्रथमच प्रत्यक्ष भेटले. मात्र, जुन्या मित्रांसारख्याच त्यांच्या गप्पा जेवणादरम्यान रंगल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्टनंतर अक्षय-माधुरीनं हॉटेल सोडलं व ठरल्याप्रमाणे बाबांची सत्तरी साजरी करून दोघंही आपापल्या ऑफिसमध्ये कामावर रुजू झाले.

★ ★ ★

रघुनाथ काटदरेंची अशातच सत्तरी साजरी झाली होती, तरीही स्वत:च्या कारखान्याची जबाबदारी ते समर्थपणे निभावत असत. टेल्कोचे सब-कॉन्ट्रॅक्टर म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली व पसारा वाढवत वाढवत दोन-चार ऑटोमोबाईल कंपन्यांना ते कॉम्पोनन्ट्स पुरवायला लागले होते. सोमनाथ धंद्यात आला असता तर धंदा वाढवण्यात अर्थ होता. परंतु तो मुंबईला निराळ्याच क्षेत्रात नोकरीला लागला आणि काटदरेंनी धंदा आवरता घेतला होता. सध्या ते फक्त टाटा मोटर्सला 'नव्या टेल्कोला' माल पुरवीत असत.

मालतीबाईंनी गृहिणीचं कर्तव्य आयुष्यभर पार पाडलं व जबाबदाऱ्या कमी झाल्यानंतर त्या नवऱ्याच्या कारखान्यातील कामगारांच्या पत्नींच्या संस्थेत रमल्या होत्या. आज वयाच्या चौसष्टाव्या वर्षी नुकतीच त्यांनी त्या जबाबदारीतून निवृत्ती स्वीकारली व बागकामात मालतीबाई रस घेऊ लागल्या; बंगल्यासभोवतालच्या बागकामात त्यांचा दिवसातील बराच वेळ जात असे.

बागेत मालतीबाई काम करत असताना फोन वाजला म्हणून त्या आत गेल्या; तोपर्यंत फोनची घंटी वाजणं बंद झालं होतं. दोन मिनिटं टेकावं म्हणून त्या बाजूच्या कोचावरच बसल्या. तेवढ्यात स्टडीमधून चहा टाकण्याची रघुनाथरावांची फर्माइश आली. काम करणाऱ्या इंदुताईंना चहा करायला सांगण्यासाठी त्या स्वयंपाकघरात आल्या तर परत फोनची घंटा वाजायला सुरुवात झाली.

परगावचा फोन आहे, हे फोनच्या घंटीवरून मालतीबाईंना कळलं व फोन रघुनाथरावांकरताच असेल असं मानून त्यांनी त्या वाजणाऱ्या फोनकडे दुर्लक्ष केलं. रघुनाथरावांनीच फोन उचलला.

''मी माधुरीची सहकारी, स्नेहा लॉरेन्सहून बोलते आहे. वाईट बातमी आहे. अक्षय सूर्यवंशी ऑफिसच्या कामाकरता चायनाला गेला असताना विमान अपघातात अक्षयचं निधन झालं आहे. माधुरीनंच तुमचा नंबर देऊन कळवायला सांगितलं. माधुरी तुमच्या फोनची वाट बघते आहे.'' एवढं बोलून स्नेहानं फोन ठेवला.

रघुनाथरावांना मोठा धक्का बसला होता, पण ते त्या धक्क्यातून सावरले व विचार करू लागले. तेवढ्यात इंदुताईंनी चहाचा मग समोर आणून ठेवला. चहा तसाच थंड होत राहिला व हळूहळू त्या धक्क्यातून रघुनाथराव सावरले आणि त्यांनी फोनाफोनी करायला सुरुवात केली.

★ ★ ★

व्हिसाच्या अडचणीमुळे अक्षयच्या अंत्ययात्रेला सोमनाथ येऊ शकला नव्हता, परंतु त्यासाठी आलेले दोघांचे आईवडील, मधुकर सूर्यवंशी, त्यांच्या पत्नी शारदाबाई, रघुनाथराव व मालतीबाई माधुरीकडेच राहिले. दोन-तीन दिवसांनंतर रघुनाथराव कारखान्याच्या कामासाठी पुण्याला परत गेले.

एका आठवड्यानंतर माधुरी थोडी सावरली आणि गरजेच्या मेलामेलीनंतर क्षिप्रा ह्या भारतीय कंपनीनं माधुरीची बदली परत पुण्यात केली. लॉरेन्समधील निरवानिरव झाल्यानंतर माधुरी पुण्याला परत जाणार, हे आता निश्चित झालं होतं.

ऑफिसमधून बिझिनेस व्हिसा व दोन आठवड्यांची रजा घेऊन सोमनाथ अमेरिकेला आला. मधुकर सूर्यवंशी व सोमनाथ ह्या दोघांनी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात खूप मदत केली आणि सोमनाथनं पुढील जबाबदारी घेण्याचं कबूल केल्यानंतर मधुकर सूर्यवंशी व शारदाबाई भारतात परतले.

अक्षयचे आईवडील भारतात परतल्यावर हॉटेलमधून सोमनाथ माधुरीच्या घरी राहायला आला. दोन-तीन दिवस सोमनाथ अक्षयच्या निधनानंतरच्या व माधुरी भारतात परत जाणार म्हणून निर्माण झालेल्या कामांत व्यस्त होता. बऱ्याच गोष्टी ऑनलाईन झाल्यामुळे घरातूनच सोमू बहुतांश आवराआवर करू शकला. उरलेली निरवानिरव माधुरी एकटीसुद्धा करू शकेल अशी सोमनाथच्या कामाची पद्धत होती.

ठरलेल्या दिवशी बाबा आले व त्यानंतर विमानाच्या आरक्षणानुसार सोमनाथ मुंबईला परत गेला.

सर्व कामं आटोपून आणि घर एजंटच्या स्वाधीन करून माधुरी, रघुनाथराव व मालतीबाई दोन दिवस हॉटेलमध्ये राहिले आणि नंतर भारतात परतले.

★ ★ ★

शनिवार-रविवारची सुट्टी साधून सोमनाथ मुंबईहून माधुरीला भेटायला पुण्याला आला होता. स्टडीमध्ये बाबांबरोबर त्याची चर्चा चालू होती. माधुरीच्या आयुष्यात एक नवीन गुंतागुंत निर्माण झाली होती.

''बाबा, काळजी करू नका. क्षिप्रातील माधुरीचा बॉस माझा जुना वर्गमित्र आहे. ऑफिसमधून माधुरीला सर्व प्रकारची मदत मिळेल, त्याची मी खात्री देतो.'' ऐकल्याचं न ऐकलं करून रघुनाथराव म्हणाले, ''माधुरीला दिवस गेलेत, ही गोष्ट अक्षयच्या आईवडिलांशी बोलावी लागेल.''

मालतीबाईंनी जेवायला बोलावलं म्हणून दोघंही उठले.

सूर्यवंशींना भेटून सोमनाथ संध्याकाळी परत आला तेव्हा रघुनाथराव काळजीत स्टडीमध्ये येरझारा घालत होते. आल्या आल्या सोमनाथ आईला व माधुरीला घेऊन स्टडीत आला. सर्वजण स्थानापन्न झाल्यावर सोमू म्हणाला, ''बाबा, एक काळजी मिटली. अक्षयच्या आईवडिलांनी सर्व निर्णय तुम्हीच घ्यावेत, अशी विनंती केली आहे.''

दुसऱ्या दिवशी सोमनाथ क्षिप्रामध्ये काम करणाऱ्या माधुरीच्या बॉसला, त्याच्या वर्गमित्राला – अजित पांडेला – भेटायला गेला. त्या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेचा वृत्तांत त्यानं घरच्या सर्वांना दिलाच होता आणि मुंबईला परतण्यापूर्वी त्यानं सर्वांसमक्ष माधुरीला सांगितलं, ''अजित म्हणालाय की क्षिप्रा मोठी कंपनी आहे. आजवरच्या तुझ्या कामात कुठेच कमतरता नव्हती. सर्व व्यवस्थित होईल, ह्या गोष्टीची अजितनं मला खात्री दिली आहे.''

काही महिन्यांनंतर माधुरीला मुलगा झाला. नावापुरतं बारसं काटदरेंकडेच झालं आणि सूर्यवंशी दांपत्याच्या संमतीनुसार मुलाचं नाव तन्मय ठेवलं गेलं.

★ ★ ★

तन्मयचा आज तिसरा वाढदिवस असल्यामुळे सोमनाथ कुटुंबासकट पुण्याला आला होता. तन्मय खुषीत होता. त्याच्यापेक्षा जास्त आनंद माधुरीच्या चेहऱ्यावर दिसत होता. सूर्यवंशी दांपत्यासकट पन्नास-साठ निमंत्रित रघुनाथरावांच्या बंगल्याच्या बागेमध्ये भोजनाकरता जमले होते; वाढदिवसाचा सोहळा मात्र आत दिवाणखान्यात सुरू होता. त्या समारंभासाठी खास जमलेली पंचवीसेक मुलं-मुली आत फुगे फोडणं व इतर स्पर्धांमध्ये रममाण झाली होती. मुलांच्या स्पर्धा संपल्यावर केक कापण्याचा कार्यक्रम सुरू झाला. वडीलमंडळींनाही दिवाणखान्यात बोलावलं गेलं आणि 'हॅपी बर्थ डे टू यू तन्मय'च्या जल्लोषात संगीताच्या संगतीनं तन्मयचा तिसरा वाढदिवस धडाक्यात साजरा झाला.

सर्व सोहळा पार पडत असताना सोमूला तन्मयचा पहिला वाढदिवस आठवला होता. त्यावेळेस माधुरीला अक्षयच्या अल्पवयीन निधनाचा शोक आवरत नव्हता. बेडरूममध्ये ती व तिच्या सासूबाई, शारदाबाई एकमेकींना मिठी मारून रडत होत्या आणि मालतीबाई त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करत होत्या. केक कापण्याच्या वेळेस माधुरी चेहरा धुऊन तयार होऊन दिवाणखान्यात आली व ओढगस्त आवाजात 'हॅपी बर्थ डे टू यू' ह्या कोरसमध्ये सामील झाली होती. तन्मय खुषीत होता, परंतु स्वत:च्या वाढदिवसाच्या दिवशी आई का रडत आहे, हे त्याला उमजत नव्हतं. पंधरा-वीस जणांच्या उसन्या आनंदात तो पहिल्या वाढदिवसाचा समारंभ पार पडला होता.

आज तन्मयच्या तिसऱ्या वाढदिवसाच्या पार्टीला माधुरीची मैत्रीण, सोनाली हजर होती. सोनाली बालवाडी चालवायची. जूनपासून तन्मय त्या बालवाडीत जाणार होता. काटदरेंच्या बंगल्यापासून तीन मिनिटांच्या अंतरावरच बालवाडी होती; तन्मयला नेण्याआणण्याची जबाबदारी मालतीबाईंनी उचलली होती.

★ ★ ★

अक्षयच्या निधनानंतर माधुरी पुण्याला परतल्यावर काही महिने माधुरीनं खाजगी इ-मेलचा विशेष वापर केला नव्हता. विषयांतरातून विरंगुळा साधण्यासाठी सोमूदादानंच तिला फेसबुकवर निमंत्रित केलं. तिथूनच माधुरीच्या इ-मेलच्या खाजगी वापराला खरी सुरुवात झाली होती. सध्या दिवसातले दीड-दोन तास तरी माधुरी इ-मेल, फेसबुक वगैरे गोष्टींत रमायची. विरंगुळा म्हणून सुरू झालेल्या उपक्रमातून विविध विषयांवरील वादविवादांत स्वत:चं मत मांडण्याच्या मोहामुळे इ-मेलवरील एक व्यासपीठच माधुरीला गवसलं. त्या माध्यमाद्वारे माधुरीच्या परदेशातील अनेक परिचितांबरोबर, मित्रमैत्रिणींबरोबर संवाद सुरू झाले; त्यात एक ग्रूप होता जितचा.

माधुरीच्या बाबांचाही इ-मेलवर दांडगा संपर्क होता. प्रवीण चांदे हा रघुनाथरावांपेक्षा दोन-चार वर्षांनी लहान असेल, पण तो खूप मेल्स पाठवायचा. त्या मेल्समधील काही मेल्स बाबा माधुरीकडे फॉरवर्ड करत असत. हळूहळू

चांदेकाकांनी बरेच मेल्स माधुरीकडे परस्पर पाठवायला सुरुवात केली; उद्देश असाही होता की त्यामुळे माधुरीचा विरंगुळा व्हावा. पुढे, काही महिन्यांत होणाऱ्या वादविवादांमधून माधुरी चांदेग्रूपचा कणा ठरली; ते मेल्स वाचण्यात, उत्तरं देण्यात माधुरीचा वेळ छान जायचा. तोच प्रकार जितच्या ग्रूपबरोबर पण झाला.

भारतीय राजकारणासंबंधातील रंजक गोष्टी, व्यंगचित्रं, प्रवासवर्णनं, विनोद, फोटोग्राफ्स, तत्त्वज्ञान, संगीत, चित्रकला व इतर विषयांवरील प्रकाशित लेख वगैरे विषयांवर चांदेकाकांकडून आलेले निवडक मेल्स माधुरी तिच्या इतर ग्रूप्सकडे पाठवायची व इतर ग्रूप्स आणि जितकडून आलेले मेल्स वाचून, निवडून ती चांदेग्रूपकडे रवाना करायची.

अक्षय व माधुरीचा जितबरोबरचा संवाद लग्नापूर्वी ती दोघं अमेरिकेत असतानाच इ-मेलवर सुरू झाला होता. सुरुवातीसुरुवातीला जितचे मेल्स तत्त्वज्ञानात्मक असायचे, परंतु नंतर त्या मेल्समध्ये वैयक्तिक बातम्या व माहिती यायला सुरुवात झाली. तोच प्रकार माधुरीला पुण्यातील जितबरोबरच्या इ-मेलवरील संपर्कातही अनुभवास आला.

माधुरी पुण्यात असताना येणाऱ्या जितच्या मेल्समध्ये त्याच्या ऑफिसमधील घडामोडी व मित्रपरिवारातील गमतीदार प्रसंग असायचे तर माधुरीच्या मेल्समध्ये तन्मय डोकवायला लागला. पुढे यु ट्युबच्या माध्यमातून व्हिडिओ शूटिंग पण एकमेकांकडे पाठवायला सुरुवात झाली.

माधुरी एकदाच अक्षयबरोबर जितला न्यू यॉर्कमध्ये भेटली होती. मात्र, चार-पाच वर्षांपूर्वी झालेल्या त्या ओझरत्या भेटीपेक्षा कम्प्युटरनं त्या दोघांना एकमेकांबद्दल खूप माहिती पुरवली होती.

★ ★ ★

तन्मयला १०२ डिग्री ताप होता. नुकतंच काटदरे कुटुंब मुंबईला सोमनाथकडे जाऊन आलं होतं आणि डॉ. पाळंदेंनी मलेरियाचा संशय व्यक्त केला. रक्ततपासणीनंतर तो सिद्धसुद्धा झाला होता.

माधुरीला ऑफिसमध्ये जाणं अटळ होतं, तिनं आईकडे विषय काढला आणि आई व बाबा तन्मयची काळजी घेतील ह्या विश्वासानं ती ऑफिसला जाऊ लागली.

काही दिवसांच्या औषधोपचारानंतर तन्मय पूर्ण बरा झाला. त्याच्या बरं होण्याचं मुख्य श्रेय डॉ. पाळंदेंना द्यायला हवं ह्याची माधुरीलाही खात्री होती, परंतु आईवडिलांवर आपण किती अवलंबून आहोत ह्या गोष्टीची माधुरीला तन्मयच्या आजारपणामुळे कल्पना आली.

चार-पाच दिवसांनंतर तन्मय परत बालवाडीला जायला लागला व रोजच्या कार्यक्रमांत रुळला.

माधुरी व तन्मयला चोवीस तास लागणारी मालतीबाईंची गरज तन्मयच्या आजारपणात रघुनाथरावांच्या ध्यानात आली व त्यांनी धंद्यातून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. धंद्यातून होणारा आर्थिक फायदा व केलेली गुंतवणूक ह्या गोष्टींचा अंदाज घेऊन रघुनाथ काटदरेंनी धंदा विकायला काढला व वर्षभरात तो निर्णय कार्यान्वितही केला.

★ ★ ★

आठ मार्च ह्या जागतिक महिलादिनाच्या दिवशी एका महिला संस्थेकडून माधुरीचा सत्कार होणार होता. 'नवऱ्यामागे मुलाला वाढवणारी तरुणी' म्हणून संस्थेला तिची ओळख होतीच. शिवाय, संगणक क्षेत्रात एलपी ह्या अमेरिकन कंपनीत तिनं केलेलं संशोधनही गाजलं होतं आणि तिचं क्षिप्रामधील काम हादेखील एक कौतुकाचा विषय होता.

सत्काराच्या त्या भाषणात माधुरी शेवटी म्हणाली होती, ''आजवर बऱ्याच पुरुषांच्या सत्कारांचे समारंभ मी बघितले व त्यांची भाषणं ऐकली आहेत. बहुतेकांनी आपापल्या कार्याच्या यशामागे एक स्त्री आहे, ह्या गोष्टीची कबुली दिली होती आणि त्यांच्या त्यांच्या पत्नीच्या खंबीरतेचं कौतुक केलं होतं. मी केलेल्या प्रगतीचं सारं श्रेय मात्र मी माझ्या आईवडिलांना अर्पण करते; जोडीला, मला त्या संदर्भात माझ्या खंबीर भावाचा, सोमनाथचाही उल्लेख करावा लागेल.''

★ ★ ★

माधुरी सूर्यवंशीला पुण्याला परतून जवळपास पाच वर्षांचा काळ लोटला होता. क्षिप्रामध्ये माधुरीला एक प्रमोशनही मिळालं होतं आणि अजित पांडेमार्फत चौकशी केली गेली होती, की तिला आठ-दहा दिवसांची फॉरेनची ट्रिप शक्य होईल का?

माधुरीनं तोच प्रश्न बाबांना विचारला. बाबांनी त्रोटकपणे उत्तर दिलं, ''मालतीला विचारून सांगतो.''

मालतीबाईंना तन्मयची देखभाल करणं सोपं जावं

म्हणून रघुनाथरावांनी धंदा विकला होता आणि ते धंद्यातून निवृत्त झाले होते. रघुनाथराव घरकामात व तन्मयच्या देखभालीत मालतीबाईंना बरीच मदत करायचे; शिवाय त्यांना क्लब व रोटरीसारख्या ॲक्टिव्हिटीजही असायच्या.

माधुरीनं विचारलेल्या प्रश्नावर मालतीबाईंबरोबर चर्चा करून बाबांनी माधुरीला सांगितलं, ''हो, तू जाऊ शकतेस. तन्मयला मालतीचा लळा असल्यामुळे आठ-दहा दिवस तू स्वत: नसलीस तरीही चालू शकेल. तन्मयला मात्र आधी तसं पटवावं लागेल.''

माधुरीनं बॉसला तिची आठ-दहा दिवसांच्या फॉरेन असाईनमेंटला जायची तयारी असल्याचं सांगितलं व दोन आठवड्यांनंतर माधुरी ऑफिसच्या कामाकरता न्यू यॉर्कला गेली.

जाण्यापूर्वी माधुरीनं इ-मेलवरून जितला ती न्यू यॉर्कला येत असल्याचं कळवलं होतं. परंतु नेमके ते दोन-चार दिवस जितला न्यू यॉर्कबाहेर ऑफिसच्या कामाकरता जायचं होतं. परतल्यावर जितनं फोन केला व तो माधुरीशी बोलला. माधुरी मुंबईमार्गे दुसऱ्या दिवशी पुण्याला परतणार होती, म्हणून त्याच रात्री त्यांचं माधुरीच्या हॉटेलवर डिनरसाठी भेटण्याचं फोनवर ठरलं.

आजवर अनेक प्रासंगिक व्हिडिओ दोघांनी एकमेकांना पाठवले होते. त्यामुळे, ते पाच-सहा वर्षांनंतर न्यू यॉर्कला हॉटेलमध्ये भेटले तेव्हा बऱ्याच वर्षांनी एकमेकांना पाहिलं असल्याचं त्यांना जाणवलं नाही. जेवताना गप्पा करत असताना उल्लेख केलेली कोणतीच वैयक्तिक बाब त्या दोघांना अनोळखी नव्हती. बऱ्याचदा ते भेटले असावेत, अन् तेही अशातच असं त्यांच्या गप्पा ऐकून कोणालाही वाटलं असतं.

★ ★ ★

माधुरी न्यू यॉर्कहून पुण्याला परतल्यावर जितचा एक मोठा मेल माधुरीला आला. त्या मेलमध्ये जितनं तो पोरका झाल्यापासून त्याच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना कालानुक्रमे सादर केल्या होत्या.

मेल वाचताना जितला जाणवणारी एकटेपणाची बोच माधुरीच्या ध्यानात यावी अशी भाषा जितकडून नकळत वापरली गेली होती.

आजवर माधुरी जितला बऱ्यापैकी ओळखत होती. पण ती दृश्य स्वरूपातील स्वाभाविक ओळख होती. सदर मेलमुळे मात्र जितची मानसिक स्थिती, एकटेपणाची भावना माधुरीच्या लक्षात आली.

जितनं मेलचा शेवट करताना लग्नाबाबत विचारून माधुरीला तिचं मत मागितलं होतं.

★ ★ ★

कामानिमित्त माधुरी मुंबईला आली होती. माधुरीला ज्या गोष्टींबद्दल खाजगीत सोमूदादाबरोबर चर्चा करायची होती त्या घरी वहिनीसमोर बोलता येणार नव्हत्या. माधुरीनं सोमूदादाच्या ऑफिसमध्ये फोन करून त्याला लंचसाठी भेटायला बाहेर बोलावलं. सोमूदादाला विषयाची काहीच कल्पना नव्हती, परंतु मुंबईला परस्पर घरी न येता माधुरीनं जेवायला रेस्टॉरंटमध्ये भेटायला बोलावलं, ह्यावरून चर्चेच्या खाजगी स्वरूपाची कल्पना सोमनाथला आली होती.

गप्पांना इतर गोष्टींनी सुरुवात करून माधुरीनं जितच्या मेलबद्दल सोमूदादाला सांगून मेलची प्रत त्याला वाचायला दिली. जितच्या मेलमधील शेवटचा प्रश्न वाचल्यानंतर सोमूदादानं माधुरीला एक प्रवचनच दिलं होतं.

''माधुरी तुझं उभं आयुष्य अजून जायचं आहे; पुनर्विवाह तर तुला करावाच लागेल! ह्यापूर्वीही बाबांनी व मी पुनर्विवाहाचा विषय तुझ्यासमोर दोन-चार वेळा काढला होता.

''तुझ्या मनाची पुनर्विवाहाला तयारी झालेली नाही, असा विचार करून त्या त्या वेळी आम्ही मुद्दा धसास लावला नव्हता. आज मात्र तूच विषय काढला आहेस, म्हणजे पुनर्विवाहासाठी तुझ्या मनाची तयारी झाली आहे असं मी मानतो.

''आता प्रश्न उभा राहतो तो जितबरोबर लग्न करण्याचा. आज तू तेहतीस वर्षांची आहेस, स्वत:चं भलंबुरं कळण्याचं तुझं वय झालंय आणि आजवरच्या आयुष्यातील अनुभवातून तू शहाणीही झाली आहेस.

''जित तसा एककल्ली आहे. आजपर्यंत काम, काम अन् काम व कामातून लाभणाऱ्या संपत्तीच्या तो मागे होता. जितला संसार जमेल का, हा मोठा प्रश्न आहे.

''दुसरी महत्त्वाची बाब आहे, ती तन्मयची. जितनं त्याला स्वत:चा मुलगा म्हणूनच वाढवलं पाहिजे; ते जितला प्रत्यक्षात जमेल का, हा प्रश्न तू स्वत:लाच विचारावास.

''आजचं जितचं एकाकी वाटणं ही गोष्ट न्यू यॉर्कमध्ये तू त्याला भेटल्यानंतर जितच्या मनात आलेली एक क्षणिक व प्रतिक्षिप्त प्रतिक्रियासुद्धा असू शकते.

''एक निदान मात्र मी जितबद्दल करू शकतो. एखादा निर्णय घेतला व तो अमलात आणायचा ठरवल्यावर त्या निर्णयाशी पक्का राहण्याची वैचारिक कुवत व तो निर्णय निभावण्याची मानसिक क्षमता जितमध्ये आहे.

''निर्णय मात्र तू तुझा घ्यायचा आहेस; जित हा माणूस चंचल आहे का निग्रही हे तूच ठरवायचं आहेस. तू जो निर्णय घेशील तो मला निव्वळ मान्यच आहे असं नाही तर गरज पडल्यास तो निर्णय बाबांना पटवून देण्याची जबाबदारी माझी!

''एक मात्र सांगतो, पुनर्विवाह ही तुझ्या आयुष्याची, तुझ्यापेक्षाही जास्त तन्मयची गरज आहे. पुनर्विवाहासाठी स्वत:चा नवा जोडीदार मात्र तूच निवडायचा आहेस.''

★ ★ ★

तन्मय दीड-दोन वर्षांचा असताना थोडंफार बोलायला लागल्यावर त्यानं विचारलं होतं, ''माझा बाबा कुठे आहे?'' सुरुवातीला माधुरीनं उडवाउडवीची उत्तरं दिली होती. पण काही महिन्यांनंतर तन्मय तोच प्रश्न माधुरीला पुन्हा पुन्हा विचारू लागला.

एक दिवस त्या प्रश्नाला कंटाळून आईसमोर माधुरीनं उत्तर दिलं होतं, ''तुझा बाबा अमेरिकेला असतो.'' नंतर आजीबरोबर तन्मयचं काही बोलणं झालं असेल. मात्र, आजीनंसुद्धा तेच उत्तर दिल्यावर तन्मयनं तो प्रश्न माधुरीला परत कधीच विचारला नव्हता.

आज जितच्या लग्नासंबंधी विचारणेवर भावाबरोबर झालेल्या चर्चेनंतर माधुरीला तन्मयच्या त्या प्रश्नाची आठवण झाली.

जितनं विचारलेल्या प्रश्नावर माधुरीनं तिच्या आईबरोबरही चर्चा केली होती. मालतीबाईंच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. मुलगी पुनर्विवाहाला तयार होणं हेच त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं.

ज्या पद्धतीनं माधुरी जितसंबंधात बोलायची त्यावरून जितबरोबर तिचा पुनर्विवाह कधी ना कधीतरी होणार, ह्या बाबीची मालतीबाईंना कल्पना होती; त्यांनी रघुनाथरावांना खाजगीत तसं बोलूनही दाखवलं होतं.

माधुरीनं सोमूदादा व आईबरोबर झालेल्या चर्चांनंतर बराच विचार केला. तो साधकबाधक विचार करताना सोमूदादानं जितबाबत केलेलं एक निरीक्षण तिला पुन्हा पुन्हा आठवत होतं. अशा अर्थाचं होतं सोमूदादाचं ते विधान, 'जितनं एकदा निर्णय घेतला, की तो त्या निर्णयाशी पक्का राहतो.'

जितनंही त्याच्या मेलमध्ये तन्मयचा उल्लेख केला होता. जितनं मेलमध्ये लिहिलं होतं, 'तन्मयला मी माझा मुलगा मानायला तयार आहे. मी चाळीशीकडे झुकल्यामुळे मला तुला पुन्हा आई बनवण्यात रस नाही. आपल्याला मूल होऊ द्यायचं का नाही, हा निर्णय तुझा असेल.'

मेलमधील ते वाक्य जितनं ठळक अक्षरात टाईप केलं होतं.

विचार पक्का ठरल्यानंतर माधुरीनं फोन करून जितला तिचा होकार कळवला आणि नंतर सविस्तर मेल पाठवला होता.

★ ★ ★

माधुरीनं तिच्या मेलमध्ये जितला एक सूचना केली होती. त्या सूचनेला दोन कारणं होती. अमेरिका माधुरीला परकी नव्हती. परंतु माधुरीचं चार-पाच वर्षांचं वास्तव्य अमेरिकेच्या वेस्ट कोस्टवर बे एरियात गेलं होतं. न्यू यॉर्क हे ईस्ट कोस्टवरील शहर तिला तसं नवखंच होतं.

स्वत:ला जे नाविन्य लग्नानंतर लाभावं ते जितच्या राहत्या घरात तिला लाभणार नव्हतं. माधुरीला जितला जुन्या घरातून व जुन्या आठवणींतून बाहेर काढायचं होतं. शिवाय, तन्मयच्या शालेय शिक्षणाच्या दृष्टिकोनातून जितचं जुनं घर सोयीचं आहे किंवा नाही ह्या गोष्टीची माधुरीला कल्पना नव्हती. म्हणूनच माधुरीनं सूचना केली होती, की जितनं त्याचं राहतं घर बदलावं व नवीन घर तन्मयच्या शाळेच्या दृष्टिकोनातून निवडावं.

★ ★ ★

सडाफटिंग असल्यामुळे जितला कोणत्याच कौटुंबिक गरजा नव्हत्या व आजवर त्याची बांधिलकी फक्त कंपनीच्या कामाशी असायची. वाईल्डमन सॅक्स त्याला भरपूर मोबदला देत असली तरी कंपनीच्या अपेक्षा तो लग्नानंतरही निभावू शकेल का नाही ह्या गोष्टीची जितला खात्री नव्हती.

कौटुंबिक स्वास्थ्य व गरजा ह्यांना प्राधान्य द्यायचं ठरवलं तर, ह्या प्रश्नावर जितनं विचार केल्यानंतर कमी पगाराची टिचिंग लाईन पत्करावी का, असा एक मुद्दा जितच्या मनात आला. प्रस्तुत मुद्यावर जितचं कोलंबिया युनिव्हर्सिटीतील त्याच्या परिचयातील प्राध्यापकांशी बोलणंसुद्धा झालं होतं.

नवीन नोकरी कुठे व कोणत्या युनिव्हर्सिटीमध्ये असेल ह्या बाबींवरसुद्धा घर बदलण्याचा निर्णय अवलंबून होता आणि नोकरीसंबंधातील तो निर्णय घेण्यापूर्वी काही महिने वा वर्षांचा कालावधी जावा लागेल, ह्या गोष्टीची जितला कल्पना होती.

अशा प्रकारच्या अनिश्चिततेत जितनं राहतं घर सोडावं ही माधुरीची इच्छासुद्धा जितला डावलणं अशक्य होतं.

★ ★ ★

वाईल्डमॅन सॅक्समधील त्याच्या अमेरिकन मित्रांबरोबर जितनं घर बदलण्यासंबंधी चर्चा केली. त्या पैसेवाल्या मंडळींनी व्हाईट प्लेन्स ही वसाहत सुचवली. व्हाईट प्लेन्सला चौकशी केल्यावर कळलं की एखादा बंगला विकत घ्यायचा झाला तर दशलक्ष डॉलर खर्च करावे लागतील. मात्र, बहुतेक भारतीय वंशाच्या मित्रांनी जर्सी सिटी हीच वसाहत सुचवली होती.

गेल्या शतकात जर्सी सिटी हे अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील एक महत्त्वाचं बंदर होतं आणि त्या शहरात जहाज उद्योगाशी जोडलेले लोक राहत असत. मात्र, सत्तरच्या दशकात बेकारीमुळे जर्सी सिटी जवळपास उजाड व गरिबीनं ग्रासलेली अशी वसाहत ठरली होती.

त्या सुमारास एका ज्यू धनिकानं जर्सी सिटीतील भली थोरली जमीन कवडीमोलानं खरेदी केली आणि नवं शहर उभं केलं. न्यू यॉर्क सिटीमधील वाढते उद्योगधंदे, हडसन नदीखालून जर्सी सिटी व न्यू यॉर्क ह्यांना जोडणारी 'पाथ' नावाची रेल्वे व्यवस्था व पुढील दोन-चार दशकांच्या आयटी उद्योगातील इमिग्रंटस ह्या कारणांमुळे जर्सी सिटीतील घरांना आज खूप भाव आला होता.

इंडियन व चायनीज इमिग्रंटसना जर्सी सिटीचं खूप आकर्षण असायचं. बऱ्याच भारतीय इमिग्रंटसचे आई अथवा वडील वा आईवडील मुलाच्या वा मुलीच्या मदतीसाठी जर्सी सिटीतील अपार्टमेंट्समध्ये पाहुणे म्हणूनही येऊन राहत असत. तीस-चाळीसच्या वयोगटातील आयटी क्षेत्रात न्यू यॉर्क शहरात काम करायला येणारी इंडियन मंडळी त्यांची पहिली निवड म्हणून जर्सी सिटीच निवडायचे. एवढी, की जर्सी सिटीच्या रस्त्यांवर आई व वडील नोकरी करणाऱ्या कुटुंबांतील मुलांचं संगोपन करणाऱ्या नॅनी व घरकामात मदत करणाऱ्या भारतीय वंशाच्या तरुणी व मध्यमवयीन बाया जा-ये करत असताना भरपूर दिसायच्या.

सांगोपांग विचार केल्यानंतर व दशलक्ष डॉलरचं लोन घेण्याची ऐपत असूनसुद्धा टिचिंग लाईनमधील नवी नोकरी कुठे आहे हे ठरवल्याशिवाय पुढील वर्ष-दीड वर्ष जर्सी सिटीमध्ये भाड्याच्या मोठ्या अपार्टमेंटमध्ये राहायचं, असं जितनं ठरवलं.

जर्सी सिटी निवडण्यामागे जितचं एक महत्त्वाचं कारण होतं, ते म्हणजे जर्सी सिटीतील भारतीय वातावरण व भारतीय कल्चर. आजूबाजूच्या भारतीय वंशाच्या कुटुंबांत मिसळण्याची संधी मुळातच भारतीय असलेल्या जितलाही टाळता आली नव्हती!

नोकरी बदलण्याचा मानस व तो तडीस जाईपर्यंत घर विकत न घेता भाड्याचं घर बघण्याचा निर्णय जितनं माधुरीला इ-मेलनं कळवल्यानंतर तो भाड्याचं घर शोधू लागला.

माधुरीला जितच्या जुन्या अपार्टमेंटमध्ये राहायचं नव्हतं. तन्मयच्या शाळेचं निमित्त करून नवीन मोठा फ्लॅट शाळेच्या जवळ घ्यावा असा हट्ट तिनं जितजवळ केला होता. जितनं तन्मयच्या प्ले-ग्रूपची झालेली ॲडमिशन लक्षात घेऊन व तन्मयच्या भावी शाळेजवळ मोठं अपार्टमेंट लग्नापूर्वीच शोधायला सुरुवात केली. काही आठवड्यांतच जर्सी सिटीतील वॉशिंग्टन रोडवर भाडेपट्टीवर उपलब्ध होत असलेलं एक तीन बेडरूमचं फर्निश्ड अपार्टमेंट जितनं पक्कं केलं व त्यानं माधुरीला तसं कळवलं.

★ ★ ★

माधुरीच्या इच्छेनुसार पुण्यातील विवाहाचा मोठा समारंभ टाळला गेला. जितही सडाफटिंग असल्यामुळे भारतातील लग्नाच्या समारंभात त्यालाही खास रस नव्हता. जवळची वीस-पंचवीस माणसं एका पंचतारांकित हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेली आणि माधुरीचं व जितचं लग्न रजिस्टर पद्धतीनं पार पडलं. जितकडून साक्षीदार म्हणून ज्यांनी सह्या केल्या ती दोघं होती, सदाकाका क्षीरसागर व अक्षयचे वडील मधुकर सूर्यवंशी.

हनीमूनसाठी माधुरी व जित कुर्ग व वायनाडला जाऊन आले. बाबा आल्याच्या आनंदात तन्मय होता, मात्र हनीमूनचे ते सात-आठ दिवस बालवाडी बुडेल ह्या निमित्ताने काटदरे आजी-आजोबांनी तन्मयला पुण्यालाच ठेवून घेतलं.

★ ★ ★

लग्नानंतर भारतातून परतल्यावर जित नवीन, भाड्याच्या

घरातच राहायला गेला होता. त्या घरात आल्या आल्या लागलीच दुसरीही दोन महत्त्वाची कामं जितला करायची होती. एका कॉकेशियन वकिलानं जितचं मृत्युपत्र बनवलं होतं. जित सडाफटिंग असल्यामुळे ऐन तारुण्यातच त्यानं मृत्युपत्र बनवलं होतं व सदाकाकाच्या मुलांच्या नावे पन्नास टक्के संपत्ती करून उर्वरित हिस्सा अमेरिकेतील सामाजिक संस्थांना आर्थिक साहाय्य देणाऱ्या ट्रस्टला दिला होता.

लग्न झाल्यावर सर्व संपत्ती पत्नीच्या नावे करणं हे जितचं पहिलं काम होतं व दुसरं काम होतं ते माधुरी व तन्मयच्या अमेरिकन सिटिझनशिपसाठी प्रयत्न सुरू करणं. दोन्हीही कामं जितनं त्या कॉकेशियन वकिलाकडेच सोपवली.

जितच्या ओळखीमुळे व वाईल्डमॅन सॅक्समधील त्याच्या पोझिशनमुळे एक-दोन ठिकाणी जितनं माधुरी न्यू यॉर्कमध्ये आल्यानंतरच्या नोकरीसाठी प्रयत्न सुरू केले होते. जितच्या त्या मदतीला मात्र माधुरीनं नकार दिला.

अक्षयच्या निधनानंतर पहिली दोन-तीन वर्षं क्षिप्राच्या मॅनेजमेंटनं माधुरीला सांभाळून घेतलं होतं. पुढेमागे क्षिप्राच्या त्या ऋणाची भरपाई केल्यावर तिनं अमेरिकन कंपनीत नोकरी केली असती; मात्र, सुरुवातीला तरी क्षिप्राकडून न्यू यॉर्कला डेप्युट होणं तिनं पसंत केलं व क्षिप्रातील तिच्या बॉसला माधुरीनं तशी कल्पनाही दिली होती.

★ ★ ★

माधुरीचं जितबरोबर लग्न होऊन आठेक महिने झाले होते.

जितनं भारतातील अमेरिकन वकिलातीला दिलेल्या माहितीनुसार माधुरी व तन्मयच्या पासपोर्ट्सवर अमेरिकन व्हिसा स्टॅम्प झालेलेच होते आणि काही महिन्यांनंतर सिटिझनशिपची चौकशी व गरजेच्या इन्टरव्ह्यूसाठी माधुरी व तन्मय मुंबईलाही जाऊन आले होते.

दरम्यान, एकदा ऑफिसच्या कामानिमित्त माधुरी न्यू यॉर्कला जाऊन आली व त्यावेळी ती त्यांच्या नवीन अपार्टमेंटमध्येच राहिली होती. तन्मयच्या अमेरिकेतील प्लेग्रूपला तिनं भेट दिली व तन्मयची भावी शाळाही माधुरीनं पाहिली होती.

सर्व गोष्टी मनासारख्या झाल्या होत्या म्हणून माधुरी आनंदात होती व माधुरी आनंदात आहे, हे बघून जितही खूष होता.

★ ★ ★

स्टीव्ह मॅकन्टायर हा जितचा बॉस व दोस्त पुण्यात लग्नासाठी आला होता. लग्नासाठी केलेल्या बंदोबस्ताकरता आभार मानण्याकरता स्टीव्हचा फोनही आला होता. फोनची बेल वाजली व बाबांनी फोन उचलला. स्टीव्ह मॅकन्टायरचा फोन होता. बाबांनी शेजारी बसलेल्या माधुरीकडे रिसिव्हर दिला. ''हॅलो स्टीव्ह.'' माधुरीनं बोलायला सुरुवात केली. तू कशी आहेस वगैरे बोलून झाल्यावर स्टीव्हनं माधुरीला जित ऑफिसमधून क्लायंटकडे गाडीनं न्यू यॉर्कबाहेर गेल्याचं सांगितलं. त्यानं जितच्या गाडीला अपघात झाल्याचं सांगितल्यावर, 'बाबा बोलताहेत' असं सांगून माधुरीनं रिसिव्हर बाबांकडे दिला व ती कोचावर डोकं धरून बसली.

माधुरीच्या बाबांनी स्टीव्हचं बोलणं ऐकून फोन ठेवला. थोडा वेळ नि:शब्द शांतता पसरली आणि विचारांती रघुनाथरावांनी सोमूला फोन लावला.

दुसऱ्या दिवशी स्टीव्हचा फोन आला होता तेव्हा सोमूनंच फोन घेतला. ऑफिसच्या कामानिमित्त जित न्यू यॉर्कबाहेर गेला असताना अपघात झाला होता, हे स्टीव्हनं सोमनाथला परत सांगितलं. हॉस्पिटलमध्ये उपचार होत असताना जित दगावला होता, हे सांगून स्टीव्हनं फोन ठेवला.

★ ★ ★

दोन दिवस जितच्या निधनाच्या धक्क्यातच निघून गेले. माधुरीनं तर मौनच धारण केलं होतं. चोवीस तास ती तिच्या बेडरूममध्ये बंदिस्त असायची.

जितचा सदाकाका येऊन माधुरीला भेटून गेला. सदाकाकाला झालेल्या घटनांचा मनातून रागच आला होता. काही महिन्यांपूर्वी जितच्या मृत्युपत्रानुसार सदाकाकाच्या मुलांना जितच्या इस्टेटीतील पन्नास टक्के रक्कम लाभणार होती. मात्र, लग्न झाल्यावर जितनं सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन मृत्युपत्रात बदल केले होते व जनरीतीप्रमाणे सर्व संपत्ती मृत्युपत्रात पत्नीच्या नावे केली होती.

इतकी वर्षं माधुरी व तन्मय पुण्यातच जवळ राहणार व केव्हाही हवं तेव्हा त्यांना नातवाला भेटता येईल हे सूर्यवंशी दांपत्य जमेस धरून चाललं होतं.

होणारी गोष्ट समाजरुढीप्रमाणेच घडत आहे, ह्या कारणामुळे माधुरीचं जितबरोबर लग्न झाल्यावर माधुरी व तन्मय ह्यांना अमेरिकन सिटिझन बनवण्यासाठी जितनं सुरू

केलेल्या प्रयत्नांना सूर्यवंशी दांपत्यानं विरोध करण्यास विशेष वाव नव्हता.

मात्र, आता निर्माण झालेल्या त्रांगड्यामुळे अक्षयच्या आईवडिलांच्या मनात नातवाची चिंता निर्माण झाली होती. माधुरीला भेटायला सूर्यवंशी दांपत्य आलं होतं तेव्हा रघुनाथरावांकडे मधुकर सूर्यवंशींनी वाटणारी ती काळजी व्यक्तही केली होती.

रघुनाथरावांनी विविध प्रश्न व त्यांच्या पर्यायांवर बराच विचार केला, परंतु त्या दोलायमान परिस्थितीत त्यांना माधुरीच्या संमतीशिवाय पुढील पर्याय व मार्ग दिसत नव्हता.

मालतीबाई काटदरेंची मतीच कुंठीत झाली होती. त्यांना माधुरीला सांभाळायचं होतं व तन्मयलाही मोठं करायचं होतं. त्या जबाबदारीची जाण त्यांना त्यांच्या सत्तर वर्षांच्या वयातही भेडसावत होती; नशिबाला दोष देऊन त्रयस्थासारखं मोकळं होणं त्यांना शक्य नव्हतं.

दोन-चार दिवसांनंतर सोमनाथ, जया व अमेय परत येण्याचं सांगून मुंबईला गेले. मुंबईला परतण्याअगोदर सोमनाथ त्याच्या मिलिंद रहाळकर नावाच्या वकील मित्राला पुण्यात भेटला होता. सोमनाथनं थोडक्यात माधुरीवर बेतलेल्या प्रसंगाचं चित्र रहाळकरसमोर उभं केलं व कायदेशीर सल्ला मागितला. रहाळकरनं माधुरी व तन्मय ह्यांची परिस्थिती कायद्याच्या दृष्टिकोनातून सोमनाथला सादर केली व माधुरीसमोरचे पर्याय दर्शवले.

★ ★ ★

मुंबईला परतल्यावर सोमनाथनं माधुरीला एक पत्र लिहिलं व त्या पत्राची एक प्रत सोमूनं बाबांना कुरिअर केली होती. कुरिअरनं आलेली दोन्ही पत्रं बाबांनी घेतली व माधुरीकरता आलेलं पाकीट मालतीबरोबर बेडरूममधील माधुरीकडे पाठवलं.

माधुरीला सोमनाथनं लिहिलेल्या पत्रातील मजकूर असा होता :

प्रिय माधुरी,

तू लवकरच सावरशील व पुढील गोष्टींचा विचार करशील. साऱ्याच बाबी कायद्याच्या चौकटीतील असल्यामुळे मी मिलिंद रहाळकर ह्या माझ्या वकील मित्राला मुंबईला जाण्यापूर्वी भेटलो होतो. रहाळकरनं केलेल्या तुझ्या व तन्मयच्या कायदेशीर परिस्थितीनुसार विशेष अडचणी मला जाणवत नाहीत. परंतु तन्मयबाबत एका गोष्टीचा विचार तातडीनं होणं आवश्यक आहे. त्याकरता आपल्याला मधुकरराव सूर्यवंशींबरोबर बोलावं लागेल.

तुझ्याबद्दल व तन्मयबद्दल मिलिंदनं केलेलं कायदेशीर निरीक्षण पुढे देतो आहे.-

**माधुरी सूर्यवंशी-क्षीरसागर**

● जितनं मृत्युपत्रात सर्व इस्टेट पत्नीच्या, माधुरीच्या नावे केली आहे.

● माधुरी अमेरिकन सिटिझन होण्यासाठी सर्व कागदपत्रं जितेंद्रकडून अमेरिकन सरकारला सात-आठ महिन्यांपूर्वी सादर झालेली आहेत व माधुरीचा मुंबईच्या अमेरिकन कौन्सिलकडून इंटरव्ह्यू व कागदांची रीतसर तपासणी झालेली आहे. येत्या काही महिन्यांतच माधुरीला अमेरिकन सिटिझनशिप मिळावी. मात्र, अजूनही माधुरी भारतीय नागरिकच आहे आणि अमेरिकन सिटिझन होण्याचा पर्याय ती नाकारू शकते.

● जितेंद्रची पत्नी म्हणून लाभलेला व्हिसाचा स्टॅम्प माधुरीच्या पासपोर्टवर उपलब्ध असल्यामुळे आजसुद्धा माधुरी न्यू यॉर्कला जाऊन जितेंद्रच्या अपार्टमेंटमध्ये राहू शकेल.

● जितेंद्रच्या कंपनीतर्फे मिळणारी ग्रॅच्युइटी व इतर रक्कम त्या कंपनीबरोबर गरजेचा पत्रव्यवहार करून एक भारतीय नागरिक म्हणूनसुद्धा माधुरीला भारतातच लाभू शकेल; तीच बाब जितेंद्रच्या इन्शुरन्सबाबतच्या कारवाईलासुद्धा लागू पडेल.

● मृत्युपत्रानुसार सर्व संपत्ती पत्नी ह्या नात्यानं माधुरीलाच लाभेल, त्यात कोणताही संदेह नाही. त्यासाठी माधुरीला अमेरिकन सिटिझन होण्याचीही गरज नाही; भारतीय नागरिक म्हणूनसुद्धा माधुरी तो हक्क प्राप्त करू शकते. सर्व ठिकाणी नॉमिनी म्हणून माधुरीचंच नाव असल्यामुळे ते सोपं जाईल. मात्र, स्थावर प्रॉपर्टीवर माधुरीला हक्क लाभण्यासाठी अमेरिकेतील कायद्याचा मला (रहाळकरला) अभ्यास करावा लागेल व स्थावराचं रूपांतर जंगममध्ये करायला काही वर्षांचा कालावधी लागू शकेल.

● समजा, काही कारणानं कोर्टानं मृत्युपत्र मान्य केलं नाही तर सर्व संपत्ती जितेंद्रच्या वारसांना लाभेल व तसा कोणी वारस नसेल तर त्या संपत्तीवर शासनाची मालकी होईल.

● अमेरिकन सिटिझन होण्यासाठी माधुरीला काही दिवस अमेरिकेत राहावं लागेल. मात्र, अमेरिकन सिटिझन व्हायचं का भारतीय नागरिकत्व ठेवायचं हा निर्णय माधुरीला

घेता येईल व तिनंच तो घ्यायला पाहिजे.

**तन्मय सूर्यवंशी**

● तन्मय कायम तन्मय सूर्यवंशीच राहील.

● लग्नापूर्वी जितेंद्रनं दत्तक विधान केलेलं नाही. त्यामुळे तन्मय 'क्षीरसागर' झालेला नाही. तन्मयला स्वत:चं अस्तित्व आहे व वयाची अठरा वर्षं पूर्ण झाल्यावरही तो तन्मय सूर्यवंशीच राहील. सूर्यवंशी हेच आडनाव तन्मय कायम लावू शकेल. माधुरी ही जरी कायद्यानं तन्मयची आई असली तरी जितेंद्रशी तिनं लग्न केल्यामुळे जितेंद्र हा कायद्यानुसार तन्मयचा बाप मानला जाणार नाही.

● मधुकर सूर्यवंशी जर कोर्टात सिद्ध करू शकले, की तन्मयचं भलं माधुरीपेक्षा जास्त चांगल्या तऱ्हेनं ते दांपत्य करू शकेल तर तन्मयची कस्टडी माधुरीकडून मधुकर सूर्यवंशींकडे जाऊ शकते.

● तन्मयला माधुरी कोणतीही आर्थिक मदत करू शकते. तद्वत, सदाकाका क्षीरसागरांच्या मुलांनाही माधुरी प्रॉपर्टीमधील काही भाग भेट म्हणून देऊ शकते, तो माधुरीचा वैयक्तिक प्रश्न आहे. मात्र, जितेंद्रची संपत्ती त्याच्या निधनानंतर मृत्युपत्रानुसार फक्त माधुरीकडेच येऊ शकते.''

पुढच्या आठवड्यात मी पुण्याला येईन तेव्हा तुला उपलब्ध असलेल्या पर्यायांबद्दल रहाळकरनं जे सांगितलं त्याबद्दल बोलू.

★ ★ ★

काही सेकंद बेल वाजल्यावर बाबांनीच फोन घेतला. स्टीव्ह मॅकन्टायरचा फोन आला होता. स्टीव्हनं माधुरीशी बोलण्याची विनंती केली. माधुरीनं बेडरूममधूनच नाही सांगितलं. कालसुद्धा तसंच झालं होतं. स्टीव्हला माधुरीशीच बोलायचं होतं. दहा मिनिटांनी परत फोन करतो, असं सांगून स्टीव्हनं फोन डिसकनेक्ट केला.

दहा मिनिटांनंतर फोनची घंटी वाजल्यावर बाबांनी माधुरीच्या बेडरूमच्या दरवाजावर टकटक केलं. अपेक्षेप्रमाणे फोन स्टीव्हचाच होता. बाबांनी रिमोट रिसिव्हर बेडरूममधील माधुरीकडे दिला व बाबा बाहेर आले.

''कोण, माधुरी बोलते आहे का?'' स्टीव्हनं विचारलं. होकारार्थी उत्तर आल्यावर स्टीव्ह म्हणाला, ''मी स्टीव्ह मॅकन्टायर, जितच्या ऑफिसमधून बोलतोय. मला तुझ्याशीच बोलायचं आहे, कारण ड्युटीवर असतानाच जितला अपघात झाला होता व नोकरीतील मिळणारी सर्व प्रकारची रक्कम देण्याकरता जितनं तुला नॉमिनेट केलेलं आहे. ऑफिसच्या वकिलानं कायद्यानुसार अपघाताची भरपाई लाभण्यासाठी कारवाई सुरू केलेली आहे व तू पुढील दोन आठवड्यांत न्यू यॉर्कला ऑफिसमध्ये येणार नसशील तर काही कागद तुझ्या सहीसाठी ऑफिसला पाठवायचे आहेत; ते मी तुझ्या पुण्याच्या पत्त्यावर पाठवू शकतो का?''

माधुरीनं फोनवर 'हो' म्हटलं.

स्टीव्ह पुढे म्हणाला, ''आता खाजगी बोलतो. जित माझा असिस्टंट असला तरी चांगला दोस्त होता, म्हणून हे धाडस करतो. तुला भविष्याचा विचार करावा लागेल; दु:ख आवर. तुझं उभं आयुष्य जायचं आहे. स्वत:च्या करिअरकडे बघताना तुला तन्मयकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

''कुरिअरनं ऑफिसचे कागद पाठवतो आहे. कागद मिळाल्यावर फोन कर व तपासून सह्या करून कागद ऑफिसच्या पत्त्यावर कुरिअर केले, की सुद्धा फोन कर.''

फोन ठेवल्यावर माधुरी बेडरूममधून बाहेर आली व बाबांना विचारलं, ''आई कुठे आहे?''

प्रथमच माधुरी तिच्या बेडरूममधून बाहेर आली होती व वर्तमानाची चौकशी करत होती.

''तन्मयला घेऊन जवळच्याच बागेत फिरायला गेली आहे. एव्हाना येतच असेल.'' बाबा म्हणाले.

''बाबा, सोमूदादा परत पुण्याला कधी येणार आहे?'' माधुरीनं विचारलं.

बाबांना ती गोष्ट माहीत असूनही माधुरीनंच पुढाकार घ्यावा ह्या उद्देशानं बाबा म्हणाले, ''सोमूला फोन करून विचार ना.''

माधुरी सोमूदादाला फोन करायला गेली.

★ ★ ★

सोमूदादा व माधुरी स्टडीमध्ये बोलत होते. तत्पूर्वी, आईवडिलांबरोबर चर्चा करून त्यांच्या मनस्थितीचा व निर्णयांचा अंदाज सोमूनं घेतला होता. पुढील निर्णय माधुरीनं स्वत:चा स्वत: घ्यावा ह्याच मताचे ते तिघंही होते.

वडीलधाऱ्यांच्या दडपणाखाली माधुरीनं पर्याय निवडू नयेत ह्या कारणास्तव आईवडिलांनी माधुरीबरोबरच्या चर्चेची जबाबदारी समवयस्क म्हणून सोमूवर सोपवली होती.

सोमूदादानंच बोलायला सुरुवात केली.

‘‘माधुरी, ह्या चर्चेचा तू प्रामाणिकपणे स्वत:च्या दृष्टिकोनातून विचार करावास.

‘‘कोणत्याही प्रौढ व्यक्तीनं स्वत:च्या पायावर उभं राहावं व त्या व्यक्तीनं स्वत:च्या आयुष्याचा विचार करावा, ह्या मताचा मी आहे व ते तुला माहिती आहे; मग ती प्रौढ व्यक्ती स्त्री असो वा पुरुष.

‘‘आजमितीला तू भारतीय नागरिक असलीस तरी तुला व तन्मयला अमेरिकन सिटिझनशिप काही महिन्यांत मिळू शकते. त्याकरता सर्व कायदेशीर कारवाई झालेली आहे.’’

विचार करून सोमनाथ पुढे म्हणाला, ‘‘बाबा आता पंचाहत्तरीचे झाले आहेत व मला माझा संसार आहे, ह्या गोष्टी कोणालाच नाकारता येणार नाहीत.

‘‘तू तरुण आहेस, तुला अजून पस्तिशी यायची आहे आणि आजवरचं तुझं करिअर असामान्य आहे.

‘‘आईवडिलांची काळजी तू करू नकोस. ती जबाबदारी पेलायला मी समर्थ आहे. स्वत:च्या व तन्मयच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून मात्र तू विचार करावास. आजच्या परिस्थितीवर मात करूनच तू ते करू शकशील.

‘‘करायचं असेल तर तुझं करिअर करायला तू मोकळी आहेस; इथेही व अमेरिकेतसुद्धा. काही वर्षं तन्मयची काळजी घेण्यासाठी इथे आई, बाबा व अक्षयच्या आईवडिलांची मदत तू घेऊ शकतेस तर अमेरिकेत उत्तम डे केअरची सोय सर्व ठिकाणी उपलब्ध आहे.

‘‘अक्षयच्या आईवडिलांच्या संदर्भातून एका महत्त्वाच्या गोष्टीचा उलगडा मात्र झाला पाहिजे. तन्मयच्या उज्वल भविष्यासाठी त्यांनी झटलं पाहिजे हा एक सर्वसामान्य विचार झाला. पण तन्मय हा मधुकर सूर्यवंशींचा एकमेव वंशज आहे. त्या भावनेनं तन्मयची कस्टडी मागण्यासाठी ते कोर्टाचा आधार घेणार नाहीत, ही गोष्ट त्यांच्याबरोबर चर्चा करून एकदा स्पष्ट झाली पाहिजे. ओढवलेल्या परिस्थितीत त्यांना तन्मयची काळजी वाटणं साहजिक आहे व बाबांशी मधुकर सूर्यवंशी त्यासंबंधात बोललेदेखील आहेत.



‘‘एका गोष्टीची तुझ्यासकट सर्वांनाच खात्री होणं गरजेचं आहे व ती म्हणजे नोकरीची तुला गरज नाही; जितच्या मृत्युपत्राची अंमलबजावणी झाल्यावर तर निश्चितच नाही. तन्मयच्या शिक्षणासाठी लॉजिंग-बोर्डिंगसकट भारतात होणारा व अमेरिकेत लागणारा सर्व खर्च तू स्वत: वैयक्तिकरीत्या पेलू शकशील, कारण तुझी ऐपत आम्हा प्रत्येकापेक्षा जास्त आहे एवढं निश्चित.

‘‘पुढे काय व कसं करायचं हा निर्णय मात्र तुझा आहे व तो तुलाच घ्यायला पाहिजे. त्यासंबंधात मिलिंद रहाळकरनं माझ्यासमोर ठेवलेले तुझ्यासाठीचे पर्याय मी वाचून दाखवतो.’’

**पर्याय एक**

काही महिन्यांत माधुरीनं व तन्मयनं व्हिसाचा उपयोग करून न्यू यॉर्कला जावं, जितच्या घरात राहावं आणि तन्मयचं

शिक्षण सुरू करावं. उपलब्ध होईल तेव्हा अमेरिकन सिटिझनशिप दोघांनीही घ्यावी.

**पर्याय दोन**

अक्षयचे आईवडील, मधुकर व शारदाबाई सूर्यवंशी कुळाचा एकुलता वंशज म्हणून तन्मयचा सांभाळ करतील व त्याला शिकवतील, गरजेचा पैसा माधुरी पुरवेल.

माधुरी अमेरिकन सिटिझनशिप घेते का भारतीय नागरिकत्वाला जवळ करते हा पर्याय तिच्यावर सोपवावा.

तन्मय मात्र सुरुवातीला भारतीय नागरिक म्हणूनच वाढेल व नंतर तन्मयचं अमेरिकेला जाणं वा त्याला तेथील सिटिझनशिप लाभणं हे त्या त्या वेळच्या अमेरिकन नियमांवर व इतर परिस्थितीवर अवलंबून राहील.

**पर्याय तीन**

माधुरी व तन्मय भारतात पुण्यालाच भारतीय नागरिक म्हणून माधुरीच्या आईवडिलांकडेच राहतील.

कागद वाचून सोमनाथनं तो टेबलावर ठेवला व माधुरीला विचार करण्याकरता एकटीला सोडून तो स्टडीबाहेर आला.

**– सु. गो. तपस्वी**
ए-३/१९, मीनल गार्डन्स,
पटवर्धन बाग, एरंडवणा, पुणे ४११००४
स्थिरभाष : ०२०-२५४१०१४५
चलभाष : ९७६६१५२२५३
suhas@fandsindia.com

**आभार**

ह्या कथेतील सर्व पात्रे काल्पनिक आहेत. कथेतील हकिगतीची सत्यता पडताळण्यासाठी केलेल्या साहाय्याकरता गुरू भरणे, संगमेश्वरन, गुरुदत्त बेलारे व मिलिंद हरताळकर ह्या मित्रांचा लेखक आभारी आहे.

**स्पर्धेच्या अटी**

१. स्पर्धा सर्व वाचकांना खुली आहे. लेखकाने कथेचा शेवट साधताना सादर केलेल्या तीन पर्यायांपैकी स्पर्धकाने त्याला योग्य वाटणारा पर्याय निवडून लिखाण सादर करावयाचे आहे. नायिका भविष्यात कोणता पर्याय निवडते व तो का निवडते याची कारणे स्पर्धकाच्या लिखाणात स्पष्ट झाली पाहिजेत. सादरीकरणाचा आविष्कार व प्रकाराबद्दल आणि किमान शब्दमर्यादेबाबत कोणतीही अट नाही. मात्र, स्पर्धकाच्या लिखाणाची कमाल मर्यादा १००० शब्द अशी आहे.

२. शब्द रुचीच्या प्रकाशन पत्त्यावर बुधवार, ३ डिसेंबर २०१४ पर्यंत प्रतिसादाच्या दोन प्रती स्पर्धकाकडून पोचल्या पाहिजेत. स्पर्धकाने नाव, फोटो व पत्ता प्रतिसादाबरोबर पाठवावा. उपरोक्त तारखेनंतर वा कमाल शब्दमर्यादेपलिकडील लिखाणाचे गुणांकन प्रकाशकावर अवलंबून असेल.

३. प्रतिसादाचे लिखाण कागदांच्या एका बाजूवर (पाठपोट नको) व व्यवस्थित मार्जिन सोडून केलेले असावे. टंकलिखित दोन प्रती पाठवता आल्या नाहीत तर लिखाण करण्यासाठी काळ्या शाईचे बॉलपॉईंट पेन वापरावे, जेणेकरून परीक्षकांकडून गुणांकन करून घेण्यासाठी लिखाणाच्या प्रती काढणे प्रकाशकाला सोपे जाईल. कोणत्याही कारणामुळे लिखाण परीक्षकांना सुलभरीत्या वाचता आले नाही तर झालेल्या गुणांकनाची जबाबदारी प्रकाशकाची नसून स्पर्धकाची असेल.

४. लाभलेल्या सर्व स्पर्धकांच्या प्रतिसादात्मक लिखाणाचे सर्व अधिकार (कॉपीराईट्स) कथेच्या लेखकाकडे राहतील. लेखकाने पर्याय निवडून पुढील लिखाण केलेले आहे. स्पर्धकाने निवडलेला पर्याय लेखकाच्या निवडीशी जुळो अथवा न जुळो, परंतु स्पर्धकाच्या व लेखकाच्या लिखाणात असलेले कोणतेही साम्य वादातीत असेल आणि कोणत्याही प्रकारच्या कॉपीराईट्स संबंधातील समस्या विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. ग्रंथालीचे गुणांकन अंतिम मानले जाईल ह्या गोष्टीची व अट क्रमांक चारमध्ये चर्चिलेल्या बाबींची स्पर्धकांनी विशेष दखल घ्यावी.

६. विजयी स्पर्धकांना निकाल पोस्टाने कळवले जातील व मार्च २०१५च्या शब्द रुचीच्या अंकात निकाल जाहीर करण्यात येतील. विजयी लिखाणाच्या प्रसिद्धीबद्दल प्रकाशकाचा निर्णय स्पर्धकांवर बंधनकारक राहील.


IRDA Regn. No. 512
सादर आहे
एलआयसीचा
जीवन रक्षक
Plan no. 827
UIN: 512N289V01
तुमच्या आनंदाचा रक्षक.
• जोखीम संरक्षण: खालीलपैकी जे अधिक असेल ते आणि लॉयल्टी ॲडिशन (जर असेल तर)
a. मूळ विमा रक्कम; किंवा
b. वार्षिक हप्त्याच्या 10 पट; किंवा
c. मृत्यूच्या तारखेपर्यंत भरलेल्या सर्व हप्त्यांचे 105%
• मुदतपूर्ती लाभ: मूळ विमा रक्कम अधिक लॉयल्टी ॲडिशन (जर असेल तर)
• पात्रता वय: 8 ते 55 वर्षे
• पॉलिसी कालावधी: किमान 10 वर्षे; कमाल 20 वर्षे
• किमान आणि कमाल विमा रक्कम: ₹ 75,000 - ₹ 2,00,000
www.licindia.in
SMS 'CITY' (Mumbai)
Follow us: LIC India Forever
Beware of Spurious Phone Calls/emails and fictitious/fraudulent offers.
IRDA clarifies to public that - IRDA or its officials do not involve in activities like sale of any kind of insurance or financial products nor invest premiums. IRDA does not announce Bonus. Public receiving such phone calls are requested to lodge a police complaint along with the details of the phone call number.
जीवनाच्या सोबतही, जीवनाच्या नंतरही.
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

ऋतुरंग प्रकाशनाची एक अनोखी भेट!



# मिर्झा ग़ालिब : गुलज़ार

अनुवाद : अंबरीश मिश्र

मूल्य : रु. २००/-

ऋतुरंग प्रकाशन

अरुण शेवते

बी-१०२, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स

गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३

भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४

## ऋतुरंग प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके

**देवडी : गुलज़ार : अनुवाद – अंबरीश मिश्र**

मूल्य : रु. २००/-

**अर्धविराम : यशवंतराव गडाख**

मूल्य : रु. २८०/-

**सहवास : यशवंतराव गडाख**

मूल्य : रु. १६०/-

**अंतर्वेध : यशवंतराव गडाख**

मूल्य : रु. १८०/-

**नापास मुलांची गोष्ट : अरुण शेवते**

मूल्य : रु. २२५/-

**हाती ज्यांच्या शून्य होते : अरुण शेवते**

मूल्य : रु. २२५/-

**नापास मुलांचे प्रगतीपुस्तक : अरुण शेवते**

मूल्य : रु. २२५/-

**ऐवज (निवडक ऋतुरंग, १९९३ ते २००९)**

मूल्य : रु. १०००/-

**एकच मुलगी : अरुण शेवते**

मूल्य : रु. २००/-

**सकाळी आठ वाजता : अरुण शेवते**

मूल्य : रु. २००/-

सर्व विक्रेत्यांकडे पुस्तके उपलब्ध.

ऋतुरंग
प्रकाशन

अरुण शेवते
बी-१०२, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४

## ऋतुरंग प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके

**देवडी : गुलज़ार : अनुवाद – अंबरीश मिश्र**
मूल्य : रु. २००/-

**अर्धविराम : यशवंतराव गडाख**
मूल्य : रु. २८०/-

**सहवास : यशवंतराव गडाख**
मूल्य : रु. १६०/-

**अंतर्वेध : यशवंतराव गडाख**
मूल्य : रु. १८०/-

**नापास मुलांची गोष्ट : अरुण शेवते**
मूल्य : रु. २२५/-

**हाती ज्यांच्या शून्य होते : अरुण शेवते**
मूल्य : रु. २२५/-

**नापास मुलांचे प्रगतीपुस्तक : अरुण शेवते**
मूल्य : रु. २२५/-

**ऐवज (निवडक ऋतुरंग, १९९३ ते २००९)**
मूल्य : रु. १०००/-

**एकच मुलगी : अरुण शेवते**
मूल्य : रु. २००/-

**सकाळी आठ वाजता : अरुण शेवते**
मूल्य : रु. २००/-

सर्व विक्रेत्यांकडे पुस्तके उपलब्ध.

ऋतुरंग
प्रकाशन

अरुण शेवते
बी-१०२, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४

# ॥ग्रंथाली॥

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com वेळ : सकाळी ११ ते ६




**चॅनल 4 Live**
समीरण वाळवेकर
टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, धावणारं जग या माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी बेधडक कादंबरी...
**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**





**हुमान**
संगीता उत्तम धायगुडे
नियतीनं घातलेली हुमानं सोडवत स्वत:ला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन
**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**




**ढोर**
भगवान इंगळे
ढोर समाजातला एक गट शिकला आणि स्थिर झाला. अशाच एका तरुणाची ही प्रातिनिधिक कहाणी...
**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




**सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर
ही कादंबरी आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम जागवणारी, जीवनसंघर्षात सफल होण्यासाठी लिहिलेली आधुनिक 'भगवत्‌गीता' आहे.
**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




**तसा मी... असा मी...**
डॉ. बाळ खरे
शंकराचार्यांचा नातू असलेल्या बाळासाहेबांच्या पोतडीत असलेले वेगवेगळे आणि अविश्वसनीय अनुभव प्रांजळपणे मांडलेले आत्मकथन...
**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**




**भिडू**
भगवान इंगळे
आयुष्याचा विविध टप्प्यांवर भेटलेले मित्र आणि त्यांच्या जीवनातील भयाण वास्तव. अशा भिडूंची ही जीवनकहाणी...
**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# टिकाराम बापू

**श्रीकांत देशमुख**

**बरडावून** डांबरी सडकेला येऊन मिळालेली पांदी. गिचमिड चिखलात अडकून सडकेजवळ एकाएकी मोकळी झाल्यासारखी. उघडावाघडा टिकाराम बापू मरतुकडी म्हातारी गाय आन आणखी काही तशीच जनावरं हाकलत पांदीत शिरलेला. हातातली काठीही त्याच्यासारखीच काटकुळ्या अंगाची डेबरीडाबरी. जोरात मारली तर कटकन मोडून जाईल अशी. त्याच्या हातात नेहमी अशीच काठी असते. फक्त जनावराला धाक वाटावा म्हणून उगारण्यासाठी. गुराढोरांना बापू सहसा मारहाण करत नाही. त्याचा आवाज कसाबसा जनावराच्या कानापर्यंत जात असावा. तेवढ्यावरच ती बापूचं ऐकतात.

बापूच्या डोळ्यांचा गारा झालेल्या. कायम उघड्या अंगावरून भुसा गळत असल्यासारखे कातडीनं खवले खवले धरलेले. डोक्यापेक्षाही मोठ्या आकाराचा मळका पांढरा पटका कायम सोबती असल्यासारखा डोक्यावर बसलेला. थंडी-ऊन-वाऱ्यात त्यालाच अंगावर पांघरता येतं. डोक्याखाली उशी म्हणूनही वापरता येतं. बापूला तशी फारशी गरज पडत नाही. त्याच्या देहाला ऊन-थंडी, पाऊसवारा साऱ्याची चांगली ओळख झालेली आहे. इज्जत राखावी म्हणून तो कंबरेला पंचासारखं धोतर गुंडाळतो आणि डोक्याला पटका बांधतो. वर्षानुवर्षं वापरून या दोन कापडांचे रंगही मातीसारखेच चिरंजीव झालेले.

''हात्तिच्या मायी, उगा कडमडत्यात जनावरं. पांधाडानं मुक्काट्यानं चालावं का नाही? इकून काही, तिकून काही. मधात चिखल. चाला मुक्यानं बल्डावर.'' असं काहीबाही गुराढोरांशी बोलत तो दोनक फर्लांगची पांदी वलांडून बरडावर स्थिरावलेला. जनावरं मुकाट्यानं खाली मुंढी घालून चरत असलेली. हातात वाकडी काठी घेऊन बापू एखाद्या खडकावर बूड न टेकवता बसलेला. असा बरडावर कधी इकडं कधी तिकडं थोडीफार चाळवाचाळव करत तो ढोरांना घेऊन फिरणार असतो. त्याच्या आधी किंवा नंतर आलेली जनावरं ढोरक्यांनी माळाकडं नाहीतर आईच्या शिवाराकडं वळवलेली असतात. बापूची जनावरं बरडाला लागून असलेल्या वढ्याच्या काठाकाठानं, वढ्याकाठच्या वावराच्या धुऱ्याबंधुऱ्याच्या कडानं तोंड घासत रमून जातात. लांबून लांबून ढोरांना बोलत, कधी आडवा होत बापू माळाकडली ढोरं येईर्यंत बरडावर फिरत असतो. माळाहून आलेल्या ढोरक्यांना उगाच रामराम करत, डोळ्यांनी हसत मग तो गावाकडं वळतो.

रानं सोंगणीला आलेली. उघडा बापू दिवस दिवस रानात काहीतरी सावरासावर करतोय. कधी निंदणाऱ्या बायकांसोबत खुरपं हाती घेऊन त्यानं पाथ धरलेली असते. कधी कणसं खुडून ठेवलेल्या कडब्याच्या पेंड्या बांधत असतो. कधी बांधलेल्या कडब्याची सुडी लावतो. खरिपाचा हंगाम संपला असला तर दिवसदिवस राबून करडी, हरबऱ्यासाठी रान नीट करत असतो.

गावरान ज्वारी गेली आणि हायब्रीडचा जमाना आला. चांगली दीड दीड पुरूस वाढणारी वानी शिवारभर दिसायची. बाई माणसालाच काय चांगल्या दगड काळीज बाप्यालाही ज्वारीच्या रानात घुसायला भीती वाटायची. ज्वारीत भेंडी, चवळीचे पाटे घातले जायचे. एकटी बाई पाट्याला कधी जात नसे. घरादारात माणसांची संख्या वाढली. खाणाऱ्यांची

तोंडं वाढली. गावरान ज्वारीनं वाढत्या तोंडाचा भरणा होईना. जालना हे आमच्या परिसरातलं संकरित संशोधित पिकाच्या वाणाचं प्रमुख केंद्र. सुरुवातीला संकरित वाणाच्या प्रसारासाठी या कंपन्यांनी खूप आटापिटा केला. वाढत्या लोकसंख्येला पोटभर अन्न मिळण्याची पंचाईत एकोणीसशे बहात्तरच्या दुष्काळानं केली. सीड कंपन्या ज्वारी, कापूस, बाजरी यांच्या संकरित बियाण्यांच्या प्रसारासाठी गाड्या घेऊन गावोगाव फिरत. सुरुवातीला संकरित वाण लावणं म्हणजे विषाचं पीक घेणं, असा अनेकांचा समज होता. लोक सांगतात आमच्या गावात ही कोंडी पहिल्यांदा टिकाराम बापूनं फोडली. हायब्रीड ज्वारीचा पहिला प्रयोग बापूनं गंमत म्हणून गावाजवळच्या आपल्या रानात केला. आभाळाकडे डोकं करून सरळ उभी असणारी ज्वारीची कणसं पाहायची लोकांना सवय नव्हती. बापूच्या शेतात कणसाचे सरळ धांडे असलेली ज्वारी पाहायला गाव लोटला.



गावाला लागून गेलेली सडक. सडक ओलांडून थोडं आत पांदीला लागून बापूचं पंधरा–वीस एकराचं रान, एक बोळकी विहीर सांभाळून असलेलं. ही बोळकी बापूनं खोदली, बांधली नव्हती. बापजाद्यांचा हा पसारा बापूनं निगुतीनं सांभाळला. तो कमी केला नाही की त्यात भर घातली नाही. आहे त्या शेताचे धुरेबंधुरे नीट ठेवले. धुऱ्याला वावरात पाय ठेवू दिला नाही. त्यासाठी त्यानं कायम गाव सोडून रान जवळ केलं.

त्याच्या शेताच्या काठानं लांबच्या शिवाराला, परगावाला गेलेली लांबलचक पांदण. पांदीतून जाणाऱ्यायेणाऱ्या ढोरावासराचा, माणसाचा, ढोरक्यांचा कायम उपद्रव शेतीला होई. तो काळ्या मातीतली म्हणजे



पेरणीधारणीची कामं संपली की हातात कुऱ्हाड आणि एक बेळी घेऊन पांदीची डागडुजी करत असे. पांदीच्या काठानं सागरगोट्यांची, चिलारीची दाट जिवंत जाळी त्यानं वाढवली. बोरीबाभळी बुडातून न तोडता त्याचा विस्तार तेवढा छाटून त्या काट्याचा उपयोग त्यानं वाटा बुजवण्यासाठी केला. भुईउंबराची झाडंझुडपंही त्यानं तोडली नाही. आराट्या–बोराट्याची झुडपं आडोसा म्हणून उभी केली. गावाशिवारात असणारी साऱ्या प्रकारची झाडंझुडपं बापूच्या पांदीला दिसत. येरमुलं, उंबर, पिंपरण, बिब्बा यांची फळं खायला पाखरंलेकरं

सारी जमा होत. त्याच्या शेतात उंच वाढलेली चिंच आहे. आजही ही चिंच आपला वेडावाकडा विस्तार सावरत, खांडकं झालेल्या खोड, फांद्या घेऊन उभी आहे. ही चिंच म्हणजे बापूचं पांदण दुरूस्तीच केंद्र. पांदण नीट करत करत तो थांबून चिंचेखाली येऊन बसायचा. चिंचेखाली पाण्याची बिनगी आणि पानाचा द्रोण ठेवलेला असे. खांद्याला समांतर कुऱ्हाड मानेजवळ ठेवून त्यावर दोन्ही हात पांगवून तो थोडावेळ निवांतपणानं उभा राही. चिंचेवरल्या पाखरांचा गलबला ऐकून तो मधून मधून एकटाच मनाशी हसताना दिसे. कधी काहीतरी मनाशीच पुटपुटताना दिसे. एखादं पाखरू चालताना समोर आलं तर तो पाखरू उडून जाण्याची वाट पाहत थोडा थांबे. पाखरू उडून गेल्यावर त्याच्या घाऱ्या डोळ्यांत हसू उमटे. तो असा मनाशीच हसला की नंतर लगेच मनाशीच काही बोलत असे. हे बोलणं सहसा दुसऱ्या कोणाला ऐकू यायचं नाही. चिंच, गोंदण, लिंब, सादुडा, करंजाची खूप झाडं त्यानं निगुतीनं सांभाळली, वाढवली. त्याच्या भवताली आडोसा म्हणून आराटी, बोराटी उभी केली. पावसाळ्याहिवाळ्यात पानाफुलांनी पांदण बहरून यायची.

शेतातली कामं संपली की बापू बऱ्याचदा चिंचेवर साऱ्या वावराची राखण करायला जाऊन बसत असे. चिंचेवरच त्यानं लाकूडफाटा तोडून एक मचाण बांधलेलं. वावरात घुसणारी ढोरं-पोरं, बाया-माणसं मचाणावरून दिसत. एवढं असलं तरी बापूच्या शेतात घुसणाऱ्याला बापूनं कधी मारलं, वेडवाकडं बोललं असं कधी झालं नाही. तरी बापू चिंचेवर बसलेला असतो या समजुतीतून कोणी बापूच्या रानाला ताप द्यायचा नाही. याच चिंचेबद्दल भुताची एक गोष्ट तयार झाली होती. या चिंचेवर एक भूत बारा महिने चोवीस तास जागं असलेलं. चिंचेखाली पांदीतून वाईट विचाराचा माणूस, बाई, कोणी गेलं की हे भूत त्याला आल्हाद वर उचलून घेतं. या भुतांशी बापूचा जोरदार दोस्ताना. बापू आणि हे भूत चिंचेच्या मचाणावर गप्पा मारत बसतात. त्या गप्पा दोघांशिवाय दुसऱ्या कोणाला ऐकू येत नाहीत. भूत कोणाला कधी दिसायचं नाही, पण बापू चिंचेवर बसलेला दिसला की तोच भूत आहे असं वाटून जायचं. बापूच्या शेताला चोरांचा फारसा उपद्रव नसायचा. त्याला हेही कारण असावं. त्याहीपेक्षा बापू गावात कधी कोणाच्या अध्यातमध्यात पडला नाही. कोणाचंही त्यानं आयुष्यात वाईट काय पण मनातही चिंतीलं नाही. त्यामुळं बापू हा पुण्यवान आहे, असं साऱ्यांनाच वाटायचं. त्याच्याबद्दल वाईटवकटं बोलणारा गावात एकही माणूस नव्हता. त्याच्या या शेतीतल्या संतपणामुळही सहसा कोणी त्याला त्रास द्यायच्या फंदात पडायचा नाही.

वादळवारा, पाऊसपाणी, उन्हातान्हात तो आपल्या पांदीच्या खोडव्यात फिरताना दिसायचा. पाखरं झोपली तरी बापू आपल्या जागलीवर जागा असायचा. खूप रात्री उशिरापर्यंत शेणाच्या गवऱ्या, बोरीबाभळीची खोडं याची शेकोटी जागी असलेली दिसायची. रात्रीबेरात्री भुताखेतासारखा बापू जागा असतो, असा समज त्याच्याबद्दल गावभर झालेला. त्याच्या शेताला लागून एका बाजूला लांबलचक पांदी आणि दुसऱ्या बाजूला लांबलचक ओढा. या दोन्ही बाजू त्यानं झाडं वाढवून साजिवंत केलेल्या. रात्री बेरात्री पांदी ओढ्यानाल्यातून उघडंनागडं फिरताना बापूला कधी भेव वाटलं नसावं. चोराचिलटाची त्याला कधी भीती वाटली नसावी. तो रानात काठी नाहीतर कुऱ्हाड खांद्यावर टाकून उभा असला की भूत उभं ह्ये, असंच म्हणायचे. टिकाराम बापू मेला तरी पांदीचं खोडवं पिढ्यान्‌पिढ्या राखत राहील, असंही लोक म्हणायचे.

हायब्रीडच्या खळ्यात बापू उभा. त्याचे कान कधीचेच हरवून गेलेले. माणसांची वस्ती नसलेल्या एखाद्या जुन्या घरातलं उखळ उंदरांनी काढलेल्या उकीरानं बुजून जावं तसे त्याचे कान बुजून गेले आहेत. झाडावरच्या पाखराचे, तोंडाचं बोळकं झालेल्या बायकोचे, तो आतड्याच्या ओढीनं सांभाळत असलेल्या बैलाचे, गाईचे, त्याला मारलेल्या हाकाचे, कोणाचेच आवाज त्याच्या कानावर आदळत नाहीत. लोक त्याला 'बह्यरा बापू' म्हणतात. गाय, बैल हंबरताना तोंड वासतात त्यावेळी तो त्यांच्या चारापाण्याची मागणी लगेच ओळखतो. ढोरं हंबरली नाही तरी त्यांच्या डोळ्यावरून तो त्यांची ओढ ओळखून घेतो. पाणी पाजतो, चारा टाकतो, पाखराच्या चोचीवरून तो आपल्याला किलबिल ऐकायला येते, असा घाऱ्या डोळ्यांत हसतो. कान बुजलेले आहेत म्हणून त्याचं काही अडलेलं आहे असं वाटत नाही. कुठल्याही आवाजाशिवाय त्याचं काम बिनबोभाट चाललेलं असतं. उघडावाघडा, हाडाला कातडी घट्ट चिकटलेला त्याचा चिपाड झालेला देह.

छातीपाठीच्या फासळ्या, हाडं उजळणी पाठ केल्यासारख्या मोजून घ्याव्यात. पाठपोट जीव शिवाला भेटल्यासारखं एक झालेलं. खळ्यावरचं सारं भुसकट डोक्यावरच्या पटक्यामधून, पांढऱ्या भिवया, दाढी, मिशा

साऱ्या देहावर चिकटलेलं. बापू थोडावेळ निचितमनानं उभा असलेला. कितीक वर्षापासून निर्विकार चेहऱ्यानं सारं काही पाहत काबाडकष्ट उपसत वाळून कोळ झालेला. आभाळ मातीशी एक झाल्यासारखा. जन्मापासूनच त्यानं मातीचा, वाऱ्याधुळीचा रंग अंगावर माखून घेतला.

असाच उन्हउताराला मी वावराकडं निघालो. दरवेळी बापूला भेटावं असं वाटायचं. त्याच्या मळ्याच्या काठावरून बरडाकडं एक पाऊलवाट जाते. मध्ये एक मोठी हिरवी छत्री डोक्यावर धरल्यासारखा गोटी आंबा. पुढं बरडाकडल्या ओढ्याकडं जाताना सरळसोट आभाळाकडं गेलेल्या तीन रामकाठी बाभळी. त्याबाजूला एक डुबरी, खरजेल्या अंगाची काटाळ बाभूळ. हायब्रीडच्या खळ्यात उभा असलेला बापू मला दिसला. बापूचं वावर ओलांडल्याशिवाय गुरावासरांना, बायामाणसांना शेताशिवारात जाता येत नाही. त्याच्या खळ्याकडं जातांना वाट वाकडी करावी लागते. त्यानं लांबूनच मला ओळखल्याचं कळतं. तो कपाळाला आडवा हात लावून उभा.

मला पाहून त्यानं उगाच पायाखालची भुई सारवल्यासारखी केली. लांबूनच आडखळत नाकातल्या नाकात 'रामराम' केला. तो मला ऐकू आला. त्याचे गढूळ डोहासारखे डोळे चमकले. मी त्याच्याशी खूप जवळीकीनं बोलतो, हे समजून तो दरवेळी हरखून जातो. डोळे उन्हात चमकताना त्याचा आनंद लपत नाही. मी फार काही न विचारता तो आपला आपण शेतीवाडीचं, कुटुंबाचं सांगत जातो. मी किंवा कोणीही बोलून फारसा उपयोगही नसतो. आपल्या ओठांची हालचाल तेवढी त्याला कळते. मग सारं काही कळालं आहे अशा पद्धतीनं तो त्याचं आपलं बोलत जातो. दरवेळच्या भेटीत यात काही फारसा फरक होत नसतो. माझ्याशी बोलताना तो निवांत मनानं कासरा विणल्यासारखा बोलतो. माझे ओठ हलले की तो पुन्हा थोडा थांबतो. पुन्हा त्याला वाटेल ते बोलत जातो. माझ्या बोलण्याशी त्याच्या माहितीचा संबंध असतोच असं नाही. तसा तो असतोही. मी तरी त्याला शेतीवाडीशिवाय काय विचारणार असतो?

यावेळी तो नेहमीप्रमाणच हरखला. मी आल्याचा आनंद क्षणभरच त्याच्या डोळ्यांत दिसला. मग बराच वेळ मनाला गाठ मारल्यासारखं उभा उदास. खूप उदासीनं कधी माझ्याकडं, कधी खाली पाहात राह्यला. दर वेळेला अडखळत्या आवाजात जवळ गेल्यावर मनापासून बोलणारा बापू एवढा शांत कसा? भुई उसवून रानात गेलेली पांदी झोप लागल्यासारखी शांत पडलेली. पाखरांचं येणंजाणं तुरळक झालेलं. कुठंमुठं शेतात काम करणारी लांबूनच दिसणारी बायामाणसं. बापूचा टाकवल्या दगडासारखा खरबड हात हाती घेतला, तसा हात हातातून सोडवून घेत आभाळाकडं पाहात दोन्ही हात वर नेत तो म्हणाला, ''आमचं काय ह्ये? चालली ही कामं धामं.''

मी बापूला काय बोलावं म्हणून खुशाली विचारली. माझ्या ओठाची हालचाल त्याच्या कानापर्यंत गेली. बापूशी बोलताना एकाच वेळी मला दोन पद्धतीनं बोलावं लागे, तोंडानं आणि हातवारे करून. नुसत्या हातवाऱ्यानं त्याला काही गोष्टी कळतीलही पण आपल्याला बोलल्याशिवाय हातवारे करता येत नाहीत. आपल्या बोलण्याचा एकच उपयोग. आपण काहीतरी बोलतो हे त्याला ओठावरून कळतं. मग तो आपण काय विचारलं असावं याचा विचार न करता बोलत जातो, ''हायब्रीडचं खळं चाल्लं, बैल पान्यावर नेले पोराह्यनं.''

कोंडी फुटल्यासारखी होते. त्याच्या उभ्या अंगावरच मळण धरली की काय असं वाटून जातं. डोळे सोडून त्याच्या अंगावर सगळीकडं भूस पडलेलं. बापूच्या कातडीला त्याची सवय झालेली. त्याशिवाय एवढ्या निवांत मनानं तो भुसात न्हाऊन उभा रहाणार नाही. एखाद्या नवख्या माणसाच्या अंगावर हायब्रीडच्या भुसाचं नुस्त वारं गेलं तरी खरूज झाल्यासारखी खाज सुटते. त्याच्या कातडीवरचा भुसाचा थर कातडीचाच एक भाग झाल्यासारखा. तो एक पाय अर्धा मुडपून उभा आहे. नंतर बराच वेळ तो मनाशीच बोलत असल्यासारखा आतल्या आत खचत गेल्यासारखा बोलत राह्यला. बोलताना अधूनमधून त्याला आता दम लागलेला, ''इतक्या दिवस पोटाला, देहीला तान देऊन सारं संबाळलं. आता काम होत नाही. दम लागतो. रातच्याला खोकला झोपू देत नाही. म्हतारीलंबी बरं वाटत नाही. ढोरामाघं दिवसभर पळावं लागतं, आं.''

नाकात आडखळत बोलताना तो थोडा थांबला. त्याचा उघडा ऊर वरखाली होत असलेला. पुन्हा आपल्याशीच बोलल्यासारखा म्हणाला, ''आता काय, आपली थकती पराई झाली. आं, आपल्या पोटालंबी किती लागतं म्हना. पण पोटबी उतरून खाली ठेवता येत नाही. काहीतरी कन्या घुगऱ्या घालावच लागतात.''

असं म्हणून त्यानं कंबरेवर विठ्ठलासारखे दोन्ही हात ठेवले. ही बापूची उभी राहाण्याची आणखी एक आवडती पद्धत. असं कंबरेवर दोन्ही हात ठेवून उभं राहाण्याचं वळणच

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*



## हॉटेल साईकृपा

शुद्ध शाकाहारी फॅमिली गार्डन रेस्टॉरंट

**प्रोपा. शिंदे ब्रदर्स**

9923678910 / 9823443728

कसारा बायपास–मोखावणे, ता. शहापूर,
जि. ठाणे – ४२१ ६०२

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*

## यथार्थ टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स

**प्रो. रमेश भोईर**

कसारा

*With Best Complimenst From*

**Granthali's leading paper supplier**

# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

त्याच्या शरीराला लागल्यासारखं. अजून त्याला काय म्हणायचं याचा अंदाज येत नव्हता. नेहमी असंच व्हायचं. काय म्हणायचं हे तो पटकन कधीच सांगत नसे. तुटक तुटक एकेक वाक्य बोलत तो काहीतरी जोडत जायचा. घाऱ्या डोळ्यानं वरखाली पाहात थांबायचा. आपणही बोलावं याची अपेक्षा त्याची कधी नसायची. नुस्तं थोडावेळ त्याच्याजवळ उभं राह्यलं, त्याला काय म्हणायचं ते ऐकलं की तो शांत झालेला दिसत असे. पण यावेळी तो थोडा जास्तच भांबावलेला दिसत होता. काहीतरी मोठा गुतपडा झाला असावा असं वाटत होतं.

''बसा जराशिक खाली, आं.''

माझा हात धरून त्यानं मला खाली बसवलं. बसताना त्याची हाडं काटकं मोडल्यासारखी वाजली. भुईवरची काडी उचलून उगा माती उचकत तो बोलू लागला, ''पोरं वायलं निघायचर म्हनतेत, लाह्यना आन् मोठा भांडन करायलेत. आं, काय कराव? त्यानला कोन आडवनार? आपल्या मनाचे मालक. आं. चाल्लं ते बरं ह्ये म्हणायचं.''

त्याचा प्रश्न त्यानं मांडला होता आणि मांडता मांडताच सोडवलाही होता. त्यामुळंही त्याच्या डोळ्यांत एक प्रकारची शांती पसरली होती.

बाराही महिने त्याचा मुक्काम सहसा रानातच असे. पाखराबरोबरच दिवस उजाडण्याआधी तो उठायचा. विहिरीला लागूनच धावावर एक खोपी त्यानं बांधलेली. मोटनाडा जाऊन आता नुकतीच डिझेल इंजीन आलेली. त्यामुळं धावंचा वापर कमी झालेला. पावसाळा लागण्याआधी वैशाखातच तो धावावरल्या खोपीची डागडुजी करत असे. पांदीकाठाला जाऊन चिंचेच्या बारीक फांद्या आणून त्यांचे बंद करे. जांभूळ, पळसाच्या डाहाळ्या गोळा करत असे. ताडाची पंजा पसरल्यासारखी मोठाली पानंही तो धावावर आणून टाकायचा. थोडाफार लाकूडफाटा. हे सारं गोळा झालं की दोन-तीन दिवस उन्हात निथळत तो खोपीचं काम मनापासून करत राहायचा. खोपीत पाण्यासाठी एक खापराची बिनगी, जर्मनची एक थाळी त्यावर झाकलेली. चेपलेला एखादा ग्लास वर उपडा ठेवलेला. गुराढोराचा कोठा तेव्हढा पावसाळ्यात गावात असे. रानात जरी तो झोपलेला असला तरी भल्या सकाळीच तो घरी जाऊन ढोराचं शेणमूत करायचा. थोडा भाकर तुकडा खाऊन आंघोळ करून ढोरांना पुढं घालून तो रानात निघायचा. त्याचं नाकातलं अडखळत बोलणं ढोरांना कळायचं. ढोरांना कळण्यासाठी त्यानं हाती कधी निबर काठी घेतली नाही. एखादी वाकडी बारीक काडी, नाहीतर धांड्याचं चिपाड, नाहीतर देवतरूट्याची बारकी फोकी हाती घेऊन तो ढोरामागं लुटूलुटू चाले. एखादं वासरू, थकली गाय मागं पडली तर तो मागं थांबून उगाच तिला मारल्याचं नाटक करत पुढं काढे. आपल्या दावणीवरले म्हातारे गायबैल त्यानं कधी विकले नाही. म्हाताऱ्या ढोरामागं खूप समजूतदारपणानं तो फिरत राहायचा.


तो म्हणायचा, ''ढोरं नयतरणी आसताना शेतात राबतात. काम होईना झालं की खाटकाला विकायचं? म्हाताऱ्या मायबापालाबी इका की खाटकाला. जरा पुन्याची गोष्ट केली पाह्यजे, आं.''

आपल्या दावणीतल्या ढोरांच्या जगण्यात आणि आपल्या जगण्यात त्यानं तसा फारसा फरक ठेवला नव्हता. गुराढोरांसारखाच तो उघडावाघडा राहायचा. गांधींसारखं धोतर. तेही कळकटलेलं. कंबरेला तेवढं गुंडाळलेलं. डोक्यावर तसाच पटका. त्याचा पांढरा रंग जाऊन जुनाट मातकट झालेला. पायात घासून घासून टाचेजवळ फाटलेली वाहाण. कधी वाहाणेला चिंधूक बांधलेलं तर कधी फाटक्या तुटक्या पट्ट्याला तार गुंडाळलेली. भुईला घासत चाललेली वाहाण अशी चिरंजीव असल्यासारखी. ढोरांना चारतांनाही खूपदा तो त्यांना खेटून उभा राहून खूप प्रेमानं काहीतरी पुटपुटत कुरवाळताना दिसे. संध्याकाळी दावणीला ढोरं बांधली की आधी ढोरांना चारा टाकल्याशिवाय तो जेवायला बसायचा नाही.

बापूला तीन पोरी आन् तीन पोरं. सारी मोठी कर्ती झाली. शेतीत राबू लागली. कोणालाही न बोलता त्याचं आपलं ठरावीक काम सालभर चालू राहायचं. कधीतरीच तो एखादं नातवंड काखेत मारून जत्रात फिरल्यासारखा गल्लीत फिरताना दिसे. त्याच्या कंबरेच्या हाडात लेकरू झाडाच्या एखाद्या बेळफाट्यावर बसावं तसं बसलेलं असे. गढूळ पाण्यासारखा घारवट डोळ्यांनी तो खूप कौतुकानं गल्लीत उभा राही. आपल्या लेकरांना त्यानं आपल्या डोळ्यांची देणगी दिली, तशी नातवंडही बापूच्याच वाणावर गेली. सकाळच्या कोवळ्या उन्हात त्याचे पाण्यानं डबडबलेले डोळे लकाकताना दिसत. महिनापंधरा दिवसाला सवडीनं तो वारकाकडं जाऊन दाढी करायचा. त्यामुळे त्याच्या दाढीची खुंटं पिकाला पाणी दिल्यासारखी कायम वाढलेली दिसत. कमरेचं धोतर जन्मापासूनच अंगाला चिकटल्यासारखं.

रात्रंदिवस राबणाऱ्या कष्टकरी माणसाचा थेट उन्हापावसात, वावराच्या बांधावर नाहीतर बरड माळावर एखादा कोरीव पुतळा ठेवावा, त्यावर साचलेली धूळ,

गरगरणारा पालापाचोळा, डोक्यावर उडणारी चिवळ पाखरं, हवेत सूर मारून पुन्हा पाताळाचा वेध घेणारी, तशीच पुन्हा खालून वर आभाळाला मिठी मारण्यासाठी निघालेली, तसा बापू दिसे. एकाच अवस्थेत आयुष्यभर गोठवलेला. उन्हाळा, दिवाळीच्या सुट्टीत बापूची भेट हमखास व्हायची. तोही मी दिसलो की माझीच वाट पाहात असल्यासारखा भरभरून बोलायचा. बोलत राहायचा. एकदा बरडावर भेटला. आमचंही शेत तिथंच ओढ्याच्या काठाला लागून असलेलं. शेतात जमिनीतून उगवल्यासारखे अधूनमधून डोकावणारे काळे खडक. मुरूम, खडकावर वीतभर पिवळी माती असणारं बरडं रान. पाऊसकाळ चांगला असला तर हिरवं दिसणार. नाहीतर ढोरांनाही तोंड घासावं वाटणार नाही. काठी हातात घेऊन बापू एका खडकावर उभा असलेला, ''आमचं आसं चाल्लं. तुम्ही शाळात जाता व्हय. आं. ही कुणबीक आवकळी हाये. काय बी सुदरू देत नाही.''



त्याला माझ्याशी बोलण्यासाठी कोणताही संदर्भ लागत नाही. माझ्याशी बोलताना त्याचे धुरकट घारे डोळे मनापासून हसले. थोडं बोलून झालं की थांबून मधेच नाकातून 'आं' म्हणण्याची याची लकब. आपल्या प्रतिक्रियेची तो जसा वाट पाहातो. भेटीत दरवेळी तो माझा हात हाती घेतो. खडकासारखे उन्हातान्हानं तापलेले, काळाला पचवून कडक झालेले तळवे माझ्या हाती देऊन तो म्हणाला, ''यंदाच लाह्यन पोरीचं लगन झालं. आता राह्यला तेवढा गन्या, त्याचं बी घेऊ उरकून. मोठ्याले दोन पोरी झाल्या. म्या म्हनलं घ्या आपरेशन करून. कुठं आपली इस्टाईन वाया चालली. पोरं नाही आयकत. काय करता, चालू द्या. आं.''

मी बापूकडं बघून नुस्ता हसलो. त्याला शब्दाची भाषा कळत नाही. माझ्या हातचे हात सोडवून घेत म्हणाला, ''ह्ये आभाळ बसलं फुगून. पाऊस चांगला पल्डा त इहिरीला वढ्यानाल्याला पाणी राहील. तुमच्यावानी शिक्षण घेनाऱ्या लोकाह्यचं बरं आसतं. पानी पलड काय, आन न पल्ड काय, सारकच.''

असं म्हणताना नोकरदाराविषयी त्याच्या मनात असूया, द्वेष नसतो. खूप समजंसपणानं तो हे सारं हलक्या आवाजात पुटपुटल्यासारखा बोलतो. तो कोणालाही 'अरेतुरे' म्हणत नाही. गावातलं एखादं बारकं लेकरू आसलं तरी त्याच्याशी बोलतांना तो 'आहोजावो'च्या भाषेतच बोलणार.

आज तो बराच निवांत दिसत होता. ढोरं वढ्याच्या काठावर रमलेली; ''आम्ही लाहान व्हतो, लय आवकाळी पाऊस पडायचा. आईकलड्या नदीत आम्ही पोऱ्हंपोऱ्हं ढोरं घेऊन जायचो. रात्रंदिवस झड लागलेली. ढोरायला त उपासी ठेवता येत नाही. आं. आमचं म्हातारं बी लय आवकाळी व्हतं, दिवसा खुट्याला बांधेल जनावर त्याला सहन व्हायचं नाही. पांधीत चांगल्या टोंगळ्या मांडीलोक हे चिखूल व्हायचा. ढोरंबी खाऊन आशी रगेल व्हयेल की चिखलात फसायची नाही. आं. आता काय सारंच पांगल्यावानी झालं.''

दोन्ही हात विठ्ठलासारखे कंबरेवर ठेवून त्यानं बोलताबोलता आभाळाकडं पाह्यलं. लांब तरंगणारे कापडाच्या फाटक्या तुकड्यासारखे पांढरे ढग. पंख फाकवत फिरणारी पाखरं. नव्या आभाळात जुनं आभाळ सापडतं की काय या भावनेनं तो बराच वेळ वर पाहात असलेला. पाखराच्या बोलण्याशिवाय दुसरा कोणताही आवाज नाही. आपल्या जुन्या काळात बापू हरवून गेलेला.

बापूचा लहाना लेक, गणाचं लग्न झालं. त्यावेळी मी गावीच होतो. लग्न लागून वऱ्हाड गावात वापस आलं. रात्रीला गणाची वरात निघाली. दुसऱ्या दिवशी सत्यनारायणाची पूजा. वरातजेवण. आंधण आलेली भांडीकुंडी भावभावकीला दाखवणं. वरात जेवणाच्या पंगतीला बापू तेवढा दिसला. लेकाच्या लग्नातली आहेराची नवी कोरी कापडं त्याच्या अंगावर दिसली. या कापडात तो खूप अवघडल्यासारखा वाटला. अशी माणसाची गर्दी दिसली

की त्याची बोलती बंद व्हायची. नव्या कापडानं त्याला बांधून टाकल्यासारखं झालं. गण्याचं लग्न झालं आणि बापू पुन्हा शेतात, ढोरांत रमून गेला. मारुतीच्या पारावर चार लोकासोबत मोकाट गप्पा मारताना बापू कधी दिसला नाही. पंढरीला, आषाढी-कार्तिकीला वारी करायलाही तो गेला नाही. तो वावराशिवाराशिवाय गावातही आला की बेचैन व्हायचा. तिथं असं बाहेर जाणं त्याचा जीव गुदमरून टाकणारं होतं. आपलं वावर, ओढे-नाले, पांदी त्यानं घर अंगण केलेले. गुरावासराशी, पाखराशी सोईरपण जोडलेलं.

गावाकडं गेलो तेव्हा अंगणातच बाज टाकून झोपलो होतो. ऊनं तोंडावर आली तशी जाग आली. बापूचा पोरगा अण्णा अंगणातच मांडवाखाली बसलेला दिसला. मी डोळे चोळत उठलो, तसा अण्णा माझ्यासमोर उभा. मी कधीही गावी गेलो की अण्णा मला भेटायचा. थोडा वेळ थांबून बोलायचा. त्यातल्या त्यात माणसं सांभाळून असणारा अण्णा सर्वांशी चांगले संबंध ठेवून असलेला. बापू गेल्यानंतर साऱ्यांच्या वाटण्या झाल्या. बापूनं आपल्या हयातीत वाटण्या होऊ दिल्या नाही. शेताचे तुकडे करून ज्यानं त्यानं शेती करायला सुरुवात केली. मी आसेलोक मह्या वावराच्या देहीचे तुकडे व्हवू देनार नाही, असं बापू म्हणाल्याचं मी ऐकलं होतं. पोरांनी निदान ते ऐकलंही. चांगली गोष्ट झाली. सारीजणं आपआपल्यापरीनं कामाला लागली. त्याशिवाय पर्यायच नव्हता. शेती वाढवण्यासाठी म्हणून पोरांनी बांधावरची झाडं तोडली. पांदीचीही तोडली. विकून पैसा केला. ढोरांना चरण्यासाठी ठेवलेले मोठाले बांध वाटणीच्या खुणा ओळखू येण्याएवढे ठेवले. बापूची बोळक्या विहिरीवरची खोपी कुजत कुजत भुईसपाट झाली. पन्नास शंभर वर्षांचा काळ खोडाफांद्यात साठवून उभ्या असलेल्या रामकाठी भुईसपाट झाल्या.

''भाऊ, एक काम व्हतं तुमच्याकडं,'' अण्णाचा आवाज हळवा झाल्यासारखा वाटत होता.

''म्हाताऱ्याला जावून आता तीनएक साल झाले. आमच्याकडं म्हताऱ्याचा फोटूच नाही. तुम्ही एकदा वावरात जाऊन म्हताऱ्याचा फोटू काढला होता, आसं आयकलं होतं. आसला तर द्या. काय लागतील ते पैसे मी देईल.''

एका दमात एवढं बोलून अण्णाराव थांबला. बापूसारखीच त्याची नाकातून बोलण्याची सवय.

बारा-चौदा वर्षापूर्वीची गोष्ट. दिवाळीच्या सुट्टीत घरी आलो होतो. कॉलेजला शिकायला होतो. मित्राचा हॉटशॉट कॅमेरा आणला होता. शेतात जात असताना बापू हायब्रीडच्या खळ्यात उभा असलेला दिसला. डोक्यावर मळका पांढरा पटका. पंचासारखं नेसलेलं मातकट रंगाचं धोतर. नेहमीप्रमाणच अंगात सदरा न घातलेला उघड्या अंगाचा बापू. विठ्ठलासारखा उभा असलेला. बापूचा फोटो काढला. त्यावेळी त्यानं मी काय केलं, हातात काय आहे, काहीही विचारलं नव्हतं. कोणाला काही विचारण्याची सवय त्याला कधीच नव्हती.

अण्णारावसाठी बापूचा फोटो द्यायचा हे ठरवून निघून आलो. माझ्याजवळच्या एका जुन्या अल्बममध्ये बापूचा फोटो सापडला. मी खरं तर बापूचा फोटो विसरून गेलो होतो. फोटो सापडल्यावर बापू पुन्हा एकदा शेताशिवारासह जिवंत होऊन माझ्यासमोर उभा राह्यला. हॉटशॉटने काढलेला हा फोटो लॅबमध्ये देऊन तो मोठा करायला सांगितला. चार-आठ दिवसांनी लॅबमधून फोटो बंद पाकिटात आला. पाकीट उघडून फोटो पाहिला तर धक्काच बसला! बापूच्या देहावरचं ऊन, वारा, थंडी, पाऊस, सारं गळून पडलेलं. फोटो मोठा करताना लॅबवाल्यानं बापूच्या अंगात चांगला पांढराशुभ्र सदरा घातला. विस्कटलेला, मळलेला पटका चांगला व्यवस्थित बांधून बगळ्याच्या रंगासारखा पांढरा केला होता. लॅबवाल्याचा त्यात काही दोष नव्हता. जुने फोटो अशाच रीतीनं दुरुस्त्या करण्यासाठी बहुतेकजण त्यांच्याकडं देतात. हाही त्यानं जगरहाटीप्रमाणं दुरुस्त केला होता. अण्णारावला कदाचित हा फोटो आवडेलही. त्याच्यासाठी बापूचा चेहरा महत्त्वाचा होता. किती दिवस केवळ कल्पनेनं आपल्या बापाला तो आठवत राहणार होता?

पांदीच्या, ओढ्याच्या काठावर, बरडावर गुराढोरात रमलेला, पिकाच्या तासात उभा राहून पीकपाण्याशी, पाखरांशी बोलणारा... भुईउंबर, आपटा, चिंचेची, आंब्याची झाडं, बोरीबाभळीत फिरताना ऊनपावसात, रानावनात हरवून जाणारा बापू... थंडी, ऊन, वाऱ्यापावसाचे कपडे घातलेला... रानपाखरासारखा वावरात फिरणारा बापू मी पुन्हा माझ्या मनात झाकून ठेवला.

**- श्रीकांत देशमुख**
'बळिवंत', नरहरनगर, नृसिंह पॅलेसमागे,
रिंगरोड, नांदेड. ४३१ ६०५
भ्रमणध्वनी : ९४२२४३६७६९
shrikantdeshmukh63@gmail.com

# कुलवृत्ताच्या निमित्ताने

प्रभाकर भिडे

**कुलवृत्त कशासाठी?**

**''आपल्या घराण्याचा पूर्वापार व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ती कशा होत्या, त्यांच्या अंगी मुख्यत्वेकरून कोणते गुण होते, त्यांचे शिल कसे होते, त्यांच्या वेळच्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितीत जो काय फरक झाला असेल तो राष्ट्रहिताच्या दृष्टीने कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे. याचा तुलनात्मक दृष्टीने विचार करण्यास असे घराण्याचे स्वतंत्र इतिहास बाहेर पडणे अत्यंत जरुरीचे आहे.'' – *लोकमान्य टिळक***

*(आपटे घराण्याच्या इतिहासावरील अभिप्राय – दै. केसरी, २४/११/१९१४)*

साधारण २००० चा डिसेंबर महिना. बत्तीस वर्षाच्या नोकरीनंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. आता पैशाकरता काम करण्याऐवजी काहीतरी आवडीचे काम करावे, जे आतापर्यंत करू शकलो नव्हतो, असे वाटत होते. माझी आवड पुस्तकाचे वाचन व त्यातूनच येणारी लिखाणाची ऊर्मी.

काय करावे याबद्दल मनात थोडा गोंधळ होता. अचानक एक दिवस एक परिचित गृहस्थ घरी आले. त्यांनी 'कुलवृत्ताचे काम चालू आहे. आपण डोंबिवलीतील भिड्यांची माहिती गोळा करून पाठवू या. त्या करता तुम्ही दर रविवारी मला मदत कराल का?' असे विचारले.

मग दर रविवारी आम्ही डोंबिवलीतील भिडे लोकांची माहिती गोळा करू लागलो. काम करताना अनेक लोकांशी संपर्क येऊ लागला. काहींनी आपुलकीने माहिती दिली. मदत करण्याची तयारी दाखवली. क्वचित काहींच्या चेहऱ्यावर आठ्या उमटल्या. 'याचा उपयोग काय? अशा प्रकारचा वेळ घालवण्याचे दिवस केव्हाच संपले.' अशा प्रतिक्रिया मिळत होत्या. आम्ही मात्र नेटाने काम चालू ठेवले.

डिरेक्टरीमधून घेतलेल्या पत्त्यावरून शोधायचा प्रयत्न केला. एका निरपेक्ष कामाचा आनंद मिळू लागला. एक प्रकारे सरकारी जनगणनेच्या कामासारखे वाटत होते. सरकार ते काम दर दहा वर्षांनी करते. त्यातून अनेक निष्कर्ष, गमतीदार गोष्टी कळतात. ब्रिटिशांनी १९१० सालापासून हे काम चालू केले होते. राज्यकर्त्यांना अशा कामातून लोकांची सामाजिक/आर्थिक स्थिती कळते. त्यातूनच भावी सुधारणा,

विकासाच्या योजना आखल्या जातात.

पण आपल्या कामाचे काय? वाटले, यातूनही समाजातील ठरावीक घटकांची माहिती मिळू शकते. ते सुद्धा समाजाचा एक भाग आहेत. त्यातूनच समाजाच्या परिस्थितीची कल्पना येऊ शकते. हाही एक प्रकारचा सँपल सर्व्हे आहे. थोड्या दिवसांत आम्ही येथील काम संपवून दादर येथील मुख्य कार्यालयात जाऊ लागलो. तोपर्यंत एक समवयस्क लोकांचा ग्रूप तयार झाला. मजा येऊ लागली. लवकरच त्याचे मैत्रीमध्ये रूपांतर झाले. ज्याची निवृत्तीनंतर गरज होती.

दादरच्या कार्यालयात कळले, की महाराष्ट्र व इतर ठिकाणांहून एकूण दोन हजार भिडे कुटुंबांची माहिती गोळा करायची आहे. सर्व लोक तर माहिती देणार नाहीत पण सत्तर टक्क्यांपर्यंत तरी माहिती मिळेल. त्यावरच कुलवृत्त तयार करावे लागेल. पण आतापर्यंत आम्हाला अनेक ऐतिहासिक व चित्रचक्षुचमत्कारीक गोष्टी कळल्या होत्या. त्यात उत्सुकता वाटू लागली होती.

याच दरम्यान आणखी एक गोष्ट घडली. मुख्य काम करणारे राजमुद्रा या प्रिटिंग प्रेसचे मालक काही कारणामुळे बाहेरगावी स्थलांतरित झाले. पण कार्यकारीणीच्या हुषार व तत्पर लोकांनी मीटिंग घेऊन कुलवृत्त संपादनाची सर्व जबाबदारी आमच्यावर सोपवली व दोन-तीन वर्षात काम पुरे करून कुलवृत्त प्रकाशित करावे असे ठरवण्यात आले.

आता अचानक मुख्य संपादकाची जबाबदारी पडल्यामुळे आलेल्या संधीचे सोने करावे जेणेकरून आपल्या नावावर एक तरी पुस्तक जमा होईल असे वाटले.

प्रारंभी सर्व वंशावळीचे नकाशे (वंशवृक्ष) बनवण्याचे ठरवले, जेणेकरून किती कुटुंबांची माहिती येणे आहे ते कळेल. दोन-तीन महिन्यांत जवळजवळ साठ शाखांचे नकाशे बनवले त्यावेळी लक्षात आले की फक्त चाळीस टक्केच माहिती आली आहे. पण उरलेली माहिती कशी मिळणार? पण जशा अडचणी येतात तशा त्या सोडवण्याचे मार्ग सापडू लागतात. एकाने सुचवले की मूळ गावे कोकणात आहेत तेथे जावे व मूळ स्रोत समजून घ्यावा. भिड्यांचे मुख्य मूळ गाव रत्नागिरीजवळील 'गणपती पुळे' हे प्रसिद्ध असलेले तीर्थक्षेत्र आहे. या गणपतीची स्थापना जवळच्या 'उंडी' गावाच्या त्रिंबक भट्ट भिडे यांनी केली. इथेच भिडे कुलवृत्ताचा श्रीगणेशा झाला. कारण त्यांच्यावर अनेक संकटे/अडचणी आल्या असता त्यांनी त्या जागेवर गणेशाची उपासना सुरू केली. पूर्वी सर्व संकटांवर देवाची उपासना हा एकच मार्ग असे. सुदैवाने संकटे दूर झाली. पुढे देवाची प्रचिती येऊन त्यांना गणेशाची स्थापना करण्याचा दृष्टांत झाला. ही गोष्ट आहे चारशे वर्षांपूर्वीची. त्यावेळी भारतावर मोगली साम्राज्य होते. आजही त्यांची समाधी देवस्थानच्या आवारात आहे. आज त्या गणपतीची भरभराट बघून आश्चर्य वाटते. जवळजवळ चारशे-पाचशे माणसे त्या देवस्थानच्या सेवेत असून त्यांचा प्रपंच देवस्थानावर अवलंबून आहे.

सुदैवाने त्या देवस्थानचे सरपंच डॉ. विवेक भिडे निघाले. त्यांना आमचा उद्देश सांगितल्यावर स्वतःच्या गाडीने नेऊन पूर्वजांच्या घराचे चौथरे वगैरे दाखवले. माहिती सांगितली. तेथे देवस्थान असल्यामुळे विविध शाखेचे लोक येऊन राहात. पूर्वी लोक पोटापाण्यासाठी विविध ठिकाणी जात. जवळच्या निवडी, आडिवरे अशा अनेक गावी जाऊन बऱ्याच लोकांची (त्यांच्या शाखांची) माहिती मिळाली. त्यात अनेक गोष्टी कळल्या. तीनशे वर्षांपूर्वी अनेक कोकणस्थ ब्राह्मण (बहुधा गरिबीमुळे) कर्नाटकात गेले. तेथे त्यांना शेती विशेषतः बागायतीसाठी जमिनी खंडानी किंवा संस्थानिकांकडून इनाम मिळाल्या. तेथे त्यांनी नारळीपोफळी इतकेच नव्हे तर रबराच्या बागा उभ्या केल्या. अशाच एका गावी (मुंडाजे, मंगलोरजवळ) जाण्याचा योग आला. तेथे अनेक मराठी कुटुंबे असून भिडे मंडळीही आहेत. ते मेहनतीने अत्यंत सुस्थित आहेत. त्यापैकी एक तर कर्नाटक रबर ग्रोअर सोसायटीचे अध्यक्ष आहेत. ते नॅचरल रबरापासून अनेक वस्तू बनवतात. कर्नाटक सरकारचे त्यांना सहकार्य व आर्थिक मदतही मिळते. त्यानी त्यांच्या वाडवडिलांच्या नावाने बारावीपर्यंत शाळाही सुरू केली आहे. मात्र त्याचे माध्यम कानडी आहे. ते घरात चित्पावनी भाषा बोलतात. ती मराठीची बोलीभाषा आहे. जशा कोकणी, मालवणी वगैरे आहेत. आता आपल्याकडे मात्र ही बोलीभाषा बोलली जात नाही. त्यांनी मात्र आपल्या पूर्वीच्या रुढीपरंपरा जपल्यात. एकंदरीत महाराष्ट्रातील पूर्वपरंपरा इतर राज्यांतील मराठी लोक आवर्जून जपतात असे दिसले. इतकेच नव्हे, तर ते एकत्र राहतात! एकमेकांना भेटतात, मदत करतात. तेथे त्यांच्या अनेक संस्था आहेत. दुर्दैवाने असे चित्र महाराष्ट्रात दिसत नाही. कर्नाटकात अनेक मराठी लोक, त्यांत ब्राह्मणही आले, शेती बागायती करून अतिशय उत्तम परिस्थिती आहेत. तेथील कानडी समाजाशी एकरूप झाले आहेत. (बेळगाव, कारवार प्रश्नावर आता हा एकमेव तोडगा शिल्लक आहे. किती वर्षे तुम्ही शेजारी राहून भांडणार?)

पूर्वीचे प्रसिद्ध नट शंकर घाणेकर यांच्या गावी (सडे

वृंदावन येथे) जाण्याचा योग आला. ते गाव अतिशय छोटे असूनही तिथे नाट्यगृह आहे. विशेष नवल म्हणजे विनोदी नट शंकर घाणेकर यांचे निधन तेथील नाट्यगृहात नाटक करतानाच झाले. एखाद्या नटाला नाटकाच्या स्टेजवर (स्वतःच्या गावात) मृत्यू यावा ही नवलाची गोष्ट आहे. अशा विविध ठिकाणी (जेथे पूर्वी भिडेमंडळी राहत होती) जाऊन आल्यामुळे त्यांचे मूळ स्रोत कळलेच, शिवाय अन्यही बरीच माहिती मिळाल्याने त्यात रस वाढला.

या अशा मागच्या पिढ्यांच्या माहितीच्या अभ्यासातून अनेक चांगल्या गोष्टी कळल्या. हल्ली धनसंपत्ती किंवा पैसे ठेवण्याकरता बँकाची सोय उपलब्ध आहे, पण पूर्वी अशा सोयी नव्हत्या. मग पूर्वीच्या काळी पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी काय सुविधा होत्या? विशेषतः राजेरजवाडे, सावकार, धनिक लोक आपली धनसंपत्ती किंवा दागदागिने कशी ठेवत? इतिहास चाळला असता असे दिसते की राज/प्रधान/पेशवे आपले दागदागिने पैसे अनेक ठिकाणी विभागून ठेवीत. प्रत्येक ठिकाणी खजिन्याचा १०/२० टक्के भाग ठेवला जाई. अशाच खजिन्याचा छोटा भाग साताऱ्यावजळील सबनीसवाडी येथील भिड्यांच्या छोट्या गढीत ठेवला होता. त्याचे रक्षण करण्याकरता त्यांनी शिपाईगिरी पत्करली होती. इतकेच नव्हे तर त्या घरातील प्रत्येक पुरुषाला व्यायाम व सैनिकासारखे ट्रेनिंग देत असत. पुढे इ.स. १८१८ मध्ये इंग्रजानी मराठी राज्य खालसा केले. दुसऱ्या बाजीरावास पेन्शन व बराच मुलुख देऊन कानपूरजवळील ब्रह्मार्वतास नेऊन वसवले. आता सबनीस भिडे मंडळीना प्रश्न पडला की आपल्याजवळील मराठी खजिन्याचे काय करायचे? पण त्यांची स्वामीनिष्ठा इतकी प्रचंड की त्याने बैलांच्या पाठीवर लमाणांच्या साहाय्याने खजिना लादला. ब्रह्मार्वतास पेशव्यांना नेऊन दिला. पेशव्यांनी त्यांच्या स्वामीनिष्ठेचे कौतुक केले. आता तुम्हाला काय बक्षीस देऊ असे विचारले. त्यावर स्वामीनिष्ठ सबनीसांनी सांगितले की आम्हाला बक्षीस नको. तुम्ही परत पुण्याला या व राज्य करा! दुर्दैवाने पेशव्यांना ते शक्य नव्हते. पुढे या भिड्यांची परिस्थिती खालावली. त्यांनी शेती व शिकार असे अनेक उद्योग केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वात सुरक्षित राजधानी म्हणून आपली राजधानी रायगड या किल्ल्यावर केली. तेथे सैन्य व मंत्रिमंडळातील सहकारी धरून दहा हजारच्या वर लोक/शिबंदी राहत असत. यांना व इतर किल्ल्यांवरील लोकांना, शिबंदीला आवश्यक ती साधनसामग्री (धान्य व दारूगोळा इत्यादी) नियमित व अखंडपणे मिळावा याकरता मराठी राज्यकर्त्यांनी बंदरापासून (राजापुरी, कल्याण वगैरे) राजधानीपर्यंत दोनतीनशे किलोमीटरचा रस्ता सुरक्षित असावा याकरता प्रत्येक पंचवीस किलोमीटरवर नायक पदावर अनेक लोकांची नेमणूक केली. त्यांच्याजवळ स्वतःचे थोडे सैन्य किंवा सैन्याचा विभाग असे. त्यांचे काम की तो २५ किलोमीटर रस्त्यावरील रसद सुरक्षितपणे रायगड व इतर किल्ल्यापर्यंत पोचवणे. हर्णेजवळ या कामी कृष्णा नायक (भिडे) माणसाची नेमणूक केली असल्याचे अभ्यासातून समजले. त्या व्यवस्थेकरता त्याला उत्पन्नाची साधने व जमीन देण्यात आली होती असे त्यांच्या वंशजांकडून कळले. इतकेच नव्हे तर त्यांना स्थानिक सामाजिक व धार्मिक कार्यात मानाने बोलवण्याची प्रथा त्यावेळी होती. गणपतीपुळे येथील उत्सवात त्यांना ढोल वाजवून आमंत्रण देण्यात येई.

आपल्याकडे पूर्वी मौखिक परंपरा होती. त्यामुळे डॉक्युमेंटेशनचा प्रयत्न दिसत नाही. साहजिकच त्या त्या कर्तृत्ववान माणसांबरोबर त्यांचे अनुभव नाहीसे होत. या उलट मोगलांच्या दिल्ली दरबारामध्ये राजाची रोजची दिनचर्या लिहिली जात असे. म्हणूनच प्रसिद्ध विचारवंत पु.ग. सहस्रबुद्धे यांनी आपल्या 'चिंतन' या पुस्तकात लिखित परंपरेच्या अभावी आपले किती नुकसान झाले आहे याचे अनेक दाखले दिले आहेत. पेशवे कालखंडात पहिला बाजीराव हा अतिशय पराक्रमी, धाडसी, चपळ लढवय्या सेनापती होता. वीस वर्षांच्या त्याच्या कारकिर्दीत तो एकही लढाई हरला नाही असे अभिमानाने सांगतात. पण त्यानंतर येणाऱ्या सेनापतीस आपली कोरी पाटी घेऊनच लढाईस जावे लागले. वेगवेगळ्या राजपूत राजांनी जवळजवळ आठशे वर्षे मोगलांशी लढा दिला. कधी ते हरले कधी त्यांना यश मिळाले. त्यांना अनेक अनुभव आले असतील. पण लिखित स्वरूपात ते उपलब्ध नसल्यामुळे पुढच्या पिढ्यांना त्या अनुभवांचा काहीच फायदा झाला नाही. या उलट इंग्रजांच्या राज्यात प्रत्येक राज्याचा ब्रिटिश गव्हर्नर आपले अनुभव डायऱ्यांमधून लिहून ठेवीत. अशा राज्यपालांच्या अनेक डायऱ्या ब्रिटिश सरकारने (पन्नास वर्षांनी) प्रकाशित केल्या आहेत. त्यामधून भारतीय लोक कसे होते ते समजते.

अशा विशिष्ट तऱ्हेचे काम करताना अनेक गमतीदार तसेच अनपेक्षित अनुभव येतात. एके दिवशी आम्हाला रिझर्व्ह बँकेतून निवृत्त झालेल्या एका भिडे भगिनीचा पत्ता मिळाला. त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ख्रिश्चन असल्याचे नमूद केले. नाव टिपिकल मराठी असल्याने जरा आपुलकीने चौकशी केली असता त्यांनी ख्रिश्चन धर्म कसा

स्वीकारला ते सांगितले. पुण्याला १९१८ साली म्हणजे शंभर वर्षांपूर्वी प्लेगची (बहुधा शेवटची) साथ आली होती. त्यावेळी त्यांच्या आजोबांचे आईवडील व इतर नातेवाईक यांचे साथीत निधन झाले. त्यावेळी आजोबा तीन वर्षांचे होते. एकच मुलगा जिवंत राहिला. अशा अनाथ मुलाला कोणीतरी पुण्याला 'पंचहौद मिशन' या ख्रिश्चन मिशनमध्ये ठेवले. तेथे त्यांना चांगले शिक्षण मिळाले. ते हुषार असल्याने चांगल्या शिक्षणामुळे ब्रिटिश राज्यात चांगली नोकरी मिळाली. साहजिकच त्यांनी पुढे ख्रिश्चन धर्म स्वीकारला. या बाईंनी परिचयानंतर आपल्या बंधूंचा पत्ता दिला. पण त्यांना या कामात रस नसल्यामुळे तो विषय तेथेच संपला. वास्तविक ही माहिती कुलवृत्तांतास उपयुक्त ठरली असती.

ज्या पानिपतावर जानेवारी १७६१ मध्ये मराठी सैन्याचा लाजिरवाणा पराभव झाला, तो ज्यांनी केला त्या अफगाणिस्तानच्या अहमदशहा अबदालीने त्यापूर्वी तीन वेळा भारतावर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. तिन्ही वेळी त्याचा पराभव झाला होता. त्यापैकी तिसरी लढाई २१ एप्रिल १७५८ रोजी झाली. त्या लढाईचे वर्णन हरी रघुनाथ भिडे मु. लाहोर. नदी यैरावती तीराहून चैत्र शु. १३ च्या पत्रात श्रीमंत नानांना कळवले आहे (ते पत्र उपलब्ध आहे). ते असे– लाहोरी प्रांती श्रीमंत आबदुल समदखान सरदहेत होता त्याचे पारपत्य करून तो मुलुक, प्रा.मा. डुवबे हे दोन्ही तालुके आदिनाबेग मोगल यांजकडे खंडणी ठरवून स्वाधीन केले. पुढे मजल दरमजल ज्याहान खान (अबदालीचे दिवाण) व अबदालीचे पुत्रासह वर्तमान लाहुरी (लाहोर) विसा हजारा फौजनसी होता त्यावर चालून गेले. तेव्हा विपाशा नदीतिरीहून सड्या फौजा मराठे सरदार मानाजी पायगुडे व गंगाधर बाजीराव रेठरेकर, गोपाळ गणेश बर्वे रवाना झाले. यासी त्याची मारनिलेशी गाठ पडली. तेव्हा ते पराभवाने घाबरा होऊन, आपले बुणगे व तोफखाना वगैरे कित्येक मागे टाकून सडा ती चौ हजार फौजेनसी चिनाब नदीपार उतरोन जीव रक्षणामुळे पलाला. आपले फौजेने नदी परिमंत पाठलाग करून सर्व फौज तोफखाना लुटला. पुढे चिनाब पार व्हावे तरी नदीस पाणी फार, उपाये नाही म्हणून राहिले. नाही तरी तोची लुटला जाता. भगवंते रक्षिला. ज्याहानखान व तैमूरशहा (दिल्लीचे पातशहा) सलावतीने पलाले. इतकियाने या प्रांती वर्तमान हिंदुस्तान रजवाड व दिल्ली व जाठ वगैरे यावरी सलावत भारी पडली. या वेळी दक्षिण फौजा पहिले दिल्ली आलाकडे आली नव्हती ते चिनाब नदी परियंत पोचली. चिनाबेस पाणी थोडे असते तरी आटक परियंत जाती. सहात मात्र अटक पार होऊन गेली. पुढे पूल बांधोन फौजा जाव्यात त्यास अटकाव भारी पडेल. मग छावणीस मुळ आले. छावणी दुर देशी करता नये. त्याहीवरी लोक कष्टी होतात यैसे आसोन सहसा विदर्धात न क्रिया म्हणून लाहोर प्रांतीचा बंदोबस्त करून श्रीमत साहेबे देशोदेशे माघारी फिरतलसे दिसते. यावरी भगवंतासता प्रमाण जाले. वर्तमान सेवेसी लिहिले. कृपा लोभाची वृधि कीजे हे विनंती.

वरील पत्राने त्यावेळच्या परिस्थितीची कल्पना येते. ही ऐतिहासिक पत्रे कुलवृत्ताच्या कामामुळे बघता आली.

१८४८ साल हे स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने इतिहासात महत्त्वाचे ठरले. त्या काळात वेडगळ कल्पना, दुराग्रह ह्याला प्रखर विरोध करून आपले सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य चालू ठेवणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते होते. त्यामध्ये पुण्यात जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले हे दांपत्य अग्रेसर होते. त्यांचे मित्र व सहकारी सदाशिवराव गोवंडे, जगन्नाथ सदाशिव परांजपे, वाळवेकर व तात्यासाहेब भिडे हे होते. या भिड्यांचा सिटी पोस्ट चौकाजवळ मोठा वाडा होता व त्यामध्ये फक्त चार माणसे राहत होती. त्यांची परिस्थिती चांगली होती. ते परोपकारी, निःपक्ष व उदारमतवादी होते. तसेच जोतिबा फुले यांचे स्नेही होती. त्यांनी तात्यासाहेबांना मुलींची शाळा सुरू करण्याचा संकल्प कथन केला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्यामुळे, हा नाविन्यपूर्ण संकल्प फार आवडला. त्यांनी त्वरित आपल्या वाड्यातील जागा शाळेसाठी देण्याचे मान्य केले. ह्याशिवाय ह्या जागेचे भाडे न घेता या क्रांतीकार्यास १०१ रुपयांची देणगी दिली. तसेच दरमहा खर्चासाठी पाच रुपये वर्गणी देण्याचे मान्य केले. वाड्याच्या पुढील चौकात शाळा सुरू झाली. सावित्रीबाई फुले या शाळेच्या पहिल्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका झाल्या. दीडशे वर्षांपूर्वी स्त्रियांना शिकवणे व त्यासाठी मुलींना शाळेत पाठवणे म्हणजे एक अपराधा होता. मुलींनी शिक्षण घेतले तर त्यांना अकाली वैधव्य येईल, तसेच विद्याभ्यासाने तिची पापाचरणाकडे प्रवृत्ती होईल अशी समजूत होतील. परंतु फुले दांपत्य व त्यांचे सहकारी यांनी अशा चुकीच्या समजूत असणाऱ्या लोकांचे अपशब्द व निर्भत्सना सहन करून शिक्षणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पहिल्या वर्षी फक्त सहा मुली आल्या. त्यामध्ये चार ब्रह्मण, एक धनगर व एक मराठा मुलगी होती. सुरुवातीला पालक मुली शाळेत पाठवण्यास तायर

नसत. पण फुले दांपत्याने शिक्षणाचे महत्त्व पटवून त्यांची मते अनुकूल करण्यात यश मिळवले. पुढे ख्रिस्ती मिशनऱ्यांपेक्षा एतद्देशीय शाळा बरी असे लोकांना वाटू लागले. साहजिकच विद्यार्थिनींची संख्या वाढू लागली. ह्याचा परिणाम म्हणजे या भिडे वाड्यातील पहिल्या शाळेच्या यशानंतर पाठोपाठ पुण्यात नऊ शाळा निघाल्या. पुढे पुणे जिल्ह्यात तळेगाव, शिरवळ, सातारा अशा अनेक ठिकाणी शाळा सुरू झाल्या. त्यावेळी 'दस्ती' या नावाच्या शाहीराने एक पोवाडा रचला. त्याच्या सुरुवातीला ओळी –

जोतिबाची एका किर्त। भिड्यांच्या वाड्यात ।।

शाळेमध्ये मुली होत्या बहुत। ब्राह्मण, शेणवी, प्रभू ज्ञात ।।

सध्या या वाड्याची पुणे महानगरपालिकेतर्फे संरक्षित वास्तू करण्याचा प्रयत्न चालू आहे. हा वाडा हल्ली जिथे प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती बसवतात त्याच्या बाजूला असून तेथे फुलांची बरीच दुकाने आहेत. तसेच वाड्याचा काही भाग पाडून बहुमजली इमारत बांधण्यात आली आहे.

ज्यांना इतिहास जाणून घेण्यात उत्सुकता आहे त्यांना कुलवृत्त हे एक साधन आहे. कारण त्यामुळे आपल्याला पूर्वीच्या परंपरा व संस्कृती कळते. पूर्वीचे लोक जाणून घेता येतात. पुढील जीवनाची दिशा ठरवण्यास मदत होते.

एका मर्यादित उद्देशाने आम्ही अनेक लोकांना वेगवेगळ्या गावांना भेटलो. ती माणसे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जग कल्पनेपेक्षा वेगळे आहे हे जाणवले. माणूस विद्येने शहाणा होतो तितकाच अनुभवाने जाणकार होतो याचा प्रत्यय आला.

काही कामे (विशेषतः सामाजिक) आपल्याकडे अचानक चालून येतात. ती आपल्या परीने पूर्ण करणे हेच त्या कामाला न्याय देण्यासारखे असते. त्याचे यशापयश आपण लोकांवर सोपवावे. आपल्याला काम केल्याचे समाधान व आनंद मिळतो. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर माणसाला आणखी काय हवे असते?

**– प्रभाकर शंकर भिडे**
२०१, राधाश्री सोसायटी, सावरकर रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४

**'संकल्पनाकोश'ला मिळालेले पुरस्कार**


- **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**
  **ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११**
  ***संकल्पनाकोश खंड १***
- **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**
  **नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३**
  ***संकल्पनाकोश खंड २ ते ५***
- **मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई**
  **केशव भिकाजी ढवळे २०१३**
  ***संकल्पनाकोश खंड १ ते ५***
- **सार्वजनिक वाचनालय, नाशिक**
  **डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३–१४**
  ***संकल्पनाकोश खंड १ ते ५***

**मूळ किंमत ३२०० रुपये**
**सवलतीत २४०० रु.**
**टपालखर्च २०० रु.**

**इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...**

**सुरेश वाघे**
लिखित
**संकल्पनाकोश**
**खंड १ ते ५**











# अरे बाबा जाहिरात!

रविप्रकाश कुलकर्णी






**चित्रपटाचं** पोस्टर म्हणजे त्या चित्रपटाची ती जाहिरातच असते आणि जाहिरातीकडे लक्ष वेधण्यासाठी कोण काय करेल हे सांगता येत नाही. सध्या आमिरखानच्या पीके चित्रपटाच्या पोस्टरने थोडी खळबळ उडवून दिली आहे. त्या नागडेपणाकडे कशाला एवढं बारीकपणानं पाहिले पाहिजे? खरं तर त्याकडे दुर्लक्ष केलं तर? शिवाय तो चित्रपट यायला देखील बराच अवधी आहे. तेव्हा ह्या पोस्टरला स्टन्ट म्हटलं तर काही चुकलं काय?

पण काय असेल ते असो, आपल्याकडे असल्या नागडेपणाचं कौतुक करायची सवय आहे की काय कुणास ठाऊक. मागे 'गहराई' नावाचा चित्रपट आला होता. त्या चित्रपटात आणि अर्थात् चित्रपटाच्या पोस्टरवर उघडी पाठमोरी पद्मिनी कोल्हापुरे दाखवली होती. एरवी त्याकडे फारसं आधी कुणाचं लक्षं गेलं नव्हतं पण खुद्द पद्मिनीनं आरडाओरडा केला की मी असा काही सिन दिलाच नाही वगैरे वगैरे, तेव्हा अनेकांनी ते पोस्टर पाहिलं. अर्थात तरी सुद्धा 'गहराई'चं व्हायचं तेच झालं. चित्रपट पडला. पडणारच तो होता म्हणा...

खरं तर एरवी, विशेषतः हिन्दी चित्रपटात एवढं अंगप्रदर्शन ज्या पद्धतीनं दाखवलेलं असतं ते पाहता वाटायला लागतं एवढे तरी कपडे कशाला घातलेत कुणास ठाऊक! तरी पण एकूणच हिन्दी सिनेमाबाबत नागडेपणाचं कौतुक होतं खरं... मागे श्रीराम गोजमगुंडेचा 'झटपट करू दे खटपट' हा चित्रपट आला होता (बहुधा). सरल येवलेकरची आंघोळ त्यात होती... ते कमी की काय, आचरट गाण्यांची त्यात भर होती. अर्थात् हे पोस्टरवर अलंच. तरीपण चित्रपट पडायचा तो पडलाच. इतका की त्या पडण्याचा देखील आवाज आला नाही!

'सत्यं शिवम सुंदरम'चं तरी काय वेगळं होतं?

ह्या सगळ्या प्रकारामुळे खऱ्या पोस्टर आर्टिस्टकडे मात्र दुर्लक्ष होतं त्याला काय करणार?

***किंमत काय?***

एक काळ होता बाबुराव पेंटर, एस्.एम्. पंडित एवढंच कशाला एम.एफ. हुसेननं केलेली सिनेमाची पोस्टर्स म्हणजे पेंटिंग्जच होती. पण त्याचं काय झालं? थिएटरवरनं चित्रपट उतरला की पोस्टरची किंमत शून्य.

जी. कांबळेंचंच उदाहरण घ्या. मोगले आझमची भव्यदिव्य पोस्टर करणारा हा कलावंत. शांतारामबापूंच्या

चित्रपटांची पोस्टर्स करण्याकरता त्यांना खास आमंत्रण असे. ही पोस्टर्स पाहायला गर्दी व्हायची.

पण एकदा जी. कांबळे स्टुडिओत गेले तो त्यांच्या पोस्टरनं कॅमेरा झाकून ठेवला होता!

तेव्हापासून जी. कांबळे यांनी पोस्टर्स करणं सोडलं!

पण असं सगळ्या आर्टिस्टना थोडंच जमतं. बिचारे स्वीकार करतात बळजबरीनं...

### *'माझा मुलगा'चा जनक*

पण एका वेगळ्या प्रकारानं पोस्टरकडे लक्ष वेधलं ते प्रसिद्ध लेखक य.गो. जोशी यांनी. प्रभातच्या 'माझा मुलगा' चित्रपटाची कथा य.गो. जोशी यांची होती. त्यात शांता हुबळीकर, शाहू मोडक असे नामवंत कलावंत होते. पण य.गो. जोशी आणि निर्माता व्ही. शांताराम यांचं काहीतरी बिनसलं आणि त्यांनी चित्रपटाच्या श्रेयनामावलीत, पोस्टरवर य.गो. जोशींचं नावच ठेवलं नाही. अर्थात् कुणालाही राग येईल तसा य.गो. जोशांना आला. तेव्हा त्यांनी काय केलं?

पुण्यात प्रभात टॉकीजला 'माझा मुलगा' लागला होता. त्याच्या समोरच य.गो. जोशींनी स्वतःचा कटआऊट लावला जो 'माझा मुलगा'च्या पोस्टरकडे अंगुलीनिर्देश करत होता आणि तिथे लिहिलेलं होतं, 'ह्या चित्रपटाचा लेखक मी – य.गो. जोशी आहे.'

नाहीतरी एरवी चित्रपटाच्या लेखकाचं स्थान दुय्यमच असतं म्हणा. नाव दिलं तरी पुष्कळ झालं. ह्यालाच समाधान मानणारे असतात. अर्थात् ते करणार तरी काय?

तोंड दाबून बुक्क्यांचाच मार असतो हा!

### *तेवढंच राहिलंय*

राजेंद्रसिंग बेदीची एक गोष्ट सांगतात.

एरवी राजेंद्रसिंग हा हिन्दीमधील अग्रगण्य कथाकार – कादंबरीकार. तो चित्रपटात कथा-पटकथा-संवाद लिहिण्यासाठी आला आणि थोडा रमला देखील. पण एकदा तो काही एकायलाच तयार नव्हता. एरवी बेदी म्हटलं की तडजोड करायला तत्पर म्हणून त्याची ख्याती होती. असा बेदी खाली वाकून चप्पल काढायच्याच बेतात आहे ह्याचंच सगळ्यांना आश्चर्य वाटलं.

प्रोड्युसरनं विचारलं देखील, ''बेदीजी, इतना गुस्सा क्यूं करते हो. ऐसा पहले तो आपने कभी नही किया...''

तेव्हा बेदी म्हणाला, ''XXX माझ्या स्क्रिप्टमध्ये इतकी कापाकापी केली आहे की आता सहन करण्याच्या पलीकडे आहे हे सगळं...''

''पण एवढं असं काय झालं?'' प्रोड्युसरला कळेना.

''अहो, सिनेमाचं मी ठेवलेलं नाव तेवढं राहिलं आहे... ते सुद्धा XXX कापण्यात गेलं तर काय करायचं?...''

असाच कमीजास्त अनुभव यच्चयावत हिन्दी चित्रपट लेखकांचा सांगता येईल.




### *एकमेव अपवाद*

याला जबरदस्त असा अपवाद एकच –

ज्याचं स्क्रिप्ट लेदर बाऊंड केलेलं असे. भारतीय राज्यघटना जशी बदलता येत नाही तसं हे स्क्रिप्ट आहे. बदलायचा अधिकार दुसऱ्या कुणालाही नाही असा दम त्यात लिहिलेला आहे. एवढी वट, एवढा दबदबा त्यांनी निर्माण केला हे मात्र मानलंच पाहिजे.

त्याचाच परिणाम म्हणजे एके दिवशी बान्द्रा पुलाच्या वर मोठं होर्डिंग होतं. त्यावर लिहिलेलं होतं–

कमिंग – सलिम-जावेदस् – दिवार!

ह्या पूर्वी अशा जाहिराती निर्मात्यांच्या नावावर असत. नौशादसारख्या संगीतकाराबाबत होती. पण फक्त लेखकाच्या

नावावर चित्रपटाची घोषणा असलेलं 'दिवार'चं पोस्टर पहिलं आणि शेवटचं...

### *वाक्‌प्रचार मिळाला*

अर्थात् जाहिरात ही नेहमीच बढ-चढाके असणार. पण कधी कधी अतिरेक होतो. अशा अतिरेकानं मराठीला एक वाक्‌प्रचार मिळाला हे ठाऊक आहे काय?

ह्या वर्षी सुशीलाराणी पटेल ह्यांचं निधन झालं तेव्हा त्यांची माहिती देताना म्हटलं होतं की त्यांनी 'द्रौपदी' चित्रपटात द्रौपदीची भूमिका केली होती वगैरे.

हा चित्रपट 'फिल्म इंडिया' ह्या मासिकाचे जबरे संपादक बाबुराव पटेल यांनी आपल्या (दुसऱ्या) पत्नीकरता म्हणजे सुशीलाराणी पटेल यांच्याकरता निर्माण केला होता. बाबुरावांनी निर्माण केलेला हा पहिलाच चित्रपट. त्यामुळे त्याचा गवगवा होणं साहजिक होतं. चित्रपट प्रदर्शित व्हायच्या आधीच न.चिं. केळकर, एम.आर. जयकर, यांच्यासारख्या जाणकार, प्रतिष्ठित लोकांच्या प्रतिक्रिया 'उत्तम', 'सुंदर अभिनय' ह्या थाटात छापून आल्या. मात्र प्रत्यक्षात चित्रपट प्रदर्शित झाला आणि सर्वसामान्य प्रेक्षकांनी त्याकडे पाठ फिरवली, कारण चित्रपटात दमच नव्हता!

मग न.चिं. केळकर, एम.आर. जयकर यांच्यासारख्यांच्या अभिप्रायाचं काय?

हे सगळं कथाकार य.गो. जोशी पाहत होते. सिनेमावाल्यांवरचा राग ('माझा मुलगा'चा अनुभव) अजून गेलेला नव्हता. त्यांनी झाल्या प्रकरणावर कथाच लिहिली – 'विद्वान भाड्याने मिळतात.'

तेव्हापासून हा वाक्‌प्रचार रूढ झाला तो झालाच.

### *पोस्टरमागे दडलंय काय?*

एखाद्या पोस्टरमागे काय काय हकीगत दडली असेल हे सांगणं कठीण. पब्लिसिटी डिझायनर श्रीकांत धोंगडे यांची हकीगत पाहण्यासारखी आहे –

पोस्टर्स करणे हा धोंगडे यांचा व्यवसाय असल्यामुळे सातत्यानं ते पोस्टर्स करत असतात. त्यानिमित्तानं नव्या-जुन्या कलावंत मंडळींशी त्यांची ओळखपाळख होत असतेच. असाच एक कलावंत त्यांच्या मनात भरला. त्याच्या पहिल्या पोस्टरपासून त्यांनी त्याची पाठराखण केली होती. तेव्हा अरविंद सामंत 'सावित्री' नावाचा चित्रपट करत होते. त्याची पब्लिसिटी डिझाइन्स श्रीकांत धोंगडेच करत होते. ती 'ओके' करण्यासाठी सामंत ऑफिसात आले असता धोंगडे यांनी त्यांना पेढे दिले.

सामंत म्हणाले, 'कसला पेढा?'

तेव्हा श्रीकांत धोंगडे म्हणाले, ''मी ज्याच्या पहिल्या पोस्टरचं काम केलं आहे त्या माझ्या आर्टिस्टनं आज पहिला हिन्दी सिनेमा साईन केला आहे.'' आता सिनेमा साईन कुणी केला आणि पेढे धोंगडे वाटत होते. त्याला आश्चर्य वाटलं. तेव्हा धोंगडे गमतीनं म्हणाले, ''उद्या हा आमचा आर्टिस्ट अमिताभ बच्चन झाला तर सांगता येईल की तो माझा मित्र आहे.''

तेव्हा तो आर्टिस्ट फक्त हसला. जणू स्वतःशीच.

पुढे काही वर्षांनी 'कोहराम' चित्रपट आला. त्याची पोस्टर्स सगळीकडे झळकली आणि श्रीकांत धोंगडेचं म्हणणं सत्यात उतरलं होतं –

'कोहराम'च्या पोस्टरवर अमिताभचा जेवढा चेहरा होता तेवढाच त्या आर्टिस्टचापण होता!

आता तुमच्या लक्षात आलं असेल पोस्टरवरील लहानमोठ्या चेहऱ्यामागे देखील गणित असतं तर...

आता 'कोहराम'मध्ये अमिताभच्या बरोबरच असलेल्या कलावंताचं नाव तुम्ही ओळखलं असेलच – तो म्हणजे नाना पाटेकर!

### *जमाने के साथ*

जाता जाता ह्या श्रीकांत धोंगडेना एका पोस्टरनं आयुष्यभराचा धडा शिकवला. तो अनुभव उद्‌बोधक आहे म्हणून सांगायलाच हवा. नवं तंत्रज्ञान सगळीकडेच आलं तसं डिझायनिंग क्षेत्रात देखील आलं. पण बऱ्याच आर्टिस्टना स्वतःच्या हातातील कला आणि डोक्यातील कल्पना ह्याची बरोबरी नवं तंत्रज्ञान काय करू शकेल असं वाटत होतं. पण तो भ्रम होता. हे पटायला श्रीकांत धोंगडे यांना धक्का खायला लागला. सुभाष घईंच्या 'त्रिमूर्ती' चित्रपटाचं डिझाइन त्यांच्याकडे होतं. नेहमीप्रमाणे तयार करून ते त्यांनी प्रिंटिंगला पाठवलं. तोच घईच्या मॅनजरनं त्यांना भेटायला बोलावलं. धोंगडेना वाटलं डिझायन्समध्ये काही फेरफार करायचे असतील त्यासंबंधात ही भेट असणार.

श्रीकांत धोंगडे भेटले तर मॅनेजरनं त्यांच्या हातात संपूर्ण कामाचा चेक ठेवला.

एरवी चित्रपट प्रदर्शित झाल्यावर पैसे देण्याचा प्रघात होता.

इथे तर डिझाइन प्रिंटिंगला जाण्याच्या आधीच पैसे? हे अघटितच होतं.

‘‘गुप्ताजी, ये क्या? मैने तो आपसे पैसा माँगा नही.’’ धोंगडे.

तेव्हा गुप्ताजी दुःखी होत म्हणाले, ‘‘श्रीकांतजी, आपके सारे डिझाइन्स कॅन्सल हुए है। सुभाषजी इस फिल्म के सारे डिझाइन्स कम्प्युटरपर बनाना चाहते है। और आगे सारे फिल्मों के डिझाइन्स कम्प्युटरपर बनेंगे। जमाने के साथ जाना पडता है।’’

मग प्रत्येकाला कम्प्युटरवर केलेलंच डिझाइन लागायला लागलं.

पण श्रीकांत धोंगडेंकडे तर कम्प्युटर नव्हता. भाड्यानं मिळायची सोय होती. पण ती जशी परवडणारी नव्हती. तसंच निर्मात्यांना तिथे येणं आवडणारं नव्हतं...




शेवटी एकदा ‘आर्मी’ चित्रपटाचं काम धोंगडे करत असताना त्याचे एक निर्माते नितीन मनमोहन हे श्रीकांत धोंगडेंना म्हणाले, ‘‘श्रीकांत, तुम्हे काम देकर मै फस गया हूँ। अगले पिक्चर के लिए अगर तुम्हारे पास अपना कम्प्युटर ना हो तो मैं किसी और को काम दूँगा।’’

‘आर्मी’चं काम जुन्या पद्धतीनं झालं. त्यांचा पुढचा चित्रपट ‘पृथ्वी’ सुरू झाला.

धोंगडेंना वाटलं की निर्माते यावेळी सांभाळून घेतली. पण त्यांनी हे काम दुसऱ्याला दिलं, कारण त्यांच्याकडे कम्प्युटर आलेला नव्हता!

आता धोंगडेंपुढे दोनच पर्याय होते. एक तर धंदा बंद किंवा कम्प्युटर घेणं.

धोंगडेंनी दुसरा पर्याय स्विकारला.

***गॅरेन्टी***

पण व्यवहारात हे कसं शक्य होतं? दहा लाखांची एकदम गुंतवणूक त्यांना शक्य नव्हती. जेवढी म्हणून शक्यता होती ते सगळे प्रयत्न करून झाले पण हाती काही लागत नव्हतं... एके दिवशी ते वरळी नाक्यावरून जात होते तेथे ‘दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे’चं प्रचंड पोस्टर-होर्डिंग लावलं जात होतं. कम्प्युटरवर तयार होऊन लागत असलेलं हे पहिलं होर्डिंग. ते पाहिलं आणि धोंगडेंना पटलं की आता काही झालं तरी कम्प्युटर हवाच...

पण हे कसं शक्य व्हावं? सगळे प्रयत्न वाया जात होते.

एके दिवशी आकस्मिकपणे त्यांच्याकडे त्यांचा मित्र प्रमोद धुरत सहज भेटायला आले.

श्रीकांत धोंगडे विवंचनेतच.

‘‘काय रे टेन्शनमध्ये दिसतोस?’’ इति धुरत.

श्रीकांतनी सगळी रडकहाणी सांगितली.

‘‘उद्या मी बँकेत येतो. मी मॅनेजरशी बोलतो.’’ प्रमोद धुरत

ठरल्याप्रमाणे बँक मॅनेजरबरोबर बैठक ठरली.

‘‘काय प्रॉब्लेम आहे कुलकर्णीसाहेब? ह्यांना लोन का मिळत नाही?’’ प्रमोदनं थेट मुद्यालाच हात घातला.

‘‘पेपर्स सर्व तयार आहेत पण गॅरेन्टर नाही.’’ इति कुलकर्णीसाहेब.

‘‘काय गॅरन्टी पाहिजे?’’

‘‘दहा लाखांचं कर्ज आहे. त्या प्रमाणात कॅलक्युलेट करतो.’’

प्रमोदनं बॅग उघडली. पेपर्स काढले आणि मॅनेजरपुढे ठेवले.

‘‘ही माझी शिवाजी मंदिरसमोरील जागा. आज एक करोड रुपये किमतीची आहे. तुमच्याकडे गहाण ठेवतो.’’

श्रीकांत धोंगडेंचा प्रश्न त्याक्षणी सुटला!

आज श्रीकांत धोंगडे पब्लिसिटी डिझायनिंग क्षेत्रात जानंमानं नाव आहे. मात्र ते म्हणतात, ‘‘त्या वेळेस प्रमोद माझ्या मदतीला आला नसता तर श्रीकांत धोंगडे हे नाव काळाच्या ओघात लुप्त झालं असतं...’’

तर एखादी जाहिरात असाही धडा देत असते.

तात्पर्य काय, जाहिरातीमुळे काय घडू शकतं ते हे असं. तरीसुद्धां पुन्हा आपण म्हणू या ‘अरे बाबा जाहिरात!...’

**रविप्रकाश कुलकर्णी**
३, स्वप्नसाकार,
ध.ना.चौधरी हायस्कूलजवळ,
डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१
भ्रमणध्वनी : ९२२४८७२८७०

# सांस्कृतिक प्रमुख

प्रा. प्रतिभा सराफ

''**सांस्कृतिक** प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!''

रेखा हसत हसत म्हणाली.

मी चष्मा नाकावर सरकवला आणि तिच्याकडे डोळे उचलून पाहिलं. ती अजूनही तोंडभरून हसतच होती. तिच्या चेहऱ्यावरून मला जाणवल की ती मनापासून कौतुक करतीय. असो. माझ्यासाठी ती वाईट बातमी होती. मी हातातलं वर्तमानपत्र नीट घडी करून टेबलावर ठेवलं आणि स्टाफरूमच्या बाहेर पडले. विचारांच्या तंद्रीत प्राचार्यांच्या रूमपर्यंत पोचले. डॉ. शिल्पा काचरेकर ह्या दारावरील पाटीकडे पाहत उभे राहिले. इतक्यात शिपाई रामपाल जवळ आला. म्हणाला,

''मॅडम, तुम्हाला आता जायचंय का?''

'' हो ना, म्हणून तर आले.''

''तुम्ही आत जाऊ शकता, तो आत बसलेला माणूस, एका विद्यार्थ्याचा पालक आहे.''

काचेतून मला दिसत होतं की मॅडम खूपच भडकलेल्या आहेत. त्या हातवारे करत बोलताहेत. अशा वेळेस न जाणं जास्त योग्य होईल ह्या विचारानं परत फिरले. पण दोन पावलं टाकल्यानंतर लक्षात आलं की परत यावंच लागेल, मग आजचं मरण उद्यावर का ढकलायचं? दुपकन् फिरले. दार ढकललं नि तडक मॅडमसमोर उभी राहिले. त्या माणसाशी बोलताबोलता काचरेकर मॅडमनी हातानंच खुर्चीवर बसा अशी खूण केली. मी बसले. बराच वेळ, त्या पालकाशी त्या बोलत राहिल्या. तो फक्त ऐकत होता आणि आता त्याच्या सोबतीनं मीही ऐकत होते. बोलूनबोलून त्या दमल्या. त्यांनी टेबलावर ठेवलेल्या पाण्याच्या गाल्साचं झाकण बाजूला केलं. घटाघटा संपूर्ण ग्लास पाणी सपवलं. त्याच्याकडे रागारागानं बघत एक पॉझ घेतला. मग त्याला म्हणाल्या,

''बोला, आता...''

''मी शंभर वेळा, माझ्या मुलाच्या वतीनं सॉरी म्हणू शकतो, यापलीकडे माझ्याकडे बोलण्यासारखं खरंच काही नाही. '' तो पालक नम्रपणे म्हणाला.

टेबलावरच्या मोबाईलशी चाळा करत मॅडम म्हणाल्या,

''ठीक आहे, जा तुम्ही. मुलाला सांगा, परत असं घडता कामा नये.''

ते उठून निघून गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत त्या स्तब्ध झाल्या. मला काही प्रकरणाचा अंदाज आला नाही. अशा वेळेस नेमकं काय करायचं असा मनाशी विचार करत मी त्यांच्या चेहऱ्याकडे एकटक पाहत राहिले.

''हं, बोला...''

त्या स्वतःला एका प्रकरणातून स्विच ऑफ करत दुसऱ्या प्रकरणाकडे वळत म्हणाल्या.

''मी बी.एड. केलं, तेव्हा मला आपण खूप लो ग्रेडेड काम करतोय, असं वाटायचं. पण त्या काळात शिकलेल्या काही गोष्टी इतक्या महत्त्वाच्या असतील, असं कधी वाटलं नव्हतं.'' मी म्हणाले.

''म्हणजे काय?'' त्यांनी आश्चर्यानी विचारलं.

''म्हणजे असं, की प्राचार्य म्हणून एका व्यक्तीला किती जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तो एक शिक्षक असतोच, पण विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, मॅनेजमेंटचा पदाधिकारी, स्थानिक राजकारणी, जाहिरातदार, सर्व कर्मचाऱ्यांच्या संदर्भात येणारं ऑफिशियल काम, सर्व प्रकारचे कार्यक्रम, व्हिजिटिंग पाहुणे, बातमीदार, आणि ... न संपणारी ही यादी आहे. त्यांच्याशी बोलावं लागतं. त्यांना समजून घ्यावं लागतं. शिवाय कधी त्यांचा रोषही सहन करावा लागतो. सतत मानेवर टांगती तलवार शिवाय...''

खूप बोलल्यामुळे मला दम लागला. मी थांबले. तर त्या पटकन् म्हणाल्या,

''शिवाय...''

''शिवाय प्रत्येक कागदावर शेवटची, अतिमहत्त्वाची सही प्राचार्यांचीच. त्यामुळे प्रत्येक गोष्टीला जबाबदार शेवटी प्राचार्यच! हे जेव्हा मी बी.एड. मध्ये शिकले तेव्हा माझ्या मनात प्राचार्य ह्या पदाबद्दल अत्यंत आदर निर्माण झाला.''

हे बोलताना मी मॅडमच्या चेहऱ्यावरचे बदणारे भाव टिपत होते. त्या अधिकाधिक आनंदीत होत होत्या.

''तुम्ही असा विचार करता, याचा मनापासून आनंद झाला. बोला... कोणत्या कामासाठी आलात?''

खरंच बोलावं का, असा विचार करत मी म्हटलं,

''माझं काम होतं...''


''बोला ना...''

''मला तुम्ही कल्चरल इन्चार्ज केलंत तर ते काम मला नको आहे. पण... दुसऱ्या कोणत्याही कमिटीचं काम दिलंत तर ते मी आनंदानं करीन.''

''भावे मॅडम... तुम्ही स्वतःच विचार करा की हे काम तुमच्याशिवाय कोणी उत्तमप्रकारे करू शकेल का?''

॥ग्रंथाली॥✲॥


डॉ. अनंत लाभसेटवार यांची दोन पुस्तके



झोके अमेरिकेतले

अमेरिकन माणसाच्या जगण्यातलं वास्तव आणि अमेरिकेचं खरं रूप उलगडणारं पुस्तक.

मूळ किंमत २५० रु.
सवलतीत १५० रु.



अमेरिकेच्या दुर्बिणीतून भारत

परदेशी दुर्बिणीतून पाहिलेल्या भारताचं चित्र विशद करणारं पुस्तक.

मूळ किंमत २०० रु.
सवलतीत १२० रु.

''........'' मी गप्पा.

''बघा, तुम्ही कलाकार आहेत. नाटकांमध्ये तुम्ही काम केलं आहे. भरतनाट्यम् शिकला आहात. शिवाय मराठी हा विषय शिकवता, पण इंग्रजी आणि हिन्दीवरही तुमचं चांगलं प्रभुत्व आहे. म्हणून एक योग्य व्यक्ती या नात्यानं तुम्हाला ही जबाबदारी दिली आहे. ह्या कामाचं तुम्ही सोनं कराल. हवं तर तुमच्या कमिटीत मी दहा जणांना देते मदतीला.''

मी त्यांच्याकडे पाहिलं. तसं माझ्याकडेही हे काम नाकारण्याचं कोणतंही ठोस कारण नव्हतंच. मी फक्त मान डोलावली.

''कार्यक्रमाच्या संदर्भात वेगळे पायंडे पाडा. मी पूर्ण सहकार्य करीन. शिवाय हवा तितका निधीही उपलब्ध करून देईन, मग तर झालं?''

मी हसत मान डोलावली. उठले, जायला निघाले, तेव्हा त्या म्हणाल्या,

''भावे मॅडम, माझ्यावर तुमचा खूप विश्वास आहे म्हणूनच सर्वांत महत्त्वाच्या कमिटीचं काम तुम्हाला दिलंय.''

या वाक्यावरही मी काहीच न बोलता फक्त मान डोलावून होकार दर्शवला.

त्या रूमबाहेर पडल्यावर, 'आलिया भोगासी' हे मनात घोळवत स्टाफरूममध्ये शिरले. कोणाशीच न बोलता मी वर्तमानपत्र उघडलं. त्यातली काळी अक्षरं, न समजण्याइतकी एकमेकांत मिसळत होती. शांतपणानं कोरा कागद घेतला नि नोटिस लिहीली –

''Tomorrow, there will be meeting of Cultural Committee...''

शिपायाला ती नोटीस बोर्डावर लावायला दिली.

खूप उत्साहात दहा जणांच्या सूचना स्वीकारत वर्षभर कोणते कार्यक्रम करायचे याची यादी केली. चहा-फराळावर ताव मारत सगळे बोलत होते आणि मी ते कागदावर उतरवून घेत होते. मी कोणतंच मत मांडलं नाही. सगळे निघून गेल्यावर तो कागद फायलीत लावला. इतक्यात इंटरकॉमवर फोन आला.

''तू यावेळेस, या ठिकाणी कशी काय मीटिंग घेऊ शकतेस?''

सुपरवायझरचा आवाज चढलेला. तिला समजावून सांगणं कठीण, कारण समजून घेण्याची वृत्तीच नव्हती. मग तिचा दुसरा प्रश्न

# 'ग्रंथाली' सवलत योजना ग्रंथसंच

॥ग्रंथाली॥✲॥

स.न.वि.वि.

खेडोपाडी ग्रंथयात्रा आखून महाराष्ट्रात वाचनसंस्कृती रुजवणाऱ्या 'ग्रंथाली'ने चाळिसाव्या वर्षात पदार्पण केले आहे. विविधांगी विषयांची सातशेहून अधिक आशयघन पुस्तके प्रसिद्ध करून, 'ग्रंथाली'ने ती अधिकाधिक सवलतीत उपलब्ध केली. शाळा, महाविद्यालये, विक्रेते, संस्था, वाचनालये यांनी संग्रही ठेवावी अशा पुस्तकांचे दोन संच सोबत दिले आहेत. यात गेल्या अनेक वर्षांपासून समाजमनावर प्रभाव टाकलेली पुस्तके आहेत, तसेच नवे खंडात्मक, दस्तावेज ठरावेत असे ग्रंथही आहेत. अवश्य लाभ घ्यावा.

कळावे.

**सुदेश हिंगलासपूरकर**

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग,
माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com,
granthali02@gmail.com
www.granthali.com
**वेळ : सकाळी ११ ते ६**

सोबतच्या यादीतील पुस्तके सुटी हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील. अधिक टपालखर्च
चेक/डी.डी./म.ऑ.
'ग्रंथाली' नावे पाठवावे.

## संच क्रमांक १
## २०० पुस्तके
**संचाची मूळ किंमत २८५७५ रु.**
**सवलतीत किंमत १४००० रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.

२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.

३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.

४. **प्रवर्तन**
संदीप जावळे ● १२० रु.

५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.

६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.

७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.

८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.

९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.

१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.

११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.

१२. **मी हिंदू झालो!**
डॉ.. रविन थत्ते ● १०० रु.

१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.

१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.

१५. **नेगल -(भाग २) हेमलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.

१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.

१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.

१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.

१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.

२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.

२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.

२२. **माझ्या वकिलीची पन्नाशी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.

२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.

२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.

२५. **चिं.त्र्यं. खानोलकर** (ललित चरित्र)
दीपक घारे ● १८० रु.

२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.

२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.

२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.

२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.

३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.

३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.

३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.

३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.

३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.

३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे,
अनु. मोहिनी दातार ● १०० रु.

३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.

३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.

३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.

३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी,
अमरेंद्र धनेश्वर ● १२५ रु.

४०. **विकासाची रूपरेषा– परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.

४१. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.

४२. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.

४३. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर,
गजानन सबनीस ● २५० रु.

४४. **कोहम् धाबा**
अनुवाद संजीव दहिवदकर ● १०० रु.

४५. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.

४६. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.

४७. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.

४८. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.

४९. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.

५०. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.

५१. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.

५२. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.

५३. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.

५४. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.

५५. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.

५६. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.

५७. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.

५८. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.

५९. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.

६०. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.

६१. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.

६२. **अंगणातलं आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.

६३. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.

६४. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.

६५. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.

६६. **आमचा बाप आन् आम्ही** (१६१ आवृत्ती)
डॉ. नरेंद्र जाधव ● १२० रु.

६७. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.

६८. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.

६९. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.

७०. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.

७१. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.

७२. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.

७३. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.

७४. **जगायचंय... प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.

७५. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.

७६. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.

७७. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.

७८. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.





७९. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.


८०. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.


८१. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.

८२. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.

८३. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.

















८४. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.

८५. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.

८६. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.

८७. **एका उन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.

८८. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.

८९. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेश्वर मुळे ● १२५ रु.

९०. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.

९१. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.

९२. **चॅनेल : डी-स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.

९३. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.

९४. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.

९५. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.

९६. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.

९७. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.

९८. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.

९९. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.

१००. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.

१०१. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.

१०२. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.

१०३. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.

१०४. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.

१०५. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.

१०६. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.

१०७. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.

१०८. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.

१०९. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.

११०. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.

१११. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.

११२. **उर्मिला**
डॉ. वसंत व्हाडपांडे ● १०० रु.

११३. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.

११४. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद-इब्राहीम अफगाण ● २०० रु.

११५. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.

११६. **निशाणी : डावा अंगठा**
रमेश इंगळे-उत्रादकर ● ३०० रु.

११७. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.

११८. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.

११९. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.

१२०. **मोरपिसं**
अनुराधा गानू ● १६० रु.

१२१. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.

१२२. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.

१२३. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.

१२४. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.

१२५. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल ● २५० रु.

१२६. **महारूद्र**
(आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.

१२७. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.

१२८. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.

१२९. **विज्ञानशिक्षण नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.

१३०. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.

१३१. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.

१३२. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.

१३३. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.

१३४. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.

१३५. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले ● १२० रु.

१३६. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.

१३७. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.

१३८. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.

१३९. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.

१४०. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.

१४१. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.

१४२. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.

१४३. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.

१४४. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.

१४५. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.

१४६. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भंडारे ● ३५० रु.

१४७. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.

१४८. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.

१४९. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.

१५०. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.

१५१. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.

१५२. **आठवणींतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.

१५३. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.

१५४. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.

१५५. **येणे बोधे आम्हा...**
यशवंत पाठक ● २०० रु.

१५६. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.

१५७. **देवांसि जीवे मारिले**
लक्ष्मण लोंढे
चिंतामणी देशमुख ● २०० रु.

१५८. **शांताराम : व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.

१५९. **टिळक ते गांधी मार्गे खाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१६०. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर, आ.रा. मराठे ● ४५रु.

१६१. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.

१६२. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.

१६३. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.

१६४. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.

१६५. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.

१६६. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.

१६७. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.

१६८. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.

१६९. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.

१७०. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे ● ४५ रु.

१७१. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.

१७२. **एक आटपाट लोकमान्यनगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.

१७३. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.

१७४. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.

१७५. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.

१७६. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी ● ५० रु.

१७७. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी म्हाडेश्वर ● ५० रु.

१७८. **पुस मॉथ ते डॅश-400**
रत्नाकर महाजन ● ५० रु.

१७९. **एड्स - कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.

१८०. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.

१८१. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.

१८२. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.

१८३. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.

१८४. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.

१८५. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.

१८६. **नाटळ**
मनोहर सावंत ● ५० रु.

१८७. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.

१८८. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.

१८९. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.

१९०. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधर ● ५० रु.

१९१. **वृद्धत्व : देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.

१९२. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.

१९३. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.

१९४. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.

१९५. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.

१९६. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.



१९७. **गुणवान मुलांचं संगोपन**
अरुणा भिडे ● ५० रु.

## मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके

१९८. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.

१९९. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.

२००. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.



''तुम्ही कॅण्टीनमधून स्नॅक्स मागवले?''

मग कॅण्टीनमधूनच मागवणार ना? जवळपास हॉटेल कुठे आहे?

''मला हे म्हणायचंय की त्याचे पैसे कॉलेज देणार नाही?''

''मी मागितलेच कुठे? मी स्वतःच पे केले.''

यावर त्यांच्याकडे बोलण्यासारखं काहीच उरलं नाही. त्यामुळे त्यांनी फोन खाली आपटला.

ही सुरुवात होती. वर्ष कसं जाणार याचा अंदाज आला.

साधा उद्‍घाटनाचा कार्यक्रम करण्यासाठी जूनपासून प्रयत्न करत होते तर सप्टेंबर महिना उगवला. प्राचार्यांनी मलाच जबाबदार धरलं. मी कारण सांगायचा प्रयत्न केला तर त्या ऐकूनही घ्यायला तयार होईनात. शेवटी कसातरी कार्यक्रमाचा दिवस उगवला.

''तासाभरात संपवा.'' प्राचार्य

''मी विद्यार्थी देऊ शकत नाही.'' सुपरवायझर

''मी उद्या रजेवर आहे.'' रेखा

''मी उद्या उशिरा येणार आहे.'' संकेत

''मी व्यासपीठावर चढणार नाही.'' राऊतसर

''मीच का डिसिप्लीन सांभाळायची?'' जॉनसर

''माझी गाडी गॅरेजमध्ये आहे त्यामुळे मी पाहुण्यांना आणायला जाऊ शकत नाही.'' रॉयसर

या पार्श्वभूमीवर उद्‍घाटनाचा सोहळा पार पडला. त्या पाहुण्यापेक्षा प्राचार्यच जास्त बोलल्या. हे अप्रत्यक्षपणे आर्टिस्ट भावेश शर्मा आपल्या भाषणात म्हणाले. त्यानंतर मला बोलावून ''कशा पाहुण्यांना तुम्ही घेऊन येता?'' असा सवाल प्राचार्यांनी केला. दिवस जात होते आणि अस्वस्थता वाढत होती.

''टॅलेन्ट हंट हा कार्यक्रम करूया.'' रेखा

''टॅलेन्ट हंटमुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जातो.'' प्राचार्य

''तू इन्चार्ज आहेस, तुला कळायला हवं की टॅलेन्ट हंट घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना इंटर कॉलेजिएटला कसं पाठवता येईल?'' सुपरवायझर

''मॅडम, टॅलेन्ट हंट केव्हा आहे?'' विद्यार्थी माझ्या मनाचा सी-सॉ. कधी 'हो' कधी 'नाही' म्हणत वेळकाढूपणा केला.

''तुम्ही विद्यार्थ्यांना घेऊन इंटर कॉलेजिएट कॉंपिटिशनसाठी रहेजा कॉलेजमध्ये जा.'' मी राऊतसरांना म्हटलं.

''मला जमणार नाही.'' राऊतसर म्हणाले,

''काय मोठं कर्तृत्व गाजवणार आहेत? कशाला पाठवायचं? नुसता वेळ वाया जातो.''

शेवटी त्या विद्यार्थ्यांना घेऊन मीच गेले. विद्यार्थ्यांना बक्षीस मिळालं नाही, हाही माझाच दोष आहे असं बोलताना मी ऐकलं. थोड्याफार फरकानं प्रत्येक इंटर कॉलेजिएट कॉंपिटिशनच्या वेळेस असंच घडत गेलं.

''इतके मोठे विद्यार्थी आहेत. दुनियाभरात भटकतात. कोणी सोबत कशाला जायला पाहिजे?''

हाच सूर संबंधित शिक्षक आळवत राहिले. पण सुमित मिश्राला गाण्याचं पहिलं बक्षीस मिळालं तेव्हा रेखा स्वतः त्या विद्यार्थ्याला घेऊन प्राचार्यांकडे गेली. जणू तिनंच गाणं शिकवून त्याची तयारी करून घेतली होती! मला ह्या मानसिकतेची गंमत वाटली. तसंही न केलेल्या कामाचं क्रेडिट घेण ही काही लोकांची जन्मजात सवय असते.

डिसेंबर महिना आला तसा विद्यार्थ्यांचा उत्साह वाढत होता. कमिटीच्या मीटिंगला दहापैकी कधी चार तर कधी दोन जण हजर असायचे. त्यांच्या विचारानंच कार्यक्रम ठरवले. त्या कार्यक्रमाच्या तारखा, वेळ वगैरे माहिती नोटीस बोर्डावर लावली. त्या भोवती झुंबड उडाली. विद्यार्थ्यांनी प्रॅक्टिस सुरू केली. गाण्याचे, तबला-पेटीचे आवाज ऐकू येऊ लागले. चार विद्यार्थी नाचत असतील तर त्यांना पाहायला चाळीस विद्यार्थी भोवती जमू लागले. वर्ग ओस पडू लागले. सुपरवायझरनं परत माझीच कानउघाडणी केली. 'किती हाकला हाकला फिरी येती पिकावर' या बहिणाबाईंच्या ओळीप्रमाणे विद्यार्थ्यांना किती हुसकून दिलं तरी ते तिथेच गर्दी करू लागले. वर्गात शिकवताना विद्यार्थ्यांना कंट्रोल करणं वेगळं आणि इथे वेगळं. कॅण्टिनवाला पोरगासुद्धा चहा दिल्यावर तिथेच थांबायचा. कोणी शिपाई काही निरोप घेऊन आला की तिथेच उभा राहायचा. कोणी शिक्षक काही विचारायला आला की तिथेच बसायचा. नाचणाऱ्या पोरांभोवतीची गर्दी वाढता वाढता वाढे, मी नेमकं कोणाला ओरडायचं, हा प्रश्न होता.

दहा दिवसांनंतर 'झपाटा कॉलेज वीक'च्या आधी ऑडिशन सुरू झाल्या. सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा माझा कॉलेजमध्येच मुक्काम होता. गाण्याची ऑडिशन होती. मला गाण्यातलं काही कळत नाही म्हणून एकदा पाच वाजता घरी गेले, तर फोन -


''तू अशी कशी घरी जाऊ शकतेस?''

‘‘मला गाण्यातलं कळत नाही आणि शिवाय माझ्या कमिटीतील लोक आहेत ना तिथे?’’

‘‘तू इन्चार्ज आहेस, तू घरी जाता कामा नये.’’ म्हणत सुपरवायझरनं फोन आपटला. कॉलेजचा फोन, म्हणून आपटायची एकही संधी ती वाया जाऊ देत नाही. घरात बसून चहा पिताना माझा मूड गेला. दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये रामायण! त्यानंतरच्या सर्व ऑडिशन माझ्या देखरेखीखाली संपन्न झाल्या. जे विद्यार्थी सिलेक्ट झाले नाहीत त्यांनी कटकट सुरू केली. काहींनी दुसरं नृत्य बसवू का, वगैरे विचारणा केली. मग त्यांचे कॉस्च्युम आम्ही ठरवले. या निवडलेल्या नृत्यांसाठी एक कोरिओग्राफर ठरवण्यात आला. त्याचं मानधन हा पुन्हा चर्चेचा मोठा विषय झाला. गाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाद्यवृंदाची व्यवस्था केली गेली. नरेशसरांना पोलिस स्टेशनला पाठवून रीतसर अर्ज वगैरे देऊन ह्या कार्यक्रमांची परवानगी घेतली. खाण्यापिण्याची रोज बिलं येत होती. कोणाला काही विचारायची सोय नव्हती. खरं तर कमिटीतील प्रत्येकजण कोणत्यातरी कार्यक्रमाची व्यवस्था सांभाळत होता, ही तितकीच मनाला समाधान देणारी गोष्ट होती. अशा कार्यक्रमासाठी कोणीतरी सिने-नाट्य-मालिका कलाकारच पाहुणा म्हणून प्राचार्यांना हवा होता. त्यांचे फोन नंबर मिळवणं, त्यांना फोन करणं ह्यात बराच वेळ खर्ची गेला. मानधनाचा आकडा ऐकल्यावर ‘आम्हाला त्या दिवशी वेळ नाही’, ‘इतक्या कमी मानधनात आम्ही येत नाही’, ‘कॉलेजमध्ये पाहुणा म्हणून आम्ही जात नाही’, ‘आम्हाला नक्की यायला आवडेल पण नेमक शूटिंग आहे’ वगैरे कारणं ऐकून पाठ झाली. सर्व शिक्षक रोज एक नवीन सेलिब्रिटी हवा म्हणून मला सांगू लागले. शेवटी निशांत पाटकर तयार झाला आणि मी निश्चिंत झाले. कोणी ‘तो खरंच येईल का?’पासून ‘तो येणारच नाही’ पर्यंत गोष्टी केल्या. इनडोअर इव्हेंटचं उद्‌घाटन प्राचार्यांच्या हस्ते झालं. भरमसाठ विद्यार्थ्यांनी नावं दिली होती त्यामुळे ढिगभर पोस्टर्स, ग्लास प्लेटस्, टी शर्टस्, रांगोळ्या वगैरे आणून ठेवलं. परंतु वेळेवर त्या दिवशी अनेकजण अनुपस्थित राहिले. याचा दोष परत मलाच दिला गेला. जणू त्यांच्या घरी जाऊन मी त्यांना ‘येऊ नका’ हे सांगून आले होते. स्पर्धेचं परीक्षक आम्हाला मुद्दामच बनवलपासून आम्हाला परीक्षक मुद्दामच बनवल नाहीपर्यंतच्या सर्व तक्रारी झाल्या. काही परीक्षक न सांगता गैरहजर राहिले. अनेक गोष्टी अनेक आघाड्यांवर मॅनेज करताना दमछाक झाली. प्राचार्यांची आठवण झाली. त्यांची दया आली.

स्टेज इव्हेंटला विद्यार्थ्यांनी खूप गर्दी केली. अगदी फॅशन शोपासून, नाचगाण्यांपर्यंत विद्यार्थ्यांनी आपल्याच मित्रमैत्रिणींना उत्तम साथ दिली. खाली सोफ्यावर बसलेले



**लेणी महाराष्ट्राची - डॉ. दाऊद दळवी**



भारतात बाराशे लेणी आहेत. त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत! इसवी सनाच्या आरंभकाळाच्या आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले, त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व त्यातील कातळ, लेणी खोदण्यास योग्य वाटले. त्यामधून एक नवा कलाविष्कार या भूमीत प्रकटला. नंतर हजार-बाराशे वर्षांपर्यंत बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध गुणदर्शी लेणी कोरली, याची महती सांगणारा दस्तावेज.

**मूल्य १२०० रुपये  सवलतीत ७५० रुपये**

**मंदिर-शिल्पे - डॉ. माया पाटील**




डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील विविध मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रुपये  सवलतीत १८० रु.**

शिक्षक मात्र ह्या नाचाला भाड्यानं ड्रेस आणायला हवे होते. तर ह्या गाण्याला कशाला खर्च करून भाड्यानं ड्रेस आणले, गरज नसताना, वगैरे कॉमेंट करत होते.

तीन तासांच्या कार्यक्रमासाठी स्टेजवर बत्तीस बाटल्या मिनरल वॉटर मागवण्यात आलं आणि पन्नास कप चहा अशी पावती कॅण्टिनवाल्यानं आणून दिली. मग स्टेजवरच्या शिक्षकांना याबद्दल विचारावं तर त्यांना ते अपमानजनक वाटेल आणि कॅण्टिनवाल्याला काही बोलावं तर तो दुखावेल या विचारानं त्याच्या पावतीवर नाइलाजास्तव सही केली. बोलावलेल्या पाहुण्यानं मात्र माझी कॉलर ताठ केली. तो भरभरून चांगलं बोलला. इतकं चांगलं बोलला की विद्यार्थ्यांनी स्वतः उभे राहून त्यांना स्टॅण्डिंग ओव्हेशन दिलं. त्यांच्या हातून पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थ्यांना स्वतःचा अभिमान वाटला. त्यानंतर विद्यार्थ्यांचे एक-दोन कार्यक्रम बघून जा असा मी त्यांना आग्रह केला, तर ते बसले. मीही त्यांच्या बाजूला बसले. पाहते तर काय व्यासपीठावर हातात माईक घेऊन वीरेंद्रसर गात होते. मला नवल वाटलं. मी काही कामासाठी बॅक स्टेजला गेले तर तिथे गाण्याच्या स्पर्धेत पहिला आलेला आशुतोष गात होता, म्हणजे वीरेंद्रसर नुसताच माईक हातात घेऊन ओठांची हालचाल करत होते! ही कसली हौस? शिक्षक असे वागतात? मी कोणाला काय बोलणार? इतक्यात राऊतसर माझ्याजवळ आले नि म्हणाले,

''बरं झालं आलात, आता शिक्षकांनी कॅट वॉक करायचंय. तुम्ही सर्वात पुढे असाल.''

मी कपाळावर हात मारून घेतला, म्हंटल, ''हे व्यासपीठ विद्यार्थ्यांसाठी आहे, आपल्यासाठी नाही.''

ह्या वाक्याचा त्यांना राग आला असणार कारण त्या दिवसापासून ते अजूनही माझ्याशी बोलत नाहीत. स्टेजवरून उतरताना मॅनेजमेंटच्या कार्तिकजींचा फोन आला,

''पाहुण्यांसाठी कोणतं स्वीट मागावलं आहे?''

''राधिकाला सांगितलं आहे.''

मी म्हटलं आणि राधिका तासाभरापूर्वीच 'नवऱ्याचा फोन आला मी जाते' सांगून गेल्याचं आठवलं.

पळापळ सुरू झाली. काहीतरी बंदोबस्त केला. मात्र निशांत पाटकर प्राचार्यांच्या रूममध्ये शिरताच, त्यांनी आपल्या बॅगेतून डबा काढला आणि म्हणाले, ''मी बाहेरचं काही खात नाही.''

आम्ही सर्व आवाक होऊन त्यांच्याकडे पाहत राहिलो. मग तिथे कॅलरी फूड, जिम, फिगर, मेडिटेशन, मेन्टेनिंग बॉडी वगैरेबद्दल चर्चा झाली. त्यांनी चहा घेतला याचा आम्हाला आनंद झाला. जाताना मानधनाच्या पाकिटाला हातही न लावता ते म्हणाले, ''कॉलेजच्या लायब्ररीसाठी पुस्तक आणा.'' मी त्यांना त्यांच्या गाडीपर्यंत पोचवायला गेले. तेव्हा रस्त्यात उभ्या असलेल्या शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत फोटो काढून घेतले. हौस भागवली. कार्यक्रम संपल्यावर स्टेजवरील सामान, उरलेले मेमेंटो, पितळी दिवे, देवीची मूर्ती उचलून जाग्यावर ठेवणं, चुकलेली सर्टिफिकेटं पुन्हा बनवणं वगैरेंमध्ये अजून तीन-चार तास गेले. तेव्हा सोबत दहामधले दोघंच होते.

पाच-सहा दिवसांनंतर पुन्हा इंटर कॉलेजिएट काँपिटिशनला विद्यार्थी पाठवणं, त्यांचे ड्रेस, येण्याजाण्याचा, खाण्यापिण्याचा खर्च वगैरेची बिलं बनवणं, दोन महिने चालूच राहिलं. अनेक बिलांमुळे फाईल भरली तरी कामं संपली नाहीत.

मॅगझिनसाठी कोणते फोटो घ्यायचे ह्याबद्दल खूप वाद झाला. प्रत्येकाची मतं इतकी वेगळी होती की मला कोणालाच न्याय देता आला नाही.

श्रमपरिहार म्हणून कमिटीमधल्या सगळ्यांनी मला पार्टी मागितली. माझ्या श्रमाचं काय, असा विचार मनात आला. तो तात्काळ झटकून मी तत्परतेनं पार्टी दिली. त्या पार्टीत मात्र सगळे वेळेवर हजर राहिले. कोणीही कोणतंही कारण दिलं नाही याबद्दल मी सर्वांचे आभार मानले.

आता ह्या वर्षाभराच्या कामाचा रिपोर्ट लिहावयास घेतला आहे. कोण्या शिक्षकाचं वा विद्यार्थ्याचं नाव विसरता कामा नये असं स्वतःस बजावलं आहे. खूप चांगलं लिहिताना, हातचं राखून ठेवावं लागतयं. हो, कोणाची तारीफ जास्त झाली तर दुसरा कोणीतरी खूप दुखावेल ही जाणीव आहेच आणि माझ्याबद्दल म्हणाल तर तेलही गेलं नि तूपही गेलं, हाती राहिलं धुपाटणं हीच स्थिती ते छापून आल्यावर माझी होणार आहे. कारण सांस्कृतिक प्रमुख म्हणून माझ्याच सहीची मोहोर खाली उमटलेली असणार आहे ना!

**– प्रा. प्रतिभा सराफ**
इ-१५०३, १५ वा मजला, रुणवाल सेंटर,
गोवंडी स्टेशन रोड, देवनार, मुंबई ४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८३३०५६७९५
pratibha.saraph@yahoo.co.in

# कवितेची पाने

## पोट्रेट ऑफ गालिब

बल्लीमाँराच्या वस्तीतील
त्या एकमेकांत घुसलेल्या चिंचोळ्या गल्ल्या
लाकडांच्या दुकानांसमोरील चौकातील बटेरांचे कशिदे
काही दरवाज्यांवर लोंबकळणारे जाड कापडाचे जीर्ण पडदे
आणि कातरवेळेच्या निस्तेज काळ्या सावल्या
भिंतीला बिलगून अशा रीतीनं चालतात इथे
चुडीवालान बाजाराच्या 'मोठ्या आई'सारखे
जी आपल्या विझू पाहणाऱ्या डोळ्यांनी दारं चाचपडते

याच निस्तेज काळोख्या 'कासिम-जान' गल्लीतून
दिव्यांची रोषणाई सुरू होते
आणि कुराण-कथनाचे सोनेरी पान उघडते
तिथेच 'असद उल्लाह खाँ गालिब'चा पत्ता मिळतो !

**मूळ कवी : गुलजार**
**अनुवाद : किशोर मेढे**
भ्रमणध्वनी ९६१९६८७९९९

## गझल

खास काही आपले मी बोललो आहे कुठे
मी तुझ्या लक्षात आता राहिलो आहे कुठे

हारली आहेस दुनिये हे खरे मानू कसे
पाहिजे आहे तसा मी जिंकलो आहे कुठे

वाट बघणारी किती आहेत माझी माणसे
मी तुझ्यासाठीच केवळ थांबलो आहे कुठे

नाद नाही सोडला अद्यापही माझा तिने
मी तिच्यासाठी पुराणा जाहलो आहे कुठे

नाइलाजाने तुझ्या दारावरी हा ठाकलो
पण दराऱ्याने तुझ्या मी वाकलो आहे कुठे

तू किती आहेस सुंदर हे कसे सांगू तुला
मी तुझ्यापेक्षा कुणावर भाळलो आहे कुठे

हा पसारा मांडण्यातच लोटली इतकी युगे!
अजुन मी कामास माझ्या लागलो आहे कुठे!

भव्य होताना दिसे मज विश्व हे अद्यापही
अजुनही विश्वात मी या मावलो आहे कुठे!

काय सांगू आज मी दुनिया कुणाची नेमकी
मीच या दुनियेत आता राहिलो आहे कुठे

**- चंद्रशेखर सानेकर**
भ्रमणध्वनी ९८२०१६६२४३

## तरुण

पंचविशीचा एक तरुण, सोज्वळ चेहऱ्याचा
घरी येऊन रद्दी घेऊन जातो
आल्याआल्या नजर कोपऱ्यातल्या रद्दीकडे
गासडी बांधायची, स्प्रिंगकाट्यावर तोलायची,
त्याच्या हातांची लगबग पाहत राहावीशी.
''आठ किलो'' निर्विकारपणे म्हणतो, पैसे पुढे करतो
कसंतरीच वाटतं त्याचं असं थंड वागणं
''ठहरो तो, पानी लाती हूँ। चाय पिओगे?''
घाईघाईनं म्हणतो, ''नहीं नहीं... आप कष्ट मत उठाइए।''
अरे वाः। चांगलं बोलता येतंय की याला
मग सुरूच, रिकामटेकडी चौकशी
''पापा बिलकुल नहीं आते आजकल...
तुमही सम्हालते हो सारा काम?''
''जी हाँ'' नम्रतापूर्वक लघुउत्तर, निघण्यासाठी घूमजाव
घाईघाईनं विचारते मी, भोचकपणे नाही, आपुलकीनंच
''पढाई कितनी हुई तुम्हारी?''
''ग्रेजुएट हूँ, बी काम'' वळू तो म्हणतो.
ते खरं वाटणं कठीणच, कपडे तर असे मळकटसळकट
देहबोलीतून कष्टाळूपण वाहत असलेलं
आवडत नसावं त्याला त्याच्याकडे असं पाहात राहिलेलं
तरी विचारते, ''शादी हुई?''
सर्रकन भाव बदलतात चेहऱ्यावरचे, उग्र लाल होतो चेहरा
''नहीं करनेवाला शादीवादी'' तीव्र उद्‌गार
''क्यों?'' निसटतोच प्रश्न तोंडातून
प्रयत्नपूर्वक शांत होऊन म्हणतो,
''क्या करेगा शादी करके?
एकही तो कमरा, उसमें माँ-बापू और हम सब...
और सामने ये पहाड रद्दी के हिलनेवाले...''
आणि निघतोच तो गासडी खांद्यावर टाकून

**- उषा मेहता**
भ्रमणध्वनी ९८३३०८४२८३

## झेंडा त्यांचा अन् काठी तुमची

'इनकमिंग फ्री'चे भोक्ते तुम्ही
तुमच्या भिडस्तीला कुठाय आऊटगोईंग!
कुणाची मेहेरनजर
नाही तारणार गडे हो,
तुमचं मुळमुळीत गांडूपण!
'आगाजा'ला पारखे
अन् भ्रांतही तुमची भिंगुळवाणी,
'नाही रे'चं पीत नाही पाणी.
मग कुठली रात नांदती
अन् कुठले दिवस भरजरी!
ही कसली धुंदी!
झेंडा त्यांचा अन् काठी तुमची.
सगळे 'यार' तुमचे वस्ताद निघाले.
चालक ते अन् तुम्ही वाहक सगळे...
कोणत्या निष्ठेचं ओझं घेऊन
चालताहात अनवाणी बापहो!
'युज अ‍ॅण्ड थ्रो'च्या जमान्यात
आणखी तुमचं काय होईल वेगळं?

**- अशोक कोतवाल**
भ्रमणध्वनी ९८५०११७५३९

## जन्मगाव

ओळखीचे पाहिले मी, बदललेले चेहरे
दिसताक्षणी मी, त्यांनी, फिरविलेले मोहरे ।।१।।
नाव, पत्ते, खाणाखुणा, जरी होते तेच सारे
विस्मित मी, भांबावलेला, गेले कुठे ते सोयरे! ।।२।।
गण्या, मन्या, गंपू, बापू, माझेच जानी दोस्त सारे
वाळूवरी घोळक्याने, भटकलो होतो किनारे ।।३।।
सांजवेळी, पारावरी, एकत्र सारे भेटणारे
विस्कळला नंतर कंपू, कधीच ना जे घडणारे ।।४।।
तो शाळेमधला ढढ्ढम, शेंड्यांचा ढब्बूस अण्णू
पण पट्टीचा गाणारा, आमुच्यातील सैगल जणू ।।५।।
ती धामणकर मामींची, शोधितो गबाळी बाळी
शिवणटिपण सर्व गावाचे, करायची एकेकाळी ।।६।।
ते धागे जवळपणाचे, ना, कधीही, उसवणारे
आताच सर्व अंगांनी, अनोळखी भासवणारे ।।७।।
माझ्यापरी अनेक, पंखावर उडूनी गेले
मनसोक्तपणे जे येथे, बालपण होते जगले ।।८।।
आता नव्या पिढीचा, चढवून स्वतःवर साज
राहिले नव्या विटीचे, साम्राज्य उभे हे आज ।।९।।
ते बालपणातील विश्व, का, मातीत मिळून गेले!
माझ्याच जन्मगावाने, मज असे तिऱ्हाईत केले ।।१०।।
गांवाने अंगोपांगी, चढविला नवा पेहेराव
आजीवपणे जपलेले, फक्त ते पुरातन नाव ।।११।।
कुंडली पूर्ण गावाची, ना होती ती राहिली
मांडली पुन्हा काळाने, बलस्थाने बदलून पहिली ।।१२।।
नकाशात आठवणींच्या, ठळकसा अजून गतकाळ
गावावर अंथरलेले, फक्त ते जुने आभाळ ।।१३।।

**– सुमन श्रीराम फडके**
फोन : २४३०८१९४

## गजल

सारेच मनाजोगे घडणार कसे सांगा
आयुष्य मिळालेले जगणार कसे सांगा !
हे युद्ध न कोणाशी, संघर्ष स्वतःशी हा
तुमचेच तुम्ही शत्रू, लढणार कसे सांगा !
छळतील जुन्या गोष्टी, स्मरतील पराभव ते
मग स्वप्न नवे-ताजे, बघणार कसे सांगा !
ते स्पर्श जुने झाले, हे श्वास शिळे झाले
एकांत तसे आता, फुलणार कसे सांगा !
जगणेच नकोसे हे, होईल कधी जेव्हा,
ठरवून कुणी तेव्हा, मरणार कसे सांगा !

**– सदानंद डबीर**
मोबाईल: ९८१९१७८४२०

## निसटून गेलेली वर्षे

निसटून गेलेली वर्षे
आणि त्यांच्या ढिगाऱ्याखाली
चिणले गेलेले
मऊशार पंखांचे, सोनेरी वर्खाचे
सळसळणारे क्षण
नाकारत किंवा विसरत नाहीये मी
मला चकीत करताहेत ते
त्या ढिगाऱ्याच्या पृष्ठभागावर
उगवून आलेले लसलसते हिरवे कोंभ
ओल्या वाऱ्याच्या संगतीनं
तरारून उठलेले.

**– स्मिता प्रकाश मेढी**
भ्रमणध्वनी ८९७६३९७१६९

## एक कविता

बाहेर वर्तुळाच्या मज लोटलेच थेट!
आणि तरीही घडते ही रोजचीच भेट!

आयुष्य हे दिलेले आनंद मानण्याचे
तरीही मनात आहे तुमच्याच; काटछाट!

या बोंबलून आता, गा गोडवे स्वतःचे
भरती तशीच ओहोटी, फसवील एक लाट!

कळणार नाही तुम्हा, आला कुठून वारा
जी बाग लाविली हो, होईल ती सपाट!

समजून वागण्याचे आले दिवस; तरीही–
तुमच्या अशाच सवयी, हसता तुम्हीही खोटं!

गुर्मीत भावनेच्या घ्या हो पिटून टाळ्या
जरका न झोप आली, नासेल हो पहाट!

येताच मी समोरी, ढळते नजर अता का ?
खेळू तरीही आता मांडून सारीपाट!

**– प्रदीप गुजर**
फोन – २५३३ ९००२

## मी माती हरवून आल्यासारखा

आई बाजारातून आल्या आल्या
मी आईच्या पिशव्या चाचपडायचो
तिनं आणलेल्या चीजवस्तूस असायचा
मातीचा वास
अगदी माझ्या बालभारतीच्या पाठ्यपुस्तकास
तसाच अंकलिपीसही तो बिलगून
असायचाच
आता माझी मिसेस मॉलला जाते
कॅटबरी, मॅगी, चिप्स, बर्गर, पिझ्झा इत्यादी इत्यादी
पिशव्या भरभरून घेऊन येते
तरीही मला सारखं वाटत राहतं की
मिसेस काहीतरी आणायचं विसरलीय
मी माती हरवून आल्यासारखा
दुःखीकष्टी...
कुणाच्या तरी मौतीला गेल्यासारखा; मी मातीला जाऊन
येतो...

**– ऐश्वर्य पाटेकर**
भ्रमणध्वनी ७५८८०१६५५९

## तिची कविता

ती भेटायची तेव्हा, तिच्या असण्यातून जाणवायची
तिच्या मनातली कविता
कवितेची रसरशीत कांती
मिरवायची ती अंगाखांद्यावर!
कविता म्हणजे पंचप्राणच तिचा
चमकत्या डोळ्यांतून दिसणारा...
मध्यंतर : तिच्या आयुष्याचं अन् कवितांचंही
शब्दांत रंगलेलं मन, अंगांगात भिनलेली कविता
पाय मात्र कायम जमिनीवरच तिचे...
तेच ते सौम्य हसू... चांदण्यासारखं...
वास्तवाच्या चटक्यात होरपळताना,
त्यागाचं कवच लपेटलं तिनं सर्वांगावर
कविता मनाआड करून
रेंगाळत जाणाऱ्या दुखऱ्या वाटेवर...
ती चालत राहिली आपल्या कवचासह...
...चटक्यांचा वणवा आणि वेदनेचा डोंब
केविलवाण्या हताशेची लकेर
दिसू लागली तिच्या विझलेल्या डोळ्यांत...
कवितेचं लेणं उतरवूनच टाकलं तिनं कधीतरी...
त्यागाच्या कवचकुंडलांचा भार सोसेनासा झाल्यावर
आतला भयाण भकास चेहरा लपवत...
ती पाय ओढत चालत राहते.
अनोळखी वाटांवरून भ्रमिष्टपणे...
तिची कविता तिला कधीच सोडून गेलीय...

**– शकुंतला मुळ्ये**
भ्रमणध्वनी ९८६३१३८५९७

## ताबा

देहाचे जर
देऊळ आपले
त्याचे का मग
दोर कापले
ज्याचे त्याचे
ज्याला त्याला
का न इथे
लखलाभ
हवा कशाला
ताबा त्यावर
गावाचा साऱ्या
यांना
वाजवू द्या ना
वाद्य तेथले
ज्याचे आहे
त्यांना

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**
भ्रमणध्वनी ९९६०४९३६२२

## शब्दात मी जरासा...

शब्दात मी जरासा, गुंतून आज गेलो
अव्यक्त भावनांचे, तोडून पाश गेलो...
लिहिली जरी कधी मी, तुटकीच एक ओळ
ओळीत फक्त एका, सांगून सर्व गेलो...
ओठी हसू तिच्याही, कारण विनोद माझा
हसण्यात तिच्या धुंद, हरवून भान गेलो...
आठवणी अधीर तिच्याही, आहेत अजून ओल्या
पावसात जुन्या मला मी, भिजवून साज गेलो...
'नाही' म्हणोनी तूही केलीस चूक मोठी
चुकून मीही वेडा, निघून दूर गेलो...
सांगू कसे तुला मी, सगळा बनाव झाला
माझ्या मनास मीच, फसवून साफ गेलो...
अव्यक्त भावनांचे, तोडून पाश गेलो...

**– अंजली श्रीराम दासखेडकर**
भ्रमणध्वनी ९७३०६७२७२२

## एका घासानं उपाशी

जेवताना
ताटातला पहिला घास
ती अंगणात काढून ठेवते
परदेशात गेलेल्या तिच्या मुलासाठी
अगदी रोज... आठवणीनं!
तिला उगीचंच वाटतं
एखादा परदेशी पक्षी येईल
चोचीत घास घेईल
अन् मुलाला नेऊन देईल.
पण तसं होत नाही
पक्षी येतो
घास खातो
अन् विरघळून जातो घरट्यात
परदेशातला तिचा मुलगाही
हॉटेलात जातो
खातो
पितो
अन् विरघळून जातो पेल्यात
इथे मात्र रोज
त्याची आई त्याच्यासाठी
एका घासानं उपाशी!

**– प्रशांत असनारे**
भ्रमणध्वनी ९७६३७१४३०४

## मर्म आठवणींचं

आपलं मन चांगलं-वाईट
असं दोन्हीही साठवत असतं,
त्यामुळे खोदलं की नेहमी
खजानाच गवसेल असं काहीही नसतं
जुन्या जीवघेण्या आठवणींचे अवशेषही
त्याच तिथे कुठेतरी असतात,
कितीही नको वाटल्या तरीही
आठवणी काही पाठ सोडत नसतात.
काळ सरतो,
तसं चालत राहतो आपण
कारण थांबायची मुळी काही सोयच नसते,
पण अचानक एका बेसावध क्षणी
मान वळते नि भूतकाळाची सावली
वर्तमानात डोळे ओले करते
पुन्हा स्वतःला सावरावं लागतं
बळेच का होईना, पण पुन्हा एकदा हसावं
लागतं,
भरकटलेल्या मनाला
सुंदर भविष्याचं आमिष दाखवून का होईना,
पण भानावर तर आणावंच लागतं
...पण भानावर तर आणावंच लागतं।।

**– स्नेहल राजेंद्र मिरगणे**
भ्रमणध्वनी ९६२३१९९४५३

## अस्वस्थ युगाचा शिलालेख!

दुःख म्हणजे काय?
माझ्या जन्मापासूनच्या आयुष्यातल्या जगण्यातले कोरीव शिल्प
जे कधीच भंग पावले नाही; कष्टाच्या अमर्याद यातनेनंतर
ते माझ्यासोबत राहिले,
प्रिय,
तुझे विश्व जे प्रस्थापितांचे
माझे विश्व बकाल जगणाऱ्या विस्थापितांचे
इथल्या नैतिक, अनैतिक या पारलौकितात वावरताना
म्हंतात की 'प्रेमात नि युद्धात सारे क्षम्य असते'; परंतु
इथल्या वास्तवात जगताना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते
हे तुला वेगळे काय सांगावे!
प्रिय,
मी पाण्यासाठी संघर्ष करतोय
मी भुकेसाठी संघर्ष करतोय
मी नोकरीसाठी संघर्ष करतोय
मी जगण्यासाठी संघर्ष करतोय
आणि
तू कशी जगतेयस –
आयुष्यातल्या मूलभूत समस्या तुझ्याकडे नाहीतच
ऐषोआराम जगण्यासाठी छानपैकी चाललेय
माझ्या लिखित, छापील कवितांवर तू माझ्यावर प्रेम करते आहेस
याचे मला आश्चर्य वाटते!
तुझ्या मनात प्रेमाची तृष्णा
माझ्या मनात जगण्याची तृष्णा
दूरवर क्षितिजाकडे पाहिले तर
जिथे आकाश जमिनीवर टेकले आहे असे वाटते
खरे तर हा नजरेचा भास असतो
हे तुला माहीत आहे का?
की तू माझ्या दुःखावर फुंकर मारते आहेस.
प्रिय,
काळ किती बदललाय
आजच्या युगात तुझा धर्म मरण पावलाय
या आंधळ्या श्रद्धेच्या नावाखाली शोक करू नयेस
विज्ञानयुगात वावरतोय आपण
कालपरवाचे पुरातन संघर्ष रद्दबातल ठरले आहेत
स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीला जागे करून
काळाची पावले ओळखून पुढे ये
प्रिय,
ह्या फाटक्या माणसात तू काय पाहिलेस
मनावरल्या बुरसटलेल्या जळमटांची पारंपरिकता झुगारून ये
पुरोगामी विचारांच्या पावलांनी ताठ मानेने माझ्या समतेच्या गावात ये
तुझे नाव माझ्या ह्रदयावर कोरून ठेवीन
तू माझ्याकडे येताना इथल्या जाति-धर्माच्या तटबंदीच्या भिंती कोसळोत
खरे तर हा तुझ्या-माझ्यातल्या प्रेमाचा आविष्कार असेल
माझे जगणे छापील मजकुरासारखे नाही
प्रिय,
तू माझी बोलीभाषा आणि मानवतेची लिपी वाच
मी,
इथल्या अस्वस्थ युगाचा शिलालेख!

**– बबन लोंढे**

भ्रमणध्वनी ९८९२९३७५०८

## कलंदराचा कवडसा

मृगजळाचा भास माझा, राहू दे आहे तसा
मयसभेचा आभास हा, राहू दे आहे तसा
चकोराचे चंद्रचांदणे, भावणार मज नाही
मुक्त वावर अंधाराचा, राहू दे आहे तसा
देखणे घर असावे ही आकांक्षा नाही
हा इमला पत्त्यांचा, राहू दे आहे तसा
देवनागरी लिपी रुचणार मज नाही
सराव मोडी लिपीचा, राहू दे आहे तसा
शिवधनुचे जड ओझे झेपणार मज नाही
इंद्रधनुचा चापबाण, राहू दे आहे तसा
जेवण गोडाधोडाचे रुचणार मज नाही
भाकरीचा घास साधा, राहू दे आहे तसा
जड ओझे विद्वत्तेचे मज नाही सोसणार
निसर्गाचा ध्यास वेडा, राहू दे आहे तसा
मैफल सप्तसुरांची खुणावीत मज नाही
वेणुनाद श्रीहरीचा, राहू दे आहे तसा
चौकटीतली जीवनशैली रुचणार मज नाही
कलंदराचा कवडसा, राहू दे आहे तसा

**– सरोज जोशी**
फोन : २५२५ ०३१७

## आधार

...आणि, खचाखच भरलेल्या बसमधून प्रवास करताना,
तुझ्या डोळ्यांतला आपुलकीचा भाव आठवत असतो,
म्हणूनच सुसह्य होते...
ओशट घामाची दुर्गंधी, 'आगे बढो'ची काळीशार आज्ञा,
आणि अंगाला भिडणारे निर्दय, बेफिकीर धक्के!
...जाणवतंय म्हणून जिवंत, असे ठरवताना,
वास्तवाशी भिडताना, जपलेला असतो...
तुझा एखादा कटाक्ष, परतीच्या वाटेवरचा...
...विझण्याच्या वाटेवरचे हे जगणे,
कसे ओघळत असते, प्रत्येक क्षणा क्षणातून...
...तुझ्या पातळ ओठातून सहज पसरणारे चांदणे,
मला आकाशाची मूठ देते...
विजेच्या वास्तवाचे जगणे सोसण्याकरिता...
...कसलाच सोस नसतो, स्थितःप्रज्ञ रानफुलांना,
पण हळुवार झुळुकेचा पाळणा जेव्हा त्यांना झुलवून जातो,
... तेव्हा त्यांनाही फुटतात आनंदाच्या पारंब्या...
विशाल वटवृक्षासारख्या ... अथांग!
...तुझ्या अस्तित्वाने, माझे जगणे साकारले आहे...
वेलीने, वृक्षाला आधार दिल्यासारखे!

**आनंद श्रीधर सांडू**
भ्रमणध्वनी ९८२१०७१९८५

## विनम्रता

आभारी आहे मी तुमचा
तुम्ही मला असंख्य शिव्यांची लाखोली वाहिल्याबद्दल
आभारी आहे मी तुमचा
भरचौकात तुम्ही माझ्या श्रीमुखात भडकावल्याबद्दल
आभारी आहे मी तुमचा
चारचौघांत तुम्ही मला अपमानित केल्याबद्दल
माझ्या आभाराला तुम्ही
माना अथवा नका मानू
पण माणूस म्हणून माझं कर्तव्य ठरतं नाइलाजानं
तुमचे आभार मानण्याचं
कारण मी माणूस आहे
तुमच्यातला माणूस आणि तुमच्यातलं माणूसपण
तुमच्याच उन्मत्त ओझ्याखाली
मरून पडलंय
म्हणून माझी ही विनम्रता
मृतकाशी लढा देणं माझ्या मनाला पटत नाही.

**– सुरेश पाचकवडे**
भ्रमणध्वनी ९८२२७१६५८२

## रंग उडालेला कॅनव्हास

गर्दनिळे थकलेले म्हातारे आभाळ
डोक्यावर घेऊन तू चालतेस
पांढऱ्याफटक कपाळासहित हिरवंकंच माळरान तुडवीत
ऐन मोसमात अळणी झालेले तुझे गुलाबी यौवनगाणे
भगव्या विरक्तीत बेसूर झाले
खरे तर,
तुलाही होता आले असते
बेताल काळ्यामायेच्या जंगलातील सळसळती नागीण.
रगविताही आल्या असत्या जांभुळरात्री
मंद दिव्याच्या आंधळ्या उजेडात.
शरीरच शरीराला खायला उठते तेव्हा
हळुहळू विरघळत जाते नीतीमत्ता, संस्कृतीची साखर.
ओठांवर येते लालजर्द रक्ताळ लाली.
गालावर पडते बेफिकिरीची ढवळी खळी
डोळ्यांतून परागंदा होते लाजेचे केशर.
मातेरं झालेल्या आयुष्यावर फासला जातो गेरू.
पण,
तू मात्र झुंजत राहिलीस माथ्यावरील अदृश्य रेषांशी.
कष्टातून उभी राहिलेली तू
मातीत राब राब राबताना झालीस मातीची.
तुझ्या निढळ घामाचा घमघमाट पसरला सर्वदूर
अन्
तुझ्या कपाळावर कुंकवाऐवजी ठसठशीत झाले
आत्मविश्वासाचे इंद्रधनुष्य.
बेरंगी कॅनव्हासवर तुला कसे चितारू
माझ्या अनोळखी बये?

**– भगवान निळे**
भ्रमणध्वनी ९७०२१४६९९०



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

'आजच्या तरूण पिढीवर माझा प्रचंड विश्वास आहे. भविष्यात स्थैर्य आणि भरभराट आणण्याकरता ही पिढी फार महत्त्वाची आहे. म्हणूनच अजूनही वेळ गेलेली नाही. आजच असाध्य ते साध्य होऊ शकते, फक्त प्रयत्नाची जोड महत्त्वाची.'

डॉ. पी.एस.रामाणी यांनी व्यक्त केलेले हे विचार आहेत, त्यांच्या ग्रंथालीने नुकत्याच प्रकाशित केलेल्या पुस्तकात. त्याचे नाव आहे 'तणावमुक्त जीवन – तरुणांपुढील आव्हान.'

डॉक्टरांचा परिचय आपणास आहेच. एक प्रख्यात न्यूरो आणि स्पायनल सर्जन म्हणून, आणि दुसरा लेखक म्हणून. 'न्यूरोस्पायनल सर्जन असोसिएशन'चे अध्यक्ष, 'जागतिक आरोग्य संघटनेच्या स्पाइन कमिटी'चे चेअरमन असलेले डॉ. रामाणी याच विषयातील नियतकालिकांचे संपादक देखील आहेत. गेली चाळीस वर्षे भारतात स्पायनल सर्जरीचा विकास व्हावा म्हणून त्यांनी प्रयत्न केलेला आहे. इतका मोठा व्याप पाठीशी असतानाही त्यांच्या नावावर आजमितीस तब्बल ४२ प्रकाशित पुस्तकांची राशी जमा आहे. आणि ती बहुतेक सर्व त्यांच्याच विषयाशी संबंधित आहेत, तरीही ती सर्वांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरावीत अशी आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक होय.




आजची तरुण पिढी आपापल्या क्षेत्रात झपाटल्यासारखी भरारी घेत आहे. नावलौकिक प्राप्त करीत आहेत. स्पर्धेत टिकून राहण्याची धडपड करत आहे. त्याचबरोबर पैसाही प्रचंड कमावण्याचे ध्येय ठेवून आहे. ही प्रगतीची, संपन्नतेची घोडदौड नक्कीच आशादायक आहे. वर्तमान आणि भविष्यकाळ यातील आर्थिक स्थैर्याचा पूल मजबूत करण्यासाठी ती आवश्यकही आहे. म्हणून या तरुणांची ही धावपळ, ओढाताण 'करिअर' या गोंडस नावाखाली वर्तमानाची गरज ठरल्यासारखी झाली आहे. पण... पण आरोग्याचं काय? शारीरिक, मानसिक, सामाजिक, आध्यात्मिक, कौटुंबिक आरोग्याचा वृक्ष पैसा नावाच्या उन्हात करपून जात आहे, त्याचे काय? हा वृक्ष आजच्या इतकाच बहारदार, डेरेदार आणि फुलाफळांनी लगडलेला दिसावा ही भविष्यकाळाची आस पूर्ण करणार कोण, हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि नुसता विचार नाही तर त्याच्यावर अंमल करण्याची गरज आहे. तीही आजच. उद्या नाही. हा आग्रह डॉ. रामाणी यांनी या पुस्तकात ठामपणे मांडला आहे. तो नुसता तरुणांसाठी आहे असे समजण्याचे कारण नाही. पालकांनीदेखील त्याकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे. नव्हे, ती त्यांची जबाबदारी आहे.

डॉ. रामाणी आज ७६ वर्षांचे आहेत. आजही ते जवळपास वर्षाकाठी चार मॅरेथॉन स्पर्धांमध्ये भाग घेतात. त्यांनी त्यांच्या प्रांतात मिळवलेला लौकिक जागतिक स्तरावरचा आहे. यापाठी आहे त्यांची शिस्त, कार्यक्षमता, स्वयंप्रेरणा, निर्णय घेण्याची पद्धत/ व्यवस्थापन, धोरण, धाडस, संवादचातुर्य, पुढाकार घेण्याची वृत्ती आणि कुवत. या अनुभवाचे संचित केवळ आपल्यापुरते बंदिस्त न ठेवता ते इतरांना सांगावे, इतरांनाही आपल्यासोबत आरोग्यमय जीवन जगण्याचा आनंद मिळावा, या हेतूने या पुस्तकाचे लेखन झाले आहे. आणि ते आजच्या धडीला तितकेच महत्त्वाचे देखील आहे. यात डॉक्टर म्हणून आलेले अनुभवही आहेतच. त्यामुळे प्रयोगशाळेत सिद्ध झालेल्या निष्कर्षांचे हे साध्य आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. जीवनात आनंद फुलला पाहिजे, तो फुललेला पाहताना इतरांनाही आनंद वाटला पाहिजे, हे समजून घेण्यासारखे आहे. गरज आहे ती त्यांनी केलेल्या सूचना पाळण्याची, अंगिकारण्याची.

सदरचे पुस्तक आपल्यासमोर आले आहे ते लेखसंग्रहाच्या रूपाने. हे लेख अनुभवाच्या मुशीतून निघालेले असल्याने त्यांचा अस्सलपणा थेट मनाला भिडणारा आहे. निष्णात शस्त्रक्रियेइतकाच लेखणीचा सराईतपणा ही डॉक्टरांची खासियत. यात नुसतेच उपदेशाचे डोस नाहीत, तर उपायांची मात्राही विषयानुरूप दिलेली आहे. तीही सोप्या पद्धतीने. दैनंदिनीत तिचा उपयोग करून घ्यावा अशी लेखक म्हणून त्यांची तळमळ यातून दिसून येते. त्यासाठी काही नामवंतांची उदाहरणेही दिलेली आहेत. समर्पक संतवचनांची अवतरणे दिलेली आहेत. त्यामुळे वैश्विक आध्यात्मिकता यांची जोड लेखांना लाभली आहे.

डॉ. रामाणी यांची आरोग्यावरील सर्वच पुस्तके वाचकांच्या पसंतीला उतरलेली आहेत, त्यांच्या आवृत्तीच्या संख्येवरून हे सगळ्याच्या ध्यानात आहे. तसाच हा प्रस्तुतचा लेखसंग्रहही वाचकांच्या पसंतीला उतरल्याशिवाय राहणार नाही.

- **मूल्य १३० रु. सवलतीत ८० रु.**

# ग्रंथपान

## हिंडताफिरता

संपादन : अरुण शेवते




'अचानक आकाशात ढगांची प्रचंड उतरंड कोसळू लागली एकमेकांवर. पृथ्वीवरल्या खंडापेक्षाही मोठाले ढग. त्यांनी एकदम रेटारेटी सुरू केली. ते रंगाने काळनिळे पडू लागले. आता समुद्र, आकाश सारेच काळसर झाले होते. एकदम त्या अंधारात एखादी ठिणगी पडावी तशी एक लालभडक रेष आकाशात उमटली आणि एकदम पृथ्वीच्या दक्षिण क्षितिजाकडून उत्तरेकडे फराटा ओढल्यासारखी ती रक्तरेखा, आमच्या डोक्यावरून सरसर जाऊ लागली. मी अशा रंगाची वीज कधीही पाहिली नाही.' हा थरारक आणि तितकाच विलोभनीय अनुभव आहे एका भ्रमंतीचा, सागरावरील. जो घेतला आहे दीपक करंजीकर यांनी. त्यांच्या या लेखाचा समावेश आहे तो 'हिंडता फिरता' या पुस्तकात. ज्याचे संपादन केले आहे, ऋतुरंगचे संपादक अरुण शेवते यांनी.

'भ्रमंती' या विषयाला वाहिलेला हा लेख–संग्रह आहे. पुस्तकाचे नाव आले ते त्याप्रमाणे. मुळातला हा याच विषयाला वाहिलेला दिवाळी अंक, ऋतुरंगचा. अरुण शेवते यांची ती खासियत आहे. दिवाळी अंक काढायचा तो बहारदार, पण एक विषय घेऊन. त्यांचा हा चोखंदळपणा रसिकांनाही चांगलाच भावलेला. त्यांच्या प्रत्येक अंकाला रसिकांनी दाद दिली, तीही अगदी ओंजळ भरभरून. 'बापलेक' हा विषय आपणास आठवत असणार, नक्कीच. धागा तोच, फुले वेगवेगळी, ताजी आणि मन प्रसन्न करणारी. ही गुंफण सुरूच आहे, अगदी १९९३ पासून. त्यातला हा एक हार, 'हिंडता फिरता'.

भ्रमंती म्हणजे हिंडणे, फिरणे, प्रवास करणे म्हणजे स्थानांतर करणे, या अर्थाने आपणास माहीत असलेला हा शब्द. त्याप्रमाणे केलेल्या प्रवासांची वर्णने या लेखांमधून वाचायला मिळतात. हा प्रवास आहे लोकल ट्रेनचा, विमानाचा, जहाजाचा, रणगाड्याचा, सायकलचा... मुंबईच्या चेंबूरपासून हिमालयापर्यंतचा. निकोबार, लक्षद्वीपपासून ब्राझील, अमेरिकेपर्यंतचा. हा नुसता प्रवास नाही, तर सोबत आहे तिथला निसर्ग, विविध रूपांत नटलेला. माणसाला आपल्यात सामावून घेणारा, माणसाला भरभरून देणारा. माणसे आहेत आपुलीच्या धाग्यात बांधलेली, आपल्याला माणूसपणाची ओळख देणारी, तर कधी फजितीला सामोरे जायला लावणारी. पण हे पुस्तक वाचल्यानंतर लक्षात येते, एवढीच त्याची मर्यादा नाही. हा प्रवास आहे, मनामनाचा. लेखणीचा, प्रतिभेचा, राजकारणाचा, सामाजिकतेचा. देशांतराचा. सतीश काळसेकरांना भटकंती ही जगण्याचा एक भाग वाटतो, अपरिहार्य. गुलजारांची लेखणी मागोवा घेत राहते प्रवासाच्या प्रत्येक टप्प्याचा, अलवार मनाने. कुमार केतकर हे नुसतेच विश्लेषणातून अमेरिकेचा राजकीय प्रवास घडवत नाहीत, तर तिथल्या भारतीयांच्या स्वप्नाचाही प्रवास घडवतात. विजय कुवळेकर प्रवास घडवतात, करुणानिधी, नंबुद्रीपाद, ए.के. अँटनी यांसारख्या दक्षिणेतल्या राजकारणातल्या माणसांचा. द.वि. अत्रे यांचा प्रवास आहे, कुष्ठरोगी माणसांना माणसात आणण्याचा, माणसाने माणसाला ओळखण्याचा. असे अनेक अनुभव या निमित्ताने आपणास यात वाचायला मिळतात.

या पुस्तकातील लेख साकारलेले आहेत ते अनुभवसंपन्न आणि सिद्धहस्त लेखकांच्या लेखणीतून. रविमुकुल, गिरीश कुबेर, राजीव खांडेकर, प्रदीप म्हापसेकर, दीपक घारे, सुनंदा भोसेकर अशी ही काही आणखी नावे. आपापल्या क्षेत्रात दबदबा असलेली. त्यांची भ्रमंती ही उत्कट अनुभवांची मेजवानी. त्यामुळे सगळेच लेख वाचकांना आपल्याशी हितगुज करायला लावतात. त्यांच्यातली विविधता 'अराउंड दी वर्ल्ड 'ची सफर केल्याचा आनंद देतात. आपले दैनदिन जगणे आणि भ्रमंतीमुळे अनुभवास येणारे जगणे किती वेगळे असते याचा प्रत्यय देतात. शेवते यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'भ्रमंतीत माणूस कधी एकटा असत नाही. भ्रमंतीतून निखळ आनंद मिळतो. आयुष्य समृद्धीकडे नेणारा भ्रमंती हा एक राजमार्ग आहे.'

सतीश भावसार हे चित्रकार आहेत तसे लेखकही आहेत. त्यांनी केलेला सायकल प्रवास जसा अद्भुत म्हणायचा, तशी आतील रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ. हे पुस्तक वाचल्यानंतर कुणाला अशा भ्रमंतीवर निघण्याची प्रेरणा झाली तर नवल वाटायला नको.

• **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



# ग्रंथपान




''दीपक राग केवळ आरोह, अवरोह आणि पकड कळल्याने सिद्ध होत नाही. रागाची बढत करताना त्यात जीव ओतावा लागतो. प्रामाणिक प्रयत्नांती राग सिद्ध झाला आणि आपोआप दीप प्रकट झाले तर, राग आळवणे संपले की हे दीप हळूहळू मंद होत जातात. काही वेळाने आपसूक विझून जातात. पण या रागाच्या गायनाने गायकाच्या देहात गूढ आणि आपसूक न शमणारा देहदाह उसळतो. तो गायकाच्या देहात मुरतो. समर्थ गायकाने आळवलेल्या मेघमल्हार रागात बरसलेल्या जलधाराच तो शमवू शकतात.''

'दीप राग' आणि 'मेघमल्हार' या दोन रागांच्या सिद्धतेभोवती गुंफलेले हे कथानक म्हणजे 'सावन घन बरसे' ही कादंबरी. तानसेन हा अकबराच्या दरबारातील नऊ रत्नांपैकी एक, संगीतसूर्य. तानसेन हे या कादंबरीच्या मध्यभागी असलेले व्यक्तिमत्त्व. एक अग्निपरीक्षा घेणारी घटना त्याच्या आयुष्यात येते, दीप राग आळवण्याची. अकबराची मर्जी आणि मत्सरकेतूंच्या आग्रहापायी त्याला या दिव्याला सामोरे जावे लागते. परिणामी देहदाहाच्या दीपशिखा मिरवत दरबार सोडण्याची वेळ येते. या ज्वाळांवर मेघमल्हाराची बरसात करणाऱ्या ताना-रिरी त्याला शर्मिष्ठा सरोवराच्या काठी भेटतात. आणि त्याचा पुनर्जन्म होतो. हा या कादंबरीचा गुंफणवीण करणारा धागा. त्यामुळे तानसेन ऊर्फ त्रिलोचन मकरंद पंड्या, त्याची मुलगी सरस्वती, पुत्र बिलासखान यांचे तपशील यात येतात. तानसेन अकबराच्या दरबारात होता म्हणून अकबर, बिरबल यांचे चित्रण अपरिहार्य ठरते. परंतु तानसेनाला पुनर्जन्म देणाऱ्या ताना आणि रिरी या भगिनीही या कथानकातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. त्या नुसत्याच लावण्याच्या खणी नाहीत, तर संगीतसाधनेतील त्यांची आराधनादेखील तानसेनापेक्षा कुठेही कमी नाही. म्हणूनच तानसेनला यमसदनास नेण्यास येत असताना मृत्यूला दूर ढकलणाऱ्या ताना - रिरी यांचे यश तानसेनच्या यशाहून उजवे ठरावयास हवे होते असे लेखिकेला वाटत राहते. या भगिनींचे कूळ मंडलेश्वराचे. वडनगरचे मंडलेश्वर. त्यांचे घराणे, आई भक्तिबा, पुत्र नीळकंठ, लोकेश, सुकन्या ताना आणि रिरी यांचाही इतिहास येतो. ते ज्या वडनगरमध्ये राहतात, तिथला इतिहास येतो. सुराष्ट्रातील, गुजरातमधील आजचे सौराष्ट्र, यातील हे वडनगर.

या कथानकाचे बीज सापडले आणि प्रत्यक्षात ते या पुस्तकरूपात सिद्ध झाले, यामधला काळ आहे पन्नास वर्षांचा. संशोधनात्मक लेखन करताना किती आणि कशी धडपड करावी लागते याचे मर्मग्राही वर्णन लेखिकेने त्यांच्या मनोगतात केलेले आहे. तसेच या कथानकाचा काळ जरी अकबराच्या कारकिर्दीचा असला तरी प्रत्यक्षात घेतलेला शोध अकराव्या शतकापासूनचा आहे. त्याची मांडणी करताना कथानकाचा आत्मा हरवणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी त्यानी पारंपरिक ऐतिहासिक कादंबरीची मांडणी स्वीकारली नाही. तर पूर्वीची नांदी, पूर्वभूमिका, उपोद्घात, उपसंहार अशी पद्धती स्वीकारली. अकबराच्या दरबारातील वा महालातील वातावरणासाठी उर्दू आणि वडनगरसाठी गुजराती या भाषेतील शब्दांचा साज चढवण्यात आलेला आहे. यात लय आणि सहजता यांचा तोल सांभाळलेला आहे. आवश्यक तेथे पृष्ठांवर तळटीपा देण्याचे औचित्य दाखवलेले आहे. 'सिंहने कोण कहे के तारु मों गंधाय', 'महायात्राए नीकळेल यात्रिकनो मर्या जिव्यानो आखरी जुहार!' यासारखी वाक्ये त्याची उदाहरणे होत.

'दीप राग' आणि 'मेघमल्हार राग' यांची महती सांगताना संगीतातील स्वर, लिपी, पकड, राग, पदे यांचाही अभ्यास लेखिकेने केला आहे हे सखोल तपशिलावरून लक्षात येते. सोमनाथ महादेवविषयीचे परिशिष्टे सोबत जोडले आहे. वडनगरचे काही फोटो दिले आहेत. शर्मिष्ठा तलाव, ताना-रिरी यांची समाधी, हाटकेश्वराचे मंदिर यांच्याविषयी वाचताना या प्रदेशाला भेट देण्याचा विचार नकळत जागृत होतो. 'माई म्हारो दीपक बुझावो' या वाक्यातील आर्तता काळजाला भिडणारी ठरते. तशी स्त्रियांच्या कर्तृत्वाकडे सजगतेने पाहण्याची भूमिका समाजाने घ्यावी ही लेखिकेची रास्त अपेक्षाही अधोरेखित होते.

स्मिता भागवत यांचे नाव साहित्याच्या प्रांगणात सगळ्यांनाच परिचित आहे. त्यांच्या नावावर असलेली ग्रंथसंपदा म्हणजे भांडारच म्हणावे लागेल. मराठीसोबतच गुजराती, हिंदी आणि इंग्रजी अशा चारही भाषांत त्यांची पुस्तके आहेत. 'सावन घन बरसे' हे पुस्तक त्यांच्या लेखनव्रतावर शिक्कामोर्तब ठरावे. सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही छान झाले आहे.

- **मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.**

# ग्रंथपान

## दत्तकवेणा

प्रगती कोळगे




'मूल ॲडॉप्ट करणं, ते निभावणं आणि सर्वांना सुखदायी करणं ही प्रक्रिया वरवर दिसते तेवढी सोपी नाही. हा नातेसंबंध आहे ज्यामध्ये आईवडील आणि मुलं आपण काही गमावल्याचं, आपल्या हातून काहीतरी निसटल्याचं दुःख घेऊनच एकमेकाजवळ येतात. आईवडिलांना आपण आपल्या वंशाचं मूल जन्माला घालू न शकल्याचं दुःख; तर मुलाला स्वतः जन्मदात्या आईवडिलांपासून दुरावल्याचं दुःख. ह्या दरीला पार करून हा नातेसंबंध जोडायचा आणि निभावायचा आहे.'

'दत्तकवेणा' या पुस्तकात व्यक्त केलेले हे मत. मुळातच दत्तक हा विषय बराचसा अवघड. भावनिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक मनोदौर्बल्याच्या स्तरावर हिंदोळे खेळणारा. माणसागणिक मतमतांरांची घडी उलगडणारा. अशा अवघड विषयाचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न लेखिकेने या पुस्तकात केलेला आहे. त्याची सुरुवातच त्यांनी केली ती, दत्तक की ॲडॉप्शन? या प्रश्नापासून. 'दत्तक' म्हणजे आपल्याच रक्तातले बाळ किंवा नातेवाईकांचे बाळ कायद्याच्या मदतीने सर्वार्थाने आपले करणे. तर आपण जे अनाथालयातून एखादे बाळ आपलेसे करून स्वीकारतो त्याला 'ॲडॉप्शन' हाच शब्द वापरतात. तरी जनमानसात रूढ झालेला शब्द 'दत्तकच.'

मूल दत्तक घेणाऱ्या पालकांचा एक वर्ग असतो. साधारणतः ज्यांना स्वतःचं मूल जन्माला घालणे काही कारणांनी अशक्य असते, तो. परंतु असाही एक वर्ग आहे, ज्यांना स्वतःच्या मुलाऐवजी अनाथालयातील मूल दत्तक घ्यायचे आहे. लेखिकेने दुसऱ्या वर्गातील पालकाचा पक्ष घेतलेला आहे. कुणा एका घर नसलेल्या बालिकेला घर मिळवून द्यायचे, आपले हक्काचे, प्रेमाचे कुटुंब मिळवून द्यायचे व त्या बदल्यात आपल्याला आपल्या बाळाचे हक्काचे प्रेम मिळवून घ्यायचे, हा हेतू ठामपणे मनाशी ठरवलेल्या पालकांचा पक्ष. त्यातून शोध सुरू होतो, तेव्हा लक्षात येते, यासाठीही काही नियम आहेत, अटी आहेत आणि प्रतीक्षाही आहे. दिल्लीची सेंट्रल ॲडॉप्शन रिसोर्स एजन्सी (कारा) ही परदेशवासीयांना मूल दत्तक देऊ शकणारी संस्था. तिचे नियम म्हणजे, भारतीयांना प्राधान्य, परदेशी असेल तर त्यांचे भारतातील वास्तव्य दोन वर्षांचे आवश्यक, किमान वय ४० वर्षांपुढील असावे आणि ज्यांना नैसर्गिकरीत्या स्वतःचे मूल होणार नाही, त्यांनाच दत्तक मूल घेता येते. या नियमात न बसणारे पालक हे कथासूत्रातील मुख्य पात्र. तरीही ते आपल्या निर्णयावर ठाम. त्यातून या विषयाचे अनेक पदर उलगडत जातात. अनाथालयातून मूल घेणे याबाबत अनेक मतभेद. अशा मुलांचा वंश, वृत्ती, मानसिकता, त्यांच्याकडे पाहण्याची समाजाची नजर, भविष्यात येणारे संभाव्य धोके, आपसातल्या नात्यातील रक्ताच्या मुलात आणि या मुलामध्ये येणारी अलिप्तता – भेदभाव, कौतुकाचा फरक, जिव्हाळा, ही त्यांची कारणे.

दुसरा मुद्दा लेखिकेने उपस्थित केला आहे तो सत्य सांगण्याचा. दत्तक मुलाला, तू 'दत्तक' आहेस, हे सांगावे का? आणि सांगायचे तर ते कोणत्या वयात? त्याचे परिणाम काय होतील? सांगितले नाही तर त्याचे परिणाम काय होतील? सत्य कळल्यानंतर दत्तक मुलाचा ओढा पालनकर्त्या आई–वडिलांकडे राहील की जन्मदात्यांच्या शोधाकडे? त्याचवेळी दत्तक घेणारे पालक भीतीच्या दडपणाखाली येतील का? या प्रश्नांच्या अनुषंगाने उत्तरे शोधण्याचा देखील प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. तसाच एक मुद्दा, मुलगा दत्तक घ्यावा की मुलगी? लेखिकेने धरलेला आग्रह हा मुलीचा आहे. त्या पाठची भूमिकाही लेखिकेने आग्रहाने प्रतिपादन केली आहे.

या विषयाला जोडून मानसशास्त्रीय दृष्टिकोण स्पष्ट करणारे डॉ. अनघा बर्वे यांचे निवेदन परिशिष्ट म्हणून सोबत जोडले आहे. समाजात याचा प्रचार आणि प्रसार होत आहे, अजून सकारात्मक जागृती व्हावी ही लेखिकेची तळमळ निवेदन आणि मनोगतातून व्यक्त झाली आहे. विषयाला पुढे नेताना व रंजकता कायम राहावी यासाठी लेखिकेने काही ठिकाणी उदाहरणे, आठवणी, संवाद यांचा आधार घेतला आहे. समाजमन समजून घेण्यासाठी चर्चा, गप्पा, बैठका यातून हा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवला. फ्लॅशबॅक पद्धतीचाही उपयोग केला आहे. 'कृष्णदेवा, तुलाही आम्ही यशोदामय्याचा दत्तकपुत्र मानायचा का? आणि सांग, कर्णाला कळलं की तोही कुंतीमातेचाच मुलगा आहे, त्यावेळी त्याच्या मनाला नेमकं काय वाटलं होतं रे?' असे प्रश्न विचारून लेखिका वाचकालाच अंतर्मुख करते. मातापुत्राचे शिल्प आणि त्याभोवती रुंजी घालणारे सप्तरंगी फुलपाखरू, मनोज आचार्य यांच्या या कल्पनेतून साकारलेले मुखपृष्ठ छानच!

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



*Even a simple good wish can turn into a big achievement if you have enough will.*

Ravindra Sapkal

Happy Diwali & Prosperous New Year

*-With Best Compliments-*



**Ravindra Sapkal**
Chairman & Managing Director



**Kalyani R. Sapkal**
Vice Chairperson

SAPKAL KNOWLEDGE HUB

- Orchid International School ™
- R. G. Sapkal College of Pharmacy
- Late. G. N. Sapkal College of Engineering
- K. R. Sapkal College of Management Studies

**Campus:** Sapkal Knowledge Hub, Kalyani Hills, Anjaneri - Wadholi, Trimbakeshwar Road, Nashik - 422 213, India, Ph.: 02594-220101 - 05, Fax: 02594-220110. Email: info@orchideducation.com Website : www.orchideducation.com

**Corporate Office:** Sapkal Knowledege Hub, "Parag" 46, Ashwin Sector, Opp. Hotel Sai Palace, Mumbai - Agra Highway, Nashik - 422 009. Ph.: 0253 - 2392450/51, Fax : 0253 - 2375557. Email : info@sapkalknowledgehub.org Website : www.sapkalknowledgehub.org



**Supreme**©

People who know plastics best

पाईपिंगचे संपूर्ण समाधान

## आपणा सर्वांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !



## पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची' दर्जेदार, पर्यावरण पूरक उत्पादने...

aqua Gold® – उच्च दाबाची प्लंबिंग प्रणाली

Lifeline® – गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

SILBOND™ FOR EVERLASTING BOND – सॉलव्हंट सिमेंट uPVC आणि C-PVC

indo green™ – गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

AQUAKRAFT™ – बाथ फिटिंग्स्

SILTANK – ओव्हरहेड वॉटर टँक्स्

S.W.R. – ड्रेनेज प्रणाली

SKYLRISE™ – हाय-टेक, लो नॉईज, एस.डब्ल्यू.आर. ड्रेनेज प्रणाली

Nu-Drain™ – भूमिगत ड्रेनेज प्रणाली

**आयुष्यभराची साथ...**

दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव फोन : 0257- 3050541,42,43,44 • www.supreme.co.in